# तृतीय वर्ष कला

## सत्र - VI (CBCS)

## इतिहास अभ्यासपत्रिका क्र. - IV

# मध्ययुगीन भारताचा इतिहास (इ.स.१५२६ ते इ.स.१७०७)

## पेपर कोड - 86513

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के**
स्थानापन्न कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्राचार्य डॉ. अजय भामरे**
स्थानापन्न प्र-कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल बनकर**
सहयोगी प्राध्यापक इतिहास व प्रमुख, मानव्यविद्याशाखा,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक व संपादक** : **प्रा. शिवदास चांगदेव घाडगे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **डॉ. कृष्णा गायकवाड**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
एल. जे. एन. जे. महाविद्यालय, विलेपार्ले (पूर्व), मुंबई.

: **डॉ. भानुदास डी. शिंदे**
इतिहास विभाग प्रमुख,
महात्मा फुले कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
पनवेल, जि. रायगड.

: **प्रा. अविनाश कै. पवार**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालय, कळंबोली, नवी मुंबई - ४१०२१८.

**मे २०२३, प्रथम मुद्रण**

**प्रकाशक**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**अक्षरजुळणी**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय, सांताक्रुझ, मुंबई

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | सम्राट जहिरूद्दीन महंमद बाबर | ०१ |
| २. | हुमायून व शेरशहा | २२ |
| ३. | सम्राट जलालुद्दीन मोहमंद अकबर | ४६ |
| ४. | बादशहा जहांगीर व शहाजहान | ६५ |
| ५. | मोगल बादशहा औरंगजेब (१६५८-१७०७) | ९० |
| ६. | मोगल प्रशासन व्यवस्था | ११२ |
| ७. | मराठी सत्तेचा उदय व विस्तार | १३८ |
| ८. | मुघल काळातील सामाजिक जीवन | १६७ |
| ८अ. | मुघल कालीन आर्थिक परिस्थिती | १८२ |
| ९. | मुघल काळातील धर्म, शिक्षणव्यवस्था व साहित्य | १९८ |
| १०. | मुघल काळातील कला आणि स्थापत्य कला | २१४ |


*****

# T.Y.B.A. History

## SEMESTER -VI

## Core Course: IV- History of Medieval India (1526 CE-1707CE)

Objectives:

1. To acquaint the students with the history of India since the emergence of the Mughal rule.
2. To understand administration of the Mughal Empire.
3. To study the rise of the Maratha Power.

**Module I: Foundation, Expansion and Decline of the Mughal Rule**

(a) India on the eve of Mughal Rule; Invasion of Babur
(b) Humayun, Shershah and Akbar
(c) Jahangir, Shahjahan and Aurangzeb

**Module II: Administrative Structure of the Mughals**

(a) Central and Provincial Administration
(b) Mansabdari System
(c) Revenue and Judicial system

**Module III: Rise of the Maratha Power**

(a) Shivaji and Foundation of Swarajya
(b) Administration of Shivaji
(c) Sambhaji, Rajaram and Tarabai

**Module IV: Society and Economy, Religion and Culture of the Mughal Rule**

(a) Society and Economy
(b) Religion, Education and Literature
(c) Art and Architecture

**References:**

Athar Ali, *The Mughal Nobility under Aurangazeb*, Asia Publishing House, Aligarh Muslim University, 1966.

Aziz Abdul, *The Mansabdari System and the Mughal Army*; Lahore, 1945.

Chitnis, K. N., *Glimpses of Medieval Indian Ideas and Institutions*, Atlantic Publishers & Distributors, 2009.

Chopra P.N. *Some Aspects of Soceity and Culture in the Mughal Age (1526-1707*, IInd , edi., Shivlal Agrawal and Co. Ltd, Agra, 1963.

Habib Irfan, *The Agrarian Systems of Mughal India (1526-1707),* Bombay Asra Publication House, 1957.

Majumdar R.C., *The History and Culture of Indian People*, Vol. IV, The Delhi Sultanate, Bombay, 1967, Vol Vii, 1987.

Mishra Rekha, *Women in Mughal India (1526-1748 A.D.),* Munshiram Manoharla, Delhi, 1967.

Moosvi Shireen, *The Economy of the Mughal Empire*, Oxford University Press, New Delhi, 1987.

Moreland, W. H., From *Akbar to Aurangzeb - A Study of Indian Economic History,* Macmillan & Co., Ltd, London, 1923.

Raychaudhari T.S. Habib Irfan(ed*), The Cambridge economyc history of India*, London, 1992.

Roy Choudhary, M. L., *The State and Religion in Mughal India*, Indian Publicity Society, Calcutta, 1969.

Sahay, B. K., *Education and Learning under the Great Mughals 1526-1707 A.D*, New Literature Publication, Bombay, 1972.

Saiyid Nurul Hasan, *Thoughts on Agrarian Relations in Mughal India*,People's Publishing House, New Delhi, 1973.

Sarkar Jadunath, *Mughal Administration*, Published by Patna University, 1920.

Sarkar Jadunath, *Shivaji and his Times*, IInd ed., Longman, Green & Co, London, 1920.

Sharma S.R., *Mughal Government and Administration*,Hind Kitab, Bombay, 1951.

Sharma S.R., *Mughal Empire in India*,Karnataka Printing Press, Bombay, 1934.

Siddiqui, N. A., *Land Revenue Administration under the Mughals (1700-1750)* Asia Publishing House, Mumbai, 1972.

Srivastava A.L., *The Mughal Empire (1526- 1803 A.D.* ), Shiva Lal Agarwal & Co. Ltd., Agra, 1974.

**Marathi Books**

Acharya Dhananjay, *Madhyakalin Bharat (1000-1707),* Shri Sainath Prakashan, Nagpur, 2008.

Chaubal J.S., *Ase Hote Mughal*, Maharashtra Rajya Sahity Sanskruti Mandal Mumbai, 1992.

Karmarkar, Oturkar, ed., Vijayanagar Smarak Granth, Bharat Itihas Sansodhan Mandal, Pune, 1936.

Kathare Anil, *Madhyayugin Bharat*-1000 -1707, Prashant Publication, Jalgaon, 2013.

Kolarkar S.G., *Madhyakalin Bharat(1206-1707*), Mangesh Prakashan, Nagpur, 1992.
Mate M. S., *Madhyayugin Maharashtra- Samajik Aani Sanskritik Jivan(1300-1650*), Maharashtra Rajya Sahitya Aani Sanskriti Mandal, Mumbai, 2002.
Sardesai G. S., *Musalmani Riyasat*, Bhag 1 Ani 2, Popular Prakashan,Mumbai, 1993.
Sardesai G. S., *Marathi Riyasat*, Popular Prakashan, Mumbai, 1993.

# १

# सम्राट जहिरुद्दीन महंमद बाबर

**घटक रचना**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ बाबराच्या आक्रमणावेळची परिस्थिती

अ) राजकीय परिस्थिती:

१) दिल्ली २) बंगाल ३) काश्मीर

४) गुजराथ ५) माळवा ६) खानदेश

७) सिंध व मुलतान ८) बहामनी राज्य ९) पंजाब

१०) जोनपूर ११) मेवाड १२) विजयनगरचे हिंदू साम्राज्य

ब) सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती

क) आर्थिक परिस्थिती

१.३ बाबराचा परिचय

१.४ समरकंदचा सत्ताधीश

अ) समरकंदच्या आकर्षणाची कारणे.

१) वैभव शाही शहर २) राजकीय वर्चस्व प्रस्थापित करणे.

३) तेमूरलंग बद्दलचा अभिमान

१.५ हिंदूस्थानावरील स्वारीची कारणे.

१) मध्य आशियातील अपयश २) हिंदूस्थानच्या संपत्तीचे आकर्षण

३) धर्मप्रसाराची ओढ ४) बाबराचे लष्करी सामर्थ्य

५) वृद्धस्त्रीपासून प्रेरणा ६) भौगोलिक सान्निध्य

७) भारतातील दुबळ्या राजकीय सत्ता

१.६ भारतावरील स्वाऱ्या व साम्राज्य विस्तार

१.७ पानिपतची लढाई २१ एप्रिल १५२६

अ) सैन्यरचना

ब) पानिपतचा संग्राम

क) बाबराच्या विजयाची कारणे.

१) लोदीची जुलमी राजवट २) लोदीचे दुबळे लष्कर

३) लोदीकडे मुत्सद्देगिरीचा अभाव ४) बाबराचे कुशल नेतृत्व

५) बाबराचा तोफखाना व बंदुका

ड) पानिपत युद्धाचे परिमाण

१) लोदी घराण्याचा अंत २) सुलमान शाहीचा शेवट
३) प्रचंड प्राणहानी ४) राणासंगाचे स्वप्नभंग
५) बाबर दिल्लीचा पातशहा
१.८ खानुआची लढाई १८ मार्च १५२७
अ) खानुआच्या युद्धाची कारणे.
१) बाबर - राणासंग यांच्यातील वाद २) राणासंगाची अपेक्षा भंग
३) राणासंगाचा निजामखानावर विजय ४) राणासंगाची महंमद लोदीला मान्यता
ब) राणा संगाचा परिचय
क) बाबर-राणासंग यांच्यात संघर्ष
क) राणासंगाच्या पराभवाची कारणे.
१) बाबराने धर्मयुद्ध पुकारणे. २) सामुदायिक युद्धाचा अनुभव नव्हता
३) प्रभावी तोफखाना ४) बाबराचे लष्कर
५) राणा संगापेक्षा बाबर श्रेष्ठ
ई) खानुआच्या युद्धाचे परिणामः
१) राजपूत संघ दुबळा झाला. २) रजपुतांचे वर्चस्व संपले.
३) बाबराच्या नव्या जीवनाला प्रारंभ ४) मोगल सत्तेची स्थापना
१.९ चंदेरीवर विजय २९ जाने. १५२८
१.१० घाग्राची लढाई ६ मे १५२९
१.११ बाबराची योग्यताः
१) सर्वगुण संपन्न व्यक्तिमत्व २) कुटुंब वत्सल
३) बाबराची लष्करी गुणवत्ता ५) बाबराचे प्रशासन
४) कट्टर धर्माभिमानी ६) कलेचा भोक्ता ७) निसर्गवेडा
१.१२ सारांश
१.१३ प्रश्न
१.१४ संदर्भ

## १.० उद्दिष्टे

१) बाबराच्या आक्रमणा वेळची भारतातील राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थिती समजावून घेणे.

२) पानिपत युद्धाची माहिती प्राप्त करणे.

३) खानुआच्या युद्धाचे स्वरूप समजावून घेणे.

४) बाबराची योग्यता सांगणे.

## १.१ प्रस्तावना

१६ व्या शतकात हिंदुस्थानच्या भूमीवर एक नाट्यमय रंगमंच उभा राहिला होता. त्यात सत्ता संघर्ष मोठ्या प्रमाणात चालत असे. दिल्लीची गादी म्हणजे सर्व हिंदुस्थानावर सत्ता मिळवल्या सारखे होते. राजकीय परिस्थितीचा विचार करता सामर्थ्यशाली सत्ता नव्हती. दिल्लीवर सुलतानाची सत्ता कमकुवत बनली होती. संपत्ती मिळवण्याच्या हेतूने अनेकांनी आक्रमण करून संपत्ती मिळवली. त्या मध्येच बाबराने आक्रमण केले आणि संपत्तीबरोबर सत्ता प्राप्त केली.

## १.२ बाबराच्या आक्रमणावेळची परिस्थिती

### अ) भारतातील राजकीय परिस्थिती:

### १) दिल्ली:

महमंद घोरीने पृथ्वीराज चव्हाणचा ११९२ तराईनच्या युद्धात पराभव करून, दिल्लीची सत्ता मुसलमानांनी हाती घेतली. अल्लाउद्दीन खिलजी व महंमद तघलकाच्या काळात सर्व हिंदुस्थान सत्ता निर्माण झाली. परंतु नंतर सुलतानशाहीला उतरती कळा लागली. तैमुरलंगाने आक्रमण करून भयानक हत्याकांड व लुटालुट केली. खिज्रखान सय्यदने १४१३ दिल्लीची सत्ता ताब्यात घेतली. शेवटी सय्यद सुलतान दिल्ली सोडून जाताना बहलोल लोदीने गादी मिळवली. त्याने पंजाब, जौनपुर, बुंदेलखंड, पश्चिम, बिहार, इ. भाग ताब्यात घेतले. त्याचा मुलगा सिंकंदरखानाने राज्यात स्थैर्य प्राप्त केले. त्यानंतर इंब्राहीम खान गादीवर आला. जौनपूरच्या राज्यावरून इब्राहीमखान व भाऊ जलालखान यांच्यात वाद होऊन, जलालखानाला ठार मारले. इब्राहीमखान संशयी, शंकेखोर स्वभावाचा होता. त्याने जलालखानाला मदत करणाऱ्या सरदारांना कैदेत टाकले व ठार मारले. सत्ता टिकवण्यासाठी रक्तपात, जुलूम, हत्या करत असे. पंजाबचा राज्यपाल दौलतखान यांने दिल्लीत भेटीसाठी यावे असा हुकूम इब्राहिमखानाने काढला. पण दौलतखानाने आपला मुलगा दिलावरखान याला पाठवले. त्यामुळे इब्राहिमखान रागवला व दिलावरखानास शिक्षा दिली. म्हणून दौलतखानाने बाबरला हिंदुस्थानावर स्वारी करण्याचे निमंत्रण दिले.

### २) बंगालः

१२ व्या शतकात महंमद खिलजीने बंगालचा प्रदेश जिंकला तेथे दिल्ली सुलतानची सत्ता प्रस्थापित झाली. खिलजीनंतर अधिकारी स्वतंत्रपणे वागू लागले पण बलबनाने दिल्लीची सत्ता पुन्हा बंगालवर निर्माण केली. १३३९ मध्ये अल्लाउद्दीन अलीशहाने स्वतःस बंगालचा शासक म्हणून घोषीत केले. त्याला दिल्लीपती फिरोजशहा तुघलकने यांनी मान्यता दिली. बंगाल प्रांत स्वतंत्र्य झाला. १४९३-१५१८ पर्यं अल्लाउद्दीन हुसेनशहां गादीवर होता. १५१८ मध्ये नासिरूद्दीन नसरतशहा बंगालच्या गादीवर आला. त्याला दिल्लीच्या राजकारणात रूची नसल्याने बावरच्या आक्रमणाच्या वेळी इब्राहिमखान लोदीला मदत केली नाही.

**३) काश्मीर:**

काश्मीर हे हिंदूचे राज्य होते. राजा रामचंद्र याला त्याचा मंत्री शाह मिर्झाने ठार करून १३३९ मध्ये मोगल सत्तेचा पाया घातला. १४२० ते ७० या काळात गादीवर आला. जनुला अबादीनेने मोठ्या प्रमाणात सुधारणा केल्या. हिंदूंना बऱ्याच सवलती दिल्या. काश्मीर सोडून गेलेल्या हिंदूना परत बोलवले. नवीन मंदिरे बांधली, जिझिया कर माफ अनेक संस्कृत ग्रंथाचे फारसी भाषेत रूपांतर केले. अबादीन मरण पावल्यानंतर काश्मीरमध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे दिल्लीच्या राजकारणात प्रवेश नाही.

**४) गुजराथ:**

तैमूरलंगाच्या आक्रमणानंतर गुजरातचा सुभेदार झापूरखान याने दिल्लीचा संबंध तोडून गुजराथ स्वतंत्र राज्य बनवले. तो मुळचा रजपूत राजा पण धर्मांतराने मुस्लीम झालेला होता. त्याने १४०१ आपला मुलगा तातरखान याला गुजराथचा शासक बनवला १४११-८१ या काळात महमुदशहा गादीवर होता. तर १४५१-१५११ या काळात महमुद बेगडा हा सत्ताधीश बनला त्याने चंपानेर, जुनागड व कच्छ ही राज्य जिंकून विस्तार केला. गुजरात मधील परदेशी व्यापार बंद पडला. त्यामुळे राजकीय व आर्थिक गरज ओळखून, पोर्तुगीजांचा बंदोबस्त करण्यासाठी बेगडाने तुर्कीराजा व कालिकतचा हिंदु राजा याच्याशी संबंध तोडले. त्याने १५०७ मध्ये पोर्तुगीजांचा पराभव केला. पोर्तुगीजांनी १५०९ मध्ये बेगडा यांचा पराभव केला. बेगडानंतर १५११ ते २६ या काळात मुझफरंशहा सत्ताधीश झाला. त्याला अनेक संघर्ष करावा लागला. १५२६ मध्ये बहादुरशहा हा गुजराथचा सत्ताधीश झाला.

**५) माळवा:**

मध्य भारतात माळवा, गुजराथ, मेवाड या तीन राजकीय सत्तामध्ये संघर्ष होता. कारण मध्य भारतावर वर्चस्व निर्माण करावयाचे होते. तैमुरलंगाच्या आक्रमणानंतर दिलावरखान घोरीने माळव्यात सत्ता स्वतंत्र निर्माण केली. दिलावरखानाचा प्रधान महमुदबोरी / महमदखान यांनी १४३५ खिलजी घराण्याची सत्ता सुरू केली. त्याने गुजराथचे सुलतान, राजपुतराजे, बहामनी राजे यांच्याशी संघर्ष करून सत्ता स्थिर केली. त्याच्यानंतर गाजीउद्दीन व नसिरूद्दीन हे दोघे शातक होऊन गेले. बाबरच्या स्वारीच्या वेळी गुजराथ शासक नसिरूद्दीनचा मुलगा महमुद दुसरा १५१०-३१ या काळात सत्तेवर होता. युद्धात पराभूत झाल्याने राणासंगाने त्याला चितोडमध्ये कैदेत ठेवले, सुटल्यानंतर पुन्हा शासक बनला.

**६) खानदेश:**

बहामनी राज्याचा सुलतान मुहंमद दुसरा याच्या विरुद्ध १३६५ मध्ये बंड करून मलिक अहमद याने स्वतंत्र खानदेश राज्याची स्थापना केली. अहमद व त्याचे वंशज स्वतःला खान म्हणत असल्याने खानदेश नाव पडले. हा तापी नदीच्या खोऱ्याचा प्रवेश होय. १३९९ मध्ये मलिक अहमदचा मृत्यु झाल्यानंतर दोन मुलांत संघर्ष सुरू झाला. नासीर-हसन यांच्या संघर्षात नासीरला गादी मिळाली. त्याच्यानंतर नासीर आदिलखान १४४१ पर्यंत, मुलगा

आदिलखान आला. १५०१ पर्यंत गादीवर बाबरच्या आक्रमणा वेळी मिर्झा मुहमंद हा सत्ताधीश होता. गुजरात संघर्षात पराभव झाल्याने खानदेशावर गुजरातचे वर्चस्व प्राप्त झाले आणि खानदेश मांडलीक बनले.

**७) सिंध व मुलतान:**

८ व्या शतकात महंमद बिन कासिमने प्रथम सिंध प्रांतात सत्ता स्थापन केली. महंमद गझनीने ११ व्या शतकात सिंध जिंकून घेतले. गझनीच्या वंशजांना पराभूत करून सुमरा जातीच्या राजपूतांनी सिंध जिंकून घेतले. १२ व्या शतकामध्ये महंमद घोरीचे सिंधवर कब्जा मिळवून पुन्हा मुसलमानाची सत्ता निर्माण केली. याच वेळी समरा राजपूतांचे महत्त्व कमी होऊन, सामान राजपूतांचे महत्त्व वाढले. त्यामुळे सिंधचे शासक समान राजपूत बनले यांनी इस्लामी धर्माचा स्वीकार करून स्वतःला 'जाम' म्हणत असे. महंमद तघलकाच्या काळात दिल्लीच्या नियंत्रणातून सिंध : स्वतंत्र्य झाले. त्याच्या मृत्युनंतर जाम खैरूद्दीनने फिरोजशहा तघलकाचे वर्चस्व झुगारून स्वतंत्र्य सिंधची स्थापना केली. यावेळी बाबराकडून कंदाहारचा राजा शाहग अर्जुन पराभूत झाल्याने त्याने सिंधचा आश्रय घेतला.

**८) बहामनी राज्य:**

महंमद तुघलकच्या जुलमी राजवटी विरूद्ध व चुकीच्या धोरणामुळे अनेक उठाव झाले, त्यापैकी तुर्की सरदार जफरखान उर्फ हसन गंगू याने १३४७ मध्ये गुलबर्गा येथे स्वतंत्र बहामनी राज्याची स्थापना केली. १३५८ पर्यंत त्याने कारभार करून राज्याच्या सिमा पश्चिमेकडील समुद्रापर्यंत, पूर्वेकडील मोनगर, उत्तरेकडे पैनगंगा तर दक्षिणेकडे कृष्णा नदीपर्यंत विस्तार वाढवला. १३८१ पर्यंत राज्याचा दिवाण महंमद गवान होता, तोपर्यंत वैभव होते. नंतर ऱ्हासाचा प्रारंभ होऊन १४९० मध्ये राज्यात विभाजन झाले. अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही, वऱ्हाडची इमादशाही, बिदरची बरीदशाही यांच्यात सत्ता संघर्ष निर्माण झाले. महंमद शाह बहामनी राज्याचे असताना विभाजन झाले. एकमेकांशी संघर्ष करीत असल्याने उत्तरेच्या राजकारणात त्याचे महत्त्व शून्य होते.

**९) पंजाब:**

पंजाब प्रांतावर दिल्लीची सत्ता नाममात्र होती. पंजाबचा राज्यपाल दौलतखान लोदी यांचे संबंध सलोख्याचे नव्हते. दौलतखान स्वतंत्र कारभार करत असल्याने, स्वतंत्र राज्याचा दर्जा प्राप्त झाला. दौलतखानला कठोर शिक्षा देण्यासाठी त्याला दिल्लीत बोलवले. त्याने आपला मुलगा दिलावरखानास पाठवले. इब्राहिमने त्याला शत्रू या नात्याने वागवले. त्यामुळे दौलतखानाने इब्राहिमखानाच्या विरुद्ध कडक कारवाई करण्यासाठी दिल्लीचे संबंध तोडून, बाबरला भारतावर आक्रमण करण्यास बोलिवले.

**(१०) जोनपूर:**

फिरोजशहा तघलकने चुलत भावाच्या आठवणीसाठी जोनपूर शहर बसवले. मलीक सरबर हा वजीर बनला. त्याने दूरावा, कोल, कनौज येथील बंड मोडून ते राज्यात जोडले.

तैमूरलंगच्या आक्रमणाचा फायदा घेऊन, मलीक सखर याने जोनपूर येथे स्वतंत्र राज्य स्थापन केले.

**११) मेवाड:**

इ.स. ५३० मध्ये गुहिल नावाच्या व्यक्तीने मेवाड राज्याची स्थापना केली. राजस्थानातील सामर्थ्यशाली, प्रभावी व विशाल राज्य असून चित्तोड ही त्याची राजधानी होती. राणा समरसिंहने मेवाड राज्याचा विस्तार केला. राणा रतनसिंह राजा असताना अल्लाउद्दीन खिल्लजीने आक्रमण करून जिंकले. त्यावर मालेदव चौहान कारभारी नेमला. परंतु पुढे पुन्हा सोदिया (गुहिल) वंशातील सत्तीशीध बनला. १४३३-६४ या काळात राणा कुंभ हा सत्ताधिश झाला. त्याने माळव्याचा राजा महंमद खिलजीस पराभूत करून कैद केले. या विजयाप्रित्यर्थ चित्तोड येथे मोठा जयस्तंभ उभारला. त्याच प्रमाणे नागोर व गुजरातच्या सुलतानाचा पराभव केला. राणा कुंभ विद्धवान असून वेद, स्मृती, राजनिती, गणित, व्याकरण, तर्कशास्त्र यात रूची होती. तो स्वतः कलावंत असल्याने त्याने कलाकारांना आश्रय दिला होता. १५०८ मध्ये राणासंग ऊर्फ राजा संग्रामसिंह मेवाडचा शासक बनला. दिल्ली सुलतानाची भिती नव्हती. उलट त्याने गुजरातच्या नसिरूद्दीनला पराभूत केले. माळवा जिंकून घेतला. तो महत्त्वाकांक्षी असून राजनितीज्ञ नव्हता. त्यामुळे जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था केली नाही.

**१२) विजयनगरचे हिंदू साम्राज्य:**

महंमद तघलकचे नियंत्रण दूरच्या प्रदेशावर नसल्याने बहमनी व विजयनगरचे राज्य स्वतंत्र झाले. संगम नावाच्या हिंदू सरदारांच्या मुलानी हरिहर व बुक्क यांनी विजयनगरचे राज्य १३३६ मध्ये स्थापन केले. तुंगभद्रा नदीच्या दक्षिण तीरावर राज्य उभारून मुस्लिम सत्तेला शह देण्याचा प्रयत्न केला. १५०९-३० या काळात तुल्व घराण्यातील कृष्णदेवराय हा पराक्रमी सत्ताधीश होता. राज्याचा विस्तार वाढवला. १५२९ मध्ये मरण पावला. यांच्या काळात आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय प्रगती मोठ्या प्रमाणात झाली होती. दक्षिणेतील मुस्लिम सत्तेच्या विस्ताराला रोखण्याचा प्रयत्न केला.

**ब) सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती:**

सुलतानशाहीच्या प्रारंभीपासून तुघलक घराण्यापर्यंत हिंदू-मुसलमान यांच्यात परस्परचे संबंध होते. मुसलमान दिर्घ काळ भारतात राहिल्याने हिंदूशी सलोख्याचे संबंध निर्माण झाले. त्यामध्ये काश्मीरचा राजा जनुल अबदीनने सहिष्णु धोरण स्वीकारले. त्याने हिंदूंना समतेने व न्यायाने वागवले. बंगालचा अल्लाउद्दीन हुसेन शाह व त्याचा मुलगा नसरतशाह यांनी बंगाली भाषेला व साहित्याला राजश्रय देऊन संरक्षण केले.

हिंदू मुसलमानांना जवळ आणणारा भक्ती मार्ग होय. भक्ती मार्गाने ऐक्य निर्माण केले, संत कबीर व गुरू नानक यांना हिंदू-मुसलमान हे दोन धर्म एकाच ध्येयाने जाणाऱ्या दोन वाटा आहेत असे प्रतिपादन केले. साहित्य क्षेत्रात सहकार्य मिळाले. हिंदू लोकांची भाषा त्यांची व्यावहारिक भाषा याच्या माध्यमातून विचाराचा प्रसार केला. हिंदी, मराठी, बंगाली, गुजरात, राजस्थान भाषेत प्रचंड साहित्य निर्माण झाले, बंगालचा शासक हुसैन शहाच्या प्रेरणेने रूप

गोस्वामी नावाच्या संस्कृत पंडीताने विदब्ध माधव व ललित माधव यासारखे साहित्य निर्माण केले.

**क) आर्थिक परिस्थिती:**

अफगाणांनी जरी अनेक ठिकाणी लुट केली. तरी, ते भारतातच राहिल्याने ती संपती बाहेर गेली नाही. त्यामुळे राजा, अमीर उमराव यांच्याजवळ मोठ्या प्रमाणात सोने, रूपे याचा साठा असल्याचे दिसते. दिल्ली, आग्रा, ग्वाल्हेर येथे बाबरांनी लुट केली. त्यावरून त्याला संपत्तीची माहिती मिळाली होती. संपूर्ण देश कृषीप्रधान होता. परदेशाशी व्यापार चालत. हवामानही चांगले होते. हे सर्व वैभव ऐकून बाबराने भारतावर स्वारी करण्याचा निर्णय घेतला.

**आपली प्रगती तपासा:**

१) बाबराच्या स्वारीवेळची भारतातील राजकीय परिस्थिती सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १.३ सम्राट जहिरूद्दीन महमद बाबर (१५२६-३०)

बाबराने ज्यावेळी भारतावर आक्रमण केले, त्यावेळी सुलतानशाहीची सत्ता अस्तित्वात होती. सुलतान स्वतः अकार्यक्षम असल्याने राजकीय परिस्थिती अतिशय गोंधळाची होती. अनेक छोट्या-छोट्या सरदारांनी बंड पुकारले होते. इतर प्रांतामधून लुटमार करणे. तेथील संपत्ती मिळवणे हा उद्योग चालू होता. त्यामुळे आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक झाली होती. याचवेळी समाज जागृतीला प्रारंभ होऊन वैचारिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली होती. हिंदू- मुसलमानांनी भक्तीचा मार्ग एकत्र आणून सर्वांसाठी खुला करण्याचा प्रयत्न केला. पण राजकीय परिस्थिती अत्यंत गोंधळाची होती. याचा फायदा बाबरने घेऊन मोगली साम्राज्य स्थापन केले.

**बाबरचा पूर्व परिचय:**

मोगल साम्राज्याचा संस्थापक व महान साम्राज्य निर्माता म्हणून इतिहासात प्रसिद्ध असलेला सम्राट जहिरुदीन मोहम्मद बाबर यांचा जन्म फरगणा परगण्याची राजधानी आंदिजान येथे शुक्रवार १४ फेब्रुवारी १४८३ रोजी झाला. वडिलांचे नाव उमरशेख मिर्झा व आईचे नाव कुतलुगनिगार खानम होते. ट्रान्स ऑक्सीयानामधील गुरू जहिरुद्दीन अब्दुल्लाच्या नावावरून जहिरूद्दीन नाव ठेवले. हे नाव उच्चारने त्याचा आजोबा युनूसखान याला अवघड असल्याने त्याने बाबर हे नाव ठेवले. बाबर चंगताई तुर्क जमातीचा होता. पित्याकडून तैमूरलंगाचा व आईकडून चंगेजखानच्या १४ वा वंशज होता. बालपणी योग्य शिक्षण मिळाले. वडिलांकडून लष्करी, प्रशासनाचे शिक्षण मिळाले होते. गुरु शेख मजिदाने पारशी, तुर्की भाषेचे ज्ञान दिले. आईवडिल युनूसखानाने शांत व धीरोदात्त गुण दिले. ९ जून १४९४ रोजी बाबरचे वडिल उमरशेख मरण पावले. यावेळी बाबर ११ वर्ष ४ महिने वयाचा

होता. आजी ऐसान दौलतबेगमच्या नेतृत्वाखाली फरगण्याचा शासक म्हणून कारभाराला प्रारंभ केला. १४९४ ते १५०२ पर्यंत चुलता अहमद मिर्झा व मामा मिर्झा महमूदखान यांच्याशी सतत संघर्ष करावा लागला. बाबराने डोंगराळ प्रदेशाच्या साहाय्याने ती आक्रमण थोपवून सत्ता टिकवली. बाबर हा जन्मजात नेता, महान योद्धा असामान्य सेनापती होता. उजवेग, इराणी, तुर्क, मंगोल व अफगाण या जातीशी संघर्ष करताना, त्यांच्या युद्ध पद्धतीचे निरीक्षण करून, त्यांच्याकडे गुण घेतले होते. युद्ध क्षेत्रात तुलूगमा तुकडीचा मोठ्या प्रमाणात उपयोग करून अनेक विजय मिळवले.

## १.४ समरकंदचा सत्ताधीश

**अ) समरकंदच्या आकर्षणाची कारणे**

१) वैभवशाली शहर १५ व्या शतकातील आशिया खंडातील तैमूरलंगाची राजधानी समरकंद शहर अतिशय सुंदर, मोहक होते. ते शैक्षिणक केंद्र असून, निरनिराळ्या व्यापारी पेढ्या होत्या. चांगल्या प्रतिचा कागद निर्माण होत असे. टरबूज, द्राक्षे, मनुका विपूल प्रमाणात असे, हवामान, सुखद, मुबलक पाणी, खाद्य पदार्थ स्वस्त होते. वैभवशाली व निसर्गरम्य शहर असल्याने ते मिळवण्यासाठी प्रयत्न केला.

२) **राजकीय वर्चस्व प्रस्थापित करणेः** समरकंद भौगोलिक दृष्ट्या अतिशय महत्त्वाचे शहर होते बाबर महत्त्वाकांक्षी असल्याने, ते शहर जिंकून त्यावर राजकीय वर्चस्व निर्माण केले.

**३) तैमूरलंगबद्दल वाटणारा अभिमानः**

तैमूरलंगाची राजधानी असल्याने समरकंदला वैभवशाली बनवले होते. बाबराला तैमुरलंगाबद्दल अभिमान वाटत असल्याने, आपल्या पूर्वजनांची ती राजधानी आहे. ती आपल्याकडे राहावी असे बाबरला वाटत असे,

**ब) समरकंदवरील स्वाऱ्या:**

एकूण ३ स्वाऱ्या १४९४ मध्ये समरकंदचा शासक मिर्झा महंमदचा मृत्यु झाला. त्यामुळे त्यांच्या मुलात वारसायुद्ध सुरु झाले. याचा फायदा घेऊन १४९१ मध्ये बाबरने आक्रमण केले. पण अपयश आले. १४९७ मध्ये बाबरने समरकंद जिंकून घेतले, तेथे आजारी पडल्यामुळे त्याच्या विरोधाकांनी उठाव करून फरगाणा प्रांतात बाबरचा भाऊ जहांगीर याला समरकंद गादीवर बसवले. त्याची १०० दिवसाची कारकीर्द होती. १४९७ मध्ये बाबराने खोनंद डोंगराळ प्रदेशाचा आश्रय घेऊन, लष्करी तयारी केली. १४९८ मध्ये फरगाण्यावर विजय मिळवून ताब्यात घेतला. नंतर १५०० मध्ये समरकंदवर विजय मिळवला. परंतु समरकंदचा शासक शैबानीखान याने सर्व उजवेग सरदार एकत्र करून १५०२ मध्ये सरायपूलच्या लढाईत बाबरचा पराभव केला. त्यामुळे ३ वर्ष भटकंतीचे जीवन बाबरला जगावे लागले.

बाबर भटकंतीचे जीवन जगत असताना, काबूलचा सत्तीधीश बाबरचा चुलता मिर्झा उझवेग हा १५०१ मरण पावला. त्याचा मुलगा अब्दुल रज्जाक शासक बनला. तो अल्पवयीन

असल्याने मोहम्मद मुकीय अर्जुन याने बंडखोरी करून सत्ता मिळवली. तेथील नागरिक राजवंशाचा शोध घेत आहे हे बाबराला समजताच, बाबराने ऑक्टो १५०४ मध्ये काबूल वर आक्रमण करून वर्चस्व निर्माण केले. स्वतःला बादशाह ही पदवी धारण केली १५०४ ते १८ पर्यंत लक्ष ठेवून सुधारणा केली. काबूलवर शैबानीखानाने समरकंद जिंकल्यानंतर ट्रान्स ऑक्सीयानावर ताबा मिळवला. खानाकडून झालेला पराभव बाबरला सतत बोचत होता. १५१० मध्ये शैबानीखान व इराणचा शहा इस्माइल सफवी यांच्यात मई येथे युद्ध होऊन, शैबानीखानचा पराभव झाला. याचा फायदा घेऊन बाबराने शहाशी हात मिळवणी केली. त्याच्या मदतीने १५१६ समरकंदवर स्वारी केली व विजय मिळवून खोरासान व बुखारा प्रदेश ताब्यात घेतला.

**आपली प्रगती तपासा:**

१) बाबरचे पूर्व चरित्रावर प्रकाश टाका.

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

## १.५ हिंदुस्थानवरील स्वारीची कारणे

### १) मध्य अशियातील अपयशः

बाबराला समरकंद जिंकण्यास सतत अपयश आले. आशिया खंडात सर्व सत्ताधीश नातेवाईक असल्याने, स्वतःच्या हिमतीवर नवीन राज्य निर्माण करावे. यासाठी हिंदुस्थानवर स्वारी केली.

### २) हिंदुस्थानाच्या संपत्तीचे आकर्षणः

इ.स. ८ व्या शतकापासून भारतावर अनेकांनी आक्रमण केले. महंमद कासीम, महंमद गझनी, महंमद घोरी चंगीझखान, तैमूरलंग इ. भारतावर स्वाऱ्या करून अमाप संपत्ती कमविली. तशी संपत्ती मिळण्यासाठी आक्रमण केले.

### ३) धर्मप्रसाराची ओढः

सुन्नी पंथाचा बाबरवर फार मोठा प्रभाव होता. तलवारीच्या जोरावर मूर्तिपूजा बंद करून काफरांचा नाश करावा. हिंदूस्थानावर स्वारी करून हिंदूची मंदिरे नष्ट करावी. लोकांत आपली प्रियता वाढवावी यासाठी बाबरानी स्वारी केला.

### ४) बाबराचे लष्करी सामर्थ्यः

काबूलचा सत्ताधीशा झाल्यानंतर लष्कारात वाढ करून, निरनिराळ्या युद्धतंत्राचा अभ्यास केला. सुसंगत तोफखाना बनवून शिस्तबद्ध व निष्ठावंत सैन्याची निर्मिती केली. हिंदुस्थानवर विजय मिळवण्याच्या हेतूने स्वारी केली.

**५) वृद्ध स्त्रीपासून प्रेरणाः**

बाबर भटकंती जीवनात १५०६ मध्ये दिखकाट गावी गेला असताना १११ वर्ष वयाच्या म्हाताऱ्या स्त्रीने तैमूरच्या भारत स्वारीची कथा सांगितली. त्यामुळे भारताकडे आकर्षित झाला.

**६) काबूल व हिंदुस्थानमधील भौगोलिक सान्निध्यः**

काबूल भौगोलिक दृष्ट्या जवळच्या प्रदेश होता सुरूवात झाली. उदयास आलेली अनेक छोटी-छोटी राज्य सतत संघर्ष करत होती. त्यामुळे आपले परकीय आक्रमणापासून संरक्षण करू शकले नाहीत. या संधीचा फायदा घेण्यासाठी हिंदुस्थानवर स्वारी.

**आपली प्रगती तपासा:**

१) बाबरची हिन्दूस्थानातील कारणे वर्णन करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १.६ भारतावरील स्वाऱ्या व साम्राज्य विस्तार

**१) पहिली हिंदुस्थानावरील स्वारी (१५१९):**

बाबराने भारतावर पहिली स्वारी करून हिंदुस्थानच्या वायव्य प्रदेश बजोरा व भेरा हा १५१९ मध्ये जिंकून घेतला. येथील युसुफजाई टोळ्यांचा पराभव करून, तेथे बाबराने हिंदुबेग हा शासक नेमला. परंतु येथील लोकांनी हिंदुबेगाला पळवून लावले.

**२) दुसरी स्वारी (१५१९):**

सप्टेंबर १५२९ मध्ये बाबराने दुसरी स्वारी हिंदुस्थानवर केली. युसुफजाई टोळ्यांचा पराभव करून, बेट पेशावर पर्यंत मुसंडी मारली, परंतु त्याच्या राज्यातच बडाली सुरू झाल्याने मोहिम अर्धवट सोडली.

**३) तिसरी स्वारी (१५२०):**

बाबराने १५२० मध्ये तिसरी स्वारी केली. यावेळी बाजोरा व भिरा ही दोन शहरे पुन्हा ताब्यात घेतली. त्यांनतर सियालकोट प्राप्त केले. सय्यदपूर येथील विरोध मोडून काढला. याचवेळी कंदहार मध्ये शहाबेगने बाबरा विरुद्ध बंडाली केल्याने मोहिम अर्धवट सोडली.

**४) चौथी मोहिम (१५२४):**

इब्राहिमखान लोदी व दौलतखान यांचा संघर्ष तीव्र झाला. त्यामुळे दौलतखानाने बाबराकडे मदतीची याचना केली, बाबर येण्यापूर्वी इब्राहिमखान लोदीने दौलतखानाचा पराभव केला. बाबराने लाहोर, दिपालपूर, सुलातानपूर, जालंदर यांच्यासह पंजाबचा बहुतेक भाग जिंकला.

काबूलला परत जाण्यापूर्वी विभाजन केले. पंजाबची राजधानी लाहोर बाबराकडे, सुलतानपुर- दिलावर खानाकडे, दिपालपूर इब्राहिमचा चुलता अलम अलीखानकडे, जालंदर दौलतखान लोदीकडे देण्यात - आले. दौलतखानाला वाटणी अमान्य असल्याने बाबर जाताच दिलावरखानने अलीखानावर हल्ला करून, प्रदेश ताब्यात घेतला. अलीखान बाबराकडे काबूलला गेला. दोघांच्यात मैत्री करार होऊन पुन्हा हिंदुस्थानवर स्वारी केला. या करारानुसार बाबरास दिल्ली तर अलीखानास पंजाब देण्याचे ठरले.

## १.७ पानिपतची लढाई - २१ एप्रिल १५२६

बाबर व आलमखान यांनी संयुक्तपणे १५२५ मध्ये दिल्लीकडे चाल केली. दौलतखानाने बाबराचा विश्वास घात केला. त्यामुळे त्याचा मिलबत येथे पराभव करून कैद केले. नंतर बाबराने आपला मोर्चा दिल्लीकडे वळवला. यावेळी बाबराने आलमखानाच्या मदतीने इब्राहिमखान लोदीचे सरदार फोडले. बाबराच्या स्वारीची वार्ता समजताच इब्राहिमखान लोदीने लष्करी तयारी करून चाल केली. पानिपतजवळ दोनिही लष्कराची भेट झाली.

### अ) बाबर व लोदीची सैन्य रचना:

बाबराने पानिपतच्या पूर्वेस व यमुना नदी यांच्या मध्ये लष्करी तळ दिला होता. पानिपत शहरामुळे एक बाजूचे संरक्षण केले. तर दुसऱ्या उजव्या बाजूस खंदक खोदून त्यात काटेरी झुडपे तोडून टाकून बाजू मजबूत केली. सैन्याची उत्कृष्ट व्यूहरचना करून आघाडीवर ७०० बैलगाड्यांची मजबूत भिंती उभी केली. त्याच्या मागे तोफखाना ठेवला. तोफखाना चालवणा-यांना संरक्षणार्थ "फळी" म्हणजे बचाव फळी उभारली होती. मधल्या मोकळ्या जागी घोडदळ व पायदळ ठेवले. तोफखान्याच्या उजव्या बाजूस बंदूक प्रमुख उस्तादअली तर डाव्याबाजूस तोफखाना प्रमुख मुस्तका होता. तोफखान्याच्या मागे खुसरी कोकलताझ व महंमद अलीजंगच्या नेतृत्वाखाली सैन्य होते. त्यांच्या उजव्या व डाव्या बाजूस तुलूगाम तुकड्या होत्या. युद्धात शत्रूला धरणे त्याच्या पिछाडीवर हल्ला करणे. या पद्धतीस तुलूगाम युद्ध पद्धत असे म्हणतात. त्याचप्रमाण बाबरने राखाव सैन्य ठेवले होते. याचे नेतृत्व सेनापती अब्दुल अजीस याच्याकडे दिले होते.

लोदीची सैन्य रचना जुनी व कालबाह्य होती. बाबर म्हणतो की "लोदीजवळ १ लक्ष सैन्य व एक हजार हत्ती होते. परंतु लोदीकडे ४०-५० हजार सैन्य, व बाबराजवळ २५ हजार सैन्य होते. लोदीने लष्कराचे ४ भागात विभाजन केले. आघाडीचे सैन्य, केंद्र तुकडी, उजवी बाजू व डावी बाजू अशी रचना होती.

### ब) पानिपतचा संग्रामः २१ एप्रिल १५२६

बाबर व लोदी यांचे सैन्य १२ एप्रिलला समोरासमोर आले. युद्धाला उशीर लावणे धोक्याचे आहे, हे ओळखून बाबराने २० एप्रिलला ४ हजाराची तुकडी लोदीवर पाठवली. तिचा पराभव करून लोदीने २१ एप्रिलला बाबरावर आक्रमण केले. बाबराची आघाडीची फळी अरूंद असल्याने लोदीने सैन्य एकत्र झाले. त्यामुळे गोंधळ निर्माण झाला. याचा फायदा घेऊन बाबराने हल्ला चाढवला. तुलूगाम तुकड्याची लोदीच्या पिछाडीवर हल्ला चढवून घनघोर युद्ध केली. या युद्धात इब्राहिमखान लोदी व १५ हजार सैन्य ठार झाले व बाबराचा

विजय झाला. सकाळी ९ वाजता सुरू झालेले युद्ध ३ वाजता संपले. या युद्धा संदर्भात बाबर म्हणतो की, "जेव्हा सुरुवात झाली तेव्हा सूर्य बराच वर आला होता दुपारपर्यंत युद्ध चालले. शत्रूचा सर्वनाश करण्यात माझ्या सैन्यांना यश मिळाले. परमेश्वराच्या कृपेने कठिण कार्य सोपे झाले. हे विशाल सैन्य केवळ अर्ध्या दिवसात नष्ट झाले. "

**क) पानिपत युद्धातीले बाबराच्या विजयाची कारणे**

**१) इब्राहिम लोदीची जुलमी राजवट :**

बाबराकडे कमी सैन्य असूनही विजय मिळाला. कारण इब्राहिम लोदी हा संशयी, हेकेखोर स्वभावाचा असल्याने दरबारातील अनेक सरदार दुखवले होते. इब्राहिमच्या जुलमी राजवटीने जनता नाराज होती. त्यामुळे सरदार व जनता यांनी युद्धाच्या वेळी बाबरला मदत केली. दौलतखान, अलमखान, दिलावरखान यांनी बाबरला मदत केली त्यामुळे बाबरला विजय मिळाला.

**२) इब्राहिम लोदीच्या लष्कराचा दुबळेपणाः**

लोदीने लढाईकरिता तत्परतेने सैन्य निर्माण केले. त्या पराक्रमाची कमतरता नव्हती परंतु सैनिकी शिस्त, लष्ककरी शिक्षण, कुशल नेतृत्व आणि अनुभव इत्यादीचा सैन्याला गंध नव्हता. लोदीने सैन्यापुढे राष्ट्र किंवा धर्म असे उदात्त विचार मांडले नाही. त्याने वांशिक आधारावर सैन्याची रचना केली उदा. रजपूत, अफगाण बाबर म्हणतो "हिंदुस्थानातील सैनिकांना मरणे माहित आहे, लढणे नव्हे. "

**३) इब्राहीमखान लोदीकडे मुत्सद्देगिरीचा अभावः**

इब्राहीम तरुण व अननुभवी होता. त्याच्यात मुत्सद्देगिरीची उणीव होती, बाबराच्या सैन्य रचनेचा अभ्यास नव्हता. चांगले मित्र अनुभवी सैन्यात पैसा खर्च करण्याची तयारी नव्हती. दौलतखान, आलमखान व राणासंग यांना आपल्याकडे वळवले असते तर, लोदीला विजय मिळाला असता.

**४) बाबराचे कुशल नेतृत्व:**

मध्य आशियातील निरनिराळ्या लढाऊ जमातीच्या युद्ध पद्धतीचा बाबराने बारकाईने अभ्यास केला, मोगल, तुर्क, इराणी, उग, अफगाण द. लोकांच्या युद्धपद्धती व सैनिक बारकाईने अभ्यास करून, भारतात त्याचा वापर केला. बाबर स्वतः उत्कृष्ट योद्धा होता. त्याने युद्ध रचना शास्त्रशुद्ध करून सैन्यात शिस्त निर्माण केली होती. युद्धाच्या वेळी बाबराने तुलूम युद्धतंत्राचा वापर केला. त्यामुळे लोदीचे सैन्य ऐनवेळी गोंधळून गेले.

**५) बाबराने तोफखाना व बंदुकांचा वापर**:

१५ व्या शतकात हिंदुस्थानातील लोकांना बंदुकांची दारू व तोफा याचे ज्ञान नव्हते. बाबाराने प्रथमच उस्ताद अली व मुस्तान यांचा नेतृत्वाखाली शेकडो तोफा बंदुका तयार केल्या. भारतातील विजयाचे श्रेय त्याच्या सुसज्ज तोफखान्यासच दिले पाहिजे.

**६) बाबराचे कार्यक्षम लष्करः**

बाबर हा जन्मजात पुढारी होता. त्याचे आपल्या सैन्यावर पाणापलीकडे प्रेम होते. त्याची युद्ध पद्धती त्यावेळी सर्वश्रेष्ठ होती. तुलुमगामी दल सुसज्ज तोफखाना, दारूगोळा व राखीव सैन्याचा बिकट प्रसंगी उपयोग इ. अनेक गोष्टीची भारतीय सैन्याला ज्ञात नव्हते. भारतातील सर्व लढाया याच तंत्राने बाबराने जिंकल्या.

**७) ऐन युद्धप्रसंगातील चुकाः**

लोदीने ऐन युद्ध प्रसंगी सैन्यधरती केली. प्रत्यक्ष युद्धात विलंब लावला, लढाईत हत्तीचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला व सर्वसाधारण सैनिकांप्रमाणे हातघाईच्या लढाईत स्वतःचे भाग घेणे इ. असंख्य चुका केल्या.

**ड) पानिपत युद्धाचे परिणाम:**

**१) लोदी घराण्याचा अंतः**

पानिपतच्या युद्धात लोदी घराण्याची प्रचंड प्राणहानी व वित्तहानी झाली. स्वतः इब्राहिम लोदी व त्याचे एकनिष्ठ सैन्य ठार झाले. अलमखान लोदी हा सरदार होता. परंतु बाबराचा पराभव करून लोदी घराण्याची सत्ता टिकवण्यासाठी त्याच्यात ताकद नव्हती.

**२) सुलतानशाहीचा शेवटः**

१२०६ मध्ये महंमद घोरीच्या स्वारीनंतर भारतात सुलतानशाहीचा प्रारंभ झाला. तर महंमद तुघलकच्या कारकिर्दीपासून सुलतानशाहीच्या ऱ्हासाची प्रक्रिया सुरू होऊन, इब्राहिमखान लोदीच्या काळात पानिपत युद्धाने शेवट केला.

**३) मोगल सत्तेची स्थापना:**

बाबराने पहिल्या पानिपत युद्धात विजय मिळवून हिंदुस्थानात मोगल सत्ता निर्माण केली. बाबराने ताबडतोब दिल्ली, आग्रा जिंकून दिल्लीचे तख्त ताब्यात घेतले व स्वतः दिल्लीच्या सिंहासनावर बसला.

**४) प्रचंड प्राणहानी:**

युद्धात इब्राहीम लोदी, विक्रमजित ठार झाले. लोदीचे १५०० हून अधिक सैन्य मारले. बाबराचीही प्रचंड प्राणहानी झाली. दोन्ही पक्षाची प्राणहानी ४० हजार इतकी झाली असावी. फक्त ६ तासात एवढी प्रचंड प्राणहानी झाली.

**५) दिल्ली जिंकण्याचे रजपूतांचे स्वप्न भंग पावलेः**

रजपूत राजा राणासंग यांनी दिल्ली जिंकून घेण्यासाठी जय्यत तयारी केली परंतु याचवेळी बाबराने दिल्ली जिंकली. राणा संगाने महत्वाकांक्षांसाठी प्रयत्न केला परंतु, खानवाच्या लढाईत पराभव झाल्याने स्वप्न उद्धवस्त झाले.

**६) बाबर दिल्लीची पातशहा बनतोः**

पानिपतच्या युद्धानंतर बाबराने हुमायूनला आग्रा घेण्यासाठी पाठवले. दुसरी तुकडी दिल्लास राजकोषावर कब्जा मिळवण्यासाठी पाठवली. शुक्रवार २७ एप्रिल १५२६ रोजी दिल्लीत बाबरने स्वतःच्या नावाने खुतबा वाचला. यावेळी हुमायूनने आग्रा लुटीतील जगप्रसिद्ध कोहिनूर हिरा बाबरला दिला. बाबराने या लुटीतील संपत्ती सैन्याला व मित्रांना वाटून टाकली. मक्का व मदीना येथील तीर्थक्षेत्रांना मोठ्यामोठ्या भेटी पाठवल्या.

**आपली प्रगती तपासा:**

१) पानिपत युद्धाची कारणे व परिणाम स्पष्ट करा.

## १.८ खानवाचे युद्ध - १६ मार्च १६२७

**अ) खानवाच्या लढाईची कारणे:**

**१) बाबर आणि राणासंग यांच्यातील वाद :**

मेवाडचा राजा राणासंग याला हिंदुस्थानचा राजा होण्याची इच्छा होती. त्यामुळे राणासंगाने बाबराशी मैत्री करार करून तह केला. त्यानुसार कसवी, जोधपूर, बियानचा प्रदेश हा इब्राहिमखान लोदीच्या विरोधात मदत केल्यास दिला जाईल. परंतु प्रत्यक्षात बाबराने युद्धानंतर अमान्य केल्याने वाद निर्माण झाला.

**२) राणासंगाची अपेक्षा भंग:**

पानिपतच्या युद्धा नंतर बाबर परत काबुलला जाईल असे राणाला वाटत होते. परंतु बाबराने आपल्या सैन्याचे आत्मविश्वास व मनोधैर्य वाढवून राज्य करण्याचा व येथे राहण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे राणाचे हिंदुस्थानचा हिंदू राजा होऊन, हिंदूचे साम्राज्य निर्माण करण्याचे स्वप्न भंग झाले. त्यामुळे दिल्लीची गादी मिळवण्यासाठी हा संघर्ष सुरु झाला.

**३) राणासंगाचा निजामखानावर विजय:**

बाबराला प्रतिकार करण्यासाठी राणासंगाच्या नेतृत्वाखाली हसतखान मेवाती, महमूद लोदी एकत्र आले. त्यांनी निजामखानावर हल्ला चढवला त्याचा पराभव केला. यावेळी निजामखान बाबराला दरसाल १४ लाख खंडणी देत होता. ती बंद झाल्याने, बाबराच्या मनात दुःख सलत होते.

**ब) राणा संगाचा परिचय:**

रजपूत राजा राणासंग ऊर्फ संग्राम सिंह इतिहास प्रसिद्ध शिसोदिया वंशातील होता. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत वर आला होता. त्याने राजस्थानमध्ये स्वतःचे व चितोडचे महत्त्व

वाढवले होते. राणासंग अत्यंत निधड्या छातीचा, महत्त्वाकांक्षी व अद्वितीय योद्धा होता. त्याने माळव्याचा सुलतान महंमद खिलजीचा पराभव करून भिल्सा, आरंगपूर, चंदेरी, रणथबोर जिंकले. या अनेक युद्धामुळे राणाच्या शरीरावर ८० जखमाच्या खुणा होत्या. दिल्ली येथे हिंदू साम्राज्या स्थापनाची जबरदस्त महत्त्वाकांक्षा होती. ८० हजार घोडदल, ५०० हात्ती, ७ रजपूत राजे, १०४ अधिकारी इतके प्रचंड सैन्य व लष्करी सामर्थ्य होते. सामर्थ्यशाली रजपूत असल्याने, त्याचा पराभव केल्याशिवाय राज्य स्थिर करता येणार नाही. हे ओळखूनच बाबराने राणा संगाशी संघर्ष केला.

राणा संगाने ८० हजार सैन्य एकत्र केले आणि चंदेरी, अजमीर, ग्वाल्हेर मारवाड, जयपूर येथील रजपूत एकत्र करून बयानचा गव्हर्नर मेहदा याची मदत घेतली.

**क) बाबर राणासंग यांच्या संघर्षाला प्रारंभ:**

ख्वाजा उर्फ निजामखानचा पराभव करून फत्तेपूर शिक्रीपासून १० मैल अंतरावर खानवा येथे तळ दिला. बाबराने निजामखानाच्या मदतीसाठी मिर्झा महमद याला पाठवले. परंतु त्याचाही पराभव झाला. स्वतः बाबर रजपूतांचा पराभव करण्यासाठी १५ हजार सैन्य घेऊन गेला पण पराभव झाला. यामुळे बाबर व त्याच्या मोगल सैन्यात भितीचे वातावरण निर्माण झाले. इब्राहिमखान लोदीची आई सुडाने पेटली होती. व त्याच्या मोगल सैन्यात भितीचे वातावरण निर्माण झाले. इब्राहिमखान लोदीची आई सुडाने पेटली होती. तिने बाबराच्या स्वयंपाक घरातील आचारी अहमद याच्याशी संधान बांधून विष घालून ठार मारण्याचा प्रयत्न केला. परंतु या विषयप्रयोगातून बाबर वाचला. राणासंगशी संघर्ष म्हणजे नव्याने निर्माण झालेल्या मोगल साम्राज्याच्या जीवनमरणाचा संघर्ष होता. बाबर सिक्री येथे असताना काबूलहून मुहमद शरीफ नावाचा ज्योतिषी आला. त्यांने सांगितले की युद्धात बाबराचा पराभव होईल. त्यामुळे सर्व सैन्य भयभित झाले. त्यामुळे बाबराने रजपूतांविरूद्ध जिहाद पुकारले. या प्रसंगी तो म्हणतो की, “सैनिक हो! कोणत्याही मनुष्यास मरण चुकत नाही. फक्त ईश्वर अमर आहे. जीवन सौख्याचे जेवण जेवणाऱ्याने अखेर मृत्युचा पेला ओठाला लावला पाहिजे! आयुष्याच्या धर्मशाळेत जो उतरला त्याला एक दिवस तरी हा दुःख निवास सोडणे आहेच. मग मरावयाचेच असेल तर नावलौकिक, प्रतिष्ठा प्राप्त करून मरणे अधिक योग्य नाही काय? बदनामीचे जीवन जगण्यापेक्षा वीरमरण समाधान मानतो कारण तेवढेच केवळ माणसाच्या हाती आहे. शरीरावर तर मृत्युची सत्ता आहेच. परमेश्वर आपल्या पाठीशी आहे. रणांगणावर आपण कामी आलो तर आपण हुतात्मे होवू. जिंकलो तर विजयी होऊ, तेव्हा आपण कोणत्याही परिस्थिती युद्ध भूमी सोडणार नाही अशी प्रतिज्ञा करू या.

**ख) खानवाच्या युद्धातील सैन्य रचना**

**१) बाबरची सैन्य रचना:**

बाबराकडे यावेळी ४० हजार सैन्य होते. पानिपतच्या युद्धरचनेप्रमाने येथेही व्यूहरचना केली. आघाडीवर एक हजार गाड्यांची संरक्षण रांग बनवली. दोन-दोन गाड्या एकत्र लोखंडी साखळीने बांधल्या. दोन मध्ये १०० घोडदल फिरू शकेल म्हणजे ६० ते ७० यार्ड इतके अंतर ठेवले. डाव्या बाजूला बंदुक प्रमुख उस्ताद अली, उजव्या बाजूला

तोफखाना प्रमुख मुस्तफा तोफखान्याच्या मागे उजवी डावी आघाडी तुलुगाम पद्धतीने रचना केली.

**२) राणासंगाची सैन्य रचनाः**

राणासंगाकडे ८० हजार सैन्य होते. त्याच्या सैन्याचे चार भागात विभाजन केले होते. १) आघाडी २) केंद्र ३) डावी बाजू ४) उजवी बाजू

**ग) खानवाच्या युद्धाला प्रारंभः १६ मार्च १५२७.**

१६ मार्च १५२७ रोजी सकाळी ९.३० युद्धाला सुरुवात झाली. रजपूतांनी डाव्या बाजूवर हल्ला चढवला. त्यावेळी बाबराने राखीव सैन्याच्या मदतीने ती बाजू मजबूत केली यावेळी बाबराने तोफखाना चालू करून रजपूतांचा धुव्वा उडवला. १० तासात बाबराला विजय मिळाला. यात राणाला मदत करणारा हसनखान मेवाती, कुंदमसिंग मरण पावला. या युद्धानंतर हजारो शुर रजपूतांच्या मुंडक्याचे मनोरे लावून बाबराने "गाजी" किताब लावून घेतला. गाजी म्हणजे पवित्र धर्मयुद्धात विजयी होणारा किंवा धर्मरक्षणार्थ काफरांना मारणारा.

**घ) राणासंगाच्या पराभवाची कारणे**

**१) बाबराने धर्मयुद्ध पुकारणे:**

रजपूत राजे शूर व पराक्रमी असल्याने बाबराच्या सैन्यात भितीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करून, आपल्या सत्तेचे भवितव्य चांगले टिकावे यासाठी बाबराने धर्म युद्धाचे स्वरूप दिल्याने विजयी झाला.

**२) सामुदायिक युद्धाचा अनुभव नव्हताः**

परकिय आक्रमणाविरुद्ध भारतात प्रथमच सर्व सत्ता एकत्र आल्या होत्या. त्यामुळे त्यांना सामुदायिक युद्धाचा अनुभव नव्हता. त्यातच आपापले हेवे दावे व स्वार्थ यावेळी निर्माण झाला. त्यामुळे अपयश आले.

**३) प्रभावी तोफखानाः**

बाबराचा प्रभावी तोफखाना व बंदुका यांच्या मदतीने बाबराला विजय मिळाला अश्या प्रकारचे शस्त्र रजपूत राजांकडे नव्हते.

**४) बाबराचे लष्करः**

पानिपतनंतर बाबराच्या लष्कराला खूप वेळ मिळाला. त्यामुळे या युद्धात नव्या दमाने, ताजेपणाने युद्धात उतरले. त्यामुळे सैन्यात संयोजन, नियंत्रण, शिस्त इ. गोष्टी व्यवस्थित पार पाडल्या.

**५) राणापेक्षा बाबर श्रेष्ठ योद्धाः**

बाबर शुर, महान सेनापती व सैन्यात आत्मविश्वास निर्माण करणारा होता. त्याचबरोबर मुत्सद्दी होता. राणाने पानिपतच्या युद्धाच्यावेळी लोदीला मदत केली असती तर, त्याचा फायदा झाला असता. परंतु हे उशीरा कळले त्यामुळे बाबर श्रेष्ठ ठरतो.

**ड) खानवाच्या युद्धाचे परिणाम**

**१) रजपूत राजांचा संघ दुबळा झालाः**

खानवा युद्धात पराभव झाल्याने रजपूत संघ दुबळा बनला. या युद्धात रजपूतांची प्रचंड प्रमाणात प्राणहानी व मानहानी झाली. राणासंग जबर जखमी झाला. त्याचे स्वप्न भंग पावले. दुसरा ब्रुक विलियम्सच्या मते "या युद्धाने रजपूत संघ चिरडून टाकला व प्रभावी संघ या युद्धाने धुळीस मिळवला."

**२) रजपूतांचे वर्चस्व संपले:**

हिंदुस्थानात आपली सत्ता निर्माण करण्याचे स्वप्न रजपूतांचे अपुरे राहिले. इब्राहिम लोदीच्या पराभवानंतर रजपूत निर्भयपणे वावरत असल्याने, मुसलमानांना भिती वाटत होती. ती या युद्धाने नष्ट झाली.

**३) बाबरच्या नव्या जीवनाला प्रारंभ झालाः**

मध्य आशियात निराश होऊन, वैभव किर्तीसाठी रानोमाळी भटकरणाऱ्या बाबराचे भाग्योदय झाला. भटकंती संपवून जीवनाला स्थैर्य प्राप्त झाली. पुढील काळात साम्राज्य विस्तारासाठी अनेक युद्धे करावी लागली. त्यात त्याला यश प्राप्त झाले.

**४) मोगल सत्तेची स्थापनाः**

इब्राहिम लोदीचा पराभव करून ही रजपूत बाबराला हिंदुस्थानचा सत्ताधीश समजत नव्हते. ही रजपूतांची समस्या त्याने खानवाच्या युद्धात सोडवली व खऱ्या अर्थाने मोगल सत्तेची स्थापना झाली असे म्हणता येईल.

**आपली प्रगती तपासा:**

१) खानवाच्या युद्धाची कारणे सांगा.

## १.९ चंदेरीवर विजयः २९ जाने. १५२८

बाबराने खानवाच्या युद्धानंतर एप्रिल १५२७ मध्ये मेवाड जिंकले. यानंतर चंदवार, शपरी, इटावा हे प्रदेश जिंकून १७ डिसेंबर १५२७ मध्ये भारतातील चंदेरीच्या प्रसिद्ध किल्ल्याला

वेढा दिला. तेथील अधिपती मेदिनी राय हा होता. त्यांनी ५ हजार सैन्यासह बाबराचे आक्रमण मोडून काढण्याचा प्रयत्न केला. हा राणसंगचा घनिष्ठ मित्र होता. मेदिनी रायने बाबराशी तह अथवा करार करण्यास मान्यता दिली नाही. बाबराचा पराभव किंवा स्वतःचे युद्धात बलिदान या ध्येयाने प्रेरीत होऊन संघर्ष चालूच ठेवला. बाबराच्या तोफखाना, बंदुका यामुळे बाबराला विजय मिळाला. मेदिनी रायचे सैन्य शेवटपर्यंत लढत राहिले, तर किल्ल्यावरील स्त्रीयांनी जोहार पत्करला. शेवटी २९ जाने. १५२८ रोजी बाबराने आपली पताका किल्ल्यावर फडकवली,

## १.१० घाग्राची लढाईः ६ मे १५२९

पानिपतच्या पराभवामुळे अफगाणांची दिल्ली व पंजाब येथील सत्ता नष्ट झाली होती. खानवाच्या लढाईतून जीव वाचवण्यासाठी पळून गेलेला, इब्राहिम लोदीचा भाऊ महंमद लोदीने, बंगाल-बिहार येथे संघटीत शक्ती निर्माण करून, सत्ता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यावेळी स्वतःला महंमद शहा ही पदवी धारण केली. बाबराविरूद्ध कारवायासाठी एक लाख सैन्य उभे केले. त्याने प्रथम बिहार प्रांत ताब्यात घेतला. यामुळे बाबराने सैन्य पाठवले व पुन्हा कनोज ताब्यात घेतले. महंमद लोदीचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी बाबराने बंगालवर चाल केली. घाग्रा (घोगरा) येथे ६ मे १५२९ राजी युद्ध होऊन बाबर विजयी झाला.

## १.११ बाबराची योग्यता

खानवाच्या लढाईनंतर बाबराने हुमायूनला पंजाब प्रांताचा राज्यपाल नेमले. तेथील उजबेगाचा बंदोबस्त करण्यात हुमायूनला अपयश आल्याने, बाबर स्वतः लाहोर पर्यंत गेला. तेथे गेल्यानंतर तो आजारी पडला. अतिपरिश्रम, दारू, अफू, भांग याच्या व्यवनामुळे जास्त प्रकृती बिघडली. यावेळी हुमायूनही आजारी पडल्याने तो परत आग्र्याला आला. बाबराने पुन्हा त्याला संभळ येथील जाहागिरीवर पाठवले. यावेळी बाबर आजारी असल्याने तो पुन्हा बाबराकडे आला. त्यावेळी हुमायून अतिशय आजारी पडला. त्याचा जीव वाचव व माझा जीव घे, अशी बाबराने इश्वराकडे प्रार्थना केली. बाबराचा आजार वाढत जाऊन तो २६ डिसेंबर १५३० मध्ये मरण पावला. प्रथम आग्रा येथे दफन केले. नंतर त्याच्या इच्छेनुसार काबूलमध्ये दफन केले. यावेळी बाबर ४८ वर्षाचा होता.

### १) सर्वगुण संपन्न व्यक्तिमत्वः

बाबर अत्यंत उदार अंतःकरणाचा, मन मिळाऊ व प्रामाणिक होता. माता-पित्यांबद्दल नितांत आदर होता. तो थोर पिता, व आदर्श मित्र होता. बाबर हा असामान्य बुद्धीमत्ता व आणि नृत्यकला, कला व युद्धशास्त्रामध्ये पारंगत होता. तो उधळ्या वृत्तीचा असून अपार धन सैनिकांना वाटून राजकोष केला.

### २) कुटुंबवत्सल:

बाबराने आपल्या कुटूंबावर अपार प्रेम केले. जहागीर या भावाने अनेक कारस्थाने केली म्हणून बाबरच्या सरदाराने जहागीरला ठार मारण्याचा सल्ला दिला परंतु बाबराने अमान्य

केले. आई, वडिल, मित्र, बंधू यांच्याशी तो जिव्हाळ्याने वागत असे. डॉ. ईश्वरीप्रसाद यांच्या मते “बाबरमध्ये सापडणारी कुटुंबवत्सलता तुर्क किंवा मोगलामध्ये अपवादानेच दिसून येते.”

**३) बाबराची लष्करी गुणवत्ताः**

सेनापती या नात्यानी बाबराने उच्च स्थान आहे. तुर्की व मंगोलाकडून शौर्य, काटकता तर पार्शियाकडून धैर्य व धडाडी या गुणांचा बाबराने संचय केला होता. तो उत्कृष्ट घोडेस्वार व धनुर्धारी असून, भालफेकीत तो पारंगत होता. रणक्षेत्रावर नवी धुमश्चक्री चालु असताना तो आपल्या कल्पकतेने व सैन्यरचनेने प्रतिस्पर्ध्यावर मात करत असे. आपल्या सैन्यावर जिवापाड प्रेम करत होता. भारतात प्रथमच तोफखान्याचा वापर बाबराने केला. प्रथम तो सैनिक होता नंतर विद्वान झाला.

**४) कट्टर धर्माभिमानी**:

बाबर हा कडवा मुसलमान होता. अल्लाच्या आशिर्वादाने आपल्याला विजय मिळतो ही त्यांची भावना होती. बाबर सुरुवातीला सुन्नी पंथीय होता. परंतु समरकंद जिंकल्यानंतर शिया पंथ स्वीकारला. हिंदूना तो काफीर समजत असे, तर अफगाणांवर विश्वास नव्हता. राणसंगाविरुद्ध जिहाद पुकारून युद्ध जिंकले. अयोध्या, मथुरा व चंदेरी येथील अनेक मंदिरे उद्ध्वस्त केली. मथुरा अयोध्या येथे मशिदी बांधल्या

**५) बाबराचे प्रशासनः**

बाबराने स्वपराक्रमाच्या जोरावर काबूल ते ग्वाल्हेरपर्यंत आणि मुलतान ते बिहारपर्यंत प्रदेश ताब्यात घेतला, प्रशासकीय बुद्धिमतेच्या अभावामुळे रचनात्मक कार्य करू शकत नाही. जुन्या शासन व्यवस्थेत बदल न करता, पुढे प्रशासन व्यवस्था चालू ठेवली. विविध ठिकाणी अनेकांना जहागिऱ्या दिल्या होत्या. अरस्कीनच्या मते "बाबराचे राज्य सुसंघटित राज्य नसून लहान-लहान राज्यांचा तो एक समूह होता." जहागिरदारांनी त्यांची जबाबदारी योग्य रितीने पार पाडली नाही. त्यामुळे महसूल योग्य रितीने गोळा झाला नाही. न्यायदानाचे कार्य ही योग्य रितीने पार पाडले नाही.

**६) कलेचा भोक्ता**:

बाबर एक सुज्ञ व सुसंस्कृत व्यक्ती होती. तुर्की भाषेवर प्रभूत्व होते. फारसी भाषेतील "मुबईयान" या काव्य प्रकारचा तो जनक मानला जातो. काव्यशैली साधी, सोपी व रसाळ होती. "दिवाण" काव्यसंग्रह, तुर्की छंदशास्त्र, स्मृतिचित्रे इत्यादी वाङ्मयीन कलाकृतकी उत्कृष्ट ठरल्या आहेत. त्याचबरोबर संगीत, चित्र व स्थापत्य कलांचा तो तज्ञ होता. त्याने आग्रा, धोलपूर, शिळी येथे बांधकाम केले. संभल येथे जामा मशीद, पानिपत येथे मसजिद या वास्तु उभ्या केल्या.

**७) निसर्गवेडा बाबर :**

बाबर, शिपाई, मुत्सद्दी, तत्वज्ञ व मोठा शिकारी होता तसेच तो सृष्टी देवतेचा अखंड उपासक होता. पशु, पक्षी, वनस्पती याचे बाबरला ज्ञान होते. आपल्या राज्यात अनेक

फुलझाडे, फळझाडे लावली. हिंदूस्थानातील निसर्ग वर्णन त्याच्या साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**८) साम्राज्याचा संस्थापक नात्याने गुणदोषः**

चंगेजखान, तैमूरलंग सारखी लुटालुट करणे हे ध्येय नसून साम्राज्य निर्मितीचे ध्येय बाबराचे होते. म्हणून भारतावर स्वारी केली. भारतात पानिपत युद्धात लोदी व खानवाच्या लढाई राणासंगाचा, घाग्राच्या लढाईत महंमद लोदीचा पराभव करून एक महान विजेता ठरला. त्याने साम्राज्य विस्तार प्रचंड केला. परंतु वेळे अभावी प्रशासन व्यवस्था निर्माण करता आली नाही. तरीपण साम्राज्याचा संस्थापक होता.

बाबराने मोठ्याप्रमाणात प्रदेश जिंकला परंतु त्याचे छोटया-छोट्या जहागिरीत रूपांतर केले होते आपल्या शत्रूला नष्ट केले नव्हते की प्रदेश संघटीतही केला नव्हता. कारण बाबाराकडे प्रशासनाचे गुणच नव्हते. त्याची अर्थव्यवस्था अत्यंत दुबळी होती. साम्राज्य संस्थापकास ज्या गुणांची गरज असते ती बाबराजवळ नव्हते. म्हणून बाबर साम्राज्याचा संस्थापक नसून अकबर होता असे म्हणावे लागते.

लेनपूल यांच्या मते, “बाबर मोगली साम्राज्याच्या वास्तु विशारद नव्हता हे खरे पण मोगली साम्राज्याचा पहिला दगड त्याने रचला आणि भव्य काम पूर्तीस नेण्याचे कार्य अकबराने केले म्हणून मोगल साम्राज्याचा संस्थापक बाबर नसून अकबर होता. "

रसब्रुकच्या मते, "साम्राज्य निर्माता बनण्याच्या दोन कसोट्या होत्या.

१) ती व्यक्ती उत्कृष्ट प्रशासक असावी. २) महान विजेता असावा.

त्यामुळे बाबर पहिल्या कसोटीला उतरत नसल्याने तो साम्राज्य निर्मितीस अपात्र ठरतो.
साम्राज्य निर्माता अकबरच होय. "

**आपली प्रगती तपासा:**

१) बाबराची योग्यता तपासा.

## १.१२ सारांश

बाबराने भारतावर आक्रमण केले तेव्हा भारतातील राजकीय परिस्थिती अतिशय गोंधळाची, दुबळी व एकमेकांचे शत्रुत्व असलेली होती. सामाजिक आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात होती. याचा फायदा घेऊन बाबराने भारतावर एकूण ५ स्वाऱ्या केल्या. पानिपत युद्धामध्ये इब्राहिमखान लोदीचा पराभव केला. भारतात राजकीय सत्तेची सुरूवात केली. खानवाच्या युद्धामध्ये राणासंग याचा पराभव करून भारतात आपली सत्ता स्थिर केली, बाबर हा सर्वगुण संपन्न होता.

## १.१३ प्रश्न

१) बाबराच्या आक्रमणाच्या वेळी भारतातील राजकीय परिस्थिती सांगा.

२) पानिपत युद्धाचे वर्णन करा.

३) राणासंग बाबर यांच्यातील युद्धाची माहिती द्या.

४) बाबराची योग्यता स्पष्ट करा.

## १.१४ संदर्भ


- केतकर संध्या, भारतीय कलेचा इतिहास, ज्योत्स्ना प्रकाशन, पुणे, २०१६.
- वर्मा हरिश्चंद्र, मध्यकालीन भारत (भाग २) (१५४० - १७६१), दिल्ली विश्वविद्यालय, प्रथम आवृत्ती, दिल्ली, २०१७.
- शर्मा सतीशचंद्र, मध्ययुगीन भारत : मोगल साम्राज्य (१५२६ - १७४८), (खंड २), के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१७.
- मेहता जे. एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास (खंड २), आवृत्ती चौथी, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१६.
- मेहता जे. एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास (खंड ३), आवृत्ती तीसरी, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१४.
- चिटणीस, के. एन., मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: १, तिसरी आवृत्ती, प्रकाशिका सौ. आर. के. चिटणीस, पुणे, २००३.
- चिटणीस, के. एन., मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: २, दुसरी आवृत्ती, प्रकाशिका सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८७.
- चिटणीस, के. एन., मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: ४, प्रथम आवृत्ती, प्रकाशिका सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८५.
- भिडे गजानन, नलावडे विजय, नाईकनवरे वैजयंती, मध्ययुगीन भारत (सामाजिक, आर्थिक आणि संस्कृतीक इतिहास), फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.
- पवार विश्वनाथ, डॉ. शिंदे, मुघलकालीन भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.


*****

# २

# हुमायून व शेरशहा

**घटक रचना**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

नासिरुद्दीन मोहम्मद हुमायून १५३०-५६

२.२ हुमायूनचा परिचय

२.३ हुमायून समोरील अडचणी

२.३.१अ ) अंतर्गत अडचणी

१) वारसा हक्काचा नियम २) हुमायूनचे भाऊ

३) हुमायूनचे नातेवाईक ४) असंघटित व दिशाहीन सैन्य

५) बाबराची प्रशासन व्यवस्था ६) रिकामा राज्यकोष

२.३.२ब) हुमायूनच्या बाह्य अडचणी

१) बिहारमधील पठाणी सत्ताधीश शेरशहा २) गुजराचा बहादूरशहा

३) इब्राहिमखानचे नातेवाईक

२.४ हुमायूनचे प्रारंभीचे यश

१) कालिंजरवर स्वारी २) अफगाण विरुद्ध मोहिम

३) चुनारगडाचा वेढा ४) हुमायून बहादूरशहा संघर्ष

२.५ हुमायून शेरशहा संघर्ष

१) चुनारचे युध्द २) बंगाल विजय

३) चौसाचे युध्द ४) बिलग्रामची लढाई

५) परशियाकडे प्रयाण

२.६ हुमायूनच्या अपयशाची कारणे

१) साम्राज्याचे विभाजन २) हुमायूनच्या युध्दपध्दतीतील दोष

३) हुमायूनचा स्वभाव ४) पैशाचा प्रचंड खर्च

५) भावासंबंधीचे धोरण ६) हुमायूनमध्ये कुशल नेतृत्व

७) राजपूतांशी असहकार ८) गुजरातवरील निष्कळ स्वारी

९) शेरशहाबाबतचे धोरण १०) शेरखानचे युध्द नेतृत्व

११) हुमायूनने वेळेचा अपव्य केला. १२) हुमायूनला लोकमताचा अभाव

२.७ हुमायूनला सम्राटपदाची पुन्हा प्राप्ती झाली

२.८ शेरशहा सूर १५४०-४५

२.९ शेरशहाचे विजय

१) चुनारची प्राप्ती २) सुरजगडचे युध्द

३) शेरशहा- हुमायून संघर्ष

२.१० शेरशहाचा साम्राज्य विजय

१) सीमा प्रदेशाची व्यवस्था २) बंगालवर विजय

३) माळव्यावर स्वारी ४) रायसेनवरील विजय

५) सिंध व मुलतानवर प्रभुत्व ६) राणा मालदेवशी संघर्ष

७) चितोडवर स्वारी ८) कलिंजरवर विजय

२.११ शेरशहाच्या सुधारणा / प्रशासन व्यवस्था

१) शेरशहाचे साम्राज्य व राजपदाचा सिध्दांत २) बंगालवर विजय

३) केंद्रिय राज्यव्यवस्था ४) कल्याणकारी राजा

५) मंत्री परिषद ६) प्रांतिय प्रशासन व्यवस्था

७) स्थानिक प्रशासन व्यवस्था

२.१२ जमीन महसूल व्यवस्था

१) महसूल व्यवस्थेतील दोष २) शेरशहाच्या महसूल व्यवस्थेची वैशिष्ट्ये

१) श्रेणीबध्द अधिकाऱ्यांची नेमणूक २) जमिनीची मोजणी व प्रतवारी

३) शेतसारा निश्चित अ) बटाई पध्दत, ब) नगदी पध्दत, क) नस्क पध्दत.

४) उत्पादित पिकाचे भाव ठरविण्यात येत ५) नियमित कर वसुली

६) शेतीवरील इतर कर अ) जाहीबाना, ब) महाशिलाना, क) दस्तूरी

७) पिकांचे संरक्षण ८) शेतकऱ्यांना कर्जे

९) महसूल पध्दतीतील दोष १०) गुण.

२.१३ लष्करी सुधारणा

१) सैन्य संख्या २) सैन्याची निवड

३) लष्करी केंद्राची उभारणी

२.१४ शेरशहाच्या इतर महत्त्वाच्या सुधारणा

१) न्यायव्यवस्था २) पोलिस खाते

३) चलन व्यवस्था ४) व्यापार

५) दळणवळणाची व्यवस्था ६) अन्य लोकोपयोगी कार्य

२.१५ शेरशहाची योग्यता

१) शेरशहाचे व्यक्तीमत्व २) कुशल सेनापती

३) श्रेष्ठ प्रशासक ४) धार्मिक धोरण

५) वास्तुकलेची आवड

२.१६ सारांश

२.१७ प्रश्न

२.१८ संदर्भ

## २.० उद्दिष्टे

१. हुमायूनसमोरील अडचणीची माहिती करून घेणे.

२. हुमायून शेरशहा संघर्ष समजावून घेणे.

३. हुमायूनच्या अपयशाची माहिती देणे.

४. शेरशहाच्या सम्राज्यविस्ताराची माहिती देणे.

५. शेरशहाच्या प्रशासन व्यवस्थेची माहिती घेणे.

## २.१ प्रस्तावना

बाबराच्या मृत्यूनंतर हुमायून सत्तेवर आला. त्याने प्रारंभीच्या अडचणी दूर करुन सत्ता स्थिर करण्याचा प्रयत्न केला. परंतु शेरशहाच्या संघर्षामुळे सत्ता गमवावी लागली. शेरशहाने १५४०-४५ या काळात दिल्लीची सत्ता ताब्यात घेतली. त्याच्या प्रशासकीय सुधारणा अतिशय महत्त्वाच्या होत्या. त्याच्या मृत्युनंतर हुमायूनने पुन्हा सत्ता ताब्यात घेतली. त्यामुळे दिल्लीच्या गादीवर १५३०-४० व १५५५-५६ या काळात हुमायूनची सत्ता होती. तर १५४०-५५ या काळात सुर घराण्यांची सत्ता होती.

**नासिरुद्दीन मोहम्मद हुमायून १५३०-५६:**

पानिपतच्या युध्दाने बाबराने मोगल साम्राज्याची स्थापना केली. प्रचंड प्रमाणात साम्राज्य विस्तार केला. परंतु अल्प काळात त्याला प्रशासन व्यवस्था निर्माण करता आली नाही. त्यात अनेक चुका निर्माण झाल्या. त्या चुका सोडवण्यात हुमायूनची कारकिर्दी गेली. म्हणून असे म्हणतात की, बापाच्या चुका सोडवत असतानाच, त्यात स्वतःच्या धोरणाने अनेक चुका केल्या. परिणामी हुमायूनला राज्य त्याग करावा लागला. सुदैवी हुमायूनने आपल्या शेवटच्या काळात पुन्हा राज्य प्राप्त करून मोगल साम्राज्याची सत्ता पुढे योग्य रितीने चालू ठेवली.

## २.२ हुमायूनचा परिचय

बाबराची पत्नी माहम बेगम हिच्या पोटी नासिरुद्दीन मोहम्मद हुमायून याचा जन्म काबूल येथे ६ मार्च १५०८ रोजी झाला. हुमायून या शब्दाचा अर्थ "सुदैवी" परंतु तो प्रत्यक्षात दुदैवी ठरला. बाबराला ४ मुलगे व एक मुलगी होती. गुलरुख बेगमपासून १५१४- कामरान तर

१५१६ अस्करी तर दिलवर बेगमपासून १५१५ हिंदाल व कन्या गुलबदन अशी चार मुले होती. त्याला तुर्की, फारसी, अरबी भाषेचे उत्तम ज्ञान होते. साहित्य, गणित, तत्वज्ञान, ज्योतिष इ. विषयामध्ये रुची होती. बाबराच्या काळात त्याला नागरी व लष्करी अनुभव मिळाले. हुमायून शुर, उदार व सुसंस्कृत असला तरी राजकारण चातुर्याचा अभाव होता. दारु, अफूचे सेवनात जास्त दंग असे. बाबराच्या मृत्युनंतर ३० डिसेंबर, १५३० रोजी आग्रा येथे वयाच्या २३व्या वर्षी हुमायूनचे राज्यरोहण झाले. त्याच्या चंचल स्वभावामुळे बाबराचा प्रधान निजामुद्दीन अली मोहम्मद खलिफा याने बाबराचा मेहूणा (बहिणीचा पती) मिर्झा पीर मोहम्मद मेहदी ख्वाजा याला गादीवर बसण्याचा कट रचला. पण ते अपयशी ठरला.

## २.३ हुमायून समोरील अडचणी

३० डिसेंबर, १५३० रोजी हुमायून हिंदुस्थानचा बादशहा झाला, परंतु त्याला प्रारंभीच्या काळातच अनेक संकटाशी मुकाबला करावा लागला. त्याच्यासमोर दोन प्रकारच्या अडचणी होत्या.

### २.३ अ) अंतर्गत अडचणी

**१) वारसा हक्काचा निश्चित नियम नव्हता:**

इस्लामी सत्तेमध्ये राजाच्या मृत्युनंतर त्याच्या गादीचा वारस निश्चित नसे. त्यामुळे त्यांच्या अनेक लोकात संघर्ष होऊन गादी मिळवण्याचा प्रयत्न केला. बाबराच्या मृत्युनंतर हुमायूनचे भाऊ व नातेवाईक यांच्यात संघर्षाला सुरुवात झाली.

**२) हुमायूनचे भाऊ**:

बाबराने मृत्युसमयी हुमायूनला लहान भावाचे संरक्षण करण्यास सांगितले. परंतु त्याचे भाऊ विश्वासघातकी, अप्रामाणिक होते. अस्करी व हिंदाल हे चंचल व अस्थिर असून कर्तुत्वहीन होते. महत्त्वाकांक्षी सरदारांच्या सल्यावरून त्यांनी सतत हुमायूनला त्रास दिला. कामरान धूर्त, कपटी व कारस्थानी असून हुमायूनला शेवटपर्यंत त्रास दिला.

**३) हुमायूनचे नातेवाईक:**

बाबराच्या सैन्यात तैमूरच्या वंशातील अनेक राजपुत्र होते. ते स्वतःला मिर्झा म्हणत. त्यांना बाबराने सैन्यात उच्च पदावरच्या जागा व जहागिऱ्या दिल्या. त्यामुळे ते शक्तीशाली बनले. हे मिर्झा स्वतःला सम्राटापेक्षा श्रेष्ठ समजत असे. बाबराचा जावई मोहम्मद जमान मिर्झा, मेव्हणा मिर्झा मेहदी ख्वाजा व मोहम्मद सुलतान मिर्झा या नातेवाईकांनी हुमायूनला सतत त्रास दिला.

**४) असंघटित व दिशाहीन सैन्य**:

हिंदुस्थानची सत्ता काबीज केल्यानंतर मोगल सैन्यात चैन, विलासी भावना वाढली. या सैन्यात चगताई, तुर्क, उझबेग, पर्शियन, अफगाण, मोगल असे मिश्र सैन्य होते. राज्य, राष्ट्र ही भावना नसून सत्ता मिळवणे एवढीच भावना त्यांच्यात होती.

**५) बाबराची प्रशासन व्यवस्था:**

बाबराची प्रशासन व्यवस्था दुबळी होती. जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था त्यांनी न लावता त्याचे जहागिरीत रुपांतर केले. त्यामुळे जहागिरदाराचे वर्चस्व वाढू लागले. याचा तोटा हुमायूनला झाला.

**६) रिकामा सरकारी राज्यकोष:**

सत्तेचे संरक्षण करण्यासाठी तिजोरी समृध्द असणे गरजेचे असते, परंतु बाबराने विजय प्राप्तीनंतर अनेकांना संपत्ती वाटली होती. परिणामी तिजोरी रिकामी झाली. ही अडचण हुमायूनची होती.

**७) स्वतः हुमायून:**

सर्वात मोठा शत्रू स्वतः हुमायूनच होता. कारण, बाबराच्या मृत्युनंतर अराजक माजली. परंतु ती मोडण्याची ताकद हुमायूनमध्ये नव्हती. तो दुबळा, व्यसनी, चंचल स्वभावाचा होता. त्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या.

**२.३ ब) हुमायूनच्या बाह्य अडचणी:**

बाबराच्या अकाली मृत्युनंतर मोगल साम्राज्य भक्कम पायावर उभे राहू शकले नाही. त्यामुळे हुमायूनला अनेक बाह्य शत्रूंना तोंड द्यावे लागले.

**१) बिहारमधील पठाणी सत्ताधीश शेरशहा:**

बाबराने पठाणांचा बंदोबस्त न केल्याने, पठाणांकडे बिहारचा प्रदेश होता. दिल्लीची सत्ता गेल्याचे त्यांना दुःख झाले. त्यामुळे ती सत्ता मिळवण्याचा प्रयत्न केला. त्याचे नेतृत्त्व शेरशहाने केले. हा अतिशय धूर्त, चतुर, प्रभावी असल्याने शेवटपर्यंत त्याने हुमायूनशी संघर्ष केला व पठाणी साम्राज्य पुन्हा स्थापन केले.

**२) गुजरातच्या सुलतान बहादुरशहा:**

गुजराथ व माळवा या प्रदेशावर बहादूरशहाची सत्ता होती. त्याला रजपूतांचा मेवाड व माळवा जिंकून दिल्ली ताब्यात घ्यायची होती. हा प्रदेश म्हणजे हुयमायूनच्या शत्रूचे आश्रयस्थान होते. त्यामुळे त्यांनी हुमायूनला मोठ्या प्रमाणात त्रास दिला.

**३) इब्राहिमखान लोदीचे नातेवाईक:**

इब्राहिम लोदीचा भाऊ महंमद लोदी याने बंगालचा सत्ताधीश नुसरतखानाची मदत घेऊन, दिल्लीची गादी मिळवण्याचा प्रयत्न केला. तर इब्राहिम लोदीचा काका अलमखान याने बाबराला दिल्ली स्वारीचे निमंत्रण दिले. परंतु नंतर त्यांच्यामध्ये वाद झाला. बाबराच्या मृत्युनंतर स्वतःची सुटका करुन बहादूरशहाच्या मदतीने दिल्ली जिंकण्याचा प्रयत्न केला.

**४) हुमायूनचे परप्रांतातील भाऊ:**

बाबराच्या आज्ञेप्रमाणे हुमायूनने भावाना साम्राज्याची वाटणी करुन दिली. काबूल व कंदहार कामरानला, संभळ - अस्करीला, अलवरचे क्षेत्र (मेवान) हिंदाल, सुलेमान मिर्झा बदक्षान वाटून केंद्रीय सत्ता दुर्बल बनवली. परंतु कामरानची नजर पंजाबवर असल्याने त्याने उठाव केला त्यामुळे त्याला पंजाब दिला. परिणामी दिल्लीला सतत धोका निर्माण झाला.

**आपली प्रगती तपासा:**

१) हुमायून समोरील अंतर्गत अडचणी.

---

---

---

---

## २.४ हुमायूनचे प्रारंभीचे यश

**१) कलिंजरवर / कालिंजरवर स्वारी: १५३१**

बाबराच्या काळात हुमायूनने कलिंजरवर स्वारी केली परंतु ती अर्धवट सोडून दिली. राज्यरोहणाच्या नंतर बुंदेलखंडातील कलिंजरच्या सुप्रसिध्द किल्ल्यावर स्वारी केली. कारण कलिंजरचा रजपूत राजा चंदेलवंशीय प्रतापरुद्र यांने अफगाणी पठाणांची मदत घेऊन मोगल सत्ता नष्ट करण्याची योजना आखली होती. तेव्हा १५३१ मध्ये स्वारी करुन पराभूत केले. प्रतापरुद्रकडून प्रचंड खंडणी व सवलती मिळवल्या.

**२) अफगाणांविरुध्द मोहिम : १५३२**

हुमायूनने कलिंजवर स्वारी केली. या संधीचा फायदा घेऊन महंमद लोदी, बिबनखान, शेख बायाजिद यांनी एकत्र येऊन जोनपूरवर हल्ला करुन ताब्यात घेतले. हुमायूनने त्यांच्यावर स्वारी करुन दौराह येथे सर्व अफगाणी नेत्यांचा १५३२ मध्ये पराभव केला.

**३) चुनारगडचा वेढा : १५३२**

महंमद लोदीच्या पराभवानंतर हुमायूनने चुनार गडाला वेढा दिला. त्यावेळी शेरशहा सत्ताधीश होता. त्याने आपला मुलगा जलालखान यांच्याकडे लष्कराचे / सैन्याचे नेतृत्व दिले आणि स्वतः बिहारमधील डोंगराळ प्रदेशाचा आश्रय घेतला कारण-

१) आपले स्वकीय सुरक्षित ठेवून बाहेरुन हुमायूनवर हल्ले करुन त्याला हैराण करणे.

२) किल्ल्यातील सैन्याला सर्व नियमीत पुरवठा करणे.

गुजराथच्या बहादूरशहाने १५३२ मध्ये माळव्यावर स्वारी केली. त्यामुळे हुमायूनने शेरशहाशी वाटाघाटी करुन मोहिम संपवली. या तहानुसार शेरशहाचा मुलगा कुतूबखान हुमायूनच्या नोकरीत ठेवण्यात आला. पुन्हा शेरशहाकडे लक्ष न दिल्याने त्याने स्वतःची ताकद वाढवली.

### ४) हुमायून बहादूरशहा संघर्ष : १५३४-३६

गुजरायचा सुलतान बहादूरशहा हा अत्यंत महत्त्वाकांक्षी असून सामर्थ्यवान होता. त्याने हुमायूनचे नातलग महंमद जमान मिर्झा, सुलतान मिर्झा, आलमखान लोदी इ. अनेकांना आश्रय दिला होता. यावेळी स्वतःचे सामर्थ्य वाढवण्यासाठी बहादुरशहाने रजपूत राज्यावर स्वारी केली. यावेळी राणासंगाची पत्नी कर्णावती हीने विक्रमादित्याला गादीवर बसवून चितोडचे संरक्षण करत होती. कर्णावतीने हुमायूनला राखी पाठवून मदतीची याचना केली. परंतु बहादूरशहाने हुमायूनला पत्र पाठवून मी जिहाद पुकारला आहे असे कळवले. धार्मिक आंधळेपणामुळे हुमायूनने कर्णावतीला मदत केली नाही. त्यामुळे बहादूरशहाने रजपूतांचा पराभव केला.

बहादूरशहाचे सैन्य थकले आहे. या संधीचा फायदा घेऊन हुमायूनने बहादूरशहावर स्वारी केली. त्यामुळे बहादूरशहाने मांडूच्या किल्ल्यात आश्रय घेतला. त्याला हुमायूनने वेढा दिला. त्यामुळे बहादूरशहाने तेथून पळ काढून चंपानेरकडे आश्रय घेतला. तेथून तो पुढे खंबायतला १५३५ ला गेला. ६ ऑगस्ट १५३५ मध्ये हुमायून चंपानेर ताब्यात घेऊन प्रचंड संपत्ती मिळवली. शेवटी बहादूरशहा दीव बेटावर पोर्तुगिजांच्या आश्रयास गेला. हुमायूनने मांडू, चंपानेर, अहमदाबाद जिंकून गुजराथ व माळवा प्रांतावर वर्चस्व निर्माण केले. गुजराथमध्ये अस्करीला सुभेदार नेमले. ऑगस्ट १५३६ मध्ये हुमायून परत आग्राला आला. तेथे विलास व आरामात दंग झाला. विजय प्राप्तीमुळे हुमायूनने प्रचंड संपत्ती वाटली. हुमायून चैनी विलासीत दंग असल्याने बहादूरशहाने दीवहून अस्करीवर चाल केली व नवसारी, भडोच, सुरत, कॅबे जिंकून घेतले. त्यानंतर हुमायूनकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे अस्करीने जीव वाचवण्यासाठी आग्राला पळून गेला. बहादूरशहाने पुन्हा गुजराथवर वर्चस्व निर्माण केले.

## २.५ हुमायून शेरशहा संघर्ष किंवा हुमायूनने राज्य कसे गमवले ?

### १) चुनारचे युध्द १५३७ (१५३२-४०):

हुमायून गुजराथच्या मोहिमेत गुंतला आहे हे पाहून शेरशहाने आपली ताकद बंगालमध्ये वाढवण्याचा प्रयत्न केला. १५३७ च्या दरम्यान हुमायून शेरशहाच्या बंदोबस्तासाठी बिहारकडे निघाला. परंतु हिंदूबेग याने प्रथम चुनार ताब्यात घेऊ असा सल्ला दिला. त्यामुळे हुमायूनने चुनारला वेढा दिला. परंतु १५३० मध्ये शेरशहाने लाड मलिका या विधवा स्त्रीशी विवाह केल्याने चुनारचा किल्ला शेरखानच्या ताब्यात आला. शेवटी रुमीखानाच्या तोफखान्याच्या मदतीने हुमायूनने विजय मिळवला.

### २) बंगाल विजय १५३८:

हुमायूनने चुनार जिंकल्यानंतर शेरखानने बंगाल मोहिम हाती घेतली. संरक्षण व्यवस्था मजबूत करून सर्व संपत्ती रोहतास येथे ठेवली. ६ एप्रिल, १५३८ रोजी शेरशहाने गौड ताब्यात घेतले. त्यामुळे हुमायूनने शेरशहाशी बोलणी करुन तह करण्याचा प्रयत्न केला. परंतु बंगालचा शासक महमूद याने हुमायूनकडे मदतीची याचना केली. त्यामुळे हुमायूनने बोलणी रद्द करुन शेरशहाविरुध्द मोहिम हाती घेतली. मोहिमेवर जाताना वाटेतच महमूद

मरण पावला. शेवटी १५ ऑगस्ट, १५३८ रोजी हुमायूनने गौंड ताब्यात घेतले. तेथे ८ महिन्यापर्यंत चैन व विलासात मग्न झाला. नंतर १६३९ हुमायून दिल्लीकडे गेला.

**३) चौसाची लढाई (२६ जून, १५३९)**:

गौडहून हुमायूनने आपला प्रवास दिल्लीकडे सुरु केला. यावेळी शेरशहाने हुमायूनला रोखण्याचा प्रयत्न केला. मोंधीरजवळ गंगा नदी पार करुन हुमायून आग्राकडे निघाला. तो मुंगेरपर्यंत गेला. हुमायूनने कर्मनाशा नदी ओलांडून चौसा गावाजवळ पोहचला. तेथे एप्रिल ते जून, १५३९ पर्यंत मुक्काम ठोकला. शेरशहाने हुमायूनशी बोलणीची भाषा सुरु केली. कारण आपले लष्करी सामर्थ्य वाढवता येईल. २५ जून, १५३९ रोजी शेरशहाने शहाबाद जिल्ह्यातील आदिवासी सरदार महारब चेरोवर आक्रमण करण्याचे कारण दाखवून लष्करी छावण्या सुरु केल्या. शेरशहा, त्याचा सेनापती खवासखान, मुलगा जलालखान यांना पाठवले. पावसाचा फायदा घेऊन, हुमायूनला जीव वाचवण्यासाठी पळ काढवा लागला आणि आग्रा येथे पोहचला. अनेक मोगल सैनिक व हुमायूनचे दोन पुत्र या युध्दात ठार झाले. या विजयामुळे शेरखानाने "शेरशहा" ही पदवी लावून घेतली.

**४) कनौज अथवा बिलग्रामची लढाई (१४ मे, १५४०) :**

चौसाच्या पराभवानंतर हुमायून आग्रा येथे आला. तेथे शेरखानच्या बंदोबस्तचा विचार विनिमय केला. भावाची मदत न घेता, स्वतःच शेरखानचा बंदोबस्त करण्यासाठी १ लाख नवीन सैन्य भरती केले. दरम्यानच्या काळात शेरशहाने बनारस, मथुरा, आग्रा हे प्रदेश जिंकून तो कनौजपर्यंत येऊन पोहचला. त्यामुळे हुमायून विशाल सैन्यासह कनौजकडे निघाला. यावेळी चांगल्या प्रतीच्या २१ तोफा, ७०० बंदुका व प्रचंड सैन्य हुमायून बरोबर होते. तर शेरखान जवळ अनुभवी, कसलेले, शिस्तबध्द १५०० सैन्य होते. गंगा नदीच्या किनाऱ्यावर बिलग्राम येथे दोन्ही सैन्याचा तळ समोरासमोर पडला. १५ मे, १५४० रोजी प्रचंड पाऊस पडला. त्यामुळे मोगल सैन्याची दैन्यावस्था झाली. याचा फायदा घेऊन शेरखानने अचानक १७ में, १५४० रोजी हल्ला करून पराभव केला.

**५) हुमायूनचे पर्शियाकडे प्रमाण :**

सिंधकडे जात असताना शिया पंथीय गुरु मीर अली अकबर याची मुलगी हमीदाबानूशी हुमायूनने लग्न केले. नंतर अमरकोच्या राजाचा आश्रय घेतला. तेथून १५४३ मध्ये पर्शियाकडे गेला.

**आपली प्रगती तपासा:**

१) हुमायून-शेरशहा संघर्ष स्पष्ट करा.

## २.६ हुमायूनचे प्रारंभीचे यश

**१) साम्राज्याचे विभाजन:**

बाबराच्या आज्ञेनुसार हुमायूनने आपल्या साम्राज्याचे विभाजन करुन ताकद कमी केली. काबूल, कंदहार, पंजाब हे सरद्ददेवरील प्रांत विश्वासघातकी कामरानकडे दिले. त्यामुळे मध्य आशियातील सैन्य पुरवठा बंद झाला. विभाजनामुळे सर्व साम्राज्यावर हुमायूनचे नियंत्रण राहिले नाही.

**२) हुमायूनच्या युध्द पध्दतीतील दोष:**

हुमायूनची युध्द पध्दत सदोष होती. सैन्याचा तळ देताना सभोवतालच्या भौगोलिक स्थितीकडे दुर्लक्ष करीत असे. चौसा व बिलग्रामचे पराभव यातूनच झाला. त्याला शत्रूच्या हालचाली कधीच समजत नसे. त्यामुळे शेरखानने बेसावधपणे हुमायूनवर हल्ले चढवले. सैन्यात शिस्त नव्हती, तोफखाना अतिशय बोजड व तुलगामापध्दतीचा युध्दात कधीच वापर केला नाही.

**३) हुमायूनचा स्वभाव:**

हुमायूनचा स्वभाव हा चैनखोर, विलासी, अस्थिर प्रवृत्तीचा होता. शत्रूवर विजय मिळवल्यावर त्याचा जास्त फायदा घेत नसे. छोटासा विजय प्राप्त झाला तरी विजयाने बेहोश होऊन प्रचंड खर्च करीत असे. चिकाटी, दृढनिश्चय व करारीपणा या गुणांचा अभाव हुमायूनकडे होता.

**४) पैशाचा प्रचंड खर्च:**

बाबराने प्रचंड संपत्ती नातेवाईक व धर्मगुरुंना वाटून राजकोष रिक्त केला. त्यामुळे अर्थव्यवस्था कोलमडली होती. तरी हुमायूनने मोठमोठे नजराणे, भेटी दिल्या होत्या. चंपानेरच्या विजयानंतर प्रचंड लुट मिळाली. त्याने धार्मिक सण, मेजवानी यात प्रचंड खर्च केला. तसेच दारु, अफु यामुळे तिजोरी सतत रिकामी होत गेली.

**५) भावांसंबंधीचे हुमायूनचे धोरण:**

बाबराच्या इच्छेनुसार हुमायूनने आपल्या भावाबरोबर अतिशय उदारपणे वागला. तरीपण कामरानने हुमायूनला मदत करण्याऐवजी शेरशहाला मदत केली. हिंदाल व अस्करी यांनी हुमायून विरुध्द बंड केले. तरी त्याने भावांना शासन केले नाही. त्यामुळे त्यांनी हुमायूनच्या कार्यात सतत अडचणी निर्माण केल्या.

**६) हुमायूनमध्ये कुशल नेतृत्वाचा अभाव:**

हुमायूनचे लष्करी शिक्षण व अनुभव अधिकारी तसेच सैन्यावर नियंत्रण नव्हते. त्यामुळे वारंवार बंड झाले तरी हुमायूनने कठोर भूमिका घेतली नाही. परिणामी बंडखोरी वाढत गेली.

**७) रजपूतांशी असहकार**:

राणासंगची विधवा पत्नी कर्णवती व मुलगा राजा विक्रमादित्य यांनी हुमायूनकडे मदत मागितली. पण अंधश्रध्देने बहादूरशहा विरुद्ध काफर हिंदूंना मदत नाकारली, चितोडला मदत केली असती तर रजपूतांनी बहादूरशहाच्या संघर्षाच्या वेळी मदत केली असती.

**८) गुजराथच्या बहादूरशहावरील निष्कळ स्वारी**:

बहादूरशहा विरुध्द युध्दात हुमायूनने अनेक चुका केल्या. बहादूरशहा चितोडवर आक्रमण करण्यात गुंतला असताना त्यांच्यावर हल्ला करुन त्याचा पराभव करणे शक्य होते. पण ते हुमायूनने केले नाही. हुमायूनने चंपानेर, गुजराथ, माळवा जिंकून त्यावर नालायक, नादान अस्करीसारख्याची नेमणूक केली. परिणामी बहादूरशहाने पुन्हा गुजराथ ताब्यात घेतला. प्रतिष्ठेला धक्का बसला. बहादूरशहाच्या स्वारीतून काहीच निष्कळ झाले नाही.

**९) शेरशहा बाबतचे धोरण:**

पानिपतच्या पराभवाचे दुःख शेरशहाच्या मनात सलत होते. त्यामुळे त्याने सर्व पठाण एकत्र करून दिल्ली पुन्हा मिळवण्याचा प्रयत्न करत होता. हुमायून शेरशहाचा पराभव करणे हे साधी गोष्ट समजत असल्याने त्याच्या कारवायाकडे दुर्लक्ष करत होता. १५३२ मध्ये चुनारगड येथे शेरखानचा पराभव केला. परंतु त्याचा कायमचा बंदोबस्त केला नाही. त्यामुळे सतत शेरखानने आपले लष्करी सामर्थ्य वाढवून हुमायूनला शह देण्याचा प्रयत्न केला. त्यातून हुमायूनचा पराभव झाला.

**१०) शेरखानचे युध्द नेतृत्व:**

पठाणी सरदार शेरखान अतिशय धूर्त व महत्त्वकांक्षी होता. तो अत्यंत चाणाक्ष व राजकारणधुरंधर होता. शेरशहाने चौसा बिलग्रामच्या लढाईत सैन्यसंख्या, शस्त्रसंख्या कमी असून हुमायूनचा पराभव केला. कारण शेरखानचे युध्द हालचालींवर नियंत्रण होते.

**११) हुमायूनने वेळेचा अपव्यय केला:**

हुमायूनला जो वेळ मिळाला तो ख्याली, खुशाकीत घालवला. तो वेळ जर शत्रूला त्रास देण्यात घालवला असता तर, हुमायून महान मोगल सम्राट ठरला असता. शेरशहाच्या विरुध्द लढतना बराच वेळ वाया घालवला. त्यामुळे शेरशहाला स्वतःची शक्ती संघटीत करण्यात पुरेसा वेळ मिळाला.

**१२) हुमायूनला लोकमताच्या पाठिंब्याचा अभाव:**

लोककल्याणावरच साम्राज्याचे स्थैर्य अवलंबून असते. बाबर, हुमायूनने जनकल्याणाच्या बाबतीत कोणतेही विधायक कार्य न केल्याने लोकमताचा पाठिंबा संकट काळी मिळू शकला नाही.

**आपली प्रगती तपासा:**

१) हुमायूनच्या अपयशाची कारणे सांगा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## २.७ हुमायूनला सम्राटपदाची पूनः प्राप्ती - १५५५-५६

हुमायूनने इराणच्या शहाबरोबर १५४४ मध्ये तह करून, शिया पंथ स्विकारला आणि १४ हजार फौज घेऊन कंदाहारचा सुभेदार अस्करीचा पराभव करून प्रदेश ताब्यात घेतला. नंतर त्याने काबूलला वेढा दिला. कामरान काबूलचा सत्ताधीश होता. त्याचा १५ नोव्हेंबर, १५४५ मध्ये पराभव करून काबूल जिंकून घेतले. पुढे १५५१ मध्ये हुमायून कामरान यांच्यामध्ये संघर्ष झाला. त्यात हिंदाल मारला तर कामरानचा पराभव केला. कामरानचा मृत्यु १५५७ मध्ये झाला. तर अस्करीला कैद करून मक्केला पाठवले. अशा रितीने सर्व भावांचा विरोध मोडून काढला.

**दिल्लीचा सत्ताधीश (२३ जुलै १५५५):**

शेरखान २२ मे, १५४५ मध्ये मरण पावला. त्यामुळे सुर घराण्याचा ऱ्हास सुरु झाला. त्यानंतर १२ वर्षांचा मुलगा फिरोजशहा गादीवर बसला. त्याचा खून मामा मुबारीजखानाने करुन दिल्लीची सत्ता ताब्यात घेतली व महंमद अदिलशहा नाव धारण केले. तो अकार्यक्षम असल्याने हिंदू अधिकारी हेमू हा सर्वकारभार पाहात होता. १५५४ च्या दरम्यान हुमायून विशाल सैन्यासह हिंदूस्थानकडे येण्यास निघाला. मार्च, १५५५ पर्यंत लाहोर व आसपासचा प्रदेश जिंकला. नंतर दिपालपूर, हरिमान जिंकले, सतलज नदीच्या किनाऱ्यावर १५ मे, १५५५ रोजी मच्छीवाडा येथे तातरखान व नसीबखांन यांचा हुमायूनने पराभव केला. त्यामुळे पंजाबचा राज्यपाल शिकंदरशहा सुर याने हुमायूनला आडवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यात सिकंदरशहाचा पराभव झाला. सिकंदरशहाचा पराभव होताच हुमायूनचे १५ वर्षानंतर पुन्हा दिल्लीत प्रवेश केला. २३ जुलै, १५५५ रोजी राज्याभिषेक करुन घेतला. शिडीवरून घसरून २४ जानेवारी १५५६ रोजी हुमायून मरण पावला.

## २.८ शेरशहा सूर (१५४०-४५)

लोदीच्या काळात शेरशहा ऊर्फ फरीदचा आजोबा इब्राहिमखान सूर भारतात आला व पंजाबमधील बसवाडा येथे स्थायिक झाले. इब्राहिम सूर हा घोड्यांची खरेदी-विक्री करत असे. हसन सुरला १४७२ मध्ये शेरशहा ऊर्फ फरीद हा मुलगा झाला. हसनखान याने जमालखानाकडे नोकरी धरली. हसनला अनेक बायका असल्याने सावत्र आईकडून मोठ्याप्रमाणात शेरशहाला त्रास होत असे. ससाराम येथे बालपण गेले. सावत्र आईच्या त्रासाला कंटाळून शिक्षणासाठी फरीद जौनपूरला गेला. तेथे फारसी भाषा, राजनिती व युध्दशास्त्र यांचे ज्ञान मिळवणे. जलालखानच्या सांगण्यावरुन हसन सुरने फरीदकडे १४९७ मध्ये ससाराम, खवासपूर, टंडा या जहागिरीचा कारभार सोपवला.

१४९७ ते १५१४ या काळात जहागिरीत शेती सुधारणा, जनकल्याणकारी कामे केल्याने अत्यंत लोकप्रिय बनला. त्यामुळे सावत्र आई, भाऊ यांनी फरीदच्या विरुध्द कट रचण्यास सुरुवात केली. त्यामुळे फरीदला ससाराम सोडून द्यावे लागले. १५१८ मध्ये हसन मरण पावल्यानंतर जहागिरीसाठी वाद निर्माण झाला. हा वाद बिहारचा प्रशासक मोहम्मद खान सूर याच्या मध्यस्थीने मिटवला. राज्याच्या वाटणीचा विचार केल्याने फरीदने जहागिरी सोडून बिहारचा राज्यपाल बहारखान लोहानीकडे नोकरी पत्करली. वाघाला ठार केल्यामुळे बहारखानाने 'शेरखान' ही पदवी फरीदला दिली. त्याला आपल्या मुलाचा शिक्षक व संरक्षण नेमले. नंतर बिहारचा उपराज्यपाल नेमले. शेरखानचे वाढते वर्चस्व, जुन्या पठाणी लोकांना अमान्य झाल्याने शेरखान विरुध्द कारस्थाने रचली. परिणामी बहारखानाने बडतर्फ केले. शेरखान एप्रिल, १५२७ मध्ये बाबराला जाऊन मिळाला. बाबराच्या मदतीने ससारामची जहागिरी प्राप्त केली. १५२८ मध्ये बाबरची नोकरी सोडून शेरखान बिहारमध्ये आला, हुमायून बरोबर जून १५३२-४० चा काळात संघर्ष करुन पराभूत केले व स्वतःचा राज्याभिषेक करुन "शेरशहा" ही पदवी धारण केली.

## २.९ शेरशहाचे विजय

### १) चूनारची प्राप्ती:

१५३० सुलतान इब्राहिम लोदीचा गव्हर्नर ताजखानकडे चूनारचा किल्ला होता. तो आपल्या ज्येष्ठ पुत्राच्या बंदोबस्तासाठी गेला असता मरण पावला. त्यावेळी शेरशहाने ताजखानची धाकटी सुंदर पत्नी लाडमलिका हिचे प्रेम संपादन करून, तिच्याशी प्रेम विवाह केला. त्यामुळे चूनार किल्ला व संपत्ती शेरशहाला मिळाली.

### २) सुरजगढचे युद्ध:

१५३४ मध्ये बंगालचा नुसरतशहा मरण पावल्यानंतर घियासूद्दीन सत्ताधीश बनला. बिहारचा लालखान व अनेक लोहानी पठाण सरदार बंगालच्या आश्रयाला गेले. घियासूद्दीन जलालखान आणि अनेक पठाणी सरदार शेरशहावर चालून गेले. या दोन फौजेची भेट सुरजगड येथे झाली. त्यात शेरशहाचा विजय झाला.

### ३) शेरशहा हुमायून संघर्ष १५३९-४० (सविस्तर माहिती पृष्ठ क्र. २८ व २९ वर वाचावी):

१. चौसाची लढाई १५३९.

२. बिलग्रामची लढाई १५४०

३. दिल्ली व आग्रा काबीज १५४०

### ४) शेरशहाचा राज्यारोहण (१५४१):

शेरशहाने हुमायूनचा कनौजच्या सुध्दात पराभव करून हिंदुस्थानातून त्याला हाकलून लावले. चौसाच्या युद्धानंतर शेरशहाने स्वतःचा राज्याभिषेक करून घेतला व "शेरशहा " ही पदवी धारण केली.

**५) शेरशहाच्या विजयाची कारणे:**

१. शेरशहा श्रेष्ठ दर्जाचा सेनापती व लढवया होता.

२. राजकारण, मुत्सदेगिरी व कुटिल कारस्थानात शेरशहा श्रेष्ठ ठरला.

३. शेरशहा लोकप्रिय नेता असून न्याय निष्ठूर, प्रजावत्सल व धार्मिक सहिष्णू शासक होता.

४. हुमायूनची प्रतिकूल परिस्थिती असून नातेवाईकांनी असहकार्य व विश्वासघात केला.

५. हुमायूनचा स्वभाव, सदोष युध्दपध्दती, अदूरदृष्टी, धरसोडीचे घोरण व्यसने, भोगाविलासाची आवड स्वप्नाळूपणा इत्यादी दुर्गुण होते.

## २.१० शेरशहाचा साम्राज्य विस्तार

शेरशहाने स्वतःचा राज्याभिषेक करुन घेतला नंतर सत्ता संघटन आणि साम्राज्य विस्ताराचे कार्य हाती घेऊन अनेक प्रदेशावर आपली सत्ता स्थापन केली.

**१) सीमा प्रदेशाची व्यवस्था:**

शेरशहाने हुमायूनचा पाठलाग करण्यासाठी खवासखान या सरदाराला पाठवले. स्वतः दिल्ली व आग्राची व्यवस्था करुन लाहोरकडे गेला. पंजाबचा ताबा मिळवला. किल्ला उत्तर-पश्चिम सरहद्द सुरक्षित करण्यासाठी 'रोहतासगड' नावाचा किल्ला बांधला व येथे हैबतखान व खवासखान यांच्या नेतृत्वाखाली एक सैन्य तुकडी ठेवली.

**२) बंगालवर विजय (१५४१)**:

बंगालचा गव्हर्नर खिज्रखानाने शेरशहाच्या विरूद्ध बंड पुकारुन स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे शेरशहाने ताबडतोब त्याला १५४१ मध्ये कैद करून उठावाचा बिमोड केला. पुन्हा बंगालमध्ये बंडाळी होऊ नये, यासाठी विभाजन केले. त्या प्रत्येक प्रांतावर (जिल्ह्यावर) स्वतःहून मुख्य आयुक्त नेमले. हे सर्व अधिकारी शेरखानास जबाबदार होते.

**३) माळव्यावर स्वारी (१५४२):**

मल्लूखानाने मंडू, उजैनी, सारंगपूर इत्यादी प्रदेश जिंकून स्वतंत्र सत्ताधीश झाल्याचे घोषित केले. स्वतः ला "कादीरशहा " ही पदवी धारण केली. शेरशहाने कादीरशहावर १५४२ मध्ये आक्रमण करुन त्याचा पराभव केला. माळवा ताब्यात घेतला. शेरशहाने सुजातखानास माळव्याचा गव्हर्नर नेमले. तो आग्राकडे परत जाताना रणथंभोर किल्ला जिंकून घेतला.

**४) रायसेनवरील विजय (१५४३):**

भोपाळ जवळील रायसेन येथे चौहान घराण्यातील रजपूत राजा पुरणमल हा सत्ताधीश होता. त्याने मुसलमानावर अत्याचार केल्याची बातमी शेरशहाला मिळाली, म्हणून शेरशहाने १५४३ मध्ये रायसेनला वेढा दिला. परंतु रजपूतांच्या पराक्रमामुळे विजय मिळवणे अवघड झाल्याने शेरशहाने कुटनीतीचा डाव टाकला. कुराणावर हात ठेवून वचन दिले. कि. "किल्ला

स्वाधीन केल्यास सैनिकासह जीवनदान देण्यात येऊन सुरक्षित बाहेर जाऊ दिले जाईल, "परंतु चंदेरीच्या विधवा मुस्लिम स्त्रिच्या आक्रोश व तक्रारीमुळे आणि अन्य मुसलमान बांधवांच्या इच्छेमुळे व मुसलमान काझीने जाहिर केले कि, "जी शपथ घ्यायला नको होती ती घेतली असल्याने, अशा शपथेचे बंधन मानण्याचे कारण नाहीं म्हणून शेरशहाने वचन भंग करुन आपला निर्णय बदलला. पुरणमलच्या छावणीला सैन्याने वेढा दिला. त्यामध्ये रजपूत स्त्रियांनी 'जौहर' केले. शेरशहाने रजपूतांची कत्तल करुन अनेक स्त्री पुरूषांना इस्लामी धर्माची दीक्षा दिली. हे प्रकरण शेरशहाच्या - चारित्र्यावर लागलेला एक कलंकच होय."

**५) सिंध आणि मुलतानवर प्रभुत्त्व (१५४३)** :

शेरशहाचा प्रतापी सरदार हैबतखान नियाजीने सिंध प्रांतातील फत्तेहखान जाटला कैद करुन शिरच्छेद करुन, सिंध प्रांत ताब्यात घेतला. तसेच त्याचा सहकारी हिंदू बलोच याला ठार मारून मुलतान ताब्यात घेतले.

**६) शेरशहा व राणा मालदेव संघर्ष (१५४४):**

राणासंगनंतर मेवाडचे महत्त्व कमी होऊन मारवाडचे महत्त्व वाढले होते. तेथील सत्ताधीश राणामालदेव हा होता. राणा मालदेव प्रचंड शक्तीशाली होता. हे राज्य दिल्लीपासून २० मैल अंतरावर होते, असे शक्तीशाली राज्य जवळ असणे हा धोका शेरशहाला वाटत होता. त्यातच हुमायूनला आश्रय दिला होता. त्यासाठी शेरशहाने मालदेवचा बंदोबस्त करण्यासाठी ६० हजार फौज घेऊन, मालदेववर चाल केली. मालदेवने ही ४० हजार फौज सज्ज करुन युध्दाची तयारी केली. तेव्हा शेरशहाने खोटी पत्रे तयार करून मालदेवला मिळतील अशी योजना केली. त्या पत्रात प्रमुख सरदार फितूर झाले आहेत असे दाखवले. त्यामुळे राणा मालदेवचे निती धैर्य खचले आणि त्याने गुजराथच्या सीमेवरील शिवाना किल्ल्याचा आश्रय घेतला. शेरशहाने मारवाडची राजधानी जोधपूरवर हल्ला करुन ताब्यात घेतली. तेथे खावासखान व इसाखान निमासी अधिकारी शेरशहाने नेमले.

**७) चितोडवर स्वारी**:

राणा संगाच्या मृत्युनंतर मेवाडमधील चितोडचे महत्त्व कमी झाले. यावेळी उदयसिंह हा अल्पवयीन शिसोदिय वंशाचा राजा गादीवर होता. उदयसिंहाला पराभव करून त्याच्यावर नियंत्रण ठेवले.

**८) कलिंजरवर विजय व शेरशहाचा मृत्यु ( १५४५):**

राजस्थान जिंकल्यानंतर शेरशहाने नोव्हेंबर १५४४ मध्ये कलिंजरला वेढा दिला. येथील राजा किरातसिंह व त्याच्या सैन्याने ६ महिने लढा दिला. किल्ला जिंकणे अवघड झाल्याने शेरशहाने किल्ल्यावर तोफांचा मारा सुरु केला. मुख्य दरवाजाला अग्निबाण तुटून मागे येऊन शेरशहा जवळील दारुभंडारमध्ये पडला. त्या दारुगोळ्याचा स्फोट होऊन, त्यात शेरशहा जखमी झाला. पठाणी सैन्यानी जोरदार किल्ला लढवला व विजय मिळवला. हे शेरशहा समजताच त्याने २२ मे, १५४५ रोजी आनंदाने प्राण सोडला. ससाराम येथे शेरशहाचे थडगे आहे. मृत्यूवेळी शेरशहा ६० वर्षांचा होता.

**आपली प्रगती तपासा:**

१) शेरशहाचा साम्राज्य विस्तार विशद करा.

## २.११ शेरशहाच्या सुधारणा / प्रशासनव्यवस्था

भारताच्या उत्तम प्रशासकामध्ये शेरशहा अत्यंत प्रतिभाशाली व कुशाग्र बुध्दीचा शासक होता. वडिलांच्या जहागिरीत त्याला या कामाचा अनुभव मिळाला. त्याने अल्पकाळात म्हणजे ५ वर्षात राज्य सुधारणेच्या अनेक योजना यशस्वी रीतीने कार्यान्वित केल्या, म्हणून त्याची गणना आदर्श राज्यकर्त्यांमध्ये केली. शेरशहाची राज्यव्यवस्था या मुद्यावर आधुनिक इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत, कालिकारंजन कानूनगो: "अकबरापेक्षा श्रेष्ठ व रचनात्मक प्रतिभेचा राज्यकर्ता शेरशहा होता." डॉ. आर. पी. त्रिपाठी : "आधुनिक काळात शेरशहाची फाजील स्तुती करण्यात आली." त्याने नवीन काही निर्माण केले नसून जुन्या व मोडकळीस आलेल्या संस्थाचे नुतनीकरण करुन जनहिताकरीता उपाय योजले. शेरशहाने निर्माण केलेली राजस्वनीती, राज्यपध्दती, लष्करी सुधारणा इत्यादी त्याच्या आधी अलाउद्दीनने प्रचलीत आणल्या होत्या.

**१) शेरशहाचे साम्राज्य व राजपदाचा सिध्दांत:**

शेरशहाच्या मृत्युसमयी काश्मीर, गुजराथ, आसाम सोडून सर्व उत्तर हिंदुस्थान ताब्यात होता. त्याच्या सिमा पश्चिमेला सिंधपर्यन्त, वायव्येला गक्कर देश, उत्तरेला हिमालय, पूर्वेला आसाम आणि दक्षिणेला विंध्य पर्यंत असा साम्राज्य विस्तार होता. शेरशहा स्वतः प्रशासनाचे केंद्रस्थान असून सर्व सत्ताधारी होता. तो अनियंत्रित व सार्वभौम राजा होता. परंतु अनियंत्रित राजेशाही जनतेच्या हितार्थ राबविली म्हणून त्याला प्रजाहितैषू अनियंत्रित राजा म्हणतात.

**प्रशासन सुधारनेमागील हेतू:**

१. सर्वसामान्य जनतेचे कल्याण आणि पालन करणे. "लोकांच्या इच्छेवर आधारलेले हिंदुस्थानी साम्राज्य उभे करणारा शेरशहा हा पहिलाच होय."

२. पठाणी सरदारातील दोष व उणीवा नष्ट करुन संघटित करून अफगाणांची शक्ती व सत्ता उभी करणे.

३. परकीय आक्रमणापासून सरंक्षण करण्यासाठी सीमांचे रक्षण करणे.

**२) केंद्रीय राज्यव्यवस्था:**

शेरशहाने राज्यव्यवस्थेची बैठक फार व्यापक व विशाल दृष्टिकोनावर आधारलेली होती. त्याच्या सुधारणेचा उद्देश देशात शांतता, राजकीय स्थैर्य व सुबत्ता निर्माण करुन

प्रजाकल्याण साधण्याकडे होता. "प्रजेचे प्रेम राज्यकर्त्याने संपादन केले पाहिजे. प्रजा सुखी तर राजाही सुखी ही थोर भावना शेरशहाच्या हृदयात सतत तेवत होती. "

**१. कल्याणकारी राजा:**

शेरशहाने सर्व राजकीय व्यवस्थेची सुत्रे स्वतःकडे घेऊन स्वतः राजा बनला त्याचा शब्द म्हणजे कायदा होता. त्याला मदतीसाठी मंत्री परिषद होती. त्याने दिलेल्या सुचनाची अंमलबजावणी करणे एवढेच काम मंत्री परिषदेला होते. त्याची एकखांबी प्रशासकीय व्यवस्था असून कल्याणकारी हुकूमशाही होती. डॉ. त्रिपाठी "ते केवळ एका व्यक्तीचेच शासन होते. "

**२. केंद्रिय व्यवस्था अथवा मंत्री परिषद:**

शेरशहा सर्वसत्ताधारी असला तरी मदतीसाठी सहा प्रमुख विभाग करून त्यावर एक एक विश्वासपात्र अधिकारी नेमले ते पुढीलप्रमाणे:

**(१) दिवाण-ए-वझारत (प्रमुख वजीर):**

या खात्याच्या प्रमुखास वजीर म्हणतात. सुलतानानंतर त्याचा दर्जा होता. सर्व मंत्र्यांचा प्रमुख असून सर्व मंत्र्यांच्या कारभाराची पाहणी करणे त्यांना मार्गदर्शन करणे शिवाय राज्याचे उत्पन्न व खर्च त्याचा हिशोब ठेवण्याचे कार्य करणे.

**(२) दिवाण-ए-आरीज (सेना मंत्रालय):**

**या विभागाच्या** प्रमुखास "आरीज-ए-मामलिक" म्हणतात. सैन्यभरती, संघटन, शिस्त व पगार या शिवाय लढाईच्या वेळी सैन्यास अन्न, शस्त्रस्त्रांचा पुरवठा करणे इत्यादी कामे करत.

**(३) दिवाण-ए-मोहतासिब अथवा दिवाण-ए रसालत (परराष्ट्र खाते)**:

या खात्याच्या प्रमुखास परराष्ट्रमंत्री म्हणत. परराष्ट्रांच्या वकिलाचे स्वागत करणे, त्याच्यांशी संबंध ठेवणे, पत्रव्यवहार करणे, आपले दुत पाठवून तेथील माहिती मिळवणे इत्यादी कामे करणे.

**(४) दिवाण-ए-इन्शा (अंतर्गत पत्रव्यवहार):**

या मंत्र्याला राज्यातील सर्व पत्रव्यवहार पाहावा लागे दस्तऐवज व इतर कागदपत्रे सांभाळणे, सुलतानच्या घोषणेचा मसुदा करणे त्याची योग्य ठिकाणी रवानगी करणे इत्यादी कामे करावे लागत.

**(५) दिवान-ए-बारीद (गुप्त हेर खाते):**

अतिशय महत्त्वाचे खाते असून साम्राज्यात गुप्तहेरीचे जाळे पसरविले. राज्यातील दैनंदिन घडामोडीची माहिती मिळवणे इत्यादी कामे करावी लागत.

**(६) दिवान-ए-काझा (न्याय खाते):**

न्याय खात्याच्या प्रमुखाला काझी म्हणत. प्रजेच्या तक्रारी व कैफियतीची सुनावणी करणे, मुलकी व फौजदारी खटल्याचा न्याय निवाडा करणे प्रांतीय न्यायदानाची देखरेख करणे इत्यादी कामे काझीला करावी लागत.

**३) प्रांतिक प्रशासन व्यवस्था:**

शेरशहाच्या साम्राज्यामध्ये ४७ प्रांत, ४४७ तालुके व ३०० खेडी होती. शेरशहाच्या प्रांतीय शासन व्यवस्थेसंबंधी इतिहासकारांमध्ये मतभेद आहे. डॉ. कालिकारंजन कानूनगों "राज्यकारभाराच्या सोयीकरिता शेरशहाने साम्राज्याचे जे अनेक विभाग पाडले त्यात "सरकार" हा सर्वात मोठा घटक होता. " प्रांत व प्रांतीय राज्यपालांची निर्मिती अकबराने केली. डॉ. परमात्माशरण यांच्यामते "शेरशहाच्या वेळी लष्करी राज्यपाल नियुक्त करण्याची प्रथा होती. अकबराच्या बऱ्याच आधीपासून भारतात प्रांतांचे अस्तित्त्व होते. प्रांतांचा प्रमुख अधिकाऱ्याचे कार्य- शांतता, सुव्यवस्था राखणे हे होते."

**४) स्थानिक प्रशासन व्यवस्था:**

**१. सरकार (जिल्हा प्रशासन):**

राज्यकारभाराच्या सोयीसाठी शेरशहाने साम्राज्याचे विभाजन ४७ विभागात केले. या विभागाला इक्ता असे म्हणतात. सरकारमध्ये शिकदार-ए-शिकदरान व मुन्सिफ-ए-मुन्सिफान हे मुख्याधिकारी होते. शिकदार हा लष्करी अधिकारी असून शांतता ठेवण्याचे कार्य करत. गुन्ह्याचे निकाल लावणे. महसूल गोळा करणे. इत्यादी कार्य करत.

**२. परगणा प्रशासन (तालुका प्रशासन):**

सरकारचे परागण्यांमध्ये विभाजन करण्यात आले. शिकदार व मुन्सिफ हे प्रमुख अधिकारी होते. त्यांच्या मदतीला दोन कारकून असत.

**३. मौजा प्रशासन व्यवस्था:**

ग्राम हा शेवटचा विभाग असून मुकादम मुख्य अधिकारी असे. चौधरी, पटवारी, चौकीदार मदतीला असत. गावात शांतता व सुव्यवस्था राखणे व महसूल गोळा करण्याचे काम यांच्याकडे असे.

**आपली प्रगती तपासा:**

१) शेरशहाची केंद्रीय प्रशासन व्यवस्था सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## २.१२ जमीन महसूल व्यवस्था सुधारणा

शेरशहा हा त्याच्या जमीन महसूलविषयक धोरणासाठी प्रसिध्द असून एक आदर्श जमीन महसूल पध्दतीचा वापर केला. शेतकऱ्याची कर देण्याची क्षमता लक्षात घेवून शेतसारा आकारला. अलाउद्दीन खिलजीच्या धोरणाचे अनुकरण करून शेरशहाने सुधारणा केल्या.

**१) जमीन महसूल व्यवस्थेतील दोष:**

१. सुलतान राज्यातील सर्व जमीन स्वतःच्या मालकीची समजत असल्याने, शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा विचार न करता, कर वसूल केला जात असे. त्यामुळे शेतकरी गरीब झाले.

२. वसूली अधिकारी मतानुसार कर गोळा करत.

३. शेतकऱ्यांना पाणीपुरवठा, खते, बी-बियाणे, कर्जे याचे वाटप नव्हते.

**२) शेरशहाच्या महसूल व्यवस्थेची वैशिष्ट्ये:**

**१. श्रेणीबध्द अधिकाऱ्यांची नेमणूक:**

जमीनदार, मुकादम, अन्य अधिकारी शेतकऱ्यावर अरेरावी करून सक्तीने आर्थिक पिळवणूक करीत, यांच्या प्रभावातून मुक्त केल्याखेरीज शेतकरी सुखी होणार नाही आणि उत्पादनात वाढ होणार नाही. हे ओळखून पूर्वीच्या पध्दतीत बदल केला. शेरशहाने साम्राज्याचे प्रांत, सरकार, परगणे व मौजा असे विभाग पाहून त्यावर श्रेणीनुसार बजीर, मुन्सिफ-ए-मुन्सिफन, अमीन, मुकादम, पटवारी असे अधिकारी नेमले.

**२. जमिनीची मोजणी आणि प्रतवारी ठरविली:**

शेरशहाने साम्राज्यातील सर्व जमिनीचे शिकंदरी यार्डाच्या साहाय्याने मापन केले यासाठी अहमदखान याची मदत घेतली. एक बिघा म्हणजे ३६०० चौरस शिकंदरी यार्ड होय. जमिनीची मोजणीनंतर उत्तम, मध्यम, कनिष्ठ या तीन भागात विभाजन केले. जमिनीतून निघणाऱ्या धान्याची सरासरी लक्षात घेऊन एकंदर उत्पादनाच्या आधारे शेतसारा ठरवला.

**३. शेतसारा निश्चित केला:**

डॉ. कानुनगो यांच्या मतानूसार, "एकूण उत्पन्नाचा १/४ इतका शेतसारा ठरविण्यात आला.” तर प्रा. परमात्माशरण यांच्या मते, १/३ इतका शेतसारा" निश्चित केला. शेतकऱ्यांनी सरकारला देण्याच्या रक्कमेला 'पट्ट' असे म्हणत, तो निश्चित झाल्यावर करारनाम्यावर सही करावी लागत त्या करारनाम्याला 'कबुलियात' असे म्हणत. शेतसारा वसूल करण्याच्या पुढील प्रमाने पध्दती होत्या.'

**अ) गल्लाबक्षी किंवा बटाई पध्दत याचे तीन प्रकार:**

१) खेत बटाई - शेतात पिक असतानाच शेतसारा ठरवणे.

२) लंक बटाई / पिक कापणीनंतर व मळणीपूर्वी शेतसारा ठरवणे,

३) रासी / रासबटाई मळणीनंतर शेतसारा ठरवणे,

**ब) नगदी किंवा जाब्ती पध्दत**:

जमीनदार व शेतकरी यांच्यात ३ वर्षासाठी किंवा त्याहून अधिक मुदतीसाठी शेतसारा निश्चित करतात. जमिनीची प्रत पाहून शेतसारा ठरवला जात. उत्पादनात कमीअधिक प्रमाण झाले तरी शेतसा-यात बदल नाही.

**क) नस्क / मुक्ताई पध्दत:**

शेतातील उभ्या पिकांचे किंवा धान्याच्या राशीचा अंदाज घेऊन शेतसारा ठरवणे,

**४. उत्पादित पिकाचे भाव ठरविण्यात येत**:

शेतसारा पैशाच्या रुपाने रोख भरणे अधिक पसंत केले जात असे. तरीही धान्याच्या रूपानेही शेतसारा भरण्यास परवानगी दिली जाते.

**५. नियमीत कर वसुली:**

शेरशहाने प्रत्येकाच्या कुवतीनुसार शेतसारा निश्चित केला. परंतु तो कर दिला नाहीतर कडक मार्गाचा वापर केला जात असे.

**६. शेतीवरील इतर कर:**

**१) जारीबाना:** जमिनीच्या मोजणी अधिकाऱ्यांच्या वेतनासाठी शेतकऱ्याकडून ५% कर घेतला जात असे.

**२) महासिलाना:** कर वसुली अधिकाऱ्यांच्या खर्चास ५% कर घेतला जात असे.

**३) दस्तुरी:** नैसर्गिक व इतर आपत्तीस तोंड देण्यासाठी उपाययोजना म्हणून ७ छटाकधान्य घेतले जात त्यास दस्तुरी कर म्हणत.

**७. पिकांचे संरक्षण**:

पिकांची नासाडी करु नये, शेतकऱ्यांना त्रास देऊ नये, असा सक्त आदेश सैन्याला दिला होता. दुष्काळ व लष्करी हालचालींमुळे पिकांची नासाडी झाल्यास शेतसारा माफ केला जात असे.

**८. शेतकऱ्यांना कर्जे:**

गरजू, गरीब शेतकऱ्यांना, बी-बियाणे, विहिरी खोदणे, बैल देणे इ. करता कर्जे दिली जात असत.

**९. जमीन महसूल पध्दतीचे गुणदोष:**

१) जमिनीची अचूक मोजणी व मुल्यमापन झाले नाही.

२) १/३ शेतसारा निकृष्ट प्रतीच्या जमिनीला जास्त असूनही जरीबाना, महसिलाना, दस्तुरी इ. कर होते.

३) साम्राज्यात सर्वच ठिकाणी एकच महसूल पध्दत नव्हती.

४) दरवर्षी सारा निर्धारित केला जात असल्याने सरकार व शेतकरी यांना त्रास होत असे.

५) महसूल विभागातील लाचलुचपत कमी करण्यात अपयश आले.

६) जहागिरदारांच्या जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांना फार त्रास होत असे.

**आपली प्रगती तपासा:**

१) शेरशहा सुरीची जमीन महसुल व्यवस्था विश्लेषीत करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## २.१३ शेरशहाच्या लष्करी सुधारणा

शेरशहा स्वतः उत्तम योध्दा व कुशल सेनापती असल्याने सैन्य संघटनेची उत्कृष्ट माहिती होती. लष्कराची पूनर्रचना करून शासनाला बळकट बनवण्याचा प्रयत्न केला. शेरशहाच्या सैन्य व्यवस्थेवर अल्लाउद्दीन खिलजीच्या सैन्य व्यवस्थेचा प्रभाव पडला होता.

**१) सैन्य संख्या:**

शेरशहाने सरंजामशाही सैन्य पध्दती बंद करून सैन्य भरतीचे कार्य तो स्वतः करत योग्यतेनुसार सैन्यांचा पगार ठरवत असे आणि बढती देत असे. त्याच्या राजधानीमध्ये दीड लाख घोडदल, २५ हजार पायदळ, ३ ते ५ हजार हातीदल ऐवढी फौज असे शिवाय अन्य लष्करी तळावरही सैन्य अधिकारी होते.

**२) सैन्याची निवड:**

शेरशहा स्वतः उत्तम सैनिक असल्याने तो योग्य सैनिकांची निवड करत असे. त्याच्या सैन्यात प्रामुख्याने पठाणी लोकांचा भरणा असे. नवसैनिकाची मुलाखत / परीक्षा घेऊन निवड करत असे. लायक व गुणी माणसाला निवडून योग्य पगार व अधिकार देत असे.

**३) लष्करी केंद्राची उभारणी:**

शेरशहाने १५४१-४५ या काळात सतत साम्राज्य विस्ताराचे धोरण आखून प्रदेश ताब्यात घेतला. त्या प्रदेशात महत्त्वाच्या व मोक्याच्या ठिकाणी लष्करी केंद्राची उभारणी करुन सैन्याची नेमणूक केली.

## २.१४ शेरशहाच्या इतर महत्त्वाच्या सुधारणा

**१) न्यायव्यवस्था**:

शेरशहा अत्यंत न्यायनिष्ठूर शासक असून तो न्याय प्रिय राजा होता. तो स्वतःला सुलतान-ए-आदिल म्हणजे न्यायी सम्राट म्हणत असे. न्यायदान हे एक पवित्र धार्मिक कर्तव्य आहे

असे समजून तो निःपक्षपातीपणे न्यायदान करत असे. न्यायदानात सगेसोयरे, सरदार जहागिरदार असा भेद ठेवत नसे. दर बुधवारी तो स्वतः अर्जाची सुनावणी करत असे. न्यायमंडळाचा प्रमुख काझी असे. तो केंद्रात तर जिह्यात मुख्य शिकदार, तालुक्यात शिकदार हे फौजदारी न्यायदानाचे कार्य करत असे. शिक्षेचे स्वरुप अत्यंत कडक होते. निजामुद्दीन अहमद म्हणतो की, "शेरशहाच्या भीतीने व त्याच्या न्यायनिष्ठूर स्वभावाने चोर व लुटारु सुध्दा व्यापाऱ्यांच्या मालावर देखरेख ठेवीत."

**२) पोलिस खाते:**

शेरशहाने स्वतंत्र पोलिस खाते निर्माण करुन शांतता प्रस्थापनेसाठी लष्कराचा उपयोग केला. त्यासाठी खेडेगावात मुकादम (पाटील), शहरात कोतवाल, तर परगण्यात शिकदाराकडे शांतता व गुन्ह्यांची चौकशी व त्यांचा बंदोबस्त राखण्याची जबाबदारी होती. डाकू, चोर, समाज कंटकावर नियंत्रण ठेवले. गुन्हा सिध्द झाल्यास कडक शासन केले जाई. खेड्यात "स्थानिक जबाबदारीचे तत्व लागू केले." अब्बास खान यांच्या मते "शेरशहाच्या राज्यात एखादी म्हतारी बाईसुध्दा कोठेही प्रवास करत असे तिला मालाची भिती नसे."

**३) चलन व्यवस्था**:

शेरशहा पूर्वीच्या चलन व्यवस्थेत कोणतीही निश्चित पध्दत नव्हती. नाण्यांचा आकार, वजन, धातू निश्चित स्वरुपाचा नव्हता. त्या सर्व नाण्यावर शेरशहाने बंदी घालून, नवीन नाणी तयार केली. त्यामे 'दाम' नावाचे नाणे तयार केले असून ते तांब्याचे होते. तर 'रुपया' चांदीचा असून हे महत्त्वपूर्ण नाणे होते. त्याचे वजन १८० ग्रेन असून १७५ शुध्द ग्रेन चांदीचे होते. ६४ दाम म्हणजे १ रुपया असे प्रमाण केले. दाम या नाण्याला ३२२ ग्रेन तांबे वापरले होते. सोन्याच्या नाण्याचे वजन १६६ ते १६८ ग्रेन होते. रुपयाचे १६ भाग पाडून चवली, पावली, अधेली अशी नाणी पाडली. त्याने नाण्यांवर अरेबीक, पार्शियिन, देवनागरी भाषेत "सुलतान-उल-अदिल" असे स्वतः चे नाव कोरले. डॉ. कानुनगो यांच्या मते, "रुपया तो पर्यंत आहे जो पर्यंत शेरशहा अमर आहे.

**४) व्यापार अथवा जकात व्यवस्था:**

शेरशहाने व्यापार व वाणिज्य विकासाचा प्रयत्न केला. व्यापारी लोकांना सुयोग्य वागणूक देण्याचा अधिकाऱ्यांना आदेश दिला. व्यापाराला प्रोत्साहन दिले, त्यावरील जकाती व अबकारी कर रद्द केले. वस्तुच्या किंमतीच्या २१ / २% जकात भरावी लागे. राज्यात ठिकठिकाणी कर वसूल करण्याऐवजी केवळ दोन ठिकाणी कर वसूल केला जात. ज्या ठिकाणी माल भरतो व उतरतो तेथे म्हणजे सोनारगाव (पूर्वेकडे) बंगाल व पश्चिमेकडे रोहतास (पंजाब). शेरशहाने रस्ते, पूल, विश्रांतीगृहे बांधली व दळणवळणाची सोय करून व्यापार सुलभ होण्यासाठी चोरट्यांचा बंदोबस्त केला.

**५) दळणवळण व्यवस्था:**

व्यापाराला गती मिळविण्यासाठी रस्ते बांधले रस्त्यांचे महत्त्व जाणणारा शेरशहा हा पहिला सुलतान होय. त्याने सोनारगाव-पेशावर, आग्रा-ब-हाणपूर, आग्रा-चितोड़, लाहोर-मुलतान इत्यादी रस्ते बांधले. त्यांच्या दुतर्फा झाडे लावली.

**६) अन्य लोकोपयोगी कार्य:**

१. राजकीय व इतर आवश्यक कागदपत्रे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठविण्याकरिता संपूर्ण साम्राज्यात ३,४०० घोडयांची व्यवस्था करण्यात आली होती.

२. प्रवासी व टपाल नेण्याच्या सोयीकरिता राजमार्गावर १७०० (धर्मशाळा) बांधल्या, शेजारी विहीर, मशीद, शिकदार, हिंदू, मुस्लिम प्रवाशांसाठी भोजन व्यवस्था असे.

३. शेरशहाने राज्यातर्फे अनाथ व निर्धनास आर्थिक साहाय्य केले. हिंदू- मुसलमानी शाळांना सरकारी अनुदाने दिली. विद्यार्थी व विद्वानांना शिष्यवृत्या दिल्या.

४. प्रजेकरिता मोफत भोजनालय आणि दवाखान चालविला होता.

५. जुन्या दिल्लीचा पुराना किल्ला व झेलम नदीवरचा रोहतासगढ़, सासाराममध्ये मकबरा बांधला.

**आपली प्रगती तपासा:**

१) शेरशहाची लष्करी सुधारणांवर भाष्य करा.

___

___

___

___

२) शेरशहाच्या चलन व्यवस्थेवर चर्चा करा.

___

___

___

___

## २.१५ शेरशहाची योग्यता / कामगिरी

**१) शेरशहाचे व्यक्तीमत्त्व**:

शेरखान सामान्य कुळात जन्माला येऊन मध्यकालीन मुसलमान राज्यकर्त्यांत श्रेष्ठ ठरला. विशाल साम्राज्याचा संस्थापक व सम्राटपदी आरूढ झाला. त्याला कौटुंबिक प्रेमाची उणीव होती. आयुष्यभर पराक्रम, हाल अपेष्टा सहन करून वृध्दपणी सम्राट बनला, तो अत्यंत महत्त्वाकांक्षी, दृढनिश्चयी व अद्भुत पुरुष होता. शेरशहा म्हणतो, "ईश्वराने मला मदत केली आणि नशिबाने साथ दिली तर अल्पावधीत मी मोगलांना भारतातून पिटाळून लावीन." ते त्याने खरे ठरविले.

**२) कुशल सेनापती:**

शेरशहास युध्दनीतीचे असाधारण ज्ञान होते. अनेक लढायात विजय मिळवला होता. त्याच्याकडे शौर्य, धाडस, चिकाटी, निर्भयता इ. उत्तम सेनापतीत लागणारे गुण होते. विजयासाठी भल्याबुऱ्या साधनांचा वापर करत असे. राजा मालदेव व रायसेनाचा पुरणमल यांच्या युध्दात जातिवंत योध्दाला शोभणारे मार्ग नव्हते. हुमायून विरुद्ध युध्दात आपल्या लष्करी प्रतिभेची चुणूक दाखविली. जलदगतीने शत्रूपक्षावर हल्ला हे रणनीतीचे प्रमुख वैशिष्ट्य होते. सैनिकाच्या सुखदुःखात तो सहभागी होत असल्याने, सैनिकांमध्ये अत्यंत प्रिय होता.

**३) श्रेष्ठ प्रशासक**:

शेरशहाने आपली निरंकुश सत्ता जनकल्याणार्थ राबवली. राज्यात स्थैर्य प्राप्त करण्यासाठी प्रजाजनातील बहुसंख्य हिंदुचा पाठिंबा आवश्यक आहे. ओळखून धार्मिक सहिष्णुतेच्या धोरणांचा स्वीकार केला. शेतकरी वर्गाला सुखी करण्यासाठी अनेक सुधारणा केला. राज्यातील बेबंदशाही नष्ट करण्यासाठी अनेक कडक धोरणाचा वापर केला. दरबारातील व्यक्तीला गुणानुसार काम दिले. किन यांच्यामते, “कोणत्याही सरकारने ब्रिटिश सरकारने देखील शेरशहा इतकी प्रशासकीय बुध्दिमत्ता दाखवली नाही.” डॉ. कानुनगो यांच्यामते, "अकरबरापूर्वी हिंदू-मुसलमानांना एकत्र आणून भारताला राष्ट्रात बांधण्याचा प्रयत्न करणारा शेरशहा हा पहिला शासक आहे."

**४) धार्मिक धोरण:**

शेरशहा कृतीने अत्यंत कर्मठ व धर्मपरायण मुसलमान होता. धार्मिक धोरणात एक वाक्यता नाही. हिंदुकडून जिझिया कर वसूल पूरणमलविरुद्ध धर्मयुद्ध पुकारले, कुराणाची शपथ घेऊन हिंदूनायकांची भयंकर कत्तल केली, जोधपुर व कलिंज स्वारीच्या वेळी हिंदूची कत्तल केली. सर्वसाधारण पण तो सहिष्णू व उदार होता. शेरशहा कट्टर सुन्नी संप्रदायी असूनही, धार्मिक विचार उदार होता. डॉ. कानूनगो "शेरशहाने हिंदुधर्मीयांना आदराने वागविले व त्यांच्या धार्मिक श्रध्दास्थानावर आक्रमण केले नाही."

**५) वास्तुकलेची आवड:**

शेरशहाने पंजाबमध्ये रोहतासगढ़, दिल्लीचा पुराना किल्ला बांधला. किल्ला-इ-कोहना मशिदी बांधली. स्वतःसाठीच स्मारक भवन (मकबरा) बिहारमधील ससाराम येथे बांधले. विलच्यामते, "हे स्मारक शेरशहाचे व्यक्तिमत्व व चरित्राचे प्रतीक आहे."

## २.१६ सारांश

बाबराच्या मृत्युनंतर दिल्लीच्या सिंहासनावर १५३०-४० व १५५५-५६ या काळात हुमायूनची राजकीय सत्ता होती. त्याच्या काळात सर्वत्र गोंधळ व संघर्ष सुरु होता. शेरशहाने १५४० मध्ये हुमायूनचा पराभव करून दिल्लीत सुर घराण्याची सत्ता स्थापन केली. शेरशहाने १५४०-४५ या काळात राज्यकारभार करून अनेक सुधारणा केल्या. त्याच्या

प्रशासकीय सुधारणा धोरणामुळे तो इतिहास प्रसिध्द आहे. हुमायूने सुर घराण्याची सत्ता १५५५ मध्ये नष्ट करून पुन्हा मोगल सत्तेची स्थापना केली.

## २.१७ प्रश्न

१) हुमायून-शेरशहा संबंध स्पष्ट करा.

२) हुमायूनच्या अपयशाची कारणे सांगा.

3) शेरशहाचा साम्राज्यविस्तार स्पष्ट करा.

४) शेरशाहाच्या प्रशासकीय सुधारणेचा आढावा घ्या.

५) एक उत्कृष्ट प्रशासक म्हणून शेरशहाच्या योग्यतेचे परीक्षण करा.

## २.१८ संदर्भ


- केतकर संध्या, भारतीय कलेचा इतिहास, ज्योत्स्ना प्रकाशन, पुणे, २०१६.
- वर्मा हरिश्चंद्र, मध्यकालीन भारत (भाग २) (१५४० - १७६१), दिल्ली विश्वविद्यालय, प्रथम आवृत्ती, दिल्ली, २०१७.
- शर्मा सतीशचंद्र, मध्ययुगीन भारत : मोगल साम्राज्य (१५२६ - १७४८), (खंड २), के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१७.
- मेहता जे. एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास (खंड २), आवृत्ती चौथी, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१६.
- मेहता जे. एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास (खंड ३), आवृत्ती तीसरी, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१४.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: १, तिसरी आवृत्ती, प्रकाशिका सौ. आर. के. चिटणीस, पुणे, २००३.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: २, दुसरी आवृत्ती, प्रकाशिका सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८७.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: ४, प्रथम आवृत्ती, प्रकाशिका सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८५.
- भिडे गजानन, नलावडे विजय, नाईकनवरे वैजयंती, मध्ययुगीन भारत (सामाजिक, आर्थिक आणि संस्कृतीक इतिहास), फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.
- पवार विश्वनाथ, डॉ. शिंदे, मुघलकालीन भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.


*****

# ३

## सम्राट जलालुद्दीन मोहमंद अकबर

**घटक रचना**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ सम्राट अकबराचा परिचय

३.३ पानिपतची दुसरी लढाई

१) हेमू  २) हेमू अकबर संघर्षाची पार्श्वभूमी

३) पानिपत युद्ध  ४) पानिपत युध्दाचे परिणाम

३.४ बैरामखानाचा अंमल १५५६-५७

३.५ पेटीकोट सरकार १५६०-६४

३.६ अकबराचा उत्तरेकडील साम्राज्य विस्तार

१) माळवा जिंकला  २) जोनपूर व चुनारवर विजय

३) आमेरशी मैत्री  ४) गोंडवानवरील विजय

५) राजस्थानवर विजय  ६) मेरठ संघर्ष

७) रणथंबोरवर विजय  ८) गुजराथवर विजय

९) बंगाल बिहार जिंकला  १०) हळदी घाटची लढाई

३.७ वायव्य सरहदचे धोरण / साम्राज्य विस्तार

१) काबूलवर विजय  २) वायव्य सरहद्द प्रदेशावर वर्चस्व

३) सिंघवर अधिकार  ४) बलुचिस्तान व कंदहारची प्राप्ती

३.८ अकबराचा दक्षिणेकडील साम्राज्य विस्तार

१) दक्षिण धोरणाची कारणे.

२) अकबराच्या दक्षिण मोहिमा: १) अहमदनगरवर स्वारी. २) खानदेश जिंकला

३.९ अकबराचे रजपूत विषयक धोरण

अ) रजपूत विषयक धोरणाची कारणे :

१) अंतर्गत बंडाळ्या  २) हिंदुस्थानातील विरोधी शक्तीसाठी प्रतिशक्ती करणे

३) धार्मिक स्वातंत्र्य  ४) सामाजिक सुधारणा

ब) रजपूतांशी प्रत्यक्षात संबंध :

१) आमेरशी मैत्री  २) मेरठ

३) चितोड  ४) रणथंबोर

५) हळदीघाट

क) रजपूत धोरणाचे परिणाम :

१) रजपूत मोगलांचे संरक्षक बनले २) मोगलांचा साम्राज्य विस्तार

३) रजपूतांची एकी भंगली ४) मोगल साम्राज्याची सर्वांगीण प्रगती

३.१० अकबराचे महसुलवषयक धोरण

३.११ अकबराच्या सैनिकी सुधारणा

३.१२ अकबराचे मुल्यमापन | इतिहासातील स्थान

१) कलेचा भोक्ता २) दयाभाव

३) कुशल सेनापती ४) धार्मिक धोरण

५) बुध्दिमान प्रशासक ६) राष्ट्रनिर्माता

३.१४ सारांश

३.१५ प्रश्न

३.१६ संदर्भ

## ३.० उद्दिष्टे

१) अकबराचा उत्तरेकडील साम्राज्यविस्तार समजावून घेणे.

२) अकबराच्या रजपूत धोरणाची माहिती देणे.

३) अकबराच्या प्रशासकीय सुधारणेची माहिती देणे.

## ३.१ प्रस्तावना

मोगल साम्राज्याची स्थापना १५२६ मध्ये बाबराने केली. हुमायूनने ते वाढवण्याचा प्रयत्न केला. पण अपयशी ठरला. मोगल साम्राज्याला वैभवशाली बनवण्याचा सम्राट अकबराने प्रयत्न केला. भारतात मुस्लिम सत्तेचा विस्तार करून, खऱ्या अर्थाने त्याला स्थैर्य प्राप्त करुन दिले. प्रशासकीय यंत्रणेत नवे सिध्दांत मांडले व उदार धोरण स्वीकारले. त्यामुळेच जागतिक महान राजांच्या मालिकेत अकबराला मानाचे स्थान प्राप्त झाले. लेनपुल म्हणतो की, "अकबर भारतीय राज्यकर्त्यात सर्वात महान राज्यकर्ता होता." डॉ. ईश्वरीप्रसाद म्हणतो की, "अकबर भारतीय इतिहासात नव्हे तर सर्व जागतिक इतिहासात एक महत्त्वपूर्ण बादशहा आहे. अकबराची योग्यता आणि त्यांची यश याची तुलना युरोपीयन राज्यकर्त्यांशी केली असता, त्यांचे श्रेष्ठत्त्व सिध्द होते. "

## ३.२ सम्राट जलालुद्दीन मोहम्मद अकबराचा परिचय

हुमायुनच्या देशत्यागाच्या काळात त्याची राणी हमीदाबानू अमरकोटचा राणा वीरसालच्या आश्रयाला गेली असताना, १५ ऑक्टोबर, १५४२ रोजी हमीदाबानूच्या पोटी अकबराचा जन्म झाला. अकबराचे पालनपोषण हुमायूनचा सावत्र भाऊ मिर्झा अस्करी व त्याची पत्नी सुलतान बेगम व बाबराची बहिण खानजादा बेगम यांनी केले. अकबरास उच्च शिक्षण देण्यासाठी व्यवस्था करण्यात आली. वयाच्या ९व्या वर्षी म्हणून म्हणजे १५५२ मध्ये गझनीचा सुभेदार म्हणून अकबराला नेमण्यात आले. याचवेळी हुमायूनने आपला वारसदार

म्हणून अकबराला घोषित केले. त्यांचा संरक्षक व मार्गदर्शक बैरामखानाची नेमणूक केली. गझनीचा सुभेदार हिंदालच्या मृत्युनंतर त्याची मुलगी रेझिया बरोबर अकबराने विवाह केला. २४ जाने. १५५६ रोजी दिल्लीत हुमायून मरण पावला. यावेळी अकबर १३ वर्षाचा असून, लाहोर येथे बेरामखानाच्या मार्गदर्शनानुसार १४ फेब्रु. १५५६ रोजी अकबराचा राज्याभिषेक झाला.

## ३.३ पानिपतची दुसरी लढाई ५ नोव्हेंबर १५५६

अकबराच्या राज्याभिषेकाच्या वेळी भारतातील राजकीय स्थिती खालावलेली होती. याचवेळी अकबराकडे सैन्य, द्रव्य याचा अभाव होता. सर्वत्र अराजकता पसरलेली होती. सिंध, मुलतान, काश्मीर, माळवा, गुजराथ, बंगाल हे प्रांत स्वतंत्र झाले होते. रजपूतानी आपली शक्ती वाढवली होती. काबूल येथे मिर्झा हकीम, पंजाबात शिकंदर सुर, मोहम्मद आदिलशाह चुनारगडला तळ ठोकून होता. अनेक संकटे अकबरासमोर उभी होती. हेमूने दिल्ली व आग्रा जिंकून घेतली होती.

**१) हेमू ऊर्फ हेमचंद्र:**

सुरवंशी सुलतान महमंद आदिलशहाचा सेनापती हेमू याचा जन्म रेवांडीच्या धूसर वैश्य जातीत झाला. प्रारंभी मिठाचा व्यापार केला. नंतर शेरशहाच्या कारकिर्दित सैन्यास रसद पुरवण्याचे कार्य केले. इस्लामशहाने एका गुप्त पदावर नेमले. स्वतःच्या अंगभूत शौर्य, चातुर्य, साहसामुळे महमंदशहाने त्याला दिवाण नेमले. त्याने दिल्लीपासून चुनारपर्यंत २४ लढाया लढल्या होत्या. त्यापैकी २२ लढायात विजय मिळवला होता. त्याने हिंदू, पठाण व तुर्कांचे एक विशाल सैन्य उभारले. तो अत्यंत महत्त्वकांक्षी होता. काही इतिहासकारांच्या मते “दिल्लीला हिंदू राज्य स्थापन करण्याची त्याची उत्कट इच्छा होती. त्याने "विक्रमादित्य" ही पदवी धारण केली होती.”

**२) हेमू-अकबर संघर्षाची पार्श्वभूमी:**

हिंदुस्थानातून पिटाळून लावण्याच्या इर्ष्येने अनेक सेनापतीवर हल्ले चढवले. मोगल राज्यपाल इस्कंदरखानाकडून आग्रा मिळवला. संभळचा अलीकुलीखान भिती पोटी पळून गेला. ऑक्टोबर १५५६ मध्ये हुमायूनचा अनुभवी सरदार तारदीबेगला हेमूने पराभूत करुन दिल्ली ताब्यात घेतली. हे सर्वजण पंजाबात सरहिंद येथे पळून जाऊन अकबराच्या सैन्याला मिळाले. त्यामुळे मोगल सैन्यात भितीचे वातावरण निर्माण झाले. ते नष्ट करण्यासाठी बैरामखानाच्या सल्ल्यानुसार अकबराने तारदीबंगला ठार मारले व आपला मोर्चा हेमूकडे वळवला.

**३) पानिपतचे दूसरे युध्द ५ नोव्हेंबर १५५६:**

दिल्लीचे राज्य परत मिळवण्यासाठी अकबराने अलीकुलीखानला १० हजार सैन्य देऊन पाठवले तर हेमू दिल्ली ताब्यात आल्यानंतर पंजाब मिळवण्यासाठी ३० हजार रजपूत, अनेक घोडेस्वार, १५००० हत्ती, बंदुकधारी शिपाई जमावून तयारी केली. या दोन्ही सैन्याची पानिपत येथे भेट झाली. ५ नोव्हेंबर १५५६ रोजी तुंबल युध्द झाले. हेमूच्या डोळ्यात बाण लागून जखमी झाला. तो मरण पावला. अशी अफवा पसरण्याने, सैन्यात

पळापळ सुरु झाली. हेमूचा पराभव होऊन त्याला कैद केले. बहरामखानच्या सल्ल्यावरुन अकबराने हेमूचा शिरच्छेद केला.

**४) पानिपत युध्दाचे परिणाम:**

हेमूबरोबर अफगाणांचे साम्राज्य प्रस्थापनाचे स्वप्न धुळीस मिळाले. हिंदुस्थानात पुन्हा मोगलांची राजवट स्थापन झाली. ६ नोव्हेंबर, १५५६ रोजी अकबराने दिल्लीत प्रवेश करुन सर्व युध्दसाम्रगी व धन्नधान्य आपल्या ताब्यात घेतले, नंतर आग्रा ताब्यात घेतला नंतर थोड्याच काळात अनेक विरोधांचा नाश केला.

**आपली प्रगती तपासा:**

१) दूसऱ्या पानिपत युध्दाचे वर्णन करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ३.४ बैरामखानाचा अंमल १५५६-६०

बैरामखानाचा जन्म बदक्शानमध्ये शियापंथीय मोगल घराण्यात झाला. वडिलाचे नाव सैफअली बेग असे होते. वयाच्या १६ व्या वर्षी बाबराच्या सैन्यात प्रवेश केला. तो अत्यंत साहसी, शूर, प्रामाणिक असल्याने हुमायूनचा तो सल्लागार व सेनापती होता. त्याची स्वामिनिष्ठा व शौर्य पाहून हुमायूनने “खान-ए-खानान" ही पदवी देऊन अकबराचा संरक्षक म्हणून नेमले.

**१) बैरामखानाची कामगिरी:**

हुमायूनबरोबर चौसा व कनोजच्या युध्दात त्याने मर्दुमकी गाजवली. कनोजच्या युध्दानंतर शेरखानाने आपल्याकडे घेण्याचा प्रयत्न केला. पण त्याला नकार दिला. हुमायूनच्या पलयनाच्या काळात पर्शियन शासनाकडून बैरामखानाने १० हजार सैन्याची मदत मिळवून दिली. याच सैन्याच्या मदतीने बैरामखानाने १५४५ पर्यंत प्रशासन संभाळले. अफगाणांविरुध्द विजय मिळवून दिल्ली परत मिळवली. म्हणून हुमायूनने “खान-ए-खानान" ही पदवी देऊन जालंदरचा राज्यपाल नेमला. विद्वता, कुशल सैन्य संचलन, व्यक्तीगत शौर्य इ. गुणामुळे बैरामखान हुमायूनच्या दरबारात अत्यंत लोकप्रिय झाला.

**२)** सिकंदर सूरचा बंदोबस्त करण्यासाठी अकबराच्या नेतृत्वाखाली व बैरामखानाच्या मार्गदर्शनाखाली हुमायूने सेना पाठवली, कलानोर येथे असतानाच हुमायूनच्या मृत्युची बातमी समजताच बैरामखानाने अकबराचा येथे राज्याभिषेक करुन, दिल्लीला परत आला. हेमुने जिंकलेला प्रदेश परत ताब्यात घेतला.

**३) बैरामखानाशी अनेकांचे शत्रूत्व**:

१५५६-५७ या काळात बैरामखान अकबरास प्रशासन आणि साम्राज्य विस्ताराबाबत पूर्ण मार्गदर्शन करीत होता. तरीपण अनेक शत्रू त्यास निर्माण झाले. अकबर मोठा झाल्याने बैरामखानाच्या सल्लाने वागण्याची इच्छा नव्हती. बैरामखान शियापंथी असल्याने दरबारातील सुन्नी पंथीय लोक नाराज होते. या लोकांनी अकबराचे बैरामखानाविरुद्ध कान भरले. बैरामखानाच्या विरोधी अकबराची आई हमीदाबानू, अकबराच्या दाया-माहम अनगा, जीजी अनगा आणि आधमखान, शमसुद्दीन, शिहाबुद्दीन, अहमदखान, मुनीखान इ. मंडळ होती. त्यांच्या सांगण्यावरुन बैरामखानला राज्यकारभारातून काढून टाकले. बैरामखान मक्केकडे जाताना गुजराथ येथे मुक्कामी असताना, पटणा येथील मुबारकखान याने वडिलांचा सुड घेण्यासाठी बैरामखानाला १५६१ मध्ये ठार केले. बैरामखानाच्या विधवा पत्नीशी अकबराने विवाह केला. त्यांचा मुलगा अब्दुल रहिम यास खान-ए-खानान ही उच्च पदवी देण्यात आली.

**४) बैरामखानाच्या पतनाची कारणे :**

१) बैरामखान उदारमनाचा, मनमिळावू, बुद्धिमान स्वामीनिष्ठ सेनापती असूनही तो अधिकाऱ्यांशी सहकार्याने वागत नसे.

२) अधिकाऱ्यांना क्षुल्लक चुकीसाठी कठोर शासन करत असे.

३) शियापंथी सुन्नपंथी यांच्यातील वाद झाल्याने सुन्नी पंथीय त्याच्या विरोधात होते.

४) राजदरबारातील स्त्रीयांनी बहरामखानाविरोधी अकबराचे कान भरले. यामुळे बैरामखानाचे पतन झाले.

**आपली प्रगती तपासा:**

१) बैरामखानची लष्करी कामगिरी अधोरेखित करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ३.५ पेटीकोट सरकार / पडदा शासन | अंतःपुर काळ १५६०-६४

बैरामखानाच्या वर्चस्वातून अकबराची सुटका झाली. परंतु आता दरबारातील स्त्रीयांच्या तावडीत सापडला. तो १५६०-६४ हा काळ होता. या काळाला पेटीकोट सरकार अथवा पडदा शासन असे म्हणतात. ही स्थिती - आसमान से गिरा खजूर अटका हिंदीतील म्हणीप्रमाणे होती. अकबराच्या दाया माहम अनगा, जीजी अनगा तसेच राजमाता हमीदाबानू बेगम या स्त्रियांचे शासनावर वर्चस्व होते. अकबराने शमसुद्दीन अतगाखान याला वजीर नेमले. १५६१ मध्ये माळव्यावर पाठवले. त्याने बाजबहादूरचा पराभव करुन तेथील लुटालुट करुन माल स्वतःजवळ ठेवला. त्यामुळे अकबराने त्याला ठार मारले. पुत्राच्या मृत्युमुळे माहम अनगा ही मरण पावली. अकबराने आपला वजीर मुनीमखानास नेमले.

अशारितीने तो स्वतंत्र झाला. अनेक बंडखोरांचा बिमोड केला. तसेच युध्दकैद्यांना दास बनवण्याचे बंद केले. तीर्थयात्रा कर, जिझीया कर रद्द केला.

## ३.६ अकबराचा उत्तरेकडील साम्राज्य विस्तार

अकबर अत्यंत महत्त्वाकांक्षी व साम्राज्यवादी मनोवृत्तीचा सम्राट होता. अंतःपुरातील महत्त्वाकांक्षी स्त्रियांच्या वर्चस्वातून मुक्त झाल्यानंतर त्याने साम्राज्य विस्ताराची मोहीम हाती घेतली. देशातील अनेक प्रदेश हळूहळू जिंकून घेतले. अकबराने आयुष्यभर राज्यविस्तार करण्याचा प्रयत्न केला. त्याने काबूलपासून बंगालपर्यंत आणि काश्मीरपासून विंध्यपर्वतापर्यंत साम्राज्य विस्तार केला. दक्षिण भारतात थोड्याच प्रमाणात यश प्राप्त झाले. अकबराने हिंदुस्तानात फार मोठ्या प्रदेशात मोगल साम्राज्य प्रस्थापित करण्यात यश मिळविले. अकबराने केलेल्या साम्राज्य विस्ताराचा आढावा पुढीलप्रमाणे :

### १) माळवा जिंकला (१५६१-६२):

माळव्यात शुजातखानाचा मुलगा बाजबहादूर हा राज्य करीत होता. संगीत प्रेमी आणि स्वरुप सुंदर पत्नीच्या प्रेममय जीवनात गुंतून पडला होता. त्याची पत्नी रुपमती उत्कृष्ट कवयित्री होती. त्यामुळे राज्यकारभाराकडे बाजबहादूरचे दुर्लक्ष झाले होते. याचा फायदा घेऊन १५६१ मध्ये अकबराने आधमखानाला पाठवले. बाजबहादूर आधमखान यांच्यात २९ मार्च, १५६१ रोजी सारंगपूर पासून २० मैलावर युध्द झाले. त्यात बाजबहादूरचा पराभव झाला व माळवा ताब्यात घेतला. बाजबहादूरने पिर महमंदवर आक्रमण करुन बऱ्हाणपूरचा प्रदेश ताब्यात घेतला व माळवा जिंकण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे अकबराने अब्दुल्लाखानास पाठवले. बाजबहादूरचा पराभव होऊन मारवाड व गुजराथच्या आश्रयाला गेला. १५६२ मध्ये पुन्हा मोगलाचे वर्चस्व निर्माण झाले. अकबराने बाजबहादूरला प्रथम एक हजारांची नंतर दोन हजारांची मनसब दिली.

### २) जोनपूर व चूनार विजय (१५६०-६१):

सुलतान महमंद आदिलशहाचा मुलगा शेरखान याने जोनपूरचा राज्यपाल अलीकुलीखान याच्यावर आक्रमण केले. त्याने तीव्र प्रतिकार करुन विजय मिळवला. अलीकुलीखानाने प्रचंड लुट मिळवली, ती स्वतःकडेच ठेवली. त्यामुळे अकबर त्याचा बंदोबस्त करण्यासाठी गेला. परंतु अलीकुलीखान शरण आल्याने, त्यास क्षमा केली. १५६१ मध्ये आसफखानास पाठवून अकबराने चुनार ताब्यात घेतले.

### ३) आमेरशी मैत्री (१५६२):

जयपूर म्हणजे आमेरचा राजा भारमलचे राज्य होते. त्या राज्यातील काही भाग मेवाडचा महाराणा व जोधपूरचा राजामालदेव यांनी बळकवण्याचा प्रयत्न केला. मेवाडचा सुभेदार शरफुद्दीन हुसेनने भारमलचा पराभव करुन, त्याचा मुलगा ओलीस ठेवला. अकबर अजमेर येथील दर्ग्यावर जियारत (तीर्थयात्रा) करण्यासाठी जात असताना, सांयानेर येथे कछवाह घराण्याचा राजा भारमलने २० जानेवारी, १५६२ रोजी अकबराची भेट घेतली. शरफुद्दीनविरुध्द अकबराची मदत घेतली. या सद्भावनेपोटी त्याने मुलगीशी लग्न लावण्याचा प्रस्ताव मांडला. अकबराने त्यास मान्यता दिली. अजमेरवरुन परत जात असताना सांभर

येथे ६ फेब्रुवारी, १५६२ रोजी भारमलची मुलगी जोधाबाईशी अकबराचे लग्न झाले. भारमलचा दरबारात मानाची जागा देऊन गौरव केला.

**४) गोंडवानावरील विजय (१५६४):**

गोंडवाना हे हिंदुचे राज्य असून वीर नारायण हा राजा होता. तो अल्पवयीन असल्याने त्याची आई राणी दुर्गावती राज्यकारभार करत होती. अकबराने साम्राज्य विस्ताराच्या लोभाने ते राज्य जिंकण्याची कामगिरी आसफखानाकडे सोपवली. १५६४ मध्ये ५० हजार सैन्य देऊन पाठवले. यावेळी राणी दुर्गावतीजवळ २० हजार घोडेस्वार, १ हजार हत्ती व मोठे पायदळ होते. आसफखानाने दुर्गावतीच्या प्रदेशात लुटालुट केली. राणीने मोठ्या धैर्याने रक्षण करण्याचा प्रयत्न केला. पण ठार झाली. किल्ल्यावरील सर्व स्त्रियांनी जोहार केला. या लढाईत वीर नारायण ठार झाल्यानंतर मोगलांनी प्रचंड लुटालुट केली. डॉ. स्मिथ विन्सेटच्या मते, "केवळ साम्राज्य पिपासा आणि लुट यासाठी राणी दुर्गावतीसारख्या चारित्र्य संपन्न व घरंदाज स्त्रीवर अकबराने केलेले आक्रमण अत्यंत अन्यायपूर्ण होते."

**५) राजस्थान:**

राजस्थानमध्ये मोगलांचे वर्चस्व व सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. यासाठी महत्त्वाचे किल्ले जिंकले. राजांना स्वामित्त्व मान्य करायला लावणे. त्यांच्याशी विवाह करुन संबंध जोडणे, दरबारात मानाच्या जागी नोकऱ्या देणे, या धोरणातून वर्चस्व निर्माण केले.

**६) मेरठ चित्तोड:**

मेरठ मेवाड राजा उदयसिंहाचा जहागिरदार जयमल याच्या अधिपत्याखाली होते. मेरठच्या कामगिरीवर शरफुद्दीन हुसेनला अकबराने पाठवले. जयमलने किल्ल्याचा ताबा दिला नंतर देवदासने २०० सैन्यासह मोगलांशी झुंज दिली. पण यश मिळाले नाही.

**७) चित्तोडचा वेढा (१५६७-६९):**

मेवाडचा राजा उदयसिंह भारमलप्रमाणे मोगलांशी वैवाहिक संबंध जोडण्यास तयार नव्हता, त्याशिवाय अकबराच्या शत्रूंना त्याने आश्रय दिला होता. म्हणून अकबराने १३ ऑक्टोबर, १५६७ मध्ये चित्तोडच्या किल्ल्याला वेढा दिला. त्याची व्यवस्था उदयसिंहाने जयमल व फतेसिंह यांच्याकडे सोपविली. तो स्वतः अरवलीच्या डोंगरात निघून गेला. त्यामुळे कर्नल टॉडच्या मते “उदयसिंह हा दुर्बल व भित्रा होता. " परंतु परिस्थितीचा विचार करता ते योग्य नाही. मोगल सैन्यांनी तोफांचा मारा व सुरुंग लावून किल्ल्याच्या तटांना खिंडारे पाडली. जयमल गोळी लागून ठार झाला. त्यामुळे फत्तेसिंहच्या नेतृत्त्वाखाली लढा सुरु झाला. युध्दात प्रचंड कत्तली झाल्या. मोगलांनी किल्ला हाती घेताच ३० हजार निर्दोष नागरिकांची कत्तल केली. आसफखानाला मेवाडचा राज्यपाल नेमले. जयमल व फत्तेसिंहाच्या पराक्रमामुळे अकबराने त्यांचे पुतळे बनवून आग्राच्या दरवाजाच्या गजावर लावले.

**८) रणथंबोरवर विजय (१५६९):**

चित्तोडच्या विजयानंतर मोगल सैन्यांनी रणथंबोरच्या अजिंक्य किल्ल्याला वेढा दिला. दीड महिना वेढा चालूच होता. याचा प्रमुख राजा सुरजराय यांनी राजा भगवानदास व मानसिंह

यांच्या मध्यस्थीने अकबराची समेट करुन किल्ला दिला. १५६९ मध्ये कलिंजरचा राजा रामचंद्रने आपला किल्ला अकबराला दिला. तसेच मारवाडचा राजा चंद्रसेन, बिकानेरचा राजा कल्याणमल व जैसलमेरचा राजा हरराय यांनीही अकबराचे स्वामित्त्व स्वीकारले. त्यामुळे सर्व रजपूतांवर मोगलांचे वर्चस्व प्रस्थापित करणारा अकबर हा पहिला सम्राट होय.

### ९) गुजरात विजय (१९७२-७३):

गुजरात हिंदुस्थानातील महत्त्वाचे व्यापारी केंद्र असून, तिसऱ्या मुजफ्फरखानाचे शासन सुरु होते. तो अत्यंत विलासी शासक असल्याने अराजक माजले. इतमादखानाच्या निमंत्रणावरुन अकबराने सप्टेंबर, १५७२ मध्ये खान कलानच्या नेतृत्त्वाखाली १० हजार घोडेस्वार व स्वतः गुजरातकडे गेला. अल्पावधीतच गुजरातवर विजय मिळवून तेथे मिर्झा अझीज कोकास राज्यपाल नेमले. आग्रास परत आल्यानंतर पुन्हा गुजराथमध्ये बंडाळी सुरु झाली. त्याचा मोड करण्यासाठी अकबर गुजरातला गेला. २३ सप्टेंबर, १५७३ ला विजय मिळवला. या विजयाची स्मृती चिरस्थयी करण्याकरिता अकबराने फत्तेपूर सिक्री येथे "बुलंद दरवाजा" नावाचे एक भव्य प्रवेशद्वार निमार्ण केले. डॉ. स्मिथ : "अकबराच्या कारकिर्दीत त्याचा गुजराथ विजय महत्त्वाचा असून अविस्मरणीय आहे."

### १०) बंगाल - बिहार जिंकला (१५७४-७६):

बिहारचा शुभेददार करारानी (किरानी) यांचे अकबराशी मैत्रीचे संबंध असल्याने, त्याने अकबराचे स्वामित्व स्वीकारले. पण तो १५७२ मध्ये मरण पावला. त्यानंतर दाऊदखान सत्ताधीश झाल्याने अकबराचे स्वामित्त्व अमान्य केले. हे पाहून अकबराने त्याला बिहारमधून हुसकावून लावले. १५७६ मध्ये राजमहालाजवळ युध्दात दाऊदखान ठार झाला. त्यामुळे बंगाल-बिहार प्रांत अकबराने मोगल साम्राज्याला जोडला.

### ११) हळदीघाटाची लढाई (१८ जून १५७६):

चित्तोडच्या पाडावानंतर महाराणा उदयसिंह निराश न होता. त्याने अरवलीच्या डोंगराळ भागात उदयपूर नावाचे नवे शहर बसवले. स्वतंत्रपणे राज्य करण्यास सुरुवात केली. त्याच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा राणा प्रतापसिंह ३ मार्च, १५७२ रोजी मेवाडचा सत्ताधीश झाला. त्याने चित्तोडचे पूर्वीचे वैभव प्राप्तीसाठी सैन्य जमा करुन, मोगल प्रदेशावर हल्ले चढवले. प्रतापसिंहाची मानखंडना करण्याकरिता अकबराने आमेरच्या कुंववर मानसिंह व आसफखानाबरोबर विशाल सैन्य देऊन मेवाडवर पाठवले. त्यांच्याजवळ १० हजार घोडदळ होते. राणाप्रतापकडे ३ हजार घोडदळ व भिल्ल सैनिक पायदळात होते. तसेच हकीमखान सूर, भीमसिंह डोडिया, जयमलचा मुलगा रामदास राठोड, ग्वाल्हेरचा राजा रामाशाह झाला बिंदा सरदार, दिवाळ भामाशाह इ. सेनापती होते. १८ जून, १५७६ रोजी अरवली पर्वतातील बिंदा नदीजवळ हळदी घाट येथे उभय पक्षात युध्द झाले. राणाप्रतापला चोहोबाजूने घेरल्याने, सरदार बिंदा झाला याने राणाप्रतापचा राजमुकुट व छत्र स्वतः घेऊन त्याच्या जागी लढाई सुरु केली व राणाप्रतापला सैन्यातून सुरक्षित बाहेर काढले आणि मोगलांना विजय मिळाला. राणाप्रतापने दऱ्याखोऱ्यांच्या आश्रयाने गनिमी काव्याने सतत २१ वर्षे मोगलांशी संघर्ष सुरु ठेवला. अखेर १५ जानेवारी, १५९७ रोजी वयाच्या ५१ व्या वर्षी शुर देशभक्तांची जीवनज्योत मावळली. राणा प्रतापच्या नंतर राणा अमरसिंह विरुध्द

अकबराने सैन्य पाठवले. तरीपण ते जिंकता आले नाही. डॉ. मथुरालाला शर्मा - "अकबराची महत्त्वाकांक्षा, योग्यता व शौर्याचे पोवाडे अनेक इतिहासकारांनी गायलेले आहे. पण महाराणा प्रतापदेखील भारतीय इतिहासातील एक दैदिप्यमान हिरा आहे. त्याचा पराभव विजयापेक्षाही अधिक प्रशंसनीय आहे. त्याच्या शौर्य व धैर्याने शेकडो कवींच्या काव्याला विषय पुरविले. खरे पाहता प्रतापचा पराभव अकबराच्या विजयापेक्षाही स्तुत्य आहे. "

**आपली प्रगती तपासा:**

१) अकबराचा उत्तरेकडील साम्राज्यविस्तार सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ३.७ अकबराचे वायव्य सरहदचे धोरण

**१) काबूल विजय (१५८१):**

अकबराच्या धार्मिक धोरणामुळे त्याला पदावरुन दूर करुन, त्याचा भाऊ मिर्झा मोहम्मद हकीम यास गादीवर बसवण्याचा गुप्त कट रचला. बंगाल-बिहारमध्ये अकबराविरुध्द बंड पुकारले. त्या बंडखोरांना मदतीसाठी मिर्झा मोहम्मद हकीम येत असतानाच, अकबराकडून पराभव झाला. परत जाताना वाटेतच १५८५ मध्ये मरण पावला. त्यामुळे काबूलचे राज्य मिळाले.

**२) वायव्य सरहद्द प्रदेशावर वर्चस्व (१५८५):**

या प्रदेशात युसूफजाई, आफ्रिदी, उजबेग, खटक इ. अनेक मुसलमान टोळ्या होत्या. ते सतत बंड करुन दिल्लीच्या शासकांना सदैव त्रास देत असे. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी अकबराने राजा बिरबल व जैनखान कोकलताश यांना पाठवले. या संघर्षात बिरबल ठार झाला. पुढे अकबराने राजा मानसिंह व राजा तोडरमल यांना पाठवून या टोळ्यांचा पराभव केला.

**३) सिंधवर अधिकार (१५९१):**

सिंध प्रांतावर वर्चस्व ठेवण्यासाठी बैरामखानाचा पुत्र अब्दुल रहिम खानला विशाल सैन्य देऊन १५९० मध्ये पाठवले. ठठ्ठा व सेहवानचे किल्ले जिंकल्यानंतर येथील शासक मिर्झा जानीबेग शरण आला. अकबराने राज्य खालसा करुन तीन हजारांची मनसब दिली.

**४) बलुचिस्तान व कंदहारची प्राप्ती (१५९५):**

अकबराचा सरदार मीर मासूम याने बलुचिस्तानातील अफगाणांचा पराभव करून १५९५ मध्ये हा प्रदेश जिंकला. याच वर्षी कंदहाराचा इराणी राज्यपाल मुजफ्फर हुसेन मिर्झा याने कंदहारचा किल्ला अकबराला दिला.

**अकबराचे दक्षिण धोरण / साम्राज्य विस्तार:**

अ) अहमदनगरवर स्वारी (१६००)

१) अकबराची महत्त्वाकांक्षा

२) दक्षिणेतील अस्थिर परिस्थितीचा फायदा

३) पोर्तुगिजांच्या विरोधी मोहिम

४) लष्कराला कार्यक्षम ठेवण्यासाठी.

**ब) अहमदनगरवर स्वारी (१६००):**

अकबराने राजपुत्र मुराद व अब्दुल रहीम खानखाना याला नगरच्या स्वारीवर १५९५ मध्ये पाठवले. सुलतान मुजफरशहा हा अल्पवयीन शासक असल्याने, चांदबीबी राज्यकारभार करत होती. या दोघांचे युध्द झाले. १५९६ मध्ये करार होऊन अकबराचे मांडलिकत्व स्वीकारले. अकबराला वऱ्हाडप्रांत दिला. १५९९ मध्ये चांद- बीबीची हत्या करुन बहादूर निजामशहाने मोगलांकडून वऱ्हाडप्रांत परत घेतला. त्यामुळे अकबराने पुन्हा स्वारी केली. बऱ्हाणपूर शहर जिंकून, नगरच्या किल्ल्याला वेढा दिला. २८ ऑगस्ट, १६०० मध्ये किल्ला जिंकून घेतला. बहादूर निजामशहाला कैद करून ग्वाल्हेरच्या किल्ल्यात ठेवले.

**क) खानदेश जिंकला (१६०१):**

खानदेशाचा फरुकी वंशी राजा अलीखानने अकबराचे वर्चस्व मान्य केले. परंतु सुप्याच्या युध्दात ठार झाल्यानंतर, त्याचा पुत्र मीरन बहादूर हा शासक बनला. त्याने अकबराचे वर्चस्व अमान्य केले. त्याला शिक्षा करण्यासाठी अकबराने १६०० मध्ये आशिरगडाच्या किल्ल्याला वेढा दिला. अनेक दिवस संघर्ष होऊन ६ जानेवारी १६०१ मध्ये किल्ला अकबराने ताब्यात घेतला. यावेळी अकबराने दगाबाजी केली. मीर बहादूरला ग्वाल्हेरच्य किल्ल्यात कैदेत ठेवण्यात आले. डॉ. विन्सेंट स्मिथ - "हा विजय त्याच्या उज्ज्वल नावावर लागलेला एक कलंकच म्हणावा लागतो."

**अकबराचा मृत्यु:**

२५ ऑक्टोबर, १६०५ आयुष्यभर भोगलेल्या कष्टांनी आणि लढाय्यांनी अकबराची प्रकृती क्षीण झाली होती. भावी सम्राट कोण यावरुन दरबारात दोन गट निर्माण झाले. एक सलिमचा तर दुसरा खुश्रूचा होता. ३ ऑक्टोबर रोजी अकबर आजारी पडला. आजार वाढत जाऊन २५ आक्टोबर, १६०५ रोजी मरण पावला. आग्रापासून पाच मैल दूर सिकंदरा येथे अकबराचे दफन करण्यात आले.

## ३.९ अकबराचे रजपूत धोरण

**अ) रजपूत विषयक धोरणाची कारणे:**

**१) अंतर्गत बंडाळ्या:**

अकबराच्या राज्यरोहणाच्या दिवसापासूनच अकबरास बंडाळीस तोंड द्यावे लागले. बादशहाची सेवा किंवा साम्राज्याचे हित त्यांना महत्त्वाचे वाटत नव्हते. हे अकबराने ओळखल्याने त्यांच्यावर विश्वास ठेवणे धोक्याचे आहे. या बंडखोर सरदारांना तोंड देण्यासाठी रजपूतांशी मैत्रीचे संबंध जोडण्याचे ठरवले.

**२) हिंदुस्थानातील विरोधी शक्तीसाठी प्रतिशक्ती करण्यासाठी:**

अकबर हिंदुस्थानाचा सम्राट झाला तरी, अनेक मुसलमानाचा विरोध होता. बंगाल, बिहार, ओरिसा, काबूल इ. सत्ता अकबराला मानत नव्हत्या. त्यांना शह देण्यासाठी प्रामाणिक, निष्ठावंत व युध्दकुशल रजपूत जमातीचे सहकार्य मिळवण्याचे ठरवले.

**३) साम्राज्य विस्तारासाठी:**

साम्राज्य वाढीसाठी त्यांनी कुटनितीचा व मुत्सद्देगिरीचा वापर केला. साम्राज्य विस्तारासाठी रजपूतांचे सहकार्य मिळवण्याचे ठरवले.

**४) रजपूतांचे गुण:**

रजपूत हे अत्यंत प्रामाणिक असून दिलेला शब्द मोडत नाही. पराक्रमासाठी ते प्रसिध्द आहेत. त्यांच्या जवळ स्वतःचे राज्यसैन्य आहे. तेव्हा अकबराला आपले ध्येय साध्य करण्यासाठी रजपूतांना मित्र बनवले.

**५) अकबराचे उदार धोरण:**

अकबराने रजपूतांना जी मोठमोठी पदे दिली. त्याच्याविषयी आपूलकी दाखवली. ते त्यांच्यावर प्रेम होतं म्हणून नव्हे. हिंदू धर्माबाबत जी सहिष्णूता दाखवण्यात आली. ते धार्मिक धोरण होते. ते उदार ठेवून राजा मानसिंग व भगवानराव यांना आपल्याकडे ओढून अन्य रजपूतावर आक्रमणे करुन साम्राज्य वाढवायचे होते. म्हणून त्याने उदार धोरण ठेवले. डॉ. ए. एल. श्रीवास्तव म्हणतात की, "अकबराचे रजपूत धोरण एका सुनियोजित धोरणाचा परिणाम होता हे धोरण स्वार्थ, योग्यतेची स्वीकृती आणि न्यायनीतीच्या सिध्दांतावर आधारीत होते."

**ब) रजपूतांना मित्र बनवण्याचे चार उपाय:**

**१) वैवाहिक संबंध जोडून:**

अकबराने दोन घराण्याशी लग्नाचे संबंध जोडून, त्यांना जवळ आणण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार जयपूरचा राजा भारमलच्या मुलीशी १५६२ मध्ये लग्न केले. राजा मानसिंगच्या बहिणीबरोबर राजकुमार सलीम ऊर्फ जहांगिरीचे लग्न लावले, डॉ. बेनीप्रसाद यांच्या मते -

"विवाहामुळे भारताच्या राजनितीच्या नव्या युगाला प्रारंभ झाला. देशात सुयोग्य सम्राटाची परंपरा निर्माण झाली. ''

**२) रजपूतांची जबाबदारीच्या पदावर नेमणूका:**

अकबराने बिहारमधील (भारमल) व भगवानदास यांना सैनिकी कमांडर म्हणून नेमले. राजा राजा तोडरमल, राजा मानसिंग यांना मोठ्या जबाबदारीवर नेमले. अकबराच्या सैन्यात मुसलमानापेक्षा रजपूत सैन्य जास्त होते. एक लेखक अकबराला रजपूतांचे स्वतंत्र अस्तित्व व शत्रूत्वही नको होते. म्हणून त्यांनी योग्य नितीचा वापर करुन, स्वातंत्र्य नष्ट करून मैत्रीचे संबंध जोडले.

**३) धार्मिक स्वातंत्र्य:**

अकबराने रजपूतास जवळ आणण्यासाठी धार्मिक स्वांतत्र्याचे धोरण स्विकारले. त्याने हिंदूवरील अनेक कर रद्द केले. हिंदु राजांना मंदिरात जाऊन पूजा करण्याची परवानगी दिली. तो स्वतः हिंदुदेवतेचा प्रसाद प्रेमाने खात असे व कपाळावर उभे गंध लावत असे. त्यामुळे अकबरासाठी आपुलकीची भावना रजपूतांच्यात झाली.

**४) सामाजिक सुधारणा:**

रजपूतांची मने जिंकण्यासाठी अकबराने हिंदू समाजात प्रामाणिक सुधारणा केल्या. बालविवाह, सत्तीची प्रथा बंद केली. जातीय बंधने दूर करण्याचा प्रयत्न केला. बालकन्या वधाला विरोध केला. युध्दात पकडलेल्या शत्रूच्या लोकांना गुलाम करण्याची प्रथा बंद केली.

**क) रजपूतांशी प्रत्यक्षात संघर्षाचे संबंध:**

१) आमेरशी मैत्री- १५६२.

२) मेरठ.

३) चित्तोडचा वेढा - १५६७-६९..

४) रणथंबोरचे युध्द १५६९.

५) हळदीघाटाची लढाई - १८ जून, १५७६.

टिप : वरील युध्दाची माहिती उत्तरेकडील साम्राज्यविस्ताराच्यामध्ये सविस्तर आहे.

**ड) रजपूत धोरणाचे परिणाम:**

१) रजपूत मोगल साम्राज्याचे संरक्षक बनले.

२) मोगलांचा साम्राज्य विस्तार.

३) रजपूतांची ऐकी भंगली.

४) मोगल साम्राज्याची सर्वांगीण प्रगती.

**आपली प्रगती तपासा:**

१) अकबराचे राजपूत विषयक धोरण नमुद करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ३.१० अकबराची राज्यव्यवस्था

अकबर हा एक अत्यंत विशाल अंतःकरणाचा, उदारमतवादी व आदर्श राजा होता. मोगल सत्तेसाठी सुव्यवस्था आणि सुसंघटित राज्यव्यवस्था बनवली. त्याने सर्व हिंदू मुसलमान प्रजाजनांना जातिधर्म भेदभाव न करता सर्वांना संधी दिली होती.

**१) अकबराची राज्यसत्तेविषयी कल्पना:**

अकबर प्रारंभिक काळात कट्टर सुन्नीपंथीय मुसलमान होता. नंतरच्या काळात त्याच्यात परिवर्तन होऊन रजा, राजपद, राजाचे अधिकार, कर्तव्य याविषयी धोरणात बदल झाले. १५७९ मध्ये सर्वोच्च धार्मिक अधिकारांचा हुकूम काढला. त्याचा परिणाम शासन व्यवस्थेवर पडला. अकबराच्या मते "राजा हा प्रजेचा हितचिंतक आणि संरक्षक असतो, राजपद ही एक ईश्वरी देणगी आहे. ती परमेश्वरामुळे लाभते. राजाने सदैव न्यायप्रेमी, निष्पक्ष आणि उदार असले पाहिजे. त्याने प्रजेचा सांभाळ स्वतःच्या मुलाप्रमाणे केला पाहिजे. तिच्या कल्याणात सदैव मग्न असले पाहिजे.

**२) केंद्रिय शासनव्यवस्था:**

अकबराने आपली सर्व शक्ती लष्करी, मुलकी व न्यायविषयक यावर केंद्रीत केली होती. राज्यकारभार चालविण्याकरिता अकबराने एक केंद्रिय मंत्रीमंडळे निर्माण केले. त्यात 'बादशाहाला' अंतिम अधिकार दिला. अकबराचे मंत्रीमंडळ पुढीलप्रमाणे होते :

१. **वजीर (पंतप्रधान):** शासक आणि प्रजा यांना जोडणारा म्हणजे वजीर होय. त्याला प्रचंड अधिकार दिले होते. बैरामखानाच्या हकालपट्टीनंतर या पदाचे महत्त्व कमी झाले. नंतर ते बंदच केले.

२. **दीवाण (अर्थमंत्री):** साम्राज्याचा जमाखर्च, मालगुजारीचा बंदोबस्त, करवसुली व शाही खजिन्यावर देखरेख इ. कामे होती. मुजफ्फरखान, शाह मन्सूर, राजा तोडरमल हे सुप्रसिध्द दीवाण होते.

३. **मीरबक्षी (सैन्यमंत्री):** लष्कराचा प्रमुख असून लष्करावर देखरेख ठेवणे.. मनसबदारांची नावे, दर्जा, वेतन इ. नोंद ठेवणे, सैन्याकरिता शस्त्रसामुग्री, अन्नपुरवठा, वाहतुकीची साधने इ. पुरवठा करणे ही प्रमुख कार्य होती.

४. **सद्र-उस-सद्र (धर्मादाय प्रमुख):** धार्मिक बाबतीत सम्राटाला सल्ला देणे, सरकारी दानधर्माची व्यवस्था पाहने, वर्षासने, शिष्यवृत्या, धार्मिक संस्था व साधुसंतांना देणग्या देण्याचे कार्य करावे लागे.

५. **खान-ए-समा (खासगीचा कारभारी):** शाही कुटुंब, शाही भोजनशाळा व सम्राटाचे अंगरक्षक इत्यादीवर देखरेख करणे हे त्यांचे कार्य होते.

६. **काजी-उलू-कजात (मुख्य न्यायाधीश):** राज्याचा प्रमुख न्यायाधीश होता. दिवाणी व फौजदारी दाव्याचा निकाल लावणे. कायदेविषयक सल्ला देणे. प्रांतीय न्यायाधिकाऱ्यांच्या नेमणूका करणे इत्यादी कार्य करत असतं.

७. **दरोगा-ए-डाक चौकी (टपाल व गुप्तहेर प्रमुख):** सरकारी कागदपत्रांची ने-आण व गुप्तहेरांच्या नेमणूकी इत्यादी कार्ये या अधिकाऱ्यास करावे लागत.

८. **मीर अतिश (तोफखाना प्रमुख):** शाही तोफखानाचा प्रमुख, तोफा, बंदुकांची निर्मिती, दारुगोळ्यांचा पुरवठा, गोलंदाजांच्या नेमणूका इ. कार्ये या खात्याचा प्रमुखास करावे लागत..

**३) प्रांतीय शासन व्यवस्था:**

अकबरने आपल्या साम्राज्याचे १५ प्रांतांमध्ये (सुबा) विभाजन केले होते. प्रांत प्रमूखास सुबेदार म्हटले जाई. अलहाबाद, माळवा, आग्रा, खानदेश इ. प्रांत विशेष महत्त्वाचे होते. केंद्रिय खातेप्रमुख प्रांतीय खातेप्रमुखाची नेमणूक करत असे. त्याचप्रमाणे प्रांतात कार्य करत असे. केंद्राप्रमाणेच प्रांतात ही अधिकारी असे. त्यांनी आपल्या खात्यानुसार कार्य करावे. सार्वजनिक स्वच्छतेची व्यवस्था कोतवालाकडे असे. सर जदुनाथ सरकार यांच्या मते, "मोगलांची प्रांतीय राज्यव्यवस्था त्यांच्या केंद्रीय शासन व्यवस्थेचेच लहान स्वरुप होते."

**४) स्थानिक प्रशासन व्यवस्था:**

**१) सरकार/जिल्हा शासन पध्दती:**

प्रांताचे अनेक 'सरकार' मध्ये विभाजन केले. जिल्ह्याला 'सरकार' असे म्हणतात. जिल्हाप्रमुख फौजदार होता. त्यासोबतच अमलगुजार, खजानदार व बितिबची हे अधिकारी होते. फौजदार हा शांतता सुव्यवस्था राखत असे तर अमलगुजार हा महसूल प्रशासन सांभाळत असे.

**२) परगण्याची (महाल) शासन व्यवस्था:**

प्रत्येक 'सरकार' मध्ये अनेक परगणे होते. परागण्यात 'शिकदार' हा प्रमुख अधिकारी होता. शांतता व सुव्यवस्था राखणे, जमिन महसूल गोळा करणे. तर 'अमिल' हा परगण्याचा महसूल प्रशासन सांभाळत असे.

**३) ग्राम व्यवस्था:**

प्रशासकीयदृष्ट्या ग्राम हा साम्राज्यातील सर्वात लहान घटक असून महत्त्वाचा आहे. ग्रामीण जीवन प्राचीन काळापासून स्वयंपूर्ण होते. गावचा कारभार ग्राम पंचायत करीत असे

मुकादम, पटवारी, चौकीदार हे ग्राम व्यवस्थेतील सरकारी कर्मचारी होते. ऐन-ए-अकबरीमध्ये 'कोतवाल' याच्या कार्याचे पण वर्णन केले आहे.

**५) राज्यकारभाराची वैशिष्ट्ये:**

१. सरकारी अधिकारी डोईजड व शक्तीशाली होऊ नये म्हणून दर ३ वर्षांनी बदली होत असे.

२. प्रत्येक मंत्र्यांनी आपला अहवाल सम्राटाकडे पाठवणे.

३. केंद्र प्रांतात न्यायी संबंध ठेवले होते.

४. व्यक्तीच्या कामगिरीप्रमाणे नोकऱ्या दिल्या होत्या.

५. सरकारी नोकरांना जहागिरी अथवा जमीन बक्षीस न देता रोख पगार दिला.

६. सर्व सरकारी व्यवहार फारसी भाषेत चालू ठेवले.

## ३.११ अकबराचे राजस्व धोरण / जमीन महसुल पध्दत

जमीन महसुलाच्या बाबतीत अकबराने शेरशहाचे अनुकरण केले. शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेला आळा घातला. शेतीत अनेक सुधारणा केल्या. अकबराच्या भूमीव्यवस्थेची स्तुती करताना डॉ. ईश्वरीप्रसाद म्हणतात की, "अकबराच्या गादीवर येण्याने प्रशासकीय सुधारणेच्या इतिहासात एका नवीन युगाचा प्रारंभ झाला. अन्य क्षेत्रांत त्याने केलेल्या प्रशंसनीय कामगिरीप्रमाणे, राजस्व खात्यालाही त्याच्या अद्वितीय प्रतिभेचा स्पर्श झाला होता." १५८५ मध्ये रजा तोडरमलची दिवाण-ए-अश्रफच्या जागेवर नेमणूक केली. त्याने जमिन व महसुल सुधारणा केली. त्यास "तोडरमलचा बंदोबस्त" अथवा "रयतवारी पध्दत" असे म्हणतात. रयतवारी पध्दतीनुसार जमिनीची मोजणी करुन उत्पादनाच्या क्षमतेवर जमिनीचे पुढीलप्रमाणे चार प्रकार पाडले. पोलज (उत्कृष्ट), परौती (मध्यम), चाचर (निकृष्ट) व बंजर (ओसाड)

डॉ. की. ए. स्मिथ "अकबराची भूमीव्यवस्था वाखाणण्याजोगी होती. त्याने या संबंधात अधिकारी वर्गाला दिलेल्या सुचना व्यावहारिकदृष्ट्या अत्यंत संतोषकारक होत्या.

## ३.१२ अकबराच्या सैनिकी सुधारणा (मनसबदारी)

अकबराला स्वतःची स्थिती बळकट करण्याकरिता आणि हिंदुस्थानात विशाल साम्राज्य निर्माण करण्याकरिता शक्तीशाली सैन्याची आवश्यकता होती. मोगल सैन्यात अनेक सुधारणा केल्या. त्या "मनसबदारी पध्दत" या नावाने प्रसिध्द आहे. अकबराच्या सैन्यात चार विभाग होते. १) मनसबदारी पध्दत, २) अंगरक्षक सैन्य, ३) स्थायी सैन्य, ४) मांडलिक राजांचे सैन्य,

**१) मनसबदारी पध्दत**:

मनसबदारी पध्दत बाबरापासून सुरु होती. मनसबदारीची मुळ कल्पना पर्शियन असून मनसब याचा अर्थ राजकीय पद अथवा दर्जा असा होता. आयर्विन यांच्या मते, “मनसबदारी मुघल शासनातील हुदा किंवा प्रतिष्ठा मोजण्याचे साधन होते. यामुळे मनसबदाराचा हुद्दा, त्याचे वेतन, राज्यदरबारातील त्याचे कार्यस्थान निश्चित होत असे.

अकबराने मनसबदार सैन्यपध्दती १५७१ मध्ये सुरु करुन, त्यांचे ३३ प्रकार केले. पण प्रमुख दोन वर्गात त्याची विभागणी केली होती. २० सैनिक ते १ हजार सैन्यापर्यंतची पदवी धारण करणाराला मनसबदार अथवा कनिष्ठ उमराव म्हणतात. तर १ हजार ते १२ हजारापर्यंत पदवी धारण करणाऱ्याला उमराव असे म्हणतात. मनसबदाराची विशिष्ट अंगे म्हणजे ‘जात’ व ‘सवार’ ही असे. श्री. ब्लॉकमन यांच्या मते, "मनसबदाराला सैनिकांची जी संख्या ठेवावी लागे तिला जात" असे म्हणत. घोडदळाच्या संख्येला ‘सवार’ असे म्हणत, इर्विन यांच्या मते, "जात म्हणजे घोडे स्वारांची एक निश्चित संख्या तर, ‘सवार’ हा एक प्रतिष्ठा सुचक शब्द होता." अब्दुल अजीजच्या मते, "जात" पद प्राप्त होणाऱ्या मनसबदारास एका निश्चित संख्येत हत्ती, घोडे व भारवाह बैलगाड्या इ. वस्तु स्वतःबरोबर बाळगाव्या लागत. घोडेस्वार व पायदळातील सैनिकांशी जातचा काही संबंध नव्हता ‘सवार’ याचा अर्थ मनसबदाराच्या आधीन एक निश्चित घोडदळाची संख्या आहे, प्रत्येक मनसब प्रथम, द्वितीय, तृतीय श्रेणीत विभक्त होती.

**मनसबदारी पध्दतीतील दोष:** अकबराची सैन्य व्यवस्था अतिशय उत्कृष्ट पध्दतीची होती तरी, त्यात अनेक दोष होते. डॉ. व्हिन्सेन्ट स्मिथ "अकबराच्या सैन्य संघटनात जरी मूलभूत दोष असेल तरीही त्याच्या शेजारच्या राज्यांपेक्षा ते अधिक चांगले होते."

१. आरमाराची व्यवस्था नव्हती. त्यामुळे अकबराच्या मृत्युनंतर सैन्याची कार्यक्षमता ही कमी होऊ लागली.

२. सैन्य रचना योग्य नसून, सम्राटाचा व सैन्याचा संबंध येत नसे. डॉ. कानूनगो यांच्या मते, "या व्यवस्थेत वास्तविकदृष्ट्या सैनिकांची भावभक्ती सम्राटाऐवजी मनसबदाराप्रती जास्त होती. कारण तोच त्यांचा वेतनदाता होता."

३. मनसबदारी पध्दतीमुळे सैन्य व्यवस्थेत एकतेचा अभाव होता.

४. सैन्यसंचलन, द्रुतगतीने होण्याचे साधन नव्हते.

५. तोफखाना विभाग सगळ्यास दुर्लक्षित विभाग होता.

**सर जदुनाथ सरकार:** यांच्या मतानूसार, “मुघल साम्राज्याच्या अस्तास कारणीभूत असलेल्या अनेक कारणांपैकी मनसबदारांची अकार्यक्षमता हे महत्त्वाचे कारण मानता येईल. हे मनसबदार युध्दाच्या मोहिमेत नृत्यांगना, हत्ती, उंट, वाद्य, बाजार, विक्रेते, अधिकारी यांचीच मोठी संख्या होती.”

**आपली प्रगती तपासा:**

१) अकबराची राजसत्तेविषयीची कल्पना स्पष्ट करा.

२) अकबराचे लष्करी धोरण सांगा.

## ३.१३ अकबराचे मूल्यमापन व इतिहासातील स्थान

मध्ययुगीन हिंदुस्थानच्या इतिहासातील एक राष्ट्रीय सम्राट म्हणून अकबरचा उल्लेख केला जातो. त्याचे व्यक्तिमत्त्व आकर्षक आणि प्रभावशाली होते. सम्राट जहांगीर तुझुक-ए-जहांगिरी या ग्रंथात त्याच्या शरीराचा बांधा मध्यम प्रतीचा परंतु उंच भासणारा होता. त्याचा रंग गहूवर्णी होता. त्याचे डोळे व भिवया काळ्या रंगाच्या होत्या. तो सावळ्या रंगाचा, छाती रुंद व बाहू लांब होते. असे वर्णन अकबराचे आले आहे.

**१) कुशल सेनापती:**

अकबर एक कुशल सैनिक व प्रतिभाशाली होता. तो एक बहादूर सैनिक, एक महान सेनापती, एक बुद्धिमान प्रशासक, एक लोकहितकारी राजा होता.

**२) अकबराचे धार्मिक धोरण:**

अकबराने विविध ज्ञान समजून घेऊन इबादतखानची निर्मिती केली. दीन-ए-इलाही धर्माची स्थापना केली. रजपूतांशी उदारपणाने वागून त्यांचे प्रेम मिळवले. शासन व्यवस्था लोकाभिमुख बनवली. डॉ. ए. एल. श्रीवास्तव यांच्या मते, "इग्लंडची राणी एलिझाबेथ, फ्रान्सचा  सम्राट चौथा हेन्री व इराणचा सम्राट शहा अब्बास या त्याच्या समकालीन महान शासकांपेक्षा श्रेष्ठ अकबर होता.”

**३) बुद्धिमान प्रशासक:**

अकबर बुध्दिमान प्रशासक असून व्यावहारिकपणा श्रेष्ठ प्रतीचा होता. त्याने केंद्रिय प्रशासन व्यवस्था, बादशहाचे अधिकार, कर्तव्य इ. तसेच प्रांताबाबतही तेच धोरण ठेवले. महसूल व्यवस्था, सैन्य सुधारणा इ. सुधारणा करून प्रजेला समान दर्जा दिला. ज्याप्रमाणे अकबर मोगल साम्राज्याचा संस्थापक असून तो एका सर्वश्रेष्ठ प्रशासन व्यवस्थेचा शिल्पकार होता.

**४) राष्ट्र निर्माता:**

इतिहासकार अकबराला थोर राष्ट्र निर्माता म्हणून गौरवतात. ४९ वर्षाच्या राज्यकारभारात त्याने प्रचंड साम्राज्य वाढवले. धर्माधर्मातील मतभेद नष्ट करण्यासाठी उदार व सहिष्णुता धोरण स्वीकारले, लोकांच्या पात्रता व योग्यतेनुसार सैन्यात व राज्यकारभारात त्यांना स्थान दिले. अनेक धर्मात संबंध जोडले. स्टॅन्ले लेनपूल यांच्या मते, "दीने इलाहीने हिंदू व मुसलमान ऐक्य निर्माण करुन एक राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण केली.

**४) राष्ट्र निर्माता:**

**५) कलेचा भोक्ता**

**६) अकबराचा दयाळू स्वभाव**

हिंदूवरील अनेक कर रद्द केले. प्रचलित प्रथा बंद केल्या. दरबारात अनेक कलावंतांना राजश्रय दिला होता. म्हणून संगीत, चित्रकला, स्थापत्य कला, नृत्यकला काव्य इत्यादींचा विकास झाला.

**आपली प्रगती तपासा:**

१) अकबराची योग्यता सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ३.१४ सारांश

हुमायूनच्या मृत्युनंतर अकबराने १५५६ मध्ये राज्याभिषेक करून दिल्लीचे सिंहासन ताब्यात घेतले. यावेळी पानिपत येथे हेमूचा पराभव करावा लागला. अकबराने उत्तर भारतात अनेक विजय मिळवून शांतता निर्माण केली. अकबर हा सहिष्णू धोरणाचा असल्याने त्याचे रजपूतांशी जवळचे संबंध होते, हे संबंध निर्माण करण्यासाठी त्याने अनेक उपाययोजना केल्या. त्याच्या धार्मिक धोरणांचा एक भाग म्हणजे दिन-ए-इलाही धर्माची स्थापना होय. अकबराने प्रशासनात अनेक सुधारणा केल्या. त्याच्या सहिष्णू धार्मिक धोरणामुळे तो मोगल काळातील सर्वश्रेष्ठ सम्राट बनला.

## ३.१५ प्रश्न

१) पाणीपतच्या दुसरी लढाई (५ नोव्हे. १५५६) वर सविस्तर टीप लिहा.

२) अकबराचा उत्तरेकडील साम्राज्यविस्तार स्पष्ट करा.

३) अकबराची रजपूत धोरणाचे स्वरुप सांगा.

४) अकबराच्या दक्षिण धोरणाचा आढावा घ्या.

५) अकबराची प्रशासन व्यवस्था सांगा.

## ३.१६ संदर्भ


- केतकर संध्या, भारतीय कलेचा इतिहास, ज्योत्स्ना प्रकाशन, पुणे, २०१६.
- वर्मा हरिश्चंद्र, मध्यकालीन भारत (भाग २) (१५४० - १७६१), दिल्ली विश्वविद्यालय, प्रथम आवृत्ती, दिल्ली, २०१७.
- शर्मा सतीशचंद्र, मध्ययुगीन भारत : मोगल साम्राज्य (१५२६ - १७४८), (खंड २), के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१७.
- मेहता जे. एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास (खंड २), आवृत्ती चौथी, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१६.
- मेहता जे. एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास (खंड ३), आवृत्ती तीसरी, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१४.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: १, तिसरी आवृत्ती, प्रकाशिका सौ. आर. के. चिटणीस, पुणे, २००३.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: २, दुसरी आवृत्ती, प्रकाशिका सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८७.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: ४, प्रथम आवृत्ती, प्रकाशिका सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८५.
- भिडे गजानन, नलावडे विजय, नाईकनवरे वैजयंती, मध्ययुगीन भारत (सामाजिक, आर्थिक आणि संस्कृतीक इतिहास), फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.
- पवार विश्वनाथ, डॉ. शिंदे, मुघलकालीन भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.


*****

# ४

# बादशहा जहांगीर व शाहजहान

**घटक रचना**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

नुरुद्दीन मोहंमद जहांगीर (१६०५ ते २७)

४.२ जहांगीरचा परिचय

४.३ खुसरो मीर्झाचे बंड (एप्रिल, मे, १६०६)

४.४ जहांगीरच्या काळातील महत्त्वाच्या घटना

१) वायव्य सरहद्द धोरण २) राजपूत धोरण

३) दक्षिण धोरण ४) कांगडावर स्वारी

५) शाह अब्बासची कंदहारवर स्वारी ६) शहाजहानचे बंड

७) महबतखानाचे बंड

४.५ नुरजहानचा उदय व कामगिरी

१) नुरजहानचा परिचय २) नुरजहान पक्षाचे प्राबल्य

३) नुरजहान जहांगीर संबंध ४) नुरजहानचा कारभार काळ

५) नुरजहानच्या वर्चस्वाचे परिणाम

४.६ जहांगीरचा मृत्यु व योग्यता

बादशहा शहाजहान (१६२८-५८)

४.७ शहाजहानचा परिचय

४.८ शहाजहानच्या कारकिर्दीतील महत्त्वाच्या घटना

१) खानजहान लोदीचे बंड २) जुझारसिंह बुंदेल्याचे बंड

३) भयंकर दुष्काळ ४) मुमताज महलचा मृत्यु

५) पोर्तुगिजांचे पारिपत्य ६) शीख गुरुशी तणावपूर्ण संबंध

४.९ शहाजहाचा दक्षिणेकडील साम्राज्यविस्तार

१) अहमदनगर खालसा २) विजापूर-मोगल संबंध

३) गोवळकोंडा राज्याशी संबंध

४.१० शहाजहानचे वायव्य सरहद्द धोरण

४.११ शहाजहानचे मध्य आशिया धोरण

४.१२ वारसा हक्काचा संघर्ष

४.१३ शहाजहानची कारकिर्द सुवर्णयुगाची होती का?

४.१४ सारांश

४.१५ प्रश्न

४.१६ संदर्भ

## ४.० उद्दिष्ट

१) जहांगिरच्या काळातील घटनांची माहिती जाणून घेणे.

२) नुरजहान विषयी माहिती समजून घेणे.

३) शहाजहानचा काळ सुवर्ण युगाचा होता का? स्पष्ट करणे.

## ४.१ प्रस्तावना

सम्राट अकबराच्या मृत्युनंतर जहागिंरने दिल्लीची सूत्र हाती घेतली. परंतु प्रत्यक्षात त्याची पत्नी नुरजहान राज्य कारभार करत होती. १६०५ ते २७ या जहांगिरची सत्ता होती. १६२८ ते ५८ या काळात शहाजहानची सत्ता होती. त्याने उत्तम प्रशासन करून शांतता स्थैर्य निर्माण केले. वारसा युध्दात औरंगजेबने सत्ता ताब्यात घेऊन दिल्लीचा बादशहा बनला. त्याने शहाजहानला कैदेत ठेवले तेथेच त्याचा अंत झाला.

**बादशहा जहांगीर १६०५-२७:**

अकबराने आपला वारसदार जहांगिरला नियुक्त केले होते. अकबराच्या मृत्युनंतर तो सत्तेवर आला. परंतु व्यसनाच्या आहारी गेल्याने राज्यकारभाराची सूत्रे नूरजहानने स्वतःकडे घेतली त्यामुळे जहांगिरची कारकिर्द केवळ नामधारीच होती. त्यांच्या मृत्युनंतर शहाजहानने सत्ता मिळवल्यामुळे नूरजहान राजकारणातून निवृत्त झाला.

## ४.२ नुरुद्दीन मोहम्मद जहांगीरचा परिचय

अकबराला फातेपूर शिक्रीचा संत शेख सलीम चिश्ती यांच्या आशिर्वादाने जयपूर राजा भारमलची राजकन्या जोधाबाई (मरियम-उस-झमानी) पासून ३० ऑगस्ट १५६९ रोजी मुलगा झाला. त्याचे नाव अकबराने मोहम्मद सलीम असे ठेवले. कौतुकाने त्याला शेखोबाबा म्हणत त्यालाच जहांगीर असेही म्हणतात. त्यानंतर अकबराला दोन मुले दानीयाल व मुराद ही झाली. जहांगीराच्या शिक्षणासाठी अकबराने बेरामखानचा मुलगा अब्दुर रहीम खानखाना याची नेमणूक केली. त्याने सलीमला फारशी, तुर्की, हिंदी भाषेचे ज्ञान, प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्र, भूगोल, इतिहास, अंकगणित, स्थापत्य, चित्रकला इ. विविध विषयात प्रविण्य केले. शिकारीची आवड होती, राज्यकारभाराचे व युध्दाच्या अनुभव प्राप्तीसाठी काबूल मोहिमेवर पाठवले. त्याला १५७७ मध्ये १० हजारांचा मनसबदार तर १५८५ मध्ये १२ हजारांचा मनसबदार बनवण्यात आला. राजा भगवानदासची मुलगी मानबाई हिच्याशी १३ फेब्रुवारी, १५८५ रोजी लग्न झाले. हा पहिला विवाह होता. जहांगींरला ज्येष्ठ मुलगा खुसरो ६ ऑगस्ट, १५८७ रोजी मानबाईपासून झाला. त्यानंतर मानबाईला शाहबेगम दर्जा प्राप्त झाला. खुसरो (खुश्रू) व जहांगीर यांच्यात बेबनाव झाल्याने मानबाईने १६०४ मध्ये आत्महत्या केली. जहांगिरची सावत्र आई सलिमा बेगम हिने मध्यस्थी करुन दोघांच्या समेट केला. सलीमला १६०३ मध्ये मेवाडवर पाठवले. परंतु सलिम अलाहाबादला गेला. तेथे

प्रजेवर अन्याय केला. त्याला शिक्षा करण्यासाठी अकबर गेला. याच सुमारास अकबराचा सर्वात धाकटा मुलगा डॅनियल आणि अकबराचि आई या दोघांचाही मृत्यु झाला. सलीम अकबराचे सांत्वनार्थ आग्र्याला गेला असताना अकबराने कैद केला. १६०५ मध्ये ऑक्टोबर महिन्याला अकबराने सलीमला राजा म्हणून निवडले,

अकबराच्या मृत्युनंतर आग्राच्या किल्ल्यात ३ नोव्हेंबर, १६०५ रोजी जहांगिरने स्वतःचा राज्याभिषेक करुन घेतला. नुरुद्दीन मोहंमद जहांगीर बादशहा गाझी ही पदवी त्याने स्वतःला लावून घेतली. अनेक कैद्याची सुटका केली. स्वतःच्या नावाने नाणी पाडली. बारा कलमी उदार धोरण (दस्तुर-उलू-अमल) जाहीर केले. ती पुढीलप्रमाणे :

१) जकात व इतर अन्यायकारक कर रद्द केले.

२) प्रवाशासाठी सराया, धर्मशाळा, मशिदी, रस्ते बांधले.

३) व्यापाऱ्याचे कापसाचे गठ्ठे त्यांच्या परवानगीशिवाय उघडले जाऊ नये.

४) कोणत्याही व्यक्तीच्या मृत्युनंतर त्याची मालमत्ता त्याच्या वारसांना मिळेल. वारस नसल्यास सार्वजनिक इमारती बांधण्याकरिता ती सरकारने ताब्यात घ्यावा.

५) दारूचे उत्पादन आणि विक्री यावर बंदी घातली.

६) सरकारी अधिकाऱ्यांनी कोणत्याही घराचा ताबा घेऊ नये.

७) नाक, कान कापण्याची शिक्षा बंद केली.

८) सरकारी अधिकाऱ्यांनी जबरदस्तीने शेतकऱ्याच्या जमिनीचा ताबा घेऊ नये.

९) सरकारी परवानगीशिवाय जहागीरादाराने किंवा सरकारी अधिकाऱ्याने मुलीचे विवाह करु नये.

१०) सरकारी दवाखाने उघडण्यात यावे.

११) गुरुवार व रविवार प्राणीहत्येला बंदी केली.

१२) अकबरकालीन सर्व सरकारी अधिकाऱ्यांनी आणि जहागीरदारींना आपल्या जागांवर कायम केले.

याशिवाय त्याने आगऱ्याच्या लाल किल्ल्यातील शाहबुरुजावरुन एक सोन्याची घंटा बांधली, नुरजहानचे वडिल गियासबेगला दिवाण नेमले. इतिमादूद्यौला व झामनबेगला महबनतखान या पदव्या दिल्या.

## ४.३ खुसरो मीर्झाचे बंड (एप्रिल, मे, १६०६)

अकबराच्या शेवटच्या दिवसात खुश्रूला गादीवर बसविण्याचा राजा मानसिंह (मामा) आणि मिर्झा अझीझ कोका यांनी प्रयत्न केला. जहागीरने त्याला आगऱ्यालाच नजर कैदेत ठेवले. राजा मानसिंह व मिर्झा अझीझ कोका यांना क्षमा केले, परंतु दरबारातील प्रतिष्ठा कमी केली.

अब्दूर्रहिम खानखाना याला दोन हजारांची मनसबदारी दिली. शरीफखानला वझीर पद, धियसबेग दिवाण, झामनवेग यांला महाबतखान हा किताब आणि १५०० ची मनसबदारी दिली. अबुल फझलला ठार मारणारा वीरसिंह बंदेल याला ३ हजाराची मनसब देण्यात आली.

जहांगीरचा पुत्र खुश्रूने १६ एप्रिल, १६०६ रोजी सिकंदरा या ठिकाणी अकबराच्या समाधीला भेट देण्याच्या निमित्ताने आग्ऱ्याच्या किल्ल्यातून ३५० घोडेस्वारासह कैदेतून निसटला. मोर्चा दिल्लीकडे वळवला. मथुरा येथे मुलगामी हुसेन वेग बदखशी ३ हजार सैन्यासह मिळाला. नंतर लाहोरचा दिवान अब्दुर रहमान येऊन मिळाला. १२ हजारापर्यंत सैन्य जमा केले. तारन तारन या ठिकाणी शिखांचा पाचवा गुरु अर्जुनसिंग याने खुसरोला आशिर्वाद दिला. नंतर खुसरो लाहोर किल्ल्याला वेढा. जहांगीरला खुसरो पळून गेल्याचे समजताच, तो स्वतः पाठलागासाठी गेला. जहांगीरच्या १० हजार सैन्याशी भारोवाल (भैरोवाल) येथे युध्द झाले. खुश्रूचा पराभव होऊन आपल्या साथीदारासह पळून जाताना, चिनाब नदी ओलंडीत असताना शहापूर येथे पकडले. लाहोर येथे जहांगीरपुढे हजर केला, जहागीरने त्याचे साथीदार हुसेन बेग, अब्दुल रहीम यांना चामड्यात शिवून ठार मारले, खुसरोला कैद केले. अन्य व्यक्तीना फाशी दिली. खुसरोचे पारिपत्य केल्यानंतर गुरु अर्जुनसिंगला दोन लाख रुपये दंड केला. अर्जुनसिंहाने दंड नाकारला. त्याला ठार मारले, त्यामुळे शिखांच्या धार्मिक भावना दुखावल्या. मोगलांचे ते कट्टर शत्रू बनले. औरंगजेबपर्यंत त्यांचा संघर्ष सुरु होता.

## ४.४ जहांगीरच्या काळातील महत्त्वाच्या घटना

### १) वायव्य सरहद्द धोरण (१६०६-०७):

खुश्रूच्या बंडाचा फायदा घेऊन इराणचा सम्राट शाह अब्बास याने मोगलांच्या ताब्यातील कंदाहार जिंकून घेण्याचा विचार केला. त्याने सैन्य पाठवले परंतु मोगल अधिकारी बेगखान याने पराभव केला. कंदहारमधून तुर्क, पर्शिया, मध्यआशिया यांच्याशी व्यापार चालत असत. कंदाहार भारताचा दरवाजा समजत असे. कंदहार महत्त्वाचे व्यापारी केंद्र असल्याने भारत व पर्शिया यात संघर्ष होत असे. १५२२ हुमायूनने गमवले तर १५९४ मध्ये अकबराने मिळवले. जहांगीरला संघर्ष निर्माण करावयाचा नसल्याने परंतु बाहेरील प्रदेशावर नियंत्रण ठेवण्यासाठी कंदहारला भेट दिली. आग्र्यावरुन लाहोरमार्गे काबूलला जून १६०७ मध्ये गेला. ३ महिने मुक्काम (१२ आठवडे) करुन, परत आग्र्याला मार्च, १९०८ मध्ये आला. लाहोर मुक्कामात त्याला ठार करुन खुसराला गादीवर बसवण्याचा कट रचण्यात आला, परंतु तो कट उघड झाल्याने कटवाल्यांना ठार मारले. खुसरोचे डोळे फोडून तुरुंगात टाकले, तेथे तो १६२२ मध्ये मरण पावला.

### २) राजपूत धोरण: मेवाडचे युध्द (१६०५ ते १५):

हळदीघाटाच्या युध्दात राणा प्रतापचा पूर्ण पराभव करुन ही अकबराला मेवाड जिंकता आले नाही. त्यांच्यानंतर त्याचा मुलगा अमरसिंहने संघर्ष सुरू केला. जहांगीर गादीवर आल्यानंतर १६०५ मध्ये आपला दुसरा गुलगा परवेज असफ खान जाफर बेग यांना २०

हजार सैन्यासह मेवाडवर पाठवले. अमरसिंहाने जोरदार प्रतिकार देऊन संघर्ष केला. खुसरोने बंड केल्याने त्यांना परत बोलवले. त्यामध्ये यश कुणालाच मिळाले नाही.

१६०८ मध्ये महाबतखानाच्या नेतृत्त्वाखाली फौज पाठवली, अमरसिंहाने जंगलाचा आश्रय घेऊन प्रतिकार केला, जहांगीराने महाबतखानाला परत बोलवले; अब्दुल्ला खानाला मेवाडच्या स्वारीवर पाठवले. मेवाड जिंकण्यात अपयश आले. राजा बसू नंतर मिर्झा अझिझ कोका यांना पाठवले. पण अपयश आले. १६१४ मध्ये जहांगीराने नुरजहानच्या सल्ल्यानुसार मेवाड मोहिमेवर राजपुत्र खुर्रम व मिर्झा अजीज कोका यांची नेमणूक केली. जहांगीर स्वतः अजमेर येथे तळ देऊन बसला. खुर्रमने जाळपोळ व लुटालुट करुन राजपूताची रसद बंद केली. कित्येक गावे बेचीराख केली. देवळांचा विध्वंस केला, अमरसिंहाने जिद्दीने बरेच दिवस टक्कर दिली. पण शेवट १६१५ अमरसिंह व खुर्रम यांच्यात वाटाघाटी होऊन तह झाला त्यामुळे त्यांच्यातील ७५ वर्षांचा संघर्ष संपला.

### ३) दक्षिण धोरण अहमदनगरशी युध्द (१६०८-२१):

अहमदनगर जिंकण्याचे अकबराचे कार्य अपूर्ण राहिले. ते पूर्ण करण्याचे जहांगीराने ठरवले. अ. नगरचा उरलेला प्रदेश, विजापूर, गोवळकोंडा ही राज्य जिंकण्याचे जहांगीराने ठरवले. या धोरणानुसार १३०८ मध्ये अब्दुर रहीमखान खाना याला १२ हजार फौज पाठवले. परंतु मलिक अंबरने मराठ्यांच्या मदतीने त्यांचा पराभव केला. १६१० मध्ये परवेज़ आणि आसफखान यांचा बऱ्हाणपूरच्या युद्धात पराभव झाला. १६१६ पर्यंत जहांगीरने खानजहान लोदी, इमान, मानसिंह, अब्दुल्ला खान इ. बलाढ्य सरदारांना पाठवले. परंतु अहमदनगर जिंकण्यात अपयश आले.

नूरजहानच्या सल्ल्यावरुन जहांगीरने या मोहिमेवर खुर्रमची नियुक्ती केली, १६१६ मध्ये "शाह सुलतान" हा जहांगीरने खुर्रमला किताब दिला. प्रथम खुर्रम बऱ्हापूरला गेला. मार्च १६१७ मध्ये मेवाडचा राजपुत्र कर्ण मदतीला होता. जहांगीर स्वतः मांडू येथे मुक्कामी असून, सैन्यावर लक्ष ठेवत होता. खुर्रमची किर्ती, लष्करी बळ ऐकून १६१७ मध्ये तह केला. नगरचा किल्ला, बालाघाट जिल्हा व १६ लाख रु. मोगलांना नजराना दिला. जहांगीर व नूरजहानने मोठा विजयोत्सव साजरा केला. शाहजहान हा किताब आणि ५० हजाराची मनसब (३० हजार जात व २० हजार सवार) दिली. त्यामुळे खुर्रमची प्रतिष्ठा वाढली. अब्दुर रहीम खानखाना याला वऱ्हाड, खानदेश, अहमदनगर या प्रदेशाचा सुभेदार नेमण्यात आले. त्याचा मुलगा शाहनबाब खान याला त्याच्या मदतीला पाठवण्यात आले..

खुर्रम परत गेल्यानंतर मलिक अंबरने १६२० मध्ये तह झुगारुन, विजापूर, गोवळकोंडा यांच्या मदतीने अब्दुर रहीमचा पराभव केला. मराठ्यांच्या मदतीने मोगलांना मांडूपर्यंत पिटाळून लावले. जहांगीरने पुन्हा खुर्रमला पाठवले. सर्वांचा १६२१ मध्ये पुन्हा करार

१) जिंकलेला सर्व प्रदेश मोगलांना परत करावा.

२) १४ लाखांचा अधिक प्रदेशही त्यांना दिले.

३) नगरने १२ लाख, विजापूरने १८ लाख रुपये, गोवळकोंडाने २० लाख मोगलांना खंडणी द्यावे.

**४) कांगडावर स्वारी (१६२०):**

पंजाबमधील कांगड्याचा किल्ला राजा विक्रमजीत याच्या ताब्यात होता. पंजाबचा सुभेदार मुर्तसाखान याला पाठवून, जहांगीरने कांगडा जिंकून घेण्याचा अपयशी प्रयत्न केला. शेवटी खुर्रमला पाठवले. मेवाडप्रमाणे रसद बंद, आजूबाजूचा प्रदेश उदध्वस्त करुन १४ महिन्यांच्या प्रयत्नानंतर १६ मे, १६२० किल्ला जिंकून घेण्यात यश मिळविले. जहांगीरने कांगड्यात जाऊन तेथे स्वतःच्या नावाने खुतब वाचला. किल्ल्यात एक मशीद बांधली. जहांगीरचा हा शेवटचा विजय होय.

**५) शाह अब्बासची कंदहारवर स्वारी विजय (१६२२):**

अफगाणिस्थानातील कंदहार हे व्यापारी व लष्करीदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र होते. इराण, तुर्क या देशांनी याच मार्गाने भारताचा प्राचीन व्यापार केला. कंदहार ताब्यात असावे यासाठी प्रयत्न केला. १६११-२२ या काळात इराकचा राजा शहा अब्बास याने जहांगीरच्या दरबारात वकिल व नजराणा पाठवला. १६२२ मध्ये जहांगीर व नुरजहाँ यांच्यातील वादाचा फायदा होऊन, शहा अब्बासने कंदहारवर स्वारी केली. ४५ दिवसात जिंकून घेतले. मोगलांच्या ताब्यातून कंदहार कायमचे गेले.

**६) शाहजहानचे बंड (१६२३-२६):**

जहांगीरची प्रकृती १६२१ पासून अतिशय बिघडलेली होती. त्यामुळे नुरजहानला भिती वाटत होती की, राज्याची सुत्रे आपल्या हातून जातात की काय? शहाजहान महत्त्वाकांक्षी व पराक्रमी असल्याने तो मुठीत राहणार नाही. जहांगीरचा सर्वात लहान मुलगा शहरयारला पाठिंबा देवून नुरजहानने आपली मुलगी लाडली बेगम हिचा विवाह शहरीयाबरोबर करुन जावई बनवले. शहाजहानला राजधानी पासून दूर ठेवण्यासाठी कंदहारच्या मोहिमेवर पाठवण्याची योजना आखली. त्याला शहाजहानने विरोध केला. शहाजहानने नुरजहानचा कावा ओळखून जहांगीरजवळ पंजाबची सुभेदारी, रणथंबोरचा किल्ला, सैन्याचे संपूर्ण अधिपत्याची मागणी केली. ही मागणी म्हणजेच बादशहाचा अपमान आहे. त्यामुळे जहांगीरने मनसबदारी काढून ती शहरयारला दिली. शहाजहान व त्याचा सासरा आसफखान याचे पारिपत्य करण्यासाठी नुरजहानने महाबतखानाला काबूलवरुन बोलविले. आपल्या अनुपस्थितीत नुरजहान शहरयाराला राजा म्हणून घोषित करेल, या सर्व प्रश्नांमुळे शहाजहाने बंड पुकारले.

शहाजहानला प्रथम फतेपूर शिक्री, नंतर आग्रा घेण्यात अपयश आले. अशीरगड येथे गेला. तेथे कुटुंबीयांना ठेवून मग बऱ्हाणपूर मार्ग धरला. बिलोचपूरा येथे लढाईत राय रायन विक्रमाजित ठार झाले. शहाजहानने मांडू किल्ल्याचा आश्रय घेतला. परंतु महबतखान आणि राजपुत्र परवेज याने पाठलाग केला. जहांगीरच्या भितीमुळे कोणीच दक्षिणेत शहाजहानला मदत केली नाही. मुख्य मदतीला अब्दुर रहीम खानखाना शाही सैन्यात जाऊन मिळाला. त्यामुळे शहाजहान ओरीसा प्रांतात गेला. ओरिसाचा सुभेदार अहमदबेग खान पळून गेला. त्यामुळे ओरिसा, शहाजहानच्या ताब्यात आला. इब्राहिमखानाचा पराभव करुन बंगाल ताब्यात घेतला. स्वतःच्या पराक्रमाने ओरिसा व बंगाल हे दोन प्रांत जिंकून घेतले.

त्याने पुन्हा दक्षिण भारतात प्रवेश केला. महाबतखानाच्या पाठलागामुळे शहाजहानचे अनेक अनुयायी त्याला सोडून गेले, काही ठार झाले. सतत धावपळीमुळे आजारी पडले. शरणागतीशिवाय मार्ग नाही म्हणून शरणागती स्वीकारली. महाबतखानाचे वाढते सामर्थ्य व परवेजविषयी त्यांची निष्ठा पाहून नुरजहानला संशय आला. त्यामुळे शहाजहानची शरणागती स्वीकारण्याचा सल्ला जहांगिरला दिला. दारा व औरंगजेब यास ओलीस ठेवून, रोहतासगड, अशीरगडचा ताबा सोडून दिला. फक्त बालाघाटाची सुभेदारी शहाजहानला १६२६ मध्ये दिली.

**७) महाबतखानाचे बंड (१६२६):**

सेनापती महाबतखान हा मोगल दरबारातील महत्त्वाकांक्षी व प्रभावशाली सरदार होता. राजपुत्र शहाजहानचे बंड मोडल्याने त्याची प्रतिष्ठा वाढली. खान स्वतंत्र बुध्दीचा होता आणि तो फक्त राजाचीच आज्ञा पाळीत. नुरजहानने राज्याची सत्ता केंद्रीत करावी ही गोष्ट मान्य नव्हती, शिवाय खानाने जहांगीरनंतर राजपुत्र परवेझला गादी मिळावी असे व्यक्त केले. त्यामुळे खानाची बदली बंगालमध्ये केली. असफखानच्या मदतीने नुरजहानने महाबतखाना विरुध्द आरोप केला की, बंगाल आणि ओरिसा प्रांतातील जहांगीरदारांकडुन पैसा उकळला आणि हत्ती व युध्द साहित्यही जमविले.

नुरजहानच्या या आरोपाने महाबतखानने संतापून बंगालमध्ये जाण्याऐवजी त्याने जहांगिरची प्रत्यक्ष भेट घेण्यासाठी पंजाबात गेला. जहांगीर ४ हजार सैन्यांसह काश्मीरची स्वारी आटोपून काबूलकडे झेलम नदी ओलांडून जात होता. महाबतखानने त्याच्या छावणीवर छापा मार्च १६२६ मध्ये घातला. आपण मला न्याय द्या, अशी विनवणी जहांगीरकडे केली. परंतु उपयोग झाला नाही. जहांगीरला कैद केले. आसफखान, नुरजहान या बहिणभाऊ यांनी खानावर हल्ला केला. जहांगीर व नुरजहान दोघेही खानाचे कैदी बनले. खानाच्या तंत्राने राज्यकारभार सुरु झाला. जहांगीरबरोबर महाबतखान काबूलला गेला. तेथे खानाचे राजपूत व मोगल पहाडी सैन्यात संघर्ष होऊन ९०० राजपूत ठार झाले. जहांगीरने सुत्र हाती घेताच खान लाहोरमधून पळून नाशिकला गेला.

**आपली प्रगती तपासा:**

१) सम्राट जहांगिर-शहाजहान संबंध स्पष्ट करा.

२) सम्राट जहांगिर यांचे राजपूत धोरण वर्णन करा.

## ४.५ नुरजहानचा उदय

### १) नुरजहानचा परिचय:

जहांगीरच्या दरबारातील सर्व राजकारण एकाच सौंदर्यशाली व्यक्ती-भोवती फिरत होते. ती व्यक्ती म्हणजे नुरजहान होय. नुरजहान ही गियासउद्दीन किंवा इत्तिमादउद्दौलाची मुलगी होती. तो मुळचा तेहरानचा रहिवाशी. धियासबेग (गियासउद्दीन) चे वडिल ख्वाजा महम्मद शरीफ खुरासानच्या सुलतानाचे वझीर होते. वडिल मरण पावल्यानंतर १५७७ मध्ये गियासबेग त्याची पत्नी, दोन मुले घेऊन भारतात आला. भारतात कंदहार मुक्कामी एक मुलगी जन्माला आली. तिचे नाव मेहरुन्निसा असे ठेवण्यात आले. फत्तेपूर शिक्री येथे अकबराची भेट होऊन नोकरीत प्रवेश केला, अशा रितीने गियासबेग भारतात स्थायिक झाला. स्वामिनिष्ठा, हुशारी या गुणामुळे गियासबेग बादशाहचा खाजगी दिवाण झाला. तो हुशार व प्रतिभावान असल्यामुळे अकबराची मर्जी त्याच्यावर वाढली.

मेहरुन्निसा हिच्यां मनमोहक सौंदर्यामुळे वाढले. साहजिकच राजपुत्र तिच्यावर मोहित झाला. तीही अतिशय महत्त्वाकांक्षी असल्यामुळे युवराजच्या हृदयसिंहासनाची सम्राज्ञी होण्याची महत्त्वाकांक्षी बाळगू लागली. परंतु ते अकबरला मान्य नव्हते. त्याने अलीकुलीबेग नावाच्या एका इराणी सरदाराशी तिचे लग्न लावून दिले. यावेळी मेहरुन्निसा १७ वर्षांची होती. जहांगीर बदशहा झाल्यानंतर अलीकुली बेगला मनसबदारी दिली व 'शेर अफगाण' असा किताब देऊन बंगालमधील जहागीरीवर पाठवले. त्याची बायको मेहरुन्निसा त्याच्याबरोबर गेली.

शेर अफगाण बरदानच्या जहागीरीवर असताना, स्वतंत्रपणे वागू लागला. जहांगीरने बंगालचा सुभेदार कुतुबुद्दीनला ठार केले. परंतु त्याच्या साथीदाराने शेर अफगाणाला ठार केले. (एप्रिल,१६०७) त्यानंतर मेहरुन्निसाला आग्र्याला आणून जहांगीरने आपल्या राजवाड्यातच सावत्र आई सलीम बेग हिच्याजवळ ठेवली. शेर अफगाणापासूनची एक मुलगी लाडली बेगम तिच्याजवळ होती. मेहरुन्निसा व जहांगीर यांचे मे, १६९९ मध्ये लग्न झाले. तिला प्रथम नुरमहाल किताब दिला. नंतर नुरजहान (जगाचा प्रकाश) इ. पदव्या दिल्या. आपली पट्टराणी केली. नुरजहान जशी सौंदर्यसंपन्न होती तशीच अत्यंत हुशार, महत्त्वाकांक्षी होती. काव्य, संगीत, चित्रकला इ. आवड होती. फारसी भाषेत कविता करीत. शृंगार प्रसाधने आणि नवनवीन वस्त्रप्रावरणे याची हौस होती. अंतःकरणाने मोठी उदार असून, गोरगरिबांच्या मदतीसाठी ती नेहमीच तत्पर असे.

### २) नुरजहानच्या पक्षाचे प्राबल्य:

लग्नाच्या वेळी नुरजहा वय ३४ वर्षे, जहांगीर ४२ वर्षांचे वय होते. नुरजहानला मुळातच राजकारणाची आवड होती. लग्नानंतर यात वाढ झाली. हळूहळू स्वंतंत्र राज्यकारभार सुरु केला. १६१३ मध्ये नुरजहानला बादशाहबेगम हे पद दिले. तिने आपल्या मर्जीतील लोकांचा एक पक्ष तयार केला "नुरजहान जुंटा" या नावाने पक्ष ओळखला जातो. त्या पक्षात तिची आई आस्मत बेगम, वडिल इतिमदउद्दौला, भाऊ आसफखान व राजपुत्र खुर्रम ऊर्फ शहाजहान होते. त्यांच्या सहकार्याने नुरजहानने राज्यकारभार सुरु केला.

### ३) नुरजहान आणि जहांगीर याचे संबंध:

नुरजहान झरोक्यातून दर्शन देत होती. राज्यकारभाराचे हुकूम देत असे. तिच्या नावाने हुकूम निघत आणि नाणीसुध्दा तिच्या नावाने पाडण्यात आली होती. राज्यकारभार करण्यास नुरजहान पूर्णपणे लायक आहे, म्हणून मी राज्यकारभारातून आपले अंग काढून घेतले, असे जहांगीरने एकदा उद्गार काढले. परंतु जहांगीर केवळ नाममात्र राजा राहिला नव्हता. कारण जहांगीरने अंतर्गत व बर्हिगत क्षेत्रात जी राजतत्त्व घालून दिलेली होती. त्याचे नुरजहानने उल्लंघन केले नाही. पुष्कळ वेळा जहांगीर स्वतः राज्यकारभारात लक्ष घालीत असे. इंग्लिश व्यापाऱ्यांवर एकदा अन्याय झाला म्हणून दोषी शहाजहानला कडक शिक्षा केली. यावरून एक शिस्तप्रिय शासक म्हणून जहांगीर यांचे गुण वैशिष्ट्ये दिसून येते.

### ४) नुरजहानच्या कारभाराचे दोन भाग :

१६११ ते २२ या काळातील तिची कामगिरी साम्राज्यहितास पोषक होती. तिच्याच आदेशावरुन राजपुत्र खुर्रम याने मेवाड (१६१५) कांगडा (१६२०) अ.नगर (१६२१) इ. महत्त्वपूर्ण विजय संपादन केले. तिच्याच संकेतावरुन खुर्रमने खुसरोचा गुप्तपणे काटा काढला. दुसरा कालखंड १६२२-२७ पर्यंत या काळात मातापित्यांच्या मृत्युमळे तिच्या सत्तापिपासेवर अंकुश लावणारे कोणीही वडिलधारी माणूस शिल्लक राहिलेले नव्हते. या काळात तिच्या सत्तेच्या अवास्तव मोहामुळे आग्रावर अनेक संकटे कोसळली, अनेक बंड होऊन, शासन व्यवस्था खिळखिळी झाली, तिच्या जाचाला कंटाळूनच राजपुत्र खुर्रम व सेनापती महाबतखान यांनी बंड केले. खुर्रम गादीवर आल्यानंतर राजकारणातून अंग काढून घेऊन, उर्वरित जीवन लाहोरला परोपकारात चालविले. इ.स. १६४५ मध्ये नुरजहानचा मृत्यू झाला.

### ५) नुरजहानच्या वर्चस्वाचे परिणाम:

नुरजहानच्या वर्चस्वाचा जहांगीरच्या जीवनावर सुखकारक व आनंददायक परिणाम झाला. परंतु राज्याचच्या सुरक्षितेच्या दृष्टीने घातक ठरला. कारण तिचे वर्चस्व राज्यकारभारात वाढले; स्वतःच्या नातेवाईकांची मोठ्या जागेवर नेमणूक केली. त्यामुळे जुने सरदार नाराज झाले. या असमाधानी गटाचे नेतृत्त्व महाबतखानाने केले.

शहाजहानला आतापर्यंत पाठिंबा दिल्यामुळे त्याची प्रतिष्ठा शिगेला पोहचली. तो आपल्या तंत्राने अथवा मुठीत राहणार नाही. त्यामुळे नुरजहानची मर्जी शहरयारवर बसली. शिवाय आपली मुलगी त्याला दिल्याने शहाजहानला विरोध दर्शवला. याउलट आसफखानची मुलगी अर्जुमंदबानू बेगम शहाजहानला दिल्याने आसफखानने शहाजहानची बाजू घेतली.

नुरजहानच्या गैरवाजवी हस्तक्षेपामुळे महाबतखान याने जहांगीर विरुध्द बंड केले. त्याने जहांगीर व नूरजहान यांना काहीकाळ कैद केले. नुरजहान स्त्री असल्याने कारभारावर पकड नाही. राज्यातील शिस्त नष्ट झाली. मर्जी संपादनेसाठी धूर्त लोक उंच नजराणे भेट देऊन कार्यभाग साधून घेत असत, लाचलुचपतीचे प्रमाण वाढले. अधिकारी स्वतंत्रवृत्तीने वागू लागले.

**आपली प्रगती तपासा:**

१) नुरजहानच्या कामगिरीचा आढावा घ्या.

___

## ४.६ जहांगीरचा मृत्यु आणि योग्यता

जहांगीर आजारी असल्याने हवा पालटण्यासाठी काश्मीरला गेला. पण तब्बेत सुधारली नाही. तो परत आग्राला आला. ७ नोव्हेंबर, १६२७ रोजी लाहोरजवळ भीमबार येथे मरण पावला. यावेळी ५८ वर्षे वय होते, त्याचे लाहोरजवळ शाहदरा येथे दफन करण्यात आले.

जहांगीरच्या व्यक्तीमत्त्वाविषयी वेगवेगळी मते आहेत. तो चंचल प्रकृतीचा मदिरा व मदिरजीचा भोक्ता, न्यायप्रिय, सौजन्यशील, प्रजाकल्याणकारी, कठोर हृदयाचा इ. गुणाचा होता. निर्धनासाठी मोफत भोजन व्यवस्था, शेतकऱ्यांना मदत, साहित्य, काव्य, संगीत, चित्रकला, बांधकाम इ. गुणासंदर्भात प्रसिध्द होता. तुजके जहांगिरी व जहांगिरनामा या आत्मचरित्रामध्ये माहिती मिळते. कठोरता व सौम्यपणा असे दोन्ही गुण जहांगिरच्या चरित्रात दिसून येते.

**बादशहा शहाजहान (१६२८-१६५८):**

जहांगीरच्या काळात नुरजहानच्या मार्गदर्शनानुसार शहाजहानने अनेक विजय मिळवले. परंतु दिल्लीचे सिंहासन मिळवण्यात अडचण येत असल्याने त्याने उठाव केला. शहाजहान अतिशय शुर व पराक्रमी होता. त्याने उत्तर, दक्षिणेकडे साम्राज्यविस्तार केला. त्याचा काळात अनेक क्षेत्रात प्रगती झाल्याने, त्याच्या काळ सुवर्ण युगाचा होता असे काही इतिहासकार मानतात. वारसायुध्दात औरंगजेब विजयी झाल्याने, त्याने शहाजहानला कैद करून तुरुंगात ठेवले.

## ४.७ शहाजहानचा परिचय

शहाजहान ऊर्फ खुर्रम याचा जन्म ५ जानेवारी, १५९२ रोजी लाहोर येथे झाला. त्याची आई मारवाडचा राजा उदयसिंहाची मुलगी. जगत गोसाई उर्फ जोधाबाई उर्फ मरियम-उज-जमानी व वडिल जहांगीर होय. खुर्रम अकबराचा अतिशय लाडका होता. अकबराने त्याच्या शिक्षणाची उत्तम सोय केली. विविध भाषा व शास्त्रांच्या ज्ञानापेक्षा युध्दकलात तो निष्णात झाला. त्याने उत्कृष्ट सेनापती या नात्याने किर्ती संपादन केली. १६०६ मध्ये सम्राट जहांगीर जेव्हा राजपुत्र खुसरोच्या पारिपत्यासाठी पंजाबात गेला. तेव्हा राज्याची जबाबदारी खुर्रमवरच सोपवली. १६०७ मध्ये वयाच्या पंधराव्या वर्षी ८००० जात व ५००० सवार मनसब देण्यात आली. १६०८ मध्ये हिसार-फिरोजची जहागीर देण्यात आली. नुरजहानच्या आमदानीत तिने या कर्तबगार राजपुत्रास हाती धरुन एक प्रबळ राजसत्ता निर्माण केली. नुरजहानच्या मध्यस्थीने एप्रिल इ.स. १६१२ मध्ये आसफखानाने आपली

मुलगी अर्जुमंदबानू उर्फ मुमताजमहल हिचा शहाजहानशी विवाह लावून दिलं. तिच्यापासून शहाजहानला एकूण १४ मुले झाली होती.

नुरजहानच्या कारकिर्दीत शहाजहानने मेवाड १६१५, कांगडा (१६२०) अ.नगर १६१७, १६२१ मध्ये विजय प्राप्त केले. त्याच्या पराक्रमावर प्रसन्न होऊन जहांगीरने शाह सुलतान आणि शाहजहान अशा चढत्या क्रमांकाच्या पदव्या बहाल केल्या. शहाजहानने अनेक विजय प्राप्त केल्याने तो साम्राज्यातील विजेता व उत्कृष्ट सेनानी ठरला. प्रतिष्ठा, गौरवाच्या शिखरावर असल्याने नुरजहानला तो प्रतिस्वार्थी भासू लागला. त्यामुळे दिल्लीपासून दूर ठेवण्यासाठी कंदहार मोहिमेवर पाठविले. नुरजहानचे हे कारस्थान असल्याने शहाजहाने बंड केले. १६२६ मध्ये महबत खानाने त्याचा बिमोड केला नंतर दोघेही एकत्र आले. ७ नोंव्हेबर १६२७ मध्ये जहांगीर मरण पावला. यावेळी खुर्रम दक्षिणेत होता. नुरजहानने आपला जावई शाहरयार तर वजीर आसफखानाने आपला जावई खुर्रमला गादीवर बसवण्याचा प्रयत्न केला. असफखानाने राजधानीत येण्यास खुर्रमला निरोप पाठवला. ४ फेब्रुवारी १६२८ रोजी खुर्रम सम्राट शहाजहान या नावाने गादीवर बसला. अनेक व्यक्तींना देणग्या, मोठ्या पदाच्या नोकऱ्या दिल्या. आसफखानास मुख्य वजीर, महाबतखानाची मनसब वाढवून त्याला खानखानान हा किताब दिला. अबुल मुनफ्फर शहाबुद्दीन मोहम्मद साहिब, किरान-ए-सानी शाहाजहान पादशाही गाझी या नावाने गादीवर बसला.

## ४.८ शहाजहानच्या कारकिर्दीतील महत्त्वाच्या घटना

### १) खानजहान लोदीचे बंड (१६२८-३०):

खानजहान लोदी एक अफगान सरदार होता. जहांगीरने दक्षिणेचा सुभेदार परवेझची नेमणूक करुन त्याच्या मदतीला खानजहान लोदीची नेमूणक केली. शहाजहानने त्याला दक्षिणेचा सुभेदार नेमले. परंतु तो नुरजहान पक्षाचा असल्याने त्याच्या मनात प्रथम पासूनच शहाजहान बद्दल मनात तिरस्कार होता. त्या महाबतखानास खानखाना किताब दिला. म्हणून लोदीने लाच घेऊन बालघाटात प्रदेश अहमदनगराच्या सुलतानाच्या स्वाधीन केला. शहाजहाने बालघाट जिंकून घेण्याची जबाबदारी त्याच्यावर सोपवली. त्यात त्याला अपयश आले. त्यामुळे महबतखानाची नेमणूक दक्षिणेस करुन लोदीची नेमणूक माळव्यात केली. हा बदल अमान्य असल्याने लोदी बुदेलखंडात पळून गेला. मोगल सैन्याने पाठलाग केला व शेवटी लोदी नगरच्या सुलतनाच्या आश्रयात गेला. १६२९ मध्ये शहाजहान स्वतः दक्षिणेत आला. त्यामुळे कोणत्याही राज्याकडून मदत मिळाली नाही. धुळे, देऊळगावराजा, तेलंगणा या तीन दिशेने सैन्य पाठवून लोदीला कोंडीत पकडले. शेवटी खानजहान उत्तरेस पळाला. उत्तरप्रदेशातील सिंहादा येथे चकमकीत लोदी आपल्या साथीदारासह १६३६ मध्ये ठार झाला.

### २) जुझारसिंह बुंदेल्याचे बंड (१६२८-३५):

अबुल फझलला ठार केल्यानंतर वीरसिंह बुंदेल हा जहांगीरचा अत्यंत लाडका सरदार बनला. त्याने जहांगीरमुळे सैन्यबळ वाढवून आजूबाजूचा प्रदेश जिंकून घेतला. १६२७ मध्ये विरसिंह मरण पावला. नंतर त्याचा मोठा मुलगा जुझारसिंह गादीवर आला. त्यानेही बापाप्रमाणेच आजुबाजूचे प्रदेश जिंकून घेतले त्यामुळे त्याचे बंड मोडण्यासाठी महाबतखान,

अब्दुल्ला खान आणि खान जहान या सरदारांना पाठविले. त्यामुळे जुझारसिंह शरण गेला. युध्द खंडणी म्हणून ६६ लाख रुपये आणि ताब्यातील बराच मुलुख दिला. मोगल सैन्यात मनसबदारी स्विकारली. १६३५ मोगलांच्या ताब्यातील गोंडवनाचा प्रदेश जिंकून घेतला. शहाजहानने जाब विचारला पण दुर्लक्ष केले. त्यामुळे शहाजहानने प्रचंड सैन्यानिशी औरंगजेबाला पाठवले. जुझारसिंह आपल्या कुटुंबीयांसह प्रथम चुनारगड नंतर दक्षिणेकडे पळून जाऊ लागला. त्याचा पराभव झाला जुझारसिंह व त्याचा मुलगा विक्रमजीत पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना गोंड लोकांनी डिसेंबर १६३५ ठार मारले.

### ३) भयंकर दुष्काळ (१६३०-३२):

शहाजहानच्या वैभवशाली कारकिर्दीत एक अत्यंत दुदैवी घटना घडली. १६३०-३२ च्या दरम्यान गुजरात व दक्षिण भारतात भयंकर दुष्काळ पडला. हजारो बायका, मुले व माणसे मरण पावली. दुष्काळ इतका तीव्र होता की, लोकांनी आपल्या मुलांना भाजून खाण्यासदेखील मागेपुढे पाहिले नाही. अब्दुल हमीद लाहोई पादशानामा या ग्रंथात म्हणतो, "दोन प्रांतच्या नागरिकांना असह्य यातना सहन कराव्या लागल्या." भाकरीसाठी लोक आपणास विकावयास तयार होते. अन्नाकरिता इतरांसमोर हात पसरत. बाजारात बकऱ्याच्या नावावर कुत्र्याचे मास विकले जाई. गरीब व निराश्रीतांसाठी बऱ्हाणपूर, अहमदाबाद. सुरत इ. शहरी अन्नछत्रे उघडण्यात आले. बऱ्हाणपूर येथे दुष्काळपीडितांना दर सोमवारी ५ हजार रुपये वाटण्यात आले. जमिनीचा महसूल माफ करण्यात आला. लोकांना मदत, धान्य इतर राज्यातून आणून वाटप करण्यात आले.

### ४) मुमताज महालचा मृत्यु (७ जून १६३१):

नुरजहानचा भाऊ आसफखानाची मुलगी अर्जमंदबानू ऊर्फ मुमताज महाल बेगम, वयाच्या १९व्या वर्षी १३ एप्रिल, १६१२ रोजी तिचा राजपुत्र खुर्रमशी विवाह झाला. तिच्यापासून शहाजहानला एकूण ८ मुले व ६ मुली असे १४ मुले झाली. त्यापैकी ६ जिवंत राहिले. नुरजहानचे अप्रतिम सौंदर्य व शहाणपण व प्रामाणिकपणा हे उत्कृष्ट गुण मुमताजच्या अंगी होते. शहाजहानने बंड पुकारले त्यावेळी, तिचीही पळापळ झाली. शहाजहान दक्षिण मोहिमेवर असताना जून १६३१ रोजी बऱ्हाणपूर येथे वयाच्या ४०व्या वर्षी मरण पावली. तिच्या स्मृती जिवंत ठेवण्यास आग्रा येथे ९ कोटी १७ लाख रुपये खर्च करुन ताजमहाल बांधला. ती कट्टर मुसलमान असून इतर धर्माचा व लोकांचा द्वेष करीत असे.

### ५) पोर्तुगीजांचे परिपत्य (१६३२):

२४ जून अकबराच्या संमतीने पोर्तुगीजांनी १५७९ मध्ये बंगालमध्ये हुगळी येथे व्यापारी केंद्र स्थापन केले. मिठाचा व्यापार करण्याची परवानगी मिळाली. त्यासाठी ते दरवर्षी १० हजार टंक सरकारला कराच्या रुपाने देत असे, मनुची या इटालियन प्रवाशाच्या लिखाणावरुन दिसते. व्यापाराच्या सुरक्षिततेच्या निमित्ताने हुगळी येथे अनेक इमारती बांधल्या.

व्यापाराबरोबर इतर गुलामांचा व्यापार सुरु केला. ख्रिश्चन धर्माचा प्रसार केला. शहाजहान गादीवर आल्यानंतर कासीमखानने (बंगालचा सुभेदार) पोर्तुगीजांचा बंदोबस्त करावा असे कळविले. शहाजहानही नाराज होता. कारण तो सम्राट झाला त्यावेळी नजराणा पाठवला

नाही. शिवाय मुमताजच्या दोन दासींना पकडून पळवून नेले. यामुळे शहाजहाने पोर्तुगीजांचे परिपत्य करण्याचा हुकूम ढाक्क्याचा राज्यपाल कासीमखानला दिला. खानाने हुगळीला वेढा दिला. शेवटी २४ जून, १६३२ रोजी पोर्तुगीज शरण आले.

### ६) शीख गुरुशी तणावपूर्ण संबंध:

शहाजहान अमृतसरजवळ शिकारीसाठी आला असता, त्याने पाळलेला ससाणा (बाज) पक्षी उडत गुरुच्या मुक्कामावर गेला. तेथे त्याला शीखांनी पकडून ठेवले. मागणी करण्यासाठी आलेले मोगल सैन्य रिक्त हाताने परत आले. नंतर समोपचाराने सदर प्रश्न मिटविण्याचा प्रयत्न दोंघांकडूनही केला गेला. गुरु हरगोविंद यांनी नदीच्या काठी गोविंदपूर शहर बसविण्यात सुरुवात केली. जालंधरच्या अब्दुलला नामक फौजदाराने मनाई केली. त्याने गुरुवर हल्ला चढवला. गुरुने अब्दुल खानाचा पराभव केला.

### आपली प्रगती तपासा:

१) सम्राट शहाजहानच्या काळातील घटणांचे वर्णन करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ४.९ शहाजहानचा दक्षिणेकडील साम्राज्य विस्तार

मोगल साम्राज्यातील बंडखोरांना दक्षिणेत मुसलमान राज्ये नेहमी आश्रय देत. धार्मिकदृष्ट्या मोगल सुन्नी तर दक्षिणेतील राज्य सियापंथी होते. त्याशिवाय विजापूर, गोवळकोंड ही राज्य सोने व हिऱ्यांच्या खाणीकरिता प्रसिध्द होते. दक्षिणेतील रणधुरंधर व श्रेष्ठ मुत्सद्दी मलिक अंबर १६२६ मध्ये मरण पावला होता. तो जोपर्यंत जिवंत होता तोपर्यंत मोगलांचा दक्षिणेत शिरकाव होऊ शकला नाही. त्याच्या मृत्युमुळे दक्षिणेत साम्राज्य विस्तार करण्यास संधी प्राप्त झाली.

### १) अहमदनगर खालसा (१६३३ ते १९३६):

अहमदनगर राज्यात औरंगाबबाद, जालना, नाशिक, बागलान, कल्याण इ. प्रदेश होता. मलिक अंबरच्या मृत्युनंतर राज्यात अराजकता, बेबंदशाहीने धुमाकूळ घातला. निजामशाहीचा सुलतान मुर्तजाखान तर राज्याची सुत्रे मलिके अंबरचा मुलगा फत्तेखान याच्या हाती होती, तो कधी मोगलांशी, तर कधी विजापूरशी हात मिळवणि करत असे. निजामाने खानजहान लोदीला आश्रय दिल्याने, शहाजहान स्वतः गेला. शहाजहानने धारूरचा किला घेऊन, परेंडाला वेढा दिला. शहाजहानच्या संकेतावरुन फत्तेखानाने मुर्तजाखानाला ठार मारले. त्याच्या जागी हुसेनशहाला गादीवर बसवले. शहाजहानची मर्जीसाठी त्याच्या नावाने खुतबा वाचला. नाणी पाडली. अहमदनगरच्या राज्याने शहाजहानचे स्वामित्त्व मान्य केले.

फत्तेखानाने निजामशाहीची नोकरी सोडून मोगलांकडे आला. १६३२ मध्ये शहाजहानने दौलताबाद किल्ल्याला वेढा दिला. विजापूरकरांमुळे आसफखानाला अपयश आले. त्यानंतर महाबतखान खानखाना याला नेमले. त्याने फत्तेहखानास एक कोटी लाच दिली. किल्ल्यासह सुलतान मोगलांच्या ताब्यात गेला. दौलताबाद पतनाने निजामशाही नष्ट झाली. फत्तेखानाचे ते कृत्य हिंदू- मुसलमानांना अजिबात पसंत पडले नाही. शहाजी भोसल्याच्या नेतृत्त्वाखाली एक लहान मुलाला सुलतान बनवून जुन्नर येथे राजधानी स्थापन केली. विजापूर, गोवळकोंडाच्या मदतीत जुन्नर, पुणे, चाकण, बालाघाट, कोकणपट्टी इ. वर्चस्व महाबत खानाने शहाजीचा पाडावा करण्याचा प्रयत्न केला पण अपयश आले. त्यानंतर शहाजहान स्वतः दक्षिणेत आला. त्याने प्रथम विजापूरशी तह केला. नंतर निजामशाहीशी संघर्ष केला. शेवटी १६३६ मध्ये शहाजीने अल्पवयीन सुलतान मोगलांच्या आधीन करून विजापूर दरबारी नोकरी धरली. निजामशाहीचे राज्य नष्ट करून ते मोगल साम्राज्याला जोडले.

### २) विजापूर मोगल संबंध (१६३६):

विजापूरचा सुलतान इब्राहिमशहाने मोगलांच्या विरुध्द नगरला मदत केली. दक्षिणेतील सुलतान मोगल सम्राटऐवजी इराणच्या शहालाच सार्वभौम सम्राट मानत होते. १६२७ मध्ये इब्राहिमशहा मरण पावला. त्याच्या जागी मुहंमद आदिलशाह गादीवर आला. मोगलांशी संबंध ठेवण्यावरुन दोन गट, रणदुल्लखान मोगलविरुध्द नगरला मदत करावी, मुस्तफाखान मोगलांशी मैत्रीचे संबंध ठेवणे, मुस्तफाखानचा सल्ला मान्य करुन, नगरविरुध्द मोगलांना लष्करी मदत केली, परंतु १६२१ मध्ये शहाजहानने आसफखानाला विजापूरवर पाठवले. त्याने तेलंगणामधील कन्धारचा किल्ला जिंकला. गुलबर्गा लुटले, पावसाळा जवळ आल्याने रसद नीट होणार नाही या भितीने आसफखानाने माघार घेतली. शहाजहानने त्याच्या जागी महाबतखानाची नियुक्ती केली. अपयश आले. शहजहानने विजापूरबरोबर १६३६ मध्ये तह केला.

१) सार्वभौमत्त्व मान्य करुन २० लाख दरवर्षी खंडणी,

२) शहाजी भोसले विरुध्द मोगलांना मदत,

३) गोवळकोंडाशी संबंध मोगलांच्या मर्जीनुसार असावे,

४) परिंडा, बिदर, गुलबर्ग, सोलापूर सुलतानाला परत दिले.

गोवळकोंड्यानंतर विजापूरवर स्वारी केली. यावेळी नोव्हेंबर, १६५६ मध्ये मोहम्मद आदिलशहा मरण पावला. त्याच्या जागी १८ वर्षीय पुत्र अली आदिलशहा द्वितीय गादीवर बसला. त्यामुळे दरबारात दोन गट पडले, याचा फायदा औरंगजेबने घेतला. मुहमंद आदिलशहाला औरस पुत्र नव्हता आणि त्याच्यावतीने बडी साहिबा हिने ज्याला गादीवर बसवले तो महंम्मद आदिलशाहाचा वारस नाही, हे औरंगजेबने शहाजहानला कळवले, त्यामुळे आमची परवानगी न घेता वारस नेमला. हे कारण दाखवून त्याच्यावर स्वारीची परवानगी दिली. औरंगजेबने मीर जुमलाच्या मदतीने स्वारी गेली बीदरचा किल्ला ताब्यात घेतला. दारुगोळा प्राप्त केल्यानंतर कल्याण जिंकले. गुलबर्ग्याजवळ विजापूरच्या दाराकडून

शहाजहानशी मध्यस्थी केली. त्यामुळे युध्दबंदीचा आदेश शहाजहानने दिला व दोघांच्यात तह झाला.

१. दीड कोटी युध्द खंडणी द्यावी.

२. बिदर, कल्याणी, परंडा, कोकण, वेंगुर्ला मोगलांना द्यावे. शहाजहान आजारी असल्याची बातमी येताच तो उत्तरेकडे गेला.

**३) गोवळकोंडा राज्याशी संबंध (१६३६) :**

गोवळकोंडा सुलतानाने अहमदनगरला आर्थिक मदत केली होती. १६२६ मध्ये मुहंमद कुतुबशहा भरण पावला. ११ वर्षे वयाचा अब्दुल्ला कुतुबशहा गादीवर आला. त्यामुळे १६३१ मध्ये शहाजहानने स्वारी करुन खंडणीची मागणी केली. परंतु यश न आल्याने खंडणी मिळाली नाही. शेवटी १६३६ मध्ये शहाजी भोसले आणि विजापूर विरुद्ध मोहिम यशस्वी केली. नंतर गोवळकोंडाचा सुलतान भयभीत होऊन १६३६ मध्ये करार झाला. करारानुसार-

१. गोवळकोंडा राज्यात शहाजहानच्या नावाने खुतब वाचण्यात यावा आणि चलनी नाण्यावर शहाजहानचे नाव अंकित करण्यात यावे.

२. सुलतानाने मांडलिकत्त्व मान्य करुन प्रतिवर्ष ८ लाख खंडणी द्यावी. मागील थकबाकी ३२ लाख द्यावे.

३. विजापूरने हल्ला केला तर, सम्राटने सुलतानाला लष्करी मदत करावी. जर मदत शक्य झाले नाही तर, गोवळकोंड्याचे जे नुकसान होईल त्याची भरपाई सम्राटाकडून व्हावी.

**४) औरंगजेबचे विजापूर गोवळकोंडा युध्द (१६५६-५७)**:

औरंगजेब १६३६-४४ या काळात दक्षिणेचा सुभेदार होता. पुन्हा १६५२ मध्ये दक्षिणेचा सुभेदार म्हणून नेमणूक झाली. त्याने प्रथम बागलाण जिंकून लुटारूंचा बंदोबस्त करुन शेती सुधारण्याकडे लक्ष दिले. नंतर राजकीय उद्देशाकडे वळला. दक्षिणेतील विजापूर-गोवळकोंडाही राज्य जिंकावयाची होती. कारण ते शियापंथी होते. औरंगजेब कट्टर सुन्नी पंथी होता.

गोवळकोंडा अति श्रीमंत राज्य असूनसुद्धा १६३६ च्या तहानुसार खंडणी थकली होती. १६३७ मध्ये शहनवासखानची मुलगी दिलरलबानू हिच्याशी लग्न झाले. १६४४ मध्ये आग्राला शहाजहान गेल्याने औरंगजेबची नेमणूक गुजराथ सुभेदार, १६४७-५३ पर्यंत औरंगजेबचे कंदाहार व मध्य आशियातील मोहिमांवर अपयश, १६५३ मध्ये पुन्हा दक्षिण सुभेदार म्हणून नेमणूक झाली.

१६३६ च्या तहानुसार सुलतानाकडून दरवर्षी खंडणी येणे बंद झाली. ही रक्कम वसुल करण्यासाठी स्वारी याच सुमारास गोवळकोंड्याचा मुख्यमंत्री मुहम्मद सैय्यद ऊर्फ मीर जुमला याचे अब्दुल्ला वजीर कुतुबशहा होऊन, कुतुबशहाने त्याची सर्व मालमत्ता जप्त

केली. त्याचा मुलगा मुहम्मद अमीन याला कैद करुन, त्याला आपल्या राज्यातून हाकलून दिले. तेव्हा मीर जुमला सुड घेण्यासाठी औरंगजेबला जाऊन मिळाला.

औरंगजेबने शहाजहानकडून स्वारीची परवानगी मागितली. त्याने जानेवारी, १६५६ मध्ये आपला मुलगा मुहम्मद याला पाठवले, प्रदेश लुटल्यास व विध्वंस करण्यास सुरुवात केली. कुतुबशहा घाबरला. त्याने विजापूरच्या मदतीसाठी प्रयत्न केला. औरंगजेब स्वतः गोवळकोंड्यावर फेब्रुवारी १६५६ ला गेला, हैद्राबाद जिंकून गोवळकोंड्याला वेढा दिला. सुलतानाने औरंगजेबशी तहाची बोलणी करण्यासाठी आईला पाठवले. तर शहाजहानकडे क्षमा मागितली. परिणामी दारा व जहानसारा यांच्या सल्ल्यावरून शहाजहानने औरंगजेबला युध्द बंदीचा आदेश दिला. ३० मार्च, १६५६ रोजी तह झाला. सुलतानाने आपल्या मुलीचे लग्न औरंगजेब पुत्र मोहमदशी करून १ कोटी विवाहाप्रित्यर्थ तसेच युध्द खंडणी दिले. यानंतर युध्दबंदीचा आदेश आल्याने तह केला.

१. सुलतानाने आपल्या मुलीचा विवाह औरंगजेब पुत्र मोहंमद याच्याशी करुन १० लक्ष अर्पण करावे.

२. युध्दखर्च म्हणून १५ लक्ष द्यावे.

३. खंडणीच्या थकबाकी देण्याचे अभिवचन दिले.

४. मीरजुमलाची संपत्ती सर्व परत करण्यात यावी.

**आपली प्रगती तपासा:**

१) सम्राट शहाजहानचे दक्षिण धोरण स्पष्ट करा.

## ४.१० शहाजहानचे वायव्य सरहद्द धोरण: कंदहार विजय (१६३८)

सम्राट जहांगीरच्या काळात खुर्रमच्या बंडाचा फायदा घेऊन इराणच्या शहां अब्बासने कंदहार जिंकून घेतले. शहाजहानने ते पुनः मिळवण्याचा निर्धार केला. कारण भौगोलिक व लष्करीदृष्ट्या ते अतिशय मोक्याचे ठिकाण होते. इराणचा शहा अंतर्गत बंडाळ्या मोडण्यात गुंतले आहे, हे पाहून शहाजहानने कंदहारचा राज्यपाल अलीमर्दानशी गुप्तपणे पत्रव्यवहार केला. पण त्यांनी बेईमानी केली नाही. म्हणून शहाजहानने स्वारी केली. अलीमर्दानने मोगलाविरुध्द फौज मागणी केली. यावेळी १६२९ मध्ये शाह अब्बास मृत्यु पावल्यानंतर नवीन अल्पवयीन शासक सत्तेवर आला. राज्याची सुत्रे ताक्री नावाच्या मंत्र्याच्या हाती होती. त्याने अलीमर्दानवर संशय घेऊन कैद करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे काबूलचा मोगल सुभेदार सैय्यदखान याला पत्र पाठवून कळवले की, कंदहारचा किल्ला मोगलांस देण्यास तयार आहे. १६३८ मध्ये मोगलांच्या स्वाधीन, तो स्वतः मोगलांच्या सेवेत रुजू झाला. शहाजहानने १ लाख बक्षीस, सैन्यात मनसब देऊन, पंजाब व काश्मीरचा सुभेदार

नेमला. त्यानंतर शहाजहान कंदहारच्या तटबंदीसाठी आणि मजबूतीसाठी प्रचंड खर्च केला. कंदहार पुन्हा १६४९ मध्ये गेले.

शहाजहानला मध्य आशियात अपयश येताच पर्शियाचा राजा दुसरा शहा अब्बास याला आनंद झाला. हा पराक्रमी व महत्त्वकांक्षी असून कंदहार जिंकण्याची इच्छा होती. १६४८ मध्ये शहा अब्बास दुसरा त्याने राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. त्याने प्रचंड सैन्यासह कंदहारला वेढा देऊन १६४९ मध्ये जिंकून घेतले. कंदहारचा मोगल किल्लेदार दौलतखान याने शरणागती पत्करली. शहाजहानने कंदहार जिंकून घेण्यासाठी औरंगजेब व सादुल्लाखान ५० हजार सैन्यासह पाठवले. शहाजहन स्वतः काबूलला गेला, कंदहारला वेढा मे, १६४९ मध्ये दिला. इराण सैन्याने तोफखान्याच्या मदतीने मोगलांशी तीन महिने झुंज दिली. शेवटी औरंगजेबने माघार घेतली. सप्टेंबर, १६४९ लाहोरला परतला. त्याने १६५२ मध्ये प्रचंड तयारीनिशी पुन्हा कंदहारला वेढा दिला. दोन महिने लढा पर्शियन सैन्य आणि उझबेग यांनी प्रतिकार केला. ऑगस्ट, १६५२ औरंगजेबने वेढा उठवला. परत आला. औरंगजेबला दक्षिणेत पाठविले. १६५६ मध्ये कंदहार स्वारीचे नेतृत्त्व दाराकडे दिले. दाराला शाह बुलंद इक्बाल असा किताब दिला. प्रथम आसपासच्या प्रदेश उद्ध्वस्त करुन कंदहारला वेढा एप्रिल १६५३ मध्ये दिला त्यात दाराचा पराभव झाला. कंदहार जिंकण्यासाठी १६४९, १६५२, १६५३ हे तीन प्रयत्न केले. १२ कोटी खर्च झाला. शहाजहानला कंदहार स्वारीत प्रचंड नुकसान झाले.

## ४.११ शाहाजहानचे मध्य आशिया धोरण

मध्य आशियात ट्रान्स ऑक्झियाना हा मोगलांचा मुळ प्रदेश. मोगल भारतात स्थिर झाले तरी, त्यांचे लक्ष मुळ मायभूमीवर होते. सर्व मोगल सम्राटाने तसा प्रयत्न केला. ट्रान्स ऑक्झियानाची राजधानी समरकंद, शासक नजर मुहम्मद उजबैग हा होता. त्याने वडील भाऊ इमाम कुलीस बाजूला सारुन गादी मिळवली. नजर मुहम्मद १६३९ मध्ये गादीवर आला. काही सरदार व त्याचा मुलगा अब्दुल अश्रीस (अजीज) याने १६४५ बंड केले. त्यामुळे नजर मोहमदला बाल्ख प्रांतात आश्रय घेतला. ट्रॉन्स आक्सियानान अंतर्गत वादाचा फायदा घेण्यासाठी मध्य आशियाच्या मोहिमेसाठी विशाल सैन्य रवाना केले.

शहाजहानने कनिष्ठ मुलगा मुरादकडे सुत्रे दिले. अलीमर्दान यांना ६० हजार फौजसह १६४६ मध्ये पाठविला. जुलै, १६४६ मध्ये बाल्ख प्रदेशावर हल्ला केला. त्यापूर्वी नजर महंमद व अब्दुल अजीज यांच्यात समेट होऊन, मुहम्मदला बाल्ख व अजीजला बुखारा प्रदेश देण्यात आला. मुरादचे आक्रमण होताच मुहमंद पळून गेला बुल्ख वर सत्ता स्थापन तेथे नाणी पाडली. परंतु हवामानामुळे मुरादची प्रकृती बिघडली. शहाजहानला न कळवता निघून आला. नजर मोहम्मद हा माहे मार्गे पर्शियात (इराण) पळून गेला. शहाजहानने १६४७ मध्ये औरंगजेबची नेमणूक केली. औरंगजेबने मोर्चा बुखाराच्या अब्दुल अजीजकडे वळवला. परंतु ऑक्ससनदीच्या पलीकडे गेला नाही. कारण हवामानामुळे अधिकारी जाण्यास नाखूष होते. औरंगजेबला दिल्लीचे सिंहासन हवे होते. त्यामुळे औरंगजेब १६७४ मध्ये भारतात आला. १६४८ मध्ये पर्शियाचा राजा शहा अब्बास दुसरा याने कंदहार स्वतःला आणि बल्ख नजर मोहमदला दिला.

**अपयशाची कारणे:**

१. ऑक्सस नदीच्या संरक्षणात्मक फळीकडे मोगलांनी पूर्णपणे दुर्लक्ष केले.

२. औरंगजेब गेल्यानंतर बहादूरखान, असलातखान आणि रुस्तुमखान सेनापती नेमण्यात आले. परंतु त्यांना औरंगजेबा इतकी प्रतिष्ठा नव्हती. त्यामुळे पराभव झाला.

३. मध्य आशियातील खडतर जीवन मोगल सैन्याला मानवले नाही.

४. ट्रान्स ऑक्सियाना प्रांत जिंकण्याबाबत शहाजहानला जितकी तळमळ होती तितकी त्याच्या अधिकाऱ्यांमध्ये नव्हती.

५. मोगलांना ट्रान्स - ऑक्झियाना प्रांतात स्थानिक लोकांची सहानुभूती मिळाली नाही.

६. उझबेग व मोगल लोकांच्यात जो वैरभाव होते. त्यामुळे उझबेगीच संपूर्ण देश मोगलांविरुध्द शस्त्र घेऊन उभा राहिला. त्यामुळे अपयश आले.

## ४.१२ वारसा हक्काचा संघर्ष (१६५७-५९)

शहाजहानच्या मुलांनी सिंहासन हस्तगत करण्याची तयारी केली त्यातून युध्दात भीषण रक्तपात झाला. मोगल इतिहासात हे युध्द “वारसा हक्काचे युद्ध" या नावाने ओळखले जाते. शहाजहानला एकूण चार मुले होती. दारा शुकोह सर्वात मोठा असून पंजाबचा व दिल्लीचा सुभेदार होता. तो नेहमी शहाजहानबरोबर राहत. शहाजहानच्या आजार काळात सर्व सूत्र सांभाळली. शहाजहानचाही विचार त्यालाच वारस नेमण्याचा होता. धार्मिकदृष्ट्या उदार असल्यामुळे तो जास्त प्रिय होता. दुसरा मुलगा शाहशुजा बंगाल व ओरिसाचा सुभेदार, त्याचे शिया पंथाकडे जास्त ओढा होता. तिसरा मुलगा औरंगजेब दख्खनचा सुभेदार असून तो कट्टर सुन्नी पंथी व गैर मुस्लीमांचा द्वेष्टा होता. चौथा मुलगा मुराद गुजराथचा सुभेदार होता. धर्माबाबत उदासीन होता. ही एकाच आईची चार मुले पण त्यांच्यात बंधू प्रेमाचा लवलेशही नव्हता. इ.स. १६५७ रोजी शहाजहानने दारास वारस नेमण्याचे जाहीर केले. ही गोष्ट अन्य राजपुत्रांना अमान्य होती. प्रो. शर्मा म्हणतात की, - "या घातक युध्दात ज्या भावांनी भाग घेतला होता त्यांची घोषणा तख्य (सिंहासन) लख्या (वधस्तंभ), राजमुकूट किंवा कफन अशी होती.”

सर्वप्रथम शहाजहानच्या उत्तराधिकारी घोषणेमुळे बंगालमध्ये पहिली प्रतिक्रिया उमटली. सुभेदार शहाजादा शहाशुजाने स्वतःला सम्राट झाल्याचे घोषित केले आणि आग्राकडे सैन्यासह निघाला. दाराने त्याचे परिपत्य करण्यासाठी स्वतःचा मुलगा सुलेमान शिकोह व राजा जयसिंग यांना सैन्यासह पाठवले. बनारसजवळ बहादूरपूर येथे २४ फेब्रुवारी, १६५८ रोजी शुजाचा पराभव झाल्याने बंगालमध्ये पुन्हा पळून गेला.

शहाजहानच्या आजाराची बातमी कळताच, गुजराथमध्ये मुरादखाने स्वतःला सम्राट घोषित केला. नावाचे शिक्केही काढले. नाणी पाडली, खुतबा वाचला. औरंगजेब अतिशय धुर्त, कपटी, कारस्थानी होता, त्याने अत्यंत गुप्तपणे युध्दाची तयारी केली. युरोपीयन सत्तेला, विजापूर, गोवळकोंडा, मराठा इ. खुष ठेवले. उलेमा व आपली बहिण रोशनसारा तर्फे दरबारातील सर्व बातम्या औरंगजेबला मिळत, त्यानंतर मुरादशी संधान जोडले. आपल्याला

फक्त दाराला नष्ट करावयाचे आहे, राजकारभारात रस नाही, असे मुरादला सांगून सैन्य एकत्र करण्याचा सल्ला दिला. उत्तरेकडे सैन्यासह जाताना, आपण आजारी पित्याला भेटण्यास जात आहो, असे जाहीर केले. माळव्यातील नर्मदेजवळ देपालपूर येथे मुराद सैन्यासह औरंगजेबला मिळाला.

मुराद व औरंगजेबचे परिपत्य करण्यासाठी दाराने तयारी केली. शहाजहान यावेळी युध्दास तयार होता परंतु दाराने नकार दिला. दाराने जोधपूर शासक महाराजा जसवंतसिंह व कासिमखानच्या नेतृत्त्वाखाली सैन्य पाठवले. दाराच्या सैन्याशी धरमत येथे युध्द झाले. सैन्याचा पराभव ऐकून दाराने सैन्य जमवून प्रतिकार करण्यासाठी निघाला. २५ मे, १६५८ रोजी सामूगड येथे लढाईत दाराचा पराभव झाला. औरंगजेब  आग्राकडे यमुनेचा पाणी पुरवठा बंद केल्याने शहाजहान औरंगजेबपुढे नमला. आग्रा ताब्यात घेऊन शहाजहानला कैद करून, आग्राच्या किल्ल्यात ठेवले, सर्वश्रेष्ठ सेना नायक म्हणून गाजलेल्या शहाजहानला वयाच्या ६६व्या वर्षी मुलाकडून पराभूत होऊन बंदिस्त अवस्थेत जीवन जगावे लागले.

औरंगजेबने आग्राचा ताबा घेऊन, दिल्लीकडे मोर्चा वळविला. मथुरा येथे मुक्काम असताना मुरादला गाफील अवस्थेत कैद करुन दिल्लीच्या किल्ल्यात ठेवले. पुढे तीन वर्षानंतर ठार मारले. प्रत्यक्ष दिल्लीवर अधिपत्य प्रस्थापित, ३१ जुलै, १६५८ रोजी राज्याभिषेक केला.

दारा दिल्यीवरुन लाहोरच्या दिशेने गेला. कोणीही मदत केली नाही. प्रथम लाहोरला नंतर तो मुलतान कच्छ, काठेवाड असा भटकत राहिला. त्याने सैन्य जमवून औरंगजेबशी अजमेर येथे संघर्ष केला, पण पराभव झाला. त्यानंतर तो सिंधकडे, तेथून तो इराणला जाण्याचा विचार केला. जीवन मलीक नावाच्या बलूची सरदारचा आश्रय घेतला. दाराने शहाजहानच्या काळात त्याला वाचवले. परंतु नीच व विश्वासघातकी जीवन मलीकडे दाराचा घात करुन औरंगजेबकडे सुपूर्द केला. औरंगजेबने दाराला धर्मद्रोही (पाखंडीपणा) आरोप ठेवून दिल्लीत धिंड काढली, नंतर ठार मारले. दारा व मुरादचा निकाल लावल्यानंतर औरंगजेबने शहासुजाकडे लक्ष दिले. ५ जानेवारी, १६५८ रोजी उत्तर प्रदेशातील खजुला ठिकाणच्या युध्दात शुजाचा पराभव झाला. औरंगजेबचा सेनापती मीर जुमलाने पाठलाग केला. शुजा ब्रह्मप्रदेशात आरकांत प्रांतात पळून गेला. तेथे त्याचा वध वन्य जमातीकडून झाला. अशा प्रकारे औरंगजेब युध्दात विजय झाला.

**वारसा युध्द औरंगजेबच्या विजयाची कारणे:**

१. शहाजहानने आजारातून उठल्यानंतर राज्याची सूत्रे न घेतल्याने वारसायुध्द अटळ होते. औरंगजेबाने विशेष तयारी करून दिल्लीकडे यशस्वी कुच सुरु केली.

२. दारापेक्षा औरंगजेब जास्त पराक्रमी, धाडसी होता. मुरादशी हात मिळवणी करुन स्वतःची सैन्यशक्ती वाढविली होती.

३. दाराच्या मुस्लिम सेनापतीना औरंगजेबने लाच देऊन आपल्या जाळ्यात ओढले. कासीमखानासारखे दाराचे विश्वासपात्र सरदार ऐन निर्णायक युद्ध प्रसंगी औरंगजेबाच्या बाजूस वळले.

४. औरंगजेब कट्टर सुन्नी पंथीय असल्याने इस्लामधर्माचा रक्षक म्हणून त्याची प्रतिमा तयार झाली. कट्टर सुन्नीपंथी मुस्लिम सरदाराच्या सदिच्छा त्याच्या बाजूला होत्या. दाराच्या धर्म सहिष्णू धोरणाचे भांडवल करुन त्याने दाराला इस्लामविरोधी ठरविले.

४. सामगडच्या युध्दात दारा हत्तीवरुन घोड्यावर बसला त्यामुळे सैन्यात पळापळ झाली.

**आपली प्रगती तपासा:**

१) वारसा युध्द स्पष्ट करा.

________________________________________________________________

________________________________________________________________

________________________________________________________________

________________________________________________________________

**शहाजहानचा मृत्यु (३१ जानेवारी, १६६६):**

शेवटचे दिवस शारीरिक व मानसिकदृष्ट्या अतिशय कष्टदायक वारसा युध्दात विजयी झालेले औरंगजेबला कैद, राज्याभिषेक बापाच्या हातानीच मुलाने राज्य करण्याची मोगल घराण्याच्या इतिहासातील पहिली घटना होय. शहाजहानची मुलगी जहानारा बेगम अखेरपर्यंत बापाची सेवा, कैदखान्यात शहाजहान वयाच्या ७४ व्या वर्षी ३१ जानेवारी, १६६६ रोजी मरण पावला. ताजमहालमध्ये मुमताज महालच्या शेजारी त्यास चिरसमाधी देण्यात आली.

**शहाजहानच्या शासनाची प्रमुख अंगे – वैशिष्ट्ये:**

शहाजहानने ३० वर्षे राज्य केले, विस्तार केला त्याने एकूण २२ प्रांतात विभाजन केले.

**१) शासनाचे स्वेच्छाचारी स्वरुप**:

अन्य मोगल सम्राटाप्रमाणे शहाजहान सुध्दा निरंकुश व स्वेच्छाचारी शासक, सर्व सता त्याच्या हाती होती, परंतु स्वभावाने उदार असल्याने प्रजा त्याच्या पाठीशी होते.

**२) राज्यकर्मचारी:**

सम्राट शासनाचा प्रमुख सल्लागार मंडळ व नोकर मदतीने राज्यकारभार सुरु केला. वकील (मुख्यप्रधान), दिवाण (बजीर) (अर्थमंत्री), मीरबक्षी सैन्यमंत्री, मुस्तौफी (जमाखर्चाचा हिशेब ठेवणारा), सदरा सदर (धर्मदायप्रमुख) साहिब-ए-तौहीन (राज्य- धानीतील सरकारी नोकरीचे वेतन वाटणारा), खानेसमा (खाजगीचा कारभारी), मुश्रिक महसुल अधिकारी खजाची (कोषाध्यक्ष) वाकयानवीरा (सरकारी कागदपत्राचे निरिक्षण करणारा), दारोगा-ए-किताबखाना (ग्रंथपाल). दारोगा-ए- जरगारखान (जजवादी प्रमुख). कोमबाल इत्यादी प्रमुख राज्यकर्मचारी त्यांच्या राज्यप्रशासनाचे प्रमुख अंगे होती.

**३) प्रांतीय शासनप्रणाली**:

प्रांतीय शासनप्रणाली केंद्रिय स्वरुपाची होती. लाहोर, अजमेर, अकबराबाद, अलाहाबाद, दौलताबाद, बऱ्हाड, खानदेश, माळवा, अहमदाबाद, अवध, बिहार, ओरिसा, बंगाल, मुलताना, उठ्ठा (सिंघ), काबूल, कंदहार, बाल्सन, बदकशान, काश्मीर अशी २२ प्रांत होती. सुभेदार प्रांतीय प्रशासनाचा प्रमुख होता. त्याचे सरकार वरगी, खेड हा विभाग होता.

**४) राज्याचे उत्पन्न**:

राज्याचे प्रमुख उत्पन्न जमीन महसुल होते. नोकरांना रयतेला त्रास देऊ नये असा आदेश, परंतु महसूल अधिकारी कर वसुली करण्यास जबरदस्ती करीत होते. जमिनीला पाणीपुरवठ्यासाठी नवीन कालवे महसुलाचा दर ३३ टक्के वाढवून ५० टक्के केला. सरकारी खजिन्यात ४ कोटींची भर कर वसुलीसाठी ठेकेदार पध्दत करुन जहागिरी प्रथा पुन्हा सुरू केला. ७० टक्के भाग जहागिरीच्या रुपाने वाटण्यत आला.

**५) न्यायव्यवस्था**:

न्यायदानाचे कार्य काजी व मीर, आदील हे अधिकारी करीत. महत्त्वाचे खटले व अपिलांनी सुनावणी कधी कधी स्वतः शहाजहान ती करत. बुधवार हा दिवस याकरिता निर्धारित होता. दंडविधान अत्यंत कठोर होता. साधारण गुन्ह्यासाठी कठोर शिक्षा दिल्या जात. अंगभंग, देहदडाच्या शिक्षा रुढ होत्या. शहरात हे कार्य कोतवाल करीत होते.

**६) सैन्यव्यवस्था:**

सैन्याचे घोडदल, पायदळ, तोफखाना, गजदल, आरमार हे प्रमुख भाग होते. घोडदळ महत्त्वाचे मानले जात. तोफखान्यात डच, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज हेच लोक गोलंदाज म्हणून काम करीत. मोगालंचे आरमार मात्र नावालाच होती. अकबराने सुरू केलेली मनसबदारी पद्धत शहाजहानच्या काळात कार्यरत होती.

**७) दळणवळण:**

मोठमोठ्या रस्त्यांच्याद्वारे केंद्रिय राजधानी व प्रांताचे घनिष्ठ संबंध निर्माण झाले होते. बंगाल ते पेशावर, राजपुतांना ते अहमदाबाद व तेथून दक्षिण भारत व माळवा ते बऱ्हाणपूर असे लांब रस्ते, बाजूला वृक्ष, प्रवासासाठी शेरशहाकाली सराया, राजमार्गाच्या सरंक्षणास उत्तम सेवा दिली जात. शहाजहानच्या राज्यकारभार बाह्यगत जरी संघटित दिसलेला तरी आतून पोखरल्या सारखा होता. अंतर्गत दुष्काळीमुळे सेनेचा -हास होत होता. कर्तव्य दक्षता व आज्ञापालनची भावना सैन्याला नव्हती.

## ४.१३ शहाजहानची कारकींद सुवर्णयुग होती का?

**१) सुवर्णयुग होते** कारण शहाजहानच्या ३० वर्षाच्या काळात देश समृध्द, प्रजा सुखी, शांत, अनेक कलाकारांना आश्रय दिला. धनधान्याचा सुकाळ होता म्हणून शहाजहान कारकदीस सुवर्ण युग म्हणतात. डॉ. बी. पी. सक्सेना, मुरॉड, एल्फिन्स्टन लेनफूल, खाफीखान, बर्निअर इत्यादी सुवर्णयुग मानतात.

**२) शांतता आणि सुव्यवस्था** सुरुवातीस काही बंडे, काही युध्द मोहिमा सोडवल्यास संपूर्ण कारकीर्द शांततेत गेली. राजपूतांनी नेहमी मांडीलत्व स्विकारले. अफगाणीस्थानापासून दक्षिण भारतापर्यंत एकछत्री अमंल होते. साम्राज्यात शांतता नांदत होती. शहाजहान मोठा न्यायप्रिय व प्रजाहित राजा होता. प्रजेच्या कल्याणासाठी कार्य केल्याने लोक सुखी होते. ट्रॅव्हरनियर म्हणतात, - "प्रजेवर आपल्या मुलासारखे प्रेम करत असे." डॉ. शर्मा वर्णन करतात की, " कारकीर्द गौरवशाली व समृध्दीच्या संयुक्त खुणांनी युक्त अशी होती म्हणून त्याला सुवर्ण युग म्हणावे लागले. "

**३) व्यापार व उद्योगधंदे यात प्रगती :**

व्यापार, उद्योगधंदे यांना प्रोत्साहन दिल्यामुळे त्यात वाढ होऊन, देशाच्या समृध्दीत भर पडली. आयात निर्यात व्यापार सुरु असून, रेशमी, सुती कापड, अफू लाख इ. निर्यात असे. त्यामुळे संपत्तीचा ओघ होता. शेतीचे उत्पन्न, इतर कर यामुळे सरकारी उत्पन्नाची वाढ झाली.

**खफीखान** वर्णन करतात की, "जरी विजेता आणि शासक म्हणून अकबर श्रेष्ठ असला. तरी प्रादेशिक आणि आर्थिक व्यवस्था चांगली ठेवण्यात. खातेनिहाय शासनव्यवस्था या दृष्टीने शहाजहाने हिंदुस्थानवर जसे राज्य केले तसे कोणत्या राजाने राज्य केले नाही. त्यामुळे लोक सुखी होते.

**४) साहित्य, कला, बांधकाम:**

सर्वच मध्ययुगीन लेखक व आधुनिक इतिहासकार शहाजहानच्या राजवटीत साहित्य, कला, वाहतुकीची फार प्रगती झाली असे मानतात.

शहाजहानने दिल्लीचा लाल किल्ला, दिवान-ए-आम, दिवाण-ए-खास, जामा मशिद, मोनी, मशिद, ताजमहाल इ. भव्य बांधकाम यासाठी अगणित संपत्ती खर्च केली. त्यावरून वैभवाची कल्पना येते. शहाजहानच्या काळात संगीत, नृत्य, चित्रकला, संगीतकला इ. विकास झाला. याच काळात हिंदी व फारसी भाषातील साहित्याचा विकास झाला. जगन्नाथ पंडित ह्या कवीने रस गंगाधर व गंगालहरी दोन संस्कृत काव्य लिहीली. फारसी भाषेचे कवी - मिर्झा मोहम्मद, अली महम्मद, फारुक हकीम, रुकनुद्दीन इ. संस्कृत भाषेचा महाकवी जगन्नाथ पंडित, हिंदीचे चिंतामणी आणि सुंदर दारु इ. कवी दरबारात होते. डॉ. सक्सेना म्हणतात की, "देशातील शांतता, राजकीय स्थैर्य, समृध्दी आणि सम्राटाच्या विकासाला अधिक प्रोत्साहन मिळाले."

**सुवर्णयुग नव्हते** : व्हि. स्मिथ, एडवर्डस, मॅरेट, डॉ. श्रीवास्तव, पु. ना. ओक इ. शहाजहानच्या कारकिर्दीला सुवर्णयुग मानीत नाहीत.

**शहाजहानचा धर्म वेडेपणा**: शहाजहान कट्टर सुन्नीपंथी असून इतर धर्मीयांचा अतिशय अनुदार होता. काही राजपुतांना अधिकार पद दिली, धर्मसहिष्णू होता म्हणून नव्हे, हिंदूची देवळे उद्ध्वस्त, तीर्थयात्रा कर हिंदू, ख्रिस्त यांना जबरदस्तीने मुसलमान बनवण्याचा प्रयत्न, बहुसंख्य हिंदूचा द्वेष्टा असलेला शहाजहान प्रजेचा पालनकर्ता व न्यायी होता असे म्हणणे विषर्यस्त वाटते. अशा धर्मवेड्या, स्वार्थी, नातेवाईकांचा क्रूर संहार करून गादी

बळकविण्याच्या शहाजहानच्या राजवटीला सुवर्णयुग म्हणता येणार नाही. डॉ. स्मिथ म्हणतात की, "ऐश्वर्य - संपन्नता, साम्राज्य विस्तार, वैभव शांतता, भव्य इमारती इ. गोष्टीकडे लक्ष देतात परंतु शहाजहानचे चारित्र्य पुत्र, भ्राता, पिता, विधुर इ. दृष्टीने अत्यंत दुषित कामकाजात तो निर्दयी, विश्वासघातकी, तत्वहीन होता, लष्करी संघटनाने कौशल्य नव्हते. न्याय देताना तो अमानुष व भावनाहीन होतं. दयेचा स्पर्श ही त्यास झाला नाही."

### २. युध्दाचा धुमाकुळ व अशांतता :

शहाजहानच्या युध्दमोहिमेचा विचार केल्यास त्याच्या काळात शांतता नांदत नव्हती. पु. ना. ओक वर्णन करतात की, शहाजहानने एकंदर ४८ युध्द मोहिमा काढल्या आणि लुटमार व कातळ यांचे सत्र सुरु अशा अवस्थेत त्याच्या कारकिर्दीत प्रजा सुखी होती आणि देशात सुबता व ऐश्वर्य नांदत होते असे म्हणणे पूर्णतः चुकीचे आहे.

### ३. अन्याय करांचा बोझा:

शहाजहानला बांधकामाचा सम्राट म्हटले आहे. त्याने इमारती बांधण्याकरिता प्रजेवर कर लावले. त्यामुळे सर्व सामान्य जनता हैराण झाली. शहाजहानच्या काळात अनेक युद्ध झाली त्याच्या प्रत्येक खर्च प्रजेवर, त्यासाठी अनेक कर आकारले, प्रजेला लुटून त्याने आपली साम्राज्य विस्ताराची तहान भागविली हेच खरे आहे. म्हणून त्याच्या काळास सुवर्ण युग असे म्हणता येणार नाही.

### ४. सदोष शासन व्यवस्था:

शासन व्यवस्था नीट नव्हती, त्याच्या हातातील प्रांताचे सुभेदार स्वतंत्र्य पणे वावरू लागले. प्रांतीय सुभेदार अन्यायी, अत्याचारी आणि महत्त्वाकांक्षी, शेतकऱ्यांची दयनीय अवस्था, प्रजा अबाधित होती. मृतव्यक्तीची संपत्ती शासनाकडे जात. सम्राट इच्छेनुसार कोणालाही उच्च पदावर चढविली अथवा पराभ्रष्ट करीत असे. प्रजेवर राज्य करण्यासाठी अमाप सैन्य ठेवण्यामुळे साम्राज्याचे दिवाळे निघाले. शहाजहानच्या काळात सैन्याचा दर्जा खालावला. चैनी, विलासी भ्रष्ट, कर्तव्य शुन्य संख्येने मोठे असून बेशिस्त, दुर्बल लष्कर होते. त्यामुळे अकार्यक्षम मोगलांच्या बादशाहीच्या ऱ्हासाला कारण ठरले. "शहाजहानच्या काळात मोगलांच्या अवनतीचे बीजारोपण झाले होते असे बऱ्याच इतिहासकाराने वर्णन केले."

**मराठ्यांचा उदय** शहाजहानच्या काळात दक्षिणेत शिवाजीच्या नेतृत्त्वाखाली मराठ्यांचा उदय, मुसलमानी, सेनेला आव्हान दिले. मध्य आशियातील पराभवामुळे लष्करी सामर्थ्य जनाला समजली. मराठ्यांनी संघटित होऊन शिवाजीच्या नेतृत्त्वाखाली अखिल भारतात हिंदू पदपादशाही स्थापन करण्याचा मनसुबा रचला. कोणत्याही लोकप्रिय व सुवर्ण युग समजल्या जाणाऱ्या राजवटीत केंद्रिय शासनाला आव्हान देणाऱ्या राष्ट्रीय शक्तीचा उदय होत नसतो. संपूर्ण देश केंद्रिय सत्तेच्या पाळीला उभा असतो. या दृष्टीने विचार उलट करता शहाजहान कारकीर्द सुवर्ण युग नावास पात्र ठरला. सर्वसाधारण विचार करता सुवर्ण युग म्हणता येणार नाही, कारण आर्थिक समृध्दी फक्त राजपरिवार कुटुंबाची प्रांताला जनतेची नव्हती. उलट अन्याय, अत्याचार होत. अनेक कर हिंदूवर, शहाजहानशी १४ व्या लुईशी तुलना मोगल काळातील सरस राजवट, राज्याचा बोध समृध्द ध्यैर्य, त्याने सर्वांगीण उन्नतीला हातभार लावला.

**आपली प्रगती तपासा:**

१) सम्राट शहाजहानचा काळ सुवर्ण युग होता का ? स्पष्ट करा.

## ४.१४ सारांश

सम्राट अकबराच्या मृत्युनंतर जहांगीर सत्तेवर आला. त्याने १६०५-२७ या काळात राज्यकारभार केला. परंतु प्रत्यक्षात राज्याची सुत्र त्याची पत्नी नूरजहान हिच्या हाती होती. जहांगीरच्या मृत्युनंतर १६२८-५८ या काळात शहाजहानची सत्ता होती, त्याने उत्तर भारत व दक्षिण भारतात साम्राज्य विस्तार केला. त्याच्याच काळात मोगल राजवटीमध्ये वारसा युद्ध होऊन औरंगजेबने सत्ता ताब्यात घेतली.

## ४.१५ प्रश्न

१) जहांगीरच्या काळातील महत्त्वाच्या घटना सांगा.

२) नुरजहानचा उदय-अस्त स्पष्ट करा.

३) शहाजहानचा उत्तरेकडील साम्राज्य विस्तार अधोरेखीत करा.

४) शहाजहानच्या दक्षिण धोरणाचा आढावा घ्या.

५) शहाजहानचा काळ सुवर्ण युग होता का ? स्पष्ट करा.

## ४.१६ संदर्भ


- केतकर संध्या, भारतीय कलेचा इतिहास, ज्योत्स्ना प्रकाशन, पुणे, २०१६.
- वर्मा हरिश्चंद्र, मध्यकालीन भारत (भाग २) (१५४० - १७६१), दिल्ली विश्वविद्यालय, प्रथम आवृत्ती, दिल्ली, २०१७.
- शर्मा सतीशचंद्र, मध्ययुगीन भारत : मोगल साम्राज्य (१५२६ - १७४८), (खंड २), के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१७.
- मेहता जे. एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास (खंड २), आवृत्ती चौथी, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१६.
- मेहता जे. एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास (खंड ३), आवृत्ती तीसरी, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१४.

- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: १, तिसरी आवृत्ती, प्रकाशिका सौ. आर. के. चिटणीस, पुणे, २००३.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: २, दुसरी आवृत्ती, प्रकाशिका सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८७.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: ४, प्रथम आवृत्ती, प्रकाशिका सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८५.
- भिडे गजानन, नलावडे विजय, नाईकनवरे वैजयंती, मध्ययुगीन भारत (सामाजिक, आर्थिक आणि संस्कृतीक इतिहास), फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.
- पवार विश्वनाथ, डॉ. शिंदे, मुघलकालीन भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.


*****

# ५

# मोगल बादशहा औरंगजेब (१६५८-१७०७)

**घटक रचना**

५.० उदिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ औरंगजेब परिचय

५.३ औरंगजेबाचे प्रारंभीचे कार्य

५.४ औरंगजेबाचा उत्तरेकडील साम्राज्य विस्तार

१) आसामवर विजय २) वायव्य सरहद्दीकडील टोळ्यांचे बंड

५.५ औरंगजेबचे दक्षिण धोरण,

अ) दक्षिण धोरणाची कारणे

ब) औरंगजेबचा दक्षिणेतील संघर्ष

१) मोगल मराठा संबंध २) विजापूर जिंकले ३) गोवळकोंडावर विजय

क) दक्षिण धोरणाचे परिणाम

५.६ औरंगजेबचे धार्मिक धोरण.

अ) हिंदुविरोधी धोरण ब) औरंगजेबच्या धार्मिक धोरणाविरोधी प्रतिक्रिया / उठाव

१) जाटांचे बंड २) सतनामी लोकांचे बंड ३) शीखांचा उठाव

५.७ औरंगजेबचे राजपूत धोरण.

१) औरंगजेब- राजपुतांचे प्रारंभीचे संबंध २) मारवाडवर आक्रमण

३) मेवाडच्या स्वातंत्र्य लढ्यात मेवाडचा प्रवेश ४) मारवाडचा स्वातंत्र्य संघर्ष

५) बुंदेलखंडातील उठाव ६) राजपुत्र शहाजादा अकबराचे बंड

५.८ औरंगजेबचा मृत्यु व योग्यता

५.९ मोगल साम्राज्याच्या पतनास औरंगजेब जबाबदार

१) औरंगजेबचे धार्मिक धोरण २) दोषपूर्ण शासन व्यवस्था

३) राजपूत विरोधी धोरण ४) शासनाचे केंद्रीकरण

५) अयोग्य वारस ६) औरंगजेबचे दक्षिण धोरण

७) सांस्कृतिक ८) राज्यकारभारात लाचलुचपत

५.१० मोगल साम्राज्याच्या पतनाची / ऱ्हासाची कारणे.

१) औरंगजेबनंतर अयोग्य सम्राट २) अमीरवर्गाचे अधःपतन

३) महत्त्वाकांक्षी सरदारांचे प्रभुत्व ४) आर्थिक विपन्नावस्था

५) औरंगजेबाचा धार्मिक अत्याचार ६) मोगल सैन्यातील अधःपतन
७) औरंगजेबाची दक्षिण स्वारी ८) मोगल दरबारातील गटबाजी
९) अमीरवर्गाचे चारित्र्यभ्रष्ट (१०) दळणवळणाच्या साधनांचा अभाव
११) मोगल साम्राज्य पोलीस राज्य १२) परकीयांच्या स्वाऱ्या
१३) कौटुंबिक प्रेमाचा अभाव १४) लोकप्रियतेचा अभाव
१५) ईस्ट इंडिया कंपनीचा उत्कर्ष.

५.११ सारांश

५.१३ संदर्भ

## ५.० उद्दिष्टे

१. औरंगजेबचे जीवन व प्रारंभीचे कार्य समजावून घेणे.

२. औरंगजेबचे दक्षिण धोरण आणि त्याच्या परिणांमाची माहिती मिळवणे.

३. औरंगजेबचे धार्मिक धोरणातून झालेल्या उठावाची माहिती सांगणे.

४. मोगल साम्राज्याच्या -हासाची कारणे समजावून घेणे.

## ५.१ प्रस्तावना

औरंगजेबचे बालपण अतिशय कष्टमय होते. वारसा युध्दात विजय प्राप्त करून दिल्लीचे सिंहासन प्राप्त केले. प्रारंभीच्या काळात सहिष्णू धोरण स्वीकारले परंतु नंतर कट्टर सुन्नी पंथ व कुराण ग्रंथानुसार आचारण केले. त्यातून हिंदू विरोधी धार्मिक धोरण अंमलात आणले. परिणामी अनेक राजपुत्र राज्यांशी व मराठ्यांशी संघर्ष करावा लागला. औरंगजेबच्या मृत्युबरोबरच वैभवशाली मोगल साम्राज्याचा -हास झाला. या ऱ्हासास स्वतः औरंगजेब आणि इतर अनेक कारणे जबाबदार होती.

## ५.२ आलमगीर औरंगजेबचा परिचय

मुहिउद्दीन मुहंमद औरंगजेबचा जन्म ३ नोव्हें. १६१८ रोजी उज्जैन जवळ दोहाद या गावी झाला. मुमताजपासून १४ मुले झाली, त्यापैकी ६वा औरंगजेब होता. शहाजहान गादीवर आल्यानंतर औरंगजेबने वयाच्या १०व्या वर्षी शिक्षणाला सुरूवात केली. तो अतिशय हुशार असून, अरबी, फारसी, तुर्की भाषत पारंगत होता. हिंदीचे उत्तमज्ञान होते. धार्मिक विषयात रूची असल्याने कुराण तोंडपाठ होते.

१६३४ मध्ये वयाच्या १६व्या वर्षी मुबारक नावाच्या एका मस्तावलेल्या हातीला वठणीवर आणून, आपल्या शौर्यचे प्रात्यक्षिक दाखविले. या पराक्रमाबद्दल शहाजहानने त्याला 'बहादूर' ही पदवी दिली होती. याच वर्षी १० हजार जात व १४ हजार सवारची मनसब देण्यात आली. १६३५ मध्ये ओरच्छा राजा जौजिहार (जुझारसिंह) बुंदेल याच्या विरुद्ध पाठवले त्यात यश प्राप्त केले.

१६३६-४४ काळात दक्षिणेचा सुभेदार म्हणून नेमणूक झाली. जमीनमहसुल व्यवस्थेत सुधारणा करून उत्पन्न वाढविले. उत्तम सेनापती आणि राज्यकर्ता कुशाल शासन प्रबंधक व कुटनितीज्ञ म्हणून किर्ती संपादन केली. १८ मे १६३७ मध्ये पर्शियन राजघराण्यातील शहानवाझखान यांची मुलगी दिलरसबानू बेगम हिच्याशी औरंगजेबाचा विवाह झाला. घराशी मतभेद झाल्याने १६४५ मध्ये दक्षिणेची सुभेदारी काढून, गुजराथ सुभेदार नेमण्यात आला. १६४७ मध्ये आशिया मोहिमेवर पाठवले. परंतु अपयश आले. १६४८-५२ या काळात मुलतानचा राज्यपाल नेमले. येथून कंदहाराच्या स्वारीवर पाठवले. १६४९ व १६५२ दोन स्वाऱ्या करून कंदहार जिंकू शकला नाही. यामुळे शहाजहान त्याच्या त्या कामगिरीवर असंतुष्ट झाला. त्याने पुन्हा १६५२ मध्ये दक्षिणेचा सुभेदार नेमला. १६५२-५८ या काळात दुसऱ्यांदा दक्षिणेचा सुभेदार झाला. घोवळकोंडा, विजापूर यांच्याशी युद्ध केले. शहाजहान आजारी असल्याची बातमी कळताच, त्याने तह करून उत्तरेकडे गेला.

आग्रा ताब्यात घेऊन शहाजहानला कैद केले. भावांचा पूर्णपणे पाडाव करून १५ मे १६५९ रोजी राज्याभिषेक केला. त्यावेळी "अन्दूर मुझफ्फर मुहीउद्दीन, मुहंमद औरंगजेब बहादूर आलमगीर बादशहा गाझी" असा किताब घेतला. आलमगीर याचा अर्थ जगाचा स्वामी होय. शहाजहानने जी तलवार दिली होती. त्यावर आलमगीर शब्द कोरला होता त्यावरून हा किताब असावा.

## ५.३ औरंगजेबचे प्रारंभीचे कार्य

वारसा युद्धामुळे जी अशांतता निर्माण झाली, त्यावर योग्य नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला, त्याने लहान मोठे एकंदर १४ कर रद्द केले. रहदारी, पानदारी, सरकारी भू-राजस्व कर व कस्टम या शिवाय अन्य कर रद्द केले. हिंदू जनतेवर यात्रा कर, मृत हिंदूंची हाडे व राख गंगेत विसर्जित करण्याचा कर, मुलाच्या जन्मावर लावण्यात आलेला कर इ. अन्यायकारक कर रद्द केले. मुसलमान धर्माप्रमाणे प्रत्येक व्यक्तिने वर्तन ठेवावे. याकरिता खास अधिकारी नेमले. त्याला मोहितासिब असे म्हणत, इस्लामच्या विरूद्ध असलेल्या अनेक रूढी रीतिरिवाज बंद केल्या. पारशीचा नवरोझ सण, भांग, दारू, मादक पदार्थाच्या खरेदी-विक्रीवर, जुगार, वेश्यागमन इ. बंदी घातली, शिया, सुफीपंथी संत, फकीर, शियापंथी खोजा, या सर्व गोष्टीवर लक्ष ठेवणे मोहितासिबाचे कर्तव्य होते. ८० प्रकारचे कर रद्द केले. स्वतः औरंगजेबला भोग विलास व स्वैराचार याचा तिटकारा होता. प्रजापालनासंबंधी, शेती व्यापार उत्कर्ष, न्यायदानात अत्यंत जागरूक होता. पण धार्मिक आत्यंतिक असहिष्णूता व अनुदारता यामुळे अनेक सद्गुणांची माती झाली. राज्यव्यवहार व राजकीय नीती इस्लाम धर्मावरच आधारित असावी, असा त्याचा दुराग्रह होता, तो कट्टर सुन्नी पंथी मुसलमान होता.

हिंदुस्थान हा नास्तिकांचा (काफीर) देश अर्थात दारूल हरब असून त्याने रूपांतर दार-उल-इस्लामध्ये करणे धर्मकर्तव्य होय, अशी औरंगजेबाची धरणा होती.

## ५.४ औरंगजेबचा उत्तरेतील विजय व साम्राज्य विस्तार

### १) आसामवर व कुचबिहार विजय:

वारसा युद्धामुळे कुचुबिहारच्या व आसामच्या सुलतानाने कामरूपचा जिल्हा, गोहारी शहर ताब्यात घेतले. वारसा युद्ध संपल्यानंतर औरंगजेबने १६६० मध्ये मीर जुम्ला या बंगालचा सुभेदार नेमला. कुचबिहार जिंकण्याचा आदेश दिला. १६६१ मध्ये मीर जुमला प्रचंड सैन्यासह कुचबिहारवर स्वारी केली, कुचबिहाराचा राजा प्रेमनारायण यांने प्रतिकार केला. परंतु अपयश आले. मीर जुमलाने तो प्रदेश मोगल साम्राज्याला जोडला.

१६६२ मध्ये मीर जुमला आसाम कडे गेला. आसामवर १३ व्या शतकापासून होम टोळ्यांचे राज्य असून जयध्वज राजाची सत्ता होती. मीर जुमल्याने १३ मार्च १६६२ रोजी ब्रम्हापुत्रा नदीवर अहोमांचा आरमारी पराभव केला. हा विजय तात्पुरता ठरला. कारण पावसाळा सुरू झाल्याने मोगल सैन्याचा बंगालशी संबंध तुटला. अन्न पुरवठा न झाल्याने हजारो सैनिक मरण पावले. अहोमांचे मोगलावर झालेल्या हल्ल्यामुळे अतिशय दगदग झाली. त्यामुळे मीर जुमला १० एप्रिल १६६३ रोजी मरण पावला. त्याच्या जागी बंगाल, आसामचा राज्यपाल म्हणून शाहिस्तेखानाची नेमणूक केली. शाहिस्तेखानाने ब्रम्हापुत्रा खोऱ्यातून पोर्तुगीजांची हकालपट्टी केली, आराकानच्या राजाचा पराभव केला. मोगलांनी आसाम ४वर्ष आपल्या ताब्यात ठेवले. जयध्वजच्या मृत्यूनंतर चक्रध्वज याने मोगलांशी युद्ध सुरू केले, त्याने आसामी वीरांना संघटित करून मोगलापासून गोहारी जिंकून, आसाम मधून मोगलांना हकलून लावले. १६७० पर्यंत सर्व आसाम परत प्राप्त केला.

### २) वायव्य सरहद्दीकडील टोळ्यांचे बंड:

दिल्लीच्या शासकांना वायव्य सीमा ही डोकेदुखी होती. सीमेवरील अफगण, पठाण टोळ्या लुटमार करीत असत. टोळीवाली स्वातंत्र्यप्रेमी युद्धवीर असून आसपास प्रदेशात सदैव जाळपोळ, लुटालुट व कत्तल करून, आपला उदर निर्वाह करत. या मध्ये खटक, आफ्रीदी, यसुफजाई प्रमुख टोळ्या होत्या. व्यापार व्यवस्थित चालावा यासाठी औरंगजेब त्यांना वार्षिक ६लाख रूपये देत असे. पेशावरच्या उत्तरेला स्वात आणि बाजारे जिल्ह्यातील युसुफजाई टोळ्यांचा प्रमुख भागू याने मुहंमद शहा नावाच्या बनावट व्यक्तिला राजा म्हणून जाहीर केले. सिंधू नदी ओलांडून मोगलांच्या हजारा जिल्ह्यावर स्वारी करून अटक, पेशावर प्रांतावरही हल्ले चढवले. जाळपोळ लुटालुट करून विध्वंस केला. औरंगजेबने मीर जुमलाचा मुलगा मुहंमद अमीनखान, कामिलखान, समरेशखान यांना पाठवले. त्याने भागूचा पराभव करून, ऑक्टोबर १६६७ मध्ये पळवून लावले. त्यांनी दहशत निर्माण करून तेथे शांतता निर्माण केली.

१६७२ मध्ये आफ्रीडी (आफ्रीदी) टोळीचा प्रमुख राजा अकमल खान याने बंड केले. खैबर खिंडीजवळील प्रदेशावर आपली सत्ता प्रस्थापित केली. यावेळी मुहंमद अमीनखान अफगाणिस्थानचा सुभेदार होता. त्याने त्याचा बंदोबस्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु मसजिद्द या ठिकाणी पराभव झाला. या विजयामुळे अमीनखानाचा आफ्रीडी टोळ्यांच्या बंडाचा वणवा सरहद प्रदेशात पसरला. खातक (खट्टक) टोळीचा प्रमुख खुशालखान हाही

आफ्रीदी बंडात सामील झाला. कंदहारपासून ते अटकपर्यंतच्या प्रदेशात पठाण टोळ्यांनी धुमाकुळ घालण्यास सुरूवात केली.

औरंगजेबने अफगाणिस्थानचा सुभेदार म्हणून महाबतखानाची नियुक्ती केली. १६७३ मध्ये शुजातखान, राजा जसवंतसिंह यांना पठाणांचा पाडाव करण्यासाठी पाठवले, तरी यश आले नाही. शेवटी स्वतः औरंगजेब जून १६७४ मध्ये पेशावरजवळ आला. त्यापूर्वीच ३ मार्च १६७४ रोजी सेनापती शुजातखान ठार झाला. औरंगजेबने पेशावर व रावडपिंडी यामधील हसन अब्दुल या ठिकाणी तळ दिला. विश्वासघात, फितुरी, लाच, युद्ध इ. मार्गाचा वापर करून दीड वर्षात पठाण टोळ्यांचा पाडाव केला. उईधूरखान या मोगल सेनापतीने पराक्रमाने सार्थ केले. आफ्रीदी टोळ्यात धाक निर्माण केला. डिसेंबर १६७५ पर्यंत सरहद्दीवर शांतता प्रस्थापित करण्यात यश प्राप्त झाले. अमीरखानला काबूलचा राज्यपाल नेमून, औरंगजेब दिल्लीकडे परत आला. औरंगजेब या युद्धात गुंतलेला आहे या संधीचा फायदा घेऊन शिवाजीने कर्नाटक जिंकले.

**आपली प्रगती तपासा:**

१) औरंगजेबने उत्तरेकडील धोरण स्पष्ट करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ५.५ औरंगजेबचे दक्षिण धोरण- १६८०-१७०७

शहाजहानच्या कारकीर्दीत औरंगजेब १६३६-४४ व १६५२-५७ याकाळात दोन वेळा दक्षिणेचा सुभेदार झाला होता. यावेळी विजापूर व गोवळकोंडा जिंकण्याचा प्रयत्न केला. १६५८-८० याकाळात उत्तर भारतात, १६८०-१७०७ या काळात दक्षिणेत त्याचा शासन काळ होता. तो परत उत्तरेला गेलाच नाही.

**अ) दक्षिण धोरणाची कारणे:**

१) १६५८-८० या काळात उत्तर भारतात साम्राज्यविस्तार केला. दक्षिणेत मोगलांचा प्रसार झालेला नव्हता. विजापूर, गोवळकोंडा, शिवाजीचे स्वराज्य ही तीन स्वतंत्र राज्य झालेला नव्हते. ती नष्ट करून दक्षिणेत साम्राज्य विस्तार करावा.

२) औरंगजेब कट्टर सुन्नीपंथी होता तर, विजापूर, गोवळकोंडा हे शिया पंथी होते, ते पर्शियन शहाशी एकनिष्ठ होते. त्यामुळे दक्षिणेत जाऊन त्यांचा बंदोबस्त करावा, यासाठी स्वारी केली.

३) विजापूर, गोवळकोंडा ही राज्ये मोगलंच्या विरोधकांना आश्रय देत होती. वेळोवेळी ते मराठ्यांना मदत करत, मराठ्यांचा नाश करण्यापूर्वी दोन राज्य नष्ट करावी, तसेच राजपुत्र अकबर, दर्गादास राठोड यांनी दक्षिणेत आश्रय घेतला होता. त्यांचे पारिपत्य करण्यासाठी दक्षिण स्वारी केली.

१४) गोवळकोंड्याची अमाप संपत्ती, हिऱ्यांच्या खाणी प्राप्त करण्यासाठी दक्षिणेवर स्वारी केली.

५) उत्तर भारत जिंकल्यानंतर अफाट मोगल सैन्याला गुंतवून ठेवण्यासाठी दक्षिणी भारतात स्वारी केली.

**ब) औरंगजेबचा दक्षिणेतील संघर्षः**

**१) मोगल-मराठा- संबंध (१६५६-८०) :**

१६३६ मध्ये शहाजी भोसले यांनी निजामशाही सोडून विजापूरच्या नोकरीत प्रवेश केला. यावेळी पुणे जहागीर शिवाजीला, शहाजीने दिली. शिवाजीने महाराष्ट्रात हिंदूचे स्वराज्य निर्माण करण्यास सुरूवात केली. तेव्हापासून विजापूर- शिवाजी यांच्यात संघर्ष निर्माण झाला. १६५९ला खानला ठार केले, १६६० सिद्दी जोहरला अपयश आल्याने विजापूरकरांनी शिवाजीच्या स्वराज्यास मान्यता दिली.

शिवाजी-औरंगजेब पहिला संबंध ३० सप्टें. १६५६ रोजी आला. शिवाजीने अहमदनगर आणि जुन्नरवर हल्ला केला. त्यावेळी दक्षिणेचा सुभेदार औरंगजेब होता. त्याने मराठा प्रदेशावर स्वारी करून सुड घेतला. नंतर शिवाजी मोगल यांच्यात १६५७ मध्ये तह झाला. दक्षिणेतील मराठ्यांचा उठाव दडपून टाकण्यास औरंगजेबने शाहिस्तेखानाला पाठवले. शिवाजीने १५ एप्रिल १६६३ रोजी हल्ला केला. जीवावरचे बोटावर निभावून खानाने माघार घेतली. सुरतेवर हल्ला करून १ कोटी रूपयांची लुट केली. २२ जून १६६५ मध्ये मिर्झा राजा जयसिंगाशी पुरंधरचा तह केला. २२ मे १६६६ रोजी आग्र्यात औरंगजेब शिवाजी भेट होऊन कैद केले, कैदेतून सुटका झाल्यानंतर सर्व प्रदेश पुन्हा प्राप्त केला. १६७० मध्ये पुन्हा सुरतेवर हल्ला केला. १६ जून १६७४ मध्ये राज्याभिषेक केला, ४ एप्रिल १६८० रोजी जीजाबाई मरण पावली.

१६८१ राजपुत्र अकबर व राजा दुर्गादास राठोड दक्षिणेत आले. त्यांना संभाजीने आश्रय दिला. त्यामुळे औरंगजेब २३नोव्हें. १६८१ रोजी प्रचंड सैन्यासह बऱ्हाणपूरला आला. चारी दिशेने स्वारी केली परंतु यश नाही. मकरावखान याने संगमेश्वर येथे संभाजी व कवी कलश यांना ११ फेब्रुवारी १६८१ रोजी कैद केले. २१ मार्च १६८१ रोजी संभाजीला ठार मारले. संभाजीच्या वधानंतर राजाराम छत्रपती बनला. धनाजी जाधव, संताजी घोरपडे यांनी गनिमी काव्याने मोगलांना हैराण केले. येसूबाई, शाहूला कैद केल्याने राजाराम जिंजीच्या आश्रयाला गेला. महाराष्ट्रात रामचंद्रपंत, शंकरजी मल्हार, परशुराम, प्रल्हाद रावजी, इ. मंत्र्यांनी, संताजी, धनाजी सेनापतीने मोगलांना सळो की पळो केले. १७०० मध्ये राजाराम सिंहगडावर मरण पावले. ताराबाईने राज्याची सूत्रे हाती घेतली. तिने लढ्याचे नेतृत्व १६९९ ते १७०७ पर्यंत केले. स्वतः औरंगजेबने युद्ध सुरू केले. अनेक किल्ले जिंकण्यात व गमवण्यात तो थकून गेला. आजारी पडल्याने ३१ जाने. १७०६ रोजी अ. नगरला आला. अखेरपर्यंत मराठ्यांवर विजय प्राप्त करू शकला नाही, याचे औरंगजेबाला दुःख झाले.

**२) विजापूर जिंकले १६८६:**

विजापूर सुलतानाने १६५७ चा तह पाळण्यात टाळाटाळ केली. त्याला धडा शिकवण्यासाठी १६६५ मध्ये जयसिंहाला पाठवले. त्याने शिवाजीचा पराभव करून, शिवाजीच्या मदतीने विजापूरवर स्वारी केली. विजापूरकरांना कोणत्याही प्रकारचे सहाय्य मिळून दिले नाही. तरीपण शेवटी मिर्झा जयसिंगचा पराभव झाला. १६७२ मध्ये सिकंदर आदिलशहा नावाचा ४वर्ष वयाचा मुलगा सुलतान झाला. १६७५ मध्ये दक्षिणेचा सुभेदार दिलेरखान याने विजापूर जिंकण्याचा प्रयत्न केला. १६८१ मध्ये औरंगजेब स्वतः दक्षिणेत आला. राजपुत्र आजमकडे विजापूर स्वारीची सुत्रे दिली. त्याने १५ महिने वेढा देऊन, विजय मिळवता आला नाही.

दरम्यान अफगाण सरदार, व दक्षिण भारतातील मुसलमान असे दोन गट निर्माण झाले. त्यामुळे विजापूर राज्यात गोंधळ निर्माण झाला. दक्षिणेचा सुभेदार बहादूरखान याने १६७६ मध्ये विजापूरवर हल्ला चढवला परंतु अपयश आले. यानंतर दक्षिणेचा सुभेदार दिलेरखानाने विजापूरचा मंत्री सिद्दी मसुद याचे मन वळवून विजापूरशी तह केला, मात्र दिलेरखानाने तह केलेला फार काळ टिकला नाही. दिलेरखानाने १६७९ मध्ये विजापूरवर हल्ला करून, प्रदेश उद्ध्वस्त केला. विजापूर जिंकण्यात अपयश आले, १६८० दक्षिणेचा सुभेदार शहाजादा आजमने १५ महिने संघर्ष केला, पण अपयश आले, १३ जुलै १६८६ रोजी औरंगजेब स्वतः विजापूर येथे आला. शेवटी २२ सप्टेंबर १६८६ रोजी विजापूर शरण आले, औरंगजेबने त्याचा मानसन्मान करून, त्याला खान हा किताब बहाल केला. राज्य मोगल साम्राज्यात विलीन करून, सुलतानाला १ लाख वार्षिक पेन्शन देण्यात आली, सिंकदर सुलतान वयाच्या ३२व्या वर्षी साराऱ्याजवळ मरण पावला. त्याच्या इच्छेनुसार त्याचे दफन त्याच्या गुरू शेख फहीमुल्ला यांच्या थडग्याजवळ करण्यात आले. हा शेवटचा विजापूरचा सुलतान होता.

**३) गोवळकोंडा विजय- १६८७:**

गोवळकोंड्याचा शेवटचा राजा अब्दुल हसन हा नालायक आणि चैनी असून, उदार व सहिष्णू शासक होता. त्याच्या राज्याची सुत्र मुख्यमंत्री ब्राम्हण अक्काणा व मादण्णा यांच्याकडे होती. गोवळकोंड्यांच्या सुलतानाने औरंगजेबच्या दरबारातील आपल्या दुताला पत्र लिहिले की "सिंकदर आदिलशहासारख्या एकाकी अनावर हल्ला चढविणाऱ्या औरंगजेबला हलकट, भित्रा म्हणण्यात आले होते." हे पत्र औरंगजेबच्या हातात पडले. औरंगजेबाला म्हणून त्याने युद्ध जाहिर केले.

जुलै १६८५ मध्ये राजपुत्र शाह आलम (बहादूरशह) त्याची नियुक्ती गोवळकोंडा जिंकण्यासाठी केली. नंतर शाहआलम सैन्यसह हैद्राबादकडे जाताना मालखेड जवळ सुलतानाच्या सैन्याशी भेट झाली. शहाआलमने सुलतानाचा सेनापती मुहमंद इब्राहिम याला लाच दिली. ही बातमी समझताच सुलतान अबूल हसन याने गोवळकोंडाचा आश्रय घेतला. मोगलांनी राजधानी हैद्राबाद (भागानगर) जिंकून घेतली. सुलतानने तहाची बोलणी केली. त्यानुसार १) नेहमीच्या खंडणीशिवाय १ कोटी २०लाख खंडणी २) दोन लाख वार्षिक कर द्यावा. ३) मदना (मादण्णा) अक्काण्णा (अक्कारा) यांना नोकरीवरून काढून टाकावे.

सुलतानाने मादण्णा व अक्कण्णा यांना नोकरीतून काढण्यात चाल ढकल केल्याने, जनानखान्यातील बायकांनी दोघांना ठार मारले. विजापूर जिंकल्यानंतर सर्व लक्ष गोवळकोंड्यावर केंद्रीत करून १६८७ रोजी वेढा दिला. राजपुत्र शहाआलमने विरोध केल्याने त्याला तुरुंगात टाकले. औरंगजेबाने तीनदा किल्ल्ला जिंकण्याचा प्रयत्न केला. पण अपयश आले. शेवटी सुलतानचा अफगाण सेवक अब्दूल पाणीला भरपूर लाच देऊन फितूर केले, त्याने किल्ल्याचे दरवाजे उघडले. २ ऑक्टोबर १६८७ रोजी जिंकला. सुलतान अबूल हसनला कैद करून, दौतलाबाद किल्ल्यात ठेवले. त्याला वार्षिक ५० हजार रूपयांची पेन्शन देण्यात आली. अकोटीची लुट या लढाईत प्राप्त झाले.

**क) दक्षिण धोरणाचे परिणाम :**

१) सरकार म्हणतात औरंगजेबाने साम्राज्याची केलेली वाढ ही राजकीय चूक ठरली. दक्षिणेतील विजापूर व गोवळकोंडा ही राज्य म्हणजे मराठ्यांवरचा अंकुश होता. त्यांच्या पतनामुळे मराठे मोकळे झाले. त्यांची शक्ती आटोक्याबाहेर वाढली. मराठ्यांचे पारिपत्य औरंगजेबला शेवटपर्यंत करता आले नाही.

२) औरंगजेब २५ वर्षांहून जास्त काळ उत्तरेस अनुपस्थित होता. त्यामुळे राज्यकारभार अयोग्य व्यक्तीच्या हातात गेला. परिणामी केंद्रसत्ता दुर्बल बनून, उत्तर भारतात शांतता नष्ट झाली.

३) औरंगजेबाच्या धार्मिक धोरणामुळे शिख, राजपूत, बुंदेल इत्यादीनी बंडे केले. सम्राट दक्षिणेत अडकलेला पाहून मोगल साम्राज्याविरूद्ध बंडाची भावना तीव्र झाली. त्यातूनच माळवा, बुंदेलखंड, बिहार इ. प्रदेशात उठाव होऊन ते साम्राज्यातून फुटून बाहेर पडले.

४) पाव शतक मराठ्यांशी सतत संघर्ष सुरू असल्याने या दीर्घ कालावधीत हजारो मोगल सैनिक मारले गेले. जे शिल्लक होते ते उत्तरेत परत जायला उत्सुक होते. मोगल सैन्याचे नैतिक धैर्य खचलेले होते. साम्राज्याचे संरक्षण करू ते शकले नाही.

५) मराठ्यांशी लढण्यासाठी सैन्यात वाढ केली. त्याचा ताण तिजोरीवर पडून ती रिकामी झाली. या सर्व गोष्टीचे दुमरिणाम औरंगजेबाच्या उत्तराधिकाऱ्यांना भोगावे लागले. अखेर मोगल साम्राज्याचे पतन निश्चित ठरले.

**आपली प्रगती तपासा:**

१) औरंगजेबच्या दक्षिण धोरणाची कारणे सांगा.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

## ५.६ औरंगजेबाचे धार्मिक धोरण

औरंगजेब कट्टर सुन्नी पंथी मुसलमान असून, कुराणाप्रमाणे आचार विचाराचे पालन करत असे. धर्मपालन नियंत्रणासाठी मुहतसिब (धर्मनिरिक्षक) अधिकारी नियुक्त केला. इस्लामाच्या विरोधातील रितीरिवाज बंद केले. उदा. भांग, अफु, गांजा, दास इ. मादक पदार्थाच्या सेवनावर बंदी घातली. तसेच संगीत, गायक चित्रकार यांना दरबारातून हाकलून दिले. बादशहाची सुवर्णतुला दान ही हिंदू पद्धत बंद केली, हिंदूपद्धतीप्रमाणे एकमेकांना अभिवादन करण्यावर प्रतिबंध केले. वाढदिवस साजरा करणे, कपाळावर गंध लावणे, प्रजेला झरोक्यातून दर्शन, नाण्यावरील कलमा हा शब्द कोरणे इत्यादी प्रथाबंद केल्या.

धर्म व राजकारण यांचा मेळ घालून राज्यकारभार केला. कुराण ग्रंथाच्या आधारे राज्याची घडी बसविण्याचा प्रयत्न केला. धर्मगुरूच्या सल्ल्याने, धर्मधिष्ठित असलेले बलाढ्य मुसलमानी राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न औरंगजेबाने केला.

### अ) हिंदु विरोधी धोरण:

औरंगजेबने इस्लामला राजधर्म म्हणून मान्यता दिली. औरंगजेबने हिंदू विरूद्ध धर्मयुद्ध (जिहाद) पुकारले. भारत हा काफिरांचा देश (दार उल- हर्ब) असून, कुराणाप्रमाणे त्याला इस्लामचा देश (दार-उल-इस्लाम) बनविणे हे प्रत्येक मुसलमानाचे धर्म कार्य आहे. काफीर हे मुसलमानी राज्याचे नागरिक नसून, ते गुलाम आहे. त्यांना जिवंत राहावयाचे असल्यास, त्यांनी एकतर मुसलमान व्हावे किंवा मुसलमानेतर म्हणून जगण्याच्या मोबदल्यात जिझिया कर द्यावा, अशी औरंगजेबची विचारप्रणाली होती. हिंदूनी मुसलमानांचा आदर करावा. आपल्या धर्माचा प्रसार करू नये, मंदिरे बांधू नये. घोड्यावर बसू नये, सामाजिक व धार्मिक सर्व अधिकार नष्ट केले. हिंदूच्या मंदिरांचा, धार्मिक क्षेत्रचा विध्वंस करावा, अशी औरंगजेबाची प्रांतीय शासकांना सुचना होती.

१) सम्राटाच्या आदेशानुसार बनारसचे जगप्रसिद्ध विश्वनाथ मंदिर, सौराष्ट्रातील सोमनाथ मंदिर यांचा विध्वंस करण्यात येऊन, त्या जागी मशिदी उभारण्यात आल्या. मंदिरात मुद्दाम गाईचा वध करणे, देवांच्या मुर्ती पायदळी तुडवणे, अहमदाबादचे चिंतामणी मंदिरात गोवध करण्यात आले.

२) हिंदूवर जिझिया कर, तिर्थयात्रा कर पुन्हा लादण्यात आला. प्रयागला गंगास्नान केल्याबद्दल कर गोळा केला. सर्व हिंदूकडून सक्तीने जिझिया कर घेतला जात, ४८-२४-१२ रुपये याप्रमाणे वार्षिक कर प्रत्येकीच्या आर्थिक स्थितीनुसार घेतला जात असे,

३) मुसलमान व्यापाऱ्याकडून चुंगीकर घेणे बंद केले. हिंदू व्यापाऱ्यांपासून ५० टक्के कर घेतला.

४) हिंदूना मुसलमान बनवण्यासाठी, औरंगजेबाने अनेक प्रलोभने दाखवली. उदा. जहागीरी, बक्षीस, पैसा, उच्चपद देणे, सुलतान फिरोजशहा तुघलकाप्रमाणे हिंदूंना जबरदस्तीने बाटविण्याचा प्रयोगही त्याने केला. कैदींनी मुस्लीम धर्म स्वीकारला तर,

त्याला मुक्त केले जाई. हिंदूमध्ये संपतीबाबत संघर्ष असल्यास जो मुसलमान धर्म स्वीकारेल त्याला सर्व संपत्तीचा मालक केला जाई.

५) राजपूताशिवाय इतर हिंदूना पालखी, हत्ती, इराणी घोडे, हत्यारे स्वतःजवळ बाळगण्याच्या अधिकारापासून वंचित करण्यात आले.

**ब) औरंगजेबच्या धार्मिक धोरणाविरोधी प्रतिक्रिया / उठाव**

**१) जाटांचे बंड - १६६९-१७०७:**

औरंगजेबच्या धार्मिक धोरणाविरूद्ध सर्व प्रथम जाटांनी उठाव केला. कारण मथुरेचे केशवदेवाचे मंदिर नष्ट केले, हिंदू स्त्रियांवर अत्याचार केला. मथुरेचा उद्धव बैरागी व त्याचा शिष्याना ठार मारले, या घटनामुळे हिंदूच्या स्वधर्म व स्वाभिमानाला जबरदस्त धक्का बसला. १६६९ मध्ये गोकुळच्या नेतृत्वाखाली जाटांनी बंड केले. त्यांनी अब्दूल नबीला ठार मारून, मोगल विरूद्ध बंड केले. त्यांनी सादाबाद परगाणा लुटला, अनेक मोगल फौजांचा पराभव केला. पण निलपन येथे युद्धात गोकुळ हाती सापडला, त्याचे तुकडे केले. त्याच्या कुटुंबियांना व अनुयायांनी जबरदस्तीने मुसलमान बनवण्यात आले.

१६८६ मध्ये राजारामच्या नेतृत्व खाली पुन्हा उठाव झाला. निकोलोस मनूची - सिंकदरा येथील मकबरा फोडून अकबराची हाडे जाळली. परिणामी औरंगजेबने विशाल सैन्य सह त्याचा नातू बिदर बख्त याला पाठवले. त्याने प्रचंड अत्याचार केला. १६८८ मध्ये संघर्षात ठार झाला. राजारामच्या मृत्यूनंतर त्याचा पुतण्या चुडामणी याने नेतृत्व स्विकारले, औरंगजेबच्या शेवटपर्यंत संघर्ष सुरू होता. चुडामणने भरतपूर येथे स्वतंत्र राज्य स्थापन केले. त्यामुळे भरतपूरच्या गादीचा संस्थापक मानला जातो. औरंगजेब त्यांचा निःपात करू शकला नाही. कारण स्वधर्म स्मरणार्थ जाटांनी प्राणपणाने प्रतिकार केला.

**२) सतनामी लोकांचे बंड - १६७२:**

दिल्लीजवळ नारनौल व मेवात प्रदोशात सतनामी जमात असून, ती शांतताप्रिय होती. त्यांची संख्या सुमारे ५ हजार असावी. शेती, व्यापार हा त्यांचा मुख्य धंदा होता. मोगल अत्याचार होत असे. एका साधुशी मोगल सैनिकाचे भांडण झाले. त्यात साधूचा अपमान केला, स्थानिक अधिकाऱ्याची अरेरावीमुळे बंड केले, त्यांना जमिनदारांनी साथ दिली. सतनामी लोक जादूटोणा करतात. त्यामुळे विजयी होतात. यामुळे मोगल सैन्यात भितीचे वातावरण पसरले. शेवटी औरंगजेबने इस्लामी मंत्र लिहिलेली कागद सैन्याच्या आग्रभागी मोगल ध्वजावर लावून सैन्यात आत्मविश्वास निर्माण केला. सुसज्ज तोफखाना सोबत देऊन, राणदाजखानाला सतनामी लोकांवर पाठवले. त्यामुळे २ हजारो सतनामी भातल येथे १६७२ मध्ये शरण आले.

**३) शीखांचा उठावः**

श्री गुरू नानकसाहेब यांनी पंजाबात शीख संप्रदायाची स्थापना केली. १४६९ ते १७०८ पर्यंत शीख संप्रदायात १० गुरू झाले. गुरू नानकनी कर्मकांड करणारे ब्राम्हण, पंडित, कट्टर पंथी मुल्ला मौलवी, मूर्ती पुजेला विरोध केला. प्रामाणिक समतेचा पुरस्कार करून पंजाबात

सामाजिक ऐक्य निर्माण केले. पाचवे गुरू अर्जुनसिंहाने खुसरोला आशीर्वाद दिल्याने जहांगीरने १६०६ ठार मारले. तेव्हापासून शत्रुत्वाला प्रारंभ झाला. शहाजहानच्या काळात गुरू हरगोविंद यांचे तणावपूर्ण संबंध होते. औरंगजेब गादीवर येताच अधिकच संबंध खराब झाले. शिखांचे नववे गुरू तेगबहादूर याने औरंगजेबाच्या धोरणाला विरोध केल्याने त्याला पकडून कैदेत टाकले. इस्लाम धर्म स्वीकारण्याचा आग्रह केला. पण त्याने नकार दिल्याने त्याला ठार मारण्यात आले.

तेगबहादूरचा मुला दहावा गुरु गोविंदसिंह (१६७५-१७०८) आणि शेवटचा गुरू होय. असताना पदावर आला, त्यांनी शीखांना सैनिकी शिक्षणाचा उपदेश करून, शीख अनुयायांची सैनिकी संघटना उभारली. स्थाला "खालसा" नाव दिले. प्रत्येक अनुयायाला त्यांनी नावामागे सिंह हे उपनाव लावण्याचे आदेश दिले. प्रत्येक शीखाला केश, कंगन, कृपाण, कच्छ कड़े हे सातवे पुकार ठेवण्याचा उपदेश केला. मोगलांविरूद्ध धर्मयुद्ध करण्यासाठी शिखा शिवांमध्ये साहस, आत्मविश्वास निर्माण झाला. सैन्य संघटित करून, औरंगजेबाशी युद्ध सुरू केले. मोगल फौजांचा अनेक वेळा पराभव केला. धर्मयुद्धात दोन मुले चार, अन्य दोन मुले पकडून औरंगजेबने त्यांना समोर चिरून ठार मारली. शेवटी गुरूना सामना देणे अशक्य असल्याने, दक्षिण भारताचा आश्रय घेतला. औरंगजेबच्या मृत्युनंतर बहादूरशाहाच्या यादवी युदात भाग घेतला, त्याच्या बरोबर पुन्हा दक्षिणेत गोदावरी काठी आले. पठाणाने गुरू गोविंदसिंहला ठार केले. १७०८ मृत्यूसमयी गुरू पद्धत बंद करून, ग्रंथ साहेबाची कास धरा असा उपदेश दिला. बंदा बैरागीच्या नेतृत्वाखाली संघर्ष सुरू राहिला.

**आपली प्रगती तपासा:**

१) औरंगजेबच्या धार्मिक धोरणाचे वर्णन करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ५.७ औरंगजेब - राजपूत धोरण

अकबराने राजपूत राजांना मांडलिक बनवून, साम्राज्य विस्तारात त्याचे सहाय्य प्राप्त केले. हेच धोरण जहांगीर व शहाजहान यांनी कामय ठेवले, मेवाडचे शिसोदिया, अंबरचे कछवाह, मारवाडचे राठोड व इतर लहान राजपूत राजे मोगल साम्राटाचे मांडलिक असून मोगल साम्राज्याचे आधार स्तंभ होते. कुटील आणि धर्मांध औरंगजेबाला राजपूतांचे राज्ये मोगल साम्राज्यात पूर्णतः विलीन करावयाचे होते. त्यामुळे राजपूत सावध झाले. त्यांनी औरंगजेबशी सर्व शक्तीनिशी लढा देऊन, आपले अस्तित्व कायम ठेवले. औरंगजेबच्या धोरणामुळे राजपुतांशी संघर्ष निर्माण झाला.

**१) औरंगजेब राजपूत प्रारंभी संबंध:**

औरंगजेब त्यावेळी मेवाड राजा राजसिंह राज्य करीत - होता. जयपूरचा राजा रायसिंह (जयसिंग), मारवाडच्या राजा जसवंत सिंह मोगल दरबारातील मोठे मनसबदार होते. त्यांना

वारसा युद्धात त्यानी दाराला पाठींबा दिला. जयसिंहाने शहाजहानचा पराभव केला. तर राजा जसवंतसिंहाने धर्मत (धरमत) मुक्कामी दाराच्या बाजूने औरंगजेबशी युद्ध केले. पण अपयश आले. औरंगजेबने शुजाशी युद्ध केले. तेव्हाही जसवंतसिंहाने औरंगजेबला साथ दिली नाही. दाराचा टिकाव लागत नाही हे ओळखून, जयसिंहाने औरंगजेबची बाजू घेतली. जसवंतसिंहालाही औरंगजेबच्या बाजूला वळवले. दोन शक्तीशाली राजपूत राजे औरंगजेबला मिळाले. औरंगजेब मनापासून त्यांच्या विरोधात होता.

शिवाजीचा बंदोबस्त व विजापूर खालसा करण्यासाठी राजा जयसिंगला पाठवले. त्याने शिवाजीला शरण आणले. विजापूर मिळवण्यात अपयश आले. १६६६ मध्ये बहाणपुर येथे राजा जयसिंह मरण पावला. जोधपुरचा महाराजा जयवंतसिंह धरमतच्या लढाईत दाराच्या बाजूने लढला. याचा सुड म्हणून त्याची नेमणूक अफगाणमध्ये केले. २० डिसेंबर १६५८ मध्ये जमरूद येथे मरण पावला. त्याच्या मृत्यूची बातमी मिळताच, राजपूत राज्ये नष्ट करण्याचे व राजपूत प्रजेला मुसलमानांनी धर्माची दिक्षा दिली.

### २) मारवाडवर आक्रमणः

मारवाडाचा राजा जसवंतसिंह मरण पावल्याची वार्ता समजताच मारवाड राज्याचा घास घेण्याचा डाव रचला. मारवाडचा युवराज पृथ्वीसिंह याला विषारी पखवान देऊन ठार मारले. जसवंतसिंहाचे दोन पुत्र अफगाणीस्तानाच्या मोहिमेत ठार झाले. जसवंतसिंगच्या मृत्यूनंतर ३ आठवड्यानंतर मारवाड जिंकण्यासाठी सैन्य पाठवून १२ एप्रिल १६७९ मारवाड जिंकून घेतले. त्याच दिवशी हिंदू प्रजेवर जिझिया कर लागू केला. जसवंतसिंह मरण पावल्यानंतर त्याच्या दोन राण्या गर्भवती होत्या. अफगाणीस्तानातून परत येताना वाटेत दोघींना दोन पुत्र झाले. एक लवकरच मरण पावला. दुसरा जगला हाच पुढे अजितसिंह नावाने इतिहासात प्रसिद्ध झाला.

अजितसिंह राठोड त्याचा सेनापती दुर्गादास राठोड दिल्लीला गेले. मारवाड राज्याचा उत्तराधिकार अजितसिंहला देण्यात यावी, अशी मागणी साम्राटाकडे केली. औरंगजेबने अट घातली की, अजितसिंहने इस्लाम धर्माची दिक्षा घेतली तर राज्य देण्यात येईल. वीर दुर्गादास मोठ्या हिंमतीने दिल्ली बाहेर पडला. प्रथम अजितसिंह व विधवा राण्या मारवाडमध्ये पोहचल्या. यानंतर स्वातंत्र्याचा लढा सुरू केला. औरंगजेबाने मुलगा अकबर व अजमेरचा फौजदार महबरखानच्या नेतृत्वाखाली फौज पाठवून स्वतः अजमेर येथे तळ दिला. मोगलांनी असंख्य मंदिर उद्ध्वस्त केली. गावे लुटली. पण मारवाड अखेर पर्यंत औरंगजेबला जिंकता आले नाही.

### ३) मारवाडच्या स्वातंत्र्य लढ्यात मेवाडचा प्रवेशः

मेवाडचा राजा राजसिंह मारवाडच्या राणीचा भाऊ होता. आपल्या विधवा बहिणीच्या व संकटग्रस्त भाच्याला मदत करण्यासाठी राजसिंह धावून आला. औरंगजेबने राजसिंहाकडून जिझिया कराची मागणी केली. मारवाडाला मेवाडची मदत करणे अत्यंत गरजेचे होते. कारण मारवाड जिंकले तर, मेवाडची सुरक्षिता धोक्यात येत होती. तेव्हा मदत करून राजसिंहाने राजकीय सुज्ञतेचाही परिचय करून दिला. त्याने चितोडगडाची डागडुजी करून किल्ला

मजबूत बनविला. तसेच देववाडीच्या खिंडीत सैन्य पाठवून मोगलांच्या संभाव्य आक्रमणाच्या प्रतिकाराची पूर्ण तयारी केली.

औरंगजेबने १५७९ मध्ये मेवाडवर आक्रमण केले. मोगलांनी देववाडीची खिंड ताब्यात घेतली. परिणामी राजसिंहाने युद्ध सुरू केले. पण औरंगजेबला अपयश आले. मेवाड मोहीमेचे नेतृत्व अकबराकडून शहाजादा मुअज्जमची नियुक्ती केली. राजसिंहाने प्रतिकार केला. राठोड मेवाड संयुक्तरित्याने मोगलांना जेरीस आणले. अकबराचा पराभव करून राजसिंहाने चितोड जिंकून घेतले. परंतु १ फेब्रु. १६८० राजसिंगाचा पराभव झाला. १ नोव्हेंबर १६८१ रोजी तो मरण पावला. त्याच्यानंतर त्याचा मुलगा जयसिंह मेवाडचा राजा झाला. त्यामुळे मोगलांनी पुन्हा युद्ध सुरू केले,

अकबराने बंड करून दक्षिणेचा आश्रय घेतला. औरंगजेब युद्ध बंद करून दक्षिणेत जाण्याचा विचार केला. त्यामुळे जयसिंहाने त्यांच्याशी तहाची बोलणी २४ जून १६८१ रोजी केली.

१) जयसिंहाला मेवाडचा राजा म्हणून मान्यता दिली.

२) त्याला ५ हजारी मनसबदारी बहाल केली. त्याचा पुत्र भीम याला राजा हा किताब देण्यात आला.

३) जिझिया कराच्या मोबदल्यात राणा राजसिंहने मेवाड राज्यातील मंडळ, पूर आणि बेदनार हे परगणे साम्राटाला द्यावेत.

४) जयसिंहाने खंडणी म्हणून ३लाख रू. मोगलांना द्यावे.

५) चितोडच्या किल्ल्याची डागडुजी करू नये.

६) मारवाडच्या राजपुत्रांना मोगलांविरूद्ध मदत करू नये.

**४) मारवाडचा स्वातंत्र्य संघर्ष :**

मेवाडने मोगलांशी तह करून युद्धातून अंग काढून घेतले. तरीही मारवाड खचून गेले नाही. त्यांनी मोगलांविरूद्ध स्वातंत्र्ययुद्ध सुरूच ठेवले, मारवाडचे स्वातंत्र्ययुद्ध तीन भागात-

१) १६८१-८७ या काळात वीर दुर्गादास शहाजादा अकबराला घेऊन दक्षिणेत गेला. अजितसिंह त्यांच्याबरोबर नसतानाही राजपूत लोकांनी साम्राटाविरुद्ध स्वातंत्र्य युद्ध सुरू केले.

२) १६८७-१७०१ या काळात दुर्गादास राठोड मारवाडमध्ये परत आले. अजितसिंह तरुण झाला, दोघांनी युद्धाचे नेतृत्व करून मोगलांशी झुंज दिली. पण मोगलांना मारवाडमधून घालवता आले नाही.

३) १७०१-०७ या काळात मोगलांवर तीव्र हल्ले चढवून, त्यांना मारवाड बाहेर घालवले. मारवाडचे स्वातंत्र्य परत मिळवले. १७०० मध्ये राजा अजितसिंहाने जोधपूर जिंकून घेतले. स्वतःला मारवाडचा राजा म्हणून घोषित केले. याबरोबरच दुर्गादासाचे स्वप्न

पूर्ण झाले. २४ जून १६८१ पासून दुर्गादासाच्या नेतृत्वाखाली ३० वर्ष लढा सुरू होता.

### ५) बुंदेलखंडातील उठावः

औरंगजेबचा उत्तर भारतातील सर्वात प्रबळ शत्रू म्हणजे बुंदेलखंडातील चंपतरायचा मुलगा छत्रसाल होय. औरंगजेबाच्या धार्मिक धोरणामुळे चंपतरायाने बंड केले. १६६१ मध्ये तो शरण आला. मोगलांचा मनसबदार बनला. त्याचा मुलगा छत्रसाल याने शिवाजीचा आदर्श घेऊन, बुंदेल खंडातून मोगल सत्ता नष्ट करण्याचा प्रयन्त केला. छत्रसाल राजा जयसिंगाबरोबर दक्षिण मोहिमेवर आला. शिवाजीची भेट घेऊन प्रेरणा घेतली. परत आल्यानंतर मोगलांशी स्वातंत्र्य युद्ध केले. सुरूवातीला धमौनी आणि कालीजर जिंकून घेतले. छत्रसालची वाढती शक्ती पाहून औरंगजेबने १७०५ मध्ये तह केला. औरंगजेबच्या मृत्यूनंतर छत्रसालाने स्वातंत्र्य घोषित केले.

### ६) राजपुत्र शाहजादा अकबराचे बंड :

औरंगजेबचा मुलगा राजपुत्र अकबर हा अत्यंत महत्त्वाकांक्षी होता. त्याला औरंगजेबचे धोरण पसंत नव्हते. तो मनाने उदार व सहिष्णू होता. औरंगजेबशी अजिबात पटत नसे. १६८१ पासून स्वतःस गादी मिळविण्यासाठी त्याने कारस्थान रचावयास सुरूवात केली. औरंगजेबने मेवाड व मारवाड राजपूत राजावर स्वारी करण्यासाठी त्याची नेमणूक केली. परंतू त्याला कामगिरीत अपयश आले. औरंगजेबाने त्याची कानउघाडणी केली. राजसिंह व वीर दुर्गादास राठोड यांनी त्याला सम्राटपद धारण करण्यास प्रोत्साहित केले. १६८० मध्ये राणा राजसिंह मरण पावला, त्याचा पुत्र जयसिंह गादीवर आला. १ जानेवारी १६८१ मध्ये औरंगजेब विरुद्ध बंड पुकारून अकबराने स्वतःला सम्राट म्हणून जाहीर केले. दुर्गादासने ३० हजार सैन्यासह अकबराला मदत केली. अकबराने औरंगजेबाविरूद्ध फतवा काढून जाहीर केले की, औरंगजेबने इस्लामी कायद्याची पायमल्ली करून तख्तावरील हक्क गमवला आहे. या फतव्यावर चार प्रतिष्ठीत मुल्ला मौलवींच्या सह्या होत्या. यानंतर राजपूत सैन्यसह अकबराने अजमेर बड केले.

यावेळी औरंगजेबजवळ मोठी फौज नव्हती. त्याने शहाजादा गुडाजगयाळ सैन्यसह मदतीला बोलाविले. तसेच अकबराच्या गोटातील मोगल सरदारांना स्वतःकडे वळवले. तहबरखानने देखील अकबराचा पक्ष सोडला. कारण त्याचे कुटुंबिय अजमेरला होते. त्याची कत्तल करण्याची धमकी औरंगजेबाने दिली. तो औरंगजेबच्या छावणीत येताच त्याला ठार मारले. यानंतर कुटील औरंगजेबाने डाव टाकला. एक बनावट पत्र लिहीले. ते राजपूतांच्या हातात पडेल अशी काळजी घेतली. या पत्रामध्ये लिहिले होते की. मेवाड मधील प्रमुख राजपूत सरदारांचे सैन्य एकत्र येऊन येथेपर्यंत आणण्यात तू कमालीचे चातुर्य दर्शविले. कारण तुझे माझे सैन्य या राजपुतांचा सहज फडशा उडवतील. या पत्रामुळे दुर्गादासला संशय आला दुर्गादास रात्री सैन्यासह गेला. सकाळी फक्त ३५० सैनिक (२.३ हजार सैन्य) शिल्लक राहिले नंतर दुर्गादासाने अकबराला आश्रय दिला.

वीर दुर्गादासाने अकबराला संभाजीची मदत घेण्यास सांगितले. खानदेशातून संभाजीच्या आश्रयात गेले. परंतु सैनिकांनी औरंगजेब विरुद्ध मदत दिली नाही. संभाजीने संरक्षण दिले.

७ वर्षांनी स्वतःचा जीव वाचवण्यासाठी इराणच्या शहाच्या आश्रयाला गेला. तेथेच १७०४ मध्ये मरण पावला. अकबराने औरंगजेबला १७०३ मध्ये एक पत्र लिहिले त्या पत्रात औरंगजेबचा स्वभाव, राज्यकारभार, धोरण इ. सत्य टीका केल्या.

**आपली प्रगती तपासा**

औरंगजेब राजपूत संघर्षांची माहिती सांगा.

___

___

___

___

## ५.८ औरंगजेबाचा मृत्यू - योग्यता

औरंगजेबच्या आयुष्याच्या उत्तरार्धातील २५ वर्ष अतिशय दगदगीत व हालअपेष्टा भोगण्यात गेली. ९० वर्षाच्या वयातही सर्व कार्ये स्वतः करत. २ मार्च १७०७ रोजी अहमदनगर येथे मरण पावला त्याचा मुलगा आजमशहाने दौलताबद जवळीच खुलदाबाद येथे शेख जैन-उल-हक याचा कबरेशेजारी अत्यंत साध्या पद्धतीने दफन विधी केला. त्याच्या अंतिम इच्छेप्रमाणे त्याची कबर अतिशय साधी ठेवण्यात आली. औरंगजेबचे अत्यंत साधे जीवन होते. ललितकालांचा त्याग, कौटुंबिक प्रेमाचा अभाव, स्वभाव संशयी कपटी, हेकेखोर, कारस्थानी, कट्टर अनुयायी, धर्मवेडेपणात अनेक कर, त्यामुळे त्याच्या राजवटीत उठाव झाले. डॉ. श्रीवास्तव यांच्या मते "हिंदू-मुसलमान या दोन जमातीला औरंगजेबाने जितका वैरभाव निर्माण केला. तितका दुसऱ्या कोणत्याच राजाने निर्माण केला नसेल, आधुनिक काळात त्याची तुलना फक्त बॅ. जिनांनी निर्माण केलेल्या वैराशीच करावे लागले."

१) औरंगजेब हा हुकूमशहा होता. त्याने स्वतःकडे सर्व सत्ता केंद्रित केली.

२) औरंगजेब हा स्वतः कितीही हुशार असला तरी, राजकीय परिस्थितीचे ज्ञान वेळी बरोबर नव्हते. तो अतिशय संकुचित मनाचा होता.

३) औरंगजेबाने सुन्नी पंथाचा राजा होण्याचे ध्येय ठेवले. त्यामुळे इतर सर्व लोकांवर त्यांना धार्मिक जुलूम जबरदस्ती केली त्याचा वाईट परिणाम झाला.

४) औरंगजेबाने आपल्या मुलांना राज्यकारभाराची जबाबदारी सांभाळण्याचे शिक्षण दिले नाही. त्यामुळे स्वतःलाच प्रचंड साम्राज्याचा राज्यकारभार पाहावा लागला.

५) औरंगजेब स्वतः अतिशय कार्यक्षम असल्याने त्याला एकाही अधिकाऱ्याचे काम पसंत पडत नसे. तो अतिशय संशयी होता. त्यामुळे अधिकाऱ्यावर त्याचा विश्वास नव्हता.

६) औरंगजेबाने राजपुतांची सहानुभूती गमावली. त्यांच्या मदतीने चांगला राज्यकारभार करता आला असता.

(७) औरंगजेबाने धार्मिक धोरणाने राजपुतांना व हिंदूनांच दुखावले याशिवाय, जाट, शिख, बुंदेल, मराठा याचे शत्रुत्व विकत घेतले.

८) दक्षिणेतील शिया पंथाचा आणि मराठ्यांचा पूर्ण निःपात करण्याचे जे धोरण आखले ती त्याची हिमालयाएवढी चूक झाली.

९) औरंगजेबाने लोकांच्या आर्थिक व सांस्कृतिक विकासाकडे कधीच लक्ष दिले नाही. त्याने ललितकलांवर बंदी घातलेली होती.

१०) सर्वसाधारण जनतेला शांतता आणि सुव्यवस्था पहिली २४वर्षे सोडली तर कधीच दिली नाही. या सर्व कारणामुळे औरंगजेबाला अपयश प्राप्त झाले.

## ५.९ मोगल साम्राज्याच्या पतनास औरंगजेब जबाबदार

बाबराने भारतात मोगल सत्तेचा पाया घातला, हुमायूनच्या अस्थिर काळांतर अकबराने विशाल साम्राज्य प्रस्थापित करून, उत्कृष्ट राज्य व्यवस्थेद्वार शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. यामुळे १५० वर्ष मोगल साम्राज्य टिकले. औरंगजेबाच्या काळात उतरणीला लागले. त्याच्यानंतर लवकर  विनाश झाला. त्याला औरंगजेबाचे धोरण जबाबदार होते.

### १) औरंगजेबाचे धार्मिक धोरण:

कट्टर सुन्नी पंथीय असून शियाचा द्वेष करत असे. हिंदुवर अत्याचार केला. संपूर्ण भारतात इस्लामाचा प्रचार करण्यासाठी त्याने सेनेचा उपयोग केला. हिंदूवर जिझियाकर, तीर्थकर अनेक बंधने लादून, मुसलमान बनवण्यासाठी अनेक उपाय केले. त्याच्या धोरणामुळे प्रांताधिकारी व अधिकाऱ्यांनी मंदिर पाडून मशिदी बांधल्या. औरंगजेबाला विरोध करण्यासाठी मराठा, राजपुत, जाट, शिख यांनी उठाव केले. त्यांच्या बंदोबस्त करता आला नाही. परिणामी साम्राज्यातील शांतता सुव्यवस्था नष्ट होऊन, नाशाला प्रारंभ झाला.

### २) शासनाने केंद्रीकरण :

अकबराच्या काळात केंद्रीय सत्ता अमर्याद असून ही प्रत्यक्षात प्रांतीय सुभेदारांना कारभाराचे स्वातंत्र्य होते. त्यामुळे ते कार्यक्षमतेने कारभार पहात. परिणामी राज्यात शांतता नांदत होती. औरंगजेबने सुभेदाराचे अधिकार काढून, सर्व सत्ता आपल्या हाती केंद्रीत केली. औरंगजेब शक्तिशाली होता तोपर्यंत, शासन व्यवस्थित राहिले. पण त्याच्याविरुद्ध धार्मिक कारणावरून बंड सुरू झाले. तेव्हा औरंगजेबच्या वृद्धापकाळात प्रांतीय सुभेदार बेजबाबदार बनले. प्रांतावरील नियंत्रण शिथिल झाल्याबरोबर दूरवर्ती प्रदेशातील शासक महत्त्वकांक्षी बनले. त्यांनी उठाव केले. परिणामी शासन व्यवस्थेत अकार्यक्षमता निर्माण झाली.

### ३) अयोग्य वारस :

सर्व राजपुत्रांना राज्यकारभाराचे व सैन्य संचालनाचे उत्कृष्ट शिक्षण मिळाले. त्यामुळे कोणीही सम्राट बनला तरी पण, त्यानी राज्य समर्थपणे सांभाळले. स्वतः औरंगजेबला उत्तम शिक्षण मिळाले. राज्यकारभाराचा, सैन्य संचालनाचा अनुभव मिळाला. परंतु औरंगजेबने स्वतःच्या मुलांना व्यवस्थित शिक्षण दिले नाही. तो अतिशय संशयी वृत्तीचा होता. स्वतः औरंगजेबने भावाला ठार करून, पित्याला कैदीत टाकून, राजपद प्राप्त केले होते, मुलेही तसे करतील अशी शंका सतत त्याला भेडसावत असे. त्यामुळे मुलांना नीट

शिक्षण दिले नाही. उलट त्यांच्यावर गुप्तहेर ठेवले, परिणामी राज्यकर्त्याला आवश्यक असणाऱ्या गुणांचा विकास औरंगजेबाच्या मुलात झाला नाही. बहादूरशहा सम्राट झाला पण राज्य चालविण्याची कुवत नव्हती. बहादुरशहाच्या अयोग्यतेमुळे साम्राज्याचे तुकडे पडण्यास सुरूवात झाली.

**४) दोषपूर्ण शासन**:

औरंगजेब उत्तम प्रशासक असून, आपल्या अधिकाऱ्यांवर विश्वास नव्हता, लहान लहान कामे स्वतः करत शासनाच्या प्रत्येक कामासाठी साम्राटाची परवानगी घ्यावी लागत. त्यामुळे अधिकाऱ्यामध्ये स्वतंत्र निर्णय शक्तीचा विकास होऊ शकला नाही. परिणामी कार्यात वारंवार अडथळे निर्माण झाले. त्यामुळे शांतता, सुव्यवस्था नष्ट झाली.

**५) राजपुत विरोधी धोरण**:

अकबराने मोठ्या कुशलतेने राजपुतांना उपयोग करून घेतला, जहांगीर, शहाजहानच्या काळात त्यांनी साथ दिली, औरंगजेबाच्या हिंदुद्वेषापायी राजपूत राज्ये जिंकता आले नाही. मारवाड जसवंतसिंहाच्या मृत्युनंतर त्यांच्या कुटुंबियांना कैद केली. अजितसिंहाला मुसलमान बनवण्याचे प्रयत्न यामुळे राजपूत संतापले. दुर्गादासच्या नेतृत्वाखाली लढा सुरू केला. ज्यांनी आपले रक्त सांडवून साम्राज्याचे संरक्षण केले, तेच राजपूत कट्टर दुष्मन बनले. मारवाडला शेवटपर्यंत जिंकू शकला नाही.

**६) औरंगजेबाने दक्षिण धोरण**:

उत्तर भारतात बंड सुरू असताना, दक्षिण भारत जिंकण्याचा निर्णय पूर्णतः चुकीचा होता. त्याहून मोठी चूक म्हणजे राजधानी सोडून दक्षिणेत येण्याची होती. विजापूर, गोवळकोंडा जिंकून घेण्याची चूक केली, त्याचा फायदा मराठ्यांना आता फक्त एकाच आघाडीवर लढावे लागले, मराठ्याचे छत्रपती बदलले परंतु संघर्षात मात्र खंड पडला नाही. २५ वर्ष दक्षिणेत राहून, सतत सैन्यावर अमाप खर्च केला. राजकोष रिकामा होऊन, व्यापार, उद्योगधंद्यावर परिणाम झाला. आर्थिक पायाच कमजोर झाल्याने जास्त काळ साम्राज्य टिकू शकले नाही. दक्षिणेत त्याची शक्ती, प्रतिष्ठा खर्च झाली.

**७) सांस्कृतिक पतन :**

औरंगजेब इस्लामचा सुन्नी पंथाचा कट्टर अनुयायी होता. शिया विद्वान दरबारात नव्हते. कुराणानुसार ललित कला व धर्मविरोधी असल्याने, चित्रकला, संगीत इ. उन्नती झाली नाही. त्यामुळे सांस्कृतिक पतन झाले. विविध कलांच्या निमित्याने कलावंत, विद्वान दरबारात येतात. तो राज्यपोषणाची संवर्धनार्थ चांगला उपयोग होता. ही परिस्थिती नसल्याने राजकीय पतन अढळ होते.

**८) राज्यकारभारात लाचलुचपत:**

औरंगजेबाने लाचलुचपत किंवा नजरा देऊन, विजय प्राप्त केले. जेव्हा लढून विजय मिळत नसे. तेव्हा तो या पद्धतीचा अवलंब करीत. त्यामुळे राज्यकारभारात लाचलुचपतीचे प्रमाण वाढले. परिणामी राज्याची कार्यक्षमता नष्ट झाली.

**आपली प्रगती तपासा:**

१) मोगल साम्राज्याच्या ऱ्हासास औरंगजेब जबाबदार होता काय? भाष्य करा.

________________________________________________________________

________________________________________________________________

________________________________________________________________

________________________________________________________________

## ५.१० मोगल साम्राज्याच्या पतनाची कारणे

### १) औरंगजेबानंतरचे अयोग्य सम्राट :

सम्राट औरंगजेबानंतर गादीवर आलेले सम्राट कर्तृत्वशुन्य व राज्यकारभार संभाळण्यास नालायक होते. ऐषआराम व विलास यांच्यात मग्न होते. केंद्रीय सत्ता दुबळी बनली. महत्त्वाकांक्षी सरदारांनी राजकारणाची सर्व सुत्रे हाती घेतल्याने सम्राट त्यांच्या हातचे खेळणे बनले.

### २) अमीर वर्गाचे अधःपतन:

ज्यांच्यावर मोगल सत्ता अवलंबून होती, त्या मोगल अमीर वर्गाचे दिवसेंदिवस अधःपतन झाले. तो वर्ग चैनी आणि विलासी बनला. त्यामुळे मोगल सत्ता खिळखिळी झाली.

### ३) महत्त्वाकांक्षी सरदाराचे प्रभुत्व :

काही प्रांताचे मोगल सुभेदार महत्त्वाकांक्षी व शक्तीशाली होते. त्यांनी आपली शक्ती वाढवून, कालांतराने हे सुभेदार सम्राटाला डोईजड झाले. उदा. महाबतखान, मीर-जुमला, सफदर जंग, सैय्यद बंधु, निजाम-उल-मुक्क, नजीबखान रोहिला इ. सरदार कारस्थानी व महत्त्वाकांक्षी असल्याने, पुढे काही स्वतंत्र राज्याचे संस्थापक झाले. त्यामुळे मोगल सत्तेचा ऱ्हास झाला.

### ४) आर्थिक विपन्नावस्था :

शहाजहाच्या काळात साम्राज्याचा उन्नतीचा काळ होता. औरंगजेबच्या २५ वर्ष लढायांनी राज्य दिवाळखोर निघाले. भारतात सर्वत्र अराजकता, धुमाकुळ, युद्धामुळे शेती, व्यापार, उद्योगधंदेची अपरिमित हानी झाली. जनतेवर नानाविध कर लावून राजकोष भरण्याचा प्रयत्न केला. बादशहा व सरदारांच्या विलासांमध्ये खंड पडला नाही. सैनिकांना पगार नाही. प्रबळ लष्कराच्या अभाव असल्याने मोगल सत्तेचा -हास झाला.

### ५) औरंगजेबचा धार्मिक अत्याचार:

औरंगजेबच्या धार्मिक धोरणामुळे हिंदू कट्टर शत्रू बनले. शियापंथीय राज्य नष्ट केली. हिंदूवर अनेक कर लादले. मुसलमान बनवण्यासाठी अनेक सक्तीचे उपाय केले. त्यामुळे औरंगजेबला कोणाचीही मदत झाली नाही.

**६) मोगल सैन्यातील अधःपतन**:

मनसबदारी पद्धतीमुळे आनि मनसबदारांना जहागिर देण्याच्या प्रथेमुळे सैन्यातील मनसबदार स्वतंत्र राजासारखे वागत. दिल्लीच्या गादीच्या नादात बादशहांचे मनसबदारांवरील नियंत्रण सैल झाले. त्यामुळे ते आपल्या मतानुसार वागू लागले. त्यामुळे सैन्याची कार्यक्षमता नष्ट झाली. ज्या बलाढ्य सैन्याच्या बळावर मोगल साम्राज्याचा डोलारा उभा होता. त्याचा आधारच कमकुवत झाला.मनसबदार सैनिकावरील धाक उडाला, शिस्त व कार्यक्षमता नाहीशी झाली.

**७) औरंगजेबाची दक्षिण स्वारी:**

मराठा साम्राज्य नष्ट करण्यासाठी दक्षिणेत २५ वर्षे केला. त्यामुळे उत्तर हिंदूस्थानकडे पूर्णपणे दर्लक्ष झाले. दक्षिणेच्या स्वाऱ्यात प्रचंड हानी झाली. त्यामुळे मोगल साम्राज्य टिकून राहणे अशक्य होते.

**८) मोगल दरबारातील गटबाजी :**

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर दरबारात वैयक्तिक स्वार्थापायी विविध गट निर्माण झाले. त्यामुळे कारस्थान व गटबाजीला ऊत आला. अफगाण, अमीर व भारतीय मुसलमान हा एक गट, दुसरा गट शियापंथी, इराणी अमीरांचा व त्याला हिंदूचे सुद्धा समर्थन प्राप्त झाले. तिसरा गट सुन्नीपंथी असून सत्तेकरिता इराणी व तुराणी यांच्यात संघर्ष असल्याने त्याला मोगल सत्तेचा -हास झाला.

**९) अमीर वर्गाचे चारित्र्य भ्रष्ट**:

मुसलमान अमीर, मुसलमान मध्यवर्ग आणि राज्यकारभारातील इतर प्रतिष्ठीत लोक त्यांच्यात बुद्धीमत्तेचा आणि दूरदृष्टीचा अभाव दिसून येत. त्यामुळे साम्राज्य रसातळाला गेले. मोगल सरदार स्वैराचारी विलासी बनले. सम्राटाप्रमाणे सरदारांच्या पिढ्याही दुर्बल, कर्तव्यशून्य निघाल्यामुळे साम्राज्याच ऱ्हास प्रारंभ झाला.

**१०) दळणवळणाच्या साधनांचा अभाव :**

मोगल साम्राज्य विस्ताराने अतिशय अफाट होते. दिल्लीवरून दूरवर नियंत्रण ठेवणे कठीण होते. मध्ययुगात दळणवळणाच्या साधनांचा अभाव, जलद वाहनाची साधने नव्हती. त्यामुळे बंडाचा बिमोड करण्यास वेळ लागत. बंडखोरांना शिक्षा न झाल्याने साम्राज्यातून स्वतंत्र होत असे. दळणवळणाच्या साधनाचा अभाव असल्याने मोघल सत्तेचा ऱ्हास झाला.

**११) मोगल साम्राज्य पोलीस राज्य होते**:

राजाने लोककल्याणाकडे प्रथम लक्ष दिले पाहिजे, ही कल्पना अस्तित्वात नव्हती. मुक्त पोलीस राज्य होते. त्यामध्ये व्यक्तीच्या विकासाला स्थान नव्हते. परिनामी ज्ञानी जनतेला साम्राज्यबद्दल प्रेम नव्हते.

**१२) परकीयांच्या स्वाऱ्या**:

१७३९ मध्ये नादिरशहाने व त्यानंतर १७४८ मध्ये अहमदशहा अब्दालीने भारतावर स्वाऱ्या केल्या. त्यामुळे साम्राज्याच्या प्रतिष्ठेचा पोकळ डोलारा पूर्णपणे कोसळला. मराठ्यांनीसुद्धा मोगल प्रदेशात स्वाऱ्या करण्यास प्रारंभ केला. या स्वाऱ्यात कोट्यवधी रूपयांची लुट स्वदेशी नेली. असंख्य माणसांच्या कतली केल्या. "नादिरशहाच्या स्वारीच्या वेळीच मोगल साम्राज्यांत अधःपतनाचा परमोच्च बिंदू गाठला होता. अब्दाली व मराठ्यांनी मृतप्राय मोगल साम्राज्यालाच अखेरच धक्का दिला," असे अनेक इतिहासकाराच्या विश्लेषणातून दिसून येते.

**१३) कौटुंबिक प्रेमाचा अभाव :**

मोगल सम्राटांच्या कुटुंबात मानवी भावनेला थारा नव्हता. जहांगिरपासून प्रत्येक शासकाच्या कारकिर्दीत किंवा नंतर गादीकरिता शाही राजपुत्रानी रक्ताचे पट सांडविले. हा अलिखित नियम होता. सहाजिक असे साम्राज्य पतनाच्या गर्तेत जाणे स्वाभाविक होते.

**१४) लोकप्रियतेचा अभाव :**

मोगल लोक है परकीय लोक आहेत, ही भावना भारतीय लोकांच्या मनात होती. सम्राटांनी त्यांची मने आपल्याकडे ओढून घेतली नाहीत. त्यामुळे त्यांचा पाठिंबा सम्राटांना मिळाला नाही. मोगलांनी इस्लामला राजधर्म आणि फारसी भाषेला राज्यभाषा म्हणून मान्यता दिली. त्यामुळे हिंदू प्रजेला त्यांच्याबद्दल कधीही आकर्षण वाटले नाही. अकबर, जहांगीर यांचा अपवाद वगळता अन्य मोगल सम्राटात राष्ट्रीय भावनेचा अभाव होता. त्यामुळे मोगल साम्राज्याचा ऱ्हास झाला.

**१५) ईस्ट इंडिया कंपनीचा उत्कर्ष :**

१६व्या शतकामध्ये व्यापारासाठी कंपनीची स्थापना झाली. कंपनीने भारतातील दुर्बळ राजकीय स्थितीचा फायदा घेऊन, दक्षिण हिंदूस्थान व बंगालमध्ये आपली सत्ता वाढवली. इंग्रजांची लढाऊ जहाजे, शिस्तबद्ध कवायती फौजा, सुधारलेली यंत्रसामग्री, लष्करी डावपेच, कुटिल कारस्थानापुढे भारतीयांचा टिकाव लागू शकला नाही. १७५७च्या प्लासीच्या लढाईमुळे बंगालचा सुपीक प्रांत इंग्रजांच्या ताब्यात आला. ह्यानंतर उत्तरेतर त्यांची सत्ता वाढत जाऊन संपूर्ण देश त्यांनी आपल्या ताब्यात घेतला. त्यामुळे मोगल सत्तेचा शेवट झाला.

**आपली प्रगती तपासा:**

१) औरंगजेबच्या दक्षिण धोरणाची कारणे सांगा.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

## ५.११ सारांश

औरंगजेबने वारसायुद्ध जिंकून दिल्लीची सत्ता ताब्यात घेतली. औरंगजेबने उत्तरेकडे शांतता निर्माण केल्यानंतर दक्षिण धोरण स्विकारले. तो स्वतः १६८१ ते १७०७ या काळात विजापूर, गोवळकोंडा जिंकून घेतले. मराठ्यांशी संघर्ष सुरू केला. परंतु अखेरपर्यंत मराठ्यांना पराभूत करता आले नाही. औरंगजेबच्या धार्मिक धोरणामुळे जाट, सतनामी, शीख लोकांनी उठाव केला. औरंगजेबच्या धोरणामुळे राजसुतांनीही स्वातंत्र्य युद्ध सुरू केले. या युद्धात मारवाड, मेवाड या राज्यानी संघर्ष केला. औरंगजेबला राजपूतांवर निर्णायक विजय मिळवता आला नाही. औरंगजेबच्या मृत्युनंतर मोगल साम्राज्याचा ऱ्हास झाला.

## ५.१२ प्रश्न

१) औरंगजेबच्या दक्षिण धोरणाची कारणे व संघर्ष स्पष्ट करा.

२) औरंगजेबच्या राजपूत धोरणाचे वर्णन करा.

३) मोगल साम्राज्याच्या ऱ्हासाची कारणे सांगा.

## ५.१३ संदर्भ


- केतकर संध्या, भारतीय कलेचा इतिहास, ज्योत्स्ना प्रकाशन, पुणे, २०१६.
- वर्मा हरिश्चंद्र, मध्यकालीन भारत (भाग २) (१५४० - १७६१), दिल्ली विश्वविद्यालय, प्रथम आवृत्ती, दिल्ली, २०१७.
- शर्मा सतीशचंद्र, मध्ययुगीन भारत : मोगल साम्राज्य (१५२६ - १७४८), (खंड २), के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१७.
- मेहता जे. एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास (खंड २), आवृत्ती चौथी, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१६.
- मेहता जे. एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास (खंड ३), आवृत्ती तीसरी, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१४.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: १, तिसरी आवृत्ती, प्रकाशिका सौ. आर. के. चिटणीस, पुणे, २००३.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: २, दुसरी आवृत्ती, प्रकाशिका सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८७.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: ४, प्रथम आवृत्ती, प्रकाशिका सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८५.

- भिडे गजानन, नलावडे विजय, नाईकनवरे वैजयंती, मध्ययुगीन भारत (सामाजिक, आर्थिक आणि संस्कृतीक इतिहास), फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.
- पवार विश्वनाथ, डॉ. शिंदे, मुघलकालीन भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.


*****

# ६

# मोगल प्रशासन व्यवस्था

**घटक रचना**

६.१ उद्दिष्टे

६.१ प्रस्तावना

६.२ मोगलांची केंद्रिय प्रशासन व्यवस्था

१) सम्राट व त्याचे कार्य २) केंद्रिय प्रशासनातील मंत्रीमंडळ

६.३ प्रांतिक प्रशासन व्यवस्था प्रांतिक अधिकारी व त्यांचे कार्य

६.४ स्थानिक प्रशासन व्यवस्था

१) जिल्हा प्रशासन व अधिकारी व त्यांचे कार्य

२) तालुका प्रशासन व अधिकाऱ्यांचे कार्य

३) ग्राम प्रशासन

६.५ मोगल काळातील महसुल व्यवस्था

६.६ मोगल काळातील न्यायव्यवस्था

अ) न्यायालयाचे प्रकार

१) धार्मिक कायदेविषयक न्यायालय

२) सामान्य कायदेविषयक न्यायालय

१) प्रांतीय २) परगाणा ३) ग्रामन्यायदान

३) राजकीय कायदेविषयक न्यायालय

ब) इस्लामी कायदेशास्त्राने मान्यता दिलेले गुन्हे

क) मोगल काळातीळ शिक्षेचे स्वरूप

१) हद २) तझीर ३) किसास ४) तशहीर

४) राजद्रोहाचा गुन्हा व त्याची शिक्षा

इ) मोगल न्यायपद्धतीतील दोष

मोगल काळातील लष्करी प्रशासन

६.७ अ) मोगल सैन्याची रचना

१) कनिष्ठ राजाकडील सैन्य २) मनसबदारांचे सैन्य ३) दाखिली सैन्य ४) अहदी ५) कायम सैन्य

ब) मोगल लष्कराचे विभाग

१) घोडदळ २) हत्तीदल ३) पायदल ४) तोफखाना ५) नौदल ६) किल्ले ७) सुरक्षादल

६.८ मोगल कालीन मनसबदारी पद्धत

अ) मनसबदारी पद्धतीचा उगम

ब) मनसबदारी पद्धतीची वैशिष्ट्ये

१) सैन्यदलाची व्यवस्था २) मनसबदारांच्या श्रेण्या

३) मनसबदारांची नियुक्ती- उच्चाटन ४) मनसबदाराचे वेतन व दर्जा

५) नियमित कर्तव्य व निश्चित पद अनावश्यकता ६) मनसबदारी नागरी व लष्करी सेवेत फरक नव्हता.

७) कुळप्रमुख मनसबदार भंगले जात ८) सैन्य दलांची देखभाल व व्यवस्था ९) मनसबदाराचे सुखी-विलासी जीवन

क) मनसबदारी पद्धतीचे गुण

१) मनसबदारीमुळे मध्ययुगीन लष्करी पद्धतीत सुधारणा

२) देशाची खरी लष्करी फौज उभारण्याचा उत्तममार्ग ३) राजसत्तेशी एकनिष्ठा व श्रद्धेत वाढ ४) स्थानिक बंडखोरांचा बंदोबस्त

ड) मनसबदारीतील दोष

१) खोटी सैन्य भरती २) अविश्वसनीय लष्करी संघटना ३) मनसबदारी वंशपरंपरागत नव्हती. ४) मनसबदारी पद्धतीचा नियमाबाबत सरकारचा निष्काळजीपणा ५) खर्चिक लष्करी पद्धती ६) राष्ट्रीय सैन्याची उभारणी झाली नाही. ७) सैन्य कमकुवत झाले. ८) बंडखोर मनसबदार

६.९ सारांश

६.१० प्रश्न

६.१० संदर्भ

## ६.१ उद्दिष्टे

१. साम्राटाचे अधिकार व त्याच्या मंत्र्यांची माहितीचे विश्लेषण करणे.

२. प्रांतीय प्रशासन व्यवस्था समजावून घेणे.

३. मोगल काळातील लष्कर व न्याय व्यवस्थेची माहिती देणे.

४. मनसबदारीची वैशिष्ट्ये अधोरेखित करणे.

## ६.१ प्रस्तावना

मध्ययुगीन इतिहासामध्ये मोगलांचा कालखंड अतिशय महत्त्वाचा होता. त्यांनी सुमारे पाचशे वर्ष भारतावर राज्य केले, विशाल साम्राज्य, कार्यक्षम प्रशासन यंत्रणा, आर्थिक संपन्नता ही या काळाची वैशिष्ट्ये आहेत. १५२६ ते १७०७ हा काळ अतिशय प्रभावी काळ होता. मोगल साम्राज्याचे प्रशासन हा अभ्यास महत्त्वाचा आहे. मोगल प्रशासनासंदर्भात माहिती देणारी अनेक साधने आहे. अबुलफजलचा ऐने-अकबरी, मुतमदखानचा इक्बालनामा, अब्दुल हमीद लाहोरीचा पादशाहनामा, बदायुनीचा मुन्तखबुल तवारीख, निजामउद्दीनचा तबकात-इ-अकबरी इ. समकालीन ग्रंथाच्या आधारे प्रशासनाचे स्वरूप समजते. दस्तुर उल

आलम सारखे दप्तर आणि मोगल सुभेदारांचा व अन्य अधिकाऱ्यांचा पत्रव्यवहार याच्या आधारे प्रशासनाचे बारकावे लक्षात येतात. मोगल काळात अनेक पाश्चात्य प्रवाशी आले. त्यांनी आपल्या प्रवास वर्णनात अनेक घटना नोंदल्या आहेत. सर थॉमस रो, हॉकीन्स, मनुची, बर्नियर इ. च्या वृत्तांतामधून प्रशासनाची माहिती मिळते. पोर्तुगिज, डच, पत्रव्यवहारातून प्रशासनाची माहिती मिळेत. यदुनाथ सरकार यांच्या मते, "मोगल शासन व्यवस्था म्हणजे हिंदुस्थानच्या भूमीत रुजली गेलेली अरबी व फारसी यांची मिश्र शासनव्यवस्था होय. डॉ. ईश्वरी प्रसाद यांच्या मते "मोगल साम्राज्याची शासन पद्धत मध्ययुगीन काळाच्या अभ्यासासाठी महत्त्वाची आहे. शिवाजी महाराजांनीही सर्वप्रथम महाराष्ट्रात काहीअंशी ह्याच शासन पद्धतीने अनुकरण केले." मोगलांच्या शासन व्यवस्थेवर विदेशी प्रभाव होता. ग्रामीण शासन व कर पद्धती ही भारतीय होती. सैन्य व्यवस्था तुर्की प्रणालीची होती. त्यांचा उत्तराधिकाराचा नियम निश्चत नसल्याने, गादी प्राप्तीसाठी रक्तरंजित संघर्ष होत होते. मोगल प्रशासनाचे तीन विभागात विभाजन केलेले होते. अ) केंद्रिय / मध्यवर्ती प्रशासन ) प्रान्तीय प्रशासन क) स्थानिक प्रशासन

## ६.२ मोगलांची केंद्रिय / मध्यवर्ती प्रशासन व्यवस्था

१) बादशहाचे अधिकार व दिनचर्या, कुराणाच्या वचनाप्रमाणे मुस्लिम राज्यकर्ता हा इस्लामी जनतेचाच शासक असतो. केंद्रिय प्रशासनाचा मुख्य व सर्वेसर्वा होता. त्याचे अधिकार अनियंत्रित व अमर्यादित होते. राज्याचा सर्वोच्च सेनापती व न्यायाधिश होता. राज्यकर्ता जुलमी व धर्माची तमा न बाळगणारा असेल तर त्याला पदच्यूत करत असे. बाबर, हुमायून यांनी इस्लामी राजनितीला अनुसरूनच राज्ययंत्रणा निर्माण केली. परंतु अकबराने सर्व प्रजेचा सम्राट म्हणून मान्य केले होते. अबुल फजलच्या मते, शस्त्रधारणा व राज्यविस्तार हे सर्व राजसिंहासन आणि राजमुकूटाच्या शोभेकरता नसून प्रजापालनासाठी आहे, अशी अकबराची भूमिका होती. शहाजहानच्या काळात सहिष्णू धोरणाला तडा गेला. औरंगजेबच्या काळात पुन्हा कडव्या इस्लामी धोरणाचा शासन व्यवस्थेत अवलंब झाला. मोगल राज्यपद्धतीमध्ये वारसा नियमाचा अभाव होता. त्यामुळे सिंहासन प्राप्तीसाठी अनेक बंड, कट-कारस्थाने, वारसायुद्धे इ. घटना घडल्या होत्या. अकबराचा भाऊ मिर्झा हकीमने सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न केला. जहांगिरने अकबरविरूद्ध तर खुसरो व शहाजहानने जहांगिर विरूद्ध बंड केले. औरंगजेबने राजपदासाठी भावाशी युद्ध केले.

मोगल बादशहांनी खलिफाचे सर्व श्रेष्ठत्व मान्य केले नाही. अकबराने उलेमांचे वर्चस्व मान्य केले नाही. १५७९ मध्ये प्रसिद्ध केलेल्या महजरमध्ये उलेमा त्याचे विचार आपल्यावर लादू शकणार नाहीत, असे अकबराने स्पष्ट केले. मुस्लिम न्यायपंडितांनी लावलेले कायद्याचे अन्वयार्थ आपल्याला बंधनकारक नाहीत, असे अकबराचे मत होते. अबूलफजल, म्हणतो की, राजपद म्हणजे परमेश्वरापासून निर्माण झालेला प्रकाश, सूर्यापासून येणारे किरण आहेत. राजा हा ईश्वरी अंश आहे. ही हिंदूची कल्पना व राजाचे अधिकार ईश्वरीवरदान आहेत, ही युरोपीयन राष्ट्राची कल्पना यांचा संयोग अकबरकालीन मोगल राज्यव्यवस्थेमध्ये दिसतो. मोगल सम्राट सिंहासनारूढ होताना, राज्याभिषेक करून घेत असत. राज्याभिषेक दिवस राजधानीमध्ये साजरा होत असे. फक्त अकबराचा राज्याभिषेक पंजाबमधील गुरुदासपूर येथे झाला. राज्याभिषेकप्रसंगी नवे नाव किंवा बिरूद धारण

करण्याची प्रथा होती, सलीमने जहांगीर, खुर्रमने शहाजहान, औरंगजेबने आलमगीर अशी नावे व बिरूद धारण केले.

**बादशहाची दिनचर्या:**

मोगल सम्राटाची दिनचर्या समकालीन साधनामधून आढळते. झरोकादर्शन, दिवान-इ-आम, घुसलखाना यासाठी बराच वेळ त्यांना द्यावा लागत असे. झरोका दर्शनाची पद्धत अकबराने सुरू केली. आग्रा किंवा दिल्ली येथे सम्राटाचा मुक्काम असेल या ठिकाणी प्रतिदिनी सकाळी बाले किल्ल्याच्या पूर्वेकडील तटाच्या दर्शनी खिडकीमध्ये सम्राट उपस्थित होत असे, त्यावेळी लोकांच्या तक्रारी, अडीअडचणी आणि समस्या समजावून घेत असे. संध्याकाळी झरोक्यातून प्राण्यांच्या झुंजी, दरवेश्यांचे खेळ मनोरंजनाचे प्रकार बादशहा पहात असे. झरोका दर्शनानंतर दिवाण-इ-आम दरबार भरत असे. सम्राटाचा दरबार प्रवेश होते वेळी विशिष्ट प्रकारचे वाद्यसंगीत वाजवत असे. दिवान-इ-आम मध्ये मीर-इ-तुझक अर्ज-इ-मुकर्रर हे अधिकारी दरबाराची व्यवस्था पहात असत. प्रांतिक सुभेदार व इतर अधिकाऱ्यांच्या पत्रांचे वाचन, त्यावर विचार विनिमय होत असे. विशिष्ट प्रसंगी बादशहा नजराणे स्वीकारीत असे. ईद, दसरा हा सण दिवाण-इ-आम मध्ये थाटाने साजरे होत असत. वाढदिवसासारख्या प्रसंगी मोगल सम्राट सुवर्णतुला करीत असे. ही पद्धत हिंदुकडून उचलली होती. तर शुक्रवारी पालखीत बसून बादशहा जामा मशीदीमध्ये प्रार्थनेसाठी जात असे. झरोका दर्शन, वाद्यसंगीत पद्धत औरंगजेबने बंद केली. त्यामुळे तो सकाळच्या वेळीही दिवाण-इ-आम मध्ये व्यतीत करीत असे.

विशिष्ट प्रकारचा आणि विशेष महत्त्वाच्या गोष्टीवर चर्चा करण्यासाठी घुसलखाना हा दरबार होता. दिवाण-इ-आम दरबार बरखास्त झाल्यावर हा दरबार भरत असे. अतिशय गुप्त व गंभीर स्वरूपाच्या प्रश्नावर चर्चा होत असल्यामुळे, महत्त्वाच्या व विश्वासातील अधिकाऱ्यांनाच या दरबारात प्रवेश होता. अनधिकृतपणे एखाद्याने प्रवेश केल्यास त्यास कडक शिक्षा होत असे. घुसलखान्यात प्रवेश करणाऱ्यावर नजर ठेवण्यासाठी एक खास अधिकारी असे. दिवाण-इ-आममध्ये एखाद्या विषयाची चर्चा अपूर्ण राहिली असल्यास व सम्राटाची सहमती असल्यास त्याची चर्चा होत असे. मोहिमेवर जाणाऱ्या लष्करी अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या सूचना या दरबारात दिल्या जात. प्रांतिय सुभेदारांना राजकीय दृष्ट्या महत्त्वाच्या सुचना बादशहा या दरबारातून देत असे. धार्मिक स्वरूपाच्या चर्चा केल्या जात असे. जहांगिरच्या काळात याचे रूपांतर मद्यखान्यामध्ये झाले.

दर बुधवारी सम्राट दिवाण-इ-आम या दरबाराचे रूपांतर न्यायालयात करीत असे. स्वतः श्रेष्ठ न्यायाधीश बनत. न्यायालयाचे अधिकारी महत्त्वाचे खटले सम्राटपुढे चालवत असे. रूढी, संकेत प्रमाणे बादशहा न्यायदान करीत असे. श्री. दिल्लीश्वरी वा जगदीश्वरो म्हणून राजांची स्तुती केली जात असे. सरदारमंडळी राजवाड्या भोवती फेऱ्या मारून सलामी देत असे. त्याला तस्लीम किंवा कुर्निस असे म्हणत. श्री. एस. आर. शर्मा यांनी म्हटले की, "मोगलांनी शासनव्यवस्था अशा तऱ्हेने निर्माण केली होती की, ज्यामुळे ते भारतीय प्रजेचे चाहते बनले. मोगल सम्राटांनी प्रजेशी निकटचा संबंध स्थापण्याचा प्रयत्न केला होता. प्रजेची गाऱ्हाणी ऐकून तिच्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करीत असत. "

**२) केंद्रिय प्रशासनतील मंत्रीमंडळ / अधिकारी:**

केंद्रिय प्रशासनामध्ये सम्राटाला मदत करण्यासाठी व कामकाजसाठी वेगवेगळे अधिकारी नेमलेले होते. सर्व अधिकारी सम्राटाला जबाबदार होते. त्यांचा निर्णय / सल्ला सम्राटाला बंधनकारक नव्हता. केंद्रिय शासनामध्ये ४ ते ६ प्रमुख अधिकारी होते. औरंगजेबच्या वेळी ८ अधिकारी होते. मोन्सर्टच्या मते कधी-कधी सम्राट अधिकाऱ्याच्या निर्णयानुसार आपला निर्णय बदलत असे. परंतु अधिकारी सम्राटाला कोणती बाब मान्य करण्यास तयार करत नसे. मोगल केंद्रिय प्रशासनात नऊ खाती प्रमुख होती. १) राष्ट्रीय उत्पन्न व महसूल २) शाही भावार ३) लष्कराचा खर्च आणि सैन्याचा पगार ४) दिवाणी व फौजदारी कायदा (५) धार्मिक बाबी ६) समाजाची नीतिमता ७) तोफखाना ८) टपाल व्यवस्था ९) चलन. या नऊ खात्यांचा कारभार संभाळण्यासाठी जबाबदार अधिकारी असे. हे अधिकारी लष्करी अंमलदारही असे. मोगल प्रशासनाचा शिल्पकार अकबर हाच मानला जातो. केंद्रीय प्रशासनातील अधिकारी पुढील प्रमाणे-

**१) बजीर किंवा दिवाण**:

मोगल काळातील प्रधानमंत्र्याला वजीर, वकील, वकील-ए-आला किंवा वकील-ए-मुतलक इ. नावाने ओळखले जाते. सम्राटानंतरचा सर्वात महत्त्वाचा अधिकारी असे. तो वित्त महसूल विभागाचा प्रमुख असे महसूल विभागाचा प्रमुख म्हणून त्याला दिवाण ही संज्ञा होती. अकबराच्या काळात पंतप्रधानाला वकील ही संज्ञा होती. अर्थखाते संभाळणाऱ्या अधिकाऱ्याला वजीर म्हटले जात असे. अकबराच्या नंतर त्याला तोच अधिकार प्राप्त झाला. बादशहाच्या वतीने हुकूमनामे काढणे नवीन प्रदेशाची व्यवस्था लावणे, महसूल वसुलीच्या संदर्भात प्रांतीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणे, प्रशासनावर लक्ष ठेवणे व सैनिक मोहिमेत सामिल होणे, जनकल्याणाचे कार्य करणे इ. कामे करावी लागत. बादशहाच्या दरबारात त्यास मान असे. घुसलखात्यातही प्रवेश असे. वजीरासाठी स्वतंत्र कचेरी व स्वतःचा शिक्का होता. वजीराच्या मदतीसाठी अकबराच्या काळात नायब दिवाण पद निर्माण करण्यात आले. पुढे नायब दिवाण ऐवजी दिवाण-इ-खालसा (शाही जमिनीचा अधिकारी) दिवाण-इ-तनखा (पगार अधिकारी) असे दोन अधिकारी दिवाणाला सहाय्यक म्हणून नेमण्यात आले. औरंगजेबच्या मृत्युनंतर दिवाण आपले अधिकार प्रभावीपणे गाजवू लागला,

**२) मीरबक्षी**:

मोगल प्रशासनामध्ये मीरबक्षी हा सैन्यमंत्री होता. मनसबदारांच्या पगारांची पत्रके तयार करणारा व वाटपाची व्यवस्था करणारा अधिकारी होय. त्याचे प्रमुख कार्य सैनिक भरती करणे, त्यांच्या परीक्षा घेणे, सैनिकांची यादी सम्राटाला देणे, घोड्यांची पहाणी करणे, शाही महालाच्या सुरक्षतेसाठी पहारेकरी नियुक्त करणे, युद्धात सैन्याचे नेतृत्व करणे, किल्ल्यांचे रक्षण करणे सैनिकी अधिकाऱ्याचे वेतन देणे, मनसबदारांचे संघटन टिकवणे, कामात कुचराई केल्यास मनसबदाराला समज देणे, युद्ध मोहिमांचा आराखडा तयार करून अधिकाऱ्याकडून घेणे व सम्राटाची मान्यता मिळवणे, सैन्याला सर्वप्रकारची मदत पुरवणे इ. कामे करावी लागत असे. राजधानीच्या बाहेरील सर्व अखबारनवीस / (वार्ताहर), राजधानीतील तोफखान्याचे अधिकारी, गजदलाचे प्रमुख, लढाऊ नौकांचे प्रमुख हे सर्व

मीरबक्षीच्या नियंत्रणाखाली असत. मीरबक्षीला स्वतंत्र कचेरी होती. मोहिमेवर बादशहा असेल तर मीरबक्षीस मोहिमेवर जावे लागत असे.

**३) खान-इ-सामा / खानेसामान / मीर सामान**:

शाही भांडारगाराचा प्रमुख म्हणजे खाने सामा होय. राजवाड्याला लागणाऱ्या सर्व वस्तुची देखभाल व तरतुद करण्याचे काम त्याच्याकडे होते. सम्राटाकडून अमीर-उमरावांना जी बक्षिस दिले जाते त्याची निवड करणे, शाही इमारत, उद्याने, कारखाने, शिकारखाने यावर नियंत्रण ठेवणे, व्यापार-उद्योगधंदे या खात्याचा कारभार सांभाळणे. उत्पादित वस्तूचा प्रचार करून, परदेशी व्यापार वाढवणे, व्यापार वाढीसाठी दळणवळणाच्या सोयी करणे, रस्ते वाहतूक योग्य प्रकारे चालवणे इ. कामे करावी लागत. त्याच्या मदतीसाठी दिवाण-इ-बयुतत नावाचा अधिकारी असे.

**४) सद्र-उस-सूद्र**:

मोगल काळातील न्यायखात्याचा प्रमुख व धर्मार्थ विभागाचा प्रधान होता. त्याला सदरे जहाँ किंवा सदरे कुल असे म्हणतात. हा बादशहाचा मुफ्ती किंवा कायदेपंदित होता. राज्याच्या धार्मिक बाबी त्याच्याकडे होत्या. त्याचे प्रमुख कार्य इस्लामी शिकवणीचा प्रसार करणे, मुस्लिम विद्वान, सुफियो, विद्यार्थ्यांना अनुदान देणे, सम्राट अन्य अधिकाऱ्यांना कुरणाच्या नियमाचे पालन करण्यास लावणे, धर्म, दान संदर्भात सम्राटाला सल्ला देणे, प्रांतीय सदरच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे.

साम्राज्यातील सर्व काझी, मुफ्ती, मुहतसीब आणि जिझिया कर वसूल करणारे अधिकारी यांच्यावर नियंत्रण ठेवणे, न्यायधिशाच्या नेमणूका करणे इनाम जमिन देताना बादशहाला सल्ला देणे, धर्मादाय देणग्या देताना बादशहा सदरशी चर्चा करत असे. अकबराने प्रत्येक प्रांतासाठी स्वतंत्र सदर नेमण्याचा प्रघात सुरू केला. सदरला स्वतंत्र कचेरी होती. तो महत्त्वाच्या खटल्याचा न्याय निवाडा करत असे.

**५) मुहतसीब :**

समाजाच्या नीतितत्वानुसार दर्जा राखण्याचे कार्य मुहतसीब या अधिकाऱ्याला करावे लागत असे. इस्लामी नीतितत्वानुसार मुस्लीम जनतेचे वर्तन असावे, यासाठी हा अधिकारी कार्यतत्पर राहत असे. कुराणाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्याला दंड करत असे. रमजानचे उपवास, ईदची प्रार्थना यावर देखरेख करत असे. दारूचे अड्डे कुंटणखाने यावर धाडी घालून प्रतिबंधात्मक उपाययोजना करत असे. राजधानीच्या शहरातील मशिदी, दर्गे यावर देखरेख करत असे. औरंगजेबच्या काळात नीतिनियमामध्ये कडवेपणा जास्त आला व वाद्यसंगीत निषिद्ध, दाढीचा आकार प्रमाणात असावा, व्यापाऱ्यांवर लक्ष ठेवणे इ. कामे करत असे. डॉ. ए. एल. श्रीवास्तवच्या मते "मुहतसिबचे काम म्हणजे शराब, भांग, मादक द्रव्ये पिणे, जुगार खेळणे यापासून समाजाला रोखणे. तो मुसलमानांना दंड करत असे की, जो इस्लाम धर्माच्या विरोधात विचार करतो. पैंगबरावर अविश्वास दाखवतो आणि पाच वेळा नमाज व रोजाचा त्याग करतो. "

**६) बयुतत**:

मरण पावलेल्या व्यक्तींची स्थावर व जंगम मालमत्ता मोजण्याचे व नोंदपत्रक करण्याचे काम बयुतत हा अधिकारी करत असे. मालमत्तेच्या मोजणीनंतर सरकारची थकबाकी वसुल करून, उरलेली मालमत्ता कायदशीर वारसाकडे सुपूर्त करणे, शाही कारखान्याच्या आवश्यक लागणाऱ्या वस्तू पुरवठा करणे.

**७) मीर आतिश :**

मीरबक्षीच्या नियंत्रणाखाली तोफखान्याची व्यवस्था पहाणारा अधिकारी म्हणजे मीरआतिश होय. तोफखान्याला विशेष महत्त्व असल्याने स्वतंत्र खाते व अधिकारी नेमण्यात आला. राजधानीच्या तटबंदी व बालेकिल्ल्याच्या संरक्षणासाठी तोफांची रचना व व्यवस्था करण्याचे काम करावे लागत असे. महत्त्वाच्या मोहिमांच्या प्रसंगी मीर आतिश हजर असे.

**८) दरोगा-इ-डाक**:

हा टपाल खात्याचा प्रमुख अधिकारी. टपालांची जलदगतीने वाहातूक करण्यासाठी खास नोकरवर्ग नेमण्यात आला होता. वहातूकीसाठी घोड्यांचा उपयोग करण्यात येत असे. विशिष्ट अंतरावर डाकचौक्य स्थापन केलेल्या असे.

**९) मीर बहरी:** महसूल खात्याचा चिटणीस होता.

**१०) मीर-ए-बहर:**

हा जलसेनेचा प्रधान अधिकारी होता. शाही नौकांचे देखभाल करणे, त्याचे प्रमुख कार्य होते.

**११) मुस्तौफी:**

हिशोब तपासणीचे काम करत असत. राज्याच्या उत्पानाचे आय-व्ययचा निरिक्षक होता.

**१२) मीर अर्ज:** बादशहापुढे विनंतीसाठी पाठविणाऱ्या अर्जांचा पाहणी करणारा अधिकारी होय.

**१३) मीर-ए-बर्र:** जंगलाचा अधिकारी होता.

**१४) वाकिया-नवीस:**

हा शाही दरबाराचा वृत्तलेखक होता. हा राज्यातील सर्व बातम्या केंद्र प्रशासनाला अवगत करत होता. मोगल काळातील केंद्रिय प्रशासनाची प्रशंसा करताना फादर मानसरेटने लिहिले आहे की, "बादशहाचे सरकारी अधिकारी आणि न्यायाकडे कार्य विशेष लक्ष होते. तथापि कोणत्याही कर्मचाऱ्यांनी चुका किंवा दुर्व्यवहार करताच त्याला गंभीर शिक्षा दिली जात." मुजूमदार, रायचौधरी यांच्या मते "आधुनिक अर्थाने मोगल प्रशासनामध्ये कोणीही मंत्री नव्हते. मंत्री न म्हणता त्याचा आढावा घेणे आवश्यक आहे. ते संपूर्ण सम्राटाच्या इच्छावर अवलंबून होते. की, त्याचा निर्णय स्वीकारणे की न स्वीकारणे."

**आपली प्रगती तपासा:**

१) मोघलांची केंद्रीय प्रशासन व्यवस्था वर्णन करा.

## ६.३ प्रांतिक शासन व्यवस्था

बाबराने मोगल सत्तेची स्थापना करून, वेळेप्रसंगी सुलतान शाहीच्या काळातील प्रांतिय शासन व्यवस्था कायम ठेवली. हुमायूननेही त्यात कोणताही बदल केला नाही. शेरशहाने प्रांतिक शासनव्यस्थेत चांगले बदल केले. त्याच्या सुरी घराण्याचा शेवट झाल्यावर पुन्हा जुनी प्रांतिक शासन व्यवस्था सुरू करण्यात आली. अकबराने प्रांतिक शासन व्यवस्थेला नवा आकार व दिशा दिली. त्यामध्ये अकबराने राज्य विस्तार वाढवून साम्राज्याचे पंधरा भाग केले. त्यावर प्रांतिक सुभेदर नेमले. अकबराच्या काळात १५, जहांगीराच्या काळात १७, शहाजहानच्या काळात १२ आणि औरंगजेबाच्या काळात २१ प्रांताची संख्या होती. प्रांतीय प्रशासनातील प्रमुख अधिकारी पुढीलप्रमाणे-

**१) सुभेदार** :

उत्तर भारतामध्ये प्रत्येक सुभ्यावर / प्रांतावर स्वतंत्र सुभेदार नेमण्याचे धोरण अकबराने स्वीकारले. ज्या सुभेदाराकडे एकापेक्षा जास्त प्रांत असतील, त्याच्या मदतीसाठी नायब नेमण्यात आला. प्रांताच्या / सुभ्याचा प्रमुख अधिकारी म्हणजे सुभेदार होय. त्याला साहिब-इ-सुमा किंवा नाहीम / नाजिम किंवा सिपहसालर असे म्हणतात. शांतता, सुव्यवस्था राखण्यासाठी जबाबदारी त्याच्यावर होती. तो सम्राटाला प्रत्यक्ष जबाबदार होता. मुलकी व लष्करी दोन्ही प्रकारचे अधिकार त्याला पार पाडावी लागत असे. बंडाचा बिमोड करणे, मांडलिकाकडून खंडणी वसूल करणे, न्यायदान करणे, व्यापार उद्योगाचा विकास करणे, लोकांचे कल्याण करणे, शेतसारा एकत्रीत करणे, इ. कामे त्याला करावी लागत असे. त्यास बादशहाच्या परवानगी शिवाय युद्ध, तह करता येत नसे. तो प्रांतिय राजधानीत डामडौलत राहत असे. त्याच्या कचेरीचे स्वरूप राजवाडयासारखे होते. युरोपीयन प्रवासी लिहितात की, "मोगल सुभेदारांच्या कचेऱ्या युरोपातील राजांच्या दरबारापेक्षा भपकेबाज असत. सुभेदार हा एक मनसबदार होता. डॉ. ए. एल. श्रीवास्तवच्या मते, "सुभेदाराला सुचना दिली जात असे. की सैन्य सुसज्ज ठेवणे संताना मदत व शेतकऱ्यांचे रक्षण करणे, शेतीच्या प्रगतीमध्ये कार्य करणे. त्याचे प्रमुख कार्य म्हणजे आपल्या क्षेत्रातील महसूल गोळा करणे.

**२) दिवाण**:

प्रत्येक प्रांतासाठी दिवाण हा वित्त विभागाचा प्रमुख असे. त्याची नेमणूक केंद्रिय दिवाणाच्या सुचनेनुसार सम्राटाकडून होत असे. केंद्रिय दिवाणाच्या सुचनेनुसार काम करावे लागते. प्रांताचा महसूल गोळा करणे, शेतसारा ठरवणे, तो गोळा करणे, विक्रीवर अबकारी कर, रहदारी कर इ. सरकारी कर गोळा करणे, हिशोब ठेवणे. शेती लागवडी खाली आणणे,

उत्पन्न वाढवणे, तगई कर्जे वसूल करणे, कामचुकार अमीलांना समज देणे, आपल्या काचा अहवाल केंद्रिय दिवाणाला देणे. इ. कामे करावी लागत असे. अनेकवेळा सुभेदार-दिवाण यांच्या वाद होत असे. आर्शदखानाला १६६५ मध्ये काबूलच्या दिवाणपदाबरोबर नायब सुभेदारचे पदही दिले.

**३) बक्षी** :

केंद्रिय मीर बक्षीच्या सुचनेनुसार बादशहाकडून प्रांतिय बक्षीची नेमणूक होत असे. सुभेदाराच्या प्रत्यक्ष वर्चस्वाखाली काम करत असे. प्रांतातील लष्करभरती, शिस्त, पगार वाटप, अश्वदल, पायदळाची पाहणी करणे, इ. त्याला कामे करावी लागत. युद्ध मोहिमावर जाणे. त्याला त्याची माहिती केंद्राला पाठवणे अनिवार्य होते.

**४) दिवाण-इ-बयुतत:**

प्रांतामध्ये सरकारी इमारतींची देखभाल करण्यासाठी दिवाण-इ- बयुतत हा अधिकारी असे. राजरस्ते, शाही इमारती, सार्वजनिक इमारती, सरकारी कचेऱ्या, उद्याने यांची पहाणी करणे, त्यातील दुरूस्ती व नवीन बांधकामाची योजना तयार करणे. इ. कामे दिवाण-इ-बयुततला करावे लागत असे. बादशहाने प्रांताला भेट दिली तर त्याची सरभराई करण्याची जबाबदारी पार पाडावी लागत असे.

**५) सदर व काजी :**

सदर हा धर्म विभागाचा प्रमुख असून, केंद्रिय सदरच्या सुचनेनुसार सम्राटामार्फत त्याची नेमणूक केली जात असे. त्याच्यावर सुभेदार, दिवाण यांचे नियंत्रण नसे. केंद्रिय सदर प्रमाणेच त्याचे कार्य असे. धार्मिक व सार्वजनिक कारणासाठी दान किंवा इनाम दिलेल्या जमिनीची देखभाल करण्याचे काम सदरला करावे लागत. प्रांतीय काझी, व मीर आदिल हे त्यांच्या नियंत्रणाखाली कार्य करीत असे. सदरला स्वतःची कचेरी असे. धार्मिक कारणासाठी जमिनी इनाम देण्याचा अधिकार होता. काजी हा न्याय विभागाचा प्रमुख होता. त्यो कार्य फौजदारी खटल्याचा निर्णय करणे. आपल्या नियंत्रणाखाली काजीच्या कार्याच निरिक्षण करणे.

**(६) कोतवाल**:

प्रांताची राजधानी मोठी व महत्त्वाची शहरे येथील प्रमुख अधिकारी म्हणजे कोतवाल होय. ऐन-अकबरी या ग्रंथामध्ये कोतवालाच्या कार्याचा तपशील दिलेला आहे. त्याची नेमणूक केंद्राकडून होत असे. तो नगराचा प्रमुख पोलिस अधिकारी होता. शहरात शांतता सुरक्षितता राखणे, रात्री दक्षता पथक घेऊन शहरातून फेरफटका मारणे, शहरातील घरे, इमारती यांच्या नोंदी ठेवणे. बाजारातील वजन मापांची पाहाणी करणे, बेवारशी नागरिकांच्या मालमतेची मोजदाद करण्याची व्यवस्था करणे, लहान-मोठ्या गुन्ह्यांची चौकशी करणे. तुरुंगांची व्यवस्था पाहाणे इ. कामे त्याला करावी लागत असे. शहरातील गुप्तहेर त्याच्या नियंत्रणाखाली काम करीत असत. त्याच्यासाठी स्वतंत्र कचेरी असे. हुशार, चाणाक्ष व अनुभवी माणसाची कोतवाल पदावर नेमणूक होत असे. अबुल फजलच्या मते "या पदासाठी

अगदी योग्य व्यक्ती नेमली जात असे ती ताकदवान, हुशार, अनुभवी, क्रियाशील, धूर्त व परोपकारी असे."

**७) वाकिया-नवीस:**

यांच्याकडे प्रांतातील पत्रव्यवहार व गुप्तहेर विभागाची जबाबदारी असे. सर्व शासकीय पत्रव्यवहार तो सांभाळत असे. हेराकडून प्राप्त झालेली माहितीचा अहवाल बादशहाकडे पाठवणे, हेर व बातमीदारांच्या नेमणूका करणे. इत्यादी महत्त्वाचे कार्य त्यास पार पाडावे लागत.

**८) अमील**:

प्रांताचा महसूल वसूल करणारा अधिकारी म्हणजे अमील होय. हाताखालील अधिकाऱ्यांच्या मदतीने सर्व महसूल वसूल करणे. त्याचा हिशोब ठेवणे, पडिक जमिनी लागवडीखाली आणणे, शेतजमिन मोजणी करणे. इ. काम करीत असे. मुकादम व पटवारी हा महसूल अधिकाऱ्यांजवळच्या वह्या तपासण्याचा अधिकार त्याला होता. सर्व कामाचा अहवाल केंद्राकडे महिन्यात पाठवणे, त्यास बंधनकारक होते.

**९) ठाणेदार**:

प्रांतात लष्करी महत्त्वाच्या ठिकाणी ठाणेदार अधिकारी असे. त्याच्यावर बादशहाचे नियंत्रण होते.

बर्नियरच्या मते, प्रांतिय शासक बड़े असून अत्याचारी बनले होते. त्यांच्या विरूद्ध प्रजा तक्रार करू शकत नव्हती. "डॉ.ए.एल. श्रीवास्तव लिहितात की, औरंगजेब कठोर व योग्य शासक होता तरीपण, प्रांतिय शासन व्यवस्था अस्तव्यस्त होती. कारण २५ वर्ष तो दक्षिण भारतात लढत होता. त्यामुळे मध्यवर्ती शासन व्यवस्था कमजोर बनली होती.'

**आपली प्रगती तपासा:**

१) मोगल काळातील प्रांतीय प्रशासन नमुद करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ६.४ स्थानिक प्रशासन व्यवस्था

मोगल काळात स्थानिक प्रशासन व्यवस्थेमध्ये सरकार (जिल्हा) तहसील (परगण) आणि मौजा (ग्राम) हे तीन विभाग येतात. त्या प्रत्येक विभागावर स्वतंत्र अधिकारी असत.

**अ) सरकार किंवा जिल्हा प्रशासन:**

प्रांताचे विभाजन जिल्हा किंवा सरकारमध्ये केलेले होते. अकबराच्या काळात १०५ जिल्हे होते. शिकदार, अमलगुजार, वितिकची, पोतदार इ. अधिकारी होते.

**१) शिकदार किंवा फौजदार**:

हा जिल्ह्याचा प्रमुख अधिकारी असे, त्यास जिल्हाधिकारी म्हणत. प्रांतिक सुभेदाराचा महत्त्वाचा सहाय्यक होता. जिल्ह्यामध्ये शांतता व सुरक्षितता राखणे, सम्राटाचे आदेश लागू करणे, सारा वसुलीसाठी मदत करणे. इ. कामे करीत असे. चोर, दरोडेखोर, लुटारू व बंडखोर यांचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी त्याच्याकडे होती. त्याच्या जवळ सैन्याची छोटीशी तुकडी असे. रस्त्यांची पाहणी करून दुरूस्ती करणे. जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणांना अचानक भेटी देऊन पाहणी करणे. अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणे.

**२) अंमलगुजार :**

जिल्ह्यातील महत्त्वाचा दुसरा अधिकारी होय. तो अर्थ विभागाचा प्रमुख होता. जमीन महसूल गोळा करणे, शेतीस उत्तेजन देण, जिल्ह्याचा जमाखर्चाचा हिशेब ठेवणे, त्याचा अहवाल प्रांतिक दिवाणाकडे पाठवणे इ. कामे करावी लागत असे. राज्याचे सरकारी उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न करणे. दुष्काळ व इतर नैसर्गिक आपत्तीत तो शेतकऱ्यांना "तनवी" कर्ज शासनामार्फत देत असे.

**३) वितिकची / बितिक्ती**:

वितिकची म्हणजे लेखपाल होय. तो जिल्हा ऑफिसचा सुपरिटेंडच होता. जिल्ह्याचे दप्तर सांभाळण्याचे त्याचे काम होते, अंमलगुजार मदत करणे. जिल्ह्यातील पटवारी, कानुनगो, मुकादम, करगोळा करणारे अधिकारी यांची नोकरी विषयक नोंदवही ठेवून त्याच्या कामावर लक्ष ठेवणे, त्यांचे पगार देणे.

**४) पोतदर (खजिनदार) :**

हा जिल्ह्यातील ट्रेझरी ऑफिसर (कोषाधिकारी) होता. तो अंमलगुजारच्या आज्ञेप्रमाणे काम करीत असे. अंमलगुजार व्यक्तीशः सरकारी तिजोरीला जबाबदार असत. या तिजोरीच्या दोन चाव्या असत. एक पोतदाराकडे व दुसरी अंमल गुजाराकडे असे. पोतदार आवश्यक लागणारा पैसा ठेवून, बाकीचा सर्व पैसा केंद्रसरकाराकडे पाठवून देत असे. शेतकऱ्यांकडून शेतसारा जमा जरून, त्यांना पावती देणे व शेती संबंधीच्या सर्व नोंदी ठेवण्याचे काम करत असे. आवक व खर्चाचे तपशील यांची नोंद ठेवणे. त्याच्या मदतीसाठी अनेक छोटे-छोटे अधिकारी होते.

**ब) परगणा किंवा महाल (तालुका) प्रशासन**:

जिल्ह्याचे विभाजन तालुक्यामध्ये केले जात असे. एका जिल्ह्यात ४५ तालुके असत. प्रत्येक तालुक्यात जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्या प्रमाणेच अधिकारी नेमलेले होते. ते अधिकारी म्हणजे शिकदार (तहसीलदार), अमील, पोतदार, कानूनगो इ. अधिकारी होते.

१) **शिकदार (तहसीलदार):** तहसीलदार मुख्य अधिकारी असे. जिल्ह्यातील फौजदाराप्रमाणे त्याचे सर्व कार्य तालुक्यात असे.

२) **अमील** तालुक्याच्या महसूल विभागाचा प्रमुख होता. शेतसारा ठरवणे, वसूल करणे, कामकाजाची तपासणी व पाहणी करणे. कर न देणाऱ्याला दंड ठरवणे. दिवाणी न्यायालयाचे कामकाज पहाणे.

३) **पोतदार** हा तालुक्याचा खजिनदार असे. वसूल झालेला महसूल व्यवस्थीत ठेवणे, तालुक्याचा खजिना संभाळणे.

४) **कानूनगो** हा पटवारीचा प्रमुख होता. त्यांचे कार्य शेती अधिकाऱ्याप्रमाणे होते. तालूक्यातील जमीन, पीक, महसूल यांची माहिती तो ठेवीत असे.

५) **कारकून** तालुक्याचे सर्व रेकॉर्ड संभाळणे. यासाठी दोन कारकून असे.

**क) मौजा / ग्राम प्रशासन**:

परगण्याचे अनेक गावात विभाजन केलेले असे. गाव हे सर्वात लहान घटक असे. प्रत्येक गावात तेथील लोकांची पंचायत असे. या पंचायतीत गावातील वडीलधारी, अनुभवी, ज्ञानी व्यक्ती असे. प्रत्येक पंचायत स्वायत असे. गावातील प्रशासन, न्यायदान, शांतता, सुव्यवस्था, स्वच्छता, शिक्षा इ. कामे पंचायत करत असे. सरकारमार्फत पटवारी, चौकीदार / मुकादम, इ. दुय्यम अधिकारी प्रशासन पाहत असे. डॉ. पी. सरनच्या मते, "गावातील भांडणाचा निर्णय पंचायत करत असे. त्यांच्या निर्णयाविरुद्ध अपील करण्याची गरज कमी होती. मोगल सरकारसुद्धा पंचायतीच्या निर्णयाचा आदर राखत असे, मुकादमाचे कार्य देखभाल करणे, पटवारीचे कार्य शेतसारा वसूल करणे. चौधरीचे कार्य पंचायतीच्या मदतीने न्यायदान करणे. चौकीदाराचे कार्य गावाची सुरक्षा राखणे.

मोगल काळात मध्यवर्ती सत्ता प्रबळ असल्याने प्रांतिय व स्थानिक सत्तेवर नियंत्रण होते. प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या दोन किंवा तीन वर्षांनी बदली होत असे. बंडखोर सुभेदारांना बादशहा शासन करीत असे. महत्त्वाच्या अधिकाऱ्यांच्या नेमणूका बादशहा करत असे. बादशहाने सर्वत्र गुप्तहेर नेमलेले असे. ती सर्व माहिती सम्राटाला कळवत असे. मोगल प्रशासनात एक साखळी असल्याने सर्व प्रशासनात सुसूत्रता निर्माण झाली होती.

## ६.५ मोगल काळातील महसुल कर व्यवस्था

मोगल साम्राज्याचे एकूण उत्पन्न प्रत्येक सम्राटाच्या काळात भिन्न होते. अकबराच्या एकूण उत्पन्न १३.५ कोटी रूपये होते. शहाजहानच्या काळात २२.५ कोटी रुपये होते. औरंगजेबच्या काळात ३८ कोटी इ. रूपये होते. मोगल राज्यव्यवस्थेमध्ये अर्थ खात्याचा प्रमुख दिवाण-इ-अला नावाचा अधिकारी असे. शेती महसूलचा हा प्रमुख होता. त्याशिवाय मुसलमानांना जकात नावाचा कर द्यावा लागत असे. या कराचे उत्पन्न धार्मिक कारणासाठी खर्च करण्यात येई. जिझिया कर हिंदूवर लादला. मीठ, नीळ यांच्या व्यापारापासून चांगले उत्पन्न मिळत असे.

मोगल काळात दोन प्रकारे उत्पन्न मिळत असे. केंद्रिय कर व स्थानिक कर असे. व्यापार, खाणी, चुंगी, मीठ, शेती यात्राकर यावर केंद्र सरकार कर लादत. याशिवाय परराज्याकडून

खंडण्या युद्धातील लुट, सम्राटाला देणग्या, नष्ट झालेल्या जहागिरी, मनसबदारी यांचे उत्पन्न मिळत असे. उत्पन्नाचा बराच भाग लष्करी व्यवस्थेसाठी खर्च होत असे. मनसबदार, सरकारी अधिकाऱ्यांचे पगार हा खर्चाचा प्रमुख वाटा होता. शाही इमारती, रस्ते, उद्याने, सराया, किल्ले यांचे बांधकाम यासाठी प्रचंड पैसा खर्च होत असे. शेतकऱ्यांच्या सोयीसाठी तलाव, पाटबंधारे यांच्या योजना असे.

मोगल काळात चलनपद्धतीत सुधारणा करणारे दोन राज्यकर्ते झाले. ते म्हणजे शेरशहा व अकबर होय. शेरशाही चलन पद्धतीमध्ये एकसूत्रीपणा व सोपेपणा आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले. शेरशहाने १८०ग्रेन वजनाचे व १७५ ग्रेन शुद्ध चांदी असलेली रुपया हे नाणे सुरू केले. अनेक ठिकाणी सरकारी नियंत्रित टांकसाळ्या सुरू केल्या. अकबराने चलन व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल केला, ख्वाजा अब्दुल समद याला अकबराने दिल्लीच्या केंद्रिय टाकसाळीचा प्रमुख नेमला. प्रांतिक टांकसाळी सुरू करून, विश्वासू अधिकारी प्रत्येक प्रांतासाठी नियुक्त केला. बंगाल, लाहोर, जौनपूर, पाटणा, अहमदाबाद येथे प्रांतिक टांकसाळ्या स्थापन केल्या. १७२.५ग्रेन वजनाचा तांब्याचा दाम, किया, पैसा हे सर्वात लहान नाणे होते. ४०दामांचा एक रूपया मानला जात असे. शहाजहानच्या काळात सुरतेला एक टांकसाळ उघडण्यात आली. सुलतानशाहीच्या तुलनेने मोगल काळात चलन व्यवस्थेत जास्त सुधारणा झालेली होती.

## ६.६ मोगल काळातील न्याय व्यवस्था

मोगल कालखंडात न्यायदान प्रक्रिया अतिशय महत्त्वाची होती. सुलतानशाहीच्या काळात असलेली इस्लामी विधिनियमांची उत्पत्ति, साधने मोगल काळात देखील होती. भारतात मोगलांची तीन प्रकारची न्यायालय होती.

**अ) न्यायालयाचे प्रकार :**

**१) धार्मिक कायदेविषयक न्यायालयः**

या न्यायालयाचे कामकाज काझी पहात असे. त्याला काझी-उल-कझत म्हणत असे. काझी शरियत किंवा धार्मिक कायद्यानुसार न्यायदान करत असे. धार्मिक संस्था, कुटुंबकायदा, वारसा कायदा असा फक्त धर्मशास्त्राशी संबंधित किंवा धार्मिक अभियोगांचा न्यायनिवाडा करत असे. ही न्यायालय मराठेकालीन धर्मसभेसारखी होती. कनिष्ठ न्यायालयाकडून आलेल्या अपीलवरही न्याय देत असे.

**२) सामान्य कायदेविषयक न्यायालयः**

यामध्ये प्रांतिक व स्थानिक स्वरूपाची न्यायालय होती. सामान्य कायद्या न्यायालयात रितीप्रमाणे किंवा अलिखित कायदेसंहितानुसार न्यायदान करण्यात येई. ज्यांना अशा अलिखित कायद्या संबंधीचे बरेचसे ज्ञान असे, त्यांना या न्यायालयात समावेश करण्यात येई. सर्व न्यायालय स्वतंत्रपणे कार्य करीत होती.

**अ) प्रांतिय न्यायालयेः**

प्रांताच्या ठिकाणी न्यायालय असे. फौजदारी खटल्याचे निर्णय राज्यपाल / सिपाहसालर घेत असे. तर नागरी खटल्याचे (जमिनी प्रकरणी किंवा मालमत्ता वगैरे) प्रकरणी दिवाण निर्णय देत असे. प्रांतिय न्यायालयाची जबाबदारी काझीकडे असे. त्याच्या मदतीला मुफ्ती व मिरही हे अधिकारी असत.

**ब) परगणा न्यायालयेः**

परगण्याच्या ठिकाणी परगणा काझी आणि कोतवाल हे न्यायदानाचे काम पहात. फौजदार आणि अंमलगुजार यांनाही फौजदारी प्रकारणाचा न्याय देण्याचा अधिकार होता. शिकदार हा मॅजिस्ट्रेटचे काम करी. तो फौजदारी खटल्याचे निकाल देत असे. नागरी न्यायनिवाड्याचे काम अमील करीत असे.

**क) ग्राम (मौजा) न्यायदानः**

खेड्यातील न्यायदानाचे कार्य पंचायत करीत असे. पंचायतीत गावातील श्रेष्ठ, निस्वार्थी, जबाबदार ज्येष्ठ नागरिक सभासद असत. गावातील तंटे गावातच मिटवले जात. अशाप्रकारे ग्रामातील न्यायव्यवस्था स्वायत्त होती.

**३) राजकीय कायदे विषयक न्यायालयः**

राज्य आणि कायदा व सुव्यवस्था यांच्या विरूद्ध केलेल्या गुन्ह्यांच्या बाबतीत न्यायनिवाडा होत असे. या गुन्ह्यात बंड, विश्वासघात, चोरी, राजमार्गावरील दरोडा आणि खून यांचा समावेश असे. जेथे वापरण्यात येणाऱ्या विधिनियमाला उर्फ म्हणत. साधारणपणे उर्फचा अर्थ अलिखित कायदा होत असून, त्याचा वापर विविध प्रकारच्या राजकीय कायद्याच्या न्यायदानासाठी किंवा त्वरीत निर्णयासाठी असलेला विधि नियम म्हणून करण्यात येऊ लागला. राजकीय कायदेविषयक न्यायालयातील न्यायदान स्वतः बादशहा करत असे. लोकांचे आलेले अर्ज बादशहासमोर सादर करण्याचे काम मीर अरक्ष नावाचा अधिकारी करत असे.

**ब) इस्लामी कायदेशास्त्राने मान्यता दिलेले गुन्हेः**

इस्लामी कायदेशास्त्राने तीन प्रकारच्या गुन्ह्याना मान्यता दिली. ते म्हणजे परमेश्वराविरूद्ध केलेले गुन्हे, राज्याविरूद्ध केलेले गुन्हे व सामान्य व्यक्तीच्याविरूद्ध केलेले गुन्हे. परमेश्वरा विरूद्ध केलेला गुन्हा, या गुन्हेगाराला शिक्षा करण्याचा अधिकार फक्त परमेश्वराला होता. म्हणून अशा बाबतीत काझी धार्मिक कायद्यानुसार न्यायदान करीत. राज्याविरूद्ध गुन्हे म्हणजे बंड, दंगेधोपे करणाऱ्या गुन्हेगारांना राज्याचा न्यायधीश न्यायदान करीत असे. सामान्य व्यक्तीच्याविरूद्ध केलेले गुन्ह्यांतील गुन्हेगाराला सरकारकडून शिक्षा होत असे.

**क) मोगल काळातील शिक्षेचे स्वरूपः** मोगल काळात चार प्रकारच्या शिक्षा होत्या.

**१) हदः**

ही शिक्षा धार्मिक विधिनियमानुसार दिलेली शिक्षा होय. ही शिक्षा गंभीर स्वरूपाची असून गुन्हेगाराला देहदंड देणे, हातपाय तोडणे, डोळे काढणे, फटके मारणे यासारखे प्रकार या शिक्षामध्ये होते, व्यभिचार केल्यास गुन्हेगाराला दगड मारून ठार मारले जाई. अविवाहितांशी शरीरसंबंध ठेवले तर शंभर फटके मारणे, चोरी केल्यास उजवा हात मोडणे, राजमार्गावर दरोडा घातल्यास हातपाय तोडणे, मृत्युदंड देणे, ही शिक्षा देण्याचा अधिकार परमेश्वराला असल्याने माणूस त्यात काही बदल करू शकत नाही. खून केल्यास मृत्युदंड देणे, विवाहीत स्त्रीवर व्यभिचाराचा खोटा आरोप लादण्यास ऐंशी फटके मारणे, ही शिक्षा देण्याचा अधिकार परमेश्वराला असल्याने माणूस त्यात काही बदल करू शकत नाही.

**२) तझीरः**

तझीरचा अपराधीचे हृदयपरिवर्तन करणे किंवा समज देणे हा उद्देश होता. तझीर या शिक्षेमध्ये गुन्हेगाराला जाहीरपणे ताकीद देणे, न्यायालयापर्यंत फरपटत नेणे, तुरुंगात डांबणे किंवा हद्दपार करणे, कानावर ठोसे मारणे किंवा ठराविक वेळा फटके मारणे, दंड (तझीर बील-माल) अर्थात मालमत्तेची शिक्षा देणे.

**३) किसासः**

म्हणजे उट्टे काढणे, खूण करणे इ. गुन्ह्याच्या बाबतीत उट्टे काढण्याकरिता ही शिक्षा दिली जात असे. ही शिक्षा इजा झालेला पक्षकार किंवा त्याचा जवळचा नातेवाईक देत असे. इस्लामी न्यायशास्त्राप्रमाणे सामान्य व्यक्तींना नुकसान भरपाई मागण्याचा हक्क होता. काही वेळा गुन्हेगाराला दिया म्हणजे रक्ताची किंमत म्हणून काही रक्कम नुकसान झालेल्या पक्षकाराला द्यावी लागत असे. उदा. हात मोडला तर हात मोडणे.

**४) तशहीर**:

गुन्हेगाराची सर्व लोकासमोर मानहानी करून शिक्षा देणे. इस्लामी न्यायशास्त्रात या शिक्षेबद्दल काही सांगितले नाही. ही शिक्षा सामान्यपणे गुन्हेगाराच्या डोक्याचे मुंडण करणे, तोंडाला काळ रंग फासणे गाढवावर / उंटावर शेपटीकडे तोंड करून बसवून, त्याची धिंड काढणे अशा स्वरूपाची होती.

**ड) राजद्रोहाचा गुन्हा व त्याची शिक्षाः**

राष्ट्रद्रोहाला कोणतीही शिक्षा देण्याचा अधिकार सम्राटाला होता. बंड, दंगेधोपे, विश्वासघात, अफरातफर, महसूल न देणे या प्रकारचे गुन्हे, राष्ट्रद्रोहाचा गुन्हा समजला जात असे. या गुन्हेगाराचा छळ करणे, फाशी देणे, हत्तीच्या पायाखाली तुडवून ठार मारणे, भयंकर विषारी सापांची डसऊन, जमिनीत जीवंत पुरणे, भिंतीत चिरून, जोरात दाबणे, कातडी सोलून ठार मारणे, इ. प्रकारच्या शिक्षा दिल्या जात असे. जिझिया कर चुकविणाऱ्यांना देहान्त शिक्षा देणे, अकबराने चोरीचा गुन्हेगाराला बाण मारून ठार मारणे, जहांगीराने चोरट्यांच्या प्रमुखाला कुत्र्याकडून छिन्नविछीन्न करून ठार मारणे, पशुवध केल्यास शिक्षा देणे म्हणजे

सक्तीचे इस्लाम धर्म स्वीकारण्यास लावणे, सक्तीने सती जाण्यास लावणाऱ्यांना शिक्षा करणे, अकबराने चुलत व मावस भावंडामधील विवाह, बालविवाह, बहुपत्नीत्व हे बेकायदेशीर ठरवले. औरंगजेबने दिवाळी व होळी सण साजरा करणे, यमुना व साबरमती नद्याकाठी मृतांना अग्निसंस्कार करणे, अमावस्या व एकादशी दिवशी दुकाने बंद ठेवणे इ. गुन्हे म्हणून जाहिर केले. काही आनंदाच्या प्रसंगी कैद्याची सुटका करण्यात येत असे. राजांचा व राजपुत्रांचा वाढदिवस साजरा करताना, राजाचा प्रदीर्घ आजार बरा झाल्यास, सिंहासनारोहणाचा वार्षिक समारंभ करताना, तुरुंगाला बादशहांनी भेट देण्याच्या प्रसंगी कैद्याची सुटका करत असे.

**इ) मोगल न्यायपद्धतीतील दोषः**

१) न्यायदान प्रक्रियेत लिखित स्वरूपाचा कायदा अस्तित्वात नव्हता.

२) धार्मिक स्वरूपाची न्यायालये ही नियमितपणे भरत नसत.

३) न्यायालयाची सत्ता व हुकूमत यांची निश्चिती करण्यात आली नव्हती.

४) न्याय सत्ता व कार्यकारी सत्ता यांच्या कामाचे पूर्णपणे विभाजन करण्यात आलेले नव्हते.

५) प्रशासन व न्यायसत्ता यांची सरमिसळ काही वेळा झालेली दिसते.

६) काझी कडून काही वेळा भ्रष्ट्राचार होत असे.

७) गुन्हेगारांना भयंकर स्वरूपाच्या शिक्षा दिल्या जात असत.

**आपली प्रगती तपासा:**

१) मोगल काळातील शिक्षेचे स्वरूप सांगा.

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

## ६.७ मोगल काळातील लष्करी प्रशासन

मोगल काळात सैन्य संघटन अतिशय उत्तम होते. त्यांचे साम्राज्य लष्करी यंत्रणेच्या आधारावर उभारलेले होते. लष्कराचा सर्वश्रेष्ठ अधिकारी म्हणजे सम्राट होय. त्याच्या मदतीला अनेक अधिकारी होते. सैन्य विभागाचा प्रमुखास मीरबक्शी म्हणत असे. त्याच्या मदतीसाठी तीन बक्शी असे. मीर बक्शीचे काम सैनिकांची नियुक्ती व प्रशिक्षण, वेतन देने इ. होते.

**अ) मोगल सैन्याची / लष्कराची रचना:**

**१) मोगलशाहीतील कनिष्ठ राज्यकर्त्याकडील सैन्यः**

मोगल काळात कनिष्ठ राज्यकर्त असत, त्यांच्याकडे स्वतःची फौज असे. बादशहाच्या आदेशानुसार फौज पाठवली जात असे.

**२) मनसबदारांचे सैन्यः**

बादशहा मनसबदारांची नेमणूक करत असे. त्यांच्या जवळ सैन्य असे. त्यांचे एकूण ३३ वर्ग असून जात व सवार या दोन प्रकारचे भेद होते. प्रचंड यश मिळवल्यावर त्यांना बढती मिळत असे. उमराव, अमीर, उल उमराव, खान, खानान इ. प्रकारचे किताब मिळत असे.

**३) दाखिली सैन्यः**

बादशहाचे खास सैन्य असे. दाखिली सैन्यांच्या घोड्यांना डाग दिलेले असत. त्यावर राज्यसरकारचे नियंत्रण असे. त्यांना राज्यसरकार पगार देत असे. हे सरकारी किंवा शाही सैन्य म्हणून ओळखतात. मोहिमांच्या प्रसंगी मनसबदारी फौजेबरोबर रणांगणावर उतरत असे.

**४) आहाडी / अहदी सैन्यः**

प्रतिष्ठित नागरीकांचे व बादशाही मान्यता असलेले सैन्यदल होते. यामध्ये प्रामुख्याने मुस्लिमांचा अधिक भरणा असे. ते एकप्रकारचे बादशहाचे अंगरक्षक असे. त्यांचा पगार केंद्र सरकारकडून होत असे.

**५) कुमकी / कायम सैन्यः**

बादशहा जवळ खास फौज असे. ते खास राखीव पथक होते. ते प्रत्यक्ष बादशहाच्या नियंत्रणाखाली असे. या सैन्यामध्ये हिंदुस्थानी मुसलमान, उझबेक, इराणी, तुराणी, तुर्की इ. परकीय मुसलमान सैन्य असे.

**ब) मोगल लष्कराचे विभागः**

मोगल लष्कराचे एकूण पाच विभाग होते. ते म्हणजे घोडदल, हत्तीदल, पायदल, तोफखाना, आरमार.

**१) घोडदळ सैन्यः**

मोगल लष्करातील अत्यंत महत्त्वाचा विभाग म्हणजे घोडदळ होय. घोडदळ हे मनसबदारी पद्धतीवर आधारीत होते. मोघल सैन्यात आशिया खंडातील प्रभावी घोडदळ होते. अकबराच्या काळात २५ हजार घोडदळ होते घोडेस्वारांना राज्यात बारगीर म्हणून ओळखत असे. घोडदळाचे दोन प्रकार होते. सरकारमार्फत घोडा व शस्त्रास्त्रे पुरवली जात व काहींचा स्वतःचे घोडे व शस्त्रास्त्रे असत. घोडदळातील सैन्याची विभागणी ही त्यांच्या गुणवत्तेवर आधारित असे. एक घोडा असलेल्या सैनिकास एक अस्पा, दोन घोडे असलेल्या

सैनिकास दो अस्पा, व तीन व चार घोडे असलेल्या सैनिकास सेहअस्पा व चहर अस्पा म्हणत असत. दहाच्या मनसबदारास दहबशी असे म्हणत. त्याच्याकडे कमीत कमी १८ घोडे असते.

**२) हत्तीदलः**

मोगल लष्करात अनेक कारणाने हत्तीचा उपयोग करत असे. सेनापती हत्तीवर बसून सैन्याची पाहणी करीत असे, शत्रूवर हल्ले करणे, किल्ल्याचे दरवाजे फोडणे, शत्रूला चिरडणे, मोहिमेच्यावेळी साहित्य वाहतूक करणे, युद्धात आघाडीवर लढण्यासाठी युद्धात बचावात्मक व आक्रमक चढाईचे प्रशिक्षण हत्तीला दिलेले असे. सैन्य रचनेतील पायदळाची फळी मोडण्यासाठी हत्तीचा उपयोग होत असे. हत्ती दलाची विभागणी सात श्रेणी होती. त्यांच्या दर्जानुसार मानधन मिळत असे. हत्ती, तोफखान्यास घाबरत व सैरावैरा धावत असत,

**३) पायदळ सैन्यः**

मोगल लष्करातील पायदल हा प्रमुख विभाग होता. यांच्या समोरासमोर जमिनीवर शत्रूशी युद्ध होत असे. त्यामुळे सैन्य भरती करताना ताकदवान, शारीरिक तंदुरुस्त, धाडसी, पराक्रमी व्यक्तीचा समावेश केलेला असे. पायदल सैन्यात दोन श्रेण्या होत्या.

१) आहशमस २) शिबंदी या विभागातील सैनिक तलवार, भाला, धनुष बाण ही शस्त्रे बाळगत असे. बादशाही दरबारात वेगवेगळ्या विभागात एक हजार तलवार पटू सदैव असे.

**४) तोफखानाः**

मोगल लष्करात तोफखाना हा महत्त्वाचा विभाग होता. यांच्या विभाग प्रमुखाला दरोगा तोफखाना किंवा मीर-ए-अतीश असे म्हणत. या विभागात वेगवेगळ्या प्रकारच्या बंदुका व तोफा असे. तोफखान्याकडे दोन विभाग होते. एका विभागात लहान-मोठ्या व जड तोफा होत्या. तर दुसऱ्या विभागात बंदुकधारी सैन्य होते. तोफा बनवण्यासाठी पाश्चात्याची मदत घेत असे. अकबराने स्वतः लक्ष देऊन अनेक तोफा बनवून घेतल्या. आर्विनच्या मते- "औरंगजबेचा तोफखाना सर्वापेक्षा प्रभावी व परिपूर्ण होता. औरंगजेबचा तोफखाना प्रमुख इटालीयन प्रवासी मनूची हा होता. मोठ्या तोफांची जलमार्गाने वाहतूक होत असे."

**५) नौदल / नाविकदल / आरमार**:

मोगलांचे नाविक दल लहान स्वरूपाचे होते. त्यांचे लहान आरमार किनारी किंवा नदी किनारी असे. नाविक दलाच्या प्रमुखाला मीर-इ-बहर किंवा दरोगा नववारा असे म्हणत. बोटीचा उपयोग साहित्य वाहतुकीसाठी, सैन्याची वाहतूक प्रवास यासाठी होत असे. मोगलांनी स्वतंत्र असे स्वतःचे आरमार निर्माण केले नाही. आरमाराची सर्व जबाबदारी जंजिऱ्याच्या सिद्दीवर सोपवली होती.

**६) सुरक्षादलः**

मोगल काळात ग्रामीण भागातील सुरक्षादलाची व्यवस्था परंपरागत होती. खेड्याची शांतता व सुरक्षा ठेवण्याचे काम ग्रामप्रमुखाकडे होते. सरकार मध्ये फौजदार व त्याचे सुरक्षा पथक

असे. शहरात कोतवाल व त्याचे खास सुरक्षा पथक व गुप्तहेरांची तुकडी असे. दरोडे चोर, लुटमार खून, बलात्कार इ. गुन्हांचा शोध घेणे. गुन्हेगारी खटले चालवणे, गस्त घालणे, लबाडी करणाऱ्या व्यापाऱ्यांना शिक्षा करणे इ. कामे करत असे.

**आपली प्रगती तपासा:**

१) मोगल काळातील लष्कराचे विभागाची माहिती द्या.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ६.८ मोगलकालीन मनसबदारी पद्धत

मोगल अमीर उमराव हा मोगल कारभाराचा पाया होता. ही यंत्रणा लष्करी पद्धतीची होती. सैन्य, सरदारकी, नोकरशाही सर्वांचा संगम त्यात झाला होता. भारतात ही पद्धत अकबराच्या काळात पूर्णत्वास पोहचली होती. अकबराने दिल्ली सुलतानांची परंपरा उचलली परंतु त्याचे अंधानुकरण केले नाही. पद्धतीतील दोष दूर करून कारभाराचे सामर्थ्यशाली व कार्यक्षम यंत्रणेत त्याचे रूपांतर केले.

**अ) मनसबदारी पद्धतीचा उगमः**

तुर्काच्या काळातील लष्करी संघटना दशमानपद्धतीवर आधारलेली होती. तिची रचना पिरॅमिडसारखी होती. वरच्या टोकाला राजा तर तळाच्या बाजूला सर्वात कनिष्ठ हुद्देदार असत. हे तुर्कांचे तत्त्व सुलतानांनी आपल्या लष्करात आणले. सर्वात कनिष्ठ हुद्देदार सल हा असून तो दहा स्वारांचा असे. दहा सलैखवर एक सिपाहसालार, दहा सिपाहसालारवर एक अमीर असे. दहा अमीरावर एक मलीक, दहा मलिकावर एक खान. सर्व खानावर राजा असे. याच पद्धतीत मोगल मनसबदारी पद्धतीचे मूळ आढळून येते. या मनसबदारी पद्धतीचा प्रारंभ बाबरापासून आढळतो. मनसबदारीची कल्पना मुळची पर्शियन आहे. १५७१ मध्ये अकबराने मनसबदारी पद्धतीची संघटना पूर्ण स्वरूपात केले. अकबराची पहिली नवीन सुधारणा म्हणजे कनिष्ठ व वरिष्ठ मनसबदारांच्या परस्पर संबंधात बदल करून, प्रत्येक मनसबदाराला प्रत्यक्ष राजकीय एकनिष्ठ राहण्याची आवश्यकता निर्माण केली. “मनसब” या अरबी शब्दाचा अर्थ स्थान, दर्जा किंवा हुद्दा असा होता. मोगल काळात ते नागरी व लष्करी नोकरांच्या हुद्याचे मोजमाप साधन समजले जात होते. अकबराने सैनिकी शक्तीचे केंद्रिकरण करण्याच्या धोरणातून मनसबदारी पद्धतीची पूनर्रचना केली.

**ब) मनसबदारी पद्धतीची वैशिष्ट्येः**

**१) सैन्य दलाची व्यवस्थाः**

मनसबदार म्हणजे शाही सेनेतील उच्चपद ग्रहण करणारा अधिकारी वर्ग होय. त्यांना ठराविक संख्येने घोडदळ, हत्ती, उंट, सैन्य असा लवाजमा बाळगावा असा संकेत होता. तसे त्यांचे त्यात बंधनही नव्हते. उदा. हजाराची मनसबदारी म्हणजे एक हजार सैन्यावरील

अधिकारी असा नव्हे, तर बादशाहने निश्चित केलेले संख्याबळ बाळगणे. मनसबदाराचा हुद्द परकीय तुर्क, इराणी, अफगाणी आणि भारतीय राजपूत लोकांकडे असे. त्यांना सर्व प्रकारची खरेदी करावी लागत असे. घोड्याच्या डाव्या पुट्यावर मनसबदारांची खुण उजव्या पट्ट्यावर सरकारी खुणेचा शिक्का मारलेला असे. सर्व प्रकारची तपासणी प्रतिवर्षी किंवा दर तीन वर्षांनी होई.

**२) मनसबदारांच्या श्रेण्याः**

मनसबदार म्हणजे शाही लष्करातील उच्च पद ग्रहण करणारा अधिकारी होय. मनसबदारांना नागरी व लष्करी या दोन्ही प्रकारची कार्ये करावी लागत असत. त्यांच्या तीन श्रेण्या होत्या मनसबदार, उमरा, आणि उमरा-ए-आझम.

१० पासून ४०० पर्यंतच्या हुद्देदारास मनसबदार म्हणत. ५००पासून २५०० पर्यंतच्या हुद्देदारास उमरा म्हणत. ३०००पासून ते त्यापुढील सर्व हुद्देदारास उमरा-इ-आझम (अकबर) म्हणत. अकबराच्या काळात सर्वात कनिष्ठ हुदा १० स्वारांचा, सर्वात वरिष्ठ हुदा, १०,००० वरचा होता. उच्च श्रेणीत मनसबदर करणाऱ्यास अमीर-उल-उमरा असेही म्हणतात. राजकुटुंबासाठी राखीव ठेवण्यात आले होते.

अकबराच्या काळात जात व सवार असे दोन हुद्दे होते. जात हा वैयक्तिक हुद्दा असून, त्यामुळे सत्तेच्या यंत्रणेतील मनसबदाराचा दर्जा निर्देशित होत असे. याच हुद्याच्या आधारावर वेतन तयार केले जाई. "सवार" या हुद्यामुळे त्या हुद्देदाराने प्रत्यक्ष बाळगलेल्या घोडदळाची निश्चित संख्या, हत्ती, जनावरे गाडया यांची माहिती मिळत असे. मनसबदारी पदाबद्दल इतिहासकारांच्यात मतभेद आहेत.

ब्लॉकमनच्या मते, "मनसबदाराला सैनिकांची जी संख्या ठेवावी लागे, तिला जात असे म्हणत व घोडदळांच्या संख्येला सवार असे म्हणत. इर्विनच्या मते जात म्हणजे घोडेस्वारांची एक निश्चित संख्या तर सवार हा एक प्रतिष्ठासूचक शब्द होता. अब्दुल अजीजच्या मते, जात पद प्राप्त होणाऱ्या मनसबदारास एक निश्चित संख्येत, हत्ती, घोडे, भारवाहक, बैलगाड्या इ. वस्तु स्वतःबरोबर बाळगाव्या लागत. घोडस्वार व पायदळातील सैनिकाशी जातचा काही संबंध नव्हता. सवार याचा अर्थ मनसबदाराच्या अधिक एक निश्चित घोडदळाची संख्या आहे.

प्रत्येक मनसब प्रथम, द्वितीय, तृतीय श्रेणीत विभक्त होती. या श्रेणीनुसार पगार, भत्ते, अधिकार असे. त्यानंतर मशरून या नवीन हुद्याची भर घालण्यात आली. हा हुद्दा सर्शत होता. मनसबदाराला हा हुद्दा दिलेल्या स्वारांच्या संख्येपेक्षा अधिक स्वार नेमावे लागत. तर हा हुद्दा देण्यात येत असे. या जागेवरून बदली झाली तर मशरून हा हुद्द आपोआप रद्द होत असे. जात व सवार यांच्यातील फरक पाच हजारावरील मनसबदारांना लागू होता. सवारांची संख्या जात पेक्षा कमी असे परंतु निम्यापेक्षा जास्त असे.

जहांगिरच्या काळात दु-अस्पा व सिंह अस्पा हे हुद्दे निर्माण करण्यात आले. शहाजहानच्या काळात यात नियम सैल झाले. कालांतराने या प्रथमध्ये अनेक दोष निर्माण झाल्याने तिचा ऱ्हास झाला.

### ३) मनसबदारांची नियुक्ती, बढती, उच्चाटनः

मनसबदाराच्या नेमणूकीमध्ये बादशहा वैयक्तिक रित्या लक्ष घालीत असे. मनसबदाराची नियुक्ती, बदली, बढती, उच्चाटन, यासंदर्भात कोणताही विशेष नियम नव्हता. ते सर्व बादशहाच्या मर्जीवर अवलंबून होते. बादशहा प्रत्येकाची मुलाखत घेत असे. प्रांताचे अधिकारी, राजपुत्र, सेनापती यांच्याकडून मनसबदारासाठी शिफारसी आलेल्या असत. त्यावर बादशहा विचार करून निर्णय घेत असे. बादशहाकडून मंजूरी मिळाल्यानंतर त्या उमेदवाराच्या संबंधीत कागदपत्रे दिवाण, बक्षी ब साहिब-ए-तौजी यांच्याकडे मान्यतेसाठी जात असे. त्यानंतर अंतिम निर्णय बादशहा देत असे. अंतिम नेमणूक पत्र दिवाण, बक्षी, किंवा वजीर यांच्या शिक्क्यासह पाठवले जात असे.

मनसबदाराची बढती करतानाही हीच पद्धत अवलंबत असे. बादशहाचा जन्मदिन किंवा विशेष समारंभ यांच्या निमित्ताने बढ़ती दिली जात असे. भ्रष्टाचार होऊ नये म्हणून अकबराने चेहरा व डाग ही पद्धत सुरू केली. माणसाचे वर्णनात्मक हजेरीपत्रक म्हणजे चेहरा होय. त्यात माणसाचे सर्व प्रकारचे वर्णन, खूण याच्या नोंदी असे. घोड्यांना डाग देण्याची पद्धत होती. उजव्या मांडीवर सरकारचा व डाव्या मांडीवर मनसबदाराचा शिक्का असे. याला डागपद्धत म्हणत. प्रत्येक वर्षी अथवा दर तीन वर्षांनी त्यांचे निरिक्षण होई. बादशहा नाराज झाल्यास त्या मनसबदारास बडतर्फ करत असे.

### ४) मनसबदाराचे वेतन व दर्जा निश्चित केलेले असे:

मनसबदारामध्ये नकदी / नगदी मनसबदार व जहागिरदार असे दोन प्रकार होते. नगदी मनसबदाराला त्याचे वेतन रोख मिळत असे. जहागिरदारांना वेतन ऐवजी जहागीर मिळत असे. जहागिरीचे उत्पन्न वेतनाइतकेच असे जर उत्पन्न कमी झाले तर ठरवलेल्या रक्कमेऐवढी फरकाची रक्कम बादशहाकडून मिळत असे. जहागीर म्हणून संपूर्ण खेडे किंवा याचा विशिष्ट प्रदेश, कर, पट्टी दिलेली असे. महाल किंवा महसुली विभागांवर आधारित जहागीर दिली जात असे.

जहागिरदाराला स्वतः जहागिरीतील महसूल गोळा करावा लागत असे. त्याच्या मदतीसाठी अमील, अमीन, पोतदार, कारकून हे होते. अमील हा शिकदार किंवा राजपुत्राच्या हाताखालील करोरी म्हणून काम करत असे. अमीलाकडून महसूल गोळा करण्याच्या कामापोटी अगाऊ रक्कम घेतली जात. त्यास कब्ज म्हणत. हा जहागिदाराचा नोकर होता. इजारदार हा स्वतंत्र माणूस असून, तो सरकारी माणूस होता. पोतदार हा खनिजदार तर कारकून हा हिशेबनीस होता. ज्या मनसबदारांना रोख वेतन हे त्यांच्या दर्जा व श्रेणीनुसार मिळत असे. मोरलँड, स्मिथ व आयर्विन यांच्या मतानुसार मनसबदारांना केवळ सहा ते सात महिन्याचा पगार दिला जात असे त्यातूनच तो व्यवस्थेचा खर्च आणि सैन्य पालखींचा खर्च करी. सर्व खर्च वजा जाता जो शिल्लक राहिल ते त्याचा खरा पगार होय. मोरलँडने श्रेणी नुसार पगार व खर्च दाखवला आहे. मासिक वेतन रूपयात

| पद/दर्जा खर्च | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी | मनसबदाराच्या सेनेचा |
|---|---|---|---|---|
| ५,००० | ३०,००० | २९,००० | २८,००० | १०,६०० |
| ३,००० | १७,००० | १६,८०० | १६,७०० | ६,७०० |
| १,००० | ८,२०० | ८,१०० | ८, ००० | ३,००० |
| ५०० | २,५०० | २,३०० | २,१०० | १,१७० |
| ५० | २५० | २४० | २३० | १८५ |
| | १०० | ८२१/२ | ७५ | ४४ |

### ५) नियमित कर्तव्य आणि निश्चित पदाची अनावश्यकता:

मनसबदारी प्राप्त झालेल्या व्यक्तिला राजदरबारी उच्च नोकरी दिली पाहिजे असा नियम नव्हता. अथवा शासकीय सेवत घेतलेच पाहिजे असेही नव्हते. बादशहाने जे काम सांगितले त्याशिवाय दुसरे कोणतेही काम नव्हते.

### ६) मनसबदारीच्या नागरी व लष्करी सेवेत फरक नव्हता:

मनसबदारी पद्धतीत नागरी व लष्करी सेवा यात फरक केला जात नव्हता. राज्याच्या कोणाताही अधिकारी असो, मुलकी खात्यातील असो न्यायाधिश अथवा राजगायक असो या सर्वांना मनसबदार म्हणून राजदरबारी भरती केलेले असे. राजदरबारातील काही आणि सदर सोडून इतर सर्व शाही नोकर मनसबदारी पद्धतीत समावेशित केले जात. त्यांना पदाप्रमाणे सैन्य बाळगावे लागे. राजा तोडरमल, राजा बिरबल, अबू फजल या सर्वांना राजदरबारात मनसबदार म्हणूनच स्वीकारलेले होते.

### ७) कुळप्रमुख मनसबदार गणले जात:

सर्व कुळ प्रमुखांना ही, जे स्वायत्तपणे कारभार पाहात अशांना देखील मनसबदारच म्हणून गणले जाई. त्यांनी देखील मनसबदारीसारखेच ठराविक संख्येने सैन्य ठेवावे. ठराविक कालावधीनंतर तपासणी करून घ्यावी असा संकेत होता.

### ८) सैन्य दलाची देखभाल व व्यवस्था:

मनसबदारास आपले सैन्यदल ठेवावे लागे. ठराविक संख्येने घोडदळ, हत्ती, उंट, सैन्य असा लवाजामा असे. मनसबदारास जेवढी मनसब असेल तेवढे सैन्यबळ असले पाहिजे असे बंधन नव्हते. या मनसबदारात बहुधा तुर्क, इराणी. अफगाणी व भारतीय राजपूत अधिक असे. त्यांना घोडे व इतर साहित्य खरेदी करावे लागत.

### ९) मनसबदाराचे सुखी-विलासी जीवन:

मनसबदारांचे जीवन अत्यंत विलासी व सुखासीन होते. मनसबदार म्हणून एखादा मान्यत मिळाली की, ती व्यक्ती पुढील आयुष्यात चैनीत घालवीत असे. कारण मनसबदारीत प्राप्त झालेली इस्टेट, मालमत्ता, मनसबदाराच्या वारसांना मिळत नसे. कारण मनसबदारी वंशपरंपरागत नव्हती. मनसबदाराच्या मृत्युनंतर त्याची मालमत्ता सरकारजमा होत असे.

त्यामुळे आपल्याच आयुष्यात जितका खर्च करता येईल. चैनीत राहता येईल, तेवढे मनसबदार राहात असत.

**१०) मनसबदारी पद्धतीचे गुणः**

**१) मनसबदारीमुळे मध्ययुगीन लष्करी पद्धतीत सुधारणा:**

मनसबदारी पद्धतीत महत्त्वाचा गुण असा मानला जातो की, मध्ययुगीन विस्कळीत सदोष लष्करी पद्धतीत सुधारणा घडवून आणण्यास उपयुक्त मनसबदारी ठरली. लष्कर भरती दोन पद्धतीने होते असे ती म्हणजे विशेष जाती प्रमुखांना स्थान देणारी पद्धत व जहागिरी पद्धतीतील सक्तीची लष्करी सेवा. या दोन्ही पद्धतीतील चांगल्या गुणांची तडजोड मनसबदारीत केलेली होती. देशाची सामर्थशाली फौज उभारण्याचा उत्तम मार्ग बादशहास सुकर झाला.

**२) देशाची खरी लष्करी फौज उभारण्याचा उत्तम मार्गः**

आपल्या राज्यातील लष्करी यंत्रणेची, लष्करी शक्तीची वाढ करण्याच्या हेतूनेच मनसबदारी पद्धतीचा उदय झाला. या पद्धतीमुळे व्यक्ती लष्कराकडे आकर्षित झाला व सैन्यात वाढ झाली.

**३) राजसत्तेशी एकनिष्ठ व श्रद्धेत वाढः**

मनसबदारी बादशहाच्या वचनाबद्दल एकनिष्ठा निर्माण झाली. वैयक्तिक उन्नतीसाठी, बादशहाही कृपा प्राप्त करण्यासाठी सैनिक बादशहाची एकनिष्ठ राहू लागले. प्रत्येक मनसबदारास माहित होते की, पदोन्नती किंवा पदच्युती या गोष्टी निष्ठेवर व सेवेवर अवलंबून आहेत. त्यामुळे मनसबदार राजसत्तेशी एकनिष्ठ राहू लागले,

४) मनसबदारामुळे स्थानिक बंडखोराच्या बंदोबस्तासाठी वेळोवेळी राजधानीतून सैन्य पाठवण्याची गरज नव्हती.

५) साम्राज्यातील सर्व भागातून सैनिक भरती होवून लष्करी सामर्थ्य वाढते.

**ड) मनसबदारीतील दोषः**

**(१) खोटी सैन्य भरती**:

मनसबदारी पद्धतीचा महत्त्वाचा दोष सांगितला जातो तो म्हणजे मनसबदार भरतीच्या निर्धारित केलेली सैन्य भरती करत असे. सरकारी तपासणी झाल्यावर चांगले सरकारी घोडे विकून त्याच्या जागी कमी प्रतीचे घोडे हजर करत असे सैन्यदल, घोडदळाबाबत सरकारला फसवले जात असे. सैन्य बादशहापेक्षा मनसबदाराशी एकनिष्ठ राहात असे. त्यामुळे सैन्यावर नियंत्रण मनसबदारामध्ये राहात असे. सैनिक व्यवस्थेत उपविभाग नसल्याने अधिकाऱ्यांच्या बदल्या होत नसे.

**२) अविश्वसनीय लष्करी संघटनाः**

मनसबदारी पद्धतीत लाचलुचपतीच्या पद्धतीला अनेक प्रकारे वाव असल्यामुळे लष्करी संघटन विश्वसनीयरित्या तयार होणे अशक्य होते. सैन्यावर मनसबदाराचा अधिकार असे. सैन्य खरे अगर खोटेही, असे सैन्याचा पगार मनसबदार स्वतःच घेत असे. सैन्याची संख्या निश्चित नव्हती. सैन्य भरतीचे अधिकार मनसबदाराकडे असल्याने अनेक मार्गीने भ्रष्टाचार होत असे.

**३) मनसबदारी वंशपरंपरागत नव्हतीः**

मनसबदारी ही केवळ व्यक्तीगत होती. त्याच्या मृत्युनंतर त्याची मालमत्ता सरकार जमा होई. त्यामुळे त्यांच्या वंशाला मनसबदारीविषयी आवड नव्हती. मनसबदार देखील विलासी व चैनी जीवन जगत असे. परिणामी मनसबदार अकार्यक्षम बनत असे.

**४) मनसबदारी पद्धतीच्या नियमाबाबत सरकारच्या निष्काळजीपणाः**

मनसबदारांच्या पद्धतीच्या नियमांचे नीटपणे निरीक्षण केले गेले नाही. संभाव्य दोषांचा अंदाज घेतला जाई. प्रत्यक्ष अंमलबजावणीत नियंत्रणात अनेक दोष निर्माण झाले. घोड्यांच्या व्यवहारात गैर व्यवहार होत असे. सरकारचे लक्ष नाही.

**५) खर्चिक लष्करी पद्धती:**

मनसबदारी पद्धत ही खर्चिक होती. मोगल सरकारने सैन्य निर्मितीसाठी प्रचंड पैसा खर्च केला. तो वाया गेला. लष्कर सुसंघटित झाले नाही. मोठ्या खर्चाची, परंतु पोकळ वरवर देखावा करणारी ही लष्करी पद्धत होती.

**६) राष्ट्रीय सैन्याची उभारणी झाली नाही:**

अकबराने बहाल केलेली मनसबदारी बहुदा परकीय लोकांना प्राप्त झाली. त्यामध्ये मंगोलियन, तुर्क, अफगाण, इराणी लोकांचा अधिक भरणा होता. त्यांनी भरती केलेले सैन्यही परकीय होते. त्यांच्या साम्राज्याविषयी आपुलकी असलेली राष्ट्रीय भावना जोपासलेली नव्हती. त्यामुळे राष्ट्रीय सेना निर्माण होऊ शकली नाही. परिणामी मोगल साम्राज्याचा नाश झाला.

**७) सैन्य कमकुवत झालेः**

मनसबदारीमुळे बाजारू सैन्याची भरती होत असे. त्यांची खोटी हजेरी ठेवणे, वेतन अपूरे देणे, यामुळे सैन्याचे संघटन झाले नाही. सैन्यामध्ये पराक्रम, शौर्य या ऐवजी संधीसाधुपणा व स्वार्थ या गोष्टीला महत्त्व प्राप्त झाले. त्यामुळे अकार्यक्षमता निर्माण होऊन सैन्य कमकुवत झाले.

**८) बंडखोर मनसबदारः**

मनसबदार हे राजधानीपासून दूर राहात असल्याने ते स्वतंत्र वृत्तीने वागत असे. बादशहाची आज्ञा पाळत नसत. त्यांचा त्रास मोगल सम्राटाला झालेला होता. मोघल साम्राज्यात बऱ्याच मनसूबदारांनी स्वस्वार्थासाठी बंड केल्याचे निर्दशनास येते.

**आपली प्रगती तपासा:**

१) मनसबदारीचा उगमाचे स्वरूप स्पष्ट करा.

## ६.९ सारांश

बाबराने १५२६ मध्ये मोगल सत्तेची स्थापना केली बाबर, हुमायून, शेरशहा, अकबर, जहांगीर, शहाजहान, औरंगजेब इ. सम्राटाने १७०७ पर्यंत मोगल साम्राज्य वाढवले व टिकवले. विशाल साम्राज्यासाठी स्वतंत्र्य प्रशासन व्यवस्था स्थापन केली. केंद्रिय, प्रांतिक, स्थानिक स्वरूपाची रचना होती. त्याबरोबरच महसुल, लष्करी, न्यायालय व्यवस्था स्वतंत्र होती. अकबराच्या काळात पूर्ण विकसीत झालेली मनसबदारी पद्धत निर्माण झाली. मनसबदारीची वैशिष्ट्ये, गुण-दोष आपणास वरिलप्रमाणे लक्षात आले. बऱ्याच प्रमाणात मनसबदारी पद्धत ही मोघल सम्राज्याच्या ऱ्हासास कारणीभूत ठरली.

## ६.१० प्रश्न

१) मोगलकाळातील केंद्रिय प्रांतिय प्रसासन व्यवस्था स्पष्ट करा.

२) मोगलकाळातील न्याय व्यवस्थेचा आढावा घ्या.

३) मोगलकाळातील लष्कर व्यवस्थेची रचना स्पष्ट करा.

४) मनसबदारीची वैशिष्ट्ये सांगा.

## ६.१० संदर्भ


- केतकर संध्या, भारतीय कलेचा इतिहास, ज्योत्स्ना प्रकाशन, पुणे, २०१६.
- वर्मा हरिश्चंद्र, मध्यकालीन भारत (भाग २) (१५४० - १७६१), दिल्ली विश्वविद्यालय, प्रथम आवृत्ती, दिल्ली, २०१७.
- शर्मा सतीशचंद्र, मध्ययुगीन भारत : मोगल साम्राज्य (१५२६ - १७४८), (खंड २), के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१७.
- मेहता जे. एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास (खंड २), आवृत्ती चौथी, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१६.
- मेहता जे. एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास (खंड ३), आवृत्ती तीसरी, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१४.

- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: १, तिसरी आवृत्ती, प्रकाशिका सौ. आर. के. चिटणीस, पुणे, २००३.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: २, दुसरी आवृत्ती, प्रकाशिका सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८७.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: ४, प्रथम आवृत्ती, प्रकाशिका सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८५.
- भिडे गजानन, नलावडे विजय, नाईकनवरे वैजयंती, मध्ययुगीन भारत (सामाजिक, आर्थिक आणि संस्कृतीक इतिहास), फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.
- पवार विश्वनाथ, डॉ. शिंदे, मुघलकालीन भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.


*****

# ७

# मराठी सत्तेचा उदय व विस्तार

**घटक रचना**


७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ छत्रपती शिवाजी महाराज

७.३ छत्रपती शिवाजी महाराज व मुघल संबंध

७.४ शिवराज्याभिषेक

७.५ छत्रपती शिवाजी महाराजांची कर्नाटक मोहिम

७.६ छत्रपती शिवाजी महाराजांची प्रशासनव्यवस्था

७.७ छत्रपती राजे संभाजी

७.८ छत्रपती राजाराम

७.९ महाराणी ताराबाई

७.१० समारोप

७.११ प्रश्न

७.१२ संदर्भ


## ७.० उद्दिष्टे

१. मराठी सत्तेचा उदय समजून घेणे.

२. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यविस्ताराचा अभ्यास करणे.

३. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेवर दृष्टीक्षेप टाकणे.

४. छत्रपती शिवाजी महाराजानंतरच्या राज्य कारभाराचा अभ्यास करणे.

## ७.१ प्रस्तावना

सामान्यपणे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या भोसले घराण्याचा संबंध राजस्थानातील उदयपूर येथील शिसोदीया घराण्याशी आहे असे मानले जाते. पारसनीस यांच्या मते, "शिवाजीचे वडील शहाजी भोसले उदयपूरच्या राजघराण्यातील लक्ष्मणसिंग यांचा नांतू सज्जनसिंह यांच्या नात्यातून होते. देवराजजी नावाचे एक कुटुंब उदयपूरच्या राणा बरोबर कलह निर्माण झाल्यामुळे दक्षिणेकडे स्थलांतरीत झाले. तेथे शहाजींच्या पूर्वाश्रमींनी 'भोसले' हे नाव धारण केले. शहाजीराजांचा पुत्र शिवाजी महाराज यांनी महाराष्ट्रामध्ये सह्याद्रीच्या कुशीत 'स्वराज्य' स्थापन केले. शिवाजीराजांना मुघलसत्तेकडून व इतर मुस्लीम सत्तांकडून कडवा विरोध असताना सुद्धा त्यांनी 'स्वराज्य' स्थापन करणे ही

भारताच्या इतिहासातील एक महनीय घटना आहे. इंग्रजी इतिहासकारांच्या मते, ही घटना एक 'अपघात' असला तरी न्या रानडे यांनी आपल्या 'मराठी सत्तेचा उदय या ग्रंथात ही घटना 'पूर्वनियोजित' व 'धार्मिक पुनरुज्जीवन' यामुळे घडली असल्याचे नमूद केले आहे.

**मुस्लिम सत्ताः**

अलाऊद्दीन खिलजीने दक्षिणेत मोहिम राबविल्यापासून (१४व्या शतकात) मराठा देश हा पुढील ३०० वर्षे दिल्ली सुलतानशाही, बहामनी, निजामशाही आणि आदिलशाही यांच्या नियंत्रणाखाली होता. परंतु ते पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण प्रांतावर पूर्णपणे नियंत्रण मिळवू शकले नाहीत. या मुस्लिम सत्तांना राज्यकारभारासाठी स्थानिक लोकांची नेमणूक करावी लागत असे. त्यामुळे पाटील, देशमुख, कुलकर्णी यांच्या नेमणूका सुरक्षित राहिल्या. मुस्लिम सैन्यामध्ये मराठा सैनिकसुद्धा भरती केले जात. त्यामुळे त्यांना युद्धकला प्रशिक्षण व अनुभव मिळत असे. सतराव्या शतकाच्या प्रारंभी दक्षिणेतील सुलतानांच्या दरबारी नागरी व लष्करी खात्यामध्ये मराठा सरदारांना मानाचे स्थान मिळत होते. त्यामुळे शिवाजी राजांच्या जन्माअगोदर सुद्धा अनेक मराठा सरदार नावारूपाला आलेले होते.

शहाजीराजे शिवाजीराजांचे वडील शहाजीराजे यांनी आपले वडील मालोजीराजे आणि मलिक अंबर यांच्या मार्गदर्शनाखाली युद्धकलेचे प्रशिक्षण घेऊन त्याचा प्रत्यक्ष अनुभवसुद्धा घेतला होता. ते अत्यंत पराक्रमी व शूर सरदार होते. इ.स. १६२६ मध्ये मलिक अंबरचा मृत्यु झाल्यानंतर शहाजीराजांनी अहमदनगरच्या निजामशहाकडे नोकरी पत्करली आणि मुघल बादशहाविरूद्ध संघर्ष चालू केला. एवढेच नव्हे तर इ.स. १६३३ मध्ये त्यांनी नामधारी निजामशहास गादीवर बसवून ३ वर्षे निजामशाही सांभाळली. त्यानंतर विजापूरच्या आदिलशहाच्या दरबारी त्यांनी सरदारकी मिळविली व त्याबदल्यात त्यांना चाकण ते इंदापूर (पुणे) हा प्रांत, जहागिर म्हणून मिळाला. अशाप्रकारे शहाजीराजांनी आपला मुलगा शिवाजी याच्यासाठी एक सुरक्षित प्रांत निर्माण केला आणि त्यातूनच शिवाजीराजांना आपल्या वडीलांकडून स्फूर्ति मिळाली. आदिलशहाकडे असतानाच शहाजीराजांनी कर्नाटकात तंजावरची जहागिरी मिळविली. अशाप्रकारे शहाजीराजांनी शिवाजी राजांसाठी एक पार्श्वभूमी तयार केली. शिवाजीराजांवर संत तुकाराम यांच्या शिकवणीचा गाढा प्रभाव होता आणि त्यामुळेच त्यांनी अध्यात्मिक व धर्मनिरपेक्ष शिकवणीचा पुरस्कार केलेला आपणास आढळतो.

## ७.२ छत्रपती शिवाजी महाराज (इ.स. १६३०-१६८०)

छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म तारखेप्रमाणे १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर झाला. त्यांच्या मातेचे नाव जिजाबाई आणि पित्याचे नाव शहाजी होते. त्या काळी सतत मुघल आक्रमणाची भिती असे. दक्षिणेतील सामाजिक जीवन अत्यंत हलाखीचे होते. त्यातच १६३०-३१ला दुष्काळ पडला होता. महागाई वाढली होती. अन्नधान्यांचा तुटवडा निर्माण झाला होता. लोक खेडी सोडून रोजगारासाठी शहराच्या दिशेने जात होते. त्यामुळेच आर्थिक व्यवस्था पूर्णपणे मोडकळीस आली होती आणि व्यापार-उदयोगास अवकळा पसरली होती.

शिवाजीराजांच्या जन्मावेळी शहाजीराजे त्यांच्या जवळ नव्हते. अशावेळी त्यांचा सांभाळ करण्याची संपूर्ण जबाबदारी जिजाबाईवर पडली. त्यांनी धैर्याने संकटांना तोंड देत शिवाजीराजांस युद्धकलेचे संपूर्ण प्रशिक्षण दिले, त्यांच्या बालमनावर सुसंस्कार केले. त्यांच्यात शौर्य लढाऊ वृत्तीचे रोपण केले. न्या. रानडे यांच्या मते, "एखाद्या महान व्यक्तिवर जर त्याच्या आईचा प्रभाव असेल तर जिजाबाईचा आपल्या बाळ शिवाजीवरील व त्याच्या जडणघडणीवरील प्रभाव सर्वांत महत्त्वाचा होता. जिजाबाई यांनी शिवाजीस खरा स्वधर्म-स्वाभिमान आणि स्वातंत्र्य, आणि स्वराज्य मिळविण्याची प्रेरणा दिली.

शिवाजीराजांनी लहान वयातच पुणे जहागिरीचा कारभार पाहण्यास सुरूवात केली. त्यावेळी मुघलांच्या व आदिलशाही आक्रमणांनी संपूर्ण मुलूख उद्ध्वस्त केला होता. त्यातच दुष्काळानेही अधिकच्या संकटात भर घातली होती. त्यांनी ‘वतन’ विषयक लोकांचे तंटे, बखेडे सोडविण्याचे प्रयत्न केले. त्यांनी बऱ्याच प्रमाणात महसूल सुद्धा जमा केला आणि आणि संपूर्ण जहागिरीला भरभराटीस आणले. देशमुख, देशपांडे व कुलकर्णी यांना शेतकऱ्यांनी शेती लागवड करून तेथेच स्थायिक होण्याचे आदेश देण्यास सांगितले. आपल्या मावळे मित्रांसोबत त्यांनी रायरेश्वर मंदिरात सर्वात प्रथम ‘स्वराज्य’ स्थापनेची प्रतिज्ञा केली.

### ७.२.१ छत्रपती शिवाजीराजांच्या सुरूवातीच्या लढाया व मोहिमा:

छत्रपती शिवाजीराजांच्या 'स्वराज्य' स्थापनेवेळी दक्षिणेमध्ये विजापूरची आदिलशाही आणि गोवळकोंड्याची कुतुबशाही या दोन मुस्लिम सत्ता होत्या. शिवाजीराजांचा जहागिरीचा 'मावळ' प्रांत हा विजापूरच्या आदिलशहाच्या अंमलाखाली येत होता. त्यामुळेच शिवाजीराजांना आपला प्रथम लढा हा आदिलशाहीविरूद्ध द्यावा लागला.

इ.स. १६४६ साली विजापूर आदिलशहा आजारी पडला आणि जवळजवळ पुढील दहा वर्षे तो निष्क्रीयच राहिला. त्या संधीचा फायदा घेण्याचे शिवाजीराजांनी ठरविले. त्याकाळी किल्ले ताब्यात असणे हे राज्यविस्ताराच्या व स्वराज्यरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जात असे. त्यामुळे शिवाजीराजांनी पुणे जहागिरीच्या आजूबाजूला असलेल्या विजापूरच्या आदिलशहाच्या ताब्यातील किल्ले काबीज करण्याचे ठरविले. इ.स. १६४६ साली वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षीच शिवाजीराजांनी तोरणा किल्ला आदिलशाही किल्लेदाराच्या तावडीतून काबीज केला. या यशानंतर त्यांनी आदिलशाही साम्राज्यावर नियमित धाडी घालण्यास सुरूवात केली. त्यानंतर त्यांनी पुरंदर, राजगड आणि कोंढाणा हे किल्ले सुद्धा जिंकून घेतले. त्यानंतर शिवाजीराजांनी सुपे, जहागिर, बारामती व इंदापूरचे किल्ले आपल्या नियंत्रणात आणले. परंतु अचानक इ.स. १६४८ मध्ये आदिलशाही शासनाने जिंजीचा वेढा घालताना शहाजी राजांना अटक केली. त्यामुळे काही प्रमाणात शिवाजीराजांच्या राज्यविस्ताराला खीळ बसली. शहाजीराजांना अटक करून विजापूरला नेण्यात आले व जेव्हा शिवाजीराजांनी आदिलशाही साम्राज्यावर आक्रमण न करण्याचे व कोंढाणा किल्ला परत करण्याचे आश्वासन दिल्यावर त्यांना सोडून देण्यात आले.

इ.स. १६५६ मध्ये शिवाजीराजांनी पुन्हा आपल्या राजकीय हालचालींना सुरूवात केली. त्यांच्या राज्यविस्ताराला त्यांच्याच मराठा सरदारांकडून विरोध केला जात होता. त्यामध्ये जावळीचे मोरे अग्रस्थानी होते व ते शिवाजीराजांस तुच्छ लेखीत होते. जावळी हा प्रांत

सोळाव्या शतकापासून आदिलशहाच्या नियंत्रणाखाली होता व तो मोरे घराण्यास जहागिर स्वरूपात दिला होता. जावळीचे मोरे स्वतःस एक राजाच समजत असत व त्यांना 'चंद्रराव' हा किताबही बहाल करण्यास आला होता. जावळीचा प्रांत हा शिवाजीराजांच्या दक्षिणविस्तारात एक अडथळाच होता आणि चंद्रराव मोरे यांनी त्यांच्याविरूद्ध हितशत्रूची फळीसुद्धा संघटित केली होती. परंतु शिवरायांनी जावळीच्या मोऱ्यांना चांगलाच धडा शिकवला आणि त्यांचा बिमोड केला. जावळी ताब्यात आल्यावर आता दक्षिणेकडील राज्यविस्ताराचा मार्ग त्यांना मोकळा झाला. त्यांनी मावळ्यांची पायदळातील संख्या दुप्पट केली. त्यांनी प्रतापगडचा किल्ला बांधला आणि रायगड हस्तगत करून राज्याची राजधानी तेथे हलविली. इ.स. १६५७ मध्ये शिवरायांनी मुघल प्रदेशावर आक्रमण करून जुन्नरवर छापा टाकला. विजापूरच्या आदिलशहाने मुघलांचे वर्चस्व, मुघल राजकुमार औरंगजेबाकडे मान्य केल्यानंतर शिवरायांनी सुद्धा त्यांच्याबरोबर शांततापूर्ण राहण्याचे मान्य केले.

विजापूरच्या आदिलशाहीतील अंतर्गत गोंधळाचा फायदा घेत शिवरायांनी कल्याण, भिवंडी इ.स. १६५८ मध्ये काबीज केले. तसेच ठाणे आणि तत्कालीन कुलाबा जिल्ह्यातील ठिकाणे सुद्धा जिंकून घेतली. कल्याण जिंकून घेतल्यानंतर शिवरायांनी देखभाल करण्याचे काम आबाजी सोनदेववर सोपवले. शिवरायांनी कल्याणच्या खाडीतील अनेक जहाजांची बांधणी केली आणि तेथेच मराठा नौदलाचा पाया घातला. शिवरायांनी कोकणातील अनेक किल्ल्यांना तटबंदी केली आणि फौजा त्यांच्या रक्षणासाठी नेमण्यात आल्या. याचकाळात त्यांनी पोर्तुगिज आणि ब्रिटीशांबरोबर शस्त्रपुरवठा आणि तांत्रिक सहकार्यासाठी सतत बोलणी चालू ठेवली.

### ७.२.२ छत्रपती शिवाजी महाराज आणि अफझलखान वध:

छत्रपती शिवरायांच्या दिवसेंदिवस राज्यविस्ताराच्या बातम्यांनी विजापूरच्या दरबारात भितीचे वातावरण पसरले होते व संपूर्ण विजापूरच्या दरबारासमोर छत्रपती शिवाजीचा बंदोबस्त करण्याचा प्रश्न उभा राहिला होता. इ.स. १६५६ च्या नोव्हेंबरमध्ये विजापूरच्या मुहम्मद आदिलशहाचा मृत्यु झाला आणि राज्यकारभाराची धुरा बडी साहीबा हिच्या हातात आली. ती सुलतान अली आदिलशाह द्वितीय अज्ञानी असल्यामुळे त्याच्यावतीने विजापूचा कारभार पाहू लागली. त्याच दरबारात शहाजीराजांनी छत्रपती शिवाजी राजांच्या कारवायांना आळा घालण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे बड़ी साहीबाने दरबारात उपस्थित सर्व सरदारांना छत्रपती शिवरायांविरूद्ध धडक वृत्ती बंदोबस्त करण्याचे आवाहन केले. याच दरबारातील बलाढ्य सरदार अफझलखानाने छत्रपती शिवरायांचा बंदोबस्त करण्याचा विडा उचलला. आपल्यासोबत १०००० सैन्य घेऊन अफझलखान छत्रपती शिवरायांचा बिमोड करण्यास निघाला रस्त्यामध्ये त्याने ठिकठिकाणी लुटालूट, जाळपोळ करून रयतेचा छळ केला. त्याने तुळजापूरच्या भवानी मातेच्या मंदिरात सुद्धा धूमाकुळ घातला आणि तो वाई (सातारा) येथे येऊन पोहाचला.

अफझल खानाने ज्या प्रकारे छत्रपती शिवरायांनी नेस्तनाबूत करण्याच्या फुशारक्या मारल्या होत्या त्याप्रमाणे तो मात्र तसे करण्यास असमर्थ ठरला होता. म्हणून त्याने छत्रपती शिवरायांशी बोलणी चालू केली. परंतु त्या बोलण्यांमध्ये दोन्ही बाजूंकडून संशयाचे वातावरण होते. अफझलखानाने छत्रपती शिवरायांबरोबर समझौता करण्याचे व

सुलतानाबरोबर सलोखा करण्याचा प्रस्ताव ठेवला. प्रतापगपाच्या पायथ्याशी भव्य मंडप उभारण्यात आला. जेव्हा छत्रपती शिवराय अफझलखानाच्या दिशेने निघाले तेव्हा खानाने छत्रपती शिवरायांना अलिंगन दिले. छत्रपती शिवराय खानाच्या भव्य देहापुढे खुजे वाटत होते. याचाच फायदा उठवत खानाने छत्रपती शिवरायांची मान आपल्या बगलेत दाबून त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न केला. तेव्हा छत्रपती शिवरायांनी खानाचा डाव क्षणात ओळखून आपल्या हातातील वाघनखांनी खानाचा वध केला आणि खान खाली कोसळला ते पाहून खानाचा अंगरक्षक सय्यद बंडा छत्रपती शिवरायांवर वार करण्यास धावला आणि ताबडतोब जिवा महालाने (छत्रपती शिवरायांचा अंगरक्षक) त्याचे शिर धडावेगळे केले. अफझलखानाचा मृत्यु झाल्यानंतर त्याच्या सैन्याची दाणादाण उडाली व अनेक सैनिकांची कत्तल केली गेली. विजापूरचे सैन्य जीवाच्या आकांताने सैरावैरा पळू लागले. त्यातच छत्रपती शिवरायांनी पन्हाळ्याकडे कूच केले व पन्हाळा मोठ्या कौशल्याने काबीज केला. त्यानंतर रांगणा व खेळणा किल्ले जिंकून खेळणा किल्ल्याचे नामकरण 'विशालगड' असे केले. त्यानंतर छत्रपती शिवरायांनी राजापूरच्या समुद्र किनाऱ्याकडे कूच केले, दाभोळ जिंकून घेतले आणि प्रचंड संपत्ती रायगडाकडे पाठवून दिली. इ.स. १६६० मध्ये विजापूरच्या फौजांनी पन्हाळगडाला वेढा घातला व छत्रपती शिवरायांना शरण येण्यास सांगितले. परंतु छत्रपती शिवरायांनी मोठ्या युक्तीने तेथून सुटका करून घेऊन विशालगडाकडे आगेकूच केली. मग पन्हाळा गड विजापूरच्या फौजांनी सिद्धी जोहर याच्या नेतृत्वाखाली काबीज केला.

**आपली प्रगती तपासा**

१) जिजाबाईनी शिवरायांना कसे शिक्षण दिले ?

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

२) अफझलखान वधाचे वर्णन करा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## ७.३ छत्रपती शिवाजी महाराज व मुघल संबंध

छत्रपती शिवाजी महाराजांचा मुघलांशी संबंध प्रामुख्याने इ.स. १६६० १६७४ या दरम्यान आला आणि त्यांनी कधी मुघलांची सत्ता मान्य केली तर कधी ती अमान्य केल्याचे आपणास दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराजांनी काही वेळेस मुघलांच्या प्रदेशावरदेखील धाडी टाकल्या होत्या. परंतु इ.स. १६५६-५७ दरम्यान मुघल सत्तेचा दक्षिणेकडील प्रमुख युवराज औरंगजेब यास नेमल्यानंतर मुघलांची सत्ता नाकारणे आणि मराठ्यांना मुघल प्रदेशात लूट करणे कठीण झाले होते. या कालावधी दरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांनी

आदिलशाही प्रदेशावर आपला रोख वळवला होता आणि आपले स्थान बळकट करण्याचा प्रयत्न केला होता. त्यातच ज्यावेळी औरंगजेबाने विजापूरच्या आदिलशाहीविरुद्ध संघर्ष चालू केला त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी बरोबर सहकार्य करण्याऐवजी मुघलांच्या प्रदेशावरच छापे घालण्यास सुरुवात केली. परंतु दक्षिणेतील मोहिम अर्धवट सोडून औरंगजेबास दिल्लीमध्ये गादीवारसाच्या संघर्षासाठी जावे लागले आणि याच्या गैरहजेरीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी आपले स्थान अधिकाधिक बळकट करण्याचा प्रयत्न केला.

गादीसाठी वारसा युद्धामध्ये औरंगजेब यशस्वी झाला व दिल्लीचा मुघल बादशहा बनला. त्याने दक्षिण प्रांताचा प्रमुख म्हणून आपला मामा शाहिस्तेखान याला नेमले. जुलै १६५६ मध्ये शाहिस्तेखान दक्षिणेचा कारभार हातात घेण्यासाठी निघाला. मजल दरमजल करीत शाहिस्तेखान अहमदनगर मधून निघाला, त्याने पुणे काबीज केले. बारामतीवर वर्चस्व मिळविले आणि पुण्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वतःचे निवास 'लालामहल' येथे मुक्काम ठोकला. त्याने अनेक किल्ले जिंकून घेतले आणि जवळजवळ दोन महिने लालमहालात मुक्काम ठोकला. तो मुघल घोडेस्वारांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुलखात पाठवून तेथील स्थानिक लोकांना मारहाण करून लूटमार करत असे. त्याने आजूबाजूचा मुलूख बेचिराख करून टाकला होता. त्यातच औरंगजेबाने त्याच्या दिमतीला अतिरिक्त १००० राजपूत सैन्याची कुमकही पाठवून दिली व तिचा ताबा जसवंत सिंगास देण्यात आला होता. छत्रपती शिवाजी महाराज शाहिस्तेखानापासून दोन हात लांब राहून समोरासमोर युद्ध करणे टाळत होते. परंतु रयतेला खानाने त्रास दिल्याच्या बातम्या त्यांना मनोमन व्यथित करीत होत्या. खानाने जवळजवळ तीन वर्षे लालमहालात मुक्काम ठोकून रयतेला सळो की पळो करून सोडले होते. शेवटी ५ एप्रिल १६६३ रोजी मध्यरात्री छत्रपती शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानाला घडा शिकविण्याचे ठरविले. मुघलांचा कडेकोट बंदोबस्त असतानाही आपल्या निवडक ४०० मावळ्यांसह छत्रपती शिवाजी महाराजांनी रात्रीच्या कडेकोट अंधारात लाल महालात प्रवेश केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी थेट शाहिस्तेखानाच्या शय्यागृहात प्रवेश करून त्याच्यावर तलवारीने हल्ला केला. शाहिस्तेखान कसा बसा उठून खिडकीच्या बाहेर त्याने उडी मारली परंतु छत्रपती शिवाजी महाराजांनी तलवारीने त्याची बोटे छाटली. खान कसाबसा जीव वाचवून पळाला. परंतु त्याचा मुलगा मावळ्यांच्या तावडीतून सुटला नाही व प्राणास मुकला. खानाच्या सैन्याची पुरती दाणादाणा उडाली आणि सर्वत्र छत्रपती शिवाजी महाराजांच्या या धाडसाचे कौतुक होऊ लागले.

शाहिस्तेखानावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या हल्ल्याने औरंगजेब अत्यंत चिडला होता. त्यामुळे मामा शाहिस्तेखानाला त्याने बंगालचा ताबा दिला आणि आपला मुलगा मुअज्जम यास दक्षिणेत प्रमुख म्हणून नेमले. काही महिन्यांनी इ.स. १६६४ जानेवारी मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या मराठा सरदारांबरोबर पश्चिम किनाऱ्यावरील मुघलांचे एक महत्त्वाचे बंदर सुरतेवर छापा घातला. सुरत हे अत्यंत श्रीमंत व वैभवशाली शहर होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आक्रमणाची बातमी कळताच मुघल गव्हर्नरने तेथील किल्ल्यामध्ये आश्रय घेतला व लोकांच्या रक्षणाची जबाबदारी टाळली. छत्रपती शिवाजी महाराजांनी संपूर्ण सुरत शहर लुटून नेले. तेथील इंग्रज व डच यांनी आपल्या बंदीस्त वसाहतीमध्ये लपून आपला बचाव केला. सुरतेचा छाप्यामागे छत्रपती शिवाजी महाराजांचा

उद्देश मुघलांची दक्षिणेतील सत्ता अस्थिर करण्याचा होता. तसेच तेथील इंग्रज व डचांच्या मनात एक भीती निर्माण करण्याचा होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी या लुटीतून मिळालेल्या धनाचा उपयोग किल्ले बांधणी व तटबंदी उभारण्यासाठी केला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या या हालचालींनी औरंगजेब अधिकच अस्वस्थ झाला. आणि भारतात मुघल सम्राट असताना एक छोटा सरदार (शिवाजी) मुघल सत्तेला आव्हान देतो याचा त्याला अपमानसुद्धा वाटला. म्हणून त्याने दक्षिणेकडचा ताबा अंबरचा राजपूत सरदार मिर्झा राजा जयसिंग याला इ.स. १६६५ मध्ये सैन्याचे सेनापतीपद बहाल करून त्याला दक्षिणेत पाठवले. त्याच्याबरोबर दिलेरखानासारखे अत्यंत निष्णात सरदारसुद्धा सोबतीस पाठवले. मिर्झा राजा जयसिंग छत्रपती शिवाजी महाराजांची ताकद ओळखून होता. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांविरूद्ध अत्यंत काळजीपूर्वक, मुत्सद्दीपणे लष्करी तयारी करण्याचे त्याने ठरविले. त्याने आजूबाजूच्या प्रदेशांवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला. त्याने विजापूरच्या आदिलशाहाला छत्रपती शिवाजी महाराजांस कोणतीही मदत न करण्याचा इशारा दिला. तसेच इंग्रज व पोर्तुगिज ह्यांना लष्करी सहाय्य करण्यास सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांविरूद्ध आकस बाळगणारे हितशत्रू मराठे, देशमुख-देशपांडे यांच्याकडे ब्राम्हणांचे शिष्टमंडळ छत्रपती शिवाजी महाराजांविरूद्ध तटस्थ राहण्यासाठी व छत्रपती शिवाजी महाराजांच्या हालचालींची इत्यंभूत माहिती देण्यासाठी पाठविले. एवढेच नव्हे तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या अधिकाऱ्यांना सुद्धा मुघल बादशहाकडून आर्थिक बक्षिसी व मोठ्या सनदा मिळवून देण्याचे आश्वासन त्याने दिले. म्हणजेच त्यांची छत्रपती शिवाजी महाराजांच्याप्रती एकनिष्ठा कमी करण्याचा प्रयत्न केला.

मिर्झा राजा जयसिंगाने पुरंदरच्या किल्ल्या वेढा घातला (१६६५) त्याचबरोबर आजूबाजूच्या प्रदेशामध्ये इतरही फौजा रयतेला त्रास देण्यासाठी पाठवल्या. त्याने रयतेला लुटण्यास व दहशत माजविण्यास सुरूवात केली. शिवराय त्यावेळी गोव्याकडच्या मोहिमेवर होते आणि खबर मिळताच त्यांनी पुरंदरकडे एप्रिल १६६५ च्या मध्यात प्रयाण केले. मिर्झा राजा जयसिंग पुरंदरचा वेढा उठविण्यास तयार नव्हता. मग शेवटी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतःच त्याच्या बरोबर बोलणी करण्याचे ठरविले त्यानुसार जयसिंह आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मध्ये तह झाला. तो 'तो 'पुरंदरचा तह' म्हणून प्रसिद्ध आहे. त्या तहानुसार मुघलांना २३ किल्ले आणि त्यासभोवतालचा प्रदेश द्यावा लागला आणि शिवरायांकडे १२ किल्ले व त्या सभोवतालचा प्रदेश राहिला. याशिवाय मुघल बादशहाला वार्षिक खंडणीसुद्धा देण्याचे ठरले. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुत्र संभाजी यांस ५०००ची 'मनसब' देण्यात आली. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघल बादशहास दक्षिणेतील मोहिमांमध्ये लष्करी मदत करण्याचे आश्वासन दिले.

विजापूरविरूद्ध मुघलांच्या मोहिमेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी जयसिंगला लष्करी मदत केली परंतु पन्हाळागड विजापूरी फौजांच्या ताब्यातून सोडविण्यात त्यांना यश आले नाही. त्यातच जयसिंग विजापूरच्या फौजांना नेस्तनाबूत करू शकला नाही. त्यानंतर जयसिंगाने छत्रपती शिवाजी महाराजांना औरंगजेबाच्या भेटीचे निमंत्रण दिले. सुरूवातीला शिवराय आग्रा दरबारी भेटीसाठी तयार नव्हते, परंतु छत्रपती शिवाजी महाराजांना औरंगजेबाची व्यक्तिगत माहिती मिळवायची होती. दिल्ली दरबारचा कारभार पाहायचा होता. तसेच बादशहाची संसाधने कोणकोणती आहेत याचाही मागोवा घ्यायचा असल्यामुळे

त्यांनी बादशहाच्या दरबाराला भेट देण्याचे मान्य केले. जयसिंगाने छत्रपती शिवाजी महाराजांना व्यक्तिगत संरक्षण देण्याची जबाबदारी घेतली होती. शिवरायांना औरंगजेबाचा कपटी व कारस्थानी स्वभाव माहिती होता व आग्र्याहून परतीची खात्री त्यांना नव्हती. म्हणून त्यांनी स्वराज्य कारभाराची व्यवस्था सोपवून जिजाऊंना राज्यप्रमुखपद सांभाळण्यास दिले होते.

आपला मुलगा संभाजी आणि काही निवडक साथीदारांसह छत्रपती शिवाजी महाराजांनी आगऱ्यास प्रयाण केले. दोन महिन्यांचा प्रवास करून शिवराय आगऱ्यास पोहोचले. १२ मे १६६६ रोजी औरंगजेबाचा वाढदिवस होता आणि त्याचदिवशी त्याच्या भेटीसाठी रामसिंगाने (जयसिंगाचा पुत्र) छत्रपती शिवाजी महाराजांना दरबारात आणले. परंतु औरंगजेबाने त्यांची साधी दखलही घेतली नाही. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांना अपमान सहन न झाल्यामुळे त्यांनी भरदरबारातून रामसिंगाच्या निवासस्थानाकडे कूच केले. औरंगजेबास छत्रपती शिवाजी महाराजांच्या हेतूबद्दल संशय आल्यामुळे त्याने छत्रपती शिवाजी महाराजांना नजरकैदेत ठेवले. छत्रपती शिवाजी महाराजांना कळून चुकले की, औरंगजेबाच्या तावडीतून आता कधीच सुटका होणार नाही. म्हणून त्यांनी आजारपणाचे ढोंग घेतले आणि त्यातून लवकर बरे होण्यासाठी साधूसंतांचा आशीर्वाद मिळविण्यासाठी मिठाई वाटण्याचे निमित्त केले. शेवटी एक दिवस त्या मिठाईच्या पेटाऱ्यांतूनच युवराज संभाजीसह त्यांनी मोठ्या युक्तीने औरंगजेबाच्या तावडीतून आपली सुटका करून घेतली आणि मथुरेला उतरले. तेथून त्यांनी हिंदू साध्या वेशामध्ये औरंगजेबाच्या हातावर तुरी देऊन शेवटी डिसेंबर १६६६ मध्ये रायगडास पोहोचले.

आगऱ्याहून सुटका केल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी सतत तीन वर्षे मुघल बादशहाशी शांततेचे धोरण स्वीकारले. त्यातच मुघल सुद्धा छत्रपती शिवाजी महाराजांशी लढण्यास तत्पर नव्हते. त्यादरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यशासन संघटीत केले. महसूल व्यवस्था सुरळीत केली. किल्ल्यांची डागडूजी करून तेथे रसद व फौज ठेवण्यात आली आणि विजापूर व जंजिऱ्याचे सिद्धी यांचा विरोध असतानाही पश्चिम किनाऱ्यावर आपली सत्ता स्थिर केली. एप्रिल १६६७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी औरंगजेबास पत्र लिहून संभाजीस चारशेची फौज देऊन मुघलांना मदत करण्यास पाठवले. जसवंत सिंग आणि युवराज मुअज्जम यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाजूने औरंगजेबास खात्री दिली आणि शेवटी औरंगजेबाने छत्रपती शिवाजी महाराजांना 'राजा' म्हणून मान्यता देऊन चाकणचा किल्लासुद्धा परत केला. संभाजीराजांना ५०००ची मनसब पुन्हा बहाल करण्यात आली आणि छत्रपती शिवाजी महाराजांना वऱ्हाडची जहागिरी देण्यात आली.

तरीसुद्धा छत्रपती शिवाजी महाराज आणि मुघल यांच्यातील समझोता एक अपूर्ण सत्य होते. त्यातच युवराज मुअज्जम आणि मुघलांचा दक्षिणेतील मुख्य सेनापती दिलेरखान यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले होते. त्यामुळे दक्षिणेतील मुघल सत्ता कमजोर झाली होती. नोकरीतून काढून टाकलेले मुघल सैनिक छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात मिळाले. त्यातच मुघलांच्या खजिनदार अधिकाऱ्यांनी युवराज संभाजीराजांच्या जहागिरीमधून एक लाख रूपये वसुल करण्याचा प्रयत्न केल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज दुखावले गेले, त्यांनी संभाजीराजांस परत बोलावले आणि पुरंदरच्या तहान्वये

मुघलांना देण्यात आलेल्या किल्ल्यांपैकी एक एक किल्ला पुन्हा मिळवण्यास सुरूवात केली. कोंढाणा किल्ला घेण्यासाठी तानाजी मालुसरे यांने आपले प्राणाची बाजी लावली म्हणून त्या किल्ल्याला 'सिंहगड' असे नाव दिले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी पुरंदर आणि माहुली किल्ले परत मिळविले. ऑक्टोबर १६७० मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरतेवर दुसऱ्यांदा छापा टाकला आणि सहा लाख रूपयांची लूट केली. तेथून परतत असताना वणी दिंडोरी येथे त्यांची गाठ मुघल सैन्याशी पडली. परंतु तेथूनही ते कोकणाकडे सुखरूपपणे निसटले. त्यापुढे चार वर्षे छत्रपती शिवाजी महाराजांनी खानदेश, वऱ्हाड, बागलाण येथील प्रदेशांवर आक्रमण करून लूट केली. त्यांनी विजापूरी प्रदेशांवर देखील आक्रमणे केली. त्यानंतर मुघल आणि विजापूरी फौजांना मराठा फौजांबरोबर सतत संघर्ष केला आणि थोड्या फार प्रमाणात त्यांना यश-अपयश मिळाले.

**आपली प्रगती तपासा**

१) शाहिस्तेखानाची फजिती शिवरायांनी कशी केली ते स्पष्ट करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

२) छत्रपती शिवाजी महाराजांची आगऱ्याहून सुटकेचे वर्णन करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ७.४ शिवराज्याभिषेक

छत्रपती शिवाजी महाराजांना मुघलांविरूद्ध आणि आदिलशाही फौजांविरुद्ध चांगले यश मिळाल्यानंतर त्यांनी स्वतःस कायदेशीर राज्याभिषेक करून घेण्याचे ठरवले. त्यामुळे त्यांच्यावर शूद्र असल्याचा आरोप करण्यात आला आणि शूद्रांना राज्याभिषेक करण्याचा व छत्रपती म्हणवून घेण्याचा अधिकार नाही असे म्हणण्यात आले. मग छत्रपती शिवाजी महाराजांनी क्षत्रिय असल्याची वंशावळ कागदपत्रांसह सादर केली आणि शेवटी काशीचे पुरोहित गागाभट यांच्याकडून ६ जून १६७४ रोजी स्वतःचा राज्याभिषेक करवून घेतला. राज्याभिषेक सोहळा पार पडत असतांनाच काही अशूभ घटना घडल्यामुळे छ. शिवाजी महाराजांना दूसरा राज्याभिषेक करावा लागला. तो निश्चल पूरीने 'तांत्रिक' पद्धतीने २४ सप्टेंबर १६७४ रोजी केला. शिवराय मराठी स्वराज्याचे 'संस्थापक झाले. ह्या ठिकाणी नमूद करण्यासारखी गोष्ट ही की, महाराष्ट्रामध्ये तत्कालीन प्रकांडपंडीत पुरोहित असतानादेखील कोणीही शिवरांयांचा राज्याभिषेक विधी करण्यास पुढे सरसावला नाही. शिवराज्याभिषेक ही सतराव्या शतकातील अत्यंत महत्त्वाची राजकीय घटना मानली जाते. त्याद्वारे महाराष्ट्रामध्ये एक 'मराठी स्वराज्याची स्वतंत्र' निर्मिती झाल्याची इतिहासाला नोंद घ्यावी लागली.

## ७.५ छत्रपती शिवाजी महाराजांची कर्नाटक मोहिम

शिवराज्याभिषेक आणि संबंधित समारंभामध्ये अमाप खर्च झाल्यामुळे राज्याची तिजोरी बरीच खाली झाली होती. आपल्या राज्याभिषेक सोहळ्यापर्यंत छत्रपती शिवाजी महाराज अत्यंत व्यस्त होते. तरीही त्यांच्या विजापूर व मुघलांबरोबरच्या लढायांनी स्वराज्यामध्ये फारशी वाढ झाली नाही. त्यांच्या स्वराज्यामध्ये नाशिक, पुणे, सातारा, रत्नागिरी, सिंधुदूर्ग या जिल्ह्याचा समावेश होता. त्या मानाने स्वराज्यासाठी हा प्रदेश फारसा अधिक नव्हता. त्यामुळेच छत्रपती शिवाजी महाराजांना अधिकचा प्रदेश व आर्थिक स्रोतांची अत्यंत आवश्यकता होती. त्यातच मराठ्यांचे स्वतंत्र राज्य स्थापन केले होते आणि ते विधीवत स्वराज्याचे 'छत्रपती' झाले होते. त्यामुळे सुद्धा संसाधनांची त्यांना निकड भासू लागली. म्हणूनच त्यांनी इ.स. १६७७ मध्ये कर्नाटक मोहिम हाती घेण्याचे ठरवले.

छत्रपती शिवाजी महाराजांना कर्नाटक मोहिमेसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली होती. आदिलशाही राज्यात 'दख्खनी' आणि 'नवीन' सरदारांमध्ये आपापसात भांडण-तंटे चालू होते. मुघल फौजा वायव्य भारतामध्ये युद्धात गुंतल्या होत्या आणि त्यांचा दक्षिण प्रमुख राज्यपाल निष्काळजी होता. त्यामुळे त्याने छत्रपती शिवाजी महाराजांना कोणताही विरोध करण्याचे टाळले म्हणून या अनुकूल परिस्थितीचा छत्रपती शिवाजी महाराजांनी फायदा उठविण्याचे ठरविले. त्यांनी गोवळकोंड्याच्या अबुल हसन कडून दक्षिण मोहिमेसाठी आर्थिक मदत मिळविली. जानेवारी १६७७ मागे छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या ६००००च्या फौजेसह गोवळकोंडयाची राजधानी हैद्राबादकडे प्रयाण केले. त्यांनी अबुल हसन कुतुबशाहबरोबर अनेक बैठका घेतल्या. त्यामुळे विजापूरच्या आदिलशाहीविरुद्ध कर्नाटक मोहिमेसाठी संयुक्त सैन्य उभारण्याचे ठरविले.

गोवळकोंड्याच्या कुतुबशाहाकडून आर्थिक व लष्करी मदत घेऊन शिवरायांनी कर्नाटक मोहिमेसाठी हैद्राबादपासून कूच केले. त्यांची मोहिम वर्षभर चालली आणि शिवरायांनी जिजी आणि वेल्लोरचे प्रमुख किल्ले जिंकून घेतले, तंजावरकडे निघतांना शिवरायांनी मदुराच्या नायकाकडून मोठी रक्कम मिळविली. तंजावरला शहाजीराजांची जहागिर होती आणि त्यांचा सावत्र मुलगा व्यंकोजी तेथील कारभार पाहात होता. शिवरायांनी आपल्या वडीलांच्या जहागिरीचा हिस्सा व्यंकोजीकडून मिळवून पुन्हा त्याला कोलार, होस्कोट, बंगलोर आणि शेरा हे प्रदेश मोठया मनाने परत केले.

कर्नाटक मोहिम संपल्यानंतरच्या काळात शिवरायांनी कुतुबशाहास दक्षिण मोहिमेमध्ये सहकार्य करण्यास नाकारल्यामुळे उभयतांमधील संबंध बिघडले गेले. त्यामुळे गोवळकोंडाच्या कुतुबशाहाने विजापूरी मंत्र्यांबरोबर संधान बांधले आणि शिवरायांविरूद्ध त्यांना आर्थिक मदतही केली. परंतु ही मराठा विरोधी युती यशस्वी झाली नाही. त्यातच मुघल गव्हर्नर बहादूरखान यांच्या जागी दक्षिण प्रमुख म्हणून दिलेरखानाची नेमणूक केली गेली. दिलेरखानाने विजापूरच्या अफगाणी सरदारांबरोबर संधान बांधून विजापूरी सत्ता नेस्तनाबूर करण्याचे ठरविले. त्यामुळे शिवरायांविरूद्ध कोणतीही संयुक्त मोहिम होण्याची शक्यता मावळली.

छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यु इ.स. १६८० मध्ये झाला. परंतु आपल्या कारकीर्दीमध्ये त्यांनी स्वराज्याची प्रशासनव्यवस्था, जनकल्याणकारी राज्यव्यवस्था निर्माण केली त्याला इतिहासात तोड नाही. त्यांनी मराठयांचे स्वतंत्र राज्य निर्माण केले. त्यांच्या अगोदर कोणत्याही मराठा सरदाराच्या मनामध्येही कल्पना सुद्धा अवतरली नव्हती. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांनी ती कल्पना मूर्तपणे उतरवून दाखवली. छत्रपती शिवाजी महाराज हे कुशल सेनापती, मुत्सदी, शिस्तप्रिय, प्रजाहितदक्ष आणि कुशल प्रशासक होते.

## ७.६ छत्रपती शिवाजी महाराजांची प्रशासन व्यवस्था

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यविस्तार विशिष्ट प्रदेशापुरताच होता हे सांगणे कठीण आहे. जदुनाथ च्या मते, "पोर्तुगिज प्रदेशा व्यतिरिक्त छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य सर्व भारतभर थोड्याफार प्रमाणात का होईना अस्तित्वात होते. त्यामध्ये उत्तरेस रामनगरपासून दक्षिणेकडे कारवार गंगावती नदीपर्यंत तर पूर्वेस बागलाण ते नाशिकपर्यंतचा प्रदेश सामाविष्ट होता. तसेच संपूर्ण सातारा, कोल्हापूर तर बेळगाव पासून तुंगभद्रा नदीपर्यंत त्यांची सत्ता चालत असे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ताब्यात उत्तर, मध्य आणि पूर्व कर्नाटक राज्य आणि तामिळनाडू जिल्ह्याच्या काही भागात सुद्धा सत्ता होती. "

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या मराठी स्वराज्यासाठी चिरकालीन अशी प्रशासन व्यवस्था निर्माण केली. त्यांच्या प्रशासनाचा मुख्य आधार हिंदू व मुस्लिम प्रशासनव्यवस्था होती. छत्रपती शिवाजी महाराजांना स्थानिक वतनदारांची कार्यपद्धती माहित असल्यामुळे केंद्रिय प्रशासनं संपूर्णपणे मजबूत करण्यावर त्यांचा जोर होता. प्रजेचे हित आणि स्वराज्याची सुरक्षा हे दोन महत्त्वाचे हेतू त्यांच्या समोर होते. जदुनाथ सरकार यांच्या मते, " छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासनव्यवस्थेचे प्रमुख उद्देश आपल्या प्रजेस शांतता, सहिष्णुता, समानसंधी, सर्वधर्म समानता, कल्याणकारी शासन, कार्यक्षम व पारदर्श प्रशासन, व्यापारवृद्धीसाठी नौदल आणि स्वराज्यरक्षणासाठी प्रशिक्षित सैन्य उभारणे हे होते. "

डॉ. के. एन. चिटणीस यांच्या मते, “छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वतंत्र मराठा राज्य 'राष्ट्रीय' मूल्ये आणि हिंदू परंपरेने प्रेरित झालेले होते. रामचंद्र पंत अमात्य आपल्या आज्ञापत्रांत असे म्हणतात की, राजाचे कर्तव्य जनतेचे रक्षण करणे, सार्वजनिक हिताची कामे करणे, कायद्यानुसार न्यायनिवाडा करणे, प्रजेच्या हितार्थ आणि स्वराज्याच्या रक्षणार्थ लष्करी व नागरी सेवा बहाल करणे होय. " या नात्याने शिवाजी महाराजांनी आपले कर्तव्य यशस्वीपणे पार पाडले होते.

### ७.६.१ केंद्रीय प्रशासन व्यवस्था:

छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वसामान्य व एकाधिकारी कल्याणकारी राजा होते. कायदा, प्रशासन, न्याय आणि सैन्यव्यवस्था यांचा सर्वाधिकार हा राजा शिवरायांकडे होता. त्यांनी राज्याची सर्व सूत्रे आपल्याकडेच ठेवली होती. त्यामुळे त्यांना एखाद वेळी कोणी 'हुकूमशहा' म्हणू शकलो. परंतु त्यांनी आपल्या संपूर्ण कारकीर्दीमध्ये प्रजेसाठी जी कल्याणकारी व्यवस्था निर्माण करून ठेवली त्यावरून त्यांना 'प्रजाहितदक्ष म्हणावे लागेल, किंबहुना ते खऱ्या अर्थाने 'रयतेचे राजे' होते, हे त्यांच्या प्रशासन व्यवस्थेतून दिसून येते.

### ७.६.२ अष्टप्रधानमंडळ

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यकारभार सुरळीत चालावा, संपूर्ण राज्यावर व प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी योग्य सल्लागार मंडळाची व्यवस्था त्यांनी निर्माण केली. त्यामध्ये आठ प्रधानांचे मंडळ कार्यरत होते. ते इतिहासात 'अष्टप्रधानमंडळ' म्हणून प्रसिद्ध आहे. हे अष्टप्रधानमंडळ प्रत्यक्षपणे 'राजा शिवछत्रपतीस' जबाबदार असे. त्यांना राजे बेजबाबदारीच्या कारणाने पदावरून केव्हाही दूर करू शकत होते. त्यांची राज्याप्रती व राजाप्रती एकनिष्ठा असणे आवश्यक होते. त्याचे स्वरूप फक्त सल्लागारापुरतेच मर्यादित होते. आणि ते स्वतः कोणतेही धोरण ठरवून त्यांची अंमलबजावणी करू शकत नव्हते. सदर अष्टप्रधानमंडळामध्ये पुढील मंत्र्यांचा समावेश होता.

**१) मुख्य प्रधान (पेशवा):**

हे पद मुख्य प्रधान राजाचा प्रतिनिधी आप आणि राज्याचा सर्वसामान्य कारभार पाहात असे. राज्याच्या प्रत्येक वर राजाच्या मोहोरखाली मुख्य प्रधानाची मोहोर असावी लागे

**२) अमात्य (मुजुमदार):**

महसूल विभागाचा प्रमुख अमात्य असे त्यांचे कार्य संपूर्ण राज्याचा जमाखर्च तपासणे आणि त्याचा अहवाल राज्याला सादर करणे असे त्याला संपूर्ण राज्याचे हिशेब तपासणी अहवाल आणि हिशेब तपासून सही करावी लागे,

**३) सचिव (शुरूनवीस):**

सचिवांकडे राजाच्या पत्रव्यवहाराची मुख्य जबाबदारी अस राजदरबाराकडून जाणारी सर्व पत्रे आणि प्रत्येक दस्तऐवज योग्य पद्धतीने लिहिलेला आहे किंवा नाही हे तपासण्याची जबाबदारी सचिवाची असे. प्रत्येक पत्राच्या वर मध्यभागी त्याने शुरूशुद (शुरूवात) असे लिहिणे क्रमप्राप्त होते

**४) मंत्री (वाका-इ-नवीस):**

ह्यांची जबाबदारी 'सरकारी दप्तर प्रमुख' म्हणून असे. राजाच्या दैनंदिनीची तसेच न्यायालयीन कामकाजाची दररोज नोंद ठेवण्याची जबाबदारी त्यांस पार पाडावी लागत असे. राजाला भेट देणा-यांची यादी तपासणे आणि त्यांच्यावर पहारा ठेवणे, शिवाय राजाच्या भोजनाची काळजी घेणे ही कामे सुद्धा पाहावी लागत असत. जेणेकरून राजाविरुद्ध कोणीही कटकारस्थान रचणार नाही. थोडक्यात, राजाचे खाजगी सचिव आणि त्याचे भाट किंवा इतिहासकार म्हणून मंत्र्यास काम करावे लागत असे.

**५) सुमंत (डबीर):**

परराष्ट्र मंत्री म्हणून युद्ध व तह शांतता यासाठी आणि परराष्ट्र संबंध स्थापित करण्याच्या बाबतीत छत्रपतींस सल्ला देण्याची जबाबदारी सुमंत पार पाडीत असे. तसेच त्यांच्याकडे शेजारच्या राज्य व राष्ट्राविषयी अद्यावत माहिती तयार असावी लागत असे. परराज्यातील

राजदूतांचे स्वागत करणे, त्यांची व्यवस्था करणे आणि भेटीचे उदेश जाणून घेण्याचे कामही त्यांनाच करावे लागे.

**६) पंडितराव**:

धार्मिक प्रमुख पंडितराव यांना धर्मविषयक ज्ञान, धर्मनीतिविषयक तत्त्वे, तंटे, आणि धार्मिक औदार्य यांबाबतीत माहिती असावी लागे. विद्वान, ब्राह्मण आणि धार्मिक साधुसंत यांचा मान सन्मान राखण्याचे काम त्यांना करावे लागे. त्यांनाच धार्मिक सण समारंभ यांच्या तिथी, कार्यक्रमाचे स्वरूप, धार्मिक उल्लंघनासाठी दंड व शिक्षा देण्याचे काम करावे लागत असे.

**७) न्यायधिश:**

मुख्य न्यायाधिश, दिवाणी आणि फौजदारी गुन्ह्यांचा न्यायनिवाडा हिंदू कायद्यानुसार करण्याचे काम मुख्य न्यायाधिशास करावे लागे. तसेच जमिनीबाबत वादविवाद किया गावप्रमुख पदाविषयीचे तंटे सोडविण्याचे कामही ह्यांनाच करावे लागे,

**८) सेनापती:**

मुख्य सेनापती किंवा सरसेनापती यांचे कर्तव्य सैन्य उभारणी करणे व त्यांची संपूर्ण व्यवस्था, भरती, पदोन्नती, पदावनती करण्याचे असे. त्यांना शेजारच्या प्रदेशांमध्ये मोहिमा आयोजित कराव्या लागत असत, तसेच नव्याने जिंकलेल्या प्रदेशांवर नियंत्रण ठेवण्याचे कामही त्यांचेच असे.

या ठिकाणी नमूद करण्यासारखी गोष्ट ही की, सेनापती सोडल्यास इतर सातही मंत्री हे ब्राह्मण होते. तसेच न्यायाधिश व पंडितराव या दोन मंत्र्यांव्यक्तिरिक्त इतर सहा जणांना राज्यकारभाराव्यक्तिरिक्त युद्धातही सहभागी व्हावे लागत असे. शिवरायांनी अष्टप्रधान मंडळातील अधिकारपदे वंशपरंपरागत ठेवलेली नव्हती. तसेच त्यांना कोणत्याही स्वरूपात जहागिर बहाल न करता त्यांना रोख पगार दिला जाई. राज्याचा प्रत्यक्ष पत्रव्यवहार दोन प्रमुख कायस्थांकडून पाहिला जात असे, त्यामध्ये बाळाजी आवजी हे चिटणीस आणि निळाजी हे मुन्शी म्हणून काम पाहात होते. त्या व्यक्तिरिक्त 'सबनीस' नावचे अधिकारी सैन्याची दैनिक हजेरीचे काम पाहात असत. त्याबरोबर सैन्याचे पगारपत्रक तयार करणे व मंजूर करून घेण्याचे कामही त्यांना करावे लागत असे.

**७.६.३ स्थानिक प्रशासनव्यवस्था:**

**अ) प्रांत:** शिवरायांचे राज्य तीन पातळीवर विभागले गेले होते. त्यांना 'प्रांत' म्हटले जाई. ते पुढीलप्रमाणे

१) **उत्तर विभाग (प्रांत):** यामध्ये नाशिक जिल्ह्यातील साल्हेर आणि पुणे, कोकणचा भाग तर मुंबईपासून १०० मैल उत्तरेकडील प्रदेशाचा समावेश होता.

२) **मध्य विभाग (प्रांत):** यामध्ये घाटमाथा ते थळघाट आणि कोकण ते दक्षिण मुंबई आणि भातखळ पर्यंतचा समावेश होता.

३) **दक्षिण विभाग (प्रांत):** घाटाच्या पलिकडील भाग म्हणजे वरघाट किंवा 'देश' आणि दक्षिण पुण्यापासून ते कोप्पल आणि तुंगभद्रापर्यंतचा प्रदेश या प्रांतात समाविष्ट होता. प्रत्येक प्रांताचा प्रमुख म्हणून 'सरकारकडून' नेमला जाई.

**ब) जिल्हा** प्रांतांची विभागणी जिल्ह्यांमध्ये केलेली होती. त्याचा प्रमुख 'सुभेदार' असून त्याच्या मदतीला मुजूमदार दिला जाई. त्याची जबाबदारी जिल्ह्याचा हिशेब तपासण्याची असे.

**क) महाल**ः जिल्ह्याची विभागणी पुढे महालांमध्ये केली गेली होती. त्याचे प्रमुखपद 'हवालदारा' कडे असे.

**ड) परगणा**ः महालाव्यक्तिरिक्त काही ठराविक खेड्यांच्या समूहाला 'परगणा' म्हटले जाई आणि परगण्यातून महसूल जमा करण्याची जबाबदारी परंपरागत चालत असलेल्या देशमुख व देशपांडे नावाच्या अधिकान्यांवर असे.

**इ) खेडेगाव / ग्राम**ः गावपंचायत ही खेडेगावाची प्रमुख कार्य संस्था असे. तेथे पाटील व कुलकर्णी हे दोन प्रमुख अधिकारी कारभार सांभाळीत असत. परंतु गावपंचायतीचा सल्ला त्यांना घेणे आवश्यक असे.

**आपली प्रगती तपासा**

१) छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळाचे कार्य विशद करा.

____________________

____________________

____________________

____________________

२) छत्रपती शिवरायांच्या प्रांतीय प्रशानाचे वर्णन करा.

____________________

____________________

____________________

____________________

### ७.६.५ छत्रपती शिवरायांची महसूल व्यवस्था:

छत्रपती शिवराय सतत लढायात, मोहिमांमध्ये गुंतलेले असले तरी त्यांनी आपल्या राज्यासाठी अतिशय उत्तम महसूल व आर्थिक व्यवस्था तयार केली होती.

१) जमीन महसूल राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन होते म्हणूनच त्यांनी भक्कम पायावर महसूल व्यवस्था उभारली होती.

२) त्यांनी तोडरमल व मलिक अंबरच्या महसूल पद्धतीचा आधार घेतला होता.

३) जमिनीची मोजणी करण्यासाठी ठराविक मापाची काठी वापरली जाई.

४) जमिनीच्या सुपीकतेनुसार तिची चार वर्गात विभागणी करून त्याला प्रथम, द्वितीय, तृतीय आणि पडीक जमीन वर्ग असे म्हटले जाई.

५) जमिनीचे सिंचनयुक्त व सिंचन-विरहीत असे वर्गीकरण केले जाई.

६) महसूल आकारणी करताना लागवडीखालील जमिनीची पत, त्याला उपलब्ध पाणीपुरवठा यांचाही विचार केला जात असे.

७) शेतकऱ्यांकडून जवळजवळ उत्पन्नाच्या ३३% ते ४०% महसूल जमा केला जाई आणि त्यांना शेतीसाठी प्रोत्साहित केले जाई. त्यासाठी त्यांनी देसाई व मध्यस्थ यांचे निर्मूलन केले आणि शेतकऱ्यांकडून राज्याच्या प्रत्यक्ष कर्मचाऱ्यांकरवी महसूल (शेतसारा) जमा करण्यास सुरूवार केली. त्यामुळे शेतकऱ्यांचे शोषण बंद झाले.

८) शेतकऱ्यांना गुरे, बी-बियाणे आणि व्याजमुक्त कर्ज देणे आणि त्याची फेड सुलभ हप्त्यात करणे, इ. सवलती दिल्या जात. त्याचबरोबर अधिकाधिक जमीन ओलिताखाली आणण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या सूचना आपल्या अधिकाऱ्यांना शिवरायांनी दिलेल्या होत्या.

९) छत्रपती शिवरायांची महसूल व्यवस्था मानवतावादी, कार्यक्षम आणि कल्याणकारी राज्यातील प्रजेला पोषक अशी होती.

१०) जमीन महसूलव्यक्तिरिक्त सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांवरील कर व्यापार, व्यवसाय, धंदा आणि इतर प्रासंगिक वेळी कर गोळा केले जात.

११) छत्रपती शिवरायांची रायगडावर स्वतःची टांकसाळ होती व त्यातूनही त्यांना उत्पन्न मिळत असे. त्याचबरोबर जवाहीर लोक स्वतःची टांकसाळ उघडण्यासाठी (मुक्त नाणे पद्धतीसाठी) राज्याकडून परवाना घेत असत.

१२) छत्रपती शिवरायांनी वेगवेगळ्या प्रकारची बत्तीस सोन्याची आणि सहा चांदीची नाणी पाडली होती.

### ७.६.६ चौथाई व सरदेशमुखी:

चौथ म्हणजे राज्याच्या एकूण महसूलाचा चौथा हिस्सा होय. तो एक प्रकारचा करच होता. त्याचा उगम दमण येथे असलेले पोर्तुगिज तेथील कोळी राजाला (रामनगर) इ.स. १५७९ पासून देत असल्याचे कळते तेव्हा झाला. छत्रपती शिवरायांनी चौथाई वसुली एकदम पद्धतशीर बनवली होती. ती मराठा सैनिकांनी छापा टाकलेल्या प्रदेशांतूनच वसूल केली जाई. जेव्हा एखादा प्रदेश छत्रपती शिवरायांची जबाबदारी नसल्यामुळे त्याप्रदेशातून चौथाई वसूल केला जाई. त्यामुळे प्रामुख्याने मुघल प्रांतावर (शत्रू प्रदेशावर) चौथाई लादली जात असे. इ.स. १६७२ मध्ये छत्रपती शिवरायांनी औरंगजेबानेच सैन्यभरतीसाठी प्रवृत्त केल्याचा दाखला देत चौथाईचे समर्थन केल्याचे आपणास दिसते.

सरदेशमुखी आणि चौथाईमध्ये मुख्य फरक हा होता की, सरदेशमुखी राज्याकडून तर चौथाई राज्याबाहेरील प्रदेशाकडून वसूल केली जाई. सरदेशमुखी हा सुभ्याच्या संपूर्ण

महसूलाच्या १०% होता व मराठे सुभेदार तो वसुल करीत असत. शिवराय स्वतःच एक पारंपारिक सरदेशमुख असल्यामुळे त्यांनी तो इ.स. १६४८ मध्ये शाहजहानकडून मागितला असल्याचे समजले जाते. सरदेशमुखी हा हक्क समजाला जाई. काही आकडेवारीनुसार चौथाई द्वारे ८० लाख होन तर सरदेशमुखीद्वारे एक कोटी होनांचे उत्पन्न (सभासद बखरीनुसार) राज्याला प्राप्त होत होते.

### ७.६.७ छत्रपती शिवरायांची न्यायव्यवस्था:

१) छत्रपती शिवाजी महाराजांची न्याय व्यवस्था निष्पक्ष तसेच धर्मसहिष्णू होती. शिवरायांची न्यायव्यवस्था पारंपारिक, साधी पण कार्यक्षम होती.

२) कोणतीही विशिष्ट नियमावली किंवा न्यायालये स्थापित केलेली नव्हती

३) स्थानिक पातळीवरील तंटेबखेडे पंचायतीद्वारेच सोडवले जात असत.

४) गाव पंचायतीशिवाय प्रत्येक जातींच्या व जमातींच्या स्वतंत्र जातपंचायती वेगवेगळ्या प्रांतामध्ये कार्यरत होत्या. उदा. ब्रह्मसभा, जातीसभा.

५) शिक्षेचे स्वरूप सौम्य होते परंतु काही गंभीर बाबतीत दिव्य करणे आणि हातपाय तोडणे अशासुद्धा शिक्षा केल्या जात.

६) मुख्य प्रधान न्यायदान प्रक्रियेत काही वेळा रस घेत असे.

७) खुनाच्या गुन्ह्यांत आणि देशद्रोहाच्या आरोपाखाली दंड देणे, मालमत्ता जप्त करणे आणि तुरूंगात डांबणे इ. प्रकारच्या शिक्षा दिल्या जात असत.

### ७.६.८ छत्रपती शिवरायांचे लष्करी व्यवस्थापन:

मराठे हे पारंपारिकदृष्ट्या लढवय्ये, शूर सैनिक होते. त्यांनी दक्षिणेतील सुलतानशाहीमध्ये सेवा करून युद्धाचा अनुभव घेतला होता. त्यामुळे ते युद्धकौशल्य आणि चातुर्य-मुत्सद्दीपणा यांमध्ये तरबेज होते. त्यामुळेच मराठ्यांना त्यांच्या घरातूनच युद्धाचे शिक्षण पिढ्यानपिढ्या मिळत होते. छत्रपती शिवराय स्वतः जन्मजात लढवय्ये असल्यामुळे त्यांचे सैन्य व्यवस्थापन पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट होते.

१) छत्रपती शिवरायांच्या सैन्यामध्ये पायदळ, घोडदळ आणि अनियमित व अस्थायी सैनिक असे प्रमुख तीन विभाग होते.

२) पायदळ हा सर्वात प्रमुख विभाग असून त्याची संख्या घोडदळ व इतरांपेक्षांही अधिक असे.

३) राज्याच्या घोडदळामध्ये 'हवालदार' हा सर्वात हा सर्वात खालचा विभागप्रमुख असून त्याच्या अंमलाखाली पंचवीस घोडेस्वारांचा हा एक गट असे. तसेच पाच हवालदारांचा प्रमुख एक 'जुमलादार' आणि दहा जुमलादारांचा प्रमुख एक 'हजारी' होता.

४) घोडेदळाचे सर्वात उच्च पद म्हणजे 'पंचहजारी' हे होते. शिवाय घोडदळाचा प्रमुख 'सरनोबत' असे.

५) जे सैनिक आपली स्वतःची शस्त्रे व घोडे आणत असत त्यांना शिलेदार म्हटले जाई.

६) पायदळाचा सर्वात लहान घटक म्हणजे नऊ सैनिकांचा गट आणि त्याच्या प्रमुखास 'नायक' म्हटले जाई. तर पायदळाच्या प्रमुखास सुद्धा 'सरनोबत' म्हटले जाई.

७) घोडदळातील सैनिकांना पायदळापेक्षा अधिक पगार मिळत असे.

८) छत्रपती शिवरायांच्या सैन्यामध्ये जवळजवळ ७०० पठाण सैनिक होते आणि त्यांना विजापूरच्या सैन्यामध्ये दांडगा अनुभव होता.

९) छत्रपती शिवरायांच्या सैन्याची मुख्य भिस्त स्थानिक, शूर लढवय्ये काटक मावळ्यांवर होती व ते बहुसंख्येने होते.

१०) छत्रपती शिवरायांचा गनिमी कावा हा तत्कालिन भूप्रदेशानुसारच होता आणि त्याचा सराव विजापूरच्या सैन्यात तुर्की घोडदळाने सुरूवात केलेला होता. त्यामुळे कमी सैन्य संख्येच्या जोरावर अधिक सैन्य संख्येच्या शत्रू सैन्यास गारद करता येऊ शकत होते. त्यामुळेच छत्रपती शिवराय बलाढ्य मुघलांबरोबर, आदिलशहाबरोबर वर्षानुवर्षे यशस्वी लढा देऊ शकले.

११) छत्रपती शिवरायांच्या सैन्यामध्ये स्वतंत्र तोफखाना नसल्यामुळे त्यासाठी त्यांना युरोपियन विशेषतः अवलंबून राहावे लागत होते आणि त्यांच्याकडूनच तोफखाना पुरवला जाई.

१२) छत्रपती शिवरायांच्या सैन्यामध्ये १० हजार पायदळ ३० ते ४० हजार घोट जहाजे हत्ती आणि थोड्याफार प्रमाणात तोफखाना होता

१३) छत्रपती शिवरायांच्या सैन्यामध्ये स्त्रियांना वाव नव्हता. त्यांचे सैन्य अत्यंत शिस्तप्रिय होते. आणि प्रजेचे रक्षण करणे कर्तव्य होते. इ.स. १६७३ मध्ये छत्रपती शिवरायांनी आपल्या सैन्याधिकाऱ्यास एक पत्र पाठवून त्यात शेतकरी स्त्रिया, दुकानदार, व्यापारी यांचे रक्षण करण्याचे नमूद केले आहे.

१४) वर्षातील बारा महिन्यांतील आठ महिने लष्कराला युद्ध मोहिमांवर जावे लागत असे पावसाळ्यातील चार महिने युद्धमोहिमा थांबवाव्या लागत असत युद्धमोहिमेवर जातांना सैनिकांनी बरोबर घेतलेल्या सामानाची, शस्त्रास्त्रांची, यादी केली जाई

१५) लढाईच्या वेळी फक्त पुरुषांनाच युद्धकैदी केले जाई आणि कोणत्याही मार्मिक क्षेत्रावर किंवा तीर्थक्षेत्रावर हल्ला करणे निषिद्ध मानले जाई. लुटून आणलेली संपत्ती राजाच्या समोर ठेवली जाई व ती राज्याच्या खजिन्यामध्ये इतर खर्चासाठी वापरली जाई.

१६) युद्धामधील कामगिरीवर सैन्यास बढ़ती दिली जाई. शिवराय स्वतः सैनिकांमध्ये मिसळत असत आणि भरती करताना जातीने लक्ष घालीत. सैनिकांना विशिष्ट आचारसंहिता पाळावी लागत असे. युद्धमोहिमेवर जाताना बायकापोरे किंवा इतर अडवणीचे साहित्य घेण्यास सैनिकांस मनाई होती.

१७) शिवाय लष्करी व्यवस्थापनामध्ये किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्त्व होते, ग्रँन्ड डफच्या मते, "लष्करी दृष्टीकोनातून पाहिल्यास जगातील इतर कोणत्याही राष्ट्रापेक्षा मराठा प्रदेश जिंकण्यास अधिक कठीण आहे. शिवरायांच्या ताब्यात २४० किल्ले होते त्यांची निर्मिती डागडूजी आणि सुशोभीकरण करण्यासाठी ते हवी तेवढी रक्कम खर्च करीत असत. प्रत्येक किल्ल्यावर कमीत कमी ५०० सैनिकांची फौज रक्षणासाठी तैनात असे आणि अनेक महिने पुरेल एवढे अधान्य, शत्रसाठा त्यांवर ठेवलेला असे. किल्ल्यावर तीन प्रमुख अधिकारी असत आणि ते तिघेही वेगवेगळ्या जातीमधील असत आणि किल्ल्याच्या रक्षणाची संयुक्त जबाबदारी त्यांच्यावर असे. किल्लेदाराचे (हवालदार) प्रमुख काम म्हणजे अधिकृत पत्रव्यवहार करणे, सूर्यास्तापूर्वी किल्ल्याचा मुख्य दरवाजा बंद करणे आणि सूर्योदयावेळी तो उघडणे आणि त्याच्या किल्ल्या सांभाळण्याचे होते. किल्ल्यावर हिशेब ठेवण्याचे काम सबनीस तर गस्त घालण्याचे काम सरनोबत आणि भांडारगृह सांभाळण्याचे काम कारखानीस करत असे.

**१८) छत्रपती शिवरायांचे आरमार (नौदल):** छत्रपती शिवरायांच्या नौदल आरमाराचा उगम इ.स. १६५९ मध्ये झाला. छत्रपती शिवरायांना आरमार उभारणीची दूरदृष्टी प्राप्त झाली होती. त्यामुळे जंजिऱ्याच्या सिद्धीचा धोका, समुद्रमार्ग मालवाहतुक, युद्धमोहिमा राबवणे व मुघलांच्या आरमारावर छापा टाकणे आणि परदेश व्यापाराला चालना देण्यासाठी शिवरायांनी आरमाराची उभारणी केली होती. त्यांनी पाच प्रकारची दोनशे जहाजे तयार करवून घेतली होती. शिवरायांनी दौलतखानास जहाजांचा प्रमुख नेमले होते. परंतु आरमाराद्वारे शिवरायांनी एखादी मोठी लढाई जिंकल्याची नोंद नाही. तरीही आरमाराच्या उभारणीबाबत शिवरायांची दूरदृष्टी हे त्यांचे स्वतंत्र राजा असण्याचे आणि कुशल प्रशासकाचे द्योतकच आहे.

वरील विवेचनावरून आपणास असे आढळते की, छत्रपती शिवरायांनी आपल्या प्रशासन व्यवस्थेमध्ये काही प्रमाणात हिंदू व मुस्लिम समन्वय सिद्धांतांचा संगम साधला होता. आपल्या ५० वर्षाच्या कारकीर्दीत त्यांनी जे काही निर्माण केले ते अतुलनीयच म्हणावे लागेल. ते खरे रयतेचे राजे असून त्यांची प्रजा अत्यंत निष्ठावान व सुखी होती. राज्याच्या राज्यकारभारासाठी त्यांनी 'राज्यव्यवहार कोश' तयार करवून घेतला. शिवराय कट्टर हिंदू असले तरी सर्व धर्मांच्या बाबतीत ते अत्यंत सहिष्णु होते. त्यांच्या सैन्यात मुस्लिम, मराठा, शुद्र इ. सैनिक होते व प्रत्येकाला आपल्या धर्माचे प्रार्थनांचे आचरण करण्याचे स्वातंत्र्य होते. म्हणूनच रामचंद्र पंत अमात्य एका पत्रात लिहून ठेवतात-"शिवाजीने नूतन सृष्टीच निर्माण केली. ''

**आपली प्रगती तपासा**

१) चौथाई व सरदेशमुखी म्हणजे काय ते स्पष्ट करा.

२) छत्रपती शिवरायांचे नौदल प्रशासनाचे वर्णन करा.

## ७.७ छत्रपती राजा संभाजी (इ.स. १६८०-१६८९)

छत्रपती संभाजीचा जन्म इ.स. १६५७ रोजी झाला. छत्रपती शिवरायांनी अफझलखानाचा इ.स. १६५९मध्ये वध केल्यानंतरच छत्रपती शिवरायांचा वारसा युवराज संभाजींस करण्याचे ठरले होते. इ.स. १६६५ च्या पुरंदरच्या तहान्वये संभाजींना मुघल बादशहाकडून ५०००ची मनसब मिळाली होती. पुढच्याच वर्षी छत्रपती शिवरायांनी आग्र्यास भेट दिल्यानंतर त्यांच्यासोबत युवराज संभाजीसुद्धा गेले होते. त्यानंतर छत्रपती शिवरायांनी संभाजीसह मोठ्या शिताफीने आग्र्याहून सुटका केल्यानंतर युवराजांना सुरक्षित व गुप्तपणे उज्जैन येथे ठेवून छत्रपती शिवराय स्वतः साधूच्या वेशामध्ये मजल दरमजल करीत रायगडावर पोहोचले हाते. छत्रपती शिवरायांनी संभाजी राजांना वेगळे, सुरक्षित उज्जैनला ठेवण्यामागे राज्याच्या तरुण वारसदारास वाचवण्याचा त्यांचा उद्देश होता. मग काही महिन्यानंतर त्यांना सुखरूप रायगडावर आणण्यात आले. नंतरच्या काळात दिलेरखान जेव्हा मुघल बादशहाचा दक्षिणेतील प्रमुख बनला तेव्हा छत्रपती शिवरायांच्या हालचालींवर त्यांची अत्यंत बारीक नजर होती. त्यामुळे छत्रपती शिवरायांच्या कुटुंबामध्ये, प्रशासनामध्ये कोणी फितुर होण्याची वाट तो पाहत होता व आपल्या गुप्तहेरांमार्फत वेळोवेळी माहितीसुद्धा मिळवीत होता.

त्यातच संभाजीराजांचा छत्रपती शिवरायांविरूद्ध गैरसमज करून त्यांना मुघल बादशहाच्या दरबारी मानसन्मान व मोठे पद मिळेल असे आश्वासन दिलेरखानाने दिले. संभाजीराजांना छत्रपती शिवराय राजाराम (लहान भाऊ) यास गादीवर बसविणार असल्याचा संशय आला व ते दिलेरखानाच्या गोटात दाखल झाले. तेथे त्यांना ७०००ची मनसब आणि राजा हा किताब देण्यात आला. युवराज संभाजी शत्रूच्या गोटात दाखल झाल्यामुळे व औरंगजेबाचा कपटी स्वभाव माहित असल्यामुळे छत्रपती शिवरायांना अत्यंत दुःख झाले. तिकडे औरंगजेबाने संभाजीला कपटाने कैद करून आग्र्यास आणण्याच्या गुप्त सूचना दिलेरखानाला दिलेल्या होत्या. परंतु दिलेरखान औरंगजेबाएवढा कपटी व विश्वासघातकी नव्हता. त्यामुळे त्याने संभाजीराजांस मुघल गोटातून निघून जाऊन आपल्या वडिलांना मिळावे असा सल्ला दिला. एवढेच नव्हे तर आपण संभाजीस अटक करणार असून त्याला

बादशहाच्या दरबारी नेणार असल्याचे सुद्धा वरवरचे नाटक केले. परंतु आतून युवराज संभाजीच्या सुटकेसाठी सर्व व्यवस्था करून ठेवली होती. कारण त्याच्या मदतीशिवाय मुघलांच्या तंबूतून सुटका करून घेणे सोपे नव्हते.

किंकेड आणि पारसनीस यांच्या मते, "दिलेरखान अफगाण मुस्लिम असला तरी दगाबाज नव्हता. त्याने औरंगजेबाच्या दुष्ट हेतूची संभाजीस कल्पना दिली आणि छत्रपती शिवरायांकडे परतण्याचा सल्ला दिला. त्यातच इतरांना संशय येऊ नये म्हणून दिलेरखानाने संभाजीचा खुलेआम अपमान केला, त्याची मनसब कमी केली आणि त्याचा खर्चसुद्धा दिला नाही. त्यामुळे संभाजीने सुद्धा अत्यंत नाराजीचे नाटक केले आणि आपल्या वडिलांशी संपर्क साधला. मग मराठा साथीदारांच्या मदतीने त्याने दिलेरखानाच्या तावडीतून आपली सुटका करून घेतली आणि पन्हाळगडावर पोहोचला. तेथे त्याच्या वडिलांनी त्याला पुन्हा स्वराज्यात घेतले खरे परंतु फितुरीची शिक्षा म्हणून त्यांस कोणतीही महत्त्वाची जबाबदारी न देता पन्हाळा येथे नजरकैदेतच जणू डांबले." युवराज संभाजी २० नोव्हेंबर १६७९ रोजी दिलेरखानाच्या तंबूतून विजापूरात मसंद यांच्या आश्रयास आले.

सर जदुनाथ सरकार म्हणतात, "नोव्हेंबर रोजी दिलेरखानास ही बातमी समजल्यानंतर तो तातडीने विजापूरात दाखल झाला व आपला दूत ख्वाजा अब्दुल रज्जाक यास लाच देऊन मसंदकडे संभाजींस अटक करण्यास पाठविले. परंतु संभाजीराजांस ही बातमी कळताच ते विजापूरातून निसटले व आपल्या वडिलांनी सज्ज ठेवलेल्या घोडेस्वारांच्या मदतीने आपल्या वडिलांस ४ डिसेंबर रोजी पन्हाळा येथे येऊन मिळाले."

इतिहासकारांची भिन्न मते असली तरी एक गोष्ट सत्य आहे की, संभाजीराजांची मुघलांच्या तंबूतून सुटका झाली व ती दिलेरखानाच्या मदतीशिवाय शक्य नव्हती. तो सर्व औरंगजेबाचा राग शांत करण्यासाठी व आपल्यावरील संशयाची सुई हटविण्यासाठी दिलेरखान तातडीने संभाजींस अटक करण्यासाठी विजापूरात दाखल झाला. शिवरायांनी मात्र संभाजींस सहजासहजी माफ केले नाही व केंद्रिय प्रशासनापासून महत्त्वाच्या पदांपासून त्यांना दूरच ठेवले.

### ७.७.१ सत्तासंघर्ष:

छत्रपती शिवरायांचा रायगडावर इ.स. १६८० मध्ये मृत्यु झाल्यानंतर त्यांचा लहान मुलगा राजाराम (वय १० वर्षे) यास त्यांची आई सोयराबाई आणि आण्णाजी दत्तो बाळाजी आवजी व इतर मंत्री यांच्या पाठिंब्याने २१ एप्रिल १६८० रोजी राज्यभिषेक करण्यात आला. परंतु संभाजीराजे सर्वात मोठे वारस असताना राजाराम या लहान भावास वारस नेमल्यामुळे राज्यातच गटबाजीचे कारस्थान चालू झाले. संभाजीराजांना मुख्य सेनापती हंबीराव मोहिते आणि इतर काही मंत्र्यांचा पाठिंबा होता व ते पन्हाळ्यावर होते. बातमी मिळताच त्यांनी पन्हाळागड ताब्यात घेतला आणि १८ जून १६८० रोजी रायगडावर आपली सत्ता स्थापन केली. त्यांनी राजाराम व त्यांची आई सोयराबाई यांना कैद केले. परंतु नंतर त्यांना सोडून देण्यात आले. त्यानंतर ऑगस्ट १६८१ मध्ये संभाजींचा खून करून राजारामला गादीवर बसविण्यात येणार असल्याचा कट उघडकीस आला. त्यामुळे कटातील सहभागी आण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी आणि इतर मंत्री यांना देहांत शासन देण्यात आले. सोयराबाईचा तुरूंगात लवकरच मृत्यु झाला.

### ७.७.२ कवी कलश:

संभाजीराजांनी सत्ता हातात घेतल्यानंतर त्यांनी शिवरायांच्या विश्वासातील माणसे (सल्लागार) शासनातून हटवण्यात सुरूवात केली. कारण त्यांस कायम संशय वाटत असे. त्यातच कनोजचा ब्राह्मण पुरोहित याच्या प्रभावाखाली, ज्याला त्यांनी 'कवी कलश असा किताब दिला होता. संभाजीराजे आपले प्रत्येक निर्णय त्याच्याच सल्ल्याने घेऊ लागले. मग तो योग्य असो की अयोग्य. त्याच्याच प्रभावाखाली संभाजीराजे तंत्रमंत्रावर विश्वास ठेवू लागले. १८ मे १६८२ रोजी बाळ शाहूचा जन्म झाल्यावर (संभाजी राजांचा पुत्र) तो काली मातेच्या पूजेमुळे झाला असल्याचे त्यांच्या मनावर बिंबवले गेले त्यामुळे तर कवी कलश वर त्यांचा विश्वास अधिकच दृढ झाला.

### ७.७.३ मुघल प्रदेशावर मोहिमा:

छत्रपती संभाजीराजांची कारकीर्द तशी धामधूमीचीच राहिली. त्यामुळेच त्यांच्या काळात स्वराज्याचा प्रादेशिक विकास झाला नाही. त्यांचा गट व राजाराम यांचा गट यांमध्ये छुपा संघर्ष सतत घुमसत होता. त्यामुळे राज्याची विधायक शक्ती खर्ची पडत होती. ह्याचा फायदा औरंगजेबाने उठविण्याचे ठरवले आणि तो दक्षिणेतच तळ ठोकून बसला. संभाजीराजांनी शिवरायांप्रमाणेच दक्षिणेतील मुघलांच्या प्रदेशांवर छापे टाकून ते लुटण्याच्या कारवाया सुरू ठेवल्या. इ.स. १६८०-८१ मध्ये त्यांनी खानदेश आणि बुऱ्हाणपूर लुटले. नोव्हेंबर १६८१ मध्ये त्यांनी अहमदनगर ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांना यश मिळाले नाही. परंतु मुघल प्रदेशामध्ये छत्रपतीसंभाजीराजांचे छापे टाकणे व ते लुटणे ही मराठ्याची पारंपारिक चाल होती. ते दसऱ्याच्या दिवशीच त्याची सुरूवात करत. त्यामुळेच या कारवायांमुळे राज्याच्या प्रदेशात काही भर पडली नाही.

### ७.७.४ छत्रपती संभाजी राजे व युवराज अकबर:

इ.स. १६७९ मध्ये औरंगजेबाने राजपूतांविरुद्ध कडक मोहिम सुरू केली होती व त्यांचा मुलगा युवराज अकबर याच्यावर ती जबाबदारी दिलेली होती. आपल्या वडिलांच्या मार्गदर्शनाखाली युवराज अकबर मोहिमेचे नेतृत्व करीत होता. परंतु पराक्रमी राजपूतांसमोर त्याला काही यश मिळाले नाही. याउलट त्याचे सैनिकी व आर्थिक नुकसान होऊ लागले. राजपूत आपणास दाद देत नसल्याचे पाहून अकबरने त्यांच्याबरोबर तहाची बोलणी चालू केली व औरंगजेबास तसे कळविले. परंतु ह्याचा औरंगजेबास राग येऊन त्याने अकबरास माघारी बोलावले. त्यामुळे अकबराने औरंगजेबाविरूद्ध उघड बंड केले. ते बंड मोडून काढण्यास आले परंतु अकबर दक्षिणेकडे संभाजीराजाच्या आश्रयास गेला. नोव्हेंबर १६८१ मध्ये युवराज अकबर व छत्रपती संभाजीराजे यांची भेट झाली परंतु त्यांच्यामध्ये विश्वासाची भावना निर्माण झाली नाही. छत्रपती संभाजीराजांस अकबर औरंगजेबाचा गुप्तहेर वाटला आणि तो आपणास गोड बोलून आगऱ्यास कपटाने नेण्यास आला आहे असा गैरसमज झाला. याउलट अकबरास छत्रपती शिवरायांप्रमाणे छत्रपती संभाजी राजे आपणास पूर्णपणे संरक्षण देऊन एकत्रितपणे औरंगजेबाविरूद्ध राजपूत राजांच्या मदतीने लढा उभारतील असे वाटले होते. परंतु त्याचा भ्रमनिरास झाला.

### ७.७.५ औरंगजेबाची दख्खन स्वारी:

औरंगजेबास अकबराचे बंड कळताच त्यास कैद करण्याचे आदेश त्याने दिले. त्यामध्ये यश न आल्यामुळे त्याने राजपूतांबरोबर समझोता करून दक्षिणेकडे मोठ्या सैन्यासह आपल्या मुलास ताब्यात घेण्यासाठी आणि त्याचा आश्रयदाता मराठा राजा संभाजी यास धडा शिकवण्यासाठी निघाला. आपल्या समवेत त्याने संपूर्ण लवाजमा नव्हे सर्व प्रशासन व त्यातील अधिकारी सुद्धा त्याने आणले होते. मार्च १६८२ मध्ये तो औरंगाबाद येथे दाखल झाला.

### ७.७.६ सिद्धी व पोर्तुगिजांविरूद्ध मोहिम:

औरंगजेब बंडखोर अकबराविरूद्ध मोठ्या सैन्यासह दक्षिणेत दाखल झाल्यामुळे कोणतीही निश्चित अशी कारवाई होऊ शकली नाही. किंबहुना ही अनिश्चिततेची स्थिती बरीच वर्षे चालू होती. अकबरासाठी छत्रपती संभाजीराजे औरंगजेबाविरूद्ध कोणताही ठाम निर्णय घेत नव्हते. त्यामुळे अकबराच्या पदरी दिवसेंदिवस निराशा येत चालली आणि औरंगजेबाकडे गेल्यास तो सोडणार नाही याचीही भिती त्याला वाटू लागली. दक्षिणेमधील मुघल सैन्यावर संभाजीराजांनी हल्ला केला नाही किंवा तशी तयारीही केली नाही त्यातच संभाजीराजांनी जंजिऱ्याच्या सिद्धीकडे आपला मोर्चा वळवला आणि मुंबईतील इंग्रजांविरूद्ध चकमकी केल्या. तसेच पोर्तुगिजांविरूद्ध (गोवा) सुद्धा दुसरे (मराठा) युद्ध केले. अकबराने आता मात्र संभाजीच्या मदतीने आपणास दिल्लीची सत्ता मिळविता येईल याची आशा सोडली आणि तो फेब्रुवारी १६८७ ला पर्शियास पळून गेला. नोव्हेंबर १७०४ मध्ये तेथेच त्याचा मृत्यु झाला.

संभाजीराजे इ.स. १६८२ मध्ये जंजिऱ्यावरील मोहिमेवर असतानाच इकडे मुघल सैन्याने उत्तर कोकणावर स्वारी केली आणि कल्याण प्रदेश काबीज केला. युवराज आझम (औरंगजेबाचा पुत्र) याने राजधानी रायगडावर पूर्वेकडून आक्रमण केले. दरम्यान संभाजींची जंजिरा मोहिम यशस्वी झाली नाही. परतीच्या वाटेत त्यांनी पोर्तुगिजांवर आक्रमण केले. एप्रिल १६८३ मध्ये त्यांनी दमण पर आक्रमण करून जाळपोळ केली. चौल बंदरसुद्धा अस्ताव्यस्त करून टाकले. पोर्तुगिज व्हाईसरायचा फोंडा प्रदेश घेण्याचा प्रयत्न फसला गेला. त्यानंतर संभाजीराजांनी गोव्यावर आक्रमण केले. मराठा सैन्याने जवळजवळ महिनाभर सालसेत आणि बारदेश या प्रदेशांची लूट केली. परंतु औरंगजेबाचा मुलगा शाह आलमने प्रदेशावर आक्रमण करताच संभाजीराजे रायगडाकडे परतले.

इ.स. १६८५-८७ दरम्यान औरंगजेब विजापूर आणि गोवळकोंडा यावरील मोहिमेमध्ये गुंतला असल्यामुळे संभाजीराजांच्या सैन्याने मुघल प्रदेशावर छोट्यामोठ्या प्रमाणात छापे टाकण्यास सुरूवात केली. त्यातच मराठा सरदार संभाजीराजांना सोडून मुघलांच्या तंबूत जाऊ लागले. त्यामुळे बंडखोर सैन्याने उत्तर कोकण आणि कर्नाटक प्रदेशांत गोंधळ घातला होता. त्यातच जिंजिचा मराठा व्हाईसराय हनूजी महाडिक यांने स्वतःस स्वतंत्र घोषित केले होते.

विजापूरची आदिलशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही नष्ट केल्यानंतर औरंगजेबाने आपला मोर्चा मराठ्यांकडे वळवला. त्यातच युवराज अकबर मराठा तंबूतून अगोदरच निघून गेला

होता. त्यामुळे त्याच्याकडून कोणताही धोका नव्हता. त्यातच ज्यावेळी औरंगजेब आदिलशाही व कुतुबशाही यांच्याविरुद्ध लढाईत गुंतला होता त्यावेळी संभाजी राजांनी परिस्थितीचा फायदा उठवणे आवश्यक होते. याउलट त्यांनी अंतर्गत भानगडींमध्ये लक्ष घातल. त्यामुळे त्यांच्याच राज्यातील मराठा देशमुख त्यांचे शत्रू बनले व आपापसातील संघर्ष वाढू लागला.

### ७.७.७ संभाजीराजांची कैद व खून:

औरंगजेबाने संभाजीराजांना पकडण्यासाठी एक खास मोहिमेवर गोवळकोंड्याचा सरदार मुकर्रब खान याची मराठी स्वराज्यावर चालून जाण्यासाठी नेमणूक केली. खरे म्हणजे त्याने पन्हाळगडास वेढा घालण्याचे निमित्त केले तरी संभाजीराजांच्या संपूर्ण हालचालींवर त्याचे लक्ष होते. आपल्या गुप्तहेरांनी माहिती दिल्यावरून मुकर्रब खानाने संभाजीराजांना पकडण्यासाठी जोरदार हल्ला केला आणि संभाजीराजांना संगमेश्वर येथे इ.स. १६८८ मध्ये पकडले. त्यांच्या सोबतीला कवी कलश सुद्धा होता. भिमा नदीच्या किनाऱ्यावरील मुघलांच्या तंबूत त्या दोघांना बंदीवान म्हणून सादर करण्यात आले. ज्यावेळी मुघल अधिकाऱ्यांनी संभाजीराजांची उलटतपासणी करण्यास सुरूवात केली त्यावेळी त्यांनी औरंगजेबाचा आणि मोहम्मद पैगंबरांचा अपमान केल्याचे म्हटले जाते. तरीसुद्धा औरंगजेबाने त्यांना काही अटींवर जीवदान देण्याचे मान्य केले. त्यामध्ये पुढील अटींचा समावेश होता.

१) संभाजीराजांनी स्वराज्यातील सर्व किल्ले मुघलांच्या स्वाधीन करणे.

२) आपली सर्व संपत्ती कुठे कुठे आहे, ती मुघलांना माहिती देणे आणि

३) ज्या मुघल अधिकाऱ्यांनी फितुर होऊन मराठ्यांना मदत केली त्यांची नावे जाहिर करणे या व्यक्तिरिक्त संभाजीराजांवर औरंगजेबाने 'मुस्लिम धर्मातर' करण्याचा प्रस्तावही ठेवला होता.

परंतु संभाजी राजांनी औरंगजेबाच्या सर्व अटी अमान्य केल्या. त्यामुळे उलेमांच्या गटाने संभाजीराजांस देहांताची शिक्षा ठोठावली. पंधरा दिवस सतत शारीरिक व मानसिक छळ केल्यानंतर ११ मार्च १६८९ रोजी त्यांचा निर्घुण खून करण्यात आला.

अलिकडील संशोधनानुसार संभाजी राजे पराक्रमी, प्रशासक व विद्वान संस्कृत पंडित होते. त्यांनी लहानवयातच 'बुद्धभूषण' नावाचा ग्रंथ लिहिला आणि तो संस्कृतमध्ये होता.

## ७.८ छत्रपती राजाराम (इ.स. १६८९-१७००)

संभाजीराजांना मुकर्रबखानाने पकडल्यानंतर छत्रपती शिवरायांच्या लहान मुलगा राजाराम यांची तुरूगांतून सुटका करण्यात आली आणि १९ फेब्रुवारी १६८९ रोजी वयाच्या १९व्या वर्षी छत्रपती म्हणून राज्याभिषेक करण्यात आला. त्यातच मुघलांच्या फौजांनी झुल्फिकार खानाच्या नेतृत्वाखाली रायगडाला वेढा घातला होता. त्यामुळे संभाजीराजांची विधवा पत्नी येसुबाई यांच्या सल्ल्यावरून राजाराम यांनी गुप्तपणे जिंजीस आश्रय घेतला. शेवटी रायगड मुघलांच्या ताब्यात आला. येसुबाई, त्यांचा छोटा मुलगा शाहू आणि इतर कुटुंबिय यांना

मुघलांच्या छावणीत कैदी म्हणून नेण्यात आले. रायगड जिंकल्यानंतर मुघलांनी इतरही किल्ले जिंकून घेतले.

इ.स. १६८९पर्यंत औरंगजेबाने जवळजवळ दक्षिणेतील प्रमुख सत्ता काबीज केलेल्या होत्या. त्यामध्ये विजापूर, गोवळकोंडा, रायगड आणि त्यांचे शासक त्याच्या छावणीत युद्धबंदी म्हणून आणण्यात आले होते. परंतु औरंगजेबाचा हा विजय फार काळ टिकला नाही. मराठा राजाच्या पराभवानंतर पराक्रमी मराठा सरदारांनी मुघल फौजांविरूद्ध लढाई चालू केली आणि मराठी स्वातंत्र्ययुद्ध हे जनतेचे युद्ध आहे असे स्वरूप त्याला प्राप्त झाले.

छत्रपती राजारामाने नोव्हेंबर १६८९ मध्ये जिंजीस पोहोचल्यानंतर तेथे आपला राज्यकारभार करण्यास सुरूवात केली. परंतु छत्रपती शिवरायांप्रमाणे ते कुशल प्रशासक नव्हते. त्यांच्याकडे संघटन कौशल्याची उणीव होती. तरीही केवळ शिवरायांचे पुत्र असल्यामुळे त्याकडे इतर कुशल मराठा सरदारांनी दुर्लक्ष केले व त्यांचा आदर केला. राजारामांच्या काळात अनेक नवनवीन मराठा सरदारांचा उदय झाला त्याचबरोबर मुघलांविरूद्ध संघर्षात अनेक नामांकित मराठा सरदार कामी आले. त्यामध्ये निळकंठ पेशवा, रामचंद्र, अमात्य, शंकरजी मल्हार सचिव आणि प्रल्हाद निराजी रावजी यांचा समावेश होता. याच काळात धनाजी जाधव, संताजी घोरपडे आणि परशुराम त्रिंबक या पराक्रमी सरदारांचा उदय झाला.

### ७.८.१ मराठा सत्तेचे विकेंद्रीकरण:

छत्रपती राजाराम दूर जिंजीस असल्यामुळे मराठा स्वराज्यावर एकछत्री नियंत्रण मिळवू शकले नाही. तसेच मराठा प्रशासन व लष्करी प्रशासन यांवर त्यांना प्रत्यक्ष नियंत्रण मिळवणे शक्य नव्हते. त्यामुळेच तत्कालीन परिस्थितीला अनुसरून राज्यअधिकारांचे विकेंद्रीकरण करणे आवश्यक होते. त्यामुळे महाराष्ट्रातील राजकीय आणि लष्करी प्रशासनाची देखभाल करण्याचे काम रामचंद्र निळकंठ बावडेकर (अमात्य) यांच्याकडे 'हुकुमत पन्हा' म्हणून देण्यात आले. इ.स. १६८९ १६९७या काळात ते राजारामपासून जवळजवळ स्वतंत्रपणे राज्याचा कारभार सांभाळीत होते. त्यांनी मराठा सरदारांवर नियंत्रण मिळविले. प्रदेशांवर छापे घातले आणि कर्नाटकातील आपले सहकारी प्रल्हाद निराजी यांना लष्करी मदत पुरविली. दक्षिणेतील छोट्या मोठ्या राजांना एकत्र करून मुघलांविरूद्ध एक मजबूत मराठा फळी बांधली.

### ७.८.२ धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे:

मराठा राज्याच्या एकछत्री राजा आणि एक केंद्रीय प्रशासन याचा अभाव असल्यामुळे औरंगजेबापुढे अनेक अडचणी निर्माण झाल्या. छत्रपती राजाराम यांच्याकडून महत्त्वाकांक्षी मराठा सरदारांना वेळोवेळी आर्थिक व लष्करी मदत मिळत असल्यामुळे ते वारंवार मुघल प्रदेशांवर छापे टाकीत असत. त्यामुळे ह्या जनतेच्या उठावाला कसे सामोरे जायचे, कोणाकोणास सामोरे जायचे, कोण मराठा सरदार कुठून येईल व हल्ला करील याचा औरंगजेब व मुघल सरदारांना सतत भिती वाटत होती. कारण एका राजाच्या नेतृत्वाखालील लष्करास व त्या राजास नेस्तनाबूत करणे सोपे असते परंतु राजा नसल्यामुळे मराठा लोकांनीच पुकारलेल्या लढ्यास तोंड देणे मुघलांस कठीण होऊन बसले

होते. मराठी फौजा आपल्या पराक्रमी सरदाराच्या नेतृत्वाखाली अचानक हल्ला करून क्षणार्धात अदृश्य होत तर बलाढ्य मुघल फौजा त्यांना शोधत बसत. प्रत्येक ठिकाणी मुघल फौजा काही मराठा फौजांना तोंड देऊ शकत नव्हत्या. त्यामुळे मुघलांकडील किल्ले मराठा सरदार लवकरच ताब्यात मिळवित असत. इ.स. १६९० मध्ये मराठ्यांनी मुघलांविरूद्ध आपला पहिला विजय नोंदविला. साताऱ्याजवळ शारजा खान नावाचा मुघल सेनापती आपल्या कुटुंब व चार हजार घोड्यांसह मराठ्यांच्या हाती लागला. त्यानंतर हळूहळू मराठा सरदारांनी प्रतापगड, रोहिडा, रायगड आणि तोरणा यासारखे किल्ले मुघलांच्या ताब्यातून मुक्त केले. इ.स. १६९२ मध्ये मराठ्यांनी पन्हाळा जिंकला परंतु मुघल सैन्याने किल्ल्यास वेढा घातला. व तो अनेक वर्षे चालवला.

संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव या सरदारांनी मुघल सैन्यप्रमुखास भंडावून सोडले. त्यांच्या रसद तोडून टाकल्या आणि अनेक वेळा त्यांच्या खजिना लुटला. सातारा, आणि धारवाड या जिल्ह्यांमध्ये ह्या सरदारांनी मुघलांविरूद्ध निर्णायक लढाया लढल्या. इ.स. बेळगाव १६९२च्या शेवटी हे मराठा सरदार कर्नाटकात निघून गेले आणि १६९३ मध्ये ते पुन्हा आले व मुघलांविरूद्ध पुन्हा छुपे हल्ले करण्यास सुरूवात केली. इ.स. १६९४-९५ च्या दरम्यान मराठा सरदारांच्या वारंवार होणाऱ्या आकस्मिक हल्ल्यांनी मुघल फौजांना सळो की पळो करून सोडले होते. संताजी घोरपडे यांनी कासिम खान आणि हिम्मत खान या दान नामांकित मुघल सरदारांचा दारूण पराभव केला.

संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव या दोन्ही पराक्रमी सरदारांमध्ये पुढे सेनापती कोण होणार याबाबत वैर निर्माण झाले. त्यामुळे इ.स १६९६-९७मध्ये मराठा सैन्यात व त्या दोघांच्या आक्रमक हालचालींवर थोडा विपरीत परिणाम झाला होता. संताजी घोरपडे यांचा स्वभाव उद्दाम स्वतःबद्दल गर्व, उद्धटपणाचा, हेकेखोरपणाचा असल्यामुळे त्यांची जनमानसातील प्रतिमा हवी तेवढी चांगली नव्हती, धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांची फौज अनेक वेळा आपापसात भांडत असे. त्यातच जून १६१७ मध्ये संताजीचा खून झाला त्यामुळे मराठा स्वराज्यांची मोठी हानी झाली. शत्रूच्या उणिवांचा फायदा घेण्यामध्ये संताजींचा हात कोणीही पकडू शकत नव्हता. आपल्या विजेच्या वेगाने हालचाली आणि कडक शिस्त यामुळे मुघल सैन्याची त्यांनी दाणादाण उडवून दिली होती. आपल्या अनेक दोषांसह (स्वभाव वैशिष्ट्ये) ते लष्करी दृष्ट्या अत्यंत अतुलनिय होते. जवळजवळ सात वर्षे मुघल सैन्यामध्ये त्यांनी एक दहशत निर्माण करून ठेवली होती. खाफी खान ह्यांच्या मते, "शाही दरबारचा एकही सरदार त्यांच्याबरोबर मुकाबला करण्याची हिंमत दाखवत नव्हता आणि त्यांनी त्यांच्या सैन्याची उडविलेली त्रेधातिरपीट पाहून धाडसीतला धाडसी सरदार थरथर कापत असे. एवढेच नव्हे तर औरंगजेबाने सुद्धा संताजी घोरपडेंबद्दल मराठा स्वातंत्र्य युद्धाचा सेनापती म्हणून गौरव केलेला आहे.'' शिवरायांनंतर सर्वात पराक्रमी सैनिक म्हणून संताजीस मान्यता मिळाली आहे.

छत्रपती राजाराम इस. १६९७ पर्यंत जिंजिस राहिले. दरम्यानच्या काळात मुघल फौजांनी झुल्फिकार खानाच्या नेतृत्वाखाली सप्टेंबर १६९० ते जानेवारी १६९८ म्हणजे जवळजवळ ८ वर्षे जिंजिच्या किल्ल्यास वेढा घातला होता. दोन्ही पक्षांना थोड्याफार प्रमाणात यश हुलकावणी देत होते. शेवटी राजारामांनी जिंजीहून आपली सुटका करून विशालगडाकडे पलायन केले. परंतु त्यांचे पूर्ण कुटुंब मुघलांच्या तावडीत सापडून त्यांना

बंदी बनविण्यात आले छत्रपती राजाराम यांनी आपल्या अंमलाखालीत प्रदेशातून प्रवास केला आणि मराठी अधिकारी आणि सैनिक सरदारांना उत्तेजन दिले. खानदेश आणि वऱ्हाडवर छापे टाकण्यासाठी आपल्या सैन्यास धाडले. सुरतेवर छापा टाकण्याच्या बहाणा करून राजाराम सिंहगडाकडे पोहोचले परंतु मुघल सैन्याने त्यांना माघार घेण्यास भाग पाडले. त्यानंतर ते गंभीररित्या आजारी पडले आणि १२ मार्च १७०० रोजी त्यांचे निधन झाले.

**आपली प्रगती तपासा**

१) औरंगजेबाने संभाजीराजांस सोडविण्यासाठी कोणत्या अटी घातल्या होत्या ते सांगा.

__________________________________________

२) संताजी घोरपडेंची कामगिरी लिहा.

__________________________________________

## ७.९ महाराणी ताराबाई (१७००-१७०७)

छत्रपती राजाराम यांच्या मृत्युनंतर थोड्याच कालावधीत त्यांची विधवा पत्नी ताराबाई यांनी शिवाजी द्वितीय ह्या मुलास गादीवर बसविले. शिवाजी द्वितीय हा सज्ञान नसल्यामुळे ताराबाई स्वतः त्यांची काळजीवाहू अधिकारी बनली आणि राज्यकारभाराची प्रत्यक्ष सूत्रे स्वतःच्या हातात ठेवली. त्यातच राजारामांची दुसरी विधवा राजस बाई हिनेसुद्धा आपल्या मुलास गादीवर बसविण्याचा प्रयत्न केला परंतु त्यात तिला यश आले नाही. परंतु त्यांच्यामध्ये गृहयुद्धाची स्थिती निर्माण झाली व गटबाजीस प्रोत्साहन मिळाले. ताराबाई स्वतः पराक्रमी आणि दृढनिश्चियी असल्यामुळे त्या मराठा राज्याच्या नामधारी राजाच्या वतीने (शिवाजी द्वितीय) खऱ्या प्रशासक बनल्या. त्यांनी मराठा राज्यातील नामंकित मंत्री आणि सरदारांचा पाठिंबा मिळविला. त्यामध्ये 'प्रतिनिधी' पद बहाल झालेले परशुराम त्रिंबक यांचा प्रामुख्याने समावेश होता.

मराठा - मुघल संघर्ष कायमचा समाप्त करण्यासाठी औरंगजेब सातारा किल्ल्याजवळ छावणीमध्ये असताना ताराबाईंनी त्याकडे शांतीवार्ता प्रस्ताव दिला. त्यांनी मुघलांना सातारा, पन्हाळा आणि इतर महत्त्वाचे पाच किल्ले देऊ केले. तसेच दक्षिणेच्या मुघल गर्व्हनरला सेवेसाठी पाच हजार मराठा घोडेस्वार पुरविण्याचे आश्वासन दिले आणि मुघलांचे वर्चस्व मान्य केले. त्याच्या बदल्यात औरंगजेबाने ताराबाईंचा मुलगा शिवाजी द्वितीय यास राज्याचा राजा म्हणून मान्यता द्यावी, त्यास सात हजाराची मनसब बहाल करावी आणि मुघल दरबारी व्यक्तिगत सेवा पुरविण्यापासून सूट मिळावी अशी मागणी मुघलांकडे करण्यात आली. तसेच ताराबाईनी दक्षिण प्रांतांकडून 'सरदेशमुखी वसुली अधिकार

मिळण्याची सुद्धा मागणी केली. परंतु विश्वासघातकी औरंगजेबाने ताराबाईंचा प्रस्ताव धुडकावून लावला आणि मराठा राज्यावर आक्रमण करण्यासाठी आपली मोहिम चालूच ठेवली.

ताराबाईने आपल्या उत्कृष्ट संघटन कौशल्याने राज्याची विस्कळीत झालेली घडी बसविण्याचा प्रयत्न केला आणि मराठा सरदारांना आपल्या मराठा स्वराज्यासाठी पुनप्रेरित केले. खाफीखान सुद्धा ताराबाईची स्तुती करतो व म्हणतो, "ताराबाई हुशार, कुशल प्रशासक लोकप्रिय, महत्त्वाकांक्षी होत्या. त्यांच्या मार्गदर्शना खाली मराठ्यांच्या कारवाया वाढल्या. स्वतःच्या हातामध्ये स्वराज्याची सूत्रे घेतली. स्वतः नेमणूका केल्या, सैन्यामध्ये फेरबदल केले. राज्याच्या कृषी लागवडीमध्ये तर लक्ष घातलेच पण मुघल प्रदेशामध्ये छापे टाकण्यासाठी मोहिमांचे नियोजनसुद्धा केले. दख्खनच्या सहा सुभ्यांवर छापे टाकण्यासाठी सैन्य पाठविले ते सिरोंज व मंदसोर (माळवा) पर्यंत त्यामुळे मराठा सरदारांची मने त्यांनी जिंकली आणि त्यामुळेच औरंगजेबाचे मराठा स्वराज्यास नष्ट करण्याचे सर्व प्रयत्न फोल ठरले. "

इ.स. १७००-१७०५ या कालवधीमध्ये औरंगजेबाने आपल्या सैन्याचे मराठा स्वराज्याविरूद्ध जातीने नेतृत्व केले. त्याने स्वतः मराठा सरदारांस व सेनाप्रमुखांस फितुर होण्यासाठी लाच देऊ केली. परंतु मराठा सैन्याने औरंगजेबाच्या सैन्यावर गनिमी काव्याने छुपे हल्ले केले, त्यांची शस्त्रे लुटली. मराठा सैन्य औरंगजेबाच्या बलाढ्य सैन्यापुढे खुले युद्ध करण्यास असमर्थ होते. परंतु गनिमी युद्ध कलेने मराठी सैन्याने औरंगजेबाच्या सैन्यान नुकसान केले आणि त्यांना सळो की पळो करून सोडले.

औरंगजेबाच्या शेवटच्या मोहिमेमुळे औरंगजेबाची दक्षिणेतील पकड काहीशी शिथिल झाली. इ.स. १७०२-०४ या कालावधीत दख्खन प्रांतांत कोरडा दुष्काळ पडल्यामुळे शेती व व्यापारावर विपरित परिणाम झाला होता. त्याचा परिणाम महागाई वाढ व जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा यांवर झाला. सर्वत्र (दक्षिणेमध्ये) दुष्काळाचे सावट पसरले होते. त्यात प्लेगच्या साथीबरोबर इतरही रोगांची साथ पसरली होती त्यामुळे मृत्युदर प्रमाण वाढले होते. या सर्व परिस्थितीमुळे औरंगजेबास नैराश्य आले आणि जानेवारी १७०६ मध्ये त्याने अहदमनगरमध्ये कूच केले. त्यानंतर इ.स. १७०७ मध्ये त्याचा मृत्यु झाला.

ताराबाई अत्यंत कुशल प्रशासक होत्या. त्यांच्यामुळेच मराठा सरदार व अधिकाऱ्यांना एक स्फूर्ति मिळाली व ते पूर्वीप्रमाणेच त्वेषाने मराठा स्वराज्यासाठी लढण्यास कार्यरत झाले, एवढेच नव्हे तर छत्रपती राजारामांपेक्षाही त्यांनी आपले कर्तृत्व मोठ्या प्रभावीपणे दाखविले. ताराबाईनी मुघलांविरुद्धच्या मोहिमा स्वतःच्या मार्गदर्शनाखाली राबविल्या आणि त्या यशस्वीही करून दाखवल्या शेवटी औरंगजेबाच्या मृत्यु पर्यंत (इ.स. १७०७) ताराबाईने मराठा स्वराज्याचे रक्षण करण्याचा आटोकाट प्रयत्न केला आणि त्यानंतर मात्र मराठा - मुघल संघर्ष जवळजवळ संपुष्टात आला होता.

**आपली प्रगती तपासा**

१) महाराणी ताराबाई व मुघल संघर्ष स्पष्ट करा.

२) खाफीखानाने ताराबाईची स्तुती कशी केली आहे ?

## ७.१० समारोप

छत्रपती शिवरायांनी आपल्या कारकीर्दीत एक अतुलनीय लोक कल्याणकारी, प्रजाहीतदक्ष, पराक्रमी, सहिष्णु, कुशल प्रशासक, मुत्सद्दी लढवय्ये अशी आपली प्रतिमा निर्माण करून मराठा राज्याची स्थापना केली. त्यांच्या वारस पुत्र छत्रपती संभाजी राजांनी त्यांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न केला. परंतु औरंगजेबाने कपटाने त्यांचा खून केला. छत्रपती राजाराम मात्र तेवढे कुशल नसल्यामुळे त्यांनी जहागिरी बहाल केल्या तर महाराणी ताराबाईंनीसुद्धा आपल्याला मिळालेल्या काळात औरंगजेबास मराठा स्वराज्य नष्ट करू दिले नाही.

## ७.११ प्रश्न

१) शिवरायांच्या प्रशासन व्यवस्थेचे विश्लेषण करा.

२) 'शिवरायांचे मराठा स्वराज्य एक अद्भुत निर्मिती होती' भाष्य करा .

३) छत्रपती संभाजी राजांच्या कारकीर्दीचा मागोवा घ्या.

४) टीपा लिहा.

अ) अष्टप्रधानमंडळ ब) छत्रपतीराजाराम

क) महाराणी ताराबाई ड) संताजी घोरपडे व धनाजी जाधव.

## ७.१२ संदर्भ


- रानडे, एम.जी, राईज ऑफ दी मराठा पावर अँड अदर ऐसेस, १९६१
- सरकार, जदुनाथ, शिवाजी अँड हिज टाईम्स, ओरियन्ट लाँगमन, बॉम्बे, १६५२
- सरदेसाई, जी.एस., न्यू हिस्टरी ऑफ मराठाज, खंड – I

- पगडी, सेतुमाधवराव, छत्रपती शिवाजी, कँन्टीनेंटल प्रकाशन, पुणे
- कोलारकर, श.गो. ‘मराठ्यांचा इतिहास’, मंगेश प्रकाशन, नागपूर
- कुलकर्णी, अ.रा., खरे ग.ह., ‘मराठ्यांचा इतिहास’, खंड पहिला, शिवाजी आणि शिवकाळ (१६००-१७०७) महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, कँन्टीनेंटल प्रकाशन, पुणे
- देव प्रभाकर, ‘मराठ्यांचा इतिहास’ विद्या प्रकाशन


*****

# ८

# मुघल काळातील सामाजिक जीवन

**घटक रचना**


८.१ उद्दिष्टे

८.२ प्रस्तावना

८.३ हिंदू समाज घटकाची वैशिष्ट्ये

८.३.१ वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था

८.४ मुस्लिम समाज घटकाची वैशिष्ट्ये

८.४.१ तुर्क-मुघल

८.४.२ अफगाण

८.४.३ इराणी

८.४.५ तूराणी

८.४.६ भारतीय मुसलमान

८.५ मुघल काळातील समाजरचना

८.५.१ सत्ताधारीवर्ग

८.५.२ उच्च वर्ग

८.५.३ व्यापारी वर्ग

८.५.४ मध्यमवर्ग

८.५.५ कारागीर वर्ग

८.५.६ शेतकरी वर्ग

८.५.७ गुलाम-नोकर

८.६ मुघल काळातील स्त्रियांची स्थिती

८.७ सरंजामी समाज

८.८ जीवनमान

८.९ सारांश

८.१० संदर्भ


## ८.१ उद्दिष्टे

- मुघल काळातील मुस्लिम समाज व परिस्थिती जाणून घेणे.
- मुघल काळातील भारतातील हिंदू समाजाची परिस्थिती व मुघल सत्तेचे प्रभाव जाणून घेणे.

- भारतातील मध्यमवर्ग व सर्वसामान्य जनतेच्या जीवनमानाचा अभ्यास करणे.
- मुघल काळातील स्त्रियांच्या परिस्थितीचे परीक्षण करणे.

## ८.२ प्रस्तावना

सर्वसाधारणपणे मध्ययुगीन भारतीय समाजावर धर्माचा पगडा होता. तरी देखील सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिकोनातून पहावयाचे झाल्यास हिंदू व मुसलमान या दोन प्रमुख धार्मिक गटातील अडसर नाहीसे झाले होते आणि भारतीय नात्याने या दोन्ही समूहातील लोकांचे परस्परांशी वर्तन चालू होते असे दिसून येते. मुघल काळातील समाज विजातीय होता. कुलीन, कुलहीन, व्यापारी, शेतकरी, वैद्य, कारागीर आणि सावकार अशा विविध प्रकारचे लोक समाजात होते. मुघल काळातील समाज व्यवस्थेमध्ये सत्तारुढवर्ग, उच्चवर्ग, व्यापारी, मध्यम कारागीर व शेतकरी वर्ग गुलाम व इतर इत्यादी वर्गांचा समावेश होतो.

## ८.३ हिंदू समाज घटकाची वैशिष्ट्ये

### ८.३.१ वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था:

प्रारंभी हिंदू समाजरचना वर्णव्यवस्थेवर आधारित होती. नंतर त्याची जातिव्यवस्थेत परिणीती झाली. त्यामुळे वर्णव्यवस्था व जातीव्यवस्थेला वेगळे करता येत नाही. वर्णव्यवस्थेत गतिशीलता होती. एका वर्गातून दुसऱ्या वर्गात जाता येत असे प्रत्येकाच्या स्वाभाविक गुणधर्माने त्याचे वर्णव्यवस्थेतील स्थान ठरविण्यात येई. त्याच्या वर्णाचा त्याच्या जन्माशी काहीही संबंध नसे. या उलट जातिव्यवस्थेत त्याचे स्थान जन्मावरून ठरवण्यात येऊ लागले आणि त्याचा स्वभाव गुणधर्म बाजूला करण्यात आला, विविध व्यवसाय रूढी-परंपरा व पवित्र-अपवित्र अशा अनेक कारणांमुळे तसेच धार्मिक निती-नियमांमुळे समाजात विविध प्रकारच्या जातींची वाढ झाली. ज्याप्रमाणे जाती वाढल्या त्याचप्रमाणे समाज जीवनातील लोकांमधील उच्चनीचता, श्रेष्ठता, भेदभाव यांच्यातील समज व असमज वाढले. जातीव्यवस्थेमुळे भारतीय हिंदू समाज जीवनात विषमता वाढली. जाती-जातीं मधील रोटी-बेटी व्यवहार बंद झाले. अनेक जातींना अस्पृश्य मानले गेले. त्यांचा स्पर्श विटाळ मानला गेला. वर्णव्यवस्थेत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चार वर्ण होते. परंतु कालांतराने त्याचे पुष्कळ जातीत रूपांतर झाले. आचार-विचार, व्यवसाय, रूढी – परंपरा, धार्मिक निती-नियम, अशा अनेक कारणांमुळे बऱ्याच जाती अस्तित्वात आल्या.

**ब्राह्मण:**

ब्राह्मणवर्णांमध्ये कायस्थ ही जात महत्त्वाची व्यवसायधारित होती. या जातीतील लोक सुसंस्कृत व सुशिक्षित होते. ब्राह्मणांना तत्कालीन समाज व्यवस्थेमध्ये प्रथम स्थान होते पण या दर्जाला फक्त तात्विक दृष्ट्याच महत्त्व होते. आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात त्यांनी आपले स्थान गमावले होते व त्याची जागा आता क्षत्रियांनी घेतली होती. मुघल काळातील क्षत्रिय म्हणजे रजपूत होते. तसेच दक्षिणेतील नायक महाराष्ट्रातील क्षत्रिय किंवा मराठे इ. परंतु दक्षिणेतील ब्राह्मणांनी प्रशासकीय व्यवस्थेतील आपले अत्युच्च ठेवले होते. कारण अशा ब्राह्मणांनी धर्मशास्त्राने सांगितलेली कर्तव्य सोडून देऊन इतर व्यवसाय पत्करले होते.

विजयनगर साम्राज्यात माधव व सायण ब्राह्मण मोठ्या हुद्द्यावर मंत्री होते. मुघलांच्या समकालीन असलेल्या मराठी राज्यात मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो सारखे अनेक ब्राह्मण मंत्री महत्वाचे होते. तसेच प्रसंगी ते युद्धात भाग घेत असत.

कायस्थासारखा पुढे आलेला दुसरा वर्ग म्हणजे चारणांचा वर्ग होय. हा वर्ग प्रामुख्याने राजस्थानमध्ये पुढे आला चारणांचा सामाजिक दर्जा ब्राह्मण आणि राजपूत यांच्या मधला होता. समाजात त्यांचा मोठा आदर सन्मान होई. ते रजपूतांच्या शौर्याच्या कथा यशोगान करीत असत.

**क्षत्रिय:**

तत्कालीन राजसत्तेतील भारताचा संरक्षणकर्ता या नात्याने क्षत्रिय वर्णाला अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. समाजात त्यांना मोठ्या प्रमाणावर प्रतिष्ठा होती. अंतर्गत तसेच परकीय शत्रूपासून स्वताच्या राज्याचे संरक्षण करणे हे त्यांचे कार्य होते. मुघल काळात भारतातील क्षत्रियांमध्ये राजपूत लोकांचा भरणा अधिक होता. तसेच दक्षिणेतील राज्यांमधले नायक व महाराष्ट्रातील मराठे सरदार इ यांचा समावेश होतो. मुघल काळात क्षत्रिय अर्थात रजपुतांच्या शौर्याचे कौतुक करून त्यांचा राजकीय उद्देशासाठी उपयोग करण्यात येऊ लागला. रजपूत सरदारांना मोठे हुद्दे बहाल करण्याच्या अकबराच्या धोरणाने देखील हिंदू समाजात त्यांचा दर्जा उंचावण्यात आला. अकबर व त्याच्या पुढील राज्यकर्त्यांनी मुघल सत्ता स्थिर करण्यासाठी तसेच मुघल सत्तेचा साम्राज्यविस्तार करण्यासाठी रजपूत सरदारांचा तसेच इतर भारतातील क्षत्रिय जमातींचा महत्त्वाचा उपयोग करून घेतला होता.

**वैश्य:**

के. एन. चिटणीस यांच्या मते, सुलतान तसेच मुघल कालखंडामध्ये सर्व वर्णांपैकी फक्त वैश्यवर्णच त्यांचा मूळ व्यवसाय करीत होता, कारण वैश्य लोकांनी आपला परंपरागत व्यापार व व्यवसाय पुढे चालू ठेवला होता. मुघल काळात वैश्य समाजात सावकार, वाहतूक, व्यवसाय, ठोक व्यापारी यांचा समावेश होता. वैश्य वर्ण अनेक श्रीमंतांना व्याजावर कर्ज देत असे. तसेच राजसत्तेला देखील तेवढ्याच मोठ्या प्रमाणावर रसद अथवा पैसे पुरवत असे. जे व्यापारी होते ते घोडे कापड गुलाम गहू कडधान्य यांचा व्यापार करीत.

**शुद्र:**

हिंदूंच्या खालच्या वर्गात लोहार, सुतार, सोनार, विणकर, शिंपी, तेली, कुंभार, न्हावी, चांभार तसेच विविध व्यवसाय काम करणारे भूमिहीन मजूर यांचा समावेश होत असे. झाडूवाले, पहारेकरी, वाणी, शेतमजूर या सर्वांची भूमिहीन मजुरांमध्ये गणना होत असे. चांडाळ जातीबहिष्कृत आणि हिन काम करणारे अस्पृश्य अशा प्रकारचे लोक हिंदु समाजाच्या अगदी खालच्या थरात होते. त्यांची स्थिती अत्यंत शोचनिय होती.

## ८.४ मुस्लिम समाज घटकाची वैशिष्ट्ये

सुलतानशाही काळासारखे मुघल काळात देखील मुसलमान समाज तुर्की, अफगाण, इराणी, तुराणी अशा इस्लाम जगतातील विविध वंशीय लोकांनी आणि हिंदुस्थानातील बाटलेल्या

लोकांनी बनलेला होता. सुलतानशाहीच्या कालखंडात परकीय देशांतून अरब, अफगाण, तुर्की, मंगोल, तातर असे विविध वंशीय लोक भारतात नोकरीसाठी आले व उमराव वर्गात त्यांचा एक वीजातीय गट बनला.

### ८.४.१ तुर्क-मुघल:

गतेतिहासात जुन्या काळात उपरोल्लेखित तुर्क आणि मंगोल या दोन्ही टोळ्या तार्तार किंवा मध्य आशियातील तातार भटक्या टोळ्यांचाच भाग होत्या.  हे असे लोक होते की, ज्यांनी तेराव्या शतकाच्या पूर्वार्धांत चीनपासून ते ऑड्रियाटिक समुद्रापर्यंतच्या प्रदेशांत पसरलेल्या प्रत्येक साम्राज्याचा पाया आपल्या आक्रमणांनी खिळखिळा केला होता. उत्तरेकडील आशियाई देशात आणि गोबी वाळवंटाच्या पश्चिमेकडील प्रदेशात भटकेपणाचे जीवन व्यतीत करीत होते, ते 'काळे तार्तार' म्हणून ओळखले गेले. काळ्या तार्तार टोळीमध्ये सुद्धा दोन उपटोळ्या होत्या. एक मंगोल आणि दुसरी तुर्क. यांपैकी मंगोल हे आशियाच्या मध्यभागातील प्रदेशात आणि गोबी वाळवंटाच्या उत्तरेला राहत होते; तर तुर्क हे गोबी वाळवंटाच्या पश्चिमेकडील आशियाई प्रदेशात राहत होते. मंगोल या शब्दाची व्युत्पत्ती 'मोग' या शब्दापासून झालेली असून, ज्याचा अर्थ 'शूर' किंवा 'कमालीचा धाडसी' असा होतो. मंगोलांचा मुख्य प्रतिनिधी चंगेज खान याच्या कारकिर्दीत मंगोलांना राज्यकर्ती जमात असा दर्जा मिळाला. चंगेज खानाचा एक वंशज असलेला तुघलप तैमुररखान हा मंगोलीस्तानचा शासक तथा सर्वश्रेष्ठ खान होऊन गेला. त्याने १३५३ मध्ये इस्लाम धर्म स्वीकारला आणि आपल्या लोकांमध्ये व प्रजेत इस्लाम धर्माचा प्रसार केला. तेव्हापासून मंगोल या शब्दाचे रूपांतर 'मुघल' मध्ये झाले आणि मंगोलीस्तान चे रूपांतर मुघलीस्तान मध्ये झाले. पुढे भारतात बाबराने सत्ता स्थापन केली, त्या बाबराचे वडील उमर शेख मिर्झा चकताई तुर्क होते. मात्र त्याची आई कुतलघ निगार खानम ही मंगोलाच्या वंशातील होती. अशा रीतीने बाबराचा संबंध दोन भिन्न वंशांशी होता. बाबर हा मंगोलांचा, जे त्याच्या आईकडुन त्याच्याशी नात्याने संबंधित होते, त्यांच्याशी कृतज्ञ होता; कारण वडिलांकडून संबंधित असलेल्या अन्याया व स्वार्थी नातेवाइकांपासून मंगोलांनी बाबराच्या हितसंबंधांचे रक्षण केले होते. इतकेच नव्हे तर, बाबराच्या प्रतिकूल परिस्थितीत मंगोलांनी बाबरासाठी अपार बलिदान करून त्याला सर्वतोपरी मदत केली. तसेच काबूल आणि दिल्ली जिंकण्यासाठी शक्य तितके मनुष्यबळ मंगोलांनी त्यास उपलब्ध करून दिले; यामुळे बाबराचा उल्लेख तुर्क म्हणून झाला काय किंवा मंगोल म्हणून झाला काय, त्याला दोन्ही बाजूंच्या किंवा वंशांच्या सामाजिक परंपरेचा वारसा मिळाला व लाभ झाला. तथापि असे दिसते की बाबराच्या आणि त्याच्याबरोबर असलेल्या मंडळींचा मोगल असा जो उल्लेख अफगाण आणि भारतीय लोकांकडून केला गेला त्यास बाबराने धोरणीपणाने संमती दिली असावी. असे ज. एल. मेहता म्हणतात.

### ८.४.२ तुराणी:

तुराणींचे मूळ स्थान ऑक्सस नदी पलीकडचा देश किंवा तुराण. हा देश पश्चिमेकडे खारिझ्म आणि ऑक्सस नदी व बदक्षान यांच्यामध्ये होता. तूराणी हे सत्तारूढ किंवा राजघराण्याच्या वंशातले होते. ते काटक आणि निर्भय होते. त्यांचा मोगल हिंदुस्तानात एक अत्यंत प्रभावी वर्ग निर्माण झाला होता. तुराणी हे सामान्यता सुस्वाभावी, सुज्ञ, परोपकारी, इतरांच्या म्हणण्याला मान देणारे असे असल्याचे मांडेलस्लो सांगतो.

### ८.४.३ इराणी:

सुसंस्कृत आणि बुद्धीवादी मध्यमवर्गीय इराणी लोकांचे सुलतानशाही काळापासून भारतात एकसारखे येणे चालूच होते. बर्नियर याच्या मते, "राज्यातील अति महत्त्वाचे हुद्दे त्यांच्या ताब्यात असून मोगल दरबारात त्यांचे अत्यंत जास्त वजन होते." न्याय पंडित, व्यापारी आणि तसेच इतर व्यवसाय करणारे असून त्यांचा प्रामुख्याने मध्यम वर्गात व बुद्धिजीवी वर्गात समावेश होत असे. भारतात असले तरी इराणी लोकांना आपली मातृभूमी इराण बद्दल अत्यंत राष्ट्रप्रेम आणि आपल्या इराणी शहा बद्दल अत्यंत आदर वाटे. म्हणून राजकारणात अमर्यादित सत्ता त्याच्या हातात देण्यास मोगल राजे मागे पुढे बघत होते. एवढा एक भाग वगळता भारतातील मुसलमान समाजावरील त्याचा सांस्कृतिक प्रभाव इतरांच्या पेक्षा जास्त होता.

### ८.४.४ अफगाण:

बाबराच्या वर्णनाप्रमाणे, अफगाण हे लोक मूर्ख तसेच बुद्धिहीन असे लोक आहेत. त्यांच्यात विशेष विचारशक्ती दिसत नाही आणि त्यांची दुरदृष्टी तिच्याहून कमी आहे. मुघल आणि अफगाण विरोधी असल्याने बाबरने अफगाणांचे वरील शब्दात वर्णन केल्याचे समजण्यासारखे आहे. त्यांच्या गुणांपेक्षा दोषावरच जास्त भर दिला आहे. मांडेलस्लो याने पण अशाच प्रकारचे त्यांचे वर्णन दिल्यामुळे बाबरने त्यांच्याबद्दलचे सांगितलेले चुकीचे असे काही नसून त्यात थोडी अतिशययोक्ती आहे. असे म्हणता येईल. मांडेलस्लो च्या मते "अफगाण हे उद्धट, क्रुर आणि रानटी होते. सुसंस्कृत समाज जीवन जगण्यास ते योग्य नव्हते."

### ८.४.५ भारतीय मुसलमान:

भारतीय मुसलमानात बाहेरून येऊन हिंदुस्थानात स्थायिक झालेले मुसलमान आणि भारतात बाटलेले मुसलमान असे दोन प्रकार होते. पहिल्या प्रकारचे मुसलमान हिंदू लोकांसोबत विवाह संबंध करून हिंदुस्तानी बनले आणि दुसऱ्या प्रकारच्या मुसलमानानी इस्लाम धर्म स्वीकारला तरी त्यांचे हिंदू संस्कार गेले नव्हते. हे दोन्ही प्रकारातील मुसलमानांना एकाच वर्गाचे मानण्यात येई आणि त्यांच्यामध्ये एकमेकांत विशेष फरक दिसत नसे. सुलतानशाही काळासारखे आता सुद्धा सय्यद लोकांना समाजात मानाचे स्थान होते. राजकारणात हात घालून समाजात ते प्रभावी बनले. हा समाज बाहेरून एक किंवा सजातीय दिसला तरी त्यातील घटकांमध्ये परस्परांमध्ये बराच ताण होता. त्यांच्यातील ताण, द्वेष आणि मत्सर हे प्रामुख्याने त्यांच्या मायदेशाबद्दलचे प्रेम त्यांच्यातील पंथभेद आणि व्यक्तीहितसंबंध यांच्यामुळे उद्भवले होते.

## ८.५ मुघल काळातील समाजरचना

### ८.५.१ सत्ताधारीवर्ग:

सत्ताधारी वर्गात महत्त्वाच्या सहकारी हुद्द्यावर असलेले बादशाहचे नातेवाईक मोठ्या हुद्द्यावर असलेले तुर्राणी, इराणी, अफगाणी आणि काही सय्यद यांचा समावेश होता. या वर्गात उलेमा देखील समाविष्ट होते. सतिशचंद्र शर्मा यांच्या मते, मुघल कालीन समाज

रचनेचा अभ्यास करत असताना राज्यकर्त्या वर्गाचे दोन प्रकारांमध्ये विभाजन करावे लागते. पहिल्या प्रकारात शाही अथवा केंद्रीय सत्तेचे प्रतिनिधित्व करणारा अमीर उमरावांचा वर्ग येतो. तर दुसऱ्या मध्ये स्थानिक शासन व सरदार आणि जमीनदार यांचा समावेश होतो.

### ८.५.२ अमीर उमराव:

राज्यकर्त्या वर्गालाच एकत्रितपणे अमीर उमराव असे म्हणत. तत्कालीन मनसबदारी व्यवस्थेतील हा पहिला वर्ग होता. मोगल सत्तेची बांधिलकी मानणारा सरंजामदारांचाही एक वर्ग होता. या उभयतांचा देशाच्या राज्यकर्त्या वर्गात समावेश होता. अमीर उमरावांच्या वर्गात मुसलमान व हिंदू अशा दोघांचा समावेश होता. मात्र त्यात हिंदूंची संख्या कमी होती. मध्ययुगीन भारतीय अमीर उमराव श्रीमंतीत लोळत असत व अतिशय चैनीचे जीवन जगत. वारसा हक्क लागून न करण्याचा कायदा असल्याने उमरावांना आपल्या ताब्यातील सर्व शाही संपत्ती सम्राटाला परत करावी लागे. मानमराबत वारसा सरदारकी व्यक्ती जिवंत असेपर्यंत चालू राही, त्यामुळे जवळ असलेल्या संपत्तीचा कोणतीही काटकसर न करता जास्तीत जास्त उपभोग घेण्याची प्रवृत्ती बळावत असे. सहाजिकच अमीर-उमराव मोठाली अंत:पुरे बाळगीत. मोठे वाडे बांधत. हत्तींचे घोड्यांचे व गुरांचे कळप बाळगत. नोकर चाकर नृत्यांगना व गुलाम यांचा त्यांच्या सभोवती सदैव गराडा पडलेला असे. व्यक्तिगत नोकर-चाकरांचा गोतावळा एकदा का वाढू दिला की तो कमी करणे कदापि शक्य होत नसे. त्यामुळे कित्येक मनसबदारांना आपले उत्पन्न व खर्च यांची तोंड मिळवणी करणे अशक्य होई. दख्खन मध्ये एका अमीराला राहण्यायोग्य निवासस्थानाची किंमत दीड लाख रुपये होती उंची मुलायम गालीचे अत्यंत महाग पडदे, उठण्या बसण्यासाठी अत्यंत सुशोभीत खुर्च्या, पलंग इत्यादी गोष्टी अत्यावश्यक समजल्या जात होत्या. त्यांच्या घराची छते नक्षीदार व जडवलेली असत आणि खाली तसेच भिंतींना गुळगुळीत प्लास्टर केलेले असे. अबुल फजल साठी दररोज शंभर पदार्थ बनविले जात असत, असे म्हटले जाते. फळांवर आणि परदेशातून मागविलेल्या मध्यावर भरपूर खर्च होत होता. बर्फ ही चैनीची बाब होती पण तो सुद्धा वर्षभर वापरला जात होता. अत्यंत महाग चिनी मातीची भांडी सोन्याची व चांदीची भांडी ही मोठ्या प्रमाणावर वापरली जात होती. खाणे-पिणे तसेच खाण्यापिण्याच्या साधनांवर त्यांचा भरपूर खर्च होत असे. त्यांच्या जीवनशैलीत काटकसर करण्यास वाव नव्हता, त्यामुळे बऱ्याचदा त्यांना शाही तिजोरीतून किंवा अन्य ठिकाणाहून मोठे कर्ज घ्यावे लागे. सरतेशेवटी याचा असा परिणाम झाला की, मोगल साम्राज्याचा कणा असलेल्या या मनसबदारांची नैतिकता ढासळली आणि त्यांच्या युयुत्सुपणाला ग्रहण लागले. त्यांच्या ढासळलेल्या नैतिकतेचा त्यांच्या लष्करी तुकड्यांवर विपरीत परिणाम होऊन लष्कराची शिस्त व कार्यक्षमता बिघडली. मोगल साम्राज्याचा नाश व पतन होण्याचे हे एक महत्त्वाचे कारण ठरले.

### ८.५.३ जमीनदार:

जमीनदार हा शब्द चौदाव्या शतकात रूढ झाला व १७ व्या शतकात त्याचा रोजच्या व्यवहारात वापर सुरू झाला. मुघलकालीन शब्दावली मध्ये, जो माणूस गावातील अगर छोट्या शहरातील जमिनीचा मालक असून शिवाय तो असतो तो जमीनदार असा अर्थ दिलेला आहे. आधुनिक इतिहासकार इरफान हबीब यांच्या मते, शेतकऱ्यांपेक्षा एका वेगळ्या

व वरच्या ग्रामीण वर्गाकडे असलेला अधिकार म्हणजे जमीनदारी. जमीनदार ग्रामीण जीवनाच्या सर्वोच्च स्थानी होते. त्यांच्याकडे स्वतंत्र सशस्त्रे होते. आणि साधारणता ते गढ्यांमध्ये अथवा किल्ल्यांमध्ये राहत असत. या गड्या म्हणजे त्यांची संरक्षित आश्रयस्थाने होती. तसेच त्या प्रतिष्ठेचे निदर्शकही होत्या. जमीनदारांच्या एकत्रित सेना प्रचंड होत्या. आईने अकबरी नुसार, अकबराच्या काळात जमीनदारांकडे ३,८४, ५५८ स्वार, ४२,७७,०५७ पायदळ, १,८६३ हत्ती व ४,२६० तोफा होत्या. जमीनदार वर्ग संख्येने मोठा सत्ताधारी व शक्तिशाली होता. जमीनदार देशात देशमुख, पाटील, नायक अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखले जात या वर्गाची संख्या व शक्ती लक्षात घेता, कोणत्याही केंद्रीय सत्तेला या वर्गाकडे दुर्लक्ष करणे किंवा नाराज करणे मुळीच सोपे नव्हते. जमीनदारांच्या जीवनस्तराबद्दल काहीही सांगणे कठीण आहे. अमीर-उमरावांच्या तुलनेत त्यांचे उत्पन्न बरेच मर्यादित होते. छोटे जमीनदार कदाचित थोड्या अधिक संपन्न शेतकऱ्यांप्रमाणे राहत असावेत; पण मोठ्या जमीनदारांचा जीवनस्तर बहुधा छोटे राजे किंवा सरदारांच्या बरोबरीचा असावा; परंतु बहुसंख्य जमीनदार ग्रामीण भागात राहत होते आणि त्यांचे स्वरूप स्थानिक वतनदार लोकांच्या एक प्रकारच्या शिथिल, विखुरलेल्या वर्गांचे होते.

जमीनदारीचे अधिकार वंशपरंपरागत चालत असत. या अधिकारांची खरेदी-विक्री देखील केली जात असे. अकबराच्या काळापासून जमीनदारी हक्कांची भागशः अगर संपूर्णपणे खरेदी-विक्री झाल्याची भरपूर उदाहरणे आहेत. खरेदी-विक्रीवर जात किंवा धर्माच्या बाबतीत काहीही निर्बंध नव्हते; पण महाराष्ट्रात जमीनदारीच्या विक्रीला गावातील रहिवाशांनी किंवा पाटलांनी संमती दिल्याचे कागदपत्र मात्र उपलब्ध आहेत. इतर संपत्तीप्रमाणे जमीनदारी हक्काची वाटणीही करता येत होती.

अबुल फजल याच्यामध्ये मते, मोगल भारतात बऱ्याच ठिकाणी कायस्थ, जाट, रजपूत आणि ब्राह्मण हे जमीनदार होते याशिवाय गुजर, गोंड, अहिर, त्यागी, कोळी, खोकर, कच्ची, धरेज, सहेज, मेहर इत्यादी जातीतले लोक सुद्धा जमीनदार होते.

### ८.५.४ व्यापारी वर्ग:

हिंदुस्थानात मध्ययुगीन काळामध्ये व्यापारीवर्ग सर्व प्रदेशांमध्ये पसरलेला होता. हिंदुस्थानातील हा वर्ग आपल्या व्यवसायात अत्यंत कुशल होता. काही व्यापारी दूर अंतरावर जाऊन आंतरप्रादेशिक व्यापार करीत असत, तर काही लोक स्थानिक स्वरूपाचा किरकोळ व्यापार करीत असत. पहिल्या प्रकारच्या व्यापाऱ्यांना सेठ, बोहरा, मोदी यांसारख्या संबोधनांनी ओळखीत; तर दुसऱ्या प्रकारच्या व्यापाऱ्यांना 'व्यापारी' अगर 'निक' म्हणून संबोधित. बनिक लोक किरकोळ प्रमाणावर माल विकत घेत असत आणि गावाशहरांमधील आपल्या प्रतिनिधींमार्फत अन्नधान्ये किंवा नगदी पिकेही विकत घेत असत. कधी कधी त्यांना 'बनिया' किंवा 'बक्काल' (अन्नधान्याचे व्यापारी) असेही संबोधित. हे बनिया लोक स्थानिक पातळीवर सावकारीचा धंदाही करीत. अतिशय लोभीपणा व कर्जदारांचे शोषण करण्याची वृत्ती यांमुळे ते बदनामही झाले होते; पण अन्नधान्यांची गावाकडून शहरांमध्ये वाहतूक सुलभ करून, देशाच्या वेगवेगळ्या भागांना अन्नधान्य पुरवून ते एकूण अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका पार पाडीत असत.

हिंदुस्थानातील व्यापारीवर्ग हा एका जातीचा किंवा एका धर्माचा नव्हता. गुजराती व्यापाऱ्यांमध्ये हिंदू, जैन व मुस्लीम यांचा समावेश होता. मुस्लीम व्यापाऱ्यांपैकी बहुसंख्य बोहरा होते. राजस्थानातील ओसवाल, माहेश्वरी आणि अग्रवालांना पुढे 'मारवाडी' म्हटले जाऊ लागले. मध्य आशियाशी खुष्कीच्या मार्गाने होणारा व्यापार मुलतानी, अफगाण व खत्री लोकांच्या हाती होता. बंगाली व्यापाऱ्यांना 'गंध-बनिक' म्हटले जात असे; पण पुढे त्यांची जागा अफगाण व मुस्लीम व्यापाऱ्यांनी घेतली. अठराव्या शतकात मारवाडी लोक महाराष्ट्र व बंगालमध्ये पसरले. कारोमांडेल किनाऱ्यावरील चेट्टीयार व मलबार किनाऱ्यावरील मुस्लीम व्यापारी (चुलिया व मापिल्ला) हे दक्षिण हिंदुस्थानातील सर्वांत महत्त्वाचे व्यापारी समुदाय होते.

व्यापाऱ्यांच्या जीवनशैलीबद्दल सांगावयाचे तर त्यामध्ये परिस्थितीनुसार भरपूर विविधता होती, असे दिसते. बर्नियर म्हणतो की, 'शोषणा'च्या भीतीमुळे व्यापारी अत्यंत निर्धन असल्याचे भासवत असत; कारण अमीर लोक कधी कधी आपल्या अधिकारांचा गैरवापर करीत असत. अकबराच्या मृत्युसमयी जौनपूरमध्ये असे घडले होते. जैन व्यापारी बनारसी दास म्हणतो की, कधी कधी शाहजादेसुद्धा व्यापाऱ्यांना बळाचा वापर करून कर्जे द्यायला भाग पाडत. अर्थात, अशी उदाहरणे अपवादात्मकच होती. 'मिरत-इ- अहमदी' या गुजरातवर लिहिल्या गेलेल्या ग्रंथाचा लेखक सांगतो की, अहमदाबादमध्ये दोन अतिसंपन्न उपनगरे होती, त्यांना तो 'शहराचे दोन सोनेरी पंख' म्हणतो. या उपनगरांमध्ये अतिधनाढ्य हिंदू सावकार राहत होते.

### ८.५.५ मध्यमवर्ग:

मध्यमवर्ग जरी मोठा असला तरी तो एकसंध नव्हता. नव्याने मनसबदारी प्राप्त झालेले सरदार, नागरी व न्यायिक खात्यांतील मधल्या पातळीवरचे अधिकारी, व्यापारी, मोठे जमीनदार, पेढ्या चालविणारे व अन्य व्यावसायिक (ज्यांत धर्मगुरू, सुशिक्षित वर्ग व कलाकार यांचा समावेश होता. अशा सर्वांचा मिळून मध्यमवर्ग बनला होता. सरंजामदार हा प्रभावी गट होता; त्यामुळे जमिनीची मालकी असणे हे समाजात मोठेपणा असल्याचे लक्षण समजले जाई. वंशपरंपरागत चालत आलेल्या जातिव्यवस्थेवर हिंदू समाजाचे स्तरीकरण झालेले असल्याने उच्चकुलीन श्रीमंत व समाजात वजन असणाऱ्यांनाच मध्यमवर्गात प्रवेश मिळाला. हिंदूंशी आलेल्या संपर्कातून मुस्लीम समाजातसुद्धा जन्माधिष्ठित आणि जातकुळीच्या आधारे समाजातील दर्जा ठरू लागला होता. उदाहरणार्थ- बंगाल व बिहारमध्ये हिंदूंच्या जातिव्यवस्थेप्रमाणेच मुसलमानांत 'अश्रफ' म्हणजे उच्चकुलीन व 'रझिल' म्हणजे हलक्या कुळात जन्मलेले अशी जन्मानुसार उच्च- नीचता प्रस्थापित झाली असल्याचे दिसून येते. जन्माने श्रेष्ठत्वाचा दावा करणाऱ्या अश्रफांना स्वतःच्या मोठेपणाचा फार गर्व वाटे. हिंदूंमधील ब्राह्मण व क्षत्रिय या वर्गांना समांतर असणाऱ्या मुसलमान समाजातील शेख, सय्यद, मोगल व पठाण यांचा अश्रफ वर्गांत समावेश होता. हलकीसलकी कामे करणे व कनिष्ठ समजले जाणारे व्यवसाय करणे त्यांना लज्जास्पद वाटे. सामान्यतः मध्यमवर्ग आर्थिकदृष्ट्या सुस्थितित होता पण स्वभावाने उधळ्या नव्हता; अमीर वर्गाचा डामडौलही त्यांच्यात नव्हता. औरंगजेबच्या कारकिर्दीच्या अखेरीला देशात आलेल्या आर्थिक डबघाईचे चटके कनिष्ठवर्गीय मनसबदार व मध्यम दर्जाच्या अमीर वर्गाला फारसे

जाणवले नाहीत; त्या काळातही ते मौजमजेचे जीवन जगले. उद्योग-व्यवसाय व पेढ्या चालविणारे बहुतेकजण हिंदू समाजातीलच होते.

व्यवसायिक वर्गामध्ये वैद्य हे छोटे अधिकारी व्यापारी, शहरी व्यवसायिक व श्रीमंत कारागीर आदींना वैद्यकीय सेवा पुरवीत असे. व्यवसायिकांच्या वर्गामध्ये संगीत तज्ञ सुलेखनकार शिक्षक आदींचा समावेश होता. लेखक, इतिहासकार, गणितज्ञ, खगोलशास्त्रज्ञ, धर्म पंडित यांचाही समावेश शहरातील बुद्धिजीवी मध्यम वर्गातच करता येईल अशा रीतीने मध्यम वर्गाचे आपले वेगळे हितसंबंध होते आणि त्यामध्ये वेगवेगळ्या जातींचे व धर्माचे लोक होते

## ८.५.६ कारागीर वर्ग:

या वर्गात खाटीक, पाणक्या, खोदकाम करणारे, चित्रकार, रोषणाई करणारे, हकीम, लेखक, विणकरी, धोबी, न्हावी, सुतार, लोहार, शिंपी, लाकूडतोड्या अशा प्रकारचे मुसलमान कारागीर समाविष्ट होते. त्यातील बरेचजण उदरनिर्वाहाची सामान्य साधने असलेले बाटलेले हिंदू होते. यातील काही- सरकारी कारखान्यात काम करीत. या वर्गाचे अस्तित्व मोरलँड यांच्या विधानाला उघडउघड खोटे ठरविते. विद्वानांच्या म्हणण्यानुसार, हिंदुस्थानी कारागीर अत्यंत साध्या उपकरणांचा उपयोग करून अत्युत्कृष्ट दर्जाचे उत्पादन करीत असत. याचे एक कारण असे होते की, देशांतर्गत बाजारपेठा मर्यादित असल्यामुळे श्रम वाचविण्याचे फारसे प्रयत्न कोणी करीत नव्हते; शिवाय श्रम वाचविण्याच्या अशा प्रयत्नांतून बेकारी वाढण्याची भीती होती. उदाहरणार्थ- इ. स. १६७२ मध्ये कारोमांडेल किनाऱ्यावर डच लोकांनी लोखंडी खिळे व तोफेच्या गोळ्यांचे उत्पादन चौपट करण्याचे तंत्र यशस्वीरीत्या अमलात आणले होते; त्यामुळे अनेक लोहार आपले उपजीविकेचे साधन गमावून बसतील, या भीतीमुळे तेथील स्थानिक सरकारी अधिकाऱ्यानी डचांच्या या तंत्राच्या वापरावर बंदी घातली.

## ८.५.७ शेतकरी वर्ग:

मुसलमान समाज हा प्रामुख्याने शहरी समाज असून त्या लोकांना शेती करत खेडयात रहाणे आवडत नसे. तरी काही भारतीय मुसलमान, विशेषतः बंगाल आणि काश्मीरमध्ये शेती करीत होते. अगदी खालच्या वर्गातून गुलाम आणि शेतमजूर यांचा पुरवठा होत असून गुलामांच्या स्थितीत आणि शेतमजुरांच्या स्थितीत विशेष काही फरक नसे. गावातील बहुसंख्य वर्ग हा शेतकरी वर्ग होता व त्यांच्यातील बहुसंख्य लोक आपण गावच्या मूळ लोकांचे वंशज असल्याचे सांगत होते. संस्कृत मध्ये जुन्या रहिवाशांना स्थानिक म्हणतात या लोकांना महाराष्ट्रात 'मिराशी' आणि 'गाव्वेती' अगर गावेती असे म्हणत असत.

स्थानिक शेतकऱ्यांचे अनेकदा दोन वर्ग होते. रियायती आणि रयती; म्हणजे अनुक्रमे विशेष अधिकार असलेले व सामान्य. त्यांना महाराष्ट्रात 'मिराशी' व राजस्थानच्या काही भागात घारु-हाला म्हणत. तर फारसी मध्ये खुदकास्त म्हणत. त्यामुळे गावातील रहिवासी असणे स्वतःची जमीन असणे व ती जमीन मजुरांसहित स्वतःच्या कुटुंबातील व्यक्तींच्या सहाय्याने कसं ही खुदाकाश्त शेतकऱ्यांची वैशिष्ट्ये होती. सर्वसामान्य शेतकरी वर्गाला राजस्थानात रय्यती अगर पालती म्हटले जात असे. फारसीत त्यांना 'मुजारियान' अशी संज्ञा होती.

### ८.५.८ गुलाम-नोकर:

राजे आणि राज्यकर्त्यां वर्गातील लोक प्रतिष्ठेचे द्योतक म्हणून, देखाव्यासाठी तसेच सेवेसाठी आपल्या घरांमध्ये किती मोठ्या संख्येने नोकर-चाकर आणि गुलाम ठेवत होते, याची वर्णने सोळाव्या शतकामध्ये हिंदुस्थानात येऊन गेलेल्या युरोपियन प्रवाशांनी केली आहेत, मोरलँड याने आपल्या 'इंडिया अॅट द डेथ ऑफ अकबर' या पुस्तकामध्ये याचा उल्लेख केला आहे. तो म्हणतो, 'बरीचशी घरगुती सेवा केवळ निरुपयोगी होती" आणि याचा परिणाम असा झाला की, "बऱ्याचशा लोकांच्या शक्तीच्या व साधनांचा उपयोग उपयुक्तः कामांसाठी न होता फजूल किंवा व्यर्थ होत होता.'

त्या काळात मुक्त नोकरांना व गुलामांना दिली जाणारी कामे बहुतांश प्रमाणात एकसारखीच होती, हे मोरलँडचे मत मात्र बरोबर आहे. गुलामगिरीची परंपरा हिंदुस्थानात फार पूर्वीपासून होती; पण शेतीच्या कामांमध्ये किंवा इतर उत्पादन कार्यांमध्ये गुलामांचा वापर जवळजवळ कधीच केला जात नव्हता. याला फक्त फिरोज तुघलक याचा जवळजवळ एकमेव अपवाद होता. अफगाणांच्या उदयानंतर गुलामांचा युद्धात वापर करण्याची प्रथा हिंदुस्थानात बव्हंशी संपुष्टात आली. अकबराने गुलामांचा उपयोग 'चेले' म्हणून युद्धात जरूर केला; पण तो सुद्धा फक्त विविध सेवांसाठी. प्रत्यक्ष युद्धात त्याने सुद्धा गुलामांचा वापर केला नाही.

सल्तनतीच्या काळाप्रमाणे या काळात आपल्याला गुलामांच्या किमतीचा फारसा उल्लेख सापडत नाही. गोव्यामध्ये दासीची किंमत सुमारे पन्नास रुपये असल्याचे पायरार्ड सांगतो, पोर्तुगीजांनी गुलामांचा मोठ्या प्रमाणात वापर केला. आराकानी व माघ लोकांना गुलाम बनविण्यासाठी पोर्तुगीज लोक पूर्व बंगालमध्ये अनेकदा हल्ले करीत होते. त्यांनी चितगाव, सनद्वीप, हुगळी आणि पिपली येथे गुलामांचे बाजार स्थापन केले होते. गोव्यातही गुलामांचा मोठा व्यापार होता. यांपैकी अनेक गुलामांना आग्नेय आशियामध्ये विकले जात असे. औरंगजेबाच्या काळात शाहिस्तेखानाने पोर्तुगिजांच्या या प्रकाराला आळा घातला.

हिंदुस्थानी गुलाम हे एक तर वंशपरंपरागत किंवा युद्धात पकडले गेलेले किंवा उठावाच्या अथवा सरकारी महसूल न भरल्याच्या आरोपाखाली गावांवरील हल्ल्यांमध्ये पकडले गेलेले असत. वरचेवर पडणाऱ्या दुष्काळामध्ये अनेकदा लोक अन्नासाठी आपल्या पोटच्या मुलांनासुद्धा विकत. युद्धकैद्यांना गुलाम बनवून त्यांना मुस्लीम बनविण्याची प्रथा अकबराने बंद पाडली. त्याचप्रमाणे लोकांनी विकलेली मुले परत विकत घेण्याची व त्यांचे पुन्हा धर्मांतर करण्याची परवानगीही त्याने दिली; हिंदुस्थानात गुलामांना सहसा वाईट वागणूक दिली जात नव्हती व गुलामांना मुक्त करणे हे सत्कृत्य मानले जात होते. पण मुळात गुलामगिरी हीच वाईट होती व त्यामुळे मुक्त नोकरांची परिस्थितीही अनेकदा वाईट होत.

## ८.६ मुघल काळातील स्त्रियांची स्थिती

सर्वसामान्यपणे मुघल काळखंडात हिंदू आणि मुस्लिम स्त्रिया या समाजात दुय्यम म्हणूनच त्यांना स्थान दिले जाई. मुस्लिम तसेच हिंदू धर्मात वडील किंवा मुलगा अथवा नवरा यांच्यावर अवलंबुन राहावे लागे. भारतातील पुरुषप्रधान व पितृसत्ताक पद्धतीचे स्त्रीवर मोठ्या प्रमाणावर परिणाम झालेले दिसून येतात.

## मुस्लीम स्त्री:

उच्चवर्गीय स्त्रिया सर्वसाधारणपणे सुशिक्षित होत्या आणि 'हरम' या जनानखान्यात जरी त्या बंदिस्त असल्या तरी त्यांचे जीवन बरेचसे सुखासीन होते. त्यांच्या पतींना इतरही अनेक बायका व रखेल्या होत्या. गोंडवनची राणी दुर्गावती किंवा अहमदनगरची चाँदबिबी यांसारख्या काही उच्चवर्गीय स्त्रियांनी स्वतः राज्यकारभार केला किंवा नूरजहाँसारख्या काही स्त्रियांनी पतीमार्फत राजकारणात सक्रिय भाग घेतला. शाहजहानची मुलगी जहाँआराचा शाहजहानच्या काळात तसेच औरंगजेबाच्या काळातही राजकारणाशी निकटचा संबंध होता, मुघल सत्तेच्या उतरत्या काळामध्ये महंमदशाहच्या कारकिर्दीमध्ये त्याची राणी उधमबाई (ही पूर्वी नर्तिका होती) व भाजीपाला विकणारी जोहरा) या दोघींनी राजकारणात महत्त्वाची भूमिका पार पाडली होती. अशा आणखीही अनेक उच्चवर्गीय स्त्रियांची उदाहरणे देता येतील. खरे तर, याहीपेक्षा अधिक महत्त्वाची भूमिका स्त्रियांनी पडद्याआड राहून पार पाडली. त्यांनी समाजाला नैतिक व सांस्कृतिक अधिष्ठान दिले; त्यांनी शाही अभिरुचीवर तसेच सत्ताधीशांनी कोणत्या गोष्टींना अगर व्यक्तींना आश्रय द्यावा यावर मोठा प्रभाव पाडला किंबहुना अनेक स्त्रियांनी स्वतःसुद्धा अनेक कलाकारांना, गायकांना आश्रय दिला. अनेकजणींनी स्वत:ही अनेक साहित्यकृतींची निर्मिती केली. जहाँआरा मख्फी (गुप्त) या टोपणनावाने लिहीत असे. औरंगजेबाने रोशनआराला दरबारातून काढून दिल्लीला पाठविल्यावर तिने तेथे एक साहित्यिक केंद्र सुरू केले होते.

मुस्लिम स्त्रियांमध्ये बहुपत्नीत्वाची चाल होती. बहुपत्नीत्वाच्या चालीमुळे स्त्रियांची परिस्थिती अधिक बिकट होत असे. समाजातील त्यांच्या संचाराला कमी वाव असला तरी स्त्रीत्वाचा मान राखला जात असे. त्यांचे पावित्र्य राखण्याचे सर्व प्रयत्न केले जात असत. स्वत्वाचे संरक्षण करताना स्वतःच्या प्राणांचे बलिदान करण्याचीही त्यांची तयारी असे. स्त्रियांचा मान राखण्याची पद्धत समाजामध्ये सुस्थापित झालेली होती. स्त्रिया आच्छादित गाडीतून प्रवास करीत असल्या तर त्यांच्या सुरक्षिततेची पूर्णपणे हमी असे. कारण ती गाडी थांबवून तपासली जात नसे. दिल्लीच्या सुलतानांच्या काळाप्रमाणे, मोगल काळातही पडदा पद्धत प्रचलित होती. सामान्यपणे सर्वच स्त्रिया व विशेषेकरून सरदार घराण्यातील स्त्रिया पडदा पद्धत पाळीत असत. व पडद्यातून बाहेर येणे अत्यावश्यक झाल्यास आपल्या चेहऱ्यावर बुरखा घेऊन त्या पडद्यातून बाहेर येत असत. मुस्लिम लोक आपल्या समाजातील स्त्रियांचे रक्षण फार काळजीपूर्वक रीतीने करीत असत. आपण स्वतः हजर नसताना आपल्या भावाला किंवा पित्याला, आपल्या पत्नीने पहावे, ही गोष्टसुद्धा मुस्लिम पुरुषाना आवडत नसे. बहुपत्वीक मुस्लिम कुटुंबामध्ये जी पहिली पत्नी किंवा पहिल्या लग्नाची बायको असेल, तिला इतर स्त्रियांच्या तुलनेने कुटुंबात बहुमान व प्रतिष्ठेचे स्थान असे व इतर स्त्रिया पहिल्या स्त्रीच्या देखरेखीखाली असल्याचे मानले जात असे.

सर्व सामान्य स्त्रियांचे जगणे सामान्यतः कंटाळवाणे, कष्टदायक व परावलंबित्वाचे असे. पुरुषांच्या जीवनाशी तुलना करताना, स्त्रियांना स्वातंत्र्य, मानसन्मान व सुखसोयी कमी प्रमाणात उपलब्ध असत. पुरुष समाजात नीतिमत्तेच्या बाबतीत बरेच शैथिल्य आढळून येत असे व त्यामुळे स्त्रियांची परिस्थिती अधिकच खालावलेली असे. महंमद यासीन म्हणतात, 'मोठमोठे जनानखाने असले तरीही, सज्जन लोकांच्या घरांचे छप्पर व गच्ची याकडे टेहळणी करीत रस्त्याने रेंगाळणाऱ्या, आणि शेजाऱ्यांच्या खिडकीतून डोकावणाऱ्या भटक्या

व दुष्ट लोकांची उणीव नव्हती. काशी (बनारस) मधील व्यसनी लोकांविषयी कबीर जे म्हणतो तेच दिल्ली व आग्रा या शहरात राहणाऱ्या वाईट मुस्लिमांनाही लागू होते. स्त्रियांचे अपहरण हा जिहादचा एक उदात्त प्रकार मानलेला होता.

**हिंदु स्त्री:**

उत्तरेकडील त्याचप्रमाणे दक्षिणेकडील स्त्रियांची परिस्थिती काही अपवाद वगळता सारखीच होती. मुलगी ही सामान्यपणे जबाबदारी मानली जात असे कुटुंबातील एक आवश्यक ओझे या दृष्टीने आई-वडील आपल्या मुलीकडे पाहत असत . मुलीचा जन्म एक अनाहुत स्वागत न करण्याजोगी घटना असे. मुलीच्या जन्माबाबत आवडत नसल्यामुळे किंवा बोज वाटल्यामुळे बालहत्येची पद्धत कदाचित रूढ झाली असावी. आयुष्यभर तिच्या हालचालींवर बंधने असत. सामान्यतः बालविवाह होत होता. मुलगी आठ वर्षाची झाली म्हणजे तिचे लग्न करावे असा आदेश धर्मशास्त्राने दिला असता तरी तो सर्वत्र सारखाच पद्धतीने पाळला जात नसे. आपला जोडीदार निवडण्यात मुलीला स्वातंत्र्य नव्हते. लग्न ही एक पवित्र बाब समजली जाई. प्रामुख्याने हिंदू समाजातील उच्च वर्गीयांमध्ये बहुपत्नीत्वाची चाल सर्रास चालू होती. सर्वसाधारण हिंदू कुटुंबात एक पत्नीत्व पाळत. हिंदू स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार नव्हता. हिंदू स्त्रियांमध्ये भ्रूणहत्येसारखी चाल होती व ते सती जाण्याला प्रोत्साहन देत. मुघलांनी सतीची चाल निर्बंद्ध करण्याचेही प्रयत्न केले दुर्दैवाने हे प्रयत्न व्यर्थ ठरले. कारण सर्वच महत्त्वाच्या रजपूत राजांनी ही चाल तशीच चालू ठेवली. इ. स. १६१४ मध्ये महाराजा मानसिंग चा दख्खन मधील एलिजपुर ला मृत्यू झाल्यावर त्याच्या चार राण्या सती गेल्या तसेच पाच राण्या अंबर येथे सती गेल्या. तथापि सती जाणाऱ्या स्त्रियांमुळे राजाला पुन्हा मिळते. अशी कल्पना रूढ झाली होती. या कल्पनेतून राजा बरोबर इतर अनेक स्त्रियांना व दासींनाही ठेवायला लावून त्यांना राजा बरोबर सती जावयास भाग पाडण्यात येऊ लागले. अशा स्त्रियांनाही राजाच्या एक प्रकारच्या पत्नीचा दर्जा देण्यात येत होता. इ.स. १६९८ मध्ये जेव्हा बिकानेर चा महाराजा अनुपसिंह मरण पावला तेव्हा त्याच्याबरोबर दोन राण्या, नऊ देशाचारगत पत्नी आणि सात दासी एवढ्या स्त्रिया सती गेल्या.

मध्ययुगीन भारतातील विधवा स्त्रीचे जिणे फारच भयंकर असे. उत्तरेत व दक्षिणेतही तिला अनेक सामाजिक चालीरीतींना व बंधनांना बळी पडावे लागत असे. स्त्रीला जे काय मानाचे स्थान असे ते एखाद्याची पत्नी म्हणूनच मिळत असे. तिचा सामाजिक दर्जा तिला एखाद्याची पत्नी म्हणूनच प्राप्त होत असे. म्हणून तिच्या वैवाहिक जीवनाचा आधार फक्त तिचा पतीच असे व एकपत्नीत्वाची पद्धत रूढ असेल तर तिची परिस्थिती निश्चितच अधिक चांगली असे व बहुपत्नीत्वाच्या पद्धतीत तिची परिस्थिती निकृष्ट होत असे. आपला पती गमावला की तिचा सामाजिक दर्जा पूर्णपणे नाहीसा होत असे. वैधव्य हा मध्ययुगीन भारतीय स्त्रीला एक शापच होता. या संकटाने तिचे सवं सुख, सर्व सन्मान, आशा, आकांक्षा, शोषून घेतल्या जात असत व अर्धमृत, कंटाळवाणे, असहाय्य आणि अपमानित जीवन तिला व्यतीत करावे लागत असे, स्त्रियांना पतीच्या निधनानंतर मालमत्तेत वाटा दिला जात नसे.

एकंदरीत हिंदू मुसलमान सर्वसामान्य स्त्रियांचे जीवन कष्टप्रद होते. समाजात स्त्रीचे स्थान कनिष्ठतम प्रतीचे होते व स्त्रियांचे विचार त्यांच्या जीवन विषयक कल्पना व त्यांच्या भावना

याबद्दल सहानुभूतीचा पूर्ण अभाव होता. ही वस्तुस्थिती मध्ययुगीन भारतात दक्षिणेप्रमाणे उत्तरेकडे ही आढळून येत होती.

## ८.७ सरंजामी समाज

मध्ययुगीन भारतीय समाजाची संरचना एक प्रकारच्या सरंजामदारी पायावर उभी राहिलेली होती. सरंजाम पद्धतीची तात्विक बैठक अशी होती की राजा हा देशातील सर्व जमिनीचा मालक समजण्यात येई. त्यातील बहुतेक भाग तो प्रमुख सरंजामदारांना प्रदान करी. हे सरंजामदार राजाचे कुळ असून देखील आपल्या खालील कुळांना जमिनीचा भाग देत असत. पुन्हा ही कुळे देखील आपल्या खालील लोकांना काही जमिनी प्रदान करीत. ही प्रक्रिया खालपर्यंत जात. याप्रमाणे समाजाची रचना मनोऱ्यासारखी दिसत असुन वरील शिखरावर राजा, जो सर्व जमिनीचा मालक असून त्याच्या खालोखाल मुख्य सरंजामदार, त्यांच्याखाली अमुख्य सरंजामदार, त्यांच्याखाली अजून काही कमी दर्जाचे सरंजामदार, अशा वेगवेगळया श्रेणी असून अगदी खाली भूमिहीन शेतमजूर (serf) असत. राजसत्ता आणि राजाचे अधिकार हे ईश्वरदत्त असून सर्वोच्च प्रमुख म्हणून राजाचा देशातील सर्व जमिनीवर मालकी हक्क आहे, असा बादशहाचा दावा होता. शाही कुटुंब, त्यांचे नातेवाईक, मित्र आणि राजाचे कुळ असून देखील आपल्या मुलांना आपल्या जमिनीतील काही भाग देत असतातही मर्जीतील लोक यांना समाजात एक खास (सर्वोच्च) स्थान होते. सामाजिक आणि सांस्कृतिक चालीरीती बादशाही अंत:पूर आणि दरबारी लोकांच्या वागण्यावरून ठरत असत. उदाहरणार्थ- राज्यातील प्रथम मानांकन असलेली स्त्री म्हणून नूरजहानने तिच्या काळातील अमीर-उमरावांसाठी सामाजिक-सांस्कृतिक मूल्यांचे आदर्श घालून दिले होते.

## ८.८ जीवनमान

एकंदरीत उपलब्ध असलेल्या देशी व परदेशी साधनांवरून तसेच प्रवासीवर्णना वरून असे चित्र उभे राहते की, १६ व्या व १७ व्या शतकात राज्यकर्ता वर्ग (उच्च वर्ग) यांचा एक गट श्रीमंत ऐषारामी जीवन जगत असे. परंतु त्याच वेळी त्याच्या विरुद्ध टोकाला सामान्य जनतेची म्हणजेच शेतकरी कारागीर व श्रमिक लोक यांची परिस्थिती अतिशय हालाखीची नाजूक होती. बहुसंख्य जनता खेड्यांमध्ये राहत होती. एखाद्या गावातील सर्व शेतकऱ्यांचे अगर कारागिरांचे जीवनमान एकाच दर्जाचे नसे. प्रत्येक गावामध्ये परिस्थिती वेगवेगळी असे. ग्रामीण समाजातील विषमता ही मोठ्या प्रमाणावर होती. टंचाईच्या काळात अगर दुष्काळात गरीब लोकांची उपासमार होऊन ते छोट्या शहरापर्यंत स्थलांतर करीत असत. ही संधी साधून श्रीमंत लोक शेतकरी व मध्यमवर्गीय अशा गरिबांना कर्जबाजारी करीत असत व त्यांचे शेती अवजारे जमिनी ताब्यात घेत असत.

बाबराने त्याच्या आत्मचरित्रामध्ये 'शेतकरी आणि निम्न स्तरातील लोक हिंदुस्थानात नग्न अवस्थेत राहतात' असे वर्णन केले आहे. अबुल फजल याने म्हटले आहे की, "लोक बहुदा कमरे भोवती छोटी लुंगी नेसतात व वर उघडेच असतात.

सर्वसामान्य लोक पादत्राणे न वापरता अनवाणीच वावरत होते. पादत्राणे वापरणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जात होते. प्रामुख्याने स्त्रिया भरपूर प्रमाणावर दागिने वापरत होत्या. हे दागिने

सोने चांदी व तांबे या खेरीज काचेचे किंवा हस्तीदंती होते. बहुतांश शेतकरी मातीच्या भिंती व गवताचे छत असलेल्या एका खोलीच्या घरांमध्ये राहत होते. दक्षिण हिंदुस्थानातील कामगारांची घरे म्हणजे काजनच्या पानांनी झाकलेल्या झोपड्या असत. गुजरात भागातील घरे खपरांनी शाकारलेली होती. तसेच त्यात चुना व विटा वापरून बांधली जात. बंगाल, ओरिसा मधील घरे बांबूची होती व त्यांची छपरे गवताची होती.

तत्कालीन वर्णनावरून असे दिसते की सर्वसाधारण लोकांच्या रोजच्या आहारामध्ये तांदूळ, ज्वारी, बाजरी, आणि डाळी यांचा समावेश होता.

## ८.९ सारांश

भारतीय समाजव्यवस्था जरी प्राचीन व बंदिस्त स्वरूपाची असली तरी देखील परकीय लोकांना भारतीय समाज व्यवस्थेने स्वीकारले तसेच त्यांना आपल्यात सामावून घेतले. अकराव्या शतकाच्या उंबरठ्यावर आलेले तुर्क कट्टर शत्रु म्हणुन गणले जात ते सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत भारतामध्ये ग्रामीण समाजामध्ये रुजले होते. सर्व साधारणपणे हिंदू व मुसलमान या दोन्ही समाजाच्या आचार विचार, रूढी, परंपरा, श्रद्धा, अंधश्रद्धा यामध्ये मोठ्या प्रमाणावर भिन्नता असली तरी उत्तरार्धामध्ये दोन्ही धर्माच्या लोकांचा एकमेकांवर प्रभाव पडलेला दिसून येतो. एकमेकांचा देवतांना देखील नवस केले जात असत. विशेषत: अकबर, जहांगीर व शहाजहान यांच्या कारकीर्दीत राज्यकर्ते असलेल्या मुघलांनी हिंदुबाबत सहिष्णु धोरण स्वीकारले. सामान्य जनतेमध्ये धार्मिक तेढ वा प्रसंग निर्माण झालेल्या प्रकरणांची नोंद यांचा अभाव दिसून येतो. भारतीय समाज व्यवस्था ही सरंजामी पद्धतीची असल्यामुळे समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर दोन वर्गांमध्ये विषमता निर्माण झालेली दिसून येते.

## ८.१० प्रश्न

१. मुघळकाळातील सामाजिक व्यवस्थेचे टिकात्मक परीक्षण करा.

२. मुघल काळातील समाजरचनेचे वर्णन करा.

३. मुघलकलीन स्त्रियांची स्थितीवर भाष्य करा.

## ८.११ संदर्भ


- वर्मा हरिश्चंद्र, मध्यकालीन भारत (भाग २) (१५४० - १७६१), दिल्ली विश्वविद्यालय, प्रथम आवृत्ती, दिल्ली, २०१७.
- शर्मा सतीशचंद्र, मध्ययुगीन भारत : मोगल साम्राज्य (१५२६ - १७४८), (खंड २), के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१७.
- मेहता जे. एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास (खंड २), आवृत्ती चौथी, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१६.

- मेहता जे. एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास (खंड ३), आवृत्ती तीसरी, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१४.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: १, तिसरी आवृत्ती, प्रकाशिका सौ. आर. के. चिटणीस, पुणे, २००३.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: २, दुसरी आवृत्ती, प्रकाशिका सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८७.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: ४, प्रथम आवृत्ती, प्रकाशिका सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८५.
- भिडे गजानन, नलावडे विजय, नाईकनवरे वैजयंती, मध्ययुगीन भारत (सामाजिक, आर्थिक आणि संस्कृतीक इतिहास), फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.
- पवार विश्वनाथ, डॉ. शिंदे, मुघलकालीन भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.

*****

# ८अ

## मुघल कालीन आर्थिक परिस्थिती

**घटक रचना**


८अ.१ उद्देश

८अ.२ प्रस्तावना

८अ.३ शेतकरी, शेती व जमीन महसूल

८अ.४ उद्योगधंदे

- i. कापड उद्योग
- ii. धातू उद्योग
- iii. कागद उद्योग
- iv. रंग उदयोग
- v. मीठ उद्योग
- vi. साखर उद्योग
- vii. जहाज उद्योग
- viii. इतर उद्योग

८अ.५ व्यापार

- i. अंतर्गत व्यापार
- ii. परराष्ट्रीय व्यापार
- iii. भारतीय सागरी व्यापारी

८अ.६ चलन

८अ.७ पेढी व्यवस्था

८अ.८ शहरांचा विकास

८अ.९ कारागीर व कसबी कारागीर

८अ.१० सारांश

८अ.११ प्रश्न

८अ.१२ संदर्भ


### ८अ.१ उद्देश

- मुघलकालीन शेती व्यवस्था व महसूल यांचा आढावा घेणे.
- मुघलकालीन उद्योगधंद्यांचा विकास जाणून घेणे.
- मुघलकालीन व्यापार क्षेत्रात झालेले परिवर्तन यांचा अभ्यास करणे.

- मुघलकालीन शहरांचा विकास कशाप्रकारे झाला, याचा अभ्यास करणे.

## ८अ.२ प्रस्तावना

सुलतानकाळाच्या परिप्रेक्षामध्ये मुघलकाळामध्ये कृषी व बिगर कृषिक्षेत्रांचे आणखी विकास व दृढीकरण झाले. यामुळेच शहरांची व छोट्या शहरांची वाढ झाली. बहुतांश मोठ्या शहरांमध्ये अनेक बाजार होते. मुघल हे मुळात वृत्तीने व्यापारी नव्हते तसेच ते व्यावसायिक देखील नव्हते, तरी देखील सर्वच मुघल राज्यकर्त्यांनी व्यापार व उद्योगास संरक्षण प्रदान केले. मुघल काळातील आर्थिक व्यवस्था उत्तम होत्या, परंतु अतिविस्तारीत साम्राज्यामुळे व्यवस्था राबविण्यात अडचणी येत असत. शेरशहा, अकबर या महत्वाच्या राजकर्त्यांनी मध्ययुगीन अर्थव्यवस्थेमध्ये महत्वाच्या सुधारणा घडवून आणल्या.

## ८अ.३ शेतकरी, शेती व जमीन महसूल

शेतकरी म्हणजे मालकीचे हक्क असोत वा नसोत जमिनीची मशागत करणारा. शेतकऱ्याचा सहसा थेट सरकारशी संबंध येत नसे. शेतकऱ्याचे संबंध हे जमीनदारासोबतच असंत. जमीन गहाण टाकणे किंवा विकणे शेतकऱ्याचे हक्क नसत. मुघल काळातील शेतकरी हा व्यक्तिशः स्वतंत्र असून काही अटींच्यावर तो जमिनीची मशागत करी व उत्पन्नातील काही भाग जमीनदारांच्या तर्फे सरकारला देई. अटी व करार ज्यात लिहिले जात त्या दस्तऐवजाला – जो जमीनदाराच्याकडून शेतकऱ्यांना दिला जाई – पट्टा म्हणत. शेतकरी जी जमीनमहसूल म्हणून रक्कम देत त्याबद्दल त्यांना पावतीही दिली जात असे असे दिसते. ही पावती पटवारी देई.

सोळाव्या व सतराव्या शतकात हिंदुस्थानातील सुमारे ८५ टक्के जनता खेड्यांमध्ये राहत होती. खेड्यातले बहुसंख्यांक वर्ग हा शेतकरी वर्ग होता. विशेष अधिकार असलेल्या शेतकऱ्यांना फारसी भाषेत खुदकाश्त म्हणत. हे लोक सवलतीच्या दराने जमीन महसूल भरत असत. विवाहकरासारख्या काही करांमधून त्यांना काही प्रमाणात अथवा पूर्णपणे सूट मिळत असे. अशा शेतकऱ्याचे गावात एकच घर असेल तर त्याला घरपट्टी माफ होती. देशाच्या विभिन्न भागांमध्ये 'रियायती' (विशेष अधिकार असलेल्या) लोकांकडून गोळा करावयाच्या करांसंबंधी वेगवेगळे नियम होते. कागदपत्रांवरून असे दिसते की, राजस्थानात हे लोक शेती उत्पन्नाच्या एक-चतुर्थांश भाग देत होते; त्या वेळी सामान्य लोकांसाठी हे प्रमाण एक-चतुर्थांशापासून निम्म्यापर्यंत होते. उल्लेखनीय गोष्ट म्हणजे, जातिनिषेधामुळे ब्राह्मण स्वतः जमिनी न कसता मजुरांकडून कसून घेत. शिवाय, काही विशिष्ट प्रसंगी जमीन महसुलातील सवलती इतर वर्गांनाही दिल्या जात. पाहि-काश्त लोक शेजारच्या गावामधून किंवा परगण्यामधून अतिरिक्त जमीन कसण्यासाठी किंवा एखादे उजाड झालेले गाव पुन्हा वसविण्यासाठी किंवा नव्यानेच गाव वसविण्यासाठी आलेले असत. अनेकदा या काही लोकांना सवलतीच्या दराने पट्टे दिले जात असत आणि पूर्ण दराने आकारणी तिसऱ्या किंवा पाचव्या वर्षी किंवा त्यानंतरही केली जात असे. असे सांगितले जाते की, पूर्व राजस्थानातील मलारना परगण्यातील मेहराजपूर हे गाव इ. स. १७२८ मध्ये पाऊस न पडल्यामुळे व तेथील आड-विहिरी आटून गेल्यामुळे उठले होते. त्या वेळी गावच्या पटेलाने गावातील सर्व जमीन लागवडीखाली आणण्याचे आश्वासन दिल्यावर त्याला त्या गावात

पुन्हा स्थायिक होण्याची परवानगी देण्यात आली; तेव्हा त्याला शेती उत्पन्नाच्या एक-तृतीयांश भागावर तीन वर्षांचा पट्टा देण्यात आला. जे 'पाही- काश्त' गावात आले त्यांना चालू वर्षात एक-तृतीयांश उत्पन्न देण्याच्या अटीवर पट्टे देण्यात आले. 'पाही' लोकांकडे पैसा अथवा स्वतःची अवजारे नसल्यास त्यांना सरकारकडून किंवा गावातील सावकाराकडून (बोहरा) नांगर, बैल, बियाणे, खते व पैसा पुरविला जात असे. जोपर्यंत ते जमीन महसूल भरत आहेत तोपर्यंत त्यांना जमिनी स्वत:कडे ठेवण्याची मुभा असे. शेतकरी लोक आपली स्थिती सुधारण्यासाठी एक गाव सोडून दुसरे गाव वसवीत किंवा एखाद्या जुन्या गावाचे पुनर्वसन करीत.

सर्वसामान्य शेतकरी वर्गाला 'रय्यती' अगर 'पालती' म्हटले जात असे. हे लोक सर्वसाधारण जाट, गुजर, माळी, अहिर, मिना अशा मध्यम जातीतील असत. ते स्वतः कसंत असलेल्या जमिनीचे मालक किंवा पट्टेदारही असत. रय्यतींपैकी जे स्वतःची जमीन कसणारे लोक होते त्यांचे महसूलनिर्धारण 'रय्यती' नियमांनुसार होत असे. हे नियमही पिकाचे स्वरूप, मोसम, पाण्याची व्यवस्था इत्यादींनुसार बदलत असत. सामान्यपणे पोलज या सुपीक जमिनीतून काढलेल्या शेती- उत्पन्नापैकी निम्मा भाग शेतकऱ्याला महसूलापोटी द्यावा लागत असे; तर गहू व बाजरी यांसारख्या पिकांवर दोन- पंचमांश भाग महसुलापोटी द्यावा लागत असे. जमीन महसुलात इतर कोणतेही कर अंतर्भूत नव्हते. रय्यती अगर पालती पट्टेदारांचे दोन प्रकार दिसून येतात- शेतीयोग्य पडीक जमीन कसणारे सरकारी पट्टेदार किंवा एखाद्या जमीनमालक शेतकऱ्याने सोडून दिलेली जमीन कसणारे पट्टेदार हा पहिला प्रकार अशा पट्टेदारांकडे बहुधा त्यांचे स्वतःचे नांगर व बैलजोड्या असत आणि त्यांना एका वर्षाकरिता किंवा एका हंगामाकरिता किंवा एका पिकाकरिता पट्टा दिलेला असे. या पट्ट्याचे नूतनीकरण होत असे. दुसऱ्या प्रकारात धनी पट्टेदारांचा समावेश होता. हे लोक जमीनदार, पटेल, भूमिया, इनामदार आदींच्या खाजगी जमिनी कसत. अनेकदा हे पट्टेदार बैल, नांगर, बियाणे, खते इत्यादींच्या बाबतींत मूळ जमीनमालकांवर किंवा महाजनांवर अवलंबून असत. जमीनदार वा जमीनमालक पट्ट्यांबरोबरच जमीनमहसूलही वसूल करीत असत.

महसूल हे कोणत्याही सत्तेचे उत्पन्नाचे प्रमुख साधन असते. मुगल साम्राज्य तर विशाल होते. भारतातील तत्पूर्वीच्या राज्यकर्त्यांनी आपापल्या ताब्यातील जमिनीचे महसूल आपापल्या पद्धतीने ठरविले होते. त्यामुळे अनेक महसूल पद्धती अस्तित्वात होत्या. अनेक कारणांमुळे मुघलांना विविध पद्धती चालू ठेवाव्या लागल्या. मुघल काळात शेरशहाने मात्र शेतकऱ्यावर अन्याय होऊ नये, योग्य शेतसारा पद्धती असावी या दृष्टीने भरीव कामगिरी केली. या पद्धतीला शास्त्रीय बैठक देण्याचे कार्य सम्राट अकबराने व १७ व्या शतकात दक्षिणेत शिवाजी महाराजांनी केले. मुघल काळामध्ये उत्तरेत झब्त पद्धत, गल्ला बक्षी पद्धत, हस्त ओबुद, कानकुट, नसक, पेरणी क्षमता व नांगर पद्धत, दक्षिणेमध्ये ठोक पद्धत पेरणी क्षमता पद्धत नांगर पद्धत क्षेत्र पद्धत इ. पद्धतीने महसुल आकारणी होत असे. शेतसारा शास्त्रीय पद्धतीवर आधारित असण्यासाठी जमिनीची मोजणी करणे ही प्राथमिक आवश्यक गोष्ट होय. अकबराने जमिनीची मोजणी करण्यासाठी जुना दोष काढून टाकून गज पद्धतीने मोजणी केली. ३३ इंच लांबीचा एक गज व ३६०० चौ. गजाचा एक बिघा याप्रमाणे मोजणी केली. ते काम करणाऱ्यांना शासनाकडून वेतन दिले. या कामी लाचलुचपत होऊ नये यासाठी कठोर धोरण राबविले.

**२. जमिनीची वर्गवारी:**

मोजणीनंतर जमिनीची वर्गवारी ४ विभागांत केली. (अ) पोलाज ( उत्कृष्ट जमीन) - वर्षातून एक किंवा दोनदा पिके घेतली जात. (ब) परौती (मध्यम जमीन) - या जमिनी एक वर्ष आड कसल्या जात. (क) चाचर (निकृष्ट जमीन) - ही जमीन ३/४ वर्षे पडीक ठेवून नंतर कसत. (ड) बंजर (खडकाळ जमीन) - पाच वर्षे किंवा अधिक काळ पडीक असणारी जमीन. अकबरापूर्वी पोलाज व परौती या दोन प्रकारांतच जमिनीचे वर्गीकरण केलेले होते व त्याचे प्रत्येकी तीन उपप्रकार होते. उत्पन्नाची सरासरी काढून त्याचा तिसरा हिस्सा शेतसारा असे. वेगवेगळ्या पिकांना वेगवेगळे दर होते. ऐन-ए-अकबरीनुसार शेरशहाच्या काळात महसुलाची झब्त पद्धत सुरू पण अकबराने त्याला पूर्णत्व व शास्त्रीय रूप दिले ही त्याची विशेष कामगिरी होय.

**आपली प्रगती तपासा:**

१) मुघलकालीन शेतकऱ्यांच्या स्थितीचे वर्णन करा.

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

## ८अ.४ उद्योगधंदे

**i. हस्तोद्योग:**

हिंदुस्थानात शेकडो वर्षांची परंपरा हस्तोद्योगाला आहे. कुशल कारागिरी आणि आर्थिक समृद्धता देशाला प्राप्त करून देण्यामध्ये हस्तोद्योगाचा वाटा फार मोठा आहे. किंबहुना भारताचा तो समृद्ध वारसा होय. मध्ययुगात मुघल काळातही तो वारसा जपला गेला होता. पण व्यापारी वृत्तीच्या परकीय ब्रिटिश राजवटीत मात्र त्यांनी ठरवून हस्तोद्योग नष्ट केले. मध्ययुगीन हस्तोद्योग म्हणजे आजच्या भाषेत कुटीरोद्योग (Small Scale Industry) असे सर्वसाधारणपणे समजता येईल. शहरी अर्थव्यवस्थेमधील एक महत्त्वाचा घटक म्हणजे हस्तोद्योग होता. भारतातील अनेक शहरे विविध प्रकारच्या हस्तोद्योगांसाठी प्रसिद्ध होती. याशिवाय शहरात इतर उद्योगधंदे सुद्धा चालत. हस्तोद्योग नागरी धंदे होते. सोन्या-चांदीच्या नाजूक दागिन्यांपासून ते हत्यारे बनविण्यापर्यंत आणि कलाकुसरीच्या झिलईदार भांड्यापासून ते वीट भट्टीपर्यंतचे अनेक व्यवसाय केले जात होते. या हस्तोद्योगांना राजाश्रय होता. वैभवसंपन्न सत्ता उपभोगणाऱ्या मुघल बादशहांनी या कलाकौशल्यांची कदर केली होती. तर शहरात राहणारे अमीर उमराव, जमीनदार, अधिकारी वर्ग म्हणजे उंची किमतीच्या आणि उच्च राहणीमानाला आवश्यक अशा कौशल्यपूर्ण उत्पादनाचा ग्राहक होता. शिवाय काही उत्पादने निर्यातही केली जात असत. एवढा त्यांचा दर्जा उच्च होता.

**ii. कापड उद्योग:**

भारतातील कापड व्यवसायाला मोठा इतिहास आहे. इरफान हबीब यांच्या मते. भारतातील शेती व्यवसायानंतरचा कापड उद्योगच महत्त्वाचा व मोठा होता. 'ऐन-ए- अकबरी', विदेशी प्रवाशांचे वृत्तांत, ईस्ट इंडिया कंपनीच्या नोंदीवरून स्पष्ट होते की, भारतात सुमारे १६० प्रकारचे कापड तयार होत असून मुघल भारतात ५० प्रकारचे कापड तयार होत होते. या आकडेवारीवरून देशात कापड उद्योग किती मोठ्या प्रमाणावर चालत असावा याची सहज कल्पना येते. मुघल काळात हा व्यवसाय विकसित होण्याला अनेक कारणे होती. उदा. शासनाने व्यापारी वस्तूंवरील जकात रद्द केली. व्यापारातील अडथळे दूर केले.

i. व्यापारी केंद्रे व शहरांची वाढ झाली.

ii. शासनाने व्यापारी वस्तूंवरील जकात रद्द केली. व्यापारातील अडथळे दूर केले.

iii. दळणवळणाच्या व प्रवासाच्या साधनांत सुधारणा झाल्या

iv. सागरी बंदरे शासनाच्या ताब्यात आली.

v. युरोपीय व्यापारी व प्रवासी मोठ्या संख्येने भारतात येत राहिले.

vi. कच्च्या व पक्क्या मालाची ने-आण आणि व्यापार सुरक्षित केला. म्हणजेच राज्यात अधिकाधिक शांतता व सुरक्षितता होती.

vii. साम्राज्यविस्ताराबरोबर प्रशासन व आर्थिक बाबींमध्ये एकरूपता ठेवली.

viii. देशातील कापड उद्योग मुख्यत्वे चार प्रकारचा होता. (अ) सुती कापड (ब) रेशमी कापड (क) लोकरी कापड (ड) ताग व घायपातापासूनचे कापड. अशा विविध प्रकारच्या धाग्यांपासून मलमल, जरतारी ते जाडेभरडे कापड गोणपाटापर्यंतचे उत्पादन केले जात होते.

कापडाचे अनेक प्रकार होते. उदा. मलमली, जरतारी, पांढरे सती, चिटाचे, भरतकाम केलेले सुती, रजया, गालिचे, शाली, कॅलिको इत्यादी. लाहोरमध्ये केवळ सुती कापडाचे सात प्रकार होते. कापडाच्या प्रकाराबद्दल ऐन-ए-अकबरी' मध्ये माहिती दिली आहे. याशिवाय ज्या केंद्रात कापड तयार होई किंवा ज्या बंदरातून कापडाचा माल पाठवला जाई. त्या बंदरांचे नाव कापडाला दिले जात असे. पश्चिम किनारपट्टीवरील दाभोळ व खंबायत, पूर्वेकडील विशाखापट्टण, बंगालमधील हुगळी तसेच सिंधू नदीकडील लहरी बंदरातून कापड निर्माण केले जाई. आफ्रिकेचा पूर्व किनारा, अरबस्तान, इजिप्त, ब्रह्मदेश, मलाक्का, फिलिपाइन्स, बहुधा मेक्सिको इ. देशांमध्ये भारतातून कापडाची निर्यात होत असे. भारतात कापड उद्योगाची अनेक केंद्रे प्रसिद्ध होती. उत्तर भारतात लाहोर, दिल्ली, आग्रा, अवध, जैनपूर, बनारस, लखनौ, अलाहाबाद, पाटणा, ढाक्का, सुरत येथे कापड उत्पादन होत असे, रेशमी कापडाच्या उद्योगाची वरील सुती कापड उद्योगाप्रमाणे भरभराट झाली नव्हती. ठरावीक ठिकाणी मर्यादित स्वरूपात उत्पादन होते. राजघराण्यातील लोक, सरदार, उमरात, श्रीमंत लोक त्याचे ग्राहक होते. काही प्रमाणात हे कापड निर्यातही होई. तसेच परदेशातून रेशीम आयात केले जात होते. लोकरी कापड हा आणखी एक प्रकारचा कापड

उद्योग होय. 'ऐन-ए-अकबरीत' त्याची माहिती आहे. मेंढ्या, तूस, अंगोरा यांसारख्या प्राण्यांपासून राजस्थान, पंजाब, काश्मीर वा प्रदेशातून लोकर मिळत असे. लाहोर हे या उद्योगाचे मुख्य केंद्र होते.

### iii. धातू उद्योग:

तत्कालीन भारतात धातू उद्योग देखील महत्त्वाचे होते विविध धातूंपासून विविध प्रकारच्या वस्तू बनवले जात असत. लाहोर, अजमेर, कालिंजर, ग्वाल्हेर, कुमाऊ अशा अनेक प्रांतांत लोखंडाच्या खाणी होत्या. लोखंडापासून शेतीची अवजारे बनविण्याचे काम लोहार करत. खेडेगावात हे कारागीर असत. पंजाबात कुलपे बनविली जात. मेवाड व बिकानेर येथे लष्करी साहित्य व शस्त्रे बनविली जात. महाराष्ट्रात लोखंडी तोफा बनविल्या जात. लोखंडाची भांडी बनवत असत. तांब्यापासून नाणी तयार करणे, इमारतीचे घुमट, बंदुका, तोफा, भांडी, देवळाचे कळस, मूर्ती अशा अनेक वस्तु बनविल्या जात. त्या वस्तू तयार करणारे अनेक कारागीर होते. याप्रमाणेच पितळ धातूपासून भांडी बनवत. हिंदू लोक पितळेची तर मुस्लीम तांब्याची भांडी वापरत. ही भांडी बनवण्याच्या उद्योगाचे बनारस हे प्रसिद्ध केंद्र होते.

दक्षिण भारतात सोन्याच्या खाणी होत्या. अर्थात ते मिळवणे खर्चीक व अवघड होते. नाणी, मूर्ती, दागदागिने, राजसिंहासन बनविणे तसेच राजाची सुवर्णतुला करणे इत्यादींसाठी सोन्याचा वापर केला जाई. तसेच चांदीचाही या वस्तूंसाठी वापर करत. म्हैसूरमध्ये कोलार येथे मध्ययुगातही सोन्याच्या खाणी प्रसिद्ध होत्या. बार्बोसा हा प्रवासी लिहितो की आंध्र प्रदेशात हिऱ्याचे उत्पादन व व्यापार होता. चंदेरी, बुंदेलखंड या भागात हिऱ्याच्या खाणी होत्या. तसेच गोवळकोंडा राज्यातही हिरे मिळत होते. ट्रॅव्हर्निअर हा प्रवासी स्वतः हिऱ्याचा व्यापारी होता. त्याने दक्षिणेतील हिऱ्याच्या खाणीची माहिती लिहिली आहे.

### iv. रंग उद्योग:

मुघल काळात रंग उद्योग प्रचलित व्यवसाय होते. रंग तयार करण्यासाठी लिंब, बाभूळ, काथ, हिरडा, बेहडा, नीळ, कुसुंबा, डाळींब, मद्दर, बेलफळ, लोध, मेंदी इत्यादी वनस्पती, आले, हळद यांसारखी शेती उत्पादने, तुरटी, चुना, फेरस सल्फेट, लाख यांसारखे घटक (रंगबंधक) आवश्यक असतात. लखनौ, बिहार, अवध, पंजाब – लाख, कोटा, बूंदी, अवध-आले, अलाहाबाद – हळद, लाहोरपासून अवधपर्यंत – निळीची झाडे यांप्रमाणे उत्पादने घेतली जात असत. विविध वृक्षांच्या साली, पाने, फुले, मुळ्यापासून रंग बनविले जात असत. रंगामध्ये रंगबंधक (घटक) मिसळत. त्यामध्ये सूत रंगवीत. तसेच रंगाचा अर्क तयार झाल्यावर तो तांब्याच्या भांड्यात उकळला जाई व त्यामध्ये ठरावीक वेळ कापड बुडवून ठेवीत नंतर बाहेर काढून स्वच्छ पाण्याने धुतले जाई. त्याचप्रमाणे वेगवेगळे लाकडी ठसे वापरून छपाई करत. त्या ठशावर वेगवेगळ्या नक्षी असत. याप्रमाणे नक्षीदार कापड तयार होत असे. रंगकाम व छपाईच्या ७७ पद्धती होत्या. त्यातून रंगांच्या ४८ छटा मिळत असत.

### v. कागद उद्योग:

इ.स. १३ व्या शतकात कागद बनविण्याची कला भारतात अवगत झाली. तत्पूर्वी चीनमध्ये कागद बनविला जाई. मुघल कालखंडात भारतात अनेक ठिकाणी हा उद्योग सुरू झाला.

उदा. बिहारमधील या उद्योगाची माहिती अबुल फजलने दिली आहे. सियालकोट येथेही केंद्र असून तेथील कागद अधिक दर्जेदार होता. कागदनिर्मितीसाठी तुतीच्या झाडांची साल, बांबू, चिंध्या इ. घटकांची आवश्यकता असे. कागदाचे विविध उपयोग असल्याने, मागणीनुसार हा उद्योगही विकसित होत गेला. काच उद्योगाची माहिती प्राचीन काळापासून भारतात होती. मुघल काळात आग्रा, बिहार, गुजरात, अहमदनगर इ. ठिकाणी या उद्योगाची केंद्रे होती. काचेची आयातही केली जाई. यामध्ये युरोपीय व्यापारी अधिक होते.

**vi. साखर उद्योग**:

भारतामध्ये प्राचीन काळापासून साखर उद्योग आहे. साखर निर्मितीसाठी उसाचे उत्पादन घेतले जात. उसापासून साखर व गूळ तयार केले जात असे. देशाची गरज पूर्ण होईल एवढे उत्पादन होत असे. मुघल काळात ही गरज भागून अधिक उत्पादन निर्यातही केले जात असे. १६३८ साली लाहोर येथे ७ रु. मण, तर १७८१ साली वाराणसी येथे ११ रु. मण साखरेचा दर होता. भारतात लाहोर, दिल्ली, आग्रा, बनारस, गाझीपूर, महाराष्ट्रात साष्टी भागात साखर उत्पादन केले जाई.

**vii. जहाज उद्योग:**

मध्ययुगीन मुघल कालखंडात विशेषता मुघल राज्य, मराठ्यांचे राज्य, व इतर छोटे छोटे राज्य हे आरमारी युद्धामध्ये सक्रिय असत. आरमारी युद्धासाठी अथवा सागरी व्यापारा करिता मोठमोठे जहाजे अत्यावश्यक होते, त्यासाठी जहाजांची निर्मिती करावी लागे. प्रामुख्याने बंगालमध्ये मुघलांनी आरमार स्थापन केले होते मुघलांच्या आरमाराचा प्रमुख मीर बहर होता. अकबराच्या काळामध्ये जवळजवळ तीन हजार जहाज होते. परंतु त्यातून ७६८ जहाज राहिले. बंगाल प्रमाणेच सिंध आणि काश्मीर मध्ये सुद्धा जहाज निर्मितीचे कार्य मोठ्या प्रमाणावर विस्तारित होते. अबुल फजल याच्या मते, 'सागरी दळणवळणाचे साधन अनेक छोटी-मोठी जहाजे आहेत जहाजांची संख्या जवळजवळ चाळीस हजार आहे अलाहाबाद आणि लाहोर या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर जहाज निर्मितीचे कार्य होत असे.' १५६५ मधील व्हॅनिश प्रवासी सीजर डी फैडरीसी याने लिहिले आहे की, 'कस्तुंतुनिया च्या सुलतानाने त्याच्या जहाजांची निर्मिती बंगालमध्ये केली.'

मोरलँड यांच्या मते, "हिंदी महासागरामध्ये अधिकांश व्यापार भारतीय जहाजांपासून होत असे. यामधील निश्चित आणि अधिकांश मोठ्या जहाजांची निर्मिती पश्चिम तटावर होत असे."

महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी पश्चिम किनारपट्टीवर जहाज निर्मितीचे कारखाने उभे केले होते. सुरुवातीला मुंबई, चौल या बंदरात जहाज निर्मिती होत असे. पुढील काळात विजयदुर्ग, कुलाबा, सिंधुदुर्ग अशा अनेक सागरी किल्ल्याजवळ जहाज निर्मिती केली जाई. जहाजांचे अनेक प्रकार होते. त्यामध्ये व्यापारी जहाज व युद्धनौका यांचा समावेश होत होता. साधारणता गुराब, गलबत, पगार, मचवा, तिरकाठी, तरंडक, होडी, महागिरी, पाल इ. प्रकारची जहाजे होती. ताड, साग, आंबा, फणस या झाडाच्या लाकडापासुन जहाज बनवले जात असत, तसेच जहाजांना खिळे न मारता त्याची शिलाई केली जात असे. साधारणता भारतीय जहाजांचा आकार याबद्दल ईस्ट इंडिया कंपनीचे

अधिकारी कॅप्टन जॉन सारीज याने असे सांगितले आहे की, 'भारतीय जहाजांमध्ये रहिमी जहाज याचे आकार १५३ फुट × ४२ फुट × ३१ फुट होते. मोहम्मदी जहाजाचे आकार १३६ फुट × ४१ फुट × २९.५ फुट होते. १५९३ मध्ये लाहोर मध्ये अकबराद्वारे बनवलेले जहाज ९८.८ फूट लांब होते.' १६ शतकाच्या पुर्वाधामध्ये मध्ये हत्ती सहाय्याने नवीन बनविलेल्या जहाजांना पाण्यात ढकलत असे.

**viii. मीठ उद्योग:**

मुघल काळामध्ये भारतात पश्चिम किनारपट्टीवर तसेच पूर्व किनारपट्टीवर मीठ उत्पादन घेतले जात असत. अजमेर मधील सांभार सरोवराचे मीठ उत्पादनासाठी उपयोग होत. पोर्तुगीज भारतात प्रामुख्याने मिठाचा व्यापार करत होते. मराठी प्रांतामध्ये पोर्तुगीज मीठ कमी भावाने विकत असे. त्यामुळे पोर्तुगीजांचा मीठ मोठ्या प्रमाणावर खपत होता. परंतु एतदेशीय मिठाच्या विक्रीवर परिणाम होत होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ही बाब लक्षात आल्यानंतर त्यांनी पोर्तुगीजांच्या मिठावर अधिक कर लावले. त्यामुळे एतदेशीय मिठाला संरक्षण प्राप्त झाले.

**ix. इतर उद्योग:**

नारळाच्या झाडापासून नारळ, तेल, फळे, काथ्या, दोर, नाडे, मद्यार्क, चटया, झाडू, बांधकामासाठी लाकूड अशा अनेक वस्तू बनविल्या जात. याशिवाय खाणीतून दगड काढणे, दगडावर कोरीव, मातीपासून भांडी, विटा बनविणे काम करणे, कातडीपासून पादत्राणे, पाण्याच्या मोटा व पखाली बनविणे, लाकडी फर्निचर तयार करणे, खेळणी तयार करणे, मासेमारीचा उद्योग, हस्तिदंती कलात्मक वस्तू, खेळणी बनविणे. इ अनेक उद्योग मुघलकाळात प्रचलित होते.

**आपली प्रगती तपासा:**

१) मुघल काळातील उद्योगांचे वर्णन करा.

______________________________________________________________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

## ८अ.५ व्यापार

मुघल काळामध्ये प्रचलित असलेल्या विविध व्यवसायामुळे उद्योगधंद्यांचे केंद्र विकसित झाले यामुळे लहान मोठी शहरे विकसित झाली आणि शहरांमध्ये बाजार भरले जाऊ लागले, या बाजारांमध्ये एक प्रमुख बाजार असे. या बाजारांमध्ये माल साठवुन ठेवला जात असत. तेथे देशांतील अथवा राज्यातील अनेक व्यापारी येऊन गरजेनुसार माल घेऊन जात होते. एकदरीत या सातत्यपूर्ण प्रकियेमुळे बाजारपेठांचे मोठे जाळे निर्माण झाले.

**i. अंतर्गत व्यापार:**

सर्वसाधारणपणे मुघल कालखंडात तीन प्रकारे अंतर्गत व्यापार चालत असे. यामध्ये सागरी मार्गाने होणारा व्यापार, नद्यांमधून होणारा व्यापार, तसेच जमिनी मार्गे किंवा खुश्कीच्या मार्गाने होणारा व्यापार. या तीन प्रकारे अंतर्गत व्यापार होत असे. त्यामध्ये सागरी मार्गाने होणारा व्यापारा हा अतिशय सुलभ व सोयीस्कर असे. तसेच वर्षातील नऊ महिने सागरी मार्गाने व्यापार होत असे. पावसाळ्याचे तीन महिने सागरी व्यापार करणे अत्यंत कठीण होत असे. त्यामध्ये लुटारूंची अडचण ठरत असे. पश्चिम सागरावर उत्तरेतील खंबायत बंदरापासून ते दक्षिणेस कोचीनपर्यंत व्यापारी जहाजे ये जा करीत असत. समुद्रकिनाऱ्यावर होणारी मालाची वाहतूक ही अधिक विकसित झाली होती. जड वस्तूंची वाहतूक जमिनीवरून केल्यास अधिक खर्च येत असल्याने त्यासाठी जलमार्गी वाहतूकच अधिक प्रमाणात होत असे.

भारतातील आणि प्रामुख्याने उत्तरेकडील अनेक मोठ्या नद्यांमधून केला जाणारा व्यापार अधिक किफायतशीर होता. व्यापार मालाची ने-आण नद्यांतून गलबतांच्या साहाय्याने केली व तो माल महत्त्वाच्या बाजारपेठांकडे पाठविला जाई. त्यामुळे अंतर्गत व्यापार विकासात हा प्रकार महत्त्वाचा होता. या प्रकारात मोठमोठ्या नद्यांनुसार एकूण चार जलमार्ग होते. (१) सिंधू नदीचा जलमार्ग २) गंगा यमुना नदीचा जलमार्ग ३) बंगालचा त्रिभुज प्रदेश मार्ग ४) तापी नर्मदा नदीचा मार्ग) त्या त्या नद्यांच्या प्रदेशातील माल दूरवर पोहोचविला जाई.

मुघलकाळामध्ये जमिनीवरील मार्गाने अंतर्गत व्यापार मोठ्या प्रमाणावर होत असे. शेरशहा सुरी याच्यापासून रस्त्यांचे विकास होण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली होती. त्यामुळे शहरे गावे ही एकमेकांपासून जोडली गेली होती. परंतु मनुचीने रस्ते सुरक्षित नसल्याचे सांगीतले आहे.

शहरांना अन्नधान्याचा पुरवठा करणे हे अंतर्गत व्यापाराचे महत्त्वाचे अंग होते. खाद्यपदार्थ व्यतिरिक्त शहरांमधील उत्पादकांना कापूस निळी इत्यादी कच्च्या मालाचा पुरवठा गावांमधून होत होता. हा व्यापार गावातील बनिया आणि मालाची वाहतूक करणाऱ्या बंजारा लोकांच्या हातात होता. गावातील लोक आपली उत्पादने मोठ्या गावातील बाजारपेठांमध्ये अथवा शहरांमध्ये विकत असत आणि ज्या गोष्टी वस्तू त्यांच्याकडे नसत त्यांची ते खरेदी करत. अन्नपदार्थांचा व कापडाचा व्यापार हे तत्कालीन अंतर प्रादेशिक व्यापाराचे अत्यंत महत्त्वाचे भाग होते. बंगालमधून साखर तांदूळ तसेच तलम मलमल रेशीम बाहेर पाठविले जात असत. कोरोमंडल किनारा हे कापड उत्पादनाचे मोठे केंद्र झाले होते आणि तेथून गुजरातची जलमार्गाने व संपूर्ण दख्खन पार करून रस्त्यांमार्गे खूप मोठा कापडाचा व्यापार होत होता.

चैनीच्या वस्तूंसाठी आग्रा व बुरहाणपुर ही दोन व्यापाराची महत्त्वाची केंद्रे होती. तसेच पुढे बनारस हे व्यापाराचे महत्त्वपूर्ण केंद्र बनले. अंतर्गत व्यापार जमिनी मार्गे अत्यंत सोयीस्कर व्हावा म्हणून रस्त्यांचे जाळे सुधारण्यासाठी शेरशाह सुरी अनेक राज्यकर्त्यांनी सातत्याने प्रयत्न केल्याचे दिसून येतात. शेरशाह ने रस्त्याच्या दुतर्फा झाडी लावली, प्रवासी लोकांसाठी धर्मशाळा बांधल्या, पिण्याच्या पाण्याची सोय करणे इत्यादी शेरशहाने सुमारे १७०० सराया बांधल्या. तेथे सर्वधर्मीयांना राहण्या-जेवण्याची सोय होईल अशी व्यवस्था

केली. शेरशहाने प्रत्येक सराईत हरकरे नेमले होते. ते दररोज किमान ७०-८० मैल प्रवास करत आणि, खबर पोहोचवीत असत. अकबराच्या काळात शहराचा प्रमुख अधिकारी कोतवाल याला आदेश होती की, त्याने रस्ते व बाजार तसेच वजन व मापे यांच्यावर बारीक नियंत्रण ठेवावे. वाईट प्रवृत्तींना आळा घालावा.

**व्यापारी जमाती:**

मुघल भारतात व्यापार करणाऱ्या विविध जमाती होत्या. त्यामध्ये वंजारी, बनिया, बोहरी, पारशी व सौदागर यांचा समावेश होता. वेगवेगळ्या प्रदेशांत त्यांचे व्यापारी कार्य होते. बंजारा ही जमात व्यापार करण्यासाठी अत्यंत प्रसिद्ध होते. बंजारा जमातीचे लोक भारतभर आपल्या बायका मुलांसह मोठ मोठ्या पल्ल्याचे प्रवास करत त्यांच्यासोबत हजारो बैल असत त्यांना तांडा म्हणत असत. ते बैलांवर अन्नधान्य व इतर चीज वस्तू लादून भारतात अनेक ठिकाणी माल पोहोचवत असत. त्याचप्रमाणे मालाच्या संरक्षणासाठी त्यांना सरकारचे संरक्षण देखील प्राप्त होत असे. (अनेक पुस्तकांमध्ये बंजारा ऐवजी वंजारी जमात असे चुकीचे उल्लेख आढळून येतात) बनिया ही जमात गुजरातमध्ये होती. त्यांच्या ८४ उपजाती केवळ अहमदाबादमध्ये होत्या. भारतात सर्वत्र व परदेशातही हे लोक व्यापारासाठी जांत येत असत. बोहरी ही आणखी एक व्यापारी जमात असून जमिनीबरोबर ते सागरीमार्गे पण व्यापार करत. मध्य आशियातील अनेक देशांशी त्यांचा व्यापार चाले. गुजरातमध्ये पारशी ही एक व्यापारी जमात होती. खुरासानी हे मुस्लीम व्यापारी होते. खुरासान हा त्यांचा मूळ देश असून त्यावरून खुरासानी असे त्यांना म्हटले जाई. तेथून व आसपासच्या देशांतून व्यापारासाठी ते भारतात येत असत. भारतातील सर्व भागांत ते व्यापार करत होते. विविध वस्तूंचा व्यापार करण्यासाठी ते निरनिराळ्या देशांत जलप्रवास करीत असत.

**ii. परराष्ट्रीय व्यापार:**

पाश्चिमात्य देश भारतात येण्यापूर्वी अरबी समुद्रमार्गे होणारा परराष्ट्रीय व्यापार हा पूर्णपणे अरब लोकांच्या हातात होता. परंतु पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात पोर्तुगीजांनी भारतात सागरी मार्गे प्रवेश करून अरबांची अरबी समुद्रावरील मक्तेदारी मोडीत काढली. व मलबार पासून ते गुजरातपर्यंत पश्चिम किनारपट्टीवर व्यापाराची मक्तेदारी त्यांनी प्रस्थापित केली. वर्चस्व निर्माण केल्यामुळे आशियाई व्यापाऱ्यांना समुद्रातून व्यापार करण्यासाठी पोर्तुगीजांकडून परवाना मिळविणे आवश्यक बनले. पुढे अनुक्रमे फ्रेंच ब्रिटिश डच या युरोपियन सत्ता भारतात आल्या आणि त्यांनी ऐतदेशीय सत्तांकडून व्यापारी सवलती प्राप्त करून घेतल्या.

परराष्ट्रांशी व्यापार करण्यासाठी पश्चिम किनारपट्टी तसेच पूर्व किनारपट्टीवर काही महत्त्वाची बंदरे होती. त्यामध्ये लहरी बंदर (सिंधु नदी), सुरत, भडोच, खंबायत (गुजरात), चौल, कलिकत, कोचीन, पुलिकत, गोवा, भटकळ होनावुर, बसरूर इ. बंदराहुन परदेशाबरोबर व्यापार जोमात सुरु होता.

डच व ब्रिटिश या दोन्ही कंपन्यांनी उच्च प्रतीचे मसाले, जायफळ, लवंगा तसेच मिरे इत्यादींच्या व्यापारावर वर्चस्व मिळविण्यासाठी जावा व सुमात्रामध्ये बस्तान बसविण्याचा प्रयत्न केला. कारोमांडेलमध्ये तयार होणाऱ्या कापडाला ईस्ट इंडीजमध्ये प्रचंड मागणी

होती; त्यामुळे डचांनी आधी कारोमांडेल किनाऱ्यावर बस्तान बसविण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर मच्छलीपट्टणम येथे त्यांनी आपले व्यापारी केंद्र सुरु केले. आशियाई व्यापारातून पोर्तुगीजांना होसकावून त्यांची जागा घेण्याचे व मसाल्याच्या व्यापारात मक्तेदारी निर्माण करण्याचे डचांनी ठरवले होते यासाठी त्यांनी सुरुवातीला मलाका जिंकून घेतले कोलंबो जिंकले त्यानंतर कोचीन सुद्धा जिंकून घेतले हळूहळू पोर्तुगीजांचा व्यापार त्यांनी भारतातून गुंडाळून लावला. पुढे पोर्तुगीज फक्त गोव्या कृत्य मर्यादित झाले.

सुरुवातीला युरोपमध्ये लोकरीला रंग देण्यासाठी वोड चा उपयोग केला जात होता. त्याऐवजी निळीचा उपयोग करणे दर्जा आणि खर्च या दोन्ही बाबतीत अधिक फायदेशीर असल्याचे दिसून आले. भारतात बयाना गुजरात कोरोमंडल भागात सर्वोत्तम नीळ मिळत होती. त्यामुळे भारतातून निळ निर्यात होऊ लागली. इंग्रजांनी युरोपमध्ये विक्री केलेली सर्वात महत्त्वाची भारतीय वस्तू म्हणजे हिंदुस्तानी कापड. ब्रिटिश ईस्ट इंडियाच्या एकूण निर्यातीमधील कापडाच्या निर्यातीचा हिस्सा ८३ टक्क्यांवर पोहोचला होता. कापडाबरोबरच रेशीम देखील मोठ्या प्रमाणावर युरोपमध्ये निर्यात होऊ लागले. कारण रेशीम त्यांना सर्वात जास्त फायदा मिळवून देणारी वस्तू ठरली. त्याचप्रमाणे सोडा देखील ब्रिटिशांना उपयुक्त ठरत होते. जहाजांमध्ये तसेच तोफखानाच्या दार उघडला व्यापक स्वरूपात सोडा वापरला जात असे. सर्वोत्तम सोडा बिहार मध्ये मिळत होता.

अशाप्रकारे युरोपियन ईस्ट इंडियन कंपन्यामुळे भारताचा पूर्वेकडील देशांची व पश्चिमेकडील देशांची व्यापार मोठ्या प्रमाणावर चालत असे.

**iii. भारतीय सागरी व्यापारी:**

युरोपियन लोकांच्या बरोबरीनेच किंवा पूर्वर्धनामध्ये त्याहून अधिकच भारतीय लोकांचा सागरी व्यापारामध्ये महत्त्वाचा सहभाग दिसून येतो. परंतु अपूर्ण साधनांच्यामुळे सागरी व्यापारात भारतीयांचे योगदान फारसे दिसून येत नाही. गुजरात बंगाल व पूर्व किनारपट्टी भागाकडील खाजगी लोक व्यक्तिगत होत्या मोठ्या प्रमाणावर सागरी व्यापारामध्ये कार्यरत होते. ते जहाजांच्या मोठ्या ताफ्याचे मालक होते. सुरत मधील अब्दुल गफूर, मच्छलीपट्टणमचा मीर कमलाउद्दीन, पुलिकतचा अश्रफा चेट्टी अशा प्रकारचे मोठे व्यापारी होते. अब्दुल गफार याच्याकडे वीस मोठी जहाजे होती. तो मनीलापासून मोर्चापर्यंत व्यापार करत असे. हिंदुस्तानी व्यापारींचे प्रतिनिधी बंदर अब्बास, बसरा, मलाक्का, मोचा, आचेह आदी बंदरांच्या ठिकाणी राहत. भारतीय व्यापारी एडन मध्ये व्यापार करत. तिथुन ते पूर्व अफ्रिकेतील मसावा मोगादिशु इ. बंदरां सोबत व्यापार करत.

**आपली प्रगती तपासा:**

१) मुघल काळातील अंतर्गत व्यापार परराष्ट्रीय व्यापार यामधील फरक स्पष्ट करा.

२. भारतीय सागरी व्यापार वर्णन करा.

## ८अ.६ चलन

मुघल कालीन नाणी ही विशेष प्रसिद्ध होती अकबराच्या कालखंडात मोठ्या प्रमाणावर नाणी पाडण्यात आली तसेच नाण्यांमध्ये एकरूपता दिसुन येते. बाबर व हुमायून यांनी शाहरुखी अथवा दिरहम या नावाने ओळखले जाणारे चांदीची नाणी पाडली. ही नाणी मुख्यता आग्रा दिल्ली लाहोर व काबुली येथे पाडली जात. नाण्याचे एका बाजूला कलमा आणि चार खलिफांची नावे लिहिलेली असत तसेच दुसऱ्या बाजूला बादशहाचे नाव व बिरूदावली नाणे पाडण्याचे वर्ष व टाकसाळी चे ठिकाण लिहिलेले होते. शेरशहा ने सर्वप्रथम चांदीचा रुपया व तांब्याचा दास अशी नाणी काढली. चांदीचा रुपया १७८ ग्रेन वजनाचे होते, व तांब्याची नाणी ३३० ग्रेन वजनाची होती. अकबराने शेरशहा ने काढलेल्या नाण्यांच्या धर्तीवर नाणी मध्ये सुधारणा घडवून आणल्या.

मुघल बादशहाच्या काळातील सोन्याच्या नाण्याला मुहर म्हणत. त्याचे प्रमाणित वजन १७० ग्रेंन असे. मोहर नाण्याच्या मुख्य बाजू कलिमा व चार खलिफांची नावे व उलट बाजूस बादशहाचे नाव, टाकसाळीचे ठिकाण व वर्ष असे. हे नाणे सर्वाधिक किमतीचे असत. अकबराने पक्षाचे चित्र असलेले नाणे व सिताराम यांच्या चित्राचे एक अशी नाणी पाडलेली होती. मुख्य बाजूस बदकाचे चित्र असलेले १८२ ग्रेन वजनाचे  मुहर हे नाणे आग्रा येथे अकबराच्या कारकिर्दीच्या ५० व्या वर्षी पाडण्यात आले. 'इलाही मुहर' म्हणुन प्रसिदध असलेल्या नाण्यांपैकी हे एक होय. जहांगीरच्या काळात नाण्यांनी उत्कृष्ट तेची परिसीमा गाठलेली होती. त्याच्या कारकीर्दीतल्या नाण्यांमध्ये आपल्याला प्रतिमा असलेल्या प्रमाणे राशीचक्र दर्शविणाऱ्या नाण्यांचेही दर्शन होते. शाहजहाँ च्या नाण्यावर सौर  महिने लिहिलेले आढळतात. शहाजहानच्या वेळचे रुपयाचे नाणे १६८ ग्रेन वजनाचे होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी विजयनगरच्या आदर्शांचा व परंपरांचा स्वीकार करून होन आणि स्वतःचे शिवराई ही नाणी पाडली. पेशव्यांनी मात्र मुघल नाण्यांप्रमाणे चांदीचा रुपया हे नाणे आपल्या नाण्यांसाठी प्रमाणभूत नाणे म्हणून वापरले. विजयनगर साम्राज्य मध्ये गद्यान आणि वराह नावाची आणि होती. पेशव्यांच्या काळात चलन व्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणावर भेसळ व गोंधळ झालेला दिसून येतो प्रमाणभूत असे नाणे पेशवे काळात नव्हते. कायदेशीर व बेकायदेशीर अशा दोन्ही प्रकारच्या टाकसाळीतून प्रमाणभूत नाणी न पडता त्यास फरक होऊ लागले व अशुद्ध प्रतीची व कमी दर्जाच्या कसबाची नाणी तयार होऊ लागली. अशा नाण्यांमध्ये रहिमतपुरी, मलकापुरी, चांदवड, चिंचवड, सुरती, बागलकोटी, मोहम्मदशाही, अहमदाबादी, लातूर, अजमेर, गंजीकोट, अर्काट, मल्हारशाही, सारोळी, अलमगिरी, भडोची, कल्याणचाल, दौलताबादी, तळेगावी, पुणेचलन, पुणे-सिक्का, जरी-पटका वगैरे प्रकारची नाणी होती.

## ८अ.७ पेढी व्यवस्था

भारतातील आर्थिक परिस्थिती पाहता कोणत्यातरी स्वरूपाची एकदेशीय पेढी (बँकींग प्रणाली) ची व्यवस्था असणे आवश्यक होते. सतत वाढत जाणारा अंतर्गत व विदेशांची चालणाऱ्या व्यापार, जोमात चालणारे उद्योगधंदे एक पद्धतीच्या नाण्यांची दुसरे पद्धतीच्या नाण्यांचे रूपांतर करण्याची प्रक्रिया, कर्ज पुरवठा करू शकणाऱ्या संस्थांच्या निर्मितीसाठी भासणारी निकड यांमुळे देशांतर्गत पेढीवाले (सावकार) करणाऱ्या संस्था यांची सेवा अत्यावश्य झाली. पूर्वीच्या राजवटीच्या काळापेक्षाही पेढ्यांचे व्यवहार अधिक जोमाने व हूशारीने होऊ लागले. मुघल अंमलाखाली असलेल्या भारतातील प्रदेशातील बहुतेक सर्व खेड्यांमध्ये सराफ अथवा श्रॉफ या नावाने पेढी व्यवहर करणारे लोक असत. ते पैसे देत असत व नाण्यांच्या विनिमयाबद्दलचे रोखे देत असत. विनिमयाचे रोखे अथवा हुंडया व्यापारासाठी व विशेषतः विदेशांशी होणाऱ्या व्यापारासाठी सर्रास वापरल्या जात असत. व्यापाराचा माल जेथे पाठवला जाई त्या ठिकाणच्या कमी वा जास्त अंतरावर विनिमयाचा दर (हुंडीची वटणावळ) अवलंबून असे. लाहोर येथून सुरत येथे हूंडी पाठवायची असली तर हा दर ६.२५ टक्के होता.

मुघल अंमलात चार प्रकारच्या हुंडया देण्याची पद्धत होती. ते प्रकार म्हणजे ‘ दर्शनी हुंडी’, ‘मिती हुंडी’, ‘शहाजोग हुंडी’ आणि ‘जोखमी हुंडी’ हे होत. दर्शनी हुंडीची रक्कम ताबडतोब अदा करावी लागत असे. (आजकालच्या ड्राफ्टप्रमाणे.) मिती हुंडीची रक्कम हुंडीमध्ये लिहिलेल्या तारखेपासून काही ठराविक दिवसांनंतर द्यावी लागत असे.

फादर मॉन्सेरेट (Father Monserrate) याने म्हटले आहे की, अकबर बादशहाने पेढ्यांच्या व्यवहारांवर बरीच नियंत्रणे लादली होती व त्यांना द्यावयाच्या परवान्यांसाठी तो मोठीच रक्कम मिळवीत असे. परवाना घेऊनच पेढीवाल्यांना काही शर्तीवर आपल्या पेढीचे व्यवहार करता येत असत. असे व्यवहारसुद्धा- अकबराच्या अधिका-यांच्या देखरेखीखाली होत असत. मॉन्सेरेट लिहितो की, तो आपल्या साम्राज्यात कोणाही पेढीवाल्याला अगर पैशाची देवघेव करणाऱ्यांना परवानगी देत नाही. मोठ्या प्रमाणावर चाललेल्या पेढ्यांच्या व्यवहारातुन बादशहाला मोठाच फायदा होतो. मुघल काळातील काही पेढीवाले इतके श्रीमंत होते की, हे प्रसंगी सरकारला कर्ज देत असत औरंगजेब बादशहाच्या आमदानीतील अतिशय प्रसिद्ध असलेला पेढीमालक म्हणजे माणिकचंद हा होय. त्याचे महत्त्व इतके वाढले होते की, खुद्द औरंगजेबाने त्याच्या सेवेचा गौरव करण्यासाठी त्याला ‘सेठ’ ही पदवी प्रदान केली होती.

**आपली प्रगती तपासा:**

१) मध्ययुगातील चलन व्यवस्था स्वरूप स्पष्ट करा.

२) मध्ययुगातील पेढी व्यवस्था व त्याचे महत्त्व सांगा.

## ८अ.८ शहरांचा विकास

शहरांच्या विकासाची प्रक्रिया १६ व्या व १७ व्या शतकामध्ये अधिक गतिमान झाली. अकबराच्या साम्राज्यात १२० मोठी शहरे आणि ३,२०० छोटी शहरे (कसबे) होती, असे सांगण्यात येते. सतराव्या शतकात आग्रा हे सर्वांत मोठे शहर होते, त्याची लोकसंख्या सुमारे पाच लाख होती; पण बादशाहचा मुक्काम असताना ही लोकसंख्या सहा लाखांवर पोहोचत असे. सतराव्या शतकाच्या मध्याला मुघल दरबार दिल्लीला हलविण्यात आल्यावरही आग्रा चांगलेच मोठे शहर होते. त्या वेळी दिल्लीची लोकसंख्या, त्या काळी युरोपातील सर्वांत मोठे शहर असलेल्या पॅरिस इतकी होती. इतर मोठ्या शहरांमध्ये ढाका, राजमहाल, थट्टा, बुऱ्हाणपूर व मसुलीपट्टणम यांचा समावेश होता. मुघल हिंदुस्थानातील मोठी शहरे ही "उत्पादनाची आणि विक्रीची, आर्थिक, व्यवहारांची व उद्योगांची केंद्रे होती. बहुतांशी शहरे ही व्यापारी व उद्योगधंदे त्याचप्रमाणे कसबे कारागीर विविध वस्तू खास पदार्थ वस्तू निर्मितीच्या कौशल्यामुळे मोठी झाली होती बयाना तेथील निळीच्या उत्पादनासाठी, गुजरात मधील पाटण कापडांच्या रंगकामासाठी, अयोध्येमधील खैराबाद सुती कापड यांसाठी प्रसिद्ध होते. मुघलांनी उत्तर व मध्य हिंदुस्थानात शांतता व कायदा सुव्यवस्था निर्माण केल्यामुळे व्यापार वाणिज्य व उद्योगांचा मोठा विकास झाला. त्यामुळे हा काळ 'शहरीकरणाचे सुवर्णयुग' गणला जातो.

## ८अ.९ कारागीर व कसबी कारागीर

कारागीर वर्गामध्ये यात रोटीवाले, मिठाईवाले किंवा हलवाई, खाटीक, सोनार, जवाहिऱ्या, लोहार, शिंपी, चांभार, टोपी करणारे, हकीम लेखक विणकरी, न्हावी, सुतार  पायमोजे करणारे, धनुष्यकार, कुंभार, सुईकाम करणारे आणि गवळी अशा वेगवेगळ्या कारागिरांचा समावेश होता. त्यातील काही कारगीर, सरकारी कारखाने आणि नक्षीकामाच्या व्यवसायात होते. इमारतींचे बांधकाम करण्यासाठी प्रचंड मोठ्या प्रमाणात मजबुरांची संख्या उपलब्ध होती. बाबराच्या म्हणण्यानुसार आग्रा येथे दररोज ६८० कामगार त्याच्या इमारतींच्या बांधकामांमध्ये सहभागी होत होते. तर १४९१ पाथरवट त्यांच्या सिक्री आग्रा बयाना दोन पूर इत्यादी शहरांमधील बांधकामावर होते. ताजमहाल बांधण्यासाठी सुमारे वीस हजार मजूर काम करत होते. भारतीय कारागीर अत्यंत साध्या उपकरणांचा उपयोग करून उत्कृष्ट दर्जाचे उत्पादन करीत असत.

कारागिरांचे दोन वर्ग करता येतील एका वर्गात ग्रामीण कारागीर होते. तर दुसऱ्या वर्गात शहरा गावांमधील व्यवसायिक कारागिरांचा होता. ग्रामीण कारागीर यामध्ये तेली निळ व सोडा तयार करणारे, साखर बनविणाऱ्या आधी लोक होते ते वर्षातले पाच सहा महिनेच काम करीत होते. जसे व्यापार व उत्पादन वाढत गेले तसतसे व्यापाऱ्यांनी दादनी पद्धतीने

हळूहळू या कारागिऱ्यांवर नियंत्रण मिळवले. कारागीर म्हणजे शहराबरोबर ग्रामीण भागामध्येही प्राचीन काळापासून कौशल्यपूर्ण अशा वस्तूंचे उत्पादन, निर्मिती करणारे कसबी लोक होत.

**आपली प्रगती तपासा:**

१) मध्ययुगीन भारतातील शहरीकरणाची प्रक्रिया वर्णन करा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

२) मध्ययुगीन उद्योगधंद्यात कारागीर व कसबी कारागिराचे महत्त्व अधोरेखीत करा..

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## ८अ.१० सारांश

शेतीखालील क्षेत्र, शेती-उत्पन्न, करांचे दर आणि जमीन महसुलाची अंदाजित आकारणी यांच्या आ४. कडेवारीचा उपयोग करून आधुनिक अभ्यासकांनी सोळाव्या शतकाच्या शेवटी देशाची लोकसंख्या सुमारे १४ ते १५ कोटी असल्याचे म्हटले आहे. ही लोकसंख्या अठराव्या शतकाच्या अखेरीस २० कोटी झाली होती

## ८अ.११ प्रश्न

१. मुघल काळातील शेती व महसूल पद्धतीवर भाष्य करा.

२. मुघल काळातील व्यापार व उद्योगधंद्यावर टीप लिहा.

३. मुघल काळातील अर्थव्यवस्थेचे टिकात्मक परीक्षण करा.

४. मुघलकालीन चलन व पेढी व्यवस्थेवर चर्चा करा.

## ८अ.१२ संदर्भ


- वर्मा हरिश्चंद्र, मध्यकालीन भारत (भाग २) (१५४० - १७६१), दिल्ली विश्वविद्यालय, प्रथम आवृत्ती, दिल्ली, २०१७.
- शर्मा सतीशचंद्र, मध्ययुगीन भारत : मोगल साम्राज्य (१५२६ - १७४८), (खंड २), के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१७.
- मेहता जे. एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास (खंड २), आवृत्ती चौथी, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१६.

- मेहता जे. एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास (खंड ३), आवृत्ती तीसरी, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१४.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: १, तिसरी आवृत्ती, प्रकाशिका सौ. आर. के. चिटणीस, पुणे, २००३.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: २, दुसरी आवृत्ती, प्रकाशिका सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८७.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: ४, प्रथम आवृत्ती, प्रकाशिका सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८५.
- भिडे गजानन, नलावडे विजय, नाईकनवरे वैजयंती, मध्ययुगीन भारत (सामाजिक, आर्थिक आणि संस्कृतीक इतिहास), फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.
- पवार विश्वनाथ, डॉ. शिंदे, मुघलकालीन भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.
- सासवडकर, प्र. ल., (अनु.) मोगलकालीन महसूल पद्धत, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००६.


*****

# ९

# मुघल काळातील धर्म, शिक्षणव्यवस्था व साहित्य

**घटक रचना**


९.० उद्देश

९.१ प्रस्तावना

९.२. मुघल काळातील धर्म

i. हिंदू धर्म व भक्ती आंदोलन

ii. इस्लाम धर्म व सुफी पंथ

iii. मुघलकालीन सुफी संत

iv. शीख धर्म

९.३ मुघल काळातील शिक्षण व्यवस्था

i. मुसलमानी शिक्षण पद्धत

ii. हिंदू शिक्षण पद्धती

९.४ मुघल काळातील साहित्य

i. मुघल काळातील साहित्याचा विकास

ii. ऐतिहासिक साहित्य

९.५ उपसंहार

९.६ प्रश्न

९.७ संदर्भ


## ९.० उद्देश

- मध्ययुगीन काळातील हिंदू, इस्लाम शीख या धर्मव्यवस्थाची परिस्थिती जाणून घेणे.
- मुघल काळातील इस्लाम सत्तेचा हिंदू धर्मावरील प्रभाव अभ्यासणे.
- मुघल काळातील शिक्षण व्यवस्थेचा अभ्यास करणे.
- मुघल काळात निर्माण झालेल्या फारसी हिंदी व इतर प्रादेशिक भाषांतील साहित्याचा आढावा घेणे.

## ९.१ प्रस्तावना

मुघल काळामध्ये भारतात हिंदू धर्म, इस्लाम धर्म, शीख धर्म हे प्रचलित धर्म होते. तत्कालीन राज्यव्यवस्थेला धार्मिक आधार तसेच तत्व असल्यामुळे वरील तीनही धर्मांना मोठ्या प्रमाणावर राजाश्रय मिळाला तद्वत ते भरभराटीस आले. मुघल हे मुसलमान

सत्ताधारी असल्याने त्यांनी भारतात इस्लाम धर्म वाढवण्याचा प्रयत्न केला. अकबर सारख्या राज्यकर्त्यांचा अपवाद वगळता काही राज्यकर्त्यांनी हिंदू धर्मावर किंवा लोकांवर मोठ्या प्रमाणावर बंधने लादली व अनेक हिंदू लोकांना धर्मांतरित करावयास भाग पाडले औरंगजेबाच्या कालखंडात याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर होते. परंतु हिंदू धर्मातील भक्ती चळवळी सारख्या सुधारक आंदोलकांनी हिंदू धर्मातले दोष बाहेर काढण्यास सुरुवात केली व जातीभेद कर्मकांड यांचा तीव्र निषेध केला तसेच इस्लाम धर्मामध्ये देखील सुफी पंथ उदयास येऊन इस्लामातील कट्टरता कमी करण्याचा प्रयत्न केला. तसेच या कालखंडात शीख धर्माची स्थापना होऊन गुरुनानकांनी जातीव्यवस्थेस विरोध केला.

## ९.२ मुघल काळातील धर्म

### i. हिंदू धर्म व भक्ती आंदोलन:

भक्तीला भारतीय हिंदू धर्मामध्ये फार मोठे स्थान आहे. मानव जातीच्या उद्धारासाठी भक्तीने केलेले महत्कार्य स्तुत्य आहे. भक्तीचा उगम प्रेमात होतो. तिची वाढ ही प्रेमात होते तिचे पर्यवसानही प्रेमातच होते. परमेश्वरा बद्दलचे हे प्रेम म्हणजेच भक्ती. भक्ती चळवळ भारतामध्ये विविध प्रदेशात वेगवेगळ्या नावाखाली पुढे आली. उत्तर भारतात, महाराष्ट्रात, पूर्वेकडे तसेच अति दक्षिणेकडे भक्तीचा अविर्भाव मोठ्या प्रमाणावर झालेला दिसून. उत्तरेकडे प्रभावी वैष्णव संत रामानंद व त्यांचे दोन सुप्रसिद्ध शिष्य तुळसीदास आणि कबीर यांच्या नेतृत्वाखाली उत्तर भारतात भक्तीचा झेंडा फडकवला गेला.

तुळसीदासांना (१५३२-१६२३) रामानंदांचे शिष्य नरहरीदास यांनी भक्तिपंथाची दीक्षा दिली. तुळसीदास हे स्वार्थत्याग आणि प्रपत्ति (ईश्वराला संपूर्ण शरणागति) यांचे प्रतीक होय. कबीरांनी युगधर्म उचलून धरला तर तुळसीदासांनी सनातनधर्माचे समर्थन केले. तुळसीदास हे बऱ्याच धर्मग्रंथांचे कर्ते होते. त्या सर्वात अत्यंत श्रेष्ठ आणि अमोघ कृती म्हणजे ‘रामचरितमानस’ होय. वाराणसीच्या तुलसीदास व त्यांच्यासारखे काही ब्राह्मण धर्मशास्त्रांमध्ये सांगितलेल्या वर्णाश्रम व्यवस्थेचे समर्थन करीत होते; पण त्याच वेळी ते तडजोडीलाही तयार होते. शूद्रातिशूद्राने जरीं सत रामनाम घेतले तरी त्याचासुद्धा उद्धार होतो असे तुलसीदास सांगत असे आणि अशा शूद्राला ब्राह्मणासमान दर्जा देत असे. त्याच वेळी ब्राह्मणांसमान विशेषाधिकारांचा उपभोग घेण्याच्या, ब्राह्मणांप्रमाणे जप-तप करण्याच्या आणि इतरांना उपदेश करण्याच्या शूद्रांच्या प्रवृत्तीबद्दल नाराजीही व्यक्त करीत असे. तो जातिव्यवस्थेचे समर्थन करीत होता. पण जन्माधिष्ठित जातिव्यवस्थेऐवजी गुणाधिष्ठित जातिव्यवस्था त्याला अभिप्रेत होती. समकालीन कर्मठ ब्राह्मणांनी तुलसीदासाची प्रचंड अवहेलना व निंदा केली; पण उत्तर हिंदुस्थानातील पुढच्या पिढ्यांवर मात्र त्याचा जबरदस्त प्रभाव पडला. मीरा आणि सूरदासांनी राधा-कृष्ण उपासना प्रचलित केली. ही उपासनापद्धती चांगलीच लोकप्रिय झाली; त्यातही स्त्रियांमध्ये ती अधिकच रुजली.

रामानंद यांचे सर्वाधिक लोकप्रिय शिष्य कबीर यांचे स्थान भक्ती चळवळीमध्ये फार महत्त्वपूर्ण आहे. असे म्हटले जाते की, ते एका हिंदू विधवेच्या पोटी जन्माला आले होते. तिने आपली बेअब्रु होऊ नये म्हणून आपल्या बाळाला जन्मतच बनारस येथील एका तलावाच्या काठी सोडून दिले होते. नीरु नावाच्या एका मुस्लिम विणकाराने बाळ कबिराला

तिथून उचलून आपल्या घरी नेले व आपल्या मुलाप्रमाणे वाढविले. थोडे मोठेपणी कबीराचा विवाह करण्यात आला व त्यांनी आपल्या धर्मपित्याचाच विणकाराचाच व्यवसाय स्वीकारला. तथापि शांत, गंभीर प्रकृतीचे कबीर आपला बहुतेक वेळ एकांतवासात व ध्यान करण्यात घालवीत असत. भक्ती चळवळीतील कबीर यांचे पदार्पण हिंदू आणि मुस्लिम यांच्यात समेट घडवून आणण्यात अतिशय उपयुक्त ठरले. ते भक्ती सुधारक चळवळीतील हिंदु साधू व सुफी संत या दोन्ही बाजुच्या मंडळीच्या संगतीमध्ये वावरत असत. कबीरांनी दोन्ही धर्मातील दोषांवर निर्भीडपणे टीका केली आहे हिंदू व मुसलमान यांच्या एकत्रित मेळाव्यात कबीर आपले विचार मांडत असत. ब्राह्मण आणि मुल्ला हे आपापल्या धर्माचे एकमेव ठेकेदार असल्याप्रमाणे वागत असल्याबद्दल कबीरांनी त्यांचा निषेध केला व त्यांच्या कर्मठ, सनातनी व शोषक प्रवृत्तीबद्दल त्यांना धारेवर धरले. वेद किंवा कुराण यांचे पावित्र्य स्वीकारण्यास त्यांनी साफ नकार दिला. हिंदू धर्मातील मूर्तिपूजा, जातिव्यवस्था, अस्पृश्यतेची प्रथा तसेच मुस्लिमांची कर्मठता, निरर्थक कर्मकांड यांचा कबीरांनी निषेध केला. मनाची शुद्धता आणि ईश्वराबद्दलची अंत:करणातून असलेली शरणागततेची भावना असल्याशिवाय मशिदीत पाच वेळा नमाज पढणे व्यर्थ आहे, असे त्यांचे मत होते.

बंगालमधील भक्ती चळवळीतील एक प्रमुख सुधारक म्हणून चैतन्य महाप्रभु यांची ओळख आहे. पूर्व हिंदुस्थानमध्ये चैतन्य महाप्रभूच्या अनुयायांनी त्यांची लिंग, जाती वा धर्माच्या आधारे भक्तांमध्ये कोणताही भेदाभेद न करण्याची परंपरा पुढे चालू ठेवली; इ.स १४७९ मध्ये दक्षिण भारतातील तेलगू ब्राह्मण कुटुंबात जन्मलेल्या वल्लभाचार्य यांचा उल्लेख महत्त्वाचा आहे. त्यांनी बनारस येथे आपला आश्रय स्थापन करून गंगेच्या खोऱ्यात कृष्ण संप्रदायाचा प्रसार केला. भक्ती चळवळीतील स्त्री संतांमध्ये मीराबाई या मेरठ येथील राजपूत राजघराण्यातील होत्या; त्यांचा विवाह राणासंगा यांचा ज्येष्ठ पुत्र व युवराज भोजराज यांच्याशी इ. स. १५१६ मध्ये झाला होता. आपल्या वडिलांच्या हयातीतच भोजराजाचे अकाली निधन झाल्याने मीराबाईस वैधव्य प्राप्त झाले. त्यानंतर राणासंगा यांच्या बाजूने लढत असताना मीराबाईंचे वडील देखील कनुआच्या ऐतिहासिक लढाईत इ. स. १५२७ मध्ये मारले गेले; त्यामुळे मीराबाईच्या दुःखात आणखी भर पडली. लवकरच लढाईतील पराभवाने खचलेले राणासंग देखील मरण पावले. जीवनाला कंटाळून मीराबाई भक्ती चळवळीकडे आकर्षित झाल्या. मीराबाईंचे हिंदी आणि संस्कृत भाषेवर प्रभुत्व होते. त्या जन्मजात कवयित्री होत्या. त्यांची भक्तिपर गीते व काव्य सोळाव्या शतकातील भारताच्या सांस्कृतिक जीवनाचा एक वारसा आहे. त्यांच्या जीवनातील अखेरची काही वर्षे त्यांनी द्वारका येथे घालविली. भक्ती चळवळीतील त्यांच्या सहभागामुळे भक्तिमार्गाने ईश्वराची उपासना करण्याचा मार्ग प्रत्येक हिंदू कुटुंबापर्यंत जाऊन पोहोचला. मातृदेवतेची उपासना करणारा भक्त भरपूर लोकप्रिय होता.

मुघल कालखंडा दरम्यान महाराष्ट्रात संत तुकाराम व संत रामदास यांचे कार्य थोर आहे. तरुण वयातच संत तुकाराम विरक्त बनले आणि ईश्वराच्या चिंतनात रंजल्या गांजलेल्याच्या सेवेत साधेपणाने आपले आयुष्य व्यतित केले. संत तुकाराम यांनी जातिप्रथेवर प्रचंड आघात व विरोध केला होता. रामदास स्वामींनी सतराव्या शतकातील मराठ्यांच्या उदयोन्मुख सत्तेला नैतिक व आध्यात्मिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. रामदासांनी महाराष्ट्रातील जनतेत राष्ट्रवादाची भावना रुजविली. आपल्या कर्मवादी विचारांचा प्रचार करण्यासाठी त्यांनी मंदिराशी जोडलेल्या अनेक मठांची स्थापना केली.

ब्राह्मण पुरोहित वर्गाच्या समाजातील वर्चस्वावर प्रचंड आघात व प्रहार करून या चळवळीने हिंदू धर्मात नवे चैतन्य निर्माण केले. जातिव्यवस्था समूळ नष्ट करणे, भक्ती चळवळीला शक्य झाले नसले तरी हिंदूंच्या उच्च व कनिष्ठ जातींमधील संबंध अधिक मोकळे व सौहार्दपूर्ण करून या चळवळीने जातिव्यवस्थेची तीव्रता कमी केली. तमिळ, तेलुगु, हिंदी, पंजाबी, बंगाली आणि मराठी यांसह इतर प्रादेशिक भाषांचा विकास घडवून आणण्याचे श्रेय मोठ्या प्रमाणावर भक्ती सुधारकांकडे जाते; कारण त्यांनी आपली चळवळ जनसामान्यांच्या बोलीभाषेत चालविली.

**ii. इस्लाम धर्म व सुफी पंथ:**

'सूफी पंथ' या संज्ञेने इस्लाममधील गूढवादाचा निर्देश होतो. हा मुस्लीम धर्मातील सर्वेश्वरवादी गूढवाद आहे. याची तीन वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती. पहिले वैशिष्ट्य म्हणजे भौतिक सुखाचा पूर्णपणे परित्याग; दुसरे, दयाघन परमेश्वराला पूर्णपणे शरण जाणे आणि तिसरे, परमेश्वराच्या या जगातील व्यापकतेवर अढळ विश्वास हे होय. सूफी पंथामध्ये अनेक धर्मातील कल्पनांचा संयोग झालेला आढळतो. ख्रिश्चन धर्म, नव्या प्लेटोवादाची तत्त्वे व हिंदू धर्मातील तत्त्वे आपणास त्यात आढळून येतात. कुराणापासून सूफी पंथाचा उगम झाल्याचे दिसून येते. मक्का व मदिना, सुरा, आध्यात्मिक भावनेने व त्यागाच्या कल्पनेने भरून गेलेल्या असत. येथील आत्मसमर्पण व त्याग या तत्त्वांचे प्रतिबिंब या सुरांमधून दिसून येत असे. नवव्या शतकात पर्शियामध्ये इस्लामच्या रीतिवादाच्या कठोर पालनाच्या विरुद्ध एक प्रतिक्रिया म्हणून सूफी पंथाची चळवळ रीतसर सुरू झाली. बगदादच्या अब्बासिद खलिफांच्या काळात सूफी मताला गूढवादाचा वैचारिक आधार मिळाला. सूफी संतांनी ख्रिश्चन, हिंदू, बौद्ध आणि जैन व अन्य धर्मांतील गूढवादी संकल्पना मुक्तपणे स्वीकारल्या. त्याचे वर्णन करताना ताराचंद म्हणतात, "सूफी पंथ हा गुंतागुंतीचा चमत्कार होता. लहान-मोठे ओहोळ येऊन मिळाल्याने ज्याचा प्रवाह रुंदावत जातो अशा ओढ्याशी त्याची तुलना करता येईल."

सूफी शब्दाची व्याख्या करण्याचे अनेक प्रयत्न केले गेले आहेत. नवव्या शतकात कधी तरी गूढवादी व धर्मनिष्ठ मुस्लिमांना उद्देशून हा शब्द वापरात आला. काहींच्या मते, सफा म्हणजेच विशुद्ध या शब्दापासून सूफी या शब्दाची व्युत्पत्ती झाली असावी; काहीजण सूफी शब्दाची व्युत्पत्ती साफ म्हणजे रांग या शब्दापासून झाली, असे मानतात; तिसऱ्या व्याख्येनुसार सूफी शब्द हा सुफा म्हणजेच ओटा किंवा चबुतरा या शब्दापासून आला असावा कारण या सूफी संतांचे सदाचारयुक्त वर्तन व त्यांच्या अंगचे गुण हे 'अशाब-अल्-सुफ' म्हणजे ओट्यावर जमणाऱ्या लोकांप्रमाणे होते.

सूफी विचारधारा आपणास आपले अंतःकरण कसे शुद्ध करावे, जीवनाचा नैतिक स्तर कसा उंचवावा आणि शाश्वत परमानंद प्राप्त करण्यासाठी आपले जीवन अंतर्यामी व बाह्य स्वरूपात कसे घडवावे, हे शिकवते. सुफी विचारधारा अस्तित्वात आल्यापासून सुफी संत हा मुस्लीम समजाचा एक महत्त्वाचा घटक होता. ते अतिशय धर्मपरायण मुस्लीम होते. ते शरा च्या चौकटीत मर्यादा पाळत असत. सुफी संत इस्लामचे शांततेच्या मार्गाने काम करणारे प्रतिनिधी अथवा प्रसारक होते मानवतेच्या सेवेसाठी आणि इस्लामच्या प्रसारासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले होते.

**मुघलकालीन भारतातील सुफी संत:**

प्रामुख्याने अरबांचे सिंधवरील स्वारीपासुनच सुफी संत भारतामध्ये येऊ लागले. भारतात सुलतान कालखंडामध्ये व त्यानंतर चिश्ती, सुहरावर्दी, नक्षबंदी, कादरिया, शत्तारी इ. पंथ प्रचलित झालेले दिसून येतात.

**कादरिया:**

अकबराने पुरस्कृत केलेल्या 'वहदत-अल-वजूद' (सृष्टीची एकता) या संकल्पनेचा स्वीकार बऱ्याचशा सूफी संतांनी केला; पण कर्मठ चिंतकांच्या एका गटाला मात्र ती मान्य नव्हती; कारण त्यांच्या मते, यामुळे 'खुदा' आणि 'बंद' यांच्यातील भेद नष्ट होऊन सर्वेश्वरवादाचा मार्ग मोकळा होत होता. 'कादिरिया' परंपरेचे शेख अब्दुल हकसारखे संत 'शरियत'च्या पुनर्सबलीकरणाचे जोरदार समर्थक होते.

पंजाब मध्ये शेख अब्दुल कादिरने कादरिया पंथ बराच लोकप्रिय केला होता. त्याची मुले व अकबर व अबुल फजल चे कट्टर समर्थक होते. कादरिया पंथाने 'वहदत अल वजूद' चे जोरदार समर्थन केले. मियाँ मीर याने सुफी पंथातील गुढवादावर भर दिला. अनेकदा सन्यासा सारखे वनात जाऊन राहिल्यावर त्याने लाहोरमध्ये मुक्काम ठोकला होता. मुल्ला शाह बद खशानी हा त्याचा पट्टशिष्य होता.

दारा शिकोह हा मिया मिर याचा शिष्य होता त्याने काशीच्या ब्राह्मणांच्या मदतीने गीतेचे फारसी मध्ये भाषांतर करून घेतले. "मजमा-उल बहरैन" हा वैदिक ऋचांचा संग्रह ही त्याची सर्वात मोठी कामगीरी होती. साधारणता कादरिया पंथ हा उदारमतवादी पंथ होता.

**नक्क्षबंदी:**

अकबराच्या उदारमतवादी, सर्वसमावेशक धोरणांच्या विरोधात एक आंदोलन उभारण्यामध्ये प्रमुख भूमिका बाकी बिल्लाह याने बजावली. बाकी बिल्लाह हा तुर्कस्तानमध्ये पूर्वी बऱ्याच लोकप्रिय असलेल्या 'नक्शबंदी' या कर्मठ सूफी संप्रदायाचा अनुयायी होता. त्याने दिल्लीजवळ मुक्काम ठोकला. अकबराच्या दरबारातील अनेक प्रमुख अमीर त्याचे शिष्य झाले. सरहिंद येथील शेख अहमद हा बाकी बिल्लाहचा आध्यात्मिक उत्तराधिकारी होता.

शेख अहमदनेही 'वहदत-अल्-वजूद'च्या विरोधात भूमिका घेतली. गैर-इस्लामी असलेल्या सर्व रीतिरिवाज व श्रद्धांचे उच्चाटन सूफी पंथामधून करण्याचा त्याने प्रयत्न केला. उदाहरणार्थ- त्याने धार्मिक संगीत ऐकणे (समा), रात्री जागून पहारा देणे, संतांच्या कबरींचे दर्शन घेणे याला विरोध केला. त्याने हिंदू धर्मामधून आलेले जे रीतिरिवाज व सण-समारंभ होते त्यांची निंदा केली आणि हिंदूंशी कोणत्याही प्रकारचे सामाजिक संबंध न ठेवण्याचा उपदेश केला.

शेख अहमद सरहिंदी प्रमाणे शाह वली उल्हाह देहलवी यांनी देखील अकबराच्या विचार आणि नीतीच्या विरोधात तसेच वजूदी विचारांच्या विरोधाचे समर्थन केले. शेख अहमद सरह हिंदी यांच्या उतरत्या काळात इस्लाम धर्माला नवीन रूप देण्याचे कार्य शाहवली

उल्हाह देहलवी यांनी केले. देहलवी यांचा मुख्य उद्देश इस्लामचे बदलत्या जगाच्या दृष्टीने इस्लामी सिद्धांताचे पुर्न:व्याख्यान्वित करणे, मुस्लिम संस्थानचे पुनर्वसन करणे आणि मुस्लिम समाज ज्याला पुन्हा शक्तिशाली बनविण्याचे प्रयत्न करणे इत्यादी उद्दिष्टे दिसून येतात.

अठराव्या शतकामध्ये नक्शबंदी सुफी पंथामध्ये एक नवी परंपरा 'तरीका- ए- मोहम्मदिया' नावाने विकसित झाली. त्यांनी मोहम्मद पैगंबर यांच्या उपदेशांना नवीन शक्ती देण्याचे दावे केले. या आंदोलनाचे मुख्य नेता दिल्लीमधील ख्वाजा मोहम्मद नासिर अंदलीब आणि त्यांचे पुत्र ख्वाजा मीर दर्द होते.

**चिश्ती**:

चिश्ती संप्रदाय सुफी मधील सर्वात जुना होता. ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती त्याचे संस्थापक होते. मुघल काळामध्ये सुफी परंपरेमध्ये चिश्ती परंपरेचे महत्त्वपूर्ण स्थान होते. असे म्हटले जाते की, अकबराने १५६२ आणि १५७९ च्या मध्ये चिश्ती सिलसिलाह चे प्रवर्तक ख्वाजा मोइनुद्दीन चिश्ती याच्या दर्ग्याची दहा वेळा यात्रा केली होती. यामुळे पुढे चिश्ती परंपरा व मुघल वंशांमध्ये घनिष्ठ संबंध राहले. चिश्त परंपराचे लोक शरियतीला सर्वाधिक महत्त्व देत होते. तसेच सोबतच कधी कधी व जुनी सिद्धांत आणि हिंदू विचारांचे सुद्धा स्वीकार करत होते. मुघल काळातील चिश्ती संत शेख अब्दुल कुददुस ने वहदत अल वजुद ला मान्यता दिली होती. बाबा फरीद हजरत निजामुद्दीन ओलिया इत्यादी प्रमुख संतांचे योगदान चिश्ती संप्रदायाला लाभले.

मुघल काळामध्ये आणखी एक सुफी परंपरा शत्तारी परंपरा म्हणुन प्रचलित होती. या परंपरेने अकबराच्या वजूदी विचारांचे स्वीकार केले व हिंदू विचारांच्या प्रती उदारता दाखविली. या पंथाची स्थापना अब्दुल्ला शत्तारी यांनी केली. त्याचप्रमाणे ग्वालियरचे शेख मोहम्मद गौस यांनी पंथाला रचनात्मक लोकप्रियता मिळवून दिली.

**iii. शीख धर्म:**

शीख या शब्दाचा अर्थ शिष्य असा आहे. शीख धर्मानुसार परमेश्वर एक आहे आणि गुरुग्रंथसाहिब हा त्याचा पवित्र ग्रंथ आहे. आदिग्रंथ, गुरुबानी म्हणूनही हा ग्रंथ ओळखला जातो. गुरू नानक हे शिखांचे पहिले गुरू होते. त्यांचा जन्म इ. स. १४६९ मध्ये लाहोरजवळ तळवंडी–सध्याचे नानकाना साहिब-गावामध्ये झाला. जसजसे नानक वयाने मोठे होत गेले तसतसे ते या व्यवहारी जगाच्या माया मोहापासून दूर जाऊन विरक्त बनले; ते अधिक चिंतनशील बनले तत्कालीन समाजातील सर्व दुर्गुणांपासून ते मुक्त होते. इसवी सन १५९४ मध्ये सुलतानपूर येथे राज्यांच्या धान्य भंडारात काम करत असताना त्यांना अचानक ज्ञान प्राप्त झाली व पुढे त्यांनी भक्ती चळवळीस प्रारंभ केला. तीस वर्षापेक्षा अधिक काळ गुरू नानक यांनी दूरवर प्रवास करण्यात व्यतीत केला. एकूण पाच वेळा त्यांनी देशभ्रमण केले. मक्का मदीना, सिलोन इत्यादी ठिकाणी जाऊन त्यांनी आपला संदेश पोहोचविला. गुरू नानक यांनी अपमानित झालेल्या समाजाची अस्मिता जागृत करून त्यास समतेची शिकवण व नवीन दिशा दिली. शीख धर्मानुसार जीवनातील श्रीमंती आणि व्यक्तिगत मालमत्ता ही आध्यात्मिक ध्येयाच्या आड येत नाहीत. मात्र आपल्या मिळकतीत

इतरांनाही सहभागी करून घेतले पाहिजे, असे गुरूंनी सांगितले आहे. पहिल्या चार गुरूंनी शांतिपूर्ण अध्ययन-मननाची परंपरा पुढे सुरू ठेवली. पाचवे गुरू अर्जुनदास यांनी 'आदि ग्रंथ' अथवा 'ग्रंथसाहिब' या शीख धर्मग्रंथाचे संकलन पूर्ण केले. गुरूच्या ठिकाणी आध्यात्मिक व ऐहिक अशा दोन्ही शक्तींचा संयोग असतो, यावर जोर देण्यासाठी त्यांनी अभिजात जीवनशैलीचा स्वीकार केला. त्यांनी अमृतसरमध्ये विशाल प्रासाद बांधले. शिखांचे एकूण दहा गुरू आहेत. ते असे : (१) गुरू नानकदेव (१४६९–१५३९), (२) गुरू अंगददेव (१५०४–५२), (३) गुरू अमरदास (१४७९–१५७४), (४) गुरू रामदास (१५३५–८१), (५) गुरू अर्जुनदेव (१५६३–१६०६), (६) गुरू हरगोविंद (१५९५–१६४४), (७) गुरू हरराए (१६३०–६१), (८) गुरू हरकिशन (१६५६–६४), (९) गुरू तेगबहादुर (१६२१-७५), (१०) गुरू गोविंदसिंग (१६६६–१७०८) ( संदर्भ :मराठी विश्वकोश)

गुरु हरगोविंद यांच्यापासून ते गुरुगोविंद सिंग पर्यंत सर्व शीख गुरूंना मुघलांसोबत संघर्ष करावा लागला या संघर्षात गुरु तेग बहादुर यांना हौतात्म प्राप्त झाले. गुरुगोविंद सिंग यांनी त्यांच्या काळात मुघलांसोबत मोठा संघर्ष केला परंतु नांदेड येथे असताना एका मातेफिरू इसमाने गुरुगोविंद सिंग यांची हत्या केली. गुरुगोविंद सिंग यांनी खालसा पंथाची स्थापना केली व शीख धर्मातील लोकांना संघटित केले व त्यांच्या हाती शस्त्रे दिली. गुरु गोविंदसिंग चांच्यानंतर पंजाब मध्ये बंदा बहादुर याने शिखांचे राजकीय नेतृत्व सांभाळले.

**आपली प्रगती तपासा:**

१) मध्ययुगीन काळातील हिंदू धर्म व भक्ती चळवळ स्पष्ट करा.

___

___

___

___

२) मुस्लीम धर्म व सुफी संप्रदायाचे वर्णन करा.

___

___

___

___

## ९.३ मुघल काळातील शिक्षणव्यवस्था

**प्रस्तावना:**

मध्ययुगीन काळातील शिक्षण व्यवस्था विकसित करणे हे सरकारचे कर्तव्य नव्हते. समाजातील एका विशिष्ट गटापुरतेच शिक्षण मर्यादित होते. शिक्षण ही बाब खाजगी मानली जात. परंतु मुघल राज्यकर्त्यांनी शिक्षण आणि शिक्षक यांना उदार आश्रय दिला.

**ii) मुस्लीम शिक्षण पद्धत:**

भारताबाहेर मुसलमानी राज्यात विकसित झालेले शिक्षण पद्धत आठव्या शतकात भारतात सुरू करण्यात आली प्रथम मुलतान मध्ये आणि मग बाराव्या शतकात पंजाब मध्ये ती रुढ झाली. हिंदुस्थानात मुसलमान सत्तेची स्थापना होण्याच्या आधीच इस्लामी शिक्षण व्यवस्था चांगलीच विकसित झालेली होती. या व्यवस्थेत मदरसा या शैक्षणिक संस्था केंद्रबिंदू होत्या. मुघल काळात दिल्ली हे देशातील सर्वात मोठे असे मुसलमानी शैक्षणिक केंद्र बनले होते. दिल्लीच्या सुलतानांनी दिल्लीमध्ये तसेच दिल्लीच्या आसपासच्या शहरांमध्ये अनेक शिक्षण संस्था उभ्या केल्या.

बाबराने दिल्ली येथे एक मदरसा स्थापन केली आणि तिथे गणितशास्त्र, खगोलशास्त्र, भूगोल आणि नेहमीचे धर्मशास्त्र हे विषय शिकवण्यात येई. हुमायून तुर्की, पर्शियन आणि अरबी भाषिक साहित्याचा गाढा वाचक होता. त्याला धार्मिक अभ्यास, गणित, खगोलशास्त्र आणि कलांमध्ये विशेष रस होता. एक शास्ता व प्रशासक म्हणून तो अपयशी ठरला असला तरी त्याची साहित्याची आवड मरेपर्यंत टिकून होती. दिल्ली येथील त्याच्या शाही महालाला जोडूनच ‘दिनपनाह’ अथवा ‘शेरमंडल’ नामक त्याचा व्यक्तिगत ग्रंथसंग्रह ठेवलेला होता. आपल्या या ग्रंथालयाच्या पायऱ्या उतरत असतानाच अपघात होऊन तो पडला. शेरशहा ने देखील त्याच्या कारकीर्दीत अनेक मकतबे व मदरसे सुरू केले. अनेक विद्वानांना शिष्यवृत्ती प्रदान केल्या. हिंदुस्थानात मुसलमानी अंमल स्थापन झाल्यापासून अकबराच्या काळापर्यंत मुसलमानी शैक्षणिक पद्धतीत त्यातील अभ्यासक्रमात आणि शिकविण्याच्या पद्धतीत काहीही महत्त्वाच्या सुधारणा झाल्या नव्हत्या. या शिक्षण पद्धतीत प्रामुख्याने दोन दोष होते; एक म्हणजे प्रचलित अभ्यासक्रमात धर्मशास्त्रावर जास्त भर देण्यात आला होता. त्याची व्याप्ती संकुचित होती आणि इस्लाम विद्याबाहेरील कित्येक महत्त्वाच्या विषयाकडे दुर्लक्ष करण्यात आले होते. दुसरा दोष म्हणजे शिकविण्याची पद्धत अवजड दीर्घसूत्री साचेबंद आणि कालबाह्य होती. अकबराने या शिक्षण पद्धतीत महत्त्वाच्या सुधारणा करून संबंध शिक्षणक्रमाला एक प्रकारची गतिशीलता आणि नाविन्य आणून दिले. प्रचलित अभ्यासक्रमात अकबराने आता भारतीय तत्त्वज्ञान, नीतीशास्त्र, गृहशास्त्र, कृषीशास्त्र, मापनशास्त्र, राज्यशास्त्र, ज्योतिषशास्त्र, भौतिकशास्त्र, खगोलशास्त्र, परिणामशास्त्र अशा नवीन विषयांचा समावेश केला. संस्कृत भाषेचा आणि वाङ्मयाचा अभ्यास पण सुरू करण्यात आला. संस्कृत विषयात न्याय, व्याकरण, योग आणि वेदांत यावरील अभ्यासक्रम समाविष्ट करण्यात आले. शिकविण्याच्या पद्धतीत अध्यापकांच्याकडून कमीत कमी मदत घेऊन स्वतः विषय समजून घेण्यास विद्यार्थ्यांची तयारी करण्यासाठी किंवा विचारशक्ती वाढविण्यावर भर देण्यात आला. आईने अकबरी मध्ये सांगितल्याप्रमाणे, ‘बादशहांची अशी आज्ञा आहे की मुलाने प्रथम मुळाक्षरे शिकावे मग जोडाक्षरे, लिहिणे, शिकावे त्यानंतर पाठांतराकडे लक्ष देऊन श्लोक किंवा नीतीबोध वचने पक्की करावेत. अक्षरज्ञान, शब्दार्थ, श्लोकार्थ आणि यांकडे अध्यापकाने विशेष लक्ष द्यावे असे अकबराचे मत होते.

इ. स. १५८० मध्ये सदर किंवा धर्म आणि न्याय खात्याच्या मंत्रिपदावर अकबराने एका उदारमतवादी व्यक्तीची नियुक्ती केली आणि या मंत्र्याखाली शिक्षण हा विषय असल्याने त्याने हिंदू आणि मुसलमान या दोन्ही शैक्षणिक संस्थाना अनुदान दिले. अकबराने पुष्टिमार्ग प्रवर्तक वल्लभाचार्य यांचा मुलगा विठ्ठलनाथ यांचा जमीन इनाम देऊन सन्मान केला.

(मुसलमानाना हिंदु धर्म आणि संस्कृति यांचे चांगले ज्ञान होईल, दोन्ही समाजामधील गैरसमज दूर होईल व दोन्ही समाजातील लोक आपापल्या उणीवा शोधून त्या दूर करतील या उद्देशाने अकबराने धर्म, तत्त्वज्ञान आणि वाड्.मय यावरील संस्कृत ग्रंथांचे फारशी भाषेत भाषांतर करण्याकरिता एका भाषांतर मंडळाची (translation bureau) स्थापना केली. या मंडळामार्फत धर्म, गूढवाद आणि न्यायशास्त्र यावरील अरबी ग्रंथांचे भाषांतर करण्याचा पण उद्देश होता. अमीर उमरावांकडे अशा भाषांतरित ग्रंथांच्या स्वतःच्या प्रती असाव्यात असा अकबराचा आग्रह होता. भाषांतर झालेले सर्व ग्रंथ शाही ग्रंथालयात ठेवण्यात आले आणि वरचेवर ती पुस्तके अराला वाचून दाखविण्यात येत. इ. स. १५९१ मध्ये अकबराचा मुलगा मुराद याची माळवा येथे प्रांताधिकारी म्हणून नियुक्ति होत असताना अकबराने त्याला महाभारताची एक फार्शी प्रत पाठवून त्या महाकाव्यात सांगितलेल्या उपदेशाप्रमाणे आपले वर्तन ठेवण्यास आवर्जून सांगितले.

मदरशांमध्ये करावयाच्या उच्चस्तरीय अभ्यासासाठी अकबराने काही महत्त्वाचे विषय निवडून दिले. नीती तत्वे, अंकगणित, क्षेत्रमापन, भूमिती, खगोलशास्त्र, सरकारी कायदे कानून, औषध विद्या तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान आणि दर्शनशास्त्र व इतिहास वरील पुस्तके ग्रंथालयात असावी. अकबराने शिक्षणाची प्रक्रिया धर्मनिरपेक्षक करण्याचा प्रयत्न केला. त्याने शिक्षणासाठी हिंदू शिक्षकांचाही समावेश केला. हिंदूंचा शैक्षणिक संस्थांनाही अनुदान देण्याची पद्धत अकबराने सुरू केली त्याचप्रमाणे संस्कृत आणि हिंदी भाषांचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन दिले.

आग्रा, फतेहपुर, सिक्री, दिल्ली, जोनपुर, सियालकोट, सरहिंद, ग्वालियर, लखनऊ, कश्मीर, अहमदाबाद इत्यादी उत्तरेतील सुप्रसिद्ध इस्लामी शिक्षण केंद्र होती. त्याचप्रमाणे दक्षिणेत गुलबर्गा, अहमदनगर, बुऱ्हानपूर, विजापूर, गोवळकोंडा व हैदराबाद ही प्रख्यात विद्या केंद्रे म्हणून प्रसिद्ध होती. या सर्व शैक्षणिक केंद्राच्या ठिकाणी उच्च शिक्षणासाठी विद्या केंद्रात सुसज्ज ग्रंथालय होती. या ग्रंथालयात दुर्मिळ ग्रंथांच्या प्रती नकला करून ठेवल्या जात असत व त्यांचे जतन केले जाई. फतेहपुर सिक्री येथील अकबराच्या ग्रंथालयात २४ हजार ग्रंथ होते. पुस्तक संग्रह करणे ही प्रतिष्ठेची बाब मानली जात होती.

जहांगीर, शहाजहान यांनी सुद्धा विद्या व साहित्याला महान आश्रय दिले. दिल्ली जवळ शहाजहानबाद या वसाहतीत शाहजाने एक नवीन महाविद्यालय स्थापन केले शहाजहान व त्याचा मोठा मुलगा यांना हिंदीत बोलण्याची आवड होती. शाहजहानाच्या कारकीर्द हिंदी भाषा व साहित्याला दरबारात व शाही अंत:पुरात मोठा मान मिळत होता. अनेक हिंदी विद्वान सुंदरदास, चिंतामणी व कवीद्राचार्य यांना राजाश्रय मिळाला होता. शहजहानच्या कारकीर्दीत गाजलेला संगीतकार जगन्नाथ हिंदी भाषेतील एक प्रतिभाशाली कवी होता.

**ii) हिंदू शिक्षण पद्धत:**

मध्ययुगीन भारतात हिंदू शिक्षण संस्थांचे प्राथमिक शाळा माध्यमिक शाळा विशेष संस्था आणि प्रसिद्ध विद्या केंद्रातील महाविद्यालय किंवा विद्यापीठ असे चार प्रकार होते. वाचन लेखन आणि गणित शिकविणे तसेच प्राथमिक स्वरूपाचे आणि व्यवहारात उपयोग पडेल असे काही प्रशिक्षण देणे हे प्रार्थमिक शाळांचे काम होते. या शाळा खेड्यातील सार्वजनिक जागेत किंवा उपाध्यायांच्या घरीच घेण्यात येत. पुष्कळदा देवळात किंवा मठात या शाळा

भरत असत. काही शैक्षणिक संस्था विद्वान पंडितांच्या घरातच चालविण्यात येत त्या ठिकाणी त्यांना उच्च शिक्षण देण्यात येई. न्याय व्याकरण वैशेषिक षड दर्शन इत्यादींचे सखोल शिक्षण देण्याची खास सोय होती साधारणता हिंदू शिक्षण पद्धती मध्ये धार्मिक शिक्षण प्रामुख्याने दिले जाई. तसेच व्यवहारात उपयोगी पडणारे ज्ञान असण्याची आवश्यकता असते. बनारस, नदिया, प्रयाग या ठिकाणी मोठमोठी विद्यापीठे असून तेथे निरनिराळ्या विषयात तज्ञ आपापल्या विषयांचे खास शिक्षण देत.

सामान्यपणे विशेषत: दक्षिणेकडे विशिष्ट उद्योग धंद्यावर आधारित जातींमध्ये आपापल्या व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याकरता खास शिक्षण संस्था चालविल्या जात असत. भारतातील ख्रिश्चन धर्मियांच्या आगमनानंतर त्यांनी मदुराई आणि चंद्रगिरी येथे प्राथमिक शाळा स्थापन केल्या मदुराई येथील शाळेत सामान्य हिंदू मुलांना वाचन आणि लेखन शिकविण्यात येईल तर चंद्रगिरी येथील शाळेत दरबारातील अमीर उमरावांच्या मुलांना शिकविण्यात येत असत.

अभ्यासक्रमात धार्मिक आणि तत्ससंबंधित विषय पारंपारिक लौकिक विषय, शास्त्रांचा अभ्यास मानवी शास्त्रे, प्रादेशिक भाषा व व्यावसायिक प्रशिक्षण यांचा समावेश होता. वेद, पुराण, महाकाव्य, पतंजली, सूत्र विविध प्राचीन नाटके, काव्य व तर्कशास्त्र, गणितशास्त्र, वैद्यकशास्त्र, भूमिती शरीरविज्ञानशास्त्र, भूगोल आणि खगोलशास्त्र इत्यादी विषय समाविष्ट होते, राज्यशास्त्र किंवा इतिहास, संगीत, शिल्प आणि स्थापत्य कला हे सामाजिक आणि मानवी शास्त्रात समाविष्ट होते. भाषांमध्ये प्रामुख्याने संस्कृत, पाली, प्राकृत आणि हिंदी, शिवाय ओरिया, राजस्थानी, मराठी, तामिळ आणि तेलुगु इत्यादी प्रादेशिक भाषा त्या त्या प्रदेशात शिकविल्या जात होत्या.

साधारणत: शिक्षण पद्धती ही तोंडी होती. विद्यार्थी आपल्या अध्यापकाकडून प्रत्यक्ष विषय ज्ञान घेत असत. ग्रंथांची संख्या फार कमी असल्याने पुस्तकी ज्ञानाला फारसे महत्त्व दिले जात नव्हते. शाळा अगदी साध्या असून कुठल्यातरी झाडाखाली त्या भरत असत. जमिनीवर बारीक वाळूमध्ये अध्यापक सांगेल तशा पद्धतीने लिहायचे, लिहिलेले पाठांतर करायचे, लिखाणाची जागा भरल्यानंतर सर्व हाताने पुसून टाकायचे अशी सामान्य शिक्षण पद्धती होती. असे परकीय प्रवाशांनी लिहून ठेवले आहे.

मध्ययुगीन भारतात हिंदूंची बरीच प्रसिद्ध विद्या केंद्र होती. यामध्ये बनारस हे सर्वात मोठे विद्या केंद्र होते भारतातील बहुसंख्य श्रीमंत तसेच पंडीतांची मुले येथे येत असत. मिथिला, तिरहुत, नवद्वीप, जगन्नाथ पुरी, द्वारका, कांची, पैठण, वाई, गोकर्ण अशी अनेक मोठी शिक्षण केन्द्रे भारतात होती. इ.स. १६८० मध्ये या केंद्रात ४००० विद्यार्थी आणि ६०० अध्यापक होते. गोकर्णला भेट दिल्यानंतर ते एक मोठे शैक्षणिक केंद्र असल्याचे पाहून डॉ. जॉन फ्रायर झाला आश्चर्य वाटले.

विजयनगर साम्राज्यामध्ये विद्यार्थी काळा रंग लावलेल्या लाकडाच्या तुकड्यावर पेन्सिलने लिहीत असत असे उल्लेख आढळतात. मराठी राज्यामध्ये शैक्षणिक हालचाली मोठ्या जोमाने चालू होत्या, पुणे हे त्या कळचे सुप्रसिद्ध शिक्षण केंद्र होते. कोल्हापूर, कराड, सांगली, नाशिक, वाई, पैठण इत्यादी महाराष्ट्रातील शिक्षण केंद्र होती. महत्त्वाच्या ग्रंथांचे भाषांतर करून ते लिहून काढण्यासाठी उत्तम अक्षर हस्ताक्षर असलेले लोक नेमले जात असत. पेशवे विद्वत्तेचे मोठे आश्रयदाते होते. त्यांच्या कारकीर्दीत विविध भागातील

पंडितांचा गौरव करून त्यांना आश्रय दिला जात असे. इ.स. १७५० मध्ये कोणी एक अमानापंत नामाचा गृहस्थ पद्मपुराणाचे पुनर्लेखन करीत होता. जुन्या व नाश पावत चाललेल्या हस्तलिखितांचे पुनर्लेखन करणे किंवा ग्रंथांच्या नवीन प्रती दुसऱ्यांकडून खरेदी करून त्यांचे आपल्या ग्रंथालयात जतन करणे अशा प्रकाराची विद्या संवर्धनाची कामे केली जात होती. स्वतः पेशवे अनेक मौलवान ग्रंथ खरेदी करीत होते.

**आपली प्रगती तपासा**

१) मुघल काळातील हिंदू शिक्षणपद्धतीचे स्वरूप स्पष्ट करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

१) मुघल काळातील हिंदू व मुस्लीम शिक्षणातील अभ्यासक्रमाची माहिती द्या.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ९.४ मुघलकाळातील साहित्य

प्रामुख्याने साहित्यकार सामाजिक दृष्टिकोन ठेवून जनतेच्या प्रति सेवात्मक कार्य म्हणून प्रवृत्त होत असतो. साहितियक ज्या समाजात संस्कृतीत परंपरेत वाढतो ते सर्व संस्काररूपी त्याच्या साहित्यातून अभिव्यक्त होते. सर्व साहित्यकार मध्यमवर्ग तसेच निम्न वर्गातून आलेले होते त्यामुळे देखील त्यांच्या साहित्यात सामाजिक सुख दुःख आशा निराशा या स्तरावर काव्य निर्माण होते. जोपर्यंत आपण एखाद्या साहित्याची जोपर्यंत सामाजिक आर्थिक सांस्कृतिक ऐतिहासिक माहिती जाणून घेत नाही तोपर्यंत ते साहित्य समजण्यास कठीण जाते. असे साहित्य तत्कालीन राज्यकर्त्यांमुळे सुफी पंथ तसेच भक्ती चळवळ यांच्यामुळे मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले.

**ii) मुघल काळातील साहित्याचा विकास:**

मुघलकालीन मध्ययुगीन साहित्याच्या अभ्यासातून असे दिसून येते की, हिंदूंच्या संस्कृतीला इस्लामी संस्कृतीने दूरवर प्रभावित केले. रामायण – कुराणच नाही तर तर हिंदू मुसलमानांचे उठणे-बसणे, वेशभूषा, आचार-विचार इत्यादी जवळ आले होते. अनेक मुसलमानी वेशभूषांचे चित्रण हिंदी साहित्यातील नायक नायिकांचे केलेले दिसून येते.

अकबराच्या सुरुवातीपासूनच भारतामध्ये हिंदी, फारसी, उर्दू या भाषांमध्ये बरेच साहित्य निर्माण झाले होते. तसेच प्रांत अनेक प्रादेशिक भाषांमध्ये देखील साहित्य लिहिले जात होते. पुढे अकबराच्या काळात फारसी साहित्याने व काव्याने कळस गाठला. महान विचारवंत व त्या काळातील प्रसिद्ध इतिहासकार असलेल्या अबुल फजलने सुरू केलेल्या

फारसी भाषेतील गद्य लेखन शैलीचे अनुकरण पुढच्या अनेक पिढ्यांनी केले. त्याचा भाऊ अबुल फैजी हा उत्तम अनुवादक होता, त्याच्या देखरेखीखाली महाभारताचे फारसी भाषांतर करण्यात आले. त्याचप्रमाणे रामायण, योग, वशिष्ठ वेदांतांचे अनुवाद केले. तसेच हिंदू मुसलमान जनतेमध्ये एकता निर्माण व्हावी म्हणून अल्लोपनिषद नावाची छोटेसे उपनिषद लिहिले. या काळात संस्कृत मध्ये फारसे नवीन व महत्त्वाचे लेखन झाले नसले तरी संस्कृत कृतींच्या निर्मितीची या काळातील संख्या चांगलीच लक्षणीय होती. पूर्वीप्रमाणे दक्षिण व उत्तर भागांमधील स्थानिक राज्यांच्या आश्रयाखाली बरेचसे संस्कृत लेखन झाले पण मुघल सम्राटांच्या अनुवाद विभागातील ब्राह्मणांनी ही बरीच साहित्य निर्मिती केली.

साधारणत: साहित्याचे विषय हे कृष्ण लीला, भागवत, पुराण यांतील कथा रामायण, महाभारत इत्यादी असतं. अनेक प्रादेशिक भाषांमध्ये देखील उत्तम साहित्यांची निर्मिती झाली. यामध्ये बंगाली, ओडिया, हिंदी, राजस्थानी, गुजराती भाषांचा समावेश होतो. या काळात रामायण व महाभारताचे प्रादेशिक भाषांमधील अनुवाद प्रसिद्ध आहेत. आलाओलं हा बंगाली भाषेत लेखन करीत असे व फारसी मधून अनुवादही करीत असे. सुफी संत मलिक महंमद जायसी याने हिंदीमध्ये पद्मावत हे महाकाव्य लिहिले. मुघल काळात हिंदी, बंगाली, मराठी, गुजराती इत्यादी भाषेत साहित्याची निर्मिती झाली वर उल्लेख केलेले तुलसीदासाचे रामचरित्रमानस, सेनापतीचे संतसई, सुरदास याचे सुरसागर, बंगाली भाषेत कृष्णदास, वृंदावन दास सुप्रसिद्ध कवी होऊन गेले.

प्रामुख्याने मध्ययुगीन कालखंड हे शृंगारिक साहित्याचे मानले जाते परंतु तरी देखील अनेक कवींनी अनेक राजा महाराजांच्या वीरश्रीचे वर्णन केलेले दिसते. या कालखंडात ऋषभदास जैन यांनी कुमारपाल रासो, राजा मानसिंह यांनी मानचरित्र, किशोरदास भाट यांनी राजप्रकाश कवी, भूषण याने शिवराजभूषण, छत्रसाल दशक, लाल कवी याने छत्र प्रकाश सुधन, याने सुजान चरित्र इत्यादी ऐतिहासिक चरित्रांवर काव्यरचना केलेली आहे. कवी भूषण याचे शिवराज भूषण हे काव्यग्रंथ छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची प्रशस्ती आहे. कवी भूषण हे मथुरेचे असल्यामुळे हे काव्य हिंदीचे तत्कालीन रूप असलेल्या ब्रजभाषेमध्ये लिहिले गेले आहे. यामध्ये ५८६ छंद आहेत. आसाराम तिवारी यांनी हिंदी भाषेत तसेच महाराष्ट्रातील थोर इतिहासकार निनाद बेडेकर यांनी शिवराज भूषण हे काव्य मराठीत अनुवाद केले आहे.

मध्ययुगीनकाळात अनेक धार्मिक अथवा नीतीपर लेखन झालेले आहे यामध्ये रहीम चे दोहे कबीरदास यांचे दोहे, ठाकरसी यांचे कृष्णचरित्र, सुंदरदास यांचे बावन्नी जिनरंगसुरी यांचे रंगबहत्तरी, लालचंद रचित छिनाल पच्चीसी, तुलसीदास रचित दोहावली इ.

उर्दू भाषेचा विकास ही अठराव्या शतकातील एक महत्त्वपूर्ण घटना होती. व्यंगकाव्य लिहिणारा कवी जाफर जटली याने औरंगजेबाच्या काळात आपल्या रचना साकारल्या. दीर्घकाळ दख्खनमध्ये राहावे लागलेल्या मुघल अमिरांच्या यातना आणि उत्तरेत मागे राहिलेल्या त्यांच्या स्त्रियांच्या एकाकीपणाबद्दल लिहिताना त्याने चोहीकडे पसरलेल्या अराजकतेबद्दल औरंगजेबावर 'दैत्याच्या बुडाखाली अंधार' या शब्दांत टीका केली. मीर, दर्द आणि सौदा (इ. स. १७१३-८१) या कवींनी उर्दू भाषेला मानाचे स्थान मिळवून दिले.

**ii) मुघलकालीन ऐतिहासिक साहित्य:**

मुघल संस्थापक बाबर याने स्वतःचे आत्मचरित्र जगताई तुर्की या भाषेत लिहिलेले असून त्याचे नाव तूझुक ए बाबरी किंवा बाबरनामा असे आहे. त्याच्या कालखंडा बद्दल माहिती देणारे एकमेव दर्जेदार साधन म्हणून या साहित्याचे महत्त्व आहे. हे साहित्य दोन वेळा पर्शियन भाषेत अनुवाद केले. पहिल्यांदा पैन्दाखान याच्याकडून नंतर अब्दुल रहीम मिर्झा यांच्याकडून हे भाषांतराचे काम करून घेण्यात आले. मुघल घराण्याबद्दल माहिती देणारा समकालीन व प्रथम दर्जाचा साधनग्रंथ म्हणून मानला जाणारा तारीख ए रशीदी हा मिर्झा हैदर तुगलात याचा ग्रंथ अप्रतिम आहे. मुघल घराण्यासोबत त्याचे एकनिष्ठतेचे संबंध असल्याने यामध्ये नाविन्यपूर्ण माहिती प्राप्त होते. बाबराची मुलगी व हुमायुनची सावत्र बहिण गुलबद्दन बेगम हिने हुमायून नामा हा ग्रंथ लिहिला. हे पुस्तक पर्शियन बोली भाषेत लिहिलेले आहे. ख्वाद अमीर याने रोझात उस सफा, खुलासात उल् अखबार, दस्तुर उल् वुझारा आणि इतर काही ग्रंथ पूर्ण केले. इतिहास लेखनाची विशेष आवड लेखकाला असल्यामुळे इतिहासकार म्हणून त्याला मान्यता व प्रतिष्ठा मिळाली होती. तसेच त्याने हबीब उस्-सियार व कानून ए हुमायुनी हे मौल्यवान ग्रंथ लिहिले.

हुमायुनची कारकीर्द व्यक्तिमत्व व जीवन यांबद्दल विशेष प्रकाश टाकणारे पुस्तक जौहर आफताबची यांच्या तारीख ए हुमायुनी या ग्रंथाचा उल्लेख करावा लागतो. अब्बासखान सरवानी याने अफगान राज्यकर्ता शेरशहा याच्यावर तारीख हे शेरशाही हे उत्कृष्ट ग्रंथ लिहिले.

अकबराच्या कालखंडात इतिहासकार व विद्वानांना उदार राजश्री देण्यात आला अनेक लेखकांना त्यांनी मुघलांचा इतिहास लिहावयास लावले. यामध्ये अबुल फजल च्या अकबरनामा या ग्रंथाचे फार वरचे स्थान आहे. इ.स. १५९४ मध्ये बक्षी निजामुद्दीन अहमद याने तबकात ए अकबरी हा इतिहास ग्रंथ लिहिला. अकबराच्या काळापर्यंतचा एकूण भारतीय मुस्लिम राजवटीचा इतिहास यात दिलेला आहे. त्याचप्रमाणे बदायुनी याचा मुतखब उल तवारीख हा ग्रंथ फार प्रसिद्ध आहे बदायुनी हा अकबराचा विरोधक असल्यामुळे अनेक शत्रू पक्षातील माहिती यात उपलब्ध आहे. तारीख ए मोहम्मद अरिफ कंदहारी हा एक अकबरकालीन महत्त्वाचा ग्रंथ आहे. यामध्ये अकबराच्या जन्मापासून ते इ.स. १५७९ पर्यंत इतिहास दिला आहे. अनेक इतिहास ग्रंथ फारसी भाषेत अकबराच्या काळात लिहिण्यात आले.

मोगल बादशहा जहांगीरच्या कारकिर्दीच्या इतिहासाची माहिती देणारे सर्वात महत्त्वाचे इतिहास साधन म्हणून तुझुक ए जहांगीरी हे स्वतः जहांगीर चे आत्मचरित्र आहे. मुघल काळातील राजकीय परिस्थितीबद्दलची महत्त्वाची माहिती या ग्रंथात उपलब्ध होते. त्याचप्रमाणे मोतमादखान याचा इकबालनामा हे ग्रंथ जहांगीरच्या काळातील महत्त्वाचे ग्रंथ आहे मोगल प्रशासनात वीरभक्षीय पदावर तो काम करत असल्यामुळे मुघलकालीन जहांगीरच्या काळातल्या महत्त्वपूर्ण घडामोडींवर तो भाष्य करतो.

मोहम्मद अमीन काझविनी याने शहाजहानच्या कारकिर्दीवर 'पातशाहानामा' हा ग्रंथ लिहीला. यामध्ये शाहजहानच्या पहिल्या दहा वर्षाचा इतिहास आहे. तसेच इनायतखान याने 'शहाजहाननामा' हा ग्रंथ लिहीला.

औरंगजेबाने आपल्या कारकीर्दीच्या २१ व्या वर्षी इतिहासलेखनावर बंदी घातली तरी त्याच्या काळात बरेच इतिहासकार किंवा ऐतिहासिक वृत्तांत-लेखक होऊन गेले. उदाहरणार्थं ' लुब-उत्-तवारीख' लिहिणारा राय बिद्रावन, 'तारीख-ए- मुहम्मदशाही नादुर-उल्-जमाती' चा लेखक खुश्शालचंद, 'तारीख-ए-इव्रतमकाल' चा लेखक कासीम, ' तबसर-उल्- नाजरीन ' चा लेखक सय्यिद मुहम्मद बिलग्रामी, तारीख-ए-आलमगीरी' चा कर्ता अहमद कुली सफवी, 'मीरात-उल्-आलम लिहिणारा बख्तावरखान, 'मिरात-ए-जहाननामा' चा कर्ता, 'तजकिरत-उल्- सलातीन – ए – चुग्ता ' चा लेखक मुहम्मद हावी, ''इंतखाब-ए-मुंतखिब कलाम आणि : मुफीद -उल्-मवरखीन या दोन्हींचा लेखक अब्दुस शकूर, अली मुहम्मदखान याचा 'मीरात-ए-अहमदी' वगैरे. यापैकी मुहम्मद काजीमचा 'आलमगीरनामा', राय बिंद्राबनंचा  लुब्-उत्-तवारीख', मुहम्मद साकी मुस्तैदखानचा ' मासीर-ए-आलमगीरी ', ईश्वरदासचा फतुहात-ए- आलमगीरी', भीमसेनचा 'नुश्का-ए-दिलकुशा.' आणि खाफीखानचा ' मुंतखब- उल्-लुबाब ' हे फार महत्त्वाचे आहेत.

**आपली प्रगती तपासा:**

१) मुघल कालीन ऐतिहासिक साहित्याची माहिती द्या.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ९.५ सारांश

तत्कालीन भारताच्या धर्म व्यवस्थेचा अभ्यास करत असताना तत्कालीन राजकीय परिस्थिती व राज्यकर्त्यांची धोरणे यांचा अभ्यास करावा लागतो. भारतात प्रामुख्याने तीन धर्म प्रचलित होते त्यामध्ये इस्लाम धर्म हा राज्यकर्त्या वर्गाचा धर्म होता. त्यामुळे इस्लाम धर्मिय जनतेचे सुरुवातीच्या काळात मोठ्या प्रमाणावर सहभाग असे. अकबराच्या काळात हिंदू बाबत उदारमतवादी दृष्टिकोन दाखवल्यामुळे मुघल दरबारात हिंदूंना जागा मिळाली तसेच इस्लामिक कायद्यांची जटीलता नष्ट झाली जिझिया करांसारखे अमानुष कर रद्द करण्यात आले. अकबराने हिंदूंना समानतेने वागले तसेच हिंदू धर्मातल्या अनेक गोष्टींचे अनुकरण केले, धार्मिक साहित्याचे फारसी मध्ये अनुवादन केले. स्वतः अकबर व त्याची मुले हिंदूंचे सण साजरे करीत होते. परंतु औरंगजेबाच्या कालखंडात कट्टर इस्लामी तत्त्वांचे अनुप पालन केले गेले. अनेक धार्मिक बंधने हिंदूंवर लाभले गेले. जिझिया कर पुन्हा एकदा लागू करण्यात आला. हिंदूंची अनेक तीर्थक्षेत्रे पाडुन टाकली. अनेक लोकांचे इस्लाम मध्ये धर्मांतर केले. अशाप्रकारे एकंदरीत हिंदूंचे औरंगजेबाच्या कालखंडात छळ होत राहिले. तत्कालीन धार्मिक वडंबर असले तरी धर्मासंबंधी धोरणे ठरविण्यात राज्यकर्ता निर्णय घेत असे. हिंदूंप्रमाणेच शिखांची परिस्थिती होती. शीख गुरूंना मुघलां सोबत लढावे लागले व स्वतःच्या प्रांताचे व धर्माचे रक्षण करावे लागले. त्याचप्रमाणे हिंदू व इस्लाम धर्मामध्ये सुधारणा घडवून आणण्याचे कार्य तत्कालीन संतांनी केले, हिंदू धर्मातील जातीव्यवस्था अस्पृश्यता यांना विरोध करण्यात आला. सुफी पंथातील संतांनी देखील हिंदू रितीपरंपरांचा मान राखून अकबराच्या वजुदी धोरणाचे समर्थन केले.

शिक्षणव्यवस्थेत, एकंदरीत हिंदू आणि मुस्लिम शिक्षण पद्धती ही सनातनी आणि पारंपारिक अथवा धार्मिक स्वरूपाची होती; त्यामध्ये सामान्यांच्या शिक्षणाची सोय नव्हती आधुनिक दृष्टिकोनाचा अभाव होता. उदारमतवादी शिक्षण दिले जात नव्हते. अकबराचा अपवाद वगळता कोणत्याही राज्यकर्त्याने शिक्षणामध्ये सुधारणा घडवून आणल्या नाहीत. सक्तीचे शिक्षण नव्हते विद्या फक्त श्रीमंत व धर्मपंडित वर्गाची मक्तेदारी होती असेच दिसून येते.

मुघलकाळामध्ये ज्याप्रमाणे कलांचा विकास झाला त्याचप्रमाणे साहित्याचा विकास झालेला दिसून येतो हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही साहित्यांवर एकमेकांचा प्रभाव पडलेला दिसून येतो साधारणता मुघल काळात प्रांतिक भाषेत साहित्याची निर्मिती मोठ्या प्रमाणावर झालेली दिसून येते. साधारणत: राजकीय ऐतिहासिक धार्मिक सामाजिक इत्यादी प्रकारचे साहित्य आपणाला पाहावयास मिळते. मध्ययुगीन कालखंडाच्या साहित्य चे विषय प्रामुख्याने शृंगारिक असले तरी काही साहित्य हे वीररसावर आधारित आहेत. अनेक फारसी व संस्कृत साहित्य हे इतर भाषांमध्ये अनुवादित केले गेले. त्यामुळे साहित्यात वाढ होण्यास मदत झाली. व हिंदू व इस्लाम धर्मियांचे  विचारांचे आदान प्रदान झाले.

## ९.६ प्रश्न

१. मुघल काळातील धार्मिक परिस्थिति स्पष्ट करा

२. मुघल काळातील साहित्याचा विकास अधोरेखीत करा.

३. मुघल काळातील शिक्षण व्यवस्थेवर भाष्य करा.

## ९.७ संदर्भ


- वर्मा हरिश्चंद्र, मध्यकालीन भारत (भाग २) (१५४० - १७६१), दिल्ली विश्वविद्यालय, प्रथम आवृत्ती, दिल्ली, २०१७.
- शर्मा सतीशचंद्र, मध्ययुगीन भारत : मोगल साम्राज्य (१५२६ - १७४८), (खंड २), के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१७.
- मेहता जे. एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास (खंड २), आवृत्ती चौथी, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१६.
- मेहता जे. एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास (खंड ३), आवृत्ती तीसरी, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१४.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: १, तिसरी आवृत्ती, प्रकाशिका सौ. आर. के. चिटणीस, पुणे, २००३.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: २, दुसरी आवृत्ती, प्रकाशिका सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८७.

- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: ४, प्रथम आवृत्ती, प्रकाशिका सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८५.
- भिडे गजानन, नलावडे विजय, नाईकनवरे वैजयंती, मध्ययुगीन भारत (सामाजिक, आर्थिक आणि संस्कृतीक इतिहास), फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.
- पवार विश्वनाथ, शिंदे, मुघलकालीन भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.


*****

# १०

# मुघल काळातील कला आणि स्थापत्य कला

**घटक रचना**

१०.१ उद्दिष्टे

१०.२ प्रस्तावना

१०.३ मुघलकालीन चित्रकला

१०.३.१ हुमायून

१०.३.२ अकबर

१०.३.३ जहांगीर

१०.३.४ शाहजहा

१०.३.५ मुघल चित्रकलेवर युरोप शैलीचा प्रभाव

१०.३.६ पहाडी शैली

१०.३.७ दक्षिणेकडील शैली

१०.४ संगीतकला

१०.४.१ बाबर

१०.४.२ अकबर

१०.४.३ जहंगिर

१०.५ नृत्यकला

१०.६ स्थापत्य कला

१०.६.१ मशिदीची सर्वसाधारण रचना

१०.६.२ बाबर

१०.६.३ हुमायून

१०.६.४ शेरशहा

१०.६.५ अकबर

१०.६.६ जहांगिर

१०.६.७ शाहजहा

१०.६.८ औरंगजेब

१०.७ सारांश

१०.८ प्रश्न

१०.९ संदर्भ

## १०.१ उद्दिष्टे

१. मुघलकालीन ललित कलांचा आढावा घेणे.

२. मुघलकालीन स्थापत्य कलेचा आढवा घेणे.

३. मुघलकालीन कलेचा भारतीय समाजावर झालेला परिणाम अभ्यासणे.

## १०.२ प्रस्तावना

कला हे माणसाच्या जीवनातील एक अंगभूत घटक आहे. कलेचे अनेक प्रकार पडतात. भारतीय परंपरेत ६४ कलांचा उल्लेख मिळतो. कलेमध्ये तत्कालीन समाजाचे सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक स्थितीचे दर्शन घडत असते. भारतीय संस्कृतीला प्राचीन कलेचा वारसा आहे. त्यामध्ये अनेत स्थित्यंतरे घडून आल्याची दिसून येतात. प्राचीन भारतापासून शिल्पावर, लाकडांवर, भिंतींवर मोठ्या प्रमाणावर चित्रकला पाहायला मिळते, अजिंठामधील चित्रकला ही अत्यंत सुंदर आहे तेथील चित्रे ही बोलकी वाटतात. संगीत कलेला देखील प्राचीन परंपरा आहे. त्याचप्रमाणे प्राचीन काळखंडापासून मंदिरे, राजवाडे, विहिरी, किल्ले, तलाव, लेण्या, विहारे, स्तूप, या स्वरुपात मोठ्या प्रमाणावर स्थापत्य आपणाला पाहावयास मिळते. भारतात तुर्की सत्तांनी सत्ता कायम करून स्थिर केल्या वर मुस्लिम जनतेला राहण्यासाठी तसेच स्वतः साठी मोठे मोठ्या वास्तु बांधल्या. त्यामध्ये महल, किल्ले, मकबरा, इ. बांधकाम सुलतान व मुघल काळातील बादशहांनी केले. इराणी परंपरेवर आधारित त्यांनी भारतात मोठ्या प्रमाणावर बांधकाम केले. मुघल राज्यकर्त्यांनी चित्रकार, संगीत व नृत्य सादर करणाऱ्या मोठ्या प्रमाणावर राजाश्रय दिला व भारतात एक वेगळ्या पद्धतीची कलेची परंपरा निर्माण केली.

## १०.३ मुघलकालीन चित्रकला

भारतातील मुघल सत्तेचा संस्थापक बाबर याला भारतात सत्ता स्थिर केल्यानंतर त्याचा उर्वरित काल हा एतदेशीय राज्यकर्त्या सोबत संघर्ष करण्यात गेला. भारतात बाबरला खूप कमी आयुष्य लाभल्यामुळे त्याच्या कालखंडात भारतातील कलेचा इतिहास अस्पष्ट आहे. बाबराच्या लिहिलेल्या त्याच्या आत्मचरित्रामधील वर्णनावर असे वाटते की, बाबराला कलेची आवड असावी.

### १०.३.१ हुमायून:

बाबरनंतर त्याचा मुलगा हुमायून याने भारतात मुघल कला शैलीचा विकास केला. इसवी सन १५४०-४२ मध्ये शेरशहाकडून हुमायून पराभूत झाला तेव्हा भारतातून पळून जाताना त्याच्याबरोबर काही राज दरबारी व वैयक्तिक सेवक होते. त्यापैकी एक चित्रकार असल्याची माहिती हुमायूनचा सेवक तथा इतिहासकार अफताबजी जौहरच्या लिखाणातून मिळते. परंतु त्यात चित्रकाराची कलाकृती विषयी माहिती मिळत नाही. शेरशहाकडून पराभूत झालेला हुमायून भारत सोडून अफगाणिस्तान आणि इराणला गेला आणि तेथे मुघल चित्रकलेचा पाया घातला गेला. इराण  राजा शाह ताहमस्प याच्या दरबारात आश्रयास

असताना इराण चित्रकला पाहून हुमायूनला चित्रकलेची प्रेरणा मिळाली. इराण दरबारातील महान कलाकार मीर सय्यद अली आणि ख्वाजा अबदुस्समद हुमायूनच्या आश्रयाला आले. इसवी सन १५५० मध्ये बनवलेले 'तैमुर घराण्याचा राजकुमार' शीर्षक असणारे चित्र हे त्याच्या काळातील सुंदर चित्र आहे.

शेरशहाच्या मृत्यूनंतर इसवी सन १५५५-५६ मध्ये हुमायूनने पुन्हा भारतात आपले राज्य स्थापन केले. तेव्हा मीर सय्यद अली आणि ख्वाजा अब्दुस्समद हे दोन्ही कलाकार हुमायून बरोबर दिल्लीत आले. अबदुस्समदची कलाकृती जहांगीरच्या गुलशन चित्रावली मध्ये संकलित असून सध्या ती तेहरानच्या गुलिस्ता महल येथे सुरक्षित आहे. हुमायूनच्या काबुल येथील चित्रशाळेमध्ये कोण कोणती कलाकृती तयार झाली, याचा उल्लेख कोणत्याही समकालीन साधनांमध्ये मिळत नाही. परंतु त्यातून अजून एक चित्रकार मुहम्मद याचे नाव आढळते.

### १०.३.२ अकबर:

अकबर हा कलेचा भोक्ता होता. त्याच्या काळात चित्रकला उच्च शिखरावर पोहोचली होती. अकबराच्या आरंभीच्या काळातील चित्रकलेमध्ये इराणी शैलीचा प्रभाव दिसून येतो. परंतु उत्तरोत्तर त्यात बदल होऊन इराणी तसेच भारतीय आणि काही ठिकाणी युरोपीय शैलींचाही प्रभाव पडलेला दिसून येतो. त्यामुळे मुघल चित्रकलेची एक वेगळीच शैली निर्माण झाली. चित्रांमध्ये दैनंदिन जीवनातील क्रिया, मुख्य चित्र सोडून त्याच्या पृष्ठभागात विविध उपदृश्य काढणे, त्याचबरोबर चित्रांमध्ये पाने, फुले, झाड, वेली यांचा वापर करणे असे विविध प्रयोग करण्यात आले. अकबराच्या काळात विशेषतः चित्रकलेमध्ये दोन विषय दिसून येतात ते असे - दरबारातील दैनदिन घटनांचे चित्रण, प्रतिमा चित्र. अकबराने चित्रकारांना आपल्या दरबारात राजाश्रय दिला. यामध्ये त्याने कोणताही धर्मभेद आणला नाही. त्याचा स्त्रोत आपल्याला इतिहासकार अबुल फजलच्या 'आईन- ए- अकबरी' ग्रंथामध्ये मिळतो. यामध्ये त्याने अकबरच्या दरबारात असलेल्या चित्रकारांच्या नावांची यादी दिली आहे. त्यापैकी बहुतेक चित्रकार हे हिंदू होते. हिंदूमध्येही उच्च - नीच्च जात न पाहता सर्वांचा समावेश केला होता. याचे उत्तम उदाहरण म्हणजे दसवंत हा कहार या त्या काळातील कनिष्ठ जातीतील होता. परंतु त्याच्यातील कलेला अकबराने प्रशिक्षण देऊन अधिक प्रोत्साहन दिले. अबूल फजलने दिलेल्या चित्रकारांची नावे पूढील प्रमाणे – दसवंत, बसावन, केशव, लाल, मुकंद, मिशकिन, फारूख कलमक, खेमकरण, तारा इ. हे चित्रकार ग्वालियर, गुजरात, लाहोर, काश्मीर, माळवा, राजस्थान अशा विविध भागातून आलेले होते. अकबर आपल्या कलाकारांची व त्यांच्या कलाकृतीची विशेष काळजी घेत होता. चित्रकलेसाठी वेगळे असे 'तसबीर खाना' म्हणून दालन तयार केले होते. चित्रकारांचे मासिक वेतन व प्रोत्साहन मिळण्यासाठी विशेष बक्षिसे नियमित देत असे. याचा प्रत्यय आपल्याला अबुल फजल च्या पुढील वाक्यात येतो -

"एखाद्याचे हुबेहूब चित्र काढणे यालाच तसबीर असे म्हणतात. अगदी तारुण्यावस्थेपासूनच बादशहाला या कलेची विशेष आवड असल्याचे दिसून येते. अभ्यास आणि करमणुकीचे एक माध्यम म्हणून बादशहाने या विषयाकडे पाहिले व त्याला सर्वतोपरी प्रोत्साहन दिले, म्हणूनच ही कला भरभराटीला आली आणि अनेक चित्रकारांनी महान कीर्ती प्राप्त केली. सर्व

चित्रकारांची चित्रे दर आठवड्याला दरोगा व लेखनिक मंडळी बादशहा समोर सादर करतात, मग प्रत्येकाच्या कलाकुसरीतील दर्जा नुसार तो त्यांना बक्षिसे देतो किंवा त्यांची मासिक बिदागी वाढवितो. चित्रकलेच्या आवश्यक असलेल्या साहित्यात खूप प्रगती झाली होती. या साहित्यच्या खर्चाचा हिशोब लक्षपूर्व आखला जायचा. रंग मिश्रणाच्या पद्धतीत विशेष प्रगती झाली. अशाप्रकारे चित्र निर्मितीमध्ये अभूतपूर्व विकास झाला. याकाळात मोठे चित्रकार होऊन गेले आणि त्यांच्या उत्कृष्ट चित्रांना युरोपच्या विश्वविख्यात चित्रकारांच्या चित्रांसमोर मांडू शकतो. चित्रातील सूक्ष्मपणा, सुंदर निर्मिती आणि उन्मुक्त सादरीकरण यामुळे याकाळातील चित्रकला अतुलनीय झाली होती, चित्रकारांनी मुर्त वस्तूंमध्येही जीव टाकला होता. या युगात हजारो चित्रकार चित्रकलेचे महारथी होते, चांगल्या आणि उत्कृष्ट कलाकारांची संख्या वाढली होती. ही गोष्ट विशेषतः हिंदूंच्या दृष्टीने बरोबर आहे; कारण त्यांचे चित्र कल्पनेच्याही पलीकडे अद्वितीय नमुने होते. संपूर्ण जगात त्यांच्यासारखे कलाकार खूप कमी भेटतात.”

मुघल चित्रकलेतील सर्वात महत्त्वाची पहिली कलाकृती म्हणजे ‘दास्ताने अमीर हम्जा’ जे हम्जानामा म्हणून प्रसिद्ध आहे. यामध्ये हस्तलिखिते आणि साधारणतः १२०० ते १४०० चित्रकृती आहेत. त्यातील सर्व चित्रे ही लिनन कापडावर चित्रित केली आहेत. यामध्ये अमीर हम्जा या चरित्र नायकाचे अरबी चरित्र नामा याच्या फारसी अनुवादावर आधारित चित्रकथा तयार केली गेली. या चित्रकथेमध्ये साधारणतः १२०० ते १५०० चित्रे होती. या कलाकृतीचा काळ ठरविणे कठीण आहे कारण त्यातील बरीचशी चित्रे गहाळ झाली आहेत आणि जी चित्रे उपलब्ध आहेत त्यावर त्या चित्रकाराचे नाव नाही. या कलाकृतीचा उल्लेख अब्दुल फजल, बदायुनी, शाहनवाज खाँ या सर्वांनी केला. परंतु त्यातून चित्रकार आणि निर्मिती काळ यामध्ये विसंगती दिसून येते. बदायुनी आणि शाहनवाज खाँ याच्यानुसार याची सुरुवात अकबराच्या काळात झाली. तर लेखक मुल्लाउद्दौला काजवीनी याने नफाइसुल - मासिर या पुस्तकात हम्जानामा ही हुमायूनच्या डोक्यातून आलेली कल्पना होती. परंतु हे मत इतिहासकार अमान्य करतात कारण जी चित्रशैली निर्माण झाली आहे ती हुमायूनच्या अस्थिरतेच्या काळात भारताबाहेर निर्माण होणे अशक्य आहे त्यामुळे या कलाकृतीचा काळ साधारणतः १५७५ - १५८० च्या मध्ये असू शकतो. अकबराने आईन-ए-अकबरी, रझ्मनामा, रामायण, कालिया दमण, चंगेझनामा आणि अयार दानिश अशा विख्यात ग्रंथांचे चित्रकथा करण्यास प्रोत्साहन दिले. परंतु बरेचसे चित्र ग्रंथ काल ओघात नष्ट झाले. तर काही इतरत्र वस्तू संग्रहालयात संग्रहित करून ठेवण्यात आले. या चित्रांमध्ये भारतीय इराणी फारसी युरोपीय कलांचे मिश्रण दिसून येते. अशा ऐतिहासिक घटनांचे चित्रण करताना चित्रकार स्वतः च्या कल्पना शक्तीचा वापर करत असे. अकबराला स्वतःचे चित्र काढून घेण्यास आवडत होते यासाठी अकबर स्वतः चित्रकारांसमोर बसत असे अबुल फजल सांगतो.

एका चित्रावर एकापेक्षा अधिक चित्रकारांनी काम केलेले दिसून येते. कारण अकबरनाम्याचे एक चित्र चार चित्रकारांनी मिळून बनविले असल्याचा पुरावा मिळतो. काही चित्रांवर दोन किंवा तीन चित्रकारांची नावे आढळून आलेली आहेत. त्यापैकी एक चित्रकार चित्राची रूपरेखा काढत असे दुसरा चित्रकार चेहऱ्याला रंग देण्याचे काम करत असे तर तिसरा चित्रकार उर्वरित चित्राला रंग देत असे अशी कामाची विभागणी केली जात असे यावरून असे दिसून येते कि चित्राच्या आरेखनासाठी व रंगसंगतीसाठी वेगवेगळे कलाकार काम

करत असे. जहांगिरचा विद्रोह त्याचबरोबर मुराद आणि दानियालचा आकस्मित मृत्यू, त्यामुळे चित्रशाळेतील चित्रांची गुणवत्ता कमी झाली. या काळातील उल्लेखनीय चित्रांमध्ये बाबरनामा ची चित्रकथा, अकबरनामाची चित्रकथा इ. चा उल्लेख येतो.

### १०.३.३ जहांगिर:

जहांगिर व शहाजहांच्या काळात चित्रकला परम्मोच्च शिखरावर पोहचली होती. जहांगिर स्वतः एक उकृष्ट चित्रकार होता. याच्या काळात मुघल चित्रकला शैली मध्ये झपाट्याने बदल होत गेले. जहांगिरने आका रिजा नावाच्या चित्रकाराच्या नेतृत्वाखाली आग्रा येथे एक नवीन चित्रशाळा सुरू केली. स्वतःच्या चित्रकला कौशल्याची स्तुती करताना पुढील वाक्य म्हणतो - "माझ्या स्वतःबद्दल बोलायचे तर बोलायचे तर माझी चित्रकलेची आवड आणि चित्रांचा दर्जा ओळखण्याची माझी पात्रता एका परिपूर्ण अवस्थेला पोहोचली आहे; इतकी की दिवंगत किंवा आजमितीस हयात असलेल्या चित्रकाराची कलाकृती त्याने नाव न सांगता माझ्यासमोर आणली तरीदेखील एका क्षणात मी ती कोणाची निर्मिती आहे, हे सांगू शकतो आणि एखाद्या चित्रात अनेक चेहरे असतील व त्यातील प्रत्येक चेहरा वेगवेगळ्या चित्रकाराने काढला असेल तरीही कोणता चेहरा कोणत्या चित्रकाराने काढला आहे, ते मी ओळखू शकतो. एखाद्या चेहऱ्यात भुवया नव्याने रंगविली तरी मूळ चेहरा कोणी काढला व डोळे आणि भुवया कोणी रंगवल्या तेही मी शोधू शकतो".

युद्ध दृश्य, पक्षी - फुल अशा चित्राची आवड होती. अकबरच्या काळात असलेली प्रतिमा चित्र काढण्याची पद्धत जहांगीरणे पुढे चालू ठेवली त्याने दरबारातील उच्चपदाधिकारी तसेच विविध कला क्षेत्रातील कलाकारांचे प्रतिमा चित्र बनवून घेतले. एवढेच नाही तर त्याच्या काळातील महान चित्रकार बिशनदास याला पर्शियाचा शाहा तसेच त्याचे अमीर यांचे प्रतिमा चित्र बनवून आणण्यासाठी पर्शियाला पाठवले. सुरुवातीच्या काळात मनोहर नन्हा आणि फारुख बेग यांच्याकडे प्रतिमा चित्राचे काम सोपविले होते परंतु नंतरच्या काळात मनोहर दौलत अबुल हसन आणि भीषण दास यांनी एकटे आणि सामूहिक प्रतिमा चित्रे काढण्याचे काम केले. त्याच्या दरबारात अबूल हसन, सालीवाहन, उस्ताद मंसूर, फारूख बेग, मनोहर, बिशनदास, गोवर्धन, दौलत उस्ताद मुराद, मुहम्मद नादीर इ. चित्रकार होते.

जहांगीर ने आपल्या दरबारातील महत्त्वाच्या घटना, सभा आणि सण या महत्त्वपूर्ण घटनांचे चित्रात्मक वर्णन करण्याचे आदेश आपल्या चित्रकारांना दिले. ज्यामध्ये 'होळी', 'आबपाशी' यांसारख्या सणांचा तसेच जन्मदिवसाच्या दिवशी झालेले तुलादान आणि दरबारातील सभा यांचे उल्हास पूर्ण चित्र वर्णन बनवले गेले. जहांगीर ने आपल्या दरबारातील चित्रकारांचे त्याच्या शब्दात पुढील प्रमाणे वर्णन केले - "आज 'नादिर-उझ्-झमान' असा किताब असणाऱ्या अबुल हसन या चित्रकाराने माझ्या दरबाराचा देखावा काढून मला सादर केला. जहांगीरनामा या ग्रंथास त्याने ते मुखपृष्ठ म्हणून जोडले होते ते वाखाणण्याजोगे असल्याने मी त्याच्यावर इनामांची खैरात केली. तो उत्कृष्ट चित्रकार होता; आणि त्याच्या काळात त्याच्याशी बरोबरी करणारे जर हयात असते तर त्यांनी त्याच्या चित्रकलेतील उत्कृष्ट अभिरुचीला पूर्ण न्याय दिला असता. मी राजपुत्र असताना त्याचे वडील अकाखान सदैव माझ्याबरोबर असत. त्यांचा मुलगा माझ्याच घरात जन्मला. हा मुलगा बापापेक्षा सवाई

होता. मी त्याला चांगले शिक्षण दिले आणि तारुण्यापासून आजच्या काळातील एक ख्यातनाम व्यक्ती बनेपर्यंत त्याचा मानसिक विकास घडविला. त्याने काढलेली प्रतिमा चित्रे फार सुंदर होती. मन्सूर हा आणखी एक उत्कृष्ट चित्रकार आहे. त्याला 'नादिरुल असली' असा किताब आहे. माझ्या वडिलांच्या आणि माझ्या ही काळात या दोघांची बरोबरी करू शकणारे दुसरे कलाकार नाहीत". जहांगीर हा प्रतिमाचित्रांबरोबर निसर्गप्रेमी होता हुबेहूपपणा आणि नैसर्गिक देखाव्यांची चित्रे काढण्यात त्याचा विशेष हातखंड होता.

जहांगीर प्रमाणेच नूरजहान ला ही चित्रकलेची आवड होती. खरे म्हणजे जहांगीरला चित्रकलेकडे आकर्षित करण्याचे श्रेय नूरजहालाच दिले जाते. तिने मुघल प्रशासन संभाळल्यामुळेच जहांगीरला चित्रकलेकडे लक्ष देणे शक्य झाले. जहांगीरच्या काळातील चित्रकलेच्या प्रगतीबद्दल डॉक्टर रामनाथ म्हणतात, जहांगीरच्या संरक्षणात मुघल चित्रकला इराणी बंधनातून मुक्त झाली आणि नव्या नव्या क्षेत्रात तिचे मार्ग खुले झाले. जहांगीरच्या काळात चित्रकारात एक नवी जागृती निर्माण झाली व जहांगीर काळात मुगल चित्रकला परमोच्य शिखरावर पोहोचली. जहांगीचा मृत्यूनंतर मुघल चित्रकलेच्या पतनाची सुरुवात झाली. श्री राय कृष्णदास हे जहांगीरच्या काळातील चित्रकलेबद्दल म्हणतात, 'जहांगीर काळात चित्रकलेबाबत मुघल शैलीने एक नवा रस्ता तयार केला तिच्यात रुढीप्रियता न राहता अस्सलपणा आला.'

### १०.३.४ शाहजहान:

सुरुवातीचे काही वर्ष शाहजहाने चित्रकारांना स्वतंत्र दिले होते. ती जहांगीरच्या काळात चित्रकलेचे ज्या पद्धतीने काम चालू होते त्याच पद्धतीने काम चालू ठेवण्यात आले. पुढे त्यामध्ये काही परिवर्तन आले. शाहजहानच्या चित्र शाळेत ची चित्रे तयार होत होती त्यामध्ये खूप अलंकृतता व विविध रंगांचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जात होता. ज्यामुळे त्या चित्रातील खरेपणा कमी झाला. शाहजहानची खरी आवड स्थापत्य कलेत होती. वास्तुकला निर्मितीसाठी त्याने विविध आणि सुंदर शैलीचा वापर केला. पर्सी ब्राऊन याच्या मतानुसार, शहाजहान गादीवर आल्याबरोबर चित्रकलेच्या पतन कालखंडास सुरुवात झाली, त्याच्या दरबारातील चित्रकार कमी झाले, काही प्रांतिक शाशकाच्या आधारानेच चित्रकला टिकून होती. काही चित्रकारांनी उपजीविकेसाठी चित्रे काढून विकणे सुरू केले, शहाजहानने दरबारी चित्रकारांना महाल व राजसभांना रंगकाम करण्यास सांगितले. त्यांनी दरबारी चित्रात गहिऱ्या रंगाचा प्रयोग केलेला आहे. त्याच्या काळात दरबारात फकीर उल्ला, मीर हसीन, अनुप चित्रमणी इत्यादी चित्रकार होते. या काळात काही व्यक्ती चित्रे ही काढली आहेत.

औरंगजेबाच्या काळात चित्रकलेला उतरती कळा लागली. औरंगजेब हा कट्टर धर्मपालक होता. चित्र काढणे धर्माविरुद्ध काम आहे म्हणून त्याने चित्रकलेला विरोध केला. चित्रकलेला राजाश्रय राहिला नाही. चित्रशाळा बंद पडल्या. परंतु भारताच्या इतर भागात तसेच राजपूतांमध्ये चित्रकला जपण्यात आली.

### १०.३.५ मुघल चित्रकलेवर युरोप शैलीचा प्रभाव:

विशेषतः १७ व्या शतकापासून मुगल चित्रकलेवर युरोप शैलीचा प्रभाव दिसून येतो. जेव्हा मुघलांचा युरोपियननांशी संबंध आला तेव्हा मुघल चित्रकारांनी युरोपच्या चित्रांचा तसेच वापरला जाणाऱ्या पद्धतीचा बारकाईने अभ्यास केला. त्याचबरोबर युरोपियन चित्रातील प्रकाश आणि सावलीच्या छटा मुघल चित्रकारांनी आपल्या चित्रात केला. मुगल चित्रकार युरोपीयन चित्रांची हुबेहूब नक्कल करण्याचा प्रयत्न करत असे. याचे उत्तम उदाहरण जहांगीरच्या दरबारात आलेला सर थॉमस रो आणि जहांगीर यांच्यातील एक प्रसंग जो स्वतः सर थॉमस रो ने सांगितला तो पुढील प्रमाणे - सर थॉमस रो याने इसवी सन १६१५ मध्ये इंग्लंडच्या राजाचा प्रतिनिधी म्हणून जहांगीरच्या दरबाराला भेट दिली. त्याने जहांगिरला देण्यासाठी आणलेल्या भेटवस्तूत एक सुंदर चित्रही होते आणि ते बादशहा जहांगीरसाठी लंडनहून मागवले होते. थॉमस रोने जहांगिरला ते चित्र देताच आनंद झाला परंतु दोन दिवसानंतर जहांगीरने थॉमस रोला आपल्या खाजगी खोलीत रात्रीच्या वेळी बोलावून घेतले आणि त्या खोलीत एका मेजवर मेणबत्तीच्या मंद प्रकाशात एक सारखी दिसणारी सहा चित्रे त्याच्यासमोर ठेवली व त्यातून लंडनहून आणलेले चित्र कोणते ते ओळखण्यास थॉमस रोला सांगण्यात आले. जहांगीरच्या दरबारातील कुशल चित्रकारांनी केलेल्या मूळ चित्रांच्या नकलांपासून मूळ चित्र ताबडतोब वेगळे करणे त्याला शक्य झाले नाही.

### १०.३.६ पहाडी शैली:

ही शैली रजपूत शैलीचा एक भाग मानले जाते. काश्मीर, पंजाब व हिमालयाच्या डोंगराळ भागात सुमारे सतराव्या शतकाच्या अखेरीस या शैलीचा उदय झाला. शेवटचा मुघल राजा औरंगजेब याने कलेस योग्य प्रोत्साहन दिले नाही. त्यामुळे चित्रकारांना मुघल दरबार सोडून दुसरीकडे जावे लागले आणि त्याच सुमारास काश्मीर व पंजाब येथील राजांकडून ह्या चित्रकारांनी राजाश्रय घेतला. तिथे राहूनच त्यांनी आपलेच चित्रकला जोपासली. त्यांच्या कलेवर तेथे स्थानिक लोक जीवनाचा परिणाम झाला. राजस्थानातून आलेले चित्रकार व मुगल दरबारातील चित्रकार यांनी मिळून ही एक नवी शैली निर्माण केली ती 'पहाडी शैली' या नावाने ओळखली जाते.

### १०.३.७ दक्षिणेकडील शैली:

औरंगजेबाच्या दरबारातून राजाश्रय शोधण्यासाठी काही चित्रकार दक्षिणेकडील विजापूर गोवळकोंडा हैदराबाद इत्यादी ठिकाणी स्थिरावले. तेथील स्थानिक वैशिष्ट्यांचा उपयोग करून त्यांनी एक स्वतंत्र शैली निर्माण केली, तीच दक्षिण शैली म्हणून ओळखली जाते. सुरुवातीच्या काळात इराण व स्थानिक कला शैलीचे मिश्रण या शैलीमध्ये दिसून येते. पण नंतर मात्र उंच मनुष्यकृती सरळ व जोरदार रेखांकन ही स्वतःची खास वैशिष्ट्य त्यांनी तयार केली. परंतु मुघल दरबारातील दिमाग व थाटमाट या शैलीत दिसून येत नाही.

**आपली प्रगती तपासा:**

१) अकबरकालीन कलेच्या विकासाचा मागोवा द्या.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

२) पहाडी शैली व दक्षिणेकडील कलेची शैली स्पष्ट करा.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

## १०.४ संगीत कला

भारतामध्ये मुस्लिम शासक सुलतानशाहीच्या काळापासून संगीताला महत्वाचे स्थान होते. त्यापैकी फिरोजशहा सारख्या करमत शासकानेही संगीत कलेला राजाश्रय दिला होता. १५ - १६ व्या शतकामध्ये भारताचे प्रादेशिक राज्यकर्त्यांनी संगीताला राजाश्रय दिला होता. त्यामध्ये उदाहरण द्यायचे झाल्यास ग्वाल्हेर चा राजा मानसिंग हा स्वतःच एक संगीत तज्ञ व संगीत तज्ञाचा आश्रयदाता होता. त्याने अनेक राग रचना केल्या मान कौतुहन या त्याच्या कृतीमध्ये या रचनांचे संकलन केले आहे. त्याचबरोबर मंदिरांमध्ये व सुफी संमेलनामध्येही संगीताला आश्रय मिळाला वृंदावनचे स्वामी हरिदास संगीत संगीताचे महान पंडित होते स्वतः अकबर वेश बदलून त्यांचे संगीत ऐकवयास जात असे म्हटले जाते. अनेक संतांनी देखील भजनांच्या रूपात संगीत कलेला जोपासले. पुढे मुगल शासन काळात संगीत कलेला भरभरून राजाश्रय मिळाला कारण स्वतः मुघल बादशहा हे संगीत प्रेमी होते.

### १०.४.१ बाबर:

बाबरचा भारतातील कार्यकाळ चार वर्ष असला तरी त्याने संगीतकलेला प्रोत्साहन दिले. तो स्वतः संगीत प्रेमी असल्यामुळे संगीत मैफिलींसाठी तो वेळ काढत असे त्याचबरोबर यात्रेमध्येही संगीत मैफिलीचे आयोजन करून संगीताचा आनंद लुटत असे. लेनपूल याच्या मते, बाबर चांगला गायकही होता. त्याने अनेक गीते रचलेली आहेत. हुमायून ला आपला पिता बाबर याच्याकडूनच संगीताचा वारसा मिळाला होता तो दर सोमवारी आणि बुधवारी संगीत ऐकत असे. हुमायूंच्या गायक आणि वादकांच्या नावांच्या यादीत २९ गायक आणि वादकांचे नावे मिळतात. इसवी सन १५५३ मध्ये हुमायूनने मांडू येथील प्रख्यात गायक 'बैजू बावरा' यास आपल्याबरोबर आणले.

### १०.४.२ अकबर:

अकबर स्वतः संगीत प्रेमी होता त्याच्या काळात संगीत कला पर्वोच्च शिखरावर पोचली होती. तो बालपणापासूनच संगीताचा भोक्ता होता. अकबरच्या संगीत प्रेमाविषयी स्वतः

अबुल फजल असे म्हणतो की - "शहेनशहांना संगीत शास्त्राचे इतके ज्ञान आहे की प्रशिक्षित संगीत तज्ञांनाही तेवढे ज्ञान नाही. नक्कारा वाजविण्यामध्ये ते सिद्धहस्त आहेत".

अकबराच्या दरबारातील नवरत्नांपैकी तानसेन हा अकबराच्या दरबारातील प्रमुख गायक होता. संगीतावरील प्रेमामुळे अकबर आणि तानसेनला रामचंद्रकडून आणले. अकबर आणि तानसेनला 'कंठाभरणवाणी विलास' ही उपाधी दिली. डॉ. ए. एल. श्रीवास्तव म्हणतात, "अकबराच्या कारकिर्दीत हिंदू व मुस्लिम संगीताचा समन्वय झाला होता. " तानसेनने हिंदी भाषेमध्ये अनेक गीते नवीन राग यांची निर्मिती केली. ग्वाल्हेरमध्ये असताना त्याने ध्रुपद गायकी आत्मसात केली. तानसेन व्यतिरिक्त बैज, बख्श, गोपाल, हरिदास, सूरदास, रामदास इत्यादी ध्रुपद गायक होते. त्याचबरोबर अकबरच्या दरबारात काही प्रमुख कलाकार होते. त्यांची नावे मिळतात ज्यामध्ये रामदास, सुभान  खान, सुरजान खान, मिया चांद, विचित्र खान, वीरमंडल खान, सरोद खान, मियाँ लाल, चांद खान आणि शहाब खान यांचा समावेश होतो. अबुल फजरने अकबराच्या दरबारातील ३६ गायकांच्या नावांचा उल्लेख केला आहे.

### १०.४.३ जहांगीर:

जहांगीरच्या दरबारात संगीतकारांचा मान सन्मान व त्यांना पदव्या देण्याची पद्धत होती. तानसेंचा छोटा मुलगा विलास खान, छतर खान, खुर्रम दाद, परवेज दाद, चतुरखां, मक्खू आणि हमजा हे जहांगीरच्या दरबारातील प्रसिद्ध कलाकार होते. शौकी नावाच्या गझल गायकास जहांगीरने 'आनंद खा' ही उपाधी बहाल केली होती.

शाहजहान हा स्वतः कलारसीक होता. जे. एन. सरकार यांच्या मते, बादशहा स्वतः गायक होता. त्याचे गाणे ऐकून सूफी, फकीर, साधू व संत ही तल्लीन होत असे. शाहजहाच्या दरबारात गायकही होत्या. असे म्हटले जाते की स्वतःच्या दालनात एक दीड तास बसून संगीताचा आनंद घेत असे. त्याच्या दरबारातील संगीतकार लाडका याला 'गुणसमुद्र' ही उपाधी बहाल केली होती. याच्या दरबारात रामनाथ, जगन्नाथ, सूखसैन, लाल खां इ. संगीततज्ञ होते.

औरंगजेबाच्या काळातसंगीत कलेचा ऱ्हास होत गेला. औरंगजेब जरी संगीत विरोधक असला तरी; तो स्वतः उत्कृष्ट वीणा वादक होता व कारकीर्दीच्या पहिल्या दहा वर्षांमध्ये त्यानेही संगीताला राजाश्रय दिला होता. परंतु पुढे धार्मिक कट्टरतेमुळे त्याने संगीत बंदी केली होती. त्यामुळे संगीतकारांनी त्याच्या समोरून संगीताची प्रेतयात्रा काढली होती. औरंगजेबने त्याबद्दल विचारले असता संगीतकार म्हणाले, "संगीत मेल्यामुळे आम्ही त्याचे दफन करण्यास जात आहोत". त्यावर तो कुत्सितपणे म्हणाला कि, "संगीताचे इतके खोल दफन करा कि पुन्हा त्याने डोके वर काढू नये". त्याच्या काळात संगीतावर आधारित असलेल्या अनेक पुस्तकांची निर्मिती झाली. चा नातू जहांदरशाह याच्यासाठी लिहिलेले 'तूहफत- उल- हिंद' हे सर्वात लोकप्रिय पुस्तक होते.

पुढे महंमदशाहच्या कारकीर्ती मध्ये संगीताचा पुन्हा मोठ्या प्रमाणात विकास झाला नियामत खान सदारंग व फिरोजखान अदारंग हे त्याच्या पदरी अत्यंत लोकप्रिय गायक होते त्यांचे

प्रभुत्व ध्रुपद गायकीवर होते महंमदशाह स्वतः ‘रंगीला पिया’ या टोपण नावाने ख्यालांच्या रचना करीत होता. या काळात तबला व सतार ही दोन वाद्ये खूप लोकप्रिय झाली.

**आपली प्रगती तपासा:**

१) मुगलकालीन संगीत कलेच्या विकासाचे विश्लेषण करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १०.५ नृत्यकला

भारतात प्राचीन काळापासून नृत्य कलेचा विकास झालेला दिसून येतो. परंतु मध्ययुगीन काळात इस्लामी आक्रमणानंतर या कलेचे महत्व कमी झाले. मुघल दरबारात नर्तकी असत ज्या बादशहाचे व दरबारी मंडळींचे मनोरंजन करीत असत. काही हिंदू लोक आपल्या मुलींना नृत्यकला शिकवत असे. विशेषतः दक्षिणेत मंदिराच्या आश्रयाने नृत्य आणि संगीत कलेचा विकास झाला.

## १०.६ स्थापत्य कला

इस्लामी आक्रमणाच्या पूर्वी भारतामध्ये स्थापत्य कलेचा विकास झाला. परंतु इस्लामी आक्रमण झाल्यावर स्थापत्य कलेला निराळेच वळण मिळाले. त्याचा परमोच्यबिंदू मुघलांच्या काळात गाठला गेला. भव्य किल्ले, भव्य प्रसाद, महाद्वारे, मशिदी, कबर, सराया, उद्याने इत्यादी त्यांच्या स्थापत्य कलेचे नमुने दिसून येतात. या काळात भारतीय तसेच इराणी शैलीचे मिश्रण होऊन वास्तूकलेची एक नवीन शैली उदयास आली. हॅवेलच्या मते, ‘मुघल कला ही विदेशी व देशी शैलीचे मिश्रण होते’, तर जॉन मार्शल म्हणतात, ‘मुघल शैलीवर कोणत्या तत्वांचा प्रभाव अधिक होता हे निश्चित करणे अवघड आहे’. डॉ. ईश्वरी प्रसाद यांच्या मते, ‘कारागिरांनी विदेशी कलांना अधिक संशोधित करून त्या भारतीय कलाबरोबर मिळून नवीन शैलीच्या रूपाने प्रकट झाल्या. या पारशी, अरबी त्याचप्रमाणे मध्य आशियाई शैलीचेही मिश्रण झालेले होते’. या वास्तुशैलीबद्दल वेगवेगळी मते दिली आहेत. विशाल गोलाकार घुमट, छत्र्यांसारखे लहान घुमट, उंच मिनार, मेहराब, बागा, कृत्रिम सरोवरे, जाळीदार नक्षी, रंगीत दगड, चौरस छत, संगमरवरी दगडांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग व रंगीत दगडांचे जडाऊ कामा इ. गोष्टी मुघल शैलीची प्रमुख वैशिष्ट्ये मानली जातात.

**मुघल काळात बांधल्या गेलेल्या इमारतींचे साधारणतः तीन गट पाडले जातात -**

१. तांबड्या रंगाच्या दगडात बांधलेल्या इमारती.

२. काही ठिकाणी तांबडा दगड व काही ठिकाणी पांढरा संगमरवरी दगड अशा समिश्र बांधणी ने तयार झालेल्या इमारती.

३. स्वच्छ पांढऱ्या संगमरवरी दगडात बांधलेल्या इमारती.

**१०.६.१ मशिदीची सर्वसाधारण रचना:**

भारतातील मशिदींची सर्वसाधारण रचना ही मक्केतील मूळ मशिदीप्रमाणे आहे. परंतु काही मशिदींमध्ये वास्तु विषयक नव्या संकल्पना ही दिसतात. पण साधारणतः मशिदीची रचनाही मोठे आयताकृती प्रांगण, मधोमध एक कारंजे, प्रांगणाच्या स्वभावात स्तंभयुक्त ओवऱ्या व अनेक प्रवेशद्वार अशी असते. मुसलमान लोक पश्चिमेकडे तोंड करून प्रार्थना करतात म्हणून प्रांगणाच्या पश्चिमेस प्रार्थनेसाठी घुमट असलेले एक भव्य दालन असते. त्याच्या पूर्व बाजूस एक जाळीदार कमान असते. या दालनाच्या मागील भिंतीत एक कोणाडा असतो त्याला 'मिहराब' असे म्हणतात. त्याच्याकडे तोंड करून प्रार्थना केली जाते. मिहराबच्या उजवीकडे इमारतीचे आसन म्हणजेच निंबर असते. मशिदीत प्रार्थनेसाठी मोठा जनसमुदाय सामावेल अशी सोय असते. त्यात स्त्रियांसाठी एक भाग जाळीदार पडद्यांनी वेगळा केलेला असतो. मशिदीच्या बाजूला किंवा आत मध्ये एक उंच मिनार असतो. त्यावरून लोकांना प्रार्थनेला बोलवण्यासाठी बांग दिली जाते. ती बांग देणाऱ्याला 'गुआजिन' असे म्हणतात.

**१०.६.२ बाबर:**

मुघल घराण्याचा संस्थापक बाबर याची भारतातली कामगिरी अत्यंत धामधूमिची होती. इसवी सन १५२६ मध्ये बाबरने जेव्हा पंजाब जिंकले त्यावेळी अंशतः भग्नावस्थेत असलेले निर्मनुष्य लाहोर शहर पाहून तो दुःखी झाला होता; सुलतानशाही काळातील मुख्य असलेले दिल्ली शहरही त्याला आवडले नव्हते. दिल्लीतील तुर्की – अफगाणी शैलीतील ऐतिहासिक वास्तूंच्या दर्जाचा त्याला राग येई. असे म्हणतात की, ग्वाल्हेर हे एकमेव स्थळ होते ज्यात बाबरला काहीसा रस वाटला. तेथील राजपूत राजांनी बांधलेला भव्य किल्ला, राजवाडे आणि अन्य सरकारी इमारती पाहून बाबर हरखून गेला. आपल्या आठवणीत सांगताना बाबर असे म्हणतो की, दिल्ली, आग्रा, सिक्री, बयाना, पानिपत, धोलपूर येथे सार्वजनिक इमारती व मशिदी बांधण्याच्या कामात त्याने हजारो गवंडी, दगडकाम करणारे आणि मजूर लावले होते. तो रोज जी रोजनिशी लिहीत होता त्यामध्ये त्याने "आपणास अनेक इमारती बांधायच्या होत्या", असे नमूद करून ठेवले होते. बाबरने बांधलेल्या इमारतीत दोन मशीदींचा समावेश केला जातो. त्यामध्ये एक हरियाणामध्ये पानिपत येथील 'काबुली बाग' नावाची व दुसरी दिल्लीच्या पूर्व भागात संबळ या ठिकाणी असलेली 'जामी मशिद'. या दोन्ही भारतीय पद्धतीच्या आहेत. इराणमधील इमारतीप्रमाणे भारतात देखील इमारती बांधल्या जाव्यात अशी बाबरची फार इच्छा होती पण ते घडू शकले नाही.

**१०.६.३ हुमायून:**

हुमायूनने इसवी सनमध्ये १५३३ मध्ये दिल्लीमध्ये एक नवीन नगराची स्थापना केली, ज्याचं नाव 'दिनपन्हा' होत. 'दिनपन्हा' शब्दाचा अर्थ विद्वान व बुद्धिमान लोकांचे आश्रयस्थान असा होतो. त्यानंतर भारतावर अफगाणीचा शेरशहा याचे राज्य आले.

बाबर व हुमायून या दोन सम्राटांच्या स्थापत्याची महती टिकात्मकरित्या पर्सी ब्राऊन याने पुढील शब्दात सांगितले आहे, "The material records which have survived of

both Babur's and Humayun's contributions to the building art of the country are therefore almost negligible".

### हुमायूनची कबर:

मुघलांच्या कारकिर्दीत बांधलेली पहिली व महत्त्वाची कबर म्हणजे हुमायूनच्या पत्नीने बांधलेली 'हुमायूनची कबर' होय. त्याच्या मृत्यूनंतर ८ वर्षांनी म्हणजेच इसवी सन १५६४ मध्ये ती बांधण्यास सुरुवात केली. ही इमारत इराण पद्धतीची असून तांबडा दगड व संगमरवरी पांढरा दगड या दोन्ही रंगाच्या दगडात बांधलेले आहेत. आतील दालनांची व त्यामधून जाणाऱ्या मार्गाची रचना उत्तम प्रकारे साधली आहे. अशी रचना अन्यत्र कोठे पहावयास मिळत नाही. या कबरीच्या दर्शनी भागात मध्यभागी कमान, तिची प्रमाणबद्धता व इतर दर्शनी भागांशी तिचा असलेला संबंध भारतीय कामगारांनी अत्यंत कौशल्य पूर्णरीतीने दाखवला आहे. इराण व भारत या दोन्हीकडेच्या स्थापत्याचा इतका कौशल्यपूर्ण संगम आशियात प्रथम पाहायला मिळतो. कबरीवरील घुमट विशिष्ट प्रकारे घडवलेला आहे. यापूर्वीच्या काळात बांधलेले घुमट एकाच थराचे होते. मात्र येथे आतून व बाहेरून असे दोन थर दिसतात. त्यामुळे तो घुमट आतून पोकळ व हलका झाला आहे. अशा प्रकारच्या सुरुवात या स्थापत्य पासून झालेली आढळते. या मकबऱ्याची तुलना तैमुरलंगची पत्नी बीबी खानमच्या मकबऱ्याशी केली जाते.

### १०.६.४ शेरशहा:

शेरशहाने बांधलेल्या उल्लेखनीय बांधकामांमध्ये सासराम व दिल्लीत मध्ये बांधलेल्या बांधकामाचा उल्लेख करावा लागतो. सासराम येथील मकबरे हे दिल्लीतील लोदींनी बांधलेल्या अष्टकोनी मकबरांच्या धर्तीवर आहेत. त्यापैकी शेरशहाचा मकबरा सर्वात उल्लेखनीय आहे आणि तो एका तळ्याच्या मध्यभागी बांधलेला होता. पर्सी ब्राऊन याची स्तुती करताना म्हणतात, "पाण्यात पडलेले त्याचे प्रतिबिंब तो हलता असल्याचा आणि त्याचा आकार दुप्पट असल्याचा आभास निर्माण करते". हे भव्य बांधकाम अष्टकोनी असून एका प्रचंड चौरस चौथाऱ्यावर बांधल्यामुळे ते आणखी उंच व अत्यंत मजबूत असल्यासारखे दिसते. सर्व कोपऱ्यांमध्ये बांधलेल्या सुंदर छत्रांच्या साह्याने हा चौथारा मुख्य इमारतीला जोडला गेला आहे. इमारतींच्या चारी बाजूंना अनेक कमानी असलेल्या व्हरांड्यामुळे आणि क्रमाक्रमाने उंच होत जाणाऱ्या विशाल काय घुमटामुळे ही सर्व इमारतच उत्तुंग असल्याचा भास होतो. घुमटाच्या ग्रीवेला झाकणारी एक भिंत असून या भिंतीवरही सुंदर छत्रे आहेत. या प्रचंड घुमटांच्या पृष्ठभागावर कमळाची आकृती कोरलेली आहे. शेरशहाच्या या मकबऱ्यामधील अनेक वैशिष्ट्यात काही बदल करून ताजमहालातही वापरण्यात आली आहेत असे मानले जाते.

### पुराना किल्ला:

पुराना किल्ला म्हणजे जुना किल्ला हा अत्यंत विशाल आहे. त्याच्या भिंती करड्या रंगाच्या दगडाच्या असून त्याचे प्रचंड प्रवेशद्वार लाल वालुकामय दगडांचे आहे आणि त्यामध्ये पांढरा संगमरवर जडलेला असून, मधून निळे गुळगुळीत चमकदार दगडाचे तुकडेही चढवलेले आहेत. किल्ल्या बाहेर असलेली उत्कृष्ट व प्रचंड दरवाजा असलेली मशीद-सह-

मदरसाची इमारत इसवी सन १५६१ मध्ये माहमआनागा हिने बांधली. तिचे नाव 'खैर-उल-मजलीस' असे आहे. किल्ल्याच्या आत अजून एक इमारत आहे. ही एक शाही मशिद असून तिचे नाव 'किला-ए-कुहना' असे आहे. या मशिदीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे पाच अत्यंत प्रमाणबद्ध अशा कमानदार प्रवेशद्वारांनी युक्त असा तिचा मोहक दर्शनी भाग हे प्रत्येक प्रवेशद्वार एका आयताकृती चौकटीमध्ये बनविले आहे. पाचांपैकी मध्यभागी असलेले प्रवेशद्वार जास्त मोठे आहे. मध्यभागी असलेल्या तीन प्रवेशद्वारांमध्ये सुंदर छोटे गोलाकार झरोके आहेत. ते राजस्थानी स्थापत्य शैलीची आठवण करून देतात. त्याची सजावट अगदी साधी आहे, त्यामध्ये पांढऱ्या संगमरवराचे तुकडे जडवलेले आहेत आणि रंगित, गुळगुळीत, चकचकीत दगडाच्या सुशोभनाकृती बनवलेल्या आहेत. मशिदीच्या मध्यभागी दोन्ही बाजूंना आणि मागच्या भिंतीच्या कोपऱ्यामध्ये बांधलेले नाजूक बुरुज इमारतीला मजबुती देतात आणि लोदींच्या शैलीत बांधलेल्या सपाट सलग छतामुळे निर्माण झालेल्या एकरसतेचा भंग करतात. या इमारतींना लोधी शैलीचा प्रमोच्चबिंदू आणि एका नव्या शैलीचा आरंभ मानता येईल.

### १०.६.५ अकबर:

मुघल स्थापत्याचा खरा प्रारंभ अकबर काळापासून झाला. अकबराने बांधलेली पहिली इमारत म्हणजे आग्रा येथील किल्ल्यासारखा बांधलेला राजवाडा होय. यालाच 'जहांगिर महाल' म्हटले जाते. हा किल्ला यमूना नदीच्या उजव्या किनाऱ्यावर अर्धवर्तुळाकृती आकारात बांधलेला आहे. त्याच्याभोवती लाल दगडात घडवलेल्या चिरेबंदी दगडांची तटबंदी आहे. तटबंदीची उंची सरासरी ७० फूट आहे. या तटबंदीला तोफा डागण्यासाठी जागा आहे व बंदुकीचा वापर करण्यासाठी भोके आहेत. किल्ल्याला दोन दरवाजे असून त्यापैकी दक्षिण दरवाजा लहान आहे व तो खाजगी वापरासाठी ठेवला आहे. तर पश्चिमेकडील दरवाजाच्या दोन्ही बाजूंना दोन मजबूत बुरुज आहेत याला 'दिल्ली दरवाजा' असे म्हणतात.

**जहंगिरी महाल**:

हा महाल अकबरने निर्माण केला असून तो लाल वालुकामय दगडापासून बनलेला उत्कृष्ट नमूना आहे. ही वास्तु हिंदू इस्लामी इमारत पद्धतीतील मिळत्या जुळत्या शैलीचा सुंदर नमूना आहे. यामध्ये विविध दालने आहेत.

**फत्तेपूर सिक्री:**

फत्तेपूर सिक्रीची निर्मिती इसवी सन १५६८ - ६९ मध्ये सुरु केली असून त्याठिकानाचे पूर्वीचे नाव सिक्री होते जे आग्रा शहराच्या पश्चिमेस २६ मैलावर होते. पुढे गुजरातच्या विजयानंतर त्याचे नाव फतेहपूर ठेवण्यात आले. अकबराच्या काळातील सर्वांत महत्वाच्या इमारती त्यांनी स्थापन केलेल्या फत्तेपूर सिक्री या शहरात आहे. हा भाग आजूबाजूच्या भागापेक्षा थोडा उंचावर आहे. या ठिकाणी भव्य राजवाडे, राहण्याच्या इमारती, कचेऱ्यांसाठी व धार्मिक गोष्टींसाठी इमारती बांधलेल्या आहेत. प्रमाणबद्धता, भव्यता, मोठमोठ्या आकारांची कलात्मक गुंफण, दगडी कोरीवकाम आणि नाजूक व अलंकृत नक्षीकाम हि येथील वास्तुकलेची वैशिष्ट्य आहेत. जुम्मा मशीद, बुलंद दरवाजा व त्याच

आवारातील सलीम चिस्तीची कबर या धार्मिक इमारती तसेच जोधाबाईचा महाल, बिरबल महाल, मरियमचे घर, सुलतानाचा महाल या इमारती महत्त्वाच्या आहेत. आधुनिक टीकाकार एस. के. सरस्वती यांच्या मते, "हा निवासस्थानीय इमारतीचा एक उत्कृष्ट नमुना असून, यातील संतुलन योजना अतिशय उल्लेखनीय आहेत. यातील संरचना व सजावटी ही अतिशय सुसंगती पूर्ण आहे".

**बुलंद दरवाजा:**

इसवी सन १५७३ मध्ये गुजरात विजयाच्या स्मृतीप्रित्यर्थ अकबराने बुलंद दरवाजाचे कामकाज सुरू केले. हे महाद्वार 'अर्धघुमटी दरवाजा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शैलीमध्ये केलेले आहे. हा प्रकार इराण मधील असून पूढे मुघल इमारतींचे तो वैशिष्ट्य बनला. या शैलीच्या बांधकामात एका घुमटाला पूर्ण उभा छेद दिला जात असे. कापलेला भाग दरवाजाच्या दर्शनी भागाचे काम करीत असे आणि मागच्या सपाट भागात जिथे घुमट व खालची फरशी एकमेकांना मिळेल तेथे छोटे दरवाजे बनविण्यात येत असत.

**दिवान-ए-खास:**

या इमारतीची योजना आयताकृती आहे. ही इमारत जनतेशी सल्ला मसलत करण्यासाठी बांधली होती. या इमारतीमध्ये खांबावर एक दगडी चबुतरा बांधलेला आहे, तिथून निघणारे चार रस्ते आहेत. हा भाग तरंगत्या गॅलरीप्रमाणे आहे. मधल्या दगडी चबुतऱ्यावर स्वतः अकबर बसत असे आणि चार रस्त्यांवर त्याचे खाजगी माणसे बसत असे. आतून ही इमारत नाजुक नक्षीकामाने सजली आहे.

**जामा मशीद:**

जामा मशीद ही फतेपुर सिक्री मधील सर्वात भव्य व सुंदर इमारत आहे. तिचे आतील पटांगण विस्तीर्ण असून मुख्य प्रार्थना स्थळाचे प्रवेशद्वार हे कमानदार घुमटयुक्त आहे. कडेच्या संरक्षक भिंतीवर, खांबावर उभारलेली छत्री त्याचबरोबर पटांगणाच्या चारी बाजूंना एक छायादार मार्ग, वेगवेगळ्या प्रकारचे खांब आणि सजावटी वापरल्या आहेत. पर्सी ब्राऊनच्या म्हणण्याप्रमाणे, "या पूजास्थानाची योजना व कार्यवाही ज्या उत्कृष्टरीतीने केली आहे त्यामुळे या मशिदीचे रूप विलोभनीय झाले आहे."

**शेख सलीम चिश्तीचा मकबरा:**

जामा मशिदीच्या आतील पटांगनात सफेद संगमरवरने हा मकबरा बांधलेला आहे. पर्सी ब्राऊन यांच्या मते, अकबरानंतरच्या राज्यकर्त्यांनी हा लाल दगड बदलून संगमरवरी बनविले आहे. डॉ. व्ही. ए. स्मिथ यांच्या मतानुसार, या मकबऱ्यावर हिंदू बांधकाम शैलीचा प्रभाव आहे.

**जोधाबाई महाल:**

ही इमारत हिंदू शैलीनुसार बांधलेली आहे. पर्सी ब्राऊन व हेवेल यांच्या मतानुसार, हे बांधकाम गुजरातच्या कारागिरांकडून केल्यामुळे या महालाच्या शैलीवर हिंदू कलेचा प्रभाव आढळतो. ही वास्तु एखाद्या मंदिराप्रमाणे आहे.

### १०.६.६ जहांगीर:

जहांगीरचा जास्त ओढा चित्रकलेकडे असल्यामुळे स्थापत्य कलेत त्याने फारसे लक्ष दिले नाही. अकबराने आग्र्याजवळील सिकंदरा येथे आपला मकबरा बनवण्याचा आराखडा तयार करून ठेवला होता. ही आराखड्याची योजना त्याचा मुलगा जहांगीर याने कार्यान्वित केली. ही जहांगीरच्या काळातील पहिली वास्तु आहे.

हा मकबरा हुमायूनच्या मकबराच्या तुलनेत वास्तुकलेच्यादृष्टीने कमी प्रतीचा आहे. हा मकबरा उद्यानाच्या एका मोठ्या चौरसावर बनवला आहे. त्याच्या मुख्य भागावर कमानी आहेत. या मकबऱ्यावर तीन मजले आहेत. त्याचा पहिला मजला वालुकामय दगडांनी बनलेला आहे, तर त्याचा दुसरा मजला जहांगीरने बनवला आहे आणि सगळ्यात वरचा मजला हा संगमरवरापासून बनवला आहे. या मकबऱ्याची कृती पिरामिडसारखी बनवण्यात आली आहे. मकबऱ्याच्या चारही कोपऱ्यात चार संगमरवरी उंच मनोरे आहेत. असे मनोरे उत्तर हिंदुस्थानातील स्थापत्यात प्रथमच आलेले दिसतात. इमारतीचा आतील भाग रंगाने सजवला असून त्यामध्ये फ्रेस्को, इनले काम व मोजाईकच्या फरशा यांचा वापर केला आहे. यातील विशेष कलाकृती म्हणजे वालुकामय दगडाने बनवलेला मकबऱ्याचा दरवाजा ज्यामध्ये संगमरवरचे नक्षीकाम आहे.

जहांगीरच्या काळातील उल्लेखनीय वास्तू म्हणजे लाहोर जवळ असलेला त्याचा मकबरा. या मकबराचे बरेचसे बांधकाम जहांगीरच्या मृत्यूनंतर त्याची पत्नी नूरजहाने केले. हा मकबरा मुघल परंपरेनुसार उद्यानाच्या मधोमध आहे. दुसरे उल्लेखनीय उदाहरण म्हणजे काश्मीर येथील 'निशांत बाग' साम्राज्याचा विशिष्ट मनसबदार आसफखान यासाठी जहांगीरने तयार केली. जहांगीरच्या शासन काळात त्याने जास्त करून बगीचे बनवण्यावर भर दिला.

### १०.६.७ शाहाजान:

शाहजहानचा काळ हा स्थापत्यकलेचे सुवर्णयुग मानला जातो. स्थापत्यकलेसंबंधी आपली तीव्र इच्छा त्याने अनिर्बंधपणे प्रकट केली. त्याच्या स्वभावातील नखरेलपणा व महत्वकांक्षा हे पैलू स्थापत्य कामाविषयक आवडीला मुख्यत्वे प्रेरक ठरले होते. बी. पी. सक्सेना म्हणतात, "नखरेलपणा लोकांकडून कौतुक करून घेण्यास नेहमीच हपापलेला असतो; आणि शहाजहानच्या हे लक्षात आले असावे की असे कौतुक तर भव्य वास्तू उभारूनच कायम मिळविता येईल. दुसरे असे की त्याच्या महत्त्वकांक्षी स्वभावाने त्याला नेहमीच एकमेव अद्वितीय अशी कामे करण्यास उद्युक्त केले. चित्रकलेच्या क्षेत्रात आणखी प्रगती करण्यास वाव नव्हता; म्हणूनच, तो स्थापत्यशास्त्राकडे वळला त्यात सुधारणा करण्यास त्यास पुष्कळ वाव होता. त्याच्या कारकीर्दीत उभारल्या गेलेल्या इमारतींमुळे त्याचा नखरेलपणाचा हव्यास आणि महत्त्वकांक्षा या दोघांचे समाधान झाले असावे".

याच्या काळात संगमरवर दगडाचा अधिक वापर करण्यात आला. हे संगमरवर विशेष करून जोधपूरच्या मकराना या ठिकाणावरून आणले जात होते. याच्या काळात संगमरवराच्या नक्षीकामाचे 'पिएत्रा डोरा' ही पद्धत वापरण्यास सुरुवात झाली. ज्यामध्ये रंगीत दगडांना शुभ्र संगमरवरामध्ये नाजूक नक्षीकामाने बसविले जाते. घुमटीच्या शैलीमध्ये आता फारसी

शैली दिसू लागली होती. आग्रा किल्ल्यातील 'दिवाण-ए-खास' ही संगमरवराने बनलेली पहिली वास्तू होती. यानंतर 'मोती मशीद' ही वास्तू संगमरवराने निर्माण केली. आग्रा किल्ल्यातील खास महाल, शिष महाल, नगीना मस्जिद इ. निर्मितीसाठी संगमरवराचा वापर करण्यात आला. यात सर्वात सुंदर आणि आकर्षक मोती मशीद आहे.

शाहजहाने आपली राजधानी दिल्ली येथे नेल्यावर; त्याठिकाणी लाल किल्ला, त्यातील रंगमहाल व दिवाण-ए-आम या वास्तू बांधल्या आणि त्या सर्व उल्लेखनीय आहेत. बेगम मुमताज हिच्या स्मरणार्थ बांधलेली कबर म्हणजेच 'ताजमहाल' हे जगातील सात आश्चर्यांपैकी एक आहे आणि तो वास्तुकलेचा अद्वितीय नमुना मानला जातो.

**मोती मशीद:**

इसवी सन १६५४ मध्ये ही मशीद बांधण्यात आली. हिच्या दर्शनी भागात प्रमाणबद्ध कमानी आहेत. या मशिदीसाठी वापरलेला दगड अगदी नितळ आणि उत्कृष्ट दर्जाचा आहे. या सर्व गोष्टींमुळे स्थापत्यास एका प्रकारची अवर्णनीय शोभा प्राप्त होऊन ती एखाद्या मोठ्या प्रमाणे चमकते; म्हणून, हिला मोती मशीद असे म्हटले जाते.

**लाल किल्ला (दिल्ली):**

हा संपूर्ण किल्ला लाल दगडांनी बांधलेला आहे म्हणून त्याला लाल किल्ला असे म्हणतात. या किल्ल्याला उंच व भक्कम अशी तटबंदी असून मध्यावर प्रवेशद्वार आहे, ते समारंभाच्या प्रसंगी उपयोगात आणता येते. त्याला 'लाहोर दरवाजा' असे म्हणतात. दुसरे खाजगी प्रवेशद्वार दक्षिणेकडे आहे. रंग महाल व प्रेक्षकांचा दिवाणखाना या इमारतीमध्ये साम्य आहे. चारही बाजूंना गुलाब लिली इत्यादी फुलांची जडाव काम आहे तसेच येते पाणी उत्तम प्रकारे वाहते खेळवलेले दिसून येते. याला 'निहार-ए-बाहित' म्हणजेच स्वर्गातील कालवा असे म्हणतात. रंगमहालात कमळाच्या आकाराचे कारंजे स्थापत्याच्या चौकटीत अत्यंत कलात्मकतेने बसवलेले आहे.

**दिवाण-ए-आम**:

ही इमारत खूपच सुंदर व आकर्षक आहे. बाहेरच्या बाजूस ५ मेहराबयुक्त विस्तृत मार्ग आहे. त्यावर सुंदर रंगकाम केले आहे. याला सुंदर संगमरवरी फरशी असून त्यावर फुलांची नक्षी आहे. छतावरही नक्षी कोरली आहे. या इमारतीच्या सौंदर्याबद्दल कवी फिरदौसीने लिहिले आहे की, अगर फिरदौसी बर रुए जमी अस्त | हमी अस्त, यूं हमी अस्त | (जर पृथ्वीवर स्वर्ग असेल तर तो हा आहे, हा आहे.)

**दिवान-ए-आम:**

लाल किल्ल्यातील आणखी एक महत्त्वाची इमारत म्हणजे दिवाण-ए-आम. तिचा उपयोग दरबारी कामासाठी केला जात असे. याच वास्तूमध्ये प्रसिद्ध असलेले शाहजानचे मयुरासन ठेवले होते. ही इमारत लाल दगडाची असली तरी तिच्या पुष्टभागावर शंख - शिंपल्याच्या भुकटीचे प्लास्टर असल्यामुळे गुळगुळीत झाली आहे म्हणून ती संगमरवरसारखी भासते.

**ताजमहाल:**

ही वास्तु १६४३ मध्ये बांधण्यास सुरुवात झाली. आपली पत्नी अर्जूमंद बानू बेगम उर्फ मुमताजच्या स्मरणार्थ वास्तु बांधण्यात आली. जगातील सात आश्चर्यामध्ये या वास्तुला मानले जाते. डॉ. व्ही. ए. स्मिथ यांच्या मते, ताजमहाल वास्तु यूरोप व आशियातील कारागिरांच्या गुणवत्तेचे सार आहे. ताजमहालची रचना व बांधकाम कोण्या एका इटालियन किंवा अन्य युरोपियन स्थापत्यकाराच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली; असा समज होता. तो समज सर जॉन मार्शल, पर्सी ब्राऊन आणि ई. बी. हॉबेल यांसारख्या जगतविख्यात कला समीक्षकांनी खोटा ठरविला. ताजमहाल ही पूर्णतः भारतीय स्थापत्यकारांची, कारागिरांची आणि कलाकारांची निर्मिती आहे. उस्ताद अहमद लाहोरी हा त्याचा प्रमुख रचनाकार होता. 'नादिर- उल-असर' या उच्च किताबाने बादशहाने त्याचा गौरव केला होता. दिवाण आफ्रिदी या लेखकाने ताजमहालच्या निर्मितीशी संबंधित असलेल्या अनेक स्थापत्यकार व कारागिरांचा उल्लेख केला आहे. त्यामध्ये आलेली काही नावे पुढीलप्रमाणे, मुकरमत खान आणि अब्दुल करीम (स्थापत्यकार), इमानतखान शिराझी (अरबी भाषेतील लेख करणारा), इस्माईलखान रुमी (घुमट बांधणारा), उस्ताद इसाखान (आग्र्याचा गवंडी), उस्ताद पिरा (दिल्लीचा सुतार), बानूहर, झटमल आणि जोरावर (दिल्लीचे शिल्पकार), राममल काश्मिरी (ताजमहाल भवतीचे बगीचे तयार करणारा तज्ञ माळी) इत्यादी. इमारती उभारण्याचे काम प्रामुख्याने मुस्लिम कारागिर यांनी केले. तर, कोरीव कामाची जबाबदारी हिंदू कारागीरांकडे होती. पिएत्रा डोरा तयार करण्याची सर्वाधिक कठीण कामगिरी कनोजहून आणलेल्या हिंदू कारागिरांच्या एका गटाकडे सोपविण्यात आली होती. असे सांगितले जाते की शुभ्र धवल संगमरवराच्या जोडीला जे सुमारे वीस प्रकारचे मौल्यवान खडे ताजमहालच्या जडणघडणीत वापरण्यात आले होते ते भारताच्या विविध भागातून आणि सिलोन, कंदाहार, येमेन आणि इराण अशा अन्य ठिकाणाहून मागविण्यात आले.

**१०.६.८ औरंगजेब:**

औरंगजेबच्या काळात त्याच्या पूर्वजाच्या तुलनेत कमी वास्तु निर्मिती झाली. ज्या वास्तु निर्माण झाल्या त्या साधारण दर्जाच्या आहेत. औरंगजेबाने कोणत्याच कलेला राजाश्रय दिला नाही. त्याने बांधलेल्या वास्तूंमध्ये लाहोरची बादशाही मशीद, औरंगाबाद येथील बेगम रबिया-उद-दौरानी (बीबी का मकबरा), मथुरेची मशीद इ. चा उल्लेख करता येईल.

**बादशाही मशीद:**

बादशाही मशीद ही लाहोर येथे स्थित असून इसवी सन १६७४ मध्ये ती बांधण्यात आली आहे. याचे मिनार खूप उंच आहेत. याचा आकार आणि निर्मिती मोती मशिदीसारखी आहे. त्यामध्ये एक मोठे सभागृह, उभ राहून प्रार्थना करण्यासाठी खोली. प्रार्थना स्थळाच्या प्रत्येक कोपऱ्याला चार छोटे मिनार आहेत. यासाठी जास्त करून लाल वालुकामय दगडाचा वापर केलाय.

**बेगम रबिया-उद-दौरानीचा मकबरा (बीबी का मकबरा):**

हा मकबरा औरंगाबाद येथे स्थित असून त्याची पत्नी रबिया-उद-दौरानी हीच्या स्मरणार्थ बांधण्यात आला आहे. तिचा पुत्र आझम याने हे बांधकाम पूर्ण केले आहे. पर्सी ब्राऊन मानतो की, "मकबराची शैली ताजमहालाची मिळती जुळती आहे किंवा यास दुसरा ताजमहाल असे मानले जाऊ शकते". परंतु खरे पाहता ही वास्तु नक्षी व कलात्मकता या दृष्टीने ताजमहालच्या तुलनेने कमी आहे. कबरीच्या चारी बाजूला केलेले शिल्पकारे सुंदर आहे. या मकबऱ्याच्या लोखंडी दरवाजावर पानाफुलांचे नक्षीकाम केलेले आहे. औरंगजेबाच्या काळात मुघल वास्तुकलेचा किती झपाटाने रास होऊ लागला हे या इमारतीवरून लक्षात येते.

**आपली प्रगती तपासा:**

१) अकबराच्या काळातील स्थापत्य कलेवर चर्चा करा.

________________________________________
________________________________________
________________________________________
________________________________________

२) लाल किल्ला व ताजमहाल या जगविख्यात स्थापत्य कलेवर टीपा लिहा.

________________________________________
________________________________________
________________________________________
________________________________________

## १०.७ सारांश

मध्ययुगीन कालखंडातील कला व स्थापत्यकला यांचा विचार केल्यास, सुलतान काळापेक्षा मुघल कलेत वास्तुकला, चित्रकला, संगीत इत्यादी कलांचा विकास अधिक झालेला आहे. वास्तुकलेस अकबर व शहाजहानचा कालखंड अधिक प्रेरणादायी ठरला. तर चित्रकलेस अकबर व जहांगीरचा कालखंड विकासदायी होता. या काळात वास्तुकला, चित्रकला, गायन, संगीत इत्यादी सर्वच कलांचा कमी जास्त प्रमाणात विकास होत गेला असे दिसते. मध्ययुगात एकूण कला व वास्तुकलेच्या विकासाला चालना मिळत गेली असे मानता येते. मुघल हे सत्ताधीश असल्यामुळे त्यांनी इस्लामी स्थापत्येचा भारतात विकास केला. परंतु भारतातील प्रादेशिक हिंदू राज्यकर्त्यांनी संबंधित राज्यात प्रादेशिक शैलीचा विकास केला.

## १०.८ प्रश्न

१. मुघलकालीन चित्रकलेविषयी टिप्पणी लिहा.

२. शाहजहानच्या काळातील स्थापत्य शैलीची माहिती लिहा.

३. मुघलकालीन संगीत कलेविषयी स्पष्ट लिहा.

४. मुघलकालीन कला व स्थापत्यकलेचे टिकात्मक परीक्षण करा.

५. अकबर व शहाजहान कालीन स्थापत्यकला ह्या जगविख्यात स्थापत्य कला का आहेत? स्पष्ट करा.

## १०.९ संदर्भ


- केतकर संध्या, भारतीय कलेचा इतिहास, ज्योत्स्ना प्रकाशन, पुणे, २०१६.
- वर्मा हरिश्चंद्र, मध्यकालीन भारत (भाग २) (१५४० - १७६१), दिल्ली विश्वविद्यालय, प्रथम आवृत्ती, दिल्ली, २०१७.
- शर्मा सतीशचंद्र, मध्ययुगीन भारत : मोगल साम्राज्य (१५२६ - १७४८), (खंड २), के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१७.
- मेहता जे. एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास (खंड २), आवृत्ती चौथी, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१६.
- मेहता जे. एल., मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास (खंड ३), आवृत्ती तीसरी, के सागर पब्लिकेशन, पुणे, २०१४.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: १, तिसरी आवृत्ती, प्रकाशिका सौ. आर. के. चिटणीस, पुणे, २००३.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: २, दुसरी आवृत्ती, प्रकाशिका सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८७.
- चिटणीस, के. एन.,मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग: ४, प्रथम आवृत्ती, प्रकाशिका सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८५.
- भिडे गजानन, नलावडे विजय, नाईकनवरे वैजयंती, मध्ययुगीन भारत (सामाजिक, आर्थिक आणि संस्कृतीक इतिहास), फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.
- पवार विश्वनाथ, डॉ. शिंदे, मुघलकालीन भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.
- आचार्य धनंजय, मध्ययुगीन भारत, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर-१०


*****